# ख्रिस्तायन


नाताळ ई - अंक ♦ वर्ष दहावे ♦ २५ डिसेंबर २०२० ♦ संपादक ख्रिस्तोफर रिबेलो



BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD

ESTD.1918

(SCHEDULED BANK)




Call:9527441600 | Toll free no 1800 233 6000 / 1800 266 2407

Follow us at : | www.bccb.co.in

# ख्रिस्तीयन

## नाताळ ई-अंक वर्ष दहावे

## २५ डिसेंबर २०२०


## संपादक : ख्रिस्तोफर रिबेलो

### सहसंपादक – एडवर्ड डिसोजा

### संपादन साहाय्य

स्मिता ख्रिस्तोफर रिबेलो

पायस तुस्कानो

### तांत्रिक सहकार्य

स्वप्निल लुईस रिबेलो

### मुखपृष्ठ

पॉल डिमेलो, गास

## संपर्क / अभिप्राय

आमच्याशी संपर्क साधावयाचा असल्यास आणि आपल्याला काय आवडलं, काय नाही ते आम्हाला कळवण्यासाठी खालील पत्त्यांवर ई-मेल करा वा फोन करा


खिस्तोफर रिबेलो :-

chrisrtayan25online@gmail.com

(9819436078)


## आभार


आमचे सर्व लेखक, कवी, हितचिंतक व प्रसिद्धी देणारे सर्व प्रसार माध्यमे यांचे " ख्रिस्तायन" तर्फे मन:पूर्वक आभार व नाताळ आणि नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा.


या अंकात प्रसिद्ध झालेल्या मताशी संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही


© सर्व हक्क लेखक व कवींच्या स्वाधीन

# अंतरंग ...

## संपादकीय...

## कथा / ललित लेख :-


प्रमाणभाषा आणि बोलीभाषा - फा. फ्रान्सिस दिब्रिटो

जोतिबा- चांगला शोमरोनी - डॉ. अनुपमा निरंजन उजगरे

"चोर चांदणं" - माधवी घारपुरे

बोधकथा - मुकेश माचकर

इच्छापूर्ती (विज्ञान कथा) जोसेफ तुस्कानो

वेश्या माझ्या सांगाती...! - जॉन कोलासो

अब की बार.........सरकार! - वर्जेश ईश्वरलाल सोलंकी

अमितची गोष्ट.. - फ्रान्सिस आल्मेडा सर

ती वाट सुंदर होती... - स्टॅन्ली गोन्सालविस

स्निग्ध चांदणे - नेहा किशोर सावंत

कंदिलाच्या प्रकाशात – जॉन गोन्सालवीस

स. ना. सूर्यवंशी ख्रिस्ताप्रमाणे संघर्षवादी. - फा. मायकल जी

वेशसंकल्पन (कॉश्च्युम डिझाइनिंग) शिकवताना.... - नीरजा पटवर्धन

पावित्र्याचे आठ नमुने - फा. (डॉ.) रॉबर्ट बी. डिसोजा

आमच्या पोरांनी आम्हांला.... - सिडनी जस्टीन मोरायस

त्रिवेणीसंगमावर.... - संकलन – फा. वेन्सी डिमेलो

खऱ्या सुखाचा मार्ग - फा. (डॉ.) एलायस रॉड्रिग्ज

नजर न लग जाए - सॅबी परेरा

अपकार की उपकार - संदीप राऊत

स्वत:च्या विवेकाने जगणे – ॲड. अतुल आल्मेडा

१२ सेकंदाचा कॉल - सुहास बिऱ्हाडे

उद्योजकीय करियर - प्रकाश आल्मेडा

"खोटी धार्मिकता हा खरा स्वतः चा घात." - -आशिष जयराज शिंदे

ख्रिसमस- प्रेमाचा व सेवेचा उत्सव! -फा. आसिस रॉड्रिग्ज

जगतो जीवन नव्हे मी माझे - सचिन मेंडिस

कमला हॅरीस यांचे भाषण - अनुवाद- मॅक्सवेल लोपीस

त्याचं देऊळ, त्याचा देव.... आलेक्स मच्याडो

स्त्री उद्धारक- येशू ख्रिस्त डॉ .नेन्सी विन्सेंट डिमेलो

निर्मळ नाका आणि आमचा ग्रुप - जेजू परेरा

फिल्म लाईन - सेविन तुस्कानो

धर्म, प्रेमाचा! - बॅप्टिस्ट वाझ

“सरीवर सरी....” - कल्पना रॉड्रिग्ज

संवाद - फा. नोबेल मेन

बॉलिवूड अन काश्मीर - सौ. वासंती प्रकाश घाडगे

‘रिस्क’ - रॉबर्ट फर्नांडिस

बदल... - अशोक दिब्रिटो

एक 'तारा' - एमेल आल्मेडा

भटकंती - सुनिता बर्नड परेरा

जोडूया नवीन नाती अॅड. जॉन रॉड्रिग्ज

माझे कुटुंब, माझी जबाबदारी – राजेश्री कणीकर

तू... - संगीता वाझ

ख्रिस्तालय - सुनील सायमन डिमेलो

मधु मालती - शुभांगी पासेबंद

ऑनलाइन शिक्षण आणि खोळंबा पायस आलेक्स तुस्कानो

एक होती मॉडर्न वसई फ्रॅंक डॉ. मिरांडा

हवे नव्या जीवनशैलीचे नियोजन. - एडवीन डाबरे

खरी शिकवण - रोहित परेरा

मी कोरोना बोलतोय दुर्गाप्रसाद खांडाळेकर

## कविता / चारोळया :-

इग्नेशियस डायस
सबिना फोस
आयवन क्रास्टो
प्रवीण पाटील
आयवन डिकुन्हा
स्वीनी डिमेलो

फेलिक्स डिसोजा
फा. वेन्सी डिमेलो
अॅलेक्स मच्याडो
किरण मोरे
रचना रॉड्रिग्ज
सुनिल सोकाळकर

महेश लीलापंडित
नंदन पाटील
फ्रॅंक डॉ. मिरांडा
ब्रायन मेंडिस
मेल्सीना तुस्कानो परेरा

## कलाकुसर :-

पॉल डिमेलो, ऑस्टिन डाबरे, रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज,

लिओनार्ड रिबेलो, ऑल्विन कोरिया, ऑल्विन परेरा, ज्योएल फुट्यार्डो

# संपादकीय ...

वाचक मित्र-मैत्रिणींनो, सर्वप्रथम नाताळ सणाच्या हार्दिक शुभेच्छा.

आम्हा ख्रिस्ती धर्मीयांमध्ये आनंदाचं उधाण घेवून येणारा हा सण. या नाताळ सणाच्या धामधुमीत आम्हीही सामील झालो आहोत आणि आपणासाठी हा नाताळ अंक रूपी फराळ घेऊन आलो आहोत. दिवाळी सण आणि दिवाळी अंक हे जसे अतूट नाते आहे तसेच नाताळ सण व नाताळ अंक यांचे नाते व्हावे अशी आमचे स्वप्न आहे आणि ते आम्ही १८ वर्षाअगोदर प्रथम छापील स्वरुपात अंक प्रकाशित करून प्रत्यक्षात आणले होते आणि गेली दहा वर्षे हा अंक ऑनलाइन प्रकाशित करून ते पुढे नेत आहोत. वसईमध्ये ख्रिस्ती लोक बहुसंख्येने आहेत आणि सर्वांची भाषा मराठी आणि त्यात चोखंदळ वाचक, त्यामुळे मराठी साहित्याचा भरभरून आस्वाद घेतला जातो. नाताळ सणानिमित्ताने ‘सुवार्ता’, ‘जनपरिवार’, ‘निर्भय जनआंदोलन’, ‘वसई टाइम्स’, संक्रमण आदी मासिक/साप्ताहिक नियतकालिकांचे नाताळ विशेषांक त्याचबरोबर ‘गीत’ हा नाताळ अंक छापील स्वरुपात प्रकाशित होतो परंतु “ख्रिस्तायन” हा पहिला व एकमेव ऑनलाइन नाताळ अंक आहे.

मंडळी, यावर्षी मार्च महिन्यात कोरोनाचे अनपेक्षित वादळ संपूर्ण जगावर घोंगावत आदळले. सामाजिक, आर्थिक अशा अनेक समस्यांना ते सोबतीला घेऊन आले. मध्ये काही काळ तर सर्व व्यवहारच ठप्प झाले, जग जणू आहे त्या स्थितीत ‘स्टॅच्यू’ झाले. प्रत्येक आरंभाला अंत आहे, तसा याही परिस्थितीचा शेवट होईल, कोरोनावर लस येईल, इतर रोगांसारखा तो ही आपल्या जीवनाचा भाग होईल, परंतु काही प्रश्न अनुत्तरित राहतील, काही नवीन गोष्टी उदा. ‘मास्क, स्टॅनिसायझर, सोशल डिस्टंसिंग’ ह्या अंगवळणी पाडाव्या लागतील. जग बदलत आहे. लॉकडाउननंतरही ते सतत बदलत राहणार आहे. लॉकडाउन काळात खूप गोष्टी ऑनलाइन झाल्या, ऑफिसचे काम घरून ऑनलाइन सुरू झाले, मुलांची शाळा-कॉलेज ऑनलाइन झाली आणि त्याबरोबर ऑनलाइन वाचनही वाढले. वर्तमानपत्रापासून नियतकालिके आणि पुस्तकेही ऑनलाइन वाचली जाऊ लागली. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे ई-बुक आणि ऑडिओ बुक या संकल्पना प्रत्यक्षात आल्या आणि आता तर त्या सर्रास वापरल्या जाऊ लागल्या आहेत. आम्हीही दहा वर्षाअगोदर काळाची पाऊले ओळखून हा अंक ऑनलाइन सुरू केला.

या अंकात ९३व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष फादर फ्रान्सिस दिब्रिटो यांनी बोलीभाषा महत्वाच्या कशा आहेत यावर प्रकाश टाकला आहे. उस्मानाबाद येथे झालेल्या या संमेलनात थोर साहित्यिका डॉ. अनुपमा उजगरे आणि ऑस्करवारी करणाऱ्या ‘श्वास’ या मराठी चित्रपटाच्या लेखिका माधवी घारपुरे यांची ओळख झाली, त्यांनी विनंतीला होकार दर्शवून अंकात आपला सहभाग दर्शविला, जोतिबा हे कसे सेवाभावी होते हे उजगरे यांनी उधृत केले आहे तर “चोराच्या मनातही चांदणं” येऊ शकतं हे सुंदर कथेद्वारे घारपुरे यांनी संगितले आहे. ‘मार्मिक’चे संपादक मुकेश माचकर यांच्या अनोख्या बोधकथा, वेश्या ह्या सांगाती होऊ शकतात हे जॉन कोलासो ह्यांनी स्वत:च्या अनुभवातून सांगितले आहे. अबकी बार सरकार कसे येते ते वर्जेश सोलंकी यांनी विनोदी शैलीत मस्त मांडले आहे. फा. दिब्रिटो हे स्निग्ध चांदणे कसे हे नेहा सावंत यांनी आपल्या लेखात सांगितले आहे.

या अंकात प्रवास वर्णन, कथा, व्यक्तिचित्रे धार्मिक तसेच काही विशेष विषयांवरचे लेखही समाविष्ट आहेत. अंकात समावेश असलेले मान्यवर लेखक-कवी यांना मी दरवर्षी लिहायला सांगून त्रास देत असतो, पण आजपर्यंत एकाही व्यक्तीने नकार दर्शविला नाही. मानधनाची अपेक्षा न करता फक्त या उपक्रमाला साथ म्हणून माझ्या विनंतीला मान देऊन या प्रवासात मला सोबत करतात, म्हणूनच हे सर्व सुहृद मला माझे कुटुंबियच वाटतात. मी हक्काने मागतो आणि ते देतात. मी या सर्वांच्या सदैव ऋणात राहू इच्छितो.

आम्ही हा अंक ‘पीडीएफ’ स्वरुपात देत आहोत, त्यामुळे आपणास अंक वाचण्यासाठी पूर्ण वेळ ऑनलाइन असण्याची गरज नाही. त्याचबरोबर या अंकाचे अँड्रॉईड ॲपही आहे. प्ले स्टोअर वरुन आपण हा अंक डाऊनलोड करून नंतर आपल्या सोयीप्रमाणे अगदी मोबाईलवरही वाचू शकता. आपण हा अंक वाचल्यानंतर इतरांनाही कळवा.. आणि आपल्या सूचना आणि अभिप्रायांची देखील आम्ही वाट पाहत आहोत..

**नाताळ सणाच्या व नव वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!!!**

**Merry Christmas & Happy New Year.**

# प्रमाणभाषा आणि बोलीभाषा

फादर फ्रान्सिस दिब्रिटो
अध्यक्ष, ९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन.

प्रमाणभाषा आणि बोलीभाषा असा एक वाद साहित्यक्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून होता. प्रमाणभाषा श्रेष्ठ आणि अधिकृत याउलट बोलीभाषा असंस्कृत म्हणून दुय्यम दर्जाची आणि निकृष्ट, कमी दर्जाची! परंतु अलीकडे भाषाशास्त्रज्ञांनी सप्रमाण सिद्ध केले आहे की भाषेच्या विकासासाठी बोलीभाषांचा अंतर्भाव नितांत आवश्यक आहे. असंख्य झरे, ओढे आणि नाले मिळूनच नदीला महानदीचे रूप प्राप्त होते. प्रमाण भाषा आणि बोलीभाषांचंही नातं त्याच धर्तीचं आहे.

खेड्यापाड्यात पसरलेल्या आणि डोंगरदऱ्यात विखुरलेल्या महाराष्ट्राच्या विविध भागांत बोलल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या बोलींभाषांमुळेच मराठी प्रमाणभाषा समृद्ध झाली आहे हे नाकारता येत नाही. म्हणूनच अलीकडे बोलीभाषेचे अध्ययन आणि संशोधन होत आहे ही स्तुत्य बाब आहे. बोलीभाषांच्या विकासाच्या अंगानेच मराठी प्रमाणभाषेचा विकास साधणार आहे.

चंद्रपूर जिल्हा परिसरात मोठ्या प्रमाणात बोलल्या जाणाऱ्या 'गोंडी' या बोलीभाषेत विपुल प्रमाणात लेखन झाले आहे ही गोष्ट कौतुकास्पद आणि उत्साहवर्धक आहे तितकीच अनुकरणीय आहे.

बोलीभाषेच्या विकासासाठी तेथील बिशप रॉड्रिगेस जोन्स आणि समविचारी विद्वानांनी एकत्र येऊन गोंडी बोलीभाषेत तीन ग्रंथांची निर्मिती केली आहे, ही अखिल मराठी साहित्य विकासप्रक्रियेतील प्रशंसनीय आणि स्वागतार्ह बाब आहे. मी या विधायक कार्याबद्दल त्या सर्वांचे मनापासून अभिनंदन करतो, धन्यवाद देतो आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो.

मराठी भाषा अधिक समृद्ध होण्यासाठी बोलीभाषेतील शब्द प्रमाणभाषेत यायला हवेत. उदाहरणार्थ. आमच्या सामवेदी बोलीभाषेतील 'रगाजळ' हा शब्द ज्याचा मूळ मराठी अर्थ 'रक्त जाळणे' असा आहे किंवा 'हाकोटे' ज्याचा अर्थ 'भल्या पहाटे' असा आहे हे शब्द जर प्रमाण मराठी भाषेत आले तर मराठी भाषेची लज्जत आणखी वाढण्यास नक्कीच मदत होईल. जसे अहिराणी, खानदेशी, कोकणी किंवा मालवणी या बोलीभाषांतील काही शब्द प्रमाण मराठी भाषेत वापरले जात आहेत तसेच सामवेदी बोलीभाषेतील शब्द प्रमाण मराठी भाषेत समाविष्ट व्हायला हरकत नाही.

सामवेदी बोलीभाषेबद्दल आणखी एक अनोखी गोष्ट अशी की या भाषेने हिंदू धर्मातील सामवेदी ब्राम्हण आणि सामवेदी ख्रिस्ती कुपारी हे दोन्ही समाजांना एकत्र आणले आहे. या एकाच बोलीतून येशू ख्रिस्ताला आळवले जाते आणि श्रीकृष्णाचेही गुणगान गायले जाते. तसेच फा. फ्रान्सिस कोरिया यांच्या लेखणीतून 'सामवेदी बोलीभाषा-लोकसाहित्य' व 'सामवेदी ख्रिस्ती समाज' यासारखी ग्रंथसंपदा प्रसवते व डॉ. नरेश नाईक यांच्याद्वारे 'सामवेदी बोली - संरचना आणि स्वरूप' या सारखा प्रबंध उधृत होतो.

आजकाल सामवेदी बोलीभाषा भाषेतून साहित्य निर्मिती होत आहे, या भाषेच्या संवर्धनासाठी समाजातील काही तरुण नियतकालिक आणि इतर मार्गाने प्रयत्न करत आहेत, ही सर्व आश्वासक चिन्हे आहेत. ही चिन्हे दिशादर्शक ठरोत ही सदिच्छा.

---

**प्रिय वाचक मंडळी, पुढचा अंक हा '*वसई स्थानिक संस्कृती विशेषांक*' असणार आहे, त्यामुळे स्थानिक वसई समाजातील कला आणि क्रीडा क्षेत्रात ज्यांनी वसईचे नाव उज्वल केले आहे अशा नृत्य, गायन, वादन, संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला, हस्तकला तसेच विविध खेळांत खेळाडू यांची माहिती देण्यात येईल, कृपया सहकार्य करावे ही नम्र विनंती आहे.**

# जोतीबा : चांगला शमरोनी

■ डॉ. अनुपमा निरंजन उजगरे

*महंमद म्हणे निर्मिक तो एक ।। कल्पीना अनेक ।। जगामाजी ।।*
*भावंडाचे परी मानवा आळवी ।। सत्याने वळवी ।। ईशासाठीं ।।*
*देश जातीभेद अजि बुडविले ।। मूर्तीस फोडीलें ।। कुभांड्यांच्या ।।*
*दास्यत्वापासून बहु मुक्त केले ।। ईशाकडे नेले ।। जोती म्हणे ।।*[*१]

जोतीबा आस्तिक होते. देव एकच आहे असे मानत. पण त्याची एखादी मूर्ती करावी आणि तिची पूजा करावी, हे त्यांना मान्य नव्हते. ज्ञानदेवांच्या समाधीच्या दर्शनाला मात्र ते नित्यनेमाने आळंदीला जात. त्याचे लोकांना नवल वाटे. एकदा ते असेच आळंदीच्या वाटेवर जात असताना एका वाटसरूने त्यांना ओळखले. न राहवून त्याने विचारलेच–

"तुम्ही तर देवबिव मानत नाही मग आळंदीला कसे नेमाने जाता?"

त्याच्या प्रश्नावर जोतीबा हसून इतकेच म्हणाले,

"अहो, देव एकच आहे, तो सर्वत्र वास करतो. गरिबांना ह्याची खात्री पटावी म्हणून मी आपला जातो..."

पुढे ते काही बोलणार तेवढ्यात त्या जथ्यात चालणारा एक वृद्ध चक्कर येऊन खाली कोसळला. जोतीबा लगोलग धावत गेले. त्यांनी त्या वृद्धाचे मस्तक आपल्या मांडीवर ठेवले. आपल्या सोबत्यांना त्यांनी पाणी आणायला सांगितले. त्यातले दोघे पाणी आणायला गेले. विहीर दूर होती. पाणी काढायला जवळ भांडे नव्हते. श्री.नवले ह्यांनी आपले पागोटे काढले आणि त्यांच्या सोबत्याने आपले उपरणे काढले. त्या दोन्हीची गाठ मारून ते जोडले आणि विहिरीत चांगले चिंब होईपर्यंत बुडवले. धावतपळत जोतीबांकडे आणून दिले. ते कापड थोडे थोडे पिळून जोतीबांनी त्या वृद्धाला पाणी पाजले. मग त्याच कापडाने त्याचा चेहरा पुसला.[*२] त्या वृद्धाला जरा तरतरी आली. तो उठून बसला.

"दादा, बरं वाटतंय का आता?"

जोतीबांनी आपुलकीने विचारले. वृद्धाने होकारार्थी मान डोलवली. आपल्याजवळची चटणीभाकर तो नको म्हणत असताही जोतीबांनी त्याला खायला दिली. पोटात भर पडल्यामुळे वृद्धाला आणखीच हुशारी आली. त्याने कृतज्ञतेने जोतीबांपुढे हात जोडले.

गोरगरिबातल्या, भुकेल्या-तहानलेल्या एकाला जरी केलंत, तरी ते मला केल्यासारखं आहे.✝[३] ... हे येशूचे बोल जोतीबांना आठवले आणि तोच धागा पकडून ते म्हणाले,

''दादा, मी काही विशेष केलं नाही. मूर्तीला खाऊपिऊ घालण्यापेक्षा भुकेल्या-तान्हेल्या जिवंत माणसाला खाऊ-पिऊ घातलं तर ते देवाला केल्यासारखं असतंय. देव माणसातच असतो. कधी कुठल्या रूपात आपल्यापुढे येऊन परीक्षा बघेल, सांगता येत नाही...''

वृद्धाने समाधानाने मान डोलवली.

जोतीबांनी स्कॉटिश मिशनच्या शाळेत असताना बायबलमधली एक गोष्ट ऐकली होती—

एक माणूस प्रवास करत असतो. काही लुटारू त्याला मारहाण करून त्याच्याकडचे सगळे लुटून नेतात. तो अर्धमेला होऊन तिथे पडून असतो. त्या रस्त्यावरून त्याच्याजवळून एक धर्मगुरू जातो. तो त्याच्याकडे बघून न बघितल्यासारखे करतो. निघून जातो.

दुसरा एक माणूस तिथून जातो. तो फार देव करणारा असतो पण तोही त्याला पाहून तसाच टाकून निघून जातो. ही माणसे धार्मिक असूनही त्यांच्या मनात दयाबुद्धी किंवा सेवाभाव नसतो. त्या दोघांपैकी कुणालाही मदत करण्याची इच्छा नसते.

नंतर एकजण येतो. तो मात्र मनाने फार दयाळू असतो. जखमी माणसाला आधी मलमपट्टी करतो. मग त्याला घेऊन धर्मशाळेत जातो. तिथे त्याची व्यवस्था करतो. तो पूर्ण बरा होईपर्यंत धर्मशाळेच्या चालकाला त्याची सगळ्याप्रकारची काळजी घ्यायला सांगतो. लागतील तेवढे आणखी पैसे परत आलो की देईन म्हणतो आणि मगच पुढे जातो.

येशूची परीक्षा पाहण्यासाठी कुणा एका चिकित्सक बुद्धीच्या माणसाने येशूला विचारले होते –

''खरा शेजारी कोणाला म्हणावं ?''

ह्या प्रश्नाला उत्तर देताना येशूने ही गोष्ट सांगितली होती,▪[१] आणि गोष्टीच्या अखेरीस प्रश्नकर्त्यालाच येशूने प्रश्न विचारला होता–

''आता तूच सांग, त्या तिघांपैकी त्याचा खरा शेजारी कोण ?''

''त्या तिघांपैकी ज्याने त्याला मदत केली, तोच खरा शेजारी.''
त्या गोष्टीतला तो 'खरा शेजारी' — ▪२ 'गुड समॅरिटन'आज आपणही झालो आहोत...ह्या विचाराने जोतीबांना समाधान वाटले.

***

मित्रहो,
आपण परधर्मातील जे चांगले ते घ्यावे. ते कृतीत आणावे. जोतीबा मिशन शाळेत शिकले. तिथे बायबलमधील गोष्टी त्यांच्या कानावर पडत. त्यांनी बायबल हा ख्रिस्ती धर्मग्रंथही अभ्यासला होता. त्यातल्या ज्या गोष्टी आवडल्या त्या त्यांनी आपल्या कृतीत उतरवल्या.

ह्यापूर्वी एकदा तुम्हाला माहीत असलेल्या धर्मातील एक शिकवण लिहून एकमेकांना दाखवायला सांगितली होती, आठवते का ? आता एखाद्या जाणकार व्यक्तीला तुमच्या वयातील मुलांसाठी कोणता भाग अमुक धर्मग्रंथातून वाचावा हे विचारा. तो भाग वाचून काढा. त्यावर मित्रांशी चर्चा करा.

स्वत: विचार करा आणि मग तो विचार अमलात आणा.

**संदर्भ**

*१ महात्मा फुले समग्र वाङ्मय, पृ.५९०

*२ महात्मा जोतिराव फुले-पंढरीनाथ सिताराम पाटील, पृ.१७९.

✞३ बायबल : नवा करार : मत्तय २५:४० : ज्याअर्थी तुम्ही ह्या माझ्या कनिष्ठ बंधूंपैकी एकाला केले, त्याअर्थी ते मला केले आहे.

**टिपा**

▪१ बायबल : नवा करार :
लूक १०:२९-३७,
मत्तय २२:३४- १६

▪२ 'गुड समॅरिटन' : येशू ख्रिस्ताने सांगितलेल्या ह्या दाखल्यावरून सेवाभावी व्यक्तीला 'चांगला शमरोनी' म्हटले जाते.

# "चोर चांदणं"

• माधवी घारपुरे, कोलशेत रोड, ठाणे (प.) – ९८१९०३५७१२

शारदा बिट्टूला खांद्यावर घेऊन घरात येरझाऱ्या घालत होती. तिचं चित्त थाऱ्यावर नव्हतं. कधी एकदा शरद येतोय, याची ती वाट बघत होती.  बिट्टू खांद्यावर कण्हत होता. जोरदार तापाने फणफणला होता. तिचेच अंग तापत होते. शारदाच्या आई-बाबांच्या जिवाची घालमेल चालली होती. ६ महिने झाले, ठाण्यात जवळ असूनही मुलगी डोंबिवलीला आली नाही म्हणून दोन दिवस विश्रांतीसाठी आणि नातवासाठी म्हणून आली. एक दिवस चांगला गेला आणि दूसरे दिवशी बिट्टूला ताप भरला. सकाळपासून उगीचच अंग कोमटसर वाटत होते. पण तो छान खेळत होता. संध्याकाळी ७-८ नंतर ताप चढतच गेला. ६ महिन्यापूर्वी या वर्षाच्या मुलाला टायफॉइड नुसताच झाला नव्हता तर उलटला देखील होता. त्यातून  डॉ. पंडितानी त्याला वाचवला. डॉ. पंडित शारदासाठी देव होते. त्याची पूर्ण वर्षभर तरी काळजी घ्यावी लागेल असं त्यांनी बजावलं होतं. शारदानं काळजी डोळ्यात तेल घालून घेतली आणि काल ७-८ महिन्यांनी दोन दिवस डोंबिवलीला आली आणि...... शारदाला उगीचच पश्चाताप होत होता.  तिने ताबडतोब डॉक्टरना हॉस्पिटलला फोन केला. त्यांनी सांगितले, त्याला आत्तापुरते पॅरासिटीमॉल द्या आणि सकाळी १०च्या आत डायरेक्ट हॉस्पिटलला आणा, मग काय ते बघू.

शारदाने लगेच शरदलाही कळवलं. तो घाबरला पण 'सकाळी ७ पर्यंतच डोंबिवलीत येतो, तयार रहा, लगेचच निघू' म्हणाला म्हणून शारदा केव्हाची वाट बघत टिपं गाळत फिरत होती. आई सांगत होती, "काळजी करू नको, शरद येईल, तुम्ही पुढे जा, आम्ही दुपारचा डबा घेऊन येतो. वाटलं तर मी राहीन."

इतक्यात भीती वाटावी इतकी कर्कश बेल वाजली. दरवाजा उघडला. घाम पुसतच शरद आत आला.

"चल, चल. पिशवी भरली आहेस नां ?"

“हो” शारदा म्हणाली.

“अहो, चहा तयार आहे, अर्धाकप तरी घ्या” आई म्हणत होती.

“आता नको” म्हणून शरद दारातूनच निघाला. आलेली रिक्षा, तीच थांबवली होती. “येते गं आई, बाबा निघते” म्हणून शारदानेही चपला सरकवल्या आणि रिक्षेत जाऊन दोघे बसले.

“किती उशीर केलास रे ! ८ वाजल्यापासून काय ७ पासून तयार होऊन राहिले. १०च्या आत हॉस्पिटलला पोचायला हवं” शारदा म्हणताना डोळे पुसत होती.

“काळजी करू नको. वेळेत पोहोचू. अगं घरात २ हजारच होते.”

“अरे, आईने पण २ हजार दिलेत माझ्याकडे.”

“त्यांना शक्य तेव्हढे त्यांनी दिले, पण ४ हजारात काही होतं का ? हाताशी पुरेसा पैसा असता तर प्रायव्हेट ओला, उबेरने नसतो का गेलो ? अर्थात, ट्रेनने २० मिनटात जाऊ. मी राजा आणि मनोहरकडून ५ हजार घेतले. त्यांच्याकडे जाऊन येईपर्यंत उशीर झाला. शिवाय बिट्टूच्या जुन्या फाईल्स घेऊन आलो. त्या सापडत नव्हत्या इतकं करेपर्यंत वेळ गेला. सॉरी......”

“अरे सॉरी काय ? चल उतर, स्टेशन आलं.” दोघे रिक्षेतून उतरले. शरदने रिक्षेचे पैसे दिले. भराभर चालत सरकत्या जिन्याशी आले पण नेमका तो आता बंद होता. ट्रेन येत असल्याची अनाउन्समेंट झाली. शरदने बिट्टूला खांद्यावर घेतले. शारदाने पिशव्या, फाइल्स धरल्या आणि धापा टाकत दादरा चढले. जिना उतरले. गाडी प्लॅटफॉर्मला येतच होती. ०९.०५ची कर्जत लोकल एरवी फास्ट पण आज स्लोला आली. शरद म्हणाला, “शारदा, दिसेल तिथे चढ, मी बिट्टूला घेऊन कसाही चढतो. तू काळजी घे. पर्स सांभाळ.”

गाडीने डोंबिवलीत श्वास टाकला पण उतरणाऱ्यांच्या दुप्पट चढणारे जास्त. पोत्यात चुरमुरे भरून हलवावे तसे लोकलचे पोते हलले. प्रवासी उभे आडवे ॲडजस्ट असे झाले की न कोणी हात हलवू शकत, ना पाय, ना साधी मान उजवी डावीकडे वळवू शकत.

दिवा स्टेशन आलं आणि लटकू शकणारे चढले, बाकी खाली राहिले. गर्दीत अधिक घुसमटल्यासारखे झाल्याने बिट्टू रडायला लागला. त्याचे गरम अंग इतरांनाही जाणवत होते. “इतक्या तापांत काय  प्रवासाची हौस ! ......

लोक बोलत होते पण अशावेळी गप्प बसणे उचित असते याची जाण शरदला होती.

कुणीतरी म्हणाले, “पोराला जरा दोन्ही हातांनी उंच धरा, वारं लागलं तर जरा बरं वाटेल.”

“बरोबर आहे पण हात वर करणंही शक्य नाही” शरद म्हणत होता. आजूबाजूच्या लोकांनी एकेक इंच आपले अंग आखडून घेतले. शरदने बिट्टूला वर धरले. तो पडायची भीती नव्हतीच कारण हलताच येत नव्हते.

पूर्वी दाबून दाबून शेगडीत भुसा भरत तशी माणसं भरली होती. बिट्टूला हवा लागल्यावर जरा बरे वाटले पण मूंब्रा, कळवा गेले. शरदचा हात अवघडला पण खाली करणं अशक्य होतं. त्याने ठाणा येईपर्यंत कळ काढली आणि बिट्टूला घेऊन तो धड अंगानं उतरला.

शारदापण विसकटलेल्या केसानी, ओढल्या गेलेल्या पदरानी पर्स छातीशी कवटाळून उतरली. चक्करल्या सारखं झाल्यानं तिथंच १० मिनिटे बसली कारण दोघांच्यातीलही त्राण त्या २० मिनिटांच्या प्रवासाने काढून घेतले होते. हळूहळू चालत दोघेही रिक्षेला आले पण १०० - २०० ची रांग पाहून घाबरले. आणखी अर्धातास जाणार या कल्पनेनेच शारदाला रडू आले. तिथल्या एका पोलिसाला खरी हकीकत सांगितली आणि माणुसकी जिवंत असल्याची खूण पटली. १० मिनिटात त्याने रिक्षा थांबवून या दोघांना बसवले आणि पंडित हॉस्पिटलला पोचवायला सांगितले. एक टप्पा पार पडला. आता डॉक्टर काय सांगतात हे ऐकायला कान अधीर झाले होते. बिट्टूला घेऊन दोघे उतरले. शरदकडे बिट्टू असल्याने शारदाने रिक्षेचे ८० रू. दिले आणि दोघेही रिसेप्शनला आले.

“मी शरद गंधे. फोन केला होता. मुलाला घेऊन आलोय. डॉक्टर आलेत ना ? त्यांनीच १०ला यायला सांगितलय.”

“अहो, मिस्टर गंधे, प्लीज स्टॉप. धीरानं घ्या. धीरानं बोला. इथं सर्वचजण अपॉइंटमेंटनच आलेत. तुमच्याइतकीच घाई सर्वांना आहे. आम्हाला दोनच हात आहेत.

शिवाय काही प्रोसेस असते की नाही ? फॉर्म भरा. नंबर लावा. डॉक्टर आलेत. बोलावतील." इतके सगळे रिसेप्शनिस्टचे बोलणे ऐकून शरद खजील झाला. पण हॉस्पिटलला आपल्यालाच प्रथम घ्यावे असे प्रत्येक पेशंटला वाटते आणि आत गेलेला पेशंट लौकर का बाहेर येत नाही याचा राग आलेला असतो.

यथावकाश डॉ. पंडितांनी बिट्टूला चेक केले. काळजी नाही पण २ दिवस ऑब्झर्व करू. ॲडमिट व्हायला सांगितले. बिट्टूला घेऊन दोघे परत रिसेप्शनला आले. शारदाने घाईघाईत आईला फोन केला. शरदने फॉर्म भरला. रिसेप्शनिस्टने सांगितले,

"फॉर्म भरा आणि १०,०००/- रु. डिपॉझिटही." ओके म्हणुन शरदने बिट्टूला शारदाकडे दिले आणि पॅंटच्या मागच्या खिशात हात घातला तर तो सरळ बाहेर आला. अत्यंत बेमालूमपणे खिसा खालून कापून त्याचं पाकीट मारलं होतं.

शरद किंचाळलाच, "शारदाऽऽ ,गर्दीत मी बिट्टूला घेऊन हात वर करून उभा राहिलो आणि चोरानं किंवा खिसेकापूनं संधी साधली. १०,००० ला फटका बसला असं म्हणून तो मटकन खाली बसला. पाणी गळतं कुठं तर मिठाच्या गाडग्यावर ! अशीच स्थिती झाली. आत्ता पैसे नाहीत आणि मित्रांचे परत करायचे तो वेगळाच प्रश्न ! आणि बिट्टूची तब्येत महत्वाची. पोस्टातल्या क्लार्कचे पैसे बैंकेत असून असून किती असणार ? भगवंताऽऽऽ म्हणून शरदने कपाळाला हात लावला.

शरदचा धक्का अगदी स्वाभाविक होता पण आता शारदाने धीर धरला. म्हणाली,

"शरद, आता बिट्टू हा सेंटर पॉंईंट आहे. पैसा काय, जसा गेला तसा मिळेलही. आधी ॲडमिशन महत्वाची." शारदा धीराने काउंटरला गेली. रिसेप्शनिस्टला म्हणाली,

"झाला प्रकार तुमच्या देखतच तुम्ही ऐकलात. आम्ही जुने पेशंट. डॉक्टर ओळखतात म्हणून गैरफायदा घेणार नाही. ही माझी एक सोन्याची बांगडी इथे देते. ती सांभाळून ठेवा. याला आज जरा उतार पडला की मी ती विकून कॅश घेऊन येते आणि भरते. प्लीज डॉक्टरांना पण बोलू नका."

रिसेप्शनिस्ट म्हणाली “ताई, बांगडी ठेवा. आम्ही पण माणूस ओळखतो. लहान मुलांचं हॉस्पिटल आहे हे. निष्पाप जिवांशी कोणी खोटं वागत नाही. घ्या ही बांगडी, डॉक्टरना पण मी हे कृत्य केलेलं आवडणार नाही.”

माणुसकीचा झरा वाहतोय हे परत एकदा सिद्ध झालं. शारदा काउंटरवरून बाजूला होण्यापूर्वीच एक काळसर माणूस, डोक्याला टक्कल, वय ४०-४५ असावं. कपडे पांढरे स्वच्छ असा आला. काउंटरवर १०,००० रु. ठेवले. आणि म्हणाला, “मी ट्रेनमध्ये तुमचा खिसा कापून हे पैसे चोरले होते पण मी ते परत द्यायला आलोय.”

“काय? आणि आता परत देताय ? चेष्टा करता काय ?” शरद वैतागला होता.

“मी आता काही बोलण्याच्या स्थितीत नाही पण तुमची अडचण ओळखून आलो. चोर असलो तरी माणूस आहे. बाप आहे. माझ्या दोन वर्षाच्या पोराला न्युमोनिया झाला. इतका की बरं व्हायचं लक्षण दिसेना. डॉक्टरनी तसं सांगितलंही, पण शेवटचा उपाय म्हणून बॉम्बे हॉस्पिटलला नेऊन बघू या म्हणाले. प्रायव्हेट गाडीला बॉम्बे हॉस्पिटलपर्यंत किती पैसे लागणार ? शिवाय औषध पाणी... कुठून पैसा आणू ! मी दिव्याला राहतो. कर्जत गाडीला चढलो. गर्दीत तुम्ही दोन्ही हातानी पोराला धरलं, हात खाली येणं शक्य नाही. बरोबर खिसा कापला. किती पैसे होते याची कल्पना नव्हती. पुढे उघडलं तर १०,०००/- दिसले. देव पाठीशी आहे समजून धावत आलो. आनंदात होतो पण इथं येईपर्यंत पोर सोडून गेलं. बॉम्बे हॉस्पिटलला न्यायचा प्रश्नच मिटला. तुम्हाला पाहिलं आणि वाटलं हयांचं पोर जगावं म्हणून तर माझ्या पोराने प्राण सोडले नसतील ? का लोकांचे आजपर्यंतचे दिलेले शिव्याशाप मला भोवले ! पैशाच्या क्षणिक आनंदाने माझ्या आयुष्यात कायमचा अंधार केला. मी खरं ते सांगितलं. पोराला स्मशानात नेतो. तुमची माफी मागतो. मग पोलिसात दिलं तरी चालेल” असं म्हणून तो मुलाच्या वॉर्डकडे ओल्या डोळ्यांनी, भिजलेल्या मनानं आणि थिजलेल्या कायेनं गेला. रिसेप्शनचं वातावरण सुन्न झालं. बिट्टूचे वडील म्हणजे शरदच मोठयानं म्हणाला, “चोराच्या मनांत चांदणं” ही म्हण चोरांवरूनच पडली पण काही वेळा अमावस्येसारखं मन असणाऱ्या चोरांच्या मनांत कोजागिरीचं चांदणंही कधी कधी पडतं हे आज खरे ठरले.”

# बोधकथा

• मुकेश माचकर

## १.. सत्य काय, असत्य काय ?

राजाने फर्मान काढलं, उद्यापासून राज्यात जो कोणी असत्य बोलेल, त्याला मी गाढवावर बसवून त्याची धिंड काढणार आणि मग फासावर लटकवणार आहे.

राजाला गुरूस्थानी असलेला फकीर त्याला म्हणाला, सत्य-असत्य या फार गुंतागुंतीच्या आणि सापेक्ष संकल्पना आहेत. त्यात न उतरता तू कायद्याने जेवढ्या गोष्टींचं नियमन करायचं असतं, तेवढं नीट केलंस, सगळ्या यंत्रणा मजबूत केल्यास तर ते राज्याच्या हिताचं होईल.

राजा म्हणाला, मी एवढा क्रांतदर्शी निर्णय घेतला आणि तुम्हाला काही कौतुकच नाही. फकीर म्हणाला, उद्या सकाळी भेटू.

दुसऱ्या दिवशी सकाळी राजाला निरोप आला की फकीर दारात आला आहे. फकीर गाढवावर बसून आला होता. राजा म्हणाला, हे काय, असे का आला आहात?

फकीर म्हणाला, तू मला फासावर लटकवणार आहेस. तुझी गैरसोय नको म्हणून मी गाढव सोबतच घेऊन आलो आहे. राजा म्हणाला, गुरुदेव, काहीतरीच काय बोलताय? मी तर खोटं बोलणाऱ्या माणसाला फासावर लटकवणार आहे. तुम्हाला का लटकावेन?

गुरुदेव म्हणाले, आता विचार कर. तू मला फासावर लटकवणार आहेस, हे जे मी म्हणालो, ते खरं की खोटं?

राजा म्हणाला, खोटं. साफ खोटं.

फकीर म्हणाला, मी जर खोटं बोललो असेन, तर तू मला फासावर लटकवलं पाहिजेस. पण, जर तू मला फासावर लटकवलंस, तर मी जे म्हणत होतो, ते खरं सिद्ध होईल. आता ठरव तुला काय करायचं ते.

राजा म्हणाला, ही काहीतरी भलतीच पंचाईत झाली. विचार करून तुम्हाला निरोप देतो. त्यानंतरच कायदा अंमलात येईल.

...तो आजवर कधीच अंमलात आला नाही, हे सांगायला नकोच.

..............................................

## २.. प्रार्थना करावी तर अशी!

कबीर बाजारात कपडा विकायला गेले होते.

त्या बाजारात एक बाई आणि तिचा लहान मुलगा आले होते. बाई कापडखरेदीत मग्न होती. तेवढ्यात एक मांजर कुठूनतरी आलं आणि त्या बाळाशी खेळायला लागलं. बाळही मांजराबरोबर खेळण्यात रमलं. खरेदी करून आईही तंद्रीत बाळाला न घेताच पुढच्या दुकानात निघून गेली. बाळालाही आईचा पूर्ण विसर पडला होता. अचानक दुकानदाराने काठी उगारल्यावर मांजर टुण्णकन् उडी मारून कुठेतरी नाहीसं झालं...

...तत्क्षणी बाळ भानावर आलं आणि त्याने ‘आईऽऽऽ’ म्हणून हृदयद्रावक किंकाळी फोडली...

...कबीर म्हणतात, प्रार्थना तशी हवी...

...बाकी सगळा खेळच.

............................................................

## ३.. प्रेषित आणि दात दुखणारा सामान्य माणूस!

प्रेषिताला सुळावर चढवलं जाणार ही वार्ता वाऱ्याच्या वेगाने पसरली...

प्रेषिताच्या शिकवणीने प्रभावित झालेली एक स्त्री आपल्या नवऱ्याला म्हणाली, ऐकलंत का? फार दु:खदायक बातमी आहे, प्रेषिताला उद्या सुळावर चढवणार.

नवरा म्हणाला, मलाही खूप यातना होतायत. माझा दात भयंकर दुखतोय.

रात्री बायकोला झोप लागेना. डोळ्यांना अश्रुधारा लागल्या होत्या. ती नवऱ्याला म्हणाली, माझा जीव तळमळतोय. प्रेषित उद्यापासून आपल्यात नसणार.

नवरा म्हणाला, मीही तळमळतोय, माझा दात फारच ठणकतोय. सकाळी सगळा गाव गोळा झाला. शेजारीपाजारी या माणसाला सांगू लागले, अहो, प्रेषिताला देहदंड झाल्याच्या बातमीने रात्रभर आम्हाला झोप लागली नाही.

गालावर हात दाबून हा माणूस म्हणाला, रात्रभर मलाही झोप लागली नाही. दातदुखीचा ठणका पार मेंदूपर्यंत पोहोचत होता. पाठीवर सूळ घेतलेल्या, जखमी, रक्तबंबाळ प्रेषिताला फटके मारत रस्त्यातून नेलं जात होतं...

लोक पाहून हळहळत होते... कोणी धाय मोकलून रडत होते...

हाही विव्हळत होता... त्याचा दातच तेवढा भयंकर ठणकत होता ना!

..............................................

## ४.. माणुसकीचं अपंगत्व!

तीन जिवलग मित्र एकदा एकत्र प्रवास करत होते. एका विचित्र अपघातात तिघेही वेगवेगळ्या प्रकारे अपंग झाले. एकाचे पाय कापले गेले, दुसऱ्याचे हात कापले गेले, तिसऱ्याचे डोळे गेले. तिघेही एकाच हॉस्पिटलमध्ये, एकाच खोलीत होते. तिघेही देवाचा धावा करत होते. डोळे गमावलेला डोळे मागत होता, हात गमावलेला हात मागत होता आणि पाय गमावलेला पाय मागत होता.

एका रात्री त्यांचा तीव्र धावा ऐकून देव त्यांच्यासमोर हजर झाला. ते तिघेही चकितच झाले. म्हणाले, देवा, तू इतक्या लवकर आलास? देव म्हणाला, मी तुमच्या खूप जवळ राहतो. तुम्ही कधी तेवढ्या जोराने हाकच मारत नाही, तर मी कसा येणार? बोला, काय काम काढलंत?

तिघांनी आपल्या अपघाताची माहिती सांगितली. आपल्याला अव्यंग आयुष्य जगायचंय, देवाने गमावलेले अवयव पुन्हा पहिल्यासारखे करावेत, अशी प्रार्थना त्यांनी केली.

देव म्हणाला, तुम्ही तिघांनीही माझ्या एका प्रश्नाचं समाधानकारक उत्तर दिलंत, तर तिघेही पुन्हा अव्यंग व्हाल.

डोळे फुटलेल्या माणसाला तो म्हणाला, आज तू डोळे गमावलेस, पण तुझी नजर चांगली नाही, असं पंचक्रोशीतल्या सगळ्या बायका म्हणतात, लहान मुलींपासून म्हाताऱ्या आजीपर्यंत कोणत्याही बाईकडे तू वासनांध नजरेने पाहतोस, बरोबर ना?

त्याची मान खाली गेली.

हात तुटलेल्या माणसाला देव म्हणाला, तुझ्या या हातांनी तू कित्येक गैरव्यवहार केलेले आहेस. हेराफेरीमध्ये तू प्रवीण आहेस. कितीएक गरीब, निष्पाप लोकांना तू या हातांच्या चलाखीने फसवलं आहेस. तुझ्या हातांनी अनेक संसार उद्ध्वस्त केले आहेत. हो ना?

त्याची मान खाली गेली.

पाय तुटलेल्याला देव म्हणाला, तू तर मूर्तिमंत क्रूरकर्मा आहेस. तुझ्या पायांनी कितीजणांना तुडवलं असेल, तुझ्या लाथांनी कितीजणांचा जीव घेतला असेल, ते सांगणं कठीण आहे.

त्याची मान खाली गेली.

मग देव तिघांनाही उद्देशून म्हणाला, तुमच्यामध्ये माणुसकीला लाज आणणारे हे दोष होते. ते मी दूर करावे आणि तुम्हाला खऱ्या अर्थाने निरोगी, अव्यंग, निर्दोष बनवावं, यासाठी माझी आठवण कधीच काढली नाहीत. आज अवयव निकामी झाले, म्हणून माझा धावा केलात, पण तेव्हा आपलं मन, आपली संवेदनशीलता, आपली माणुसकी अपंग आहे, म्हणून कधी माझा धावा केला नाहीत, ते का, याचं समाधानकारक उत्तर दया. तुमची लायकी नसतानाही मी तुम्हाला पुन्हा अव्यंग बनवेन.

त्या तिघांनीही देवाला उत्तर दिलं, परमेश्वरा, तू बनवलेल्या या जगात तू सांगितलेल्या माणुसकीच्या अपंगत्वाने आमचं कधीच काही अडलं नाही, म्हणून तुझा धावा केला नाही. तशी गरजच भासली नाही.

...हे उत्तर ऐकल्यावर देवाला, त्यांची लायकी नसताना, त्यांना पुन्हा अव्यंग बनवावं लागलंच !!!

# इच्छापूर्ती (विज्ञान कथा)

■ जोसेफ तुस्कानो, बोरीवली (प)

कोकण कृषी विद्यापीठातर्फे वसईत भरविण्यात आलेल्या त्या कृषी प्रदर्शनाचा आज पाचवा दिवस होता. त्या प्रदर्शनामुळे वसईचा पारनाका तर फार गजबजून गेला होता. वसई परिसरातील मूळ शेतकरी असलेल्या नागरिकांची प्रदर्शन पाहण्यासाठी प्रचंड झुंबड उडाली होती. महाराष्ट्रातील काही निवडक शेतकऱ्यासोबतच वसई तालुक्यातील स्थानिक शेतकऱ्यांनीदेखील ह्या प्रदर्शनात हिरिरीने भाग घेतला होता. नाना तऱ्हेची धान्ये, फळे, फुले, रोपटी, बी-बियाणे ह्या प्रदर्शनात थाटाने मिरविले जात होते. निरनिराळ्या जातीची संकरीत फुले, फळे तर भलतीच भाव खाऊन होती. दोन वेगवेगळी वैशिष्ट्ये एकवटलेले नवीन फूल वा फळ निर्माण होते, ह्या या कृषीक्षेत्रातील महत्त्वपूर्ण शोधाचा जगभर वापर केला जात होता. वसईतले काही गरीब शेतकरी तर फळा-फुलांचे ते नानाविध आकार नि प्रकार पाहून विस्मित झाले होते.

कोकण कृषी विद्यापीठाचे काही संशोधक प्रदर्शन पहायला आलेल्या शेतकऱ्यांना सोप्या भाषेत विविध धान्य, फळभाज्या इत्यादीच्या लागवडीबद्दल माहिती पुरवीत होते. केळीसाठी प्रसिद्ध असलेल्या वसईकरांना प्रदर्शनातील 'केळ्यांच्या स्टॉल'ने आकर्षित केल्यास नवल न वाटावे ! वसईत केळी दुर्मिळ होत चालल्यामुळे की काय, जणू प्रदर्शनास भेट देणाऱ्या प्रत्येक वसईकर शेतकऱ्याच्या मनात नाना आकाराची आणि नाना प्रकारची हिरवी, पिवळी केळी पाहून रुखरुख वाटून राहिली होती.

ह्या स्टॉलमध्ये एका पांढऱ्या बशीत ठेवलेलं एक केळं तर सगळ्यांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत होते. ते केळं नजरेस पडताच तरुण पोरी 'अय्या !' उद्गार काढत होत्या तर एखादा गावरान शेतकरी, "त्येच्या मा.... पोरगंच दिसत्ये की जणू !" असे आश्चर्य व्यक्त करी. फुटभर लांबीच्या त्या जाडजूड केळ्याचा आकार एखाद्या छोट्या बालकासारखा दिसत होता.

डोक्याचा गोलाकार भाग, दोन्ही बाजूला इवल्या इवल्या हातासारखे दिसणारे अवयव, तर दुसऱ्या टोकाला पायासारखे दोन फाटे ! प्रदर्शनाचं उद्घाटन झालं तेव्हा वर्तमानपत्रांनी या विचित्र आकाराच्या केळ्याचे छायाचित्र प्रसिद्ध केले आणि त्यासोबत फरशाकाकाचा फोटोदेखील छापला होता.

कारण ते फळ फरशाकाकाच्या बागेतले होते. वसई तालुक्याच्या उत्तरेस असलेल्या खारभाट गावातील फरशाकाका एक छोटे शेतकरी होत. त्यांची जी काही चार-पाच एकर वडिलोपार्जित जमीन आहे त्यातील एका एकरात पूर्वपरंपरागत केळीची बाग पिकवली जात होती. वास्तविक चक्रीय वादळ आलं की केळीच्या बागा भुईसपाट होत आणि वर्षभराचे श्रम नि पैसा पाण्यात जाई. तसेच पर्णगुच्छासारख्या रोगाने केळीची नासाडी होत असताना सरकार दरबारातील संबंधितांची उदासीनता ह्या छोट्या शेतकऱ्याचे अवसान गळण्यास हातभार लावी. तेव्हा अधूनमधून येणाऱ्या ह्या नैसर्गिक आपत्तींना कंटाळून वसईतल्या, बहुसंख्य शेतकऱ्यांनी केळीची लागवड थांबविली होती. आणि पैसा देणाऱ्या मोगरा, काकडा, जर्मन या फुलांचे पीक घेण्यास सुरुवात केली होती. मात्र फरशाकाका अपवाद राहिले. त्यांचे दोस्त असलेल्या झुज्या शेठनी आणि नाईकअण्णांनी त्यांना कितीदा समजावून सांगितले, पण फरशाकाका आपल्या निश्चयापासून ढळले नाहीत. ते आपली केळीची बाग फुलवीत राहिले.

फरशाकाका स्वभावाने भोळेभाबडे होते. त्यांचा स्वभाव अगदीच संवेदनशील होता. ते पटकन भावनावश होत. त्यांची कारभारीण सांतूबाय सतत आजारी असे. लग्न झाल्याच्या दुसऱ्या वर्षापासून ती अंथरुणाला खिळली होती. पण फरशाकाकांनी कधी त्रागा केला नाही. आपल्या लाडक्या सांतूवर त्यांचा खूप जीव होता. त्यांनी तिला अनेक तज्ञ डॉक्टर-वैद्यांना दाखविले पण सांतूबायच्या तब्येतीत फरक पडत नव्हता. तिचा आजार एक प्रकारचं गूढच म्हणा ना ! धार्मिक वृत्तीचे देवभोळे फरशाकाका आपल्या शेतावरून थकून भागून आल्यानंतर, खाटेला खिळलेल्या पत्नीची मनोभावे सेवा करीत. तिला बरे वाटावे म्हणून ते रोज संध्याकाळी रोझरीची प्रार्थना करताना प्रभू येशू ख्रिस्ताकडे कळकळीची विनंती करीत. रविवारी चर्चला जाऊन मनःपूर्वक मिस्सा ऐकीत. दर बुधवारी नोव्हेना भेटवून सुकुर मावलीकडे धावा करीत. पण देव त्यांची परीक्षा पाहतच होता.

लग्न होऊन एक तप लोटले तरी त्यांच्या पोटी संतान नव्हते. तरीदेखील ते गुराढोरांवर पोरांसारखी माया करीत. बैलापुढे पेंढा टाकल्याशिवाय अन गायवासरांना चारा-दाणा दिल्याशिवाय ते जेवायला बसत नसत. तसेच ते शेतातल्या रोपट्याची काळजी घेत. केळींच्या बागेला वेळच्यावेळी खतपाणी मिळावे म्हणून ते राबत. थकल्याभागल्या अवस्थेत केळीच्या बुडाशी अंग टाकून ते एकाग्रपणे हिरव्यागार पानांनी बहरलेल्या केळींच्या रोपांकडे पहात रहात. हळूवार वाहणाऱ्या झुळकेसोबत मंजुळ सळसळ करणारी केळीची पाने त्यांना कित्येक क्षण मोहवून टाकीत. मग बागेच्या ओळी ओळीत पाणी वळविताना ते प्रत्येक केळीच्या बुडाशी, तिथली माती ओलीचिंब होईपर्यंत पायांनी पाणी शिंपडीत. स्वतःचं समाधान झालं की ते त्या केळीच्या लोदाला थोपटीत पुटपुटत, “आता बरं वाटत असेल माझ्या बायला. जाम गरम झाली होती !” त्या केळीवर प्रेमपूर्ण नजर टाकीत आपला मोर्चा ते पुढच्या केळीकडे वळवित.

आजसुद्धा, शेवटची ओळ पाण्याने शिंपडून टाकीत असताना फरशाकाका शेवटच्या केळीच्या रोपट्याकडे वळले. क्षणभर ते पाहतच राहिले. ह्या झाडाची वाढ बागेतल्या इतर केळींपेक्षा जलद झाली होती. हिरव्यागार पानांनी सजलेली ती केळ, त्यांना जणू एखाद्या नवरीसारखी वाटली. इतर केळींना केळफुल यायला, निदान पंधरवड्याचा अवधी होता, पण ही खेळ सगळ्यात अगोदर तयार झाली होती. जणू दोन-तीन दिवसात फुल फुटेल असं वाटावं ! फरशाकाका त्या केळीजवळ गेले. हळुवारपणे त्यांनी आपला हात त्या केळीवरून फिरवला. त्यांना भास झाला की ती जणू शहारते आहे. “माझी बाय नव्या नवरीवाणी दिसत्ये”, ते स्वतःशीच पुटपुटले. का कुणास ठाऊक, शरीरात रोमांच उठल्यागत फरशाकाका काही काळ केळीला घट्ट चिकटून गेले.

“आरे फरश्या, शिपणं आटोपलं की नाय ?” बागेच्या कुंपणावरून, आपल्या वाडीतले काम आपटून आपल्या घरी जायला निघालेल्या नाईकअण्णांनी हाळी दिली. ती हाक ऐकताच फरशाकाका भानावर आले. अन “आटोपलेऽ आटोपलेऽऽ, आता येतो बघ” म्हणत ते रहाटाचा बैल सोडायला धावले.

पाच दिवसांनी त्या केळीला फुल आले. ते वर्षाचे पहिले वहिले भलेमोठे केळफुल पाहून फरशाकाका तर हरखूनच गेले. “फरशा, तुझी बोणी मात्र झक्कास झाली बघ !” त्याच्या पाठीवर हात मारीत झुज्याशेठने त्यांचे कौतुक केले.

अन त्या केळफुलांचं केळ्याच्या घडात रुपांतर झाले, तेव्हा फरशाकाकाच नाही तर सगळ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनी तोंडात बोटे घातली. त्या भल्यामोठ्या लोंगराला लटकलेले ते मानवी आकाराचं एक केळं पाहण्यासाठी गावकऱ्यांची तर रीघ लागली. मग कृषी विद्यापीठाने वसईतल्या प्रदर्शनात ठेवलेलं ते केळं सर्वत्र कौतुकाचा विषय बनून राहिले.

प्रदर्शन पाहायला आलेल्या शेतकऱ्यांना विद्यापीठाचे एक वनस्पतीशास्त्रज्ञ समजावून सांगत होते.

“बरं का शेतकरी बंधूनो,

संत तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे ‘वृक्षवेली ही आमची वनसोयरे आहेत.’ वनस्पतींना भावना असतात हे प्रथम डॉ. जगदीश चंद्र बोस यांनी दाखवून दिले. आपल्या सभोवतालची वनस्पतीसृष्टी माणसाला, त्यांच्या अन्न-वस्त्र-निवारा ह्या तिन्ही गरजा पूरवितेच, पण माणसाच्या भावनिक स्थितीतदेखील ती समरस होऊ शकते. काही दिवसांपूर्वी हैदराबाद येथील श्रीनिवासमानगपुरम येथे घडलेली घटना तुम्ही ऐकली असेलच. एका चिंचेच्या झाडाखाली डाकूंनी दोन जीवांची क्रूर हत्या केली, तेव्हा ते झाड आठवडाभर अश्रू ढाळीत होते. जणू त्या निष्पाप जीवांच्या अकाली मृत्यूबद्दल ते शोक व्यक्त करीत होते.

आज जगभरचे शास्त्रज्ञ वनस्पतींच्या भावभावनांचा नि स्वभाववैशिष्ट्यांचा अभ्यास करीत आहेत. ही वृक्ष-रोपटी त्यांच्या सतत सान्निध्यात असलेल्या सजीवांच्या भावनाशी पूर्णपणे एकरूप होतात आणि त्यामुळेच पक्षी, प्राणी, मानव वा देवमूर्तीच्या आकाराच्या फळाफुलांची निर्मिती होत असते....” त्या शास्त्रज्ञाचे बोलणे टक लावून ऐकत असलेल्या फरशाकाकाने हळूच आपली नजर वळविली. मानवी आकाराच्या आपल्या त्या फळाकडे ते टक लावून पाहत होते. वात्सल्याच्या उर्मी त्यांच्या अणूरेणूंतून उचंबळून येत होत्या.

तिथे, ते कृषिशास्त्रज्ञ बुचकळ्यात पडले होते. त्या फळाची संपूर्ण पार्श्वभूमी ज्ञात झालेले ते संशोधक विचार करत होते : वनस्पतींना संवेदना असतात, पण भावनादेखील असतील का बरे ? ते नाविन्य पूर्णपणे हुडकून काढण्याचे त्यांनी मनाशी ठरविले....

# वेश्या माझ्या सांगाती...!

- जॉन कोलासो, गिरीज, वसई

देहविक्री करणाऱ्या महिला दिसल्या की मला पूर्वी माझ्या छातीत धडकीच भरायची. त्याचं कारण म्हणजे मी बी.कॉम.च्या शेवटच्या वर्षाला असताना मला राज्य वीज मंडळाच्या प्रसिद्ध व जनसंपर्क खात्यात नोकरी लागली होती. वीज मंडळाची त्यावेळी मुंबईत पाचसहा ठिकाणी मुख्यालये होती. आमचे प्रसिद्धी व जनसंपर्क विभागाचे प्रमुख म्हणजे मुख्य प्रसिद्धी आणि जनसंपर्क अधिकारी रमेश के. सहस्रबुद्धे मला आणि माझे एक सहकारी एच. व्ही. गुरव या दोघांना कोणतेही काम असले की नेहमीच बाहेर पिटाळत असत. त्यांचा आमच्या दोघांवर फार विश्वास होता... आमच्यावर सोपविलेलं काम आम्ही कोणत्याही परिस्थितीत पूर्ण करणारच... अशी त्यांना खात्री होती. त्यामुळे वीज मंडळाच्या मुंबईतील कोणत्याही कार्यालयातून माहिती काढून आणणे, प्रसिद्धी पत्रक मुंबई दुरदर्शन तसेच मुंबईतील प्रमुख वृत्तपत्रे यांच्या कार्यालयात जाऊन देणे ही सर्व कामे आम्हा दोघांना नेहमीच मिळत. ही कामे फारच अर्जंट असली तर टॅक्सीने जायला परवानगी असायची, नाहीतर बेस्ट बसने... ते काम सोपवितानाच आम्हाला सांगत... 'गो बाय टॅक्सी अँड कम बाय बस...' आम्हीही आवडीने बसनेच प्रवास करीत... तेही शक्यतो डबल डेकर बसच्या वरच्या मजल्यावर बसून... त्यामुळे मुंबई दर्शन सुंदर घडत असे....

परंतु कधीकधी बस अशा वस्तीतून जात असे की, मुंबई किती गलिच्छ आहे, हेही दिसून येई... त्यात ओठ गाल रंगवून आपल्या शरीराचे अभद्र दर्शन घडवित अगदी फतकल मारून बसलेल्या, हावभाव करणाऱ्या महिला दिसल्या की किळस येई... त्यावेळी तारुण्यात पदार्पण केलेलं असूनही स्त्रीदेहाची ती विटंबना पाहवत नव्हती... हे आपण पाहिलं... असा एक भाग मुंबईत आहे, तो कोणता परिसर, हे परत आल्यावर आमच्या ऑफिसमध्ये किंवा

घरीही कोणाला विचारता येत नव्हते... पुढे पुढे समजले की, मुंबईतील हा भाग रेड लाइट म्हणून ओळखला जातो. नंतर लोकल ट्रेनमधून घाटकोपर स्टेशन परिसरातही अशाच महिला बसलेल्या किंवा फिरताना दिसत असत.... अनेक दिवस रेड लाइट एरिया डोळ्यांपुढून जात नसे. या सर्व महिला म्हणजे देहविक्रय करणाऱ्या महिला म्हणजे वेश्या... अशी माहिती, त्यांच्याविषयीचं ज्ञान मिळत गेलं आणि त्यांची एक धडकीच माझ्या मनात भरली.

पुढे एक दिवस रविवारच्या लोकसत्तेत श्रीकांत सिनकर यांचा वेश्याविषयीचा लेख वाचण्यात आला. श्री. सिनकर दर रविवारी लोकसत्तेत वेगवेगळ्या, उपेक्षित समजल्या जाणाऱ्या विषयांवर लिहित असत. त्यांचे सदर होते. त्यांनी सर्कसमध्ये धाडसी काम करणाऱ्या युवतींचं खासगी जीवन कसं असतं, यावरही लिहिलं होतं, तसेच वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या जीवनांवर लिहिण्यासाठी त्यांनी एका देहविक्री करणाऱ्या महिलेसोबत त्यांच्या कोठीवर जाऊन जीवनकथा ऐकून घेतली होती. त्या आधारे लिहिलेल्या त्यांच्या त्या लेखाला एक कारुण्याची झालर निर्माण झाली. तो लेख वाचल्यावर किळस वाटणाऱ्या या महिलांबद्दल माझ्या मनात एक अनुकंपा निर्माण झाली. त्या या व्यवसायात कशा ओढल्या जातात... त्यांना आपला देह पैशासाठी परपुरुषाच्या हाती का द्यावा लागतो... हे समजल्यावर मला आपलीच शरम वाटायला लागली...

वास्तविक वेश्याव्यवसाय हा फार जुना असावा... कारण महाभारत, बायबलमध्येही त्याचा उल्लेख आढळतो... म्हणजे महिलांना आपल्या उपजिविकेसाठी हा व्यवसाय फार पूर्वीपासून करावा लागत आहे. काहींच्या मते गरीब, निराधार, असाह्य महिलांकडे पैसे नसल्याने बिगरभांडवलाचा व्यवसाय करणे भाग पडते... परंतु इतकेच कारण या मागे नाही, इतरही अनेक कारणे आहेत... ती हळुहळू समजू लागली.

पुढे बीकॉमनंतर पत्रकारितेचा डिप्लोमा केला आणि वीज मंडळाची नोकरी सोडून मुंबईच्या 'नवशक्ती' दैनिकात उपसंपादक म्हणून रुजू लागलो... अशाप्रकारे पत्रकारितेत आल्यावर तर देहविक्री करणाऱ्या महिलांचा जणू रोजच सहवास लाभत गेला. मी नोकरीस लागलो तेव्हा नवशक्तीचे ऑफिस फोर्टमधील दलाल स्ट्रीटवर होते. दैनिकामधील नोकरी

म्हणजे ऑफिसमधून रोजच रात्री उशीरा निघावं लागत असे. फोर्ट परिसरातील गर्दी रात्री विरळ होत असे... तेथून चर्चगेटला चालत जात असताना सोबत थोडेफार लोक असत... तरीही वाटेत देहविक्री करणाऱ्या महिला आजूबाजूला उभ्या असलेल्या किंवा फिरत असलेल्या दिसायच्या, पण आपण सरळ रस्त्याने जाणारे त्यामुळे त्यांच्याकडे विशेष लक्ष जात नसे.

परंतु आमचे ऑफिस फोर्टमधून नरिमन पॉईंटला हालविण्यात आले. तेथे समुद्र किनारी बांधण्यात आलेल्या फ्री प्रेस हाऊसच्या पहिल्या मजल्यावर ऑफिस थाटण्यात आले होते. पूर्ण इमारत त्यावेळी रिकामी होती, तसेच आजूबाजूलाही दुसरी कोणतीच इमारत नव्हती... काही इमारतींचे बांधकाम चालू होते. त्यामुळे अगदी दिवसाही आमच्या ऑफिसच्या इमारतीजवळ वर्दळ कमी होती. मध्यरात्री एडिशनचे काम संपवून इमारतीमधून बाहेर पडलो की एकदम सन्नाटा असायचा... समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्याचा घो घो आवाज यामुळे परिसर आणखी भीषण वाटत असे.

अशावेळी नरिमन पॉईंटच्या या टोकापासून चर्चगेटला चालत मध्यरात्री चालत जाताना फारच भीती वाटत असे. सोबत कधीकधी तरी, नालासोपारा येथे राहणारा माझा सहकारी नंदकुमार जावळे असे... नंदू सोबत असला तरी मंत्रालय येईपर्यंत छाती धडधडत असे... हळुहळू लक्षात आले की, आजूबाजूला रस्त्याच्या आडोशाला देहविक्री करणाऱ्या महिला असतात... आरंभी त्यांचीही भीती वाटत असे... परंतु, नंतर लक्षात आले की, त्याच आपल्या सोबती आहेत... आणि खरोखरच नवशक्तीतील सुमारे साडेचार वर्षे नोकरीच्या काळात रात्रीच्या वेळी नरीमन पॉईंट ते चर्चगेट या वाटचालीत याच महिला आमच्या सोबती बनल्या. कधीकधी त्या पुढे येऊन 'भाई कितना बजा...?' म्हणून विचारत... म्हणजे आमचे त्यांच्याशी भाईबहनचे नाते बनले.

नवशक्तीनंतर महाराष्ट्र टाइम्समध्ये उपसंपादक म्हणून लागलो. तेथे तर व्हीटी आणि टाइम्स बिल्डिंग परिसर रात्रीच्या वेळी देहविक्री करणाऱ्या महिलांचा आगर बनलेला असे. पोलिसांसमवेत त्यांचा लपंडाव खेळ चालत असे... रात्री आपण गुमाने चर्चगेटकडे चालत

असताना... मागून या महिला एकदम धावत येत... एखादी सोबत चालत असे... अशावेळी त्यांना माझी सोबत लागत असे अगदी आझाद मैदान क्रॉस करीपर्यंत.

त्यानंतर दुपारी महाराष्ट्र टाइम्सच्या ऑफिसला जाताना व रात्री परताना... वसई रेल्वे स्टेशन आणि नवघर एसटी स्टँड परिसरात देहविक्री करणाऱ्या महिलांची सोबत राहिली. वसईहून लोकल ट्रेन सुटणारा प्लॅटफॉर्म नंबर एक हा एका टोकाला आहे. मर्यादित लोकल गाड्या या प्लॅटफॉर्मवरून सुटत असल्याने हा प्लॅटफॉर्म रिकामाच असतो. दुपारी १.११ वाजता दादर लोकल पकडण्यासाठी मी या प्लॅटफॉर्मवर नियमित जात असे. त्यावेळी अगदी स्वागताला अशा अनेक महिला बसलेल्या असत. रोजचा परिचय झाल्याने अनेक जणींशी 'तोंडओळख' झाली. तसेच मध्यरात्री नवघर एसटी डेपोवर बससाठी वाट पाहत उभे राहिलो किंवा रात्रीच्या एसटी कंट्रोलरशी गप्पा मारत असलो की, आसपास फिरणाऱ्या महिला 'भाईसाब' म्हणत तोंडातून पिचकारी मारत ओळख देत असत... आता पत्रकारिता संपली. त्यामुळे मुंबईला जाणं नाही आणि रात्रीअपरात्री परतणं नाही. त्यामुळे या ओळखी आता संपल्या आहेत...

या सर्वांची आठवण येण्याचे कारण म्हणजे. मुंबई हायकोर्टाने अलिकडे दिलेला एक निकाल. अनैतिक देहव्यापार प्रतिबंधक कायदा १९५६ नुसार वेश्याकार्य गुन्हा नाही असं २४ सप्टेंबर २०२० रोजी दिलेल्या निकालात स्पष्ट करून या गुन्ह्याखाली अटक करण्यात आलेल्या तीन युवतींना सोडून देण्याचा आदेश दिला, हे योग्यच केलं, असं मला वाटतं, इतकंच नव्हे तर कुठल्याही प्रौढ स्त्रीला कोणताही व्यवसाय निवडण्याचा अधिकार आहे, हेही न्यायमूर्ती पृथ्वीराज के. चव्हाण यांनी स्पष्ट केलं...!

या निकालाचे सविस्तर विश्लेषण करणारा लेख 'संग्राम' संस्थेच्या संस्थापिका आणि कार्यवाह मीना सेशू यांनी लोकसत्तेच्या शनिवार ३ ऑक्टोबर २०२० रोजीच्या चतुरंग पुरवणीत लेख लिहिला आहे. या लेखात त्यांनी वेश्या व्यवसाय कधी गुन्हा ठरतो आणि कधी ठरत नाही, याचे तपशीलवार विवेचन केलं आहे. हे सर्व वाचल्यावर मला देहविक्री करणाऱ्या या महिलांबाबत नेहमी वाटत असलेली अनुकंपा, सहानुभूती व्यक्त करावी वाटली.....

# अब की बार.........सरकार!

▪ वर्जेश ईश्वरलाल सोलंकी

सरकार 'आलं' व लगेच कुंकवाला 'आलं' टाकून चहा बनवण्याची फर्माईश केली. इतक्या दिवसाचा डोक्यावरचा ताण हलका झालेला. रात्री झोप नव्हती. जेवणाचा पत्ता नव्हता. राष्ट्रहितासाठी काय करावं लागतं, मतदारांच्या 'दाढीला' व 'लंगोटाला' हात घालायला किती खस्ता खाव्या लागतात हे कुंकवाला, विरोधकांना, जनता जनार्दन व पक्षाला काय माहित. हे रुसवे फुगवे मिन्नतवा-या त्याची बात औरच!

ह्या झटापटीत आपली कंबर ५६ची होती ती २६ची झाली. समजलंच नाही.

त्याच काय आहे ह्या प्रदेशातून त्या प्रदेशात, ह्या गावातून त्या गावात, ह्या गल्लीतून त्या गल्लीत, ह्या घरातून त्या घरात धावाधाव करावी लागते. 'मिग' व 'सुखोई' विमान कोसळण्याच्या बातम्या वरचेवर येत असतात. तेंव्हा हॅलीकॉप्टरमधून प्रवास करताना जीव टांगणीलाच असतो. आपली फोरव्हिलर बरी पण खड्डे, ट्रॅफिक जॅम पुन्हा वेळेवर नाही पोहचलो तर कार्यकर्त्यांचे फोन कुठे आहे कोठवर आले, लवकर या!, या! या! पब्लीक जमा झालेलं आहे नाहीतर कल्टी मारायचं एक नि दहा फोन. कान लाल होतो. आवाज घोगरा होतो. म्हणून हा हॅलीकॉप्टरचा आसरा. पण मायला धुकधुकी! एकदा हॅलीकॉपटर विजेच्या तारेत अडकलं. उडवणारही लहान पोर. नवशिक्या होतं हे तपासाअंती समजलं. त्याला वाटलं खेळण्यातलच आहे. जेम्स बॉन्डच्या पिक्चरची शुटींग वाटली त्याला!. कॅमेरा! लाईट! ॲक्शन! खडखड खाडखुड आवाज आला. धाडदिशी खाली आलं. नशीब बलवत्तर म्हणतात वाचलो कसेबसे नाहीतर वरचे टिकीट बुक होतच तर असं काय-काय घडत असतं.

आपल्याला '६१६२४२०' मतं मिळाली. आपल्या पक्षाने जादुई आकड्याला स्पर्श केला. म्हणजे कबड्डीमध्ये कसं प्रतिस्पर्धी तंगड्या खेचत असतात व खेळाडू विजयी रेषेवर हात आपटतो. तसच काहीसं झालेलं. विरोधकांचा धुव्वा उडवला. प्रचाराचं टाईमिंग जुळलं. आपण पडणार, धाराशाही होणार, डिपॉझीट जाणार, अशा विरोधकांनी काय वावड्या उठवलेल्या. धर्माचं राजकारण करतात, अमुकएक समुदयाच्यामागेच उभे असतात. पण

भोळ्याशंकर लोकांनी विश्वास दाखवला. आपली ठिकठिकाणी लागलेली पोस्टर्स खुपच 'बोलकी' व समोरच्याला 'मूक' करणारी आहेत असं सकाळी दूधवाला कुंकवाशी बोलत होता.

तिकडे विरोधी पक्षाचीही फे उडालेली. एकझीट पोलमधून सपशेल आपणच येणार हे दिसून येत होतं तरी अचानक हे असं आक्रीत कसं काय घडलं. आपल्या बऱ्याच उमेदवारांचं तर 'डिपॉझीट' जायची वेळ आलेली. दीडशे वर्ष पंरपरा असलेला पक्ष अगदी धाराशाही झालेला.

समोरचा जातो म्हणून समोरची पार्टीही कधी पाय-या न चढलेल्या देवादिकांना पाया पडली. शेवटचा तुक्का समजुन पगडी घातली, टोपी घातली, सुट घातला, धोतर नेसलं, लुंगी घातली, दाढीधारींचा आशिर्वाद घेतला, वालेकुमसलाम केलं, डोक्याला फेटा मारुन पाण्यात पाय बुडवून गुरुद्वारात गेले. क्रॉसमोर पवित्र पाणी शिंपडून घेतलं. काही बाकी ठेवायचं नव्हतं. केमिकल लोचा नको होता. अंधश्रद्धा मानत नव्हते. 'सेक्युलर' होते पण 'सेक्युअर' नव्हते. देवादिकांना मानत नव्हते. पण पर्याय दिसत नव्हता. विकल्प बाकी ठेवायचे नव्हते. जंग मे सब जायज म्हणतात ना!

तीर्थ प्यालो. यात्रा केल्या. कळकटमळकट साधूसंताचे आशीर्वाद घेतले. '....यही बनायेंगे' असं म्हणणार होते पण ओठातच राहिलं. समोरचे पक्षाध्यक्ष साधं घर बांधू घेऊ व विकत घेऊ शकले नाही. सगळं बापजाद्यांकडूनच खैरातीत मिळालं होतं. बिल्टअप सुपरबिल्टअपची भाषा डोक्यात जात नव्हती. जाऊही द्यायची नव्हती. गाडीत कधी पेट्रोल भरायला गेलेच नव्हते. तूरडाळ चणा डाळ काय किलो माहितच नव्हतं. वडापावबरोबर कांदा का मिळत नाही ह्याचा शोध घ्यायचाच नव्हता. काही कसूर ठेवली नाही. उगाच शाप नको.

रोज सकाळी उठल्यावर राजकीय पक्षासमोर दोन महत्वाचे प्रश्नः

दिवसभरातलं फुकटचोट जेवल्यानंतर सकाळी पोट साफ व्हायला हवे.

विरोधकांना चेचण्यासाठी एक नवीन मुद्दा रोज मिळायला हवा.

तसा भाषणबाजीला आपल्या ब-यापैकी गर्दी व हशा होता. सद्य सरकारला धोबीपछाड करण्याचे डावपेच आपले सगळे अचूक पडत होते. आपण बनविलेल्या ह्या वेळच्या स्लोगनने तर धूम केलेली होती. सकाळी कचरा साफ करणाराही आपलेच स्लोगन गुणगुणत असताना दिसला. पक्षश्रेष्ठींना खूप हायसे वाटले. कॉलेजच्या जमान्यात खूप

चारोळ्या लिहिल्या. त्यातलीच एक कामाला आली. ह्यापुढे आपण लिहायला हवं. एकदम गालिब नसलं तरी कुमार अविश्वाससारखं!. पब्लिक जाम फिदा असतं! कुठे बोलवतात. सुपारी म्हणतात ना तसं! असो! पण हे कार्यकर्ते काही जगू देत नाही. सुचू देत नाही. रोजचा काहीतरी झमेला असतो. पंगा असतो. लगेच धावून जावं लागतं. कलेक्टर दहाच्या टाईमाला कचेरीत नाही आला व पेशंट मेल्यानंतर पण डॉक्टर नाही आला तरी चालेल पण राजकीय नेता अगदी टाईमावर यायला हवा! असो!

आपल्या ट्विटर व फेसबुक अकाऊंटरवर तर लाईक्सचा खच पडला होता. काही कळेनासे झालेले होते. आपण एवढ्या मोठ्या लोकशाही असलेल्या देशातून तिस-या क्रमांकाचे पक्ष झालेलो आहोत हे काही पचनी पडत नव्हते. काहीतरी गपला झालेला आहे. हे शक्यच नाही.

निवडून यायचा आनंद काही औरच असतो. फटाकेवाले, मिठाईवाले, बॅनरवाले, दारुवाले, गुलालवाले, डीजेवाले हे तर अधिक उत्साहात आलेले असतात. निवडून येणा-यांच्यावर त्यांचा धंदा जोर पकडत असतो. दारुवाले आचारसंहितेत उगाच सापडलेले असतात 'निवडणूक' 'अंगारकी' 'गांधी सप्ताह' असलेला दिवस तर त्यांच्यासाठी काळरात्रीसारखा फणा काढून असतो. हूं की चू करायची सोय नसते.

जो निवडून आला तो 'सिकंदर' हारा वो गलीका 'बंदर'. पाच वर्षे विरोधी बाकावर काढायची ह्या जाणीवेने एक ओंगळ शिरशिरी आली. मित्रपक्षांनीही आपल्यावरच खापर फोडून 'इकडून तिकडे' झाले. मिले सूर मेरा तुम्हारा हे गाणे रेडियोवर जोरजोराने वाजत राहिलेले. जॉकी जोरजोराने किंचाळत होता. न्यूज चॅनलवर तर स्फोटच झाला होता. निवेदक जोरजोराने आकांडतांडव करताना दिसला. त्यांना आयतं कोलीत मिळालेलं होतं. बहोत बेआब्रु होकर तेरे कुचेसे हम निकले.

जिंकून आलेल्यांच्या मिरवणुका गावगल्लीत घुमत होत्या. गुलाल उधळला जात होता. आपण आपल्या मतदारसंघातून नशीब जिंकून आलो ४२० मते जास्त मिळाली. पण म्हणतात ना हरतात त्याच्या मय्यतीला पण लोक जात नाहीत.

'हमसे जो टकरायेगा मिट्टी मे मिल जाएगा'. एक छाकटा सारखासारखा आपल्या घराच्यासमोर जोरजोराने आरोळ्या ठोकत आपटी बॉम्ब फेकत लुंगीडान्स करताना दिसला.

सकाळच्या झाडूवाल्याच्या तोंडात गाण्याचा वेगळाच सूर होता. इतक्या लवकर झालेला 'बदल' आपलं आधीच 'लाल' असलेलं नाक अधिक लाल करुन गेलं.

सरकार आलं म्हणजे कसं धुंदफुंद असतं. सकाळ रोमॅन्टीक तर रात्र रंगीन असते. त्यात त्रिशंकूची मोठी दहशत. पण मायबाप जनताजनार्दनने भरभरुन मते दिल्यामुळे तशी दहशत काही निर्माण झाली नाही. सव्वाशे करोड जनतेमधून अर्धीअधिक जनता आपल्याबरोबर आहे ह्याचा आनंदच और होता. घोडाबाजार प्रकरण नव्हतं. सगळं सेव्हिंग नो एक्सपेन्स. ये हुई ना बात! खुप दिवसात दाढीपण करुन झाली नव्हती. एकदम सामाजिक व सांस्कृतीक कट मारायला हवा. थोडीशी आपली बनेलगिरी दाढीच्या केसात लपवायला काही हरकत नव्हती. मॅच हरण्यातच आपली जमा होती. एक बॉल सात रन्स अशी अवस्था होती. नो बॉल पडला. वाईड बॉल टाकला गेला. फ्री हीट मिळाली. स्टॅट्रजिक ब्रेक मिळाला. फिजियोथेरेपीस्टने फुकटात पाठ दाबून दिली. १२व्या खेळाडूने बाबा कामदेवचं सरबत दिलं. मस्त! सिस्करच मारली. अख्ख मैदान पाहत राहिलं! समस्या गंभीर होती. नशीबाने हात दिला.

गोष्ट अशी झाली. आपला मुलतान का सुलतान बोल्ला 'फोन पर बात' मनून चालू करा. नवा फंडा! लोकं विसरभोळी असतात. लगेच माफ करतात. संवाद साधा. भले बाजुच्या फ्लॅटमध्ये कोण राहत असतं माहित नसतं. पण हे सॉलीड अस्त्र आहे. संवादाचं. संवादानेच जग जिंकू शकतो. ज्याच्या हातात 'माईक' तोच व्यवस्थेचा 'पाईक'. आपली सगळी लफडी इकडेच सुलटतील. कहासुनी माफ. डोकं आहे साल्याला कुठुन ना कुठुन आयडिया काढतो. आपला जुना मित्र जो सोमवारच्या बाजारात कटलरी विकायचा नंतर आपल्याच पाठिंब्याने कटलरी वस्तुचा कारखाना टाकलेला. अशाच शिड्या आपल्या आधारने चढत आता मोबाईल कंपनी काढलेली. कारोबार वाढवलेला. लावला त्याला फोन. बोल्लो! कुछ तो करो! मनला डन! लगेच 'पिओ' म्हणून सीमकार्ड लॉन्च केलं. वर्षभर फ्री. काय आपटायची तर आपटा. 'फ्री' म्हणताच इथली जनता जनार्दन पागल झाली. रांगाच रांगा लागल्या. डालड्याबरोबर केरसुणी फ्री. भले डालडाची आय घातली गेलेली असेल. तेलाच्या बाटलीबरोबर टुथब्रश फ्री. मग भले बाजूचा ब्रश कितीही चांगला असेना! कधी नव्हे आमच्या परशाकाकाने पेपर विकत घेतला त्याबरोबर शॅम्पोचा पाऊच आला. एकदम येडे होऊन गेले. त्यानंतर वर्षभर विकत घेतला. पण पाऊच काही आला नाही 'पाई' मात्र गेली.

अशी माणसं भोळी व वेडी असतात. त्यांचाच फायदा घ्यायचा असतो. आपण शिक्षणमंत्री नव्हतो. पण ह्या जगाने सगळं शिकवलेलं होतं.

'फोन पे बात' एकदम जोरदार झालं. बुडत्याला काडीचा आधार.

'अब की बार............सरकार' म्हणत पुन्हा कोणीतरी बॉम्ब फोडलेला. एकदम कसनुसं झालं तरी त्या दिवसाची म्हणजे आपलं सरकार आल्याची, त्या दिवसावरही कितीतरी वर्षाची धूळ पडलेली त्या दिवसाची मदभरी आठवण येऊन अंगअंग शहारलं. अशीच मिरवणूक, गुलाल, हार तुरे, डीजेच खणखणारं संगीत शुभेच्छांचे संदेश, बुकै काय-काय. सकाळी महानगरपालिकेची गाडी कचरा गोळा करताना पायात गोळे आणून थकून गेलेली. रात्री ओली पार्टी झालेली. किशाकाकांनी दोन पेग मारताच लुंगी डान्स केलेला. आपलं सरकार येण्यासाठी पाच जण तेंव्हा कमी पडलेले. शंकराने जसा त्याच्या शिष्यांना आदेश दिला की काहीही करा कोण पहिला भेटेल त्याचे शिर घेऊन या. आपले दोस्त लोकसुद्धा चड्डी बनियनवर धावले. जंगजंग पछाडलं. पाच जण एकाचवेळी रस्त्यात भेटले. सरळ उचलून आणले. जेल तोडून फरार होत होते. पण विद्यमान मतदारसंघातले खासदार होते. पाचाची सोय केली. विजनवासात नेलं. खाऊपिऊ घातलं. दाढबिढी करायला लावून लक्स साबणाने आंघोळ करायला लावली. लाड केले. समजूत काढली. मोक्याच्या पदाचं आमिष, बिदागी दिली. कोर्टात जामीन मिळवून देऊ. आता आपलं सरकार आहे. घाबरु नका मी तुमच्या पाठीशी आहे. राजहट्ट काय असतो हे त्यादिवशी समजलं. आपल्या पक्षाची आम जनतेत स्वच्छ प्रतिमा होती. आपण कपडेपण स्वच्छ घालतो. पांढ-या साबणाने आंघोळ करतो. घराला नावही दिलेले आहे 'व्हाईट हाऊस'. सकाळच्यावेळी 'पिवळं' होतं बाकी पांढरं.

पाच जणांची पार्श्वभूमी ही गुन्हेगार स्वरुपाची होती. जेलखान्यात जाऊन पाचांचे चेहरे रापलेले होते. ह्यावर एक चॅनेलवाला अंगचटीला आलाच. आपण पण आता ह्या क्षेत्रात येऊन चांगले निर्ढावलेलो होतो. वाल्याचा जसा वाल्मीकी होईल अशी गोष्ट फिरवून सांगितली. जेलमध्ये होते तरी त्यांनी तिथे भगवदगीता, रामायण, कुराण, बुद्धतत्वज्ञान वाचून स्वतःत बदल घडविलेला आहे. त्यांचं शिक्षण, सहकार, आरोग्य क्षेत्रातल्या कामाबद्दल माहिती देऊन वेळ मारुन नेण्यात आपण कसेबसे यशस्वी झालो!

पोलिटिक्स सायंन्समधून पदवीधर होऊन आपण काही दिवस प्राध्यापकी केली. मुलांना शिकवलं. पण आईचं अकस्मात हॅलिकॅप्टर अपघातात निधन झालं. (जिसको कोई

नही मारता है उसे हॅलीकॅप्टर मारता है जानी!). नाखुशीनेच पक्षाचा कार्यभार स्वीकारावा लागलेला. एकुलते एक ठरलो ना! शिकवणी चालू झालेली. वर्गात शिकवणं व हजारोंच्या जमावाला उद्देशून भाषण ठोकणं वेगळं असतं. दोघांतही अभ्यास व मुद्दे लागतात ही समान बाब. पुन्हा पत्रकारांच्या टोळक्याला उत्तर द्यायचं म्हणजे हजरजबाबीपणा आला. जिल्हे किती, तालुके किती, गावं किती, किती कितीचा पाढा पाठ करावा लागलेला. समस्यांचा शोध घ्यावा लागतो, दुष्काळ कोठे आहे, कुपोषण कुठे आहे. आपला नेमका मतदारसंघ कुठला, कुठल्या घरात आपला माणुस कुठला, अशा असंख्य नोंदी करताना दमछाक झालेली. पण आपल्या आईचा जलवा भारी होता. आपसुक अध्यक्षपदाची धूरा खांद्यावर आली. मुलाखतीशिवाय रुजू होणं ही मस्त गोष्ट असते (इस ताल मे करे हम धमाल!) कोणी ऑब्जेक्शन घेतलच नाही. सरळसरळ निवडून आलो. (हे सरळसरळ मस्त असतं. सरळसरळ जिंकलो. सरळसरळ चाललो. सरळसरळ चालत आलं. सरळसरळ जगलो. किती सरळ. सरळसरळ 'सरळ' केला). कुणात धमक पण नव्हती. 'आयजीच्या नावावर बायजी उदार आईच्या ....द्यावर जावई सुभेदार'. अशी कुजबुजसुद्धा आपण ऐकून होतो. आपण पण राजकीय पटावर सगळ्यांना पूरुन उरलो. पण घर फिरलं की घराचे वासेही फिरतात म्हणतात ना! त्या पाच जणांनी त्यांच्या मोक्याच्या खात्यात पुन्हा 'गपला' केला. जुनी खोड, घोटाळे घोटाळा शब्दाचा कीस पाडलेला. मनले काय करणार साहेब लफडी केल्याशिवाय मजा येत नाही. प्रकरण न्यायप्रविष्ठ झालेलं. विरोधकांना तर आयतं कोलीत मिळालेलं. पूरावे विरोधकांनीच गोळा केलेले. जनमानसात प्रतिमा डागाळण्याची रोज नवी युक्ती शोधून काढत होते.

आमच्या शेजारच्या गावात 'जाम जनता पार्टी' म्हणून एक नवा पक्ष स्थापन झालेला. सगळे एकापेक्षा एक नग. सगळ्या म्हाता-या कोता-यांचा पक्ष. सकाळी जॉगींगला जाताना हाशहुश्श करत चांडाळचौकडी एकदा बागेतल्या बाकावर बसली की दिवसभरात कुणाला किती शिव्या द्यायच्या ह्याचा रोडमॅप त्यांच्याकडे तयार असायचा. एकजण नुस्ता माहिती अधिकाराचा फॉर्म भरायचा. दुसरा रेकी करत फिरायचा. तिसरा सरळ पोलीस कंप्लेन्ट करायचा. चौथा धरणे धरायचा. पाचवा गावगल्लीत ओरडत फिरायचा. सहावा...... असं बरच काय-काय! सुरवातीच्या काळात दुष्मनाचे महामेरु व कर्दनकाळ समजले जाणारे स्वातंत्र्यसेनानी गणपतकाकांना हाताशी धरलं. हा मध्ये 'हा' व 'ना' मध्ये ना मिळवली. खांद्यावर त्यांच्या बंदूक ठेवून चुतियानंदन बनवलं. मांडीलामांडी व गांडीला गांड लावून लढा दिला. गणपतकाकांनाही आपला वारसदार दिसला. चल कोई तो मिला अपने किसमका असं

गणपतकाका सर्वांना सांगत फिरले. गावपंचायतीच्या निवडणूक लढले आणि निवडूनही आले. लोकांना पण नवा माल हवा असतो. फ्रेश कुरकुरे. काही काळानंतर गांडीतले दात दिसायला लागले. म्हणतात ना 'झ..ल्यानंतर कोण कुणाचे!'

असो! वर्तमानपत्रात भ्रष्ट आचाराच्या बातम्या ठळकपणे येऊ लागलेल्या. पाच जणांनी आपली जात दाखवलेली. आमचा काही दोष नाही असा चेहरा घेऊन मीटींगमध्ये आले व बाहेर पडलेले. कधी नव्हे ती पक्षाची छीथू झालेली. ते घरातले नव्हतेच तेव्हा घराबाहेर जा ही म्हणवत नव्हते. पापी सीट का सवाल है!

हा सगळा इतिहास झाला. बाहेर गुलाल. डीजे. मिरवणुक. मिठाई. ओली पार्टी, कार्यकर्त्यांचा उत्साह. इकडे शुकशुकाट. मातम. चिडीचुप. पडिक विहिरीमधली काळोखी शांतता. दरदरकी ठोकर.

दारावरली बेल वाजली. साक्षात महिन्याभराची भरपगारी सुट्टी घेऊन गावाला गेलेली कामवाली. मतदानाला गेली होती. हक्क बजावला होता. चेह-यावर बेफिकरी होती. नक्कीच समोरच्याला मतदान करुन आली असणार! जिस थाली मे खाया उसकोही छेद! पण तिला कोण छेडणार उद्या आली नाहीतर कपबशा आपल्यालाच धुवायला लागतील. दुनियामे सब मिलता है लेकिन परफेक्ट कामवाली बाई नही मिलती है! हे वयपरत्वे लक्षात आलं होतं.

तिला काही छेडण्याआधी तिच बोल्ली भांडी घासता, 'म्या सांगू सायेब ये नया मिशीन है ना उसमेच सब घोटाला की है. नईतो तुमचाच नंबर व्हताच! मतदानकेंद्रात गेलती, जिस निशाणीपे बटन रखती उधरा का बटन दबताच नही था. पंद्रा मिनिट उभी राहिली म्या. तो उधरका साब वरडला मनला काय संडासाला गेलेली आहे का मतदानाला लवकर करा. जल्दी बटन दाबा लास्ट को निचेवाला दबा दिया. टॉ करके आवाज आला सायेब. निशाणीभी समजा नाही सायेब. बाहर ढकल दिया पोलिसवालाने चला! चला! बाहेर पडा नेक्स्ट! निघा मनला.

सगळा गपलाच! क्या बोलते है वो मिशीनको...........?

आपण काही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हतोच. तरी ऐकून घ्याव लागलं.

जोरात बोलावसं वाटलं तिच्या कानातः

'आयचा घो!'

# अमितची गोष्ट..

▪ फ्रान्सिस आल्मेडा सर

साधारण वीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. शाळेच्या मधल्या सुट्टीत अमितला घेऊन आमच्या चित्रकलेच्या शिक्षिका माझ्याकडे आल्या. अमितला मी ओळखत होतो. तो आमच्या शाळेतून दोन वर्षांपूर्वी दहावीला नापास होऊन बाहेर पडला होता. चित्रकला चांगली असल्यामुळे चित्रकला शिक्षिकेचा आवडता विद्यार्थी.

विज्ञान प्रदर्शनामध्ये नावीन्यपूर्ण उपकरणे बनवणारा म्हणून विज्ञान शिक्षकांनाही परिचित. उंचापुरा, हसरा व सुस्वभावी अमित गणिताच्या चक्रात अडकला होता. बाहेर क्लास लावण्यासाठी पैसे नव्हते. त्याचे वडील बिल्डिंग रंगवणाऱ्या रंगाऱ्याकडे दिवस मजुरीने काम करून कुटुंब चालवायचे. सगळ्या विषयात पास झाला होता. परंतु गणित त्याला पुढे जाऊ देत नव्हते.

गेली दोन वर्षे त्याचे ऑक्टोबर मार्च परीक्षेला बसणे सुरू होते. आता डिसेंबर महिन्यात विज्ञान प्रदर्शना निमित्त त्याला चित्रकलेच्या मॅडमनी बोलावले होते. प्रदर्शनासाठी काही चार्ट तयार करणे व उपकरणे तयार करणे यात त्याचा हातखंडा होता. त्याच्याशी बोलत असताना मॅडमना कळले की अजून त्याचा गणित विषय सुटलेला नाही. गणितामुळे त्याची दोन वर्षे वाया गेली आहेत.

त्याच्या बरोबरीची मुले कॉलेजला जात होती. मी अमितला बसवून घेतले. त्याच्याशी गणिता विषयी चर्चा केली. अमितचे गणित एकूण खूपच कच्चे होते. त्याला पंचवीस गुणिले सहा किती असा प्रश्न विचारला तर खूप विचार करूनही त्याला बरोबर उत्तर सांगता आले नाही. एकूण परिस्थिती माझ्या लक्षात आली.

डिसेंबर महिना सुरू झाला होता. एसएससी परीक्षा मार्च मध्ये असते. त्यामुळे अमितला अभ्यास करण्यासाठी चार महिने हाताशी होते. त्याला मी विचारले की मी सांगेन तसा अभ्यास करण्याची तयारी आहे का ? त्यावर त्याने होकार दिला. त्याला चित्रकलेची आवड असल्यामुळे भूमितीचा चांगला परिचय असेल अशा अपेक्षेने मी त्याला भूमिती पासून सुरुवात करायला सांगितले. भूमिती मधले कोणते प्रकरण आवडते ते घेऊन त्याच्यातील सोपे सोपे प्रश्न सोडवायला सांगितले.

त्याने भूमिती मधल्या भौमितिक रचना या चित्रकलेच्या संबंधित प्रकरणाची निवड केली. मी त्याला त्यातील सोपे प्रश्न सोडवायला सांगितले. त्याच्याकडे चिकाटी आणि सहनशीलता भरपुर असल्याने दिवसभर बसून तो एकेक प्रश्न सोडवून मला दाखवीत असे. मी त्याला सुचवलेल्या दुरूस्त्या करून सुधारणा करीत असे. सकाळी मी शाळेत असताना पायरीवर कुठेतरी बसून गणिताची उदाहरणे सोडवीत असे. दुपारी जेवायला जाऊन आल्यावर मी घरी असताना पुन्हा येऊन माझ्या घरी बसत असे.

तीन महिने हा कार्यक्रम सुरू होता. सगळ्या प्रकरणातून सोपे सोपे प्रश्न त्याने सोडवले. त्याचा आत्मविश्वास वाढत गेला. जुन्या प्रश्नपत्रिका मधून सोपे प्रश्न सोडवायला सांगितले. शेवटी प्रश्नपत्रिका देऊन सोडवायला सांगितल्या. त्यावेळी भूमितीची ७५ मार्क आणि बीजगणिताची ७५ मार्कांची अशा प्रश्नपत्रिका असत. आता पर्यंत त्याला दीडशे पैकी १५ मार्क देखील मिळत नव्हते.

एवढ्या तयारीनंतर पहिल्यांदा प्रश्नपत्रिका सोडवल्या त्यामध्ये त्याला दीडशे पैकी ४० पर्यंत मार्क मिळाले. पास होण्यासाठी ५२ मार्कांची गरज लागायची. मार्चमध्ये परीक्षा सुरू होईपर्यंत गाडी ५० मार्कांपर्यंत पोहोचली. परीक्षेच्या सुरु झाल्यानंतर गणिताचे दोन पेपर देऊन देऊन पास होण्याची आशा घेऊन तो घरी परतला. रिझल्ट लागला तेव्हा अमितने लढाई जिंकली होती.

मधल्या काळामध्ये अमितने मला एक भेटवस्तू दिली. स्वतः थर्मोकोल पासून बनवलेले ते बंदुकीचे मॉडेल होते. प्रथम मी पाहिले तेव्हा खरीच बंदूक आहे असे मला वाटले. माझ्या घरी ते मॉडेल बरेच दिवस होते. एकदा माझ्या एका मित्राने खरी बंदूक समजून हातात

घेतली व मोडली. अमितनेच माझ्या मुलीच्या लग्नात स्टेजवरील डेकोरेशन केले होते. लग्नाला आलेल्या अनेकांनी त्याचे कौतुक केले होते.

रिझल्ट नंतर पुढच्या शिक्षणाचा विचार सुरू झाला. अमितला आता फाईन आर्ट कॉलेजला प्रवेश मिळवणे आवश्यक होते. त्याने चित्रकलेची इंटरमिजिएट परीक्षा दिलेली असल्यामुळे चित्रकलेसाठी त्याला प्रवेश मिळू शकत होता परंतु अडचण होती एसएससी परीक्षेतील मार्कांची ! अनेक वेळा परीक्षा देऊन पास झालेल्या विद्यार्थ्यांना ३५% मार्क मिळाले आहेत असे गृहीत धरले जाते. सरकारी चित्रकला विद्यालयात प्रवेश मिळणे तर कठीण होते.

शेवटी वसई मधील कला महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. डोनेशन देऊन प्रवेश मिळत होता परंतु डोनेशन देण्याची त्याची आर्थिक परिस्थिती नव्हती. शिक्षकांकडून मदत गोळा करून फी भरण्याची तयारी केली. चित्रकला विद्यालयाच्या संचालकांच्या ओळखीने प्रवेश मिळाला.

आवडीच्या क्षेत्रात प्रवेश मिळाल्याने त्याने दोन वर्षात खुप प्रगती केली. त्यानंतर त्याला गुणवत्तेच्या जोरावर रहेजा ह्या चित्रकलेच्या शासकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. तेथे त्याने चार वर्षाचा कमर्शियल आर्टचा डिप्लोमा केला. उपाशी पोटी खिशात पैसे नसताना ती चार वर्षे त्याने कशी पूर्ण केली हे त्यालाच माहीत. मधून मधून मला येऊन भेटून जायचा.

शिक्षण पूर्ण झाल्यावर त्याला लगेच रिलायन्स कंपनी मध्ये नोकरी मिळाली. त्यानंतर त्याने कम्प्यूटर ॲनिमेशन मध्ये बराच अनुभव घेतला एक-दोन कंपन्यात नोकऱ्या बदलल्यानंतर शेवटी स्वतःची ॲनिमेटेड गेम्स तयार करण्याची कंपनी काढली. आता तो स्वतःच्या पायावर उभा असून अनेकांना त्याने आपल्याकडे काम दिले आहे.

✦ ✦✦

# ती वाट सुंदर होती...

■ स्टॅन्ली गोन्सालविस, वसई

"या बकुळीच्या झाडाखाली..." खूप दिवसांनी रेडिओ लावला, तर हे भावगीत कानावर पडले. मी रेडिओसमोर कान देऊन बसलो. गाणं संपलं. शब्द हवेत विरुन गेले आणि बिदीतला तो बकुळवृक्ष माझ्या तन-मनावर सावली धरुन उभा असलेला दिसू लागला. त्याने भूमीला समर्पित केलेल्या फुलांच्या गंधकोषात घुटमळणारे मन आणि माझ्या रित्या ओंजळीत हलकीच येऊन पडणारी ती फुले...

आमच्या खळयातूनच सरळ पुढे जाणारी वाट म्हणजे आमची बीद. देवळात, शाळेत जायची ही आमची वहिवाट. ओंडी बीद (खोल) म्हणून लोक तिला ओळखायचे. खडबडीत व खड्ड्यांची वळणवाट. बैलगाडीचा जेमतेम रस्ता. दोन गाड्या समोरासमोरुन आल्या की एका गाडीला बाजूच्या वईत (कुंपणात) घुसावे लागे. बैलांना ते ठाऊक असायचे. वईच्या झाडापानांत शिरुन ते पानं ओरबाडीत उभे रहात. दुसरं गाडं पास होताच, गाडेकर "हाडऽऽ बैलाऽऽ" अशी हाळी देत समोरच्या जूवर काठी हाणायचा. बैल पुन्हा मार्गाला लागायचे. तोवर शाळेच्या वाटेवर असलेले आम्ही मागून त्या गाड्यावर चढून पेंढयाच्या राशीवर जाऊन बसायचो.

गाडीला मागच्या बाजूला आलेला ताण गाडेकऱ्याला जाणवायचा. बैलांच्या मानेवरील जू वर उचललं जायचं. तो बसल्या जागेवरुन शिव्या द्यायचा, "च्या मायला तुमश्या ते... पोरांनोऽऽ उतरा पयलेऽऽ नंय ते येऊन पराणी मारीन तुमश्या xxx"

पेंढयाने भरलेले गाडे ओढताना आधीच तोंडाला फेस आलेले बैल आम्हां चार-पाच जणांच्या वजनाने कुंथायला लागायचे. गाडं मध्येच थांबवलं की बैल जागीच ब्रेक लावून उभे रहात. त्यामुळे गाडेकर आम्हाला शिव्या घालीत बैलांच्या पाठीवर पराणीच्या काठीने फटके हाणीत रहायचा. आम्ही वर बसून हाताला लागतील त्या झाडांच्या फांद्या खेचत खिदळत रहायचो. शाळेजवळ गाडं येताच चालत्या गाडीतून पटापट उड्या मारुन पसार व्हायचो...

रोज काही बैलगाडी भेटायची नाही. एरवी चालतच बिदीची वाट तुडवावी लागे. तसं रोज सकाळी मोठ्या मायबरोबर मिस्साला जावं लागायचं. आमची माय 'काणी' सांगायची

म्हणून मी तिच्याजवळ झोपत असे. रोजच्या त्याच त्या कहाणीचं दळण दळून झाल्यावर ती उशिरापर्यंत रजार (प्रार्थना) करीत बसायची. बेंतीन मावली, गरास मावली, रुजार मावली, रमेद मावली अशा एकूण एक माऊल्या व तिच्या माहितीतल्या सांव फराशीस, सांव झुजे, सांव अतोन ह्या संत मंडळींना गा-हाणं घालून झाल्यावर कुटुंबातील सर्व मेलेल्या माणसांची नावं घेत तिचं मोठया आवाजात रजार चालायचं. त्यात मच्छर गुणगुणत यायचं. खाटेच्या सुंभातून बाहेर येऊन ढेकणांचे सैन्य गनिमी हल्ला करायचे. मग माय रुजार बाजूला ठेवून त्यांचा शोध घ्यायला लागायची. त्यानंतर पुन्हा तेस (प्रार्थना) चालू... खाटेत झोपलेल्या माझी झोप त्यामुळे सतत चाळवत रहायची.

त्यामुळे सकाळपरी उशिरापर्यंत झोपून रहावसं वाटे. पण कावळे भल्या पहाटेच खिडकीजवळ येऊन कावकाव करीत असायचे. हा ‘काक अलाराम’ मायला जागवायला पुरेसा असायचा. “कागळा आला बग... पोरा, ऊठ रे, मर्तीन होईल आथं...” ती माझी कांबळ ओढत ढोसलत रहायची. अस्सा राग यायचा मायचा ! “निजू दे न गो डोकरे !” आमची आय मायसाठी (तिच्या पाठी) वापरत असलेले हे विशेषनाम मनातल्या मनात उच्चारीत मी हात-पाय आपटीत पुन्हा कांबळ लपेटून झोपी जायचो.

खूप वेळाने देवळातलं पाचचं घाट वाजायचं. गावातला मिंगूकाका त्याचे टोणगे घेऊन रहाटावर निघायचा. टोणगे पुढे, तो मागे. पायाखाली जनावर वगैरे येऊ नये म्हणून की काय तो जोरजोरात गाणं बोलायचा – “ऊठ माळया, सांदाला रे, बैल झूप रे राटाला रेऽऽ”

सामाईक बावखलातील तो मोठा हिस्सेदार असल्याने सकाळी पहिला ‘वारा’(पाळी) त्याचा असायचा. आमोशा असो नाहीतर पौर्णिमा, रोजरोज तेच सांदाचं गाणं गात (व माझी झोपमोड करत) मिंगू आमच्या खिडकीजवळून जायचा. आमच्या मायला तो आवाज द्यायचा, “आवोऽऽ उठली का ? बोंदी गेऽऽ”

“पोरा ऊठ, मिंगू गेला राटावर...”

मरो तो मिंगू... मी कांबळीतून हळूच डोकं बाहेर काढून बाहेरच्या काळोखाचा अंदाज घेत मायकडे पाठ फिरवायचो. माझ्या झोपेवर टपलेले इतर प्राणीही आता जागे झालेले असायचे. काकूच्या लाडक्या तांबड्या कोंबड्याचे कोऽ कोऽ कानकीट करायचे. काकू अधूनमधून मला ताती (अंडी) देत असल्याने, राग आला तरी कोकोला कानाआड करावे लागे. आमची मांजर, आयच्या भाषेत काळुंद्री, खिडकीतून आत येऊन गोधडीत शिरुन गुर्रऽ गुर्रऽ करु लागायची. रात्रभर उगाचच्या उगाच भुंकत रहाणारा टॉमीसुध्दा कूंऽ कूंऽ करीत खाटेखाली येऊन बसायची.

तिथे चुलीवर रोट्या भाजताना आयच्या हाका सुरु व्हायच्या. पाय (बाबा) कामाला निघताना अंगावरील कांबळ ओढीत, “ऊठ रे घोडया, मिस्साला जा. आबेस कर... तांबड्या लायनी नय पायेत रिजटमंद...” असे बाप म्हणून मुलांना दम देण्याचे आपले कर्तव्य नेमाने पार पाडायचे. आता उठणं भाग असायचं. माकडछापने दात घासून, चहा-रोटी खाऊन मिळतील ते कपडे अंगावर चढवून तयार व्हायचं.

एव्हाना माय तिकडे माशीवर (झोपाळा) डोक्यावर ‘वल’ वगैरे घेऊन तयार होऊन बसलेली असायची. तिचा हात धरुन मिस्साला निघायचं. थंडीत, आगोठीत सकाळी बिदीतून जाताना काळोख असायचा. पायाखाली काही पडेल त्याची भीती. कधी एखादं कोलसूट नाहीतर मुंगूस आडवं जाऊन वईत घुसायचं. त्यामुळे सावधगिरी बाळगावी लागे.

“नीट बगून सल रेऽ लक्ष कटे हय तुअं?” माय माझा हात जोरात हलवत सांगायची. संधिवातामुळे तिचे पाय दुखायचे. पण मी पडेन (असं तिला वाटायचं) म्हणून ती माझा हात घट्ट पकडून चालायची. कधी दुसरी एखादी काकू (डोकरी) सोबतीला मिळायची. मग देवळात पोहचेपर्यंत दोघींच्या आपापल्या ओबायच्या (सुना) वार्ता संपायच्या नाहीत...

मध्येच मी हळूच माझे हात सोडवून घ्यायचो. मागे वळून पहावं तर टॉमी आमच्या मागे येताना दिसायचा. तसा मला देवळात जायचा (तेव्हांपासूनच) कंटाळा. टॉमी मात्र दररोज देवळात यायला (चारही पायांवर) तय्यार. तसे इतरही बरेच कुत्रे (स्वत:हून) देवळात येत. हे कुत्रे देवा-धर्मासाठी देवळात यायचे की आपल्या मित्र (मैत्रिणींना) भेटण्यासाठी यायचे, हे कळायला काहीच मार्ग नव्हता. पण कुत्र्यांना देवळाची ओढ असते, हे आजही दिसतं. हे कुत्रे त्यांच्या श्वानधर्माला जागून देवळात एकमेकांशी वचावचा भांडायचे. त्यांची ती पळापळ व कज्जा बघताना खूपच मज्जा यायची व शेर्माव (प्रवचन) ऐकताना कधीच डुलकी लागायची नाही...

असो. तर माय थोडं अंतर चालून गेल्यावर (दमल्यामुळे) थांबायची. मागे वळून टॉमी येतोय का पहायची. बिदीतला दगड उचलून वलीत लपवून उभी रहायची. टॉमी कुत्रा असल्याने मायपेक्षा हुशार होता. आम्ही थांबलो की तोही थांबायचा. “मीस अर्द जालं... ओ अदमाशी मेला, तरास द्याला देवळात येते...” असं म्हणत ती हातातला दगड त्याच्यावर भिरकवायची. टॉमी दगड चुकवून बाजूच्या वईत दिसेनासा व्हायचा. देवळात आल्यावर बघावं तर टॉमी आमचा वास काढीत बाकाजवळ येऊन बसलेला ! कधीकधी मेरणीआपाय (चर्चसेवक) हातात दांडा घेऊन यायचे व कुत्र्यांच्या पाठीत उपटी मारायचे. मार खाऊनही टॉमी दुसऱ्या दिवशी पुन्हा आमच्या मागे देवळात हजर...

देवळातून येताच शाळेची तयारी. कुलकर्णी बाई शिकवताना विसरायच्या, पण गृहपाठ द्यायला कधीच विसरत नसत. त्यामुळे गृहपाठ पाठ सोडीत नसे. तेव्हा गाईडं नव्हती की कोचिंग क्लास नव्हता. आय-पायला कधी (अगदीच नाईलाज झाल्यावर) घाबरत घाबरत प्रश्नाचे उत्तर विचारावे तर उलट दम मिळायचा, “शाळेत करतो काय मग? अख्खा दिवस उंडारतो... रात न् दी खेळ... अजिबात नय हांगणार...” त्यांनाही अभ्यासातलं काही कळत नव्हतं हे गुपित उघड होईतोवर आम्ही बाप झालो होतो. त्यामुळे न सुटलेल्या प्रश्नांची उत्तरे शाळेत आल्यावर घाईघाईने एकमेकांच्या वहीतून उतरवून घ्यायची. कधी ह्या प्रश्नाचे उत्तर त्या प्रश्नाला असेही व्हायचे व बाईंचा मार काही चुकायचा नाही. असे आम्ही चुकत चुकत शिकलो व (चुकून) पास झालो !

तर (कालचाच) युनिफॉर्म अंगावर चढवून, कणेरी पिऊन खुरसाजवळ (क्रुस) यायचं. तिथे कोणीतरी रात्री पेटवलेल्या मेणवातीचं मेण खरवडत दोस्तांची वाट बघायची. कार्लुस, रिचर्ड, अंतू, पिट्या, अरुण, पक्या, जानी असे कोण आमच्या तर कोण मागच्या वर्गात राहिलेले सोबती एकेक करुन जमायचे. हो, एकट्याने बिदीतून जायची कोणाची शामत नव्हती. एकटयाची भीती चार-चौघांत लपून जाते. गँगमध्ये असलो की वाघाची ताकद येते... म्हणून एकत्र.

त्यामुळे आंबे-बोरं पाडणे, पाखरांना टिपणे, बेलकाटं (खेकडे), डाकू, चिवणी, खवळी पकडणे, सरडयांचा पाठलाग करणे, फुलपाखरं-चतुरांना पकडणे अशी बरीच ‘सहकारेण कार्यसिध्दी’ घडायची आणि मनातली भागूबाई पळून जायची. अरुण आणि पक्या हे आमचे आदिवासी शाळामित्र जणू त्यांनी प्रत्यक्ष पाहिल्यासारख्या भूता-खेतांच्या कथा ऐकवायचे. त्यांच्या त्या अजब नवल कथांवर आम्ही खऱ्या-खोट्याची शहानिशा न करता विश्वास ठेवायचो.

बिदीच्या वळणावरील ओवळीचं (बकुळ) झाड हे त्याचं कारण. तिथे वईला उंच वाढून वर छत्रीसारखा डेरा धरलेला हा मोठा वृक्ष होता. त्यावरुन ओवळं सतत जमिनीवर पडायची. हात पुढे करुन उभं राहिलं तरी सहज पाच-सहा ओवळं अलगद ओंजळीत येऊन विसावायची. त्यांचा तो रेशीमस्पर्श आणि मंद सुगंध हुंगत-हुंगत शाळेत निघायचं. नाहीतर खिशात किंवा दफ्तरात ठेवायची. ती दरवळ दिवसभर सोबत करायची.

बकुळीची काळीशार सावली अस्ताव्यस्त पसरुन रहायची. त्यात आजूबाजूला सर्वत्र टणटणीचं(घाणेरी) जंगल. त्यामुळे तिथे भर दुपारीसुध्दा काळोख वाटायचा. जवळपास वस्तीही नव्हती. लागूनच बबनची वाडी. तिथे पानवेलीचे दाट मांडव, वेलीवर सावली धरलेल्या भुरीच्या केळी व बांधावर पपया... असं घनगर्द वातावरण. अरुण सांगायचा,

“ओवळीखालं हेरलीन निघते दुपारच्याला. आय शप्पत! मी बघिलती एकदा... आणि रातच्या बाराला बरम्या घोड्यावर बसून फिरतो. हेरलीन उलटया पायाची असते. पाठी लागली का झुंबलीच अंगाला... बरम्या लागला का घेऊन जातो माणसाला कुठे बावखलात, चिखलात आणि रात्रभर फिरवून सकाळी घरी आणून सोडतो...”

अरुणच्या अशा भयकथा ऐकत ओवळीजवळ आलो की आम्ही कावरेबावरे व्हायचो. मग पिटया धीर द्यायचा, “छातीवरल्या बेंतिनीला हात लावा... काय नाय करणार हेरलीन... घाबरते ती परमेसराला.” पण माझी छाती इतकी धडधडत असायची की बेंतीन हाताला लागायची नाही. अरुणच्या ह्या कहाण्या देवळात जाताना मी मायला सांगत असे. तेव्हा ती आवाज चढवून म्हणायची, “वगा बव! नय त्या वार्ता काढते ओवळीखालं... ‘आमशे बापा’ बोल...” माय ओवळीखालं ‘आमशे बापा’ प्रार्थना पुटपुटत थांबायची व जमिनीवर पडलेली फुलं पटापट उचलून पदरात टाकायची. घरी आल्यावर ती आल्तारावर ठेवायची. मीसुध्दा कितीतरी फुले पुस्तकाच्या पानात ठेवलेली. निर्माल्य झाले तरी त्यांचा गंध मिटायचा नाही...

दुपारी जेवणाच्या सुट्टीत आम्ही घरी यायचो. वेळ वाचवण्यासाठी धावत-धावत यायचो. धन-चिंचवणी-डाळ असं खाऊन फटाफट निघायचं चिंचा पाडायला. सुक-या काकाच्या भटात एक गोडी चिंच होती. कधी तो भटात फेरी मारायचा. त्यामुळे आम्ही चिंचेवर बिदीतूनच दगडमार करुन चिंचेचा पाऊस पाडायचो. हाती लागतील तितक्या चिंचा उचलून खिसे भरुन शाळेकडे पळायचं. बोरांच्या दिवसात फरसू मास्तरच्या बोरीवर धाड... त्या गोड हाक्कर (साखर) चिंचा, बोरं म्हणजे आमची मोठी दौलत असायची.

हा मेवा वर्गात आणून मित्रांना थोडा थोडा वाटायचा व गुपचूप चघळत बसायचं. बाईंना कधीतरी संशय यायचा. त्या नेमक्या उठवायच्या, “तू सांग रे” टेबलावर छडी आपटीत त्या ओरडायच्या. पुढची छडी आपल्या हातावर पडण्याआधी काहीतरी उत्तर द्यावं लागायचं. पण काहीतरी बोलायला जायचं आणि तोंडातील चिंचोका टणकन् बाकावर पडायचा. उत्तर बरोबर असलं तरी आणि नसलं तरीही छडीचा मार काही चुकायचा नाही.

एकदा पावसाळयात गटारात कासवाचं पिल्लू दिसलं. मग काय, आमची गँग त्याला पकडण्यात गुंतली. कासवं पाण्यात भारी चपळ. लवकर हाती लागेना. खूप वेळाने माझ्याच हाती लागलं! शर्ट-पॅन्ट भिजली होती, पण कासव पकडल्याचा आनंद मोठा होता. मी त्याला पॅन्टच्या खिशात ठेवले व खिशावर हात धरुन शाळेत आलो. वर्गात उजळणी सुरु होती. “बोल रे, एकोणीसचा पाढा” बाईंनी माझ्या अवताराकडे पहात मला आरोपीच्या पिंज-यात उभे केले. आता उलटतपासणी सुरु. पंधराच्या पुढे आम्ही धावू शकत नव्हतो. बाईंनी कान धरुन वर्गासमोर उभं रहायची शिक्षा फर्मावली.

मी मुकाट खिशावर धरलेला हात काढून कान पकडून उभा राहिलो. त्याबरोबर खिशातून कासवाची मुक्तीसाठी धडपड सुरु झाली. त्याच्या पायाच्या नखांच्या भलत्या ठिकाणी गुदगुल्या होऊ लागल्या. काय करावे मला कळेना. हात सोडले तर शिक्षा ठरलेली. इतक्यात ते कासव खिशातून बाहेर आले व खाली पडले! सर्व वर्गात हास्याचा कल्लोळ उठला. मी मात्र रडकुंडीला आलो होतो. मुद्देमाल अंगावर सापडल्यामुळे बाईंनी माझ्या पार्श्वभागावर फटाफट छडीचे फटके मारले. एक कासव पकडले म्हणून बाईंचे काय हे क्रौर्य! बाल मानसशास्त्र, मानवाधिकार वगैरे तेव्हाच्या शिक्षकांना कोणी शिकवलेले नव्हते, आणि शिक्षकांना शिक्षा हा प्रकारच नव्हता... नसो.

बिदीत ओवळाच्या झाडाजवळ टणटणीचं जंगल माजलं होतं. त्यावर गुंजाचे वेल पसरलेले. गुंजाच्या शेंगेतील चकचकीत लाल बियांवरील काळा ठिपका टकाटका आपल्याकडे पहात असल्यासारखा वाटे. ह्या गुंजा काढून खेळायला घ्यायच्या. टणटणीची फुलं एकदमच ब्युटी'फुल'! पण वास जाम घाणेरडा. त्या फुलांना नंतर मण्यासारखे हिरवे घोस येत. पिकल्यावर ते काळसर जांभळे दिसत. ती फळं खायला बुलबुल, मैनांची झुंबड उडायची. फुलपाखरंही झाडावर खूप यायची. अरुण आणि पक्या हे आमच्यातील दाविद – गलोलीने पक्षांना अचूक टिपण्यात पटाईत. त्यांच्या दफ्तरात 'राबट' असायचेच. किती चिमण्या, बुलबुलं, बुडया(खारी), सरडे त्यांच्या दगड'गोळयां'ना बळी पडले असतील ह्याचा 'नेम' नाही. टणटणीची ती गोड फळं आम्हीसुध्दा मटकवायचो. अशीच मण्यासारखी पिवळी मऊ फळं खोरेट्याला यायची. पाखरं आणि पोरं त्यांचे गि-हाईक.

वईला सूर्यफुलांचं रान होतं. सूर्य उगवताच ती फुलं सूर्यकिरणांकडे माना वळवून फिरत रहात. संध्याकाळी मावळतीकडे पहात माना खाली घालीत. काळया ठसठशीत कुंकवाभोवती पिवळया पाकळयांची आरास केल्यासारखी ती दिसायची. आकार शेवंतीएवढा. वास नावापुरता. काळे-जांभळे भुंगे व रंगील्या फुलपाखरांचा त्याभोवती सतत नाच चालायचा. सूर्यप्रकाशात चमकणारे ते नाचरे-हसरे जीव... 'छान किती दिसते फुलपाखरु...' ही वर्गात शिकवलेली कविता गात आम्ही निसर्गाच्या त्या अजाण लेकरांना कपटाने पकडून पुस्तकात बंद करायचो. दोन दिवसांनी काढून घरात कुठे कुठे चिकटवायचो... आमचेही हे क्रौर्यच होते. आमच्या हातून सुटण्याची त्या इवल्या जीवांची तडफड आठवून आज मन खंतावते. हाताला चिकटलेल्या त्यांच्या फडफडणा-या पंखांवरील सप्तरंगी 'रक्त'बिंदू डोळयापुढे लख्ख दिसतात. अजाणता घडलेली निष्पापांच्या प्राणहरणाची वेदना वाढत्या वयात ठसठसू लागते. न कळत्या वयातील गमती आणि त्यातून कोणाच्या जीवाचा झालेला खेळ...

शनिवार म्हणजे आमचा आनंदवार. आजच्या भाषेत वीकएन्ड. अर्ध्या दिवसाची शाळा. मग बेत ठरायचा. दफ्तरं खांद्याला अडकवून मोहिमेवर निघायचं. एकदा कार्लुसने विडी ओढायची आयडिया काढली. आमचे आपाय (आजोबा) विडी ओढायचे. त्यांचे कोपात (मित्र) वगैरे आले की ते विडीचा डबा काढून विड्या पेटवून वार्ता करीत बसायचे. डबा पुन्हा त्यांच्या कपाटात. मुलांना ‘धुम्रपानास सक्त मनाई’ होती. अनेकदा प्रयत्न करुनही तो डबा माझ्या हाती लागला नव्हता. आपायसारखे आरामखुर्चीत पाय लांब करुन बसावे व हाताच्या मुठीत विडी पकडून मोठा झुरका घेत नाकातून धूर सोडण्याचे माझे कधीपासूनचे स्वप्न होते. त्यामुळे मनाई हुकूम मोडून ते स्वप्न पुरे करण्यासाठी आम्ही गुप्तपणे आखणी केली. प्रत्येकाने घरातून आगपेटीतील दोन-दोन काड्या आणल्या. रिकामी आगपेटया होत्याच. मग बिदीतील आपटयाच्या झाडाची सुकलेली पाने काढली. पपईच्या सुकल्या पानांचा चुरा केला. हा तंबाखू. तो आपट्याच्या पानात गुंडाळून त्याला धागा बांधला. झाल्या विड्या. हया विडया व आगपेट्या आम्ही एका झाडाखाली दडवून ठेवल्या.

शनिवारी दुपारी शाळा सुटताच आम्ही भटातील रहाटावर गेलो. दुपारी तिथे सामसूम असायची. रहाटावर बसून विड्या काढल्या. पेटवल्या. ऐटीत झुरके मारु लागलो. एकमेकांचे बघून तोंडात धूर ओढून नाकातून बाहेर काढू लागलो. त्यामुळे खोकल्याची उबळ आली. ढास लागली. सर्वजण खोकू लागले. शेवटी दफ्तरं उचलून रहाटावरुन खाली आलो. विड्या पाण्यात फेकल्या व दांडातील पाण्याने चूळ भरली.

रहाटाखालील बावखलाच्या बाजूला भाताची उडवी रचलेली होती. आमच्यापैकी कोणीतरी तिथे विडी फेकली असावी. त्या विडीने आपला प्रताप दाखवला. उडव्याला आग लागली. लोक येईपर्यंत सारं जळून खाक झालं. गावभर बोभाटा झाला. पुरं पीक जळून राख झाली होती. आग कशी लागली कोणालाच समजले नाही. आम्हाला त्यातलं गांभीर्य जाणवलं नाही. कशी मजा आली, हे आठवून आम्ही जाता-येता हसू-खिदळू लागलो. आगीशी खेळ... त्याची आच जाणवायला खूप काळ जावा लागला...

विडी म्हटलं की पान आलंच. त्यामुळे कधी पान-प्रयोगही व्हायचा. पानवेलीची (नागवेल) तळव्याएवढाली तजेलदार पानं नजरेत भरणारी. अनेक गावकरी पानपट्टी खाताना दिसत. तळयावरच्या सोसायटीत रेशन आणायला जावं लागायचं. सोसायटीला लागूनच पानविडी शॉप होतं. रेशन म्हणजे तासाभराची रांग आलीच. तिथे पानाच्या ठेल्यावर रमेश बैठक मारुन पानं कात्रीत बसलेला असे. हळूच जाऊन त्याच्यापुढे हात केला की तो हातावर बडीशोप, लाल सुपारी असं काहीतरी ठेवायचा. कधी त्याने आम्हाला ‘रिक्त हस्ते’ परत पाठवले नाही. तेच तोंडात पानासारखं चघळीत रेशनच्या रांगेत उभं रहायचं. पण मोठी

माणसं पान खाताना त्यांच्या तोंडातून गळणारा तो लाल मुखरस, ओठांवर दोन बोटं धरुन त्यामधून मारलेली लालभडक पिचकारी ह्याचं आकर्षण अधिक होतं.

मग आम्ही आळीपाळीने रमेशकडून बडीशोप वगैरे जमवायचो. झाडाखाली पडलेल्या सुपा-या दगडाने फोडून त्यांचा चुरा करायचा. काटेसावरीचे काटे काढून ते कुटायचे. त्यामुळे पानाला काथ्यासारखा लाल रंग यायचा. हा मालमसाला पानात टाकून त्याचा तोबरा भरायचा. तशी काही त्यात फार मजा यायची नाही. पण मोठयांचं अनुकरण करीतच आपण 'मोठे' होत असतो ना! हे मोठेपण नक्की कशात असतं हे कळेतोवर कधी कधी (खूप) उशीर झालेला असतो, हेही उशिरानेच कळतं...

पावसाळयात ओंड्या बिदीला पूर यायचा. मुळात पावसाळी पाण्याच्या ओहोळाची ती नैसर्गिक वहिवाट असावी. आगोठ संपल्यावर लोक जाण्या-येण्यासाठी ती वापरत. कालांतराने तीच पायवाट बनली. बिदीच्या दोन्ही काठावरच्या वाड्या कितीतरी उंचीवर. त्यामुळे पावसाचे पाणी सर्व बाजूंनी बिदीत उतरायचे. गुडघाभर पाणी नेहमीच असायचे. त्या पाण्यातून डुबूक डुबूक करीत शाळेत जाताना धम्माल यायची. पाऊस माघारी फिरला की, पाणी उतरायचं. मात्र ते नोव्हेंबरपर्यंत गटारातून झुरुमुरू वहात असायचं. नाव गटार, पण पाणी नितळ. त्यात खूप मासोळया लवलवत असायच्या. गटाराच्या काठाने तेरं (सफेद अळू) तरारुन उठलेली असत. त्यांच्या बुडाशी बेलकाटांची बिळं. काळे खुबेसुध्दा पाण्यात तोंड उघडून बसलेले असत. त्यांना उचलताच ते तोंड मिटून घेत.

संध्याकाळी शाळेतून येताना ह्या उथळ पाण्यात आमची मासेमारी चालायची. पाण्यात लोद (केळीचा खांब) टाकून त्यावर चिखलाचा बांध घालून खवळी, चिवणी, डाकू पकडायचे. बाटलीत भरुन नाहीतर तेराच्या पानाच्या द्रोणात भरुन घरी आणायचे. एव्हाना चिंबो-या बिळात दडी मारुन बसत. मग नारळीच्या झापाची पाती घेऊन तिच्या बिळात घालायची. बाजूला बसून हलवत रहायचं. हळूहळू चिंबोरी बाहेर यायची. मग वरुन झडप घालून तिला पकडायचं. कधी एखादी मोठी चिंबोरी फांगोडा मारायची. ती अशी चावा घ्यायची की तिचा पाय तोडल्याशिवाय पकड सुटायची नाही. मग रागाने दगडावर आपटून तिला चेचून टाकायचं... आणि नंतर आपणच आपल्या रक्ताळलेल्या बोटावर लघवी करायची! पिट्याने सांगितलेला हा अक्सीर ॲन्टिसेप्टीक इलाज. चिवणं किंवा नारहिंगटीने काटा मारला तरी हाच उपाय. आपल्याच हातात असलेला... कधी आयत्या बिळात लपलेली नानेड्डी बाहेर निघत. अशावेळी काठया, दगड घेऊन एकजात सारे त्यावर तुटून पडायचे. सर्व सरपटणारे प्राणी धोकादायक, हे आमचं (पुस्तकाबाहेरचं) गणित पक्कं असल्याने त्या बिनविषारी नानेड्डुयाचा बळी ठरलेला...

अंतू तसा डेरिंगबाज. तो नानेङुयाच्या शेपटीला धरुन पकडायचा. बारक्या पोरांपुढे त्याला नाचवून त्यांना घाबरवून सोडायचा. खूप खेळ झाल्यावर जमिनीवर आपटून मारायचा. ह्या अशा गोष्टींत तज्ज्ञ असल्याने अभ्यासात मागे व वर्गातही प्रत्येक वर्षी त्याच्यासाठी मागच्या बाकावरील जागा आरक्षित असे. तिथेही त्याच्या करामती चालत. तो काडेपेटीत तितूर (चतूर), फुलपाखरं, किडे वगैरे पकडून आणायचा. वर्गात मध्येच त्यांना सोडायचा व गंमत बघत बसायचा. त्याच्या करामती वाढल्या तेव्हा बाईंनी प्रिन्सिपॉल फादर पिटरना सांगितले. त्यांनी सकाळच्या प्रार्थनेवेळी सर्वांसमोर त्याच्या हातावर रट्टे हाणून त्याचा ‘गौरव’ केला!

हा राग त्याने मनात ठेवला होता. एकदा त्याने नानेङुं पकडलं तेव्हा रिचर्डने आयडिया दिली – अंत्या, वर्गात नेऊन सोड. आम्ही सर्वांनी त्याला सहर्ष ‘अनुमोदन’ दिले. झाले. अंत्याने त्याला कंपासपेटीत कोंबून शाळेत आणले व वर्ग सुरु होण्याआधी कंपासपेटी बाईंच्या टेबलाजवळ झाकण अर्धवट उघडून ठेवून दिली. थोडया वेळाने ते पिल्लू बाहेर आले. इतस्तत: फिरु लागले. ते पहाताच ‘साप साप’ म्हणून गलका करीत सारी पोरं वर्गाबाहेर पळाली. पायाजवळ साप पाहून बाई पार टरकल्या. त्या पळत पळत प्रिन्सिपॉलकडे गेल्या. फादर पिटर विठूला घेऊन आले. विठूने वर्ग तपासला. पिल्लू वर्गाबाहेर पळाले होते. त्याला रिकामी कंपासपेटी तेवढी मिळाली. फादर समजून चुकले. त्यांनी सर्वांना दम भरला. कोणीच कबूल होईना.

इतक्यात अंतू उभा राहून मानभावीपणे म्हणाला, “फादर, तो साप आपल्या बागेतूनच आला असणार...”

“अस्सं! तुला रे कसं कळलं? ये, इकडे ये...” अंतू घाबरत पुढे येताच फादरने त्याच्या पाठीत धपाटे मारले. शेवटी अंतू कबूल झाला. मग फादरनी त्याला दिवसभर आपल्या ऑफिसबाहेर उभे रहाण्याची शिक्षा फर्मावली. कैद्यासारखा मान खाली घालून अंतू तिथे उभा राहिला. तेव्हापासून सर्व पोरं त्याला ‘नानेङुं’ म्हणून चिडवू लागली. अंतूला आम्हीच भरीस घातले होते. शिक्षा त्याला झाली. धडा आम्ही घेतला. पुन्हा कधी नानेङुयाच्या मागे गेलो नाही...

बीद प्रत्येक दिवशी नवीनवेली भासायची. प्रत्येक ऋतुत वेगळा ऋतुगंध तिथे जाणवायचा. डिसेंबरात नाताळ जवळ येऊ लागला की गारसर वारे सुटून पानगळीला प्रारंभ व्हायचा. झाडी विरळ व्हायची. करंजाच्या अंगावरील पानं झडून जायची. सुकल्या शेंगा तेवढया त्यावर लटकलेल्या दिसत. लागलीच ते झाड हिरव्यालूस पानांनी डवरुन जायचं. त्यातून इटुकली जांभळया-पांढ-या ठिपक्यांची गंधील फुलं डोकवायची. देवदाराचे झाडही

पानगळ होताहोताच फुलांच्या घोसांनी भरायचं. त्याचा उग्र वास वा-याबरोबर बिदीभर सोबत करीत यायचा. त्याच्या पानांचे फूटभर लांबीचे पिवळे देठ गळून पडायचे. ते छडीसारखे फिरवत आजूबाजूच्या झाडापानांवर सपकारे मारीत जायला मजा यायची.

हळूहळू पांगारा व काटेसावरीची झाडं फुलो-याने भरभरुन यायची. जणू त्या झाडांवर वैशाखवणवा भडकायचा त्या लालेलाल फुलांतील मध चोखताना मैना, चिमण्या, कावळे, सूर्यपक्षी, पोपट, कोकिळा असे शेकडो रंगभरे पक्षी कलकलाट करीत आपसात भांडायचे. खाली पडलेली सावरीची फुलं दफ्तरात भरुन आम्ही शाळेत न्यायचो. मधल्या सुट्टीत ती चेंडूसारखी एकमेकांच्या अंगावर भिरकावत आमचा खेळ चालायचा.

बिदीत वईला जागोजागी बांबूची गच्च बनं होती. उंचच उंच वाढून ते बांबू कमानीसारखे रस्त्यावर छत्री धरीत. त्यावरुन वलकनाच्या वेली गुंडाळलेल्या दिसत. त्यातच एक भिरभि-याचं झाड होतं. त्याची सुकलेली तीन पात्यांची फुलं (की फळं? ) चक्राकार गरगरत खाली यायची. ही भिरभिरणारी ‘विमानं’ वरवर उडवणं व खाली येताना त्यांना अलगद कॅच करणं हा मजेदार खेळ होता.

आंब्याची झाडंही आता मोहरु लागायची. सकाळच्या वेळी सुटणारा मोहराचा घमघमाट धुंद करणारा. तेव्हा हापूस कुठे नव्हता. सर्वत्र रायवळ आंबे. तूप आंबा, मधी आंबा, आमट्या आंबा, हाकर (साखर) आंबा. अशी प्रत्येक झाडाची वेगळया नावाची ओळख होती. पोपट, कावळे, कोकिळा, वटवाघळं कितीतरी आंबे खाली पाडायचे. कुठे रतांब दिसली की आम्ही तिला दगडाने टिपायचो. खाली पडलेला पाचोळा पायाने दूर सारला तरी पिक्के आंबे सापडत. हे सारे आगळया चवीचे, रसाळ आंबे. त्यात गर कमी. बाठा साफ होईपर्यंत चोखून खायचे. हेच बाठे नंतर पेटवण्यात टाकून भाजून त्याच्या तुरट-कडूसर कोयी मीठ लावून खायच्या...

सुट्टीच्या दिवशी बावखलाच्या उथळ पाण्यात केळीच्या लोदाचे तारफे (तराफे) करुन आमचं ‘नौकानयन’ चालायचं. खरे तर हया नौकांची बांधणी व दुरुस्ती ह्यातच जास्त वेळ जायचा. त्यात नेहमीच क्षमतेपेक्षा जास्त ‘प्रवासी’ भरले जायचे व तराफा उलटायचा. बावखलात पडणं म्हणजे चिखलपाण्याची अंघोळ! तो वास तांबडया लाईफबॉयने अंग धुतल्याशिवाय जायचा नाही. त्यामुळे घरुन ह्या प्रकाराला विरोध असायचा. म्हणून दुपारी घरातल्या माणसांचा डोळा लागल्यावर आमचे हे जलपर्यटन चालायचे. त्यानंतर आमची कुचुंबर पार्टी ठरलेली...

पानमळयात पपयांची झाडं भरपूर. वेलीची ‘डेवरणी’ नाहीतर पानांची खुडणी चालायची तेव्हा तिथे कामकरी बाया-बाप्यांची वर्दळ असायची. एरवी शांत गारवा सर्वत्र भरुन रहायचा. कुवाकोंबडया(पाणकोंबडया) तेवढया दबकत दबकत पानवेलींच्या हरळांमधून (ओळींतून) फिरताना दिसत. माणसांची चाहूल लागताच त्या वेगात पळून जात. वर्गात शेवटचा नंबर असलेला बुट्या जानी पपई, नारळीवर चढण्यात पहिला नंबर होता. पपया काढायला तो कधीही दोन्ही पायांवर तयारच असायचा. झटक्यात तो झाडावर चढायचा व गुरम्या (अर्धपिकल्या) पपया काढून खाली सोडायचा. झेलायला आम्ही सारे तयारच असायचो. प्रत्येकाने घरुन (चोरुन) मीठ, साखर, चिंच, मसाला, सुरी असं काय काय ठरल्यानुसार आणलेलं असायचं. पपया सोलून, कापून तुकडे करायचे. खोल्यावर (केळीच्या पानावर) त्याचं कालवण बनवायचं आणि त्याच ‘ताटातून’ सर्वांनी त्यावर ताव मारायचा. मग बावडीवर जाऊन प-याने पाणी काढून ते तोंडाला लावायचे. साराच मामला चोरीचा आणि (म्हणूनच) मौजेचा!

आगोठ लागली की बीद हिरवी, पाणेरी व्हायची. माय सांगायची, “पोरा, मिरीग (मृग) लागलाय. पयला पाणी पक्का थंडा. भिजू नाका. ताप येल...” पण पयल्या पाण्यात भिजायची मजाच वेगळी. मातीचा मातकट गंध सर्वत्र सुटायचा. उरलेले पिक्के आंबे गळून पडायचे. बिळात झोपलेल्या चिंबो-या बाहेर येऊन पाऊस अंगावर घ्यायच्या. बावखलात जमलेल्या पाण्यात बेडूक डराँव डराँव करीत साद घालू लागायचे, आणि बघता बघता बावखलाकाठचं गावठी बदामाचं झाड तांबूस-हिरव्या बदामांनी लगडून जायचं. ती तुरट-गोड बदामं पाडायला कठीण. झाडावर पोपट खूप यायचे. त्यांनी पाडलेली बदामं उचलून घ्यायची. ती खाऊन बिया दफ्तरात भरुन घरी आणायच्या व फोडून त्यातले बदामगोळे चवीने खायचे. हयापेक्षा वेगळे काही बदाम असतात हेच ठाऊक नव्हतं. पुढे कळलं की, हे वाईल्ड आल्मन्ड. नखरेल अमेरिकन बदाम मिळू लागल्यावर हे अस्सल देशी बदाम गावठी ठरुन बाद झाले आणि त्याची झाडंही नकोशी होत गेली...

संज्याव (संत जॉन) च्या सणापर्यंत बावखलं तुडुंब भरुन वाहू लागायची. त्या पाण्यावर उंच गवत व कमळपानांचा हिरवा पसारा व्हायचा. त्यातून माना वर काढून पांढरी, जांभळी कमळं फुलायची. दुपारपर्यंत ती पाकळयांचा पिसारा फुलवून डोलायची. उन्हं वाढली की मुकाट मिटायची. अरुण बावखलात शिरुन आम्हाला कमळं काढून द्यायचा. कधी चिखलात हात घालून कमळाचे कांदे काढायचा. ते हे कांदे वाफवून खायचे. आम्हालाही तो द्यायचा. आत पिवळा गर असलेले ते पाणकांदे भारी टेस्टी लागायचे.

नोव्हेंबर-डिसेंबरला हिंवारं लागू लागलं की गावात जिथे-तिथे भाजीपाला जोमात बहरुन यायचा. दुधी, गळके, पडवळाचे मांडव सजायचे. बिदीलाच एक आडवाट फुटत होती. तिथे एक टेपार होतं. तो आमचा शॉर्टकट. टेपारावर आकोलाची भरपूर झाडं. टपो-या बोराएवढाली आकोलं पिकली की त्यांना जांभळा रंग येतो. ती जांभळी साल अलगद काढताच बर्फासारखा चकचकीत मऊलूस गोळा दिसायचा. ह्या झाडाला थोडे काटे. त्यामुळे, ही रानफळं काढायला अवघड, पण चवीला अतिमधुर!

तिथेच एक उंडीचं (सुरंगी) झाड होतं. त्या झाडाच्या सर्वांगाला बटणाएवढाली हजार-लाख फिक्कट पिवळी फुलं चिकटलेली असायची. गंधवणारी ती फुलं व त्यावर घुमणारे तितकेच छोटे-मोठे भुंगे. ते अंगा-तोंडावर घोंघावत. त्यांना हाकलून दोन-चार फुलं तोडून नाकाला लावत पुढे गेलो की भेंडीची झाडं लागायची. ह्या झाडांची पानं बदामच्या एक्क्यासारखी. ती तोडून मलईवाल्याला द्यायची. तो एका पानावर मलई पसरवून द्यायचा. तो गारीगार साखरी प्रकार म्हणजे आमचं तेव्हाचं आईस्क्रीम! ढीगभर पानं द्यावीत तेव्हा पानभर मलई मोफत मिळणार. अन्यथा, चार-पाच पैसे मोजून मलई विकत घ्यायची ऐपत कोणाची होती?

त्या उंडी-भेंडीच्या झाडांच्या पुढे आणखी एक बावखल होतं. बावखलाच्या निसरडया काठावरुन वरच्या भटातून जाणारी ती वन वे - एका माणसापुरती वाट होती. तिथल्या दवभरल्या वाडीत हिवाळयात आलकोन (नवलकोल), बीट, मुळे, कोबी, फ्लॉवर अशा भाज्यांचे वाफे तरारुन उठलेले दिसत. त्यातील अल्कोनाचे गरगरीत गोळे आम्हाला खुणवायचे. जमिनीत वाढलेले मुळेही आम्हाला दिसायचे. हया वाडीत कोणी ना कोणी काम करीत असायचे. पण आम्ही झटकन बांधावरुन उतरुन अल्कोन, मुळे असं हाती लागेल ते उचकटून काढून आणायचो व कचाकचा खात निघायचो. काहीतरी गुपचूप काढून घ्यायचं, खायचं व मित्रांमध्ये मिरवायचं हेच मोठं थ्रिल होतं. धर्मशास्त्राच्या तासाला फादर दहा आज्ञा शिकवत. चौथी आज्ञा – चोरी करु नकोस. तोंडपाठ होती ती. पण पाठ असलेल्या ब-याच गोष्टींच्या अर्थाचा तळ गाठला जात नाही हेच खरे.

बावखलाच्या भोवताली नारळ व नेवराची कितीतरी झाडे. नेवर तर पावसाळयापासूनचे पाच-सहा महिने कमरेभर पाण्यात खडी तपश्चर्या करीत असल्यासारखे स्थिर उभे असत. त्यांच्या गर्द हिरव्या पर्णछायेत कुवाकोंबडया व कोकिळा बसत. माणसं दिसताच कुवाकोंबडया कमळपानांवरुन उडया मारीत बावखलातील गवतात गुडूप होत. तर कोकिळा किक् किक् चित्कार करीत उडून जात. नारळीच्या शेंडयावर नाहीतर रहाटाच्या टोकावर बसून खंडया बावखलातील मासोळयांवर नजर ठेवून असायचा. अचानक पाण्यात

सूर मारुन तो मावरं पकडून पुन्हा झाडावर बसायचा. हे चाणाक्ष पक्षी अरुण-पक्याच्या राबटांना कधीच बळी पडले नाहीत, हे त्यांचे नशीब.

पावसाळा संपला की नेवरावरुन कळयांच्या हज्जारो मंजिरी लटकलेल्या दिसू लागत. थोडी थंडी अंगाला झोंबू लागताच हया कळयांतून इवलाले गुच्छ असलेली मखमाली, रक्तवर्णी फुलं खाली गळू लागत. अशा लाखो फुलांची एकरंगी रांगोळी जमिनीवर, पाण्यावर रेखाटली जायची. गव्हाच्या दाण्याएवढाली ही फुलं झाडावर दिसतच नसत. खाली पडल्यावरच त्यांची शोभा! बावखलाच्या पाण्यावर त्यांचा थर जमायचा. पाण्यात पडलेल्या झाडाच्या ओंडक्यावर उन खात बसलेल्या कासव किंवा बेडकावर दगड मारला की पाण्यावर तरंग उठत. त्या हलक्या लाटांवर हेलकावे खात चिमुकल्या नेवरफुलांचा गुलाबी थवा बदकांसारखा तरंगत दूर दूर जायचा... एप्रिल-मे मध्ये बावखलाचं पाणी तळ गाठी. पाणबदकं, बगळे मावरं मटकवायला येत. कमळं चिखलात दडी मारत. कोणताही उत्सव चार दिसांचा... तसा नेवरफुलांचा बहरही आता ओसरणीला लागायचा...

बालपण हळूहळू सरु लागलं. इतके दिवस घर, शाळा आणि खेळ हेच आमचं जग होतं. बिदीतून सकाळ-संध्याकाळ होणारी वाटचाल हे त्यातलं बंधमुक्त विश्व. तो आमचा मोकळा अवकाश होता. ही वाट चालता चालता मुक्कामाला – मॅट्रीकला येऊन पोहोचलो. ह्यापुढे प्रत्येकजण आपापल्या वाटेने निघणार होता. कोण सोबतीला होते तर काही मागे राहिले होते. आता फादर पिटर जादा क्लास घेऊ लागले. कोणाला अभ्यास करायला ते थांबवून घ्यायचे. त्यामुळे घरी येताना सांजवायचं. बिदीला लाईट नव्हते. तिकडनं एकटयाने जायची हिंमत नव्हती. त्यामुळे मी येताना लांबच्या रस्त्याने येऊ लागलो.

गावात घरांचे दरवाजे उघडेच असत. डोकरं माणूस ओटीवरील बाकडयावर विडी ओढत बसलेलं असायचं. कुठे आयमरीचं तेस (सायंप्रार्थना) चालू असायचं. आळीत पहिलं घर दुमाकाकाचं. त्याच्या ओटीवरील माशीवर सुशी हातात पुस्तक घेऊन झोके घेत बसलेली असायची. डोळे मात्र भिरभिरते. जवळ येताच माझी नजर तिचा वेध घेत रहायची. संधिप्रकाशात डोळयांना डोळे भिडायचे. जवळ येताच कसलीशी थरथर जाणवायची. हे काहीतरी वेगळं होतं. हवंहवंसं आणि हुरहूर लावणारं...

एकदा काय केलं, शाळेत जाताना भरपूर ओवळं वेचली. खिशात भरुन ठेवली. संध्याकाळी दुमाकाकाच्या घराजवळ येताच खिशातून मूठभर ओवळं काढली. मागे-पुढे पहात कानोसा घेतला. कोणी दिसत नव्हतं. झोपाळयाजवळ येऊन थबकलो. पटकन् हात सुशीपुढे केला. तिचे डोळे विस्फारले. तिचाही हात तसाच पुढे आला. मी मूठ तिच्या ओंजळीत रिती केली. तिच्या तळव्यांचा निसटता स्पर्श अंगभर शिरशिरी उठवून गेला.

फुलांचा मदगंध सर्वत्र घमघमल्यासारखे वाटले. झपाट्याने चालत घरी आलो. छाती धडधडत होती. तळव्यांना घाम फुटला होता. पायच्या कानावर गेलं तर ‘घोडयाला’ बेदम मार पडला असता. आयची शब्दांची झोड त्याहून टोचणारी... तरुण पोरा-पोरींनी हे असले चाळे करणं म्हणजे बा! बा! बा! ह्यापुढे नकोच असं काही करायला...

दुस-या दिवशी मी ओवळं उचललीच नाहीत. संध्याकाळी सुशीकडे न पहाता पटपट चालत राहिलो. पण नजर वळलीच तिच्याकडे. पहातो तर तिच्या वेणीत बकुळीचा गजरा होता. छातीवर रुळणारी वेणी ती हाताने कुरवाळीत होती. मला पहाताच वेणीचा शेपटा पाठीवर उडवत ती हसली. तिने मान खाली घातली. मी तसाच पुढे गेलो. न रहावून वळून पाहिले तर ती माझ्याकडेच पहात होती... आय-पायची माझी भीती पार निघून गेली. नंतर मग शाळेतून कितीतरी वेळा मुद्दाम उशिरा, थोडं अंधारल्यावर निघायचं... ती फुलांची ओंजळ... चोरटया स्पर्शाची ओढ आणि देह-मनावर फिरणारी मोरपिसं... त्या दोन हस-या डोळयांतून टपटपणारी बकुळफुले कितीतरी दिवस माझी स्वप्नं सजवत राहिली...

पुढेपुढे चालताना बीद सुटली. नवा मार्ग पायाखाली आला. वाहत्या काळात बिदीचं रुपही बदलत गेलं. कच्चा रस्ता पक्का डांबरी झाला. नव्या रस्त्यावरुन आता गाडया धूर सोडीत पळत असतात. दिवसा आणि रात्रीही तिथे उजेड असतो. एकेक झाड तुटू लागले तशी पाखरं दूरदेशी निघून गेली. उरल्यासुरल्या फुलांवर फुलपाखरं कधीमधी दिसतात. पावसाळयात बिदीत अजूनही पाणी भरतं आणि गटाराची सांडपाण्याने गटारगंगा बनलीय. हेरलीन, बरम्या कुठे परागंदा झाले, कुणास ठाऊक. बाजूच्या वाडया-भटांमध्ये बंगले उभे राहिले. रायवळ आंबे, चिंचा, आकोलं, बोरी जाऊन बुटकी कलमी झाडं बंगल्यांच्या अंगणात डोलत आहेत. परवाच्या वा-या-पाण्यात ते वयोवृध्द ओवळीचं झाडही कोलमडून पडलं आणि बीद पुरती पोरकी झाली...

माझी ओंजळ मात्र त्या लाख फुलांनी भरलेली आहे. विसरता येत नाहीत ते गंधभारीत दिवस. त्या स्वप्नील दिवसांच्या रेशीमझुल्यावर झुलताना आठवतो तो बकुळफुलांच्या दरवळीत थबकलेला श्वास आणि त्या अबोल स्पर्शाचा अमीट सुगंध...

******


दूरभाष : 8390706013

ई- मेल:stanleyg2013@gmail.com

# स्निग्ध चांदणे

▪ नेहा किशोर सावंत, दहिसर

nehasawant603@gmail.com

आगाशी या निसर्गसंपन्न गावाशी माझी नाळ जुळली त्याला आता तीस वर्ष झाली. या तीस वर्षात या गावाने अनेक अविस्मरणीय क्षणांची आणि असामान्य व्यक्तिमत्वांची भेट मला दिली आहे, ज्यामुळे माझं आयुष्य किती समृद्ध होत झालं आहे हे शब्दात मांडणं खरंच अवघड आहे.

मी मूळची मुंबईकर. त्यातही चाळसंस्कृतीतील खुराडयात राहाणारी. ब्लॉक संस्कृतीच्या आणि निसर्गरम्य परिसराच्या ओढीने तीस वर्षांपूर्वी आगाशीत राहायला आले. अनोळखी माणसं, अनोळखी संस्कृती, अनोळखी परिसर, वातावरण या सगळ्यांशी जुळवून घ्यायला काही काळ जावा लागला. अर्थात मनात उपरेपणाची भावना दबा धरून बसलेली होतीच. त्यात आम्ही ज्या काळात आगाशीत राहायला आलो तो काळ माफिया टोळीच्या दहशतीचा होता. कानावर रोज नव्या बातम्या येत होत्या, वर्तमानपत्रातूनही या संदर्भात काही ना काही वाचायला मिळत होतंच. हरितवसई बचाव आंदोलन, टँकर पाणी चोरी विरोधातील आंदोलन या घटनांमुळे वर्तमानपत्रातून एक़ नाव खूप परिचयाचं झालं होतं, ते नाव म्हणजे फादर फ्रान्सिस दिब्रिटो.

खुप नवल वाटलं होतं तेव्हा. कारण तोपर्यंत फादर म्हणजे धर्मगुरू. चर्चमध्ये प्रवचन देणारी व्यक्ती इतकंच माहीत होतं. परंतु वर्तमानपत्रात छापून येणारं त्यांचं लिखाण आणि त्यांचा फोटो पाहून आश्चर्याला पारावार उरत नव्हता. एकतर अस्खलित सुगम आणि सुबोध मराठीतील त्यांचं ललित लेखन आणि दुसरीकडे आपल्या लेखनातून विविध आंदोलनासंदर्भात केलेली विचारांची ठाम, स्पष्ट पण संयत मांडणी यामुळे माझ्या मनात त्यांच्याविषयी आदर निर्माण होत होता. वर्तमानपत्रात छापून येणारे फोटो पाहून हे खरंच धर्मगुरू आहेत का ? असा प्रश्न निर्माण होत होता, कारण त्यांचा पेहराव. धर्मगुरूंचा पारंपरिक घोळदार झगा त्यांच्या अंगावर कधीच दिसायचा नाही, तर साधासा खादीचा झब्बा आणि पँट असा पेहराव असायचा. कधीतरी यांना प्रत्यक्ष भेटलं पाहिजे असं मनातून खूप वाटायचं पण मार्ग दिसत नव्हता.

एकदा आमच्या शेजाऱ्यांच्या घरी 'सुवार्ता' हा अंक पाहिला. फा. फ्रान्सिस दिब्रिटो त्यावेळी सुवार्ताचे संपादक होते. अनेक ख्रिस्ती बांधवांकडे सुवार्ता अंक नियमीत येत असे. आमच्या इमारतीत आणि आजुबाजूच्या परिसरातही ईस्ट इंडियन लोक बरेच राहात होते. आमच्याशी ही सगळीच मंडळी खूप आस्थेने आणि प्रेमाने वागत होती पण आम्ही नवखे असल्यामुळे आमच्या मनातला उपरेपणा काही जात नव्हता. तेव्हा मनात आलं की या वातावरणाशी जुळवून घ्यायचं असेल तर इथली संस्कृती, घडामोडी समजून घ्यायला हव्यात, आणि त्या जर समजून घ्यायच्या असतील तर एक़मेव साधन आहे ते म्हणजे ‘सुवार्ता’. आम्ही रितसर सुवार्ताचे सभासद झालो. त्यातील बहुतांशी लेखन हे ख्रिस्तीधर्मविषयक होतं, पण अनेक लेख हे वाचनीय असायचे, डोळ्यात अंजन घालणारे असायचे, समाजभान देणारे असायचे, सुवार्तामधून स्थानिक लोकांच्या लेखनगुणांना वाव देण्यासाठी काव्यलेखन, कथालेखन, ललितलेख यांच्या स्पर्धांचं आयोजन करण्यात येत असे, मी त्या स्पर्धेत भाग घेऊ लागले. सलग दोन वर्ष मला कथा आणि ललितलेख या गटात पारितोषिक मिळाल्यामुळे माझ्यात लेखनाचा हुरूप आला आणि इथूनच माझ्या लेखनाची सुरूवात झाली. मला आठवतंय, त्यावेळी सत्यघटनेवर आधारित कथालेखन स्पर्धा घेण्यात आली होती. लेडीज स्पेशल लोकलचा अपघात या विषयावर लिहिलेल्या 'नियती' या माझ्या कथेला प्रथम क्रमांकाचं पारितोषिक मिळालं होतं. ही कथा वाचून फादरांनी मला स्वत:हून फोन केला होता. माझा माझ्या कानांवर विश्वास बसत नव्हता, ‘आनंदाचे डोही आनंद तरंग’ अशी माझी अवस्था झाली होती. सुरुवातीला थोडसं औपचारिक बोलणं झाल्यावर फादर मला म्हणाले, “नेहा, किती सुंदर कथा लिहिली आहेस तू ! वाचताना मला अगदी गहिवरून आलं.” फादरांनी स्वत: मला फोन करून प्रतिक्रिया देणं म्हणजे माझ्यासाठी मोठा पुरस्कारच होता तो.

काही दिवसांनी घरी पुरस्कार वितरण सोहळ्याचं निमंत्रण आलं, त्यात सगळ्या स्पर्धांचा निकाल जाहीर झाला होता. माझ्या कथेला पहिलं पारितोषिक मिळालं होतं. फादरांना ही गोष्ट माहीत असूनही स्पर्धेच्या नियमाला आणि शिस्तीला धरून त्यांनी ती बातमी मला दिली नव्हती. चार दिवसानंतर पुन्हा फादरांचा फोन आला, “नेहा, बक्षीस घ्यायला नक्की ये हा ! मला तुला पहायचं आहे आणि भेटायचं आहे.” खरंतर मलाच त्यांना भेटायचं होतं. पारितोषिक वितरण समारंभाच्या निमित्ताने ही संधी आयतीच चालून आली होती. हा कार्यक्रम गिरीज येथील जीवन दर्शन केंद्रात होता. या समारंभासाठी डॉ. श्रीराम लागू प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, हा एक दुग्धशर्करा योगच होता. “परमेश्वराला रिटायर करा” हे त्यांनी केलेलं विधान आणि भाषण चांगलंच गाजलं होतं नव्हे वादग्रस्त ठरलं होतं.

या समारंभाच्या धांदलीत असूनसुद्धा फादर म्हटल्याप्रमाणे मला आणि माझ्या कुटुंबाला थोडावेळ का होईना पण भेटले होते, विशेष बोलता आलं नाही म्हणून खास भेटीचं आमंत्रणही त्यांनी दिलं, इथेच त्यांचं थोरपण माझ्या अनुभवाला आलं. ललितलेख स्पर्धेचं आणि कथालेखन स्पर्धेचं बक्षीस म्हणून 'ओॲसिसच्या शोधात' आणि 'तेजाची पाऊले' ही फादरांनीच लिहिलेली ललित पुस्तकं मिळाली होती. या पुस्तकांमुळे मला फादरांमधील साहित्यिक आणि संवेदनशील उत्कट मनाच्या लेखकाचा परिचय झाला. त्यांच्या अतिशय ओघवत्या, तरल अशा शैलीने मी भारावून गेले होते. छोट्या छोट्या गोष्टीत आनंद शोधणारी, निसर्गाचे विभ्रम सौंदर्यपूर्ण नजरेने टिपणारी त्यांची दृष्टी मला भावली होती, साध्या साध्या गोष्टीतील सौंदर्य आपल्यालाही टिपता आलं पाहिजे, शोधता आलं पाहिजे, जीवनावर, माणसांवर असं निर्व्याज-निरपेक्ष प्रेम करता आलं पाहिजे हा संस्कार फादरांच्या लेखनाने माझ्या मनावर झाला. हळुहळु सुवार्तामधून माझ्या कविता छापून येऊ लागल्या, त्यामुळे मनाला एकप्रकारची उभारी आली. मनातील उपरेपणाची जाणीवही हळुहळू निघून गेली.

फादरांना कबूल केल्याप्रमाणे त्यांना भेटायला एकदा सहकुटुंब जीवनदर्शन केंद्रात गेलो होतो, तासभर छान गप्पा मारून घरी परतत असताना एकप्रकारचा आत्मविश्वास आणि असीम आनंद मनात लहरत होता. आपण परके नाही आहोत, कुणीतरी वडीलधारं आपल्या आधाराला आहे ही जाणीव मनाला दिलासा देणारी होती. फादरांमुळेच माझा परिचय कवी सायमन मार्टीन यांच्याशी झाला. सायमन तेव्हा 'सहयोग' या दिवाळी अंकाचे संपादक होते. फादरांनी मला नवी कथा लिहून सहयोग अंकासाठी द्यायला सांगितलं, माझी 'इस्कोट' ही कथा या अंकात प्रकाशित झाली. यामुळे माझा लेखनाचा उत्साह आणि हुरूप वाढू लागला. वेगवेगळ्या दिवाळी अंकातून कथा प्रसिद्ध होऊ लागल्या आणि माझ्यातली लेखिका मला गवसू लागली.

फादरांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळेच मी लिहिती झाले हे मी कधीही विसरू शकत नाही. फादरांमुळे व सायमन मार्टीन यांच्यामुळेच माझा परिचय आगाशीतील नवोदित (तेव्हाचे) कवी वर्जेश सोलंकी याच्याशी ओळख झाली. पाहता पाहता वर्जेश आणि त्याच्या कुटुंबाशी मैत्रीचे स्नेहबंध कायमचे जुळले. हळुहळु आगाशीशी आमची नाळ घट्ट जुळू लागली. फादरांनी आमच्यातलं बुजरेपण, उपरेपण हेरलं होतं का ? हा प्रश्न आजही मनाला छळत असतो. मला वाटतं, साधारण २०००-०१ हे साल असावं. मे महिन्याच्या सुट्टीत मी श्रीअंबिका योगाश्रमच्या योगवर्गाला जाऊ लागले होते. ते वातावरण आणि योगाभ्यास मला आवडू लागला, यात रीतसर प्राविण्य मिळवावं म्हणून मी योगशिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम पूर्ण करून श्रीअंबिका योगाश्रमच्या परिवाराशी जोडली गेले.

माझा व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी या परिवाराचाही मोठा हातभार लागला आहे हे मला विसरता येत नाही. या श्रीअंबिका योगाश्रमच्या वर्धापनदिनाला आम्ही प्रमुख अतिथी म्हणून लेखक, साहित्यअभ्यासक आणि सामाजिक कार्यकर्ते या नात्याने फादरांना आमंत्रित केलं होतं. कार्यक्रम ठाण्याला होता, कार्यक्रम इतक्या दूरवर असुनही फ़ादर कसलेही आढेवेढे न घेता आले होते. प्रेक्षकांमध्ये कुजबुज चालली होती, “ख्रिस्ती धर्मगुरू योगवर्गाच्या कार्यक्रमाला प्रमूख अतिथी ? त्यांनी चर्चमध्ये प्रवचन द्यावं, इकडे काय बोलणार ते ?” फादरांनी बहुदा हे अंतर्मनाने ओळखलं असावं, त्यांनी त्यांच्या शांत, स्नेहाळ संयत शैलीत साऱ्यांची मनं जिंकून घेतली. त्यांचा संतकाव्याचा व्यासंग त्यांच्या भाषणातून जाणवत होता. ज्ञानेश्वरांचे आणि ज्ञानेश्वरीचे विविध दाखले देऊन योगाचे महत्व त्यांनी उलगडून सांगितलं, तेही हातात कोणताही कागद किंवा टिपण न घेता. फादर उत्स्फुर्तपणे बोलत होते, नव्हे श्रोत्यांशी संवादच साधत होते.

ते भाषण ऐकल्यावर 'फिटे अंधाराचे जाळे झाले मोकळे आकाश' अशी साऱ्यांची अवस्था झाली होती. ज्या ज्या मंडळींनी कुजबुज करून नाकं मुरडली होती तीच मंडळी त्यांचा "उदो उदो" करायला त्यांच्याभोवती कोंडाळं करून उभी होती. पण फादर अगदी निर्विकार होते. जणू ज्ञानेश्वरांची स्थितप्रज्ञता त्यांना अवगत झाली होती. श्रीअंबिका योगाश्रमच्या शिस्तबद्ध आणि सौहार्दपूर्ण वातावरणाने फादरही भारावले होते. त्या व्यासपीठावर योगसाधकांनी सादर केलेली योगासनं पाहून फादरांच्या चेहऱ्यावर कौतुकमिश्रीत भाव दाटले होते, डोळ्यात लहान मुलाची जिज्ञासा तरळली होती.

या कार्यक्रमाचं सूत्रसंचालन मी करत होते याचंही फादरांना कौतुक वाटत होतं. फादरांचा परिचय करून देण्याची जबाबदारी माझी होती. मराठी विषयाची प्राध्यापक असल्याने आणि प्रसारमाध्यमातील निवेदनाचा अनुभव असल्याने मी खास साहित्यिक शैलीत त्यांचा परिचय करून दिला होता. कार्यक्रम संपल्यावर त्यांनी माझं कौतुक केलं. एका चांगल्या संस्थेशी मी जोडली गेले होते याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं, माझं आत्मविश्वासपूर्वक वावरणं आणि व्यासपीठावरचं बोलणं याबद्दलचा आनंद त्यांनी माझ्यापाशी बोलून व्यक्त केला. त्यांच्या या शाबासकीने मलाही आभाळ ठेंगणं झालं होतं. कार्यक्रम संपल्यावर ते मला म्हणाले, “नेहा, तुझ्यातला लेखनाचा गुण मला माहीत होता पण तुझ्या वक्तृत्वगुणाचा परिचय मला पहिल्यांदाच झाला. थांब, आता तुला एक छान मोठं कामच देतो, नाही म्हणायचं नाही हां !” एकीकडे मला आनंदही झाला आणि दुसरीकडे दडपणंही आलं. मी विचारलं, “फादर कसलं काम ?” फादर हसतहसत म्हणाले, “वेळ आली की सांगतो.”

समोरच्या व्यक्तीतले कलागुण हेरायचे आणि त्या गुणांसाठी त्याला योग्य ती संधी देऊन पुढे आणायचं ही त्यांची खासियत आहे, यामागे त्यांचा कोणताच व्यक्तिगत स्वार्थ नसतो. निरीच्छ आणि नि:स्वार्थपणे ही कृती त्यांच्या हातून घडत असते. हा अनुभव मला अनेकदा येत गेला. नकळत माझ्यावर हा संस्कार घडत गेला, या निरपेक्षवृत्तीतला आनंद हेच त्यांच्या जगण्याचं गमक असावं असं मला वाटतं.

एक दोन महिन्यानंतर फादरांचा फोन आला. “नेहा, तुला म्हटल्याप्रमाणे मला तुझ्यावर एक जबाबदारी टाकायची आहे, नाही म्हणू नकोस हां” मी म्हटलं, “फादर काम तर सांगा.”

“सुवार्ताचा साहित्यिक मेळावा आहे मोठा. त्यात सुप्रसिद्ध लेखक अनिल अवचट यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम आहे, तू तुझ्या रसाळ साहित्यिक शैलीत त्यांचा परिचय करून द्यायचा आहेस. मी त्यांचा आग्रह तात्काळ मान्य केला आणि माझ्यावर सोपवलेल्या तयारीला लागले. हा साहित्य मेळावा अगदी अविस्मरणीय झाला होता. वसई-विरार पंचक्रोशीत इतकी अनुभवी माणसं असताना माझ्यासारख्या नवखीवर ही जबाबदारी सोपवताना फादरांना ताण आला नसेल का? सतत पुढे पुढे करू पाहणाऱ्या मंडळींचा रोष ओढवून घेतला नसेल का ? पण फादरांनी ही गोष्ट मला आजतागायत कळू दिली नाही, हे त्यांचं मोठेपण आहे.

एखाद्याचे कलागुण ओळखून त्याला प्रोत्साहन देणं, योग्य संधी देऊन मार्ग दाखवणं हे काम कित्येक वर्ष अगदी निरपेक्ष भावनेने करीत आले आहेत. माझे जवळजवळ सतरा-अठरा वर्ष आगाशीत वास्तव्य होतं तो काळ फादरांनी आयोजित केलेल्या साहित्य मेळाव्यामुळे किती समृद्ध आणि सुखावह झाला हे शब्दात सांगणं कठीण आहे. फादरांमुळे उत्तमोत्तम कार्यक्रमांची मेजवानी रसिकांना मिळत होती. कवी मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर, सुप्रसिद्ध अभिनेते श्रीराम लागू, श्रीकांत मोघे, थोर विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते यांचे कार्यक्रम घठवून आणून फादरांनी रसिकांना साहित्य मेजवानीच दिली नाही तर त्यांची साहित्याभिरूचीही घडवली. या साऱ्यातून फादरांचे अजातशत्रूत्व माझ्या मनावर कायमचंच ठसलं.

फादरांच्या ऋृजू आणि नितळ व्यक्तिमत्वाने, शांत संयत बोलण्याने मी नेहमीच प्रभावित होते, जणूकाही स्नेहाळ चांदणंच पसरलंय असा भास मला होतो. त्यांच्या व्यक्तिमत्वाला उठाव देतो तो त्यांचा पेहराव. धर्मगुरूंचा पायघोळ झगा न घालता आपल्या व्यक्तिमत्वाला आणि हवामानाला साजेसा असा खादीचा झब्बा त्यांनी स्वीकारला, यात त्यांची बंडखोरी होती का? असाही प्रश्न मला नेहमीच पडतो.

त्यांच्या या पेहेरावातही त्यांची रसिकता जाणवते, छान फिकट पण आकर्षक रंगांचे झब्बे किंवा तलम मंद, पण तजेलदार, सुखावह रंगाचे हाफ शर्ट यामूळे त्यांचे व्यक्तिमत्व अधिक खुलून दिसतं, त्यांच्या पेहरावातून त्यांच्या व्यक्तिमत्वातील तरलता आणि मृदूता, आश्वासकता समोरच्याला सुखावून जाते. सतत प्रसन्न असणारा हसरा चेहरा समोरच्या व्यक्तीला ताणविरहित करतो. त्यामुळे त्यांच्याशी बोलताना, आपण आपल्याच नकळत अगदी मोकळे होऊन जातो हा अनुभव माझ्याप्रमाणे अनेकांना आलाच असेल. त्यासाठी त्यांना सातत्याने भेटायची गरजही नसते. कितीही काळाने तुम्ही त्यांना भेटायला गेलात तरी ते तुम्हाला विसरलेले नसतात, त्याच आस्थेने तुमचं स्वागत करतात, ही मला भावलेली आणखी एक़ गोष्ट.

एकदा एका रविवारी आमच्या योगवर्गात योगाध्यक्षांनी आम्हा योगशिक्षकांपुढे एक़ प्रस्ताव ठेवला. हा प्रस्ताव फादर दिब्रिटोंकडून आला होता. आमच्या योगवर्गाचा कार्यक्रम पाहिल्यानंतरच ही चक्रे त्यांच्या डोक्यात फिरू लागली होती बहुतेक. आमच्या योगसंस्थेतील निवडक शिक्षकांनी दर रविवारी संध्याकाळी जीवनदर्शन केंद्रात जाऊन सगळया धर्मगुरूंना आणि पंचक्रोशीत राहणाऱ्या ख्रिस्ती बंधूभगिनींना योगसाधनेचे प्राथमिक धडे द्यावेत. एक नवी आणि छान संधी चालून आली म्हणून आम्हीही खूश होतो. पण आम्ही काहीसे साशंकही होतो. कारण किती ख्रिस्ती बांधव योगसाधनेसाठी येतील, सगळेजण गायत्री मंत्र् म्हणतील का ? ओंकारनादावर आक्षेप तर घेणार नाहीत ना, असं राहूनराहून मनात येत होतं, कारण त्रैमासिक योगवर्गाला येणारे अनेक मुस्लीम आणि ख्रिस्ती साधक पूर्वग्रहामुळे गायत्री ओंकारनाद करीत नसत असा आमचा अनुभव होता.

फादरांच्या प्रस्तावाचं स्वागत करून आम्ही जीवनदर्शन कॅेंद्रात जायला सुरूवात केली. यावेळी सुद्धा रामदास उक्तीप्रमाणे "आधी केले मग सांगितले" या न्यायाने जीवनदर्शन केंद्राच्या त्या प्रशस्त हॉलमध्ये सगळ्यात आधी फादर दिब्रिटोच येऊन बसलेले असायचे, आपल्या सर्वांसोबत फादरदेखील योग करत आहेत ही जाणीवच सगळ्यांसाठी प्रेरणादायी होती. चर्चमध्ये योगवर्ग प्रथमच सुरू केले होते ते बहुदा फादरांनीच. परिवर्तनशीलता हा त्यांच्या व्यक्तिमत्वातील वेगळेपणाच होता, नव्हे त्यांनी केलेल्या बदलाची, परिवर्तनाची ती सुरूवातच होती. योगसाधनेतही अध्यात्म आहे, याची अनुभुती त्यांना आली होतीच पण ती इतरांनाही यावी यासाठी ते प्रयत्नशील होते. कौटुंबिक ताणतणाव, आरोग्याचे प्रश्न, वाढती व्यसनाधीनता, बदलती जीवनशैली, बदलती खाद्य संस्कृती, वाढता चंगळवाद या साऱ्याचा विपरीत परिणाम समाजजीवनावर होताना दिसत होता.

योगसाधना यावर उत्तर आहे, योग नक्कीच यातून प्रकाश दाखविल, मार्ग दाखविल हा विश्वास फादरांना वाटत होता, म्हणून त्यांनी जीवन दर्शन केंद्रात योगवर्ग सुरू करायचा धाडसी निर्णय घेतला. नुसता निर्णय घेतला नाही तर स्वत:ही तो अमलात आणला. इथे मला त्यांच्यात परंपरा आणि नवता यांची सांगड घालू पाहणारी वृत्ती जाणवली. (यासाठी त्यांनी अनेकांचा, पदाधिकाऱ्यांचा रोष ओढवून घेतल्याची शक्यता नाकारता येत नाही) जे योग्य आहे, जे आपल्याला पटतं ते बेधडकपणे अमलात आणायचे, येणाऱ्या परिस्थितीला ठामपणे सामोरं जायचं ही निर्भीडवृत्ती नक्कीच प्रेरणादायी होती. तेरा आठवड्यानंतर योगवर्ग संपला तेव्हा अनेक ख्रिस्ती स्त्रीपुरूषांनी योगसाधनेमुळे त्यांच्यात झालेला सकारात्मक बदल, व्याधीमुक्ततेचे सांगितलेले अनुभव खरोखरच ऐकण्यासारखे होते. ते ऐकत असताना मला फादरांच्या चेहऱ्यावर अतीव समाधान पसरलेलं जाणवत होतं. जणुकाही ते मनातल्या मनात म्हणत असावेत, "याचसाठी केला होता अट्टाहास". पण त्या आनंदांने ते हुरळून गेले नव्हते, ते निर्विकारच होते. इथे पुन्हा त्यांची स्थितप्रज्ञता दिसून येत होती.

मध्यंतरीच्या काळात आगाशीहून माझे स्थलांतर मुंबईला झाले. बऱ्याच वर्षांनंतर म्हणजे ९.९.२००९ रोजी मी शब्दांकन केलेलं कविवर्य नारायण सुर्वे यांच्या पत्नी कृष्णाबाई सुर्वे यांचे 'मास्तरांची सावली' हे पुस्तक प्रकाशित झालं. अल्पावधीतच ते रसिकप्रिय, वाचकप्रिय झालं, अनेक वृत्तपत्रांनीही या पुस्तकाची दखल घेतली होती. अशावेळी फादरांनी माझा नवा नंबर मिळवून मला फोन केला, “नेहा, पोरी खूप खूप अभिमान वाटतो तुझा. किती सुंदर शब्दांकन केलं आहेस तू ! अशीच छानछान लिहित राहा". एवढ्या कार्यव्यस्तेतही माझ्यासारख्या सामान्य मुलीची आठवण ठेवून त्यांनी फोन केला, आपण फोन केला नाही, या जाणिवेने मी खजील झाले होते. पुढे १५ ऑगस्ट २०११ या दिवशी वसई येथे डिंपल पब्लिकेशनच्या २६ पुस्तकांचं प्रकाशन झालं, त्यात माझ्या 'मास्तरांची सावली' या पुस्तकाच्या चौथ्या आवृत्तीचं प्रकाशन फादरांच्या हस्ते झालं होतं हा माझ्यासाठी गौरवाचा क्षण होता. ज्यांच्या प्रोत्साहनाने माझ्या लेखनाचा आरंभ सुवार्तामधून झाला होता, त्यांच्याच हस्ते माझ्या पुस्तकाचं प्रकाशन झालं होतं ही माझ्यादृष्टीने खूपच मोलाची गोष्ट होती. जणू एक़ वर्तुळ पूर्ण झालं होतं. मध्यंतरी फादर शिर्लयवाडी चर्चमध्ये कार्यरत होते तेव्हा दोनतीन वेळा मी त्यांना भेटायला गेले होते, त्यांना भेटलं की खूप सकारात्मक उर्जा मिळायची. मी कुपारी बोलीभाषेतील साहित्यावर संशोधनकार्याला सुरूवात केली होती, फादरांची बोलीभाषाही कुपारीच असणं ही माझ्यादृष्टीनं केवळ योगायोगाची बाब नव्हती तर तो एक आशीर्वाद होता.

माझ्या संशोधन विषयाबाबत त्यांना आश्चर्यही वाटलं होतं आणि आनंदही झाला होता. याबाबत त्यांनी मला योग्य ते मार्गदर्शन केलंच शिवाय ज्यांच्याकडून मला योग्य ते सहकार्य मिळेल अशांची नावं, फोन नंबरही दिले. या नव्या भाषेचा अभ्यास मला झेपेल ना? हा ताण ओळखून अत्यंत आश्वासक सुरात म्हणाले, “नेहा, काही काळजी करू नकोस. आनंदाने अभ्यासाला लाग. मी तुझ्यासाठी प्रार्थना करतो". त्या एका वाक्याने माझ्यातील आत्मविश्वास अन् उत्साह दुणावला होता.

काही दिवसानंतर फादरांचा पुन्हा फोन आला. त्यांची फोनवरची नेहा, अशी प्रेमळ हाक ऐकली की खूप बरं वाटतं. (खरंतर ते सगळयांशीच असे बोलतात पण समोरच्याला वाटतं की आपणच फादरांच्या जास्त जवळचे आहोत) फादर मला म्हणाले एक छोटंसं पण महत्वाचं काम आहे, थोडं confidential आहे. मला उत्सुकता लागून राहिली होती कसलं बरं काम असेल ? दोनचार दिवसांनंतर मी माझ्या भाचेसुनेला सोबत घेऊन गेले होते, ती त्यांच्या साहित्याची चाहती होती, फादरांना भेटायची तिची तीव्र् इच्छा होती. फादरांना भेटल्यावर आपल्या आवडत्या लेखकाला भेटल्याचा आनंद तिला झाला होता, पण ती काहीशा मानसिक ताणातून जात होती. फादरांनी तिच्या डोक्यावर हात ठेवून प्रार्थना केली. म्हणतात ना, “सो दवा का काम एक दुवा करती है" त्याप्रमाणे फादरांशी बोलून तिला खूप हलकं हलकं वाटत होतं. असं काय आहे फादरांच्या व्यक्तिमत्वात की समोरच्याला असं तणावरहित वाटतं, हे मात्र् मला अजुनही न उलगडलेलं कोडंच आहे.

गप्पांच्या ओघात फादरांनी माझ्या हातात एक बाड दिलं, आणि मला म्हणाले की हे घरी घेऊन जा आणि शांतपणे वाच. काही बदल करावासा वाटला, काही सुचना कराव्याशा वाटल्या तर अगदी नि:संकोचपणे सांग. मला खूपच आश्चर्य वाटलं होतं. फादरांनी त्यांच्या लेखनाचा खर्डा मला वाचायला दिला होता. (तसा तो अनेक सुज्ञ आणि जाणकार मंडळींना दिला होता) न राहवून मी फादरांना म्हटलं, “फादर तुमच्या लेखनात मी काय दुरुस्ती करणार ? मी तर लेखनाच्या प्रांतात तशी नवखीच आहे.” यावर फादर म्हणाले, “मला तुझ्याविषयी खात्री आहे. तू कामात प्रामाणिक आहेस, म्हणून मी हे काम तुला देतोय.” इतकी साहित्यसंपदा निर्माण करूनही ते किती सचिंत होते आपल्या नव्या पुस्तकाबाबत ! किंबहुना ते अधिक नेटकं आणि सुरचित व्हावं, सहेतुक, समर्पक आणि निर्दोष असावं यासाठी ते किती आग्रही होते ते दिसून येत होतं. ही विनम्रता आजच्या काळात अल्प लेखन करून प्रसिद्धीची हवा डोक्यात शिरणाऱ्यांनी शिकण्यासारखी आहे.

घरी आल्यानंतर मी अगदी अधाश्यासारखं फादरांचं ते लिखाण वाचून काढलं, नेहमीच्याच ओघवत्या शैलीत, रसाळ भाषेत लिहिलेलं लिखाण एका बैठकीतच वाचून संपवलं. माझ्या कुवतीनुसार मी मला जाणवलेल्या शंका, लेखनात अनवधानाने सुटलेले काही दुवे, काही घटनांचा आवश्यक असणारा संदर्भ, अशा काही जुजबी सुचना लिहून ठेवल्या आणि दोन दिवसानंतर ते बाड द्यायला पुन्हा शिर्लयवाडी चर्चमध्ये गेले. नेहमीप्रमाणेच त्यांनी हसतमुखाने स्वागत केलं. मी सुचवलेले बदल शांतपणे ऐकून घेतले, खरं पाहता फादरांच्या लेखनात बदल सुचवण्याची माझी योग्यता तरी होती का? पण फादरांच्या मनाचा मोठेपणा किती कि त्यांनी मी केलेल्या सुचनांचं स्वागत तर केलंच शिवाय माझ्या पृष्ठ क्रमांकासहित नोंदवलेल्या शंकांचं आणि हस्ताक्षराचं (?) कौतुक केलं. (पुन्हा एकदा त्यांच्या विनयशीलतेने खजील होण्याची माझी पाळी) समोरच्या माणसातील गुणांची कदर करणं आणि त्याला सतत प्रोत्साहित करणं हा फादरांनी स्विकारलेला वसाच आहे, यामूळे नकळत त्यांनी किती लेखक घडवले आहेत, संस्कारित केले आहेत याची त्यांना कल्पनाही नसेल.

नुकतंच फादरांचं "नाही मी एकला" हे आत्मकथन प्रकाशित झालं, पुस्तक खपाचे आणि विक्रीचे उच्चांक या आत्मकथनाने मोडले यावरूनच त्यांच्या लेखनाची आणि अजातशत्रुत्वाची खात्री पटते. अल्पावधीतच हे पुस्तक लोकप्रिय ठरले. फादरांच्या रसिकतेचा, संवेदनशीलतेचा, विनम्रतेचा आणि सत्य अहिंसात्मक मूल्याग्रही वृत्तीचा ठायीठायी प्रत्यय येतो. आध्यात्म, समाजकारण, साहित्य आणि मानवता यांचा समसमा समन्वय, संयोग म्हणजेच फादर फ्रान्सिस दिब्रिटो, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही. मध्यंतरी माझं 'जिवलग' हे व्यक्तिचित्रणात्मक लेखांचं पुस्तक प्रकाशित झालं. या पुस्तकाची प्रस्तावना फादरांनी लिहावी अशी मनोमन माझी इच्छा होती, पण फादरांच्या कार्यव्यग्रतेत ते प्रस्तावना लिहतील का, ही शंकाही मनात होतीच. तरीही धीर करून गेले, त्यांना विनंती करण्याचीही गरज पडली नाही. कामात इतके व्यग्र् असतानाही त्यांनी कसलेही आढेवेढे घेतले नाही. उलट मला पुन्हा फेरी घालावी लागू नये म्हणून लिहिलेला टंकलिखित मजकूर मला ईमेल करून पाठवला. काही दिवसांनी माझं दिलेलं लेखांचं बाड आणायला गेले (खरंतर प्रतिक्रिया ऐकायला) तेव्हा त्यांना विचारलं, “फादर कसं झालंय पुस्तक ? जमलेयत का लेख ?” त्यावर फादर म्हणाले, “किती सहज ओघवत्या शैलीत लिहितेस तू ? तू मला भेटायला अगदी पहिल्यांदा आली होतीस ती अजूनही आठवतेय मला. किती विकसित केलं आहेस स्वत:ला ! फारफार आनंद होतोय मला. तुला माणसांविषयी किती आत्मीयता आहे हे तुझ्या लेखनातून जाणवतं. किती मनापासून लिहितेस तू !”

फादरांचं बोलणं ऐकून माझे डोळे टचकन भरले. माझ्या लेखनावर नकळत तुम्हीच तर संस्कार केलेत, हे वाक्यही मला बोलता आलं नाही. माझ्या डोक्यावर हात ठेवून त्यांनी मला आशीर्वाद दिला आणि त्यांच्या नेहमीच्या शैलीत डोळे मिचकावून म्हणाले, “माझ्यावर पण लिहिशील ना असंच कधीतरी हा ऽऽ" मी हसतहसत होकार दिला तेव्हा ते म्हणाले, “गंमत केली हा तुझी !’’

आज मी गंमत म्हणून हा लेख नाही लिहिला. फादरांनी आज साहित्यविश्वातला केवढा मोठा पल्ला गाठलाय ! अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी बिनविरोध, निर्विवाद निवड झाली आहे. यातच त्यांचे वेगळेपण आणि असामान्यत्व सिद्ध होते. फादर अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवडून येणं ही आम्हा सर्वांच्याच दृष्टीने आनंदाची आणि अभिमानाची बाब आहे. ख्रिस्ती धर्मगुरू अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा अध्यक्ष होणं ही देखील इतिहासातील पहिलीच घटना असावी. यानिमित्ताने मनात घोळत असलेल्या आठवणींचा कोलाज तयार झाला. एखाद्या चित्रपटात जशी दृश्यांची मालिका सटासट सरकत जाते तसंच काहीसं झालं माझ्या मनात. अगदी या कोरोना काळातही 'लीलाई’ या दिवाळी अंकासाठी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष या नात्याने मुलाखत घ्यायची होती. अचानक संपादकांचा मला फोन आला, मुलाखत घेण्यासाठी तीन चार जणांची नावं फादरांनी सुचवली होती त्यात माझं नाव असणं हा माझा बहुमानच होता. मला काहीसं दडपण आलं होतं. कारण सध्याच्या परिस्थितीत मुलाखतीसाठी फादरांची प्रत्यक्ष भेट घेणंही शक्य नव्हतं. पण त्यातूनही फादरांनीच छान वाट काढली. शिवाय फोनवरून गप्पा मारूनही मला मुलाखत घेता आली.

यामध्ये फ्रान्सिस डिमेलो सरांनी खूपच मोलाचं सहकार्य केलं अर्थात आपल्यामूळे दुस-याला कोणताही त्रास होऊ नये याची या वयातही फादर किती काळजी घेतात हे पाहून अचंबित व्हायला होतं. या मुलाखतीच्या निमित्ताने पुन्हा एकदा आठवणींचे मोंटाजेस पुन्हापुन्हा डोळयासमोरून सरकत होते आणि जाणवत होतं की आजवर फादरांशी मोजक्याच भेटी झाल्या पण प्रत्येक भेटीत त्यांच्या स्नेहाळ सावलीत किती निर्धास्तपणे आपण वावरलो आहोत. प्रत्येक भेटीनंतर माझ्या मनात त्यांच्या व्यक्तिमत्वाचं तेजस्वी स्निग्ध चांदणं नेहमीच आनंदाची पखरण करीत असतं. त्यांना भेटल्यानंतर मनात तुकोबांच्या ओळी घोळत असतात -

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती

चालविसी हाती धरोनिया ---

# कंदिलाच्या प्रकाशात

■ जॉन गोन्सालवीस, उमराळा, वसई.

काही वर्षांपूर्वी मुंबईच्या चकचकीत, गुळगुळीत, काळ्याकभिन्न डांबरी रस्त्यावर एक वयोवृद्ध मनुष्य हातात जळता कंदील घेऊन काहीतरी शोधत होता. त्यावेळी एका वाटसरूने त्यांना विचारले, "अरे बाबा, तू काय शोधतो आहेस?" तेव्हा तो वयस्क गृहस्थ म्हणाला, "कंदिलाच्या प्रकाशात मी ज्ञान शोधतो आाहे. कुठे मिळते का ते बघतो!" त्यावर तो वाटसरू म्हणाला, "अरे बाबा, ही मुंबई नगरी आहे. ही अर्थनगरी आहे. येथे तुला सत्ता, संपत्ती, धनदौलत मिळेल. ज्ञान काही मिळणार नाही. तुला जर ज्ञान हवे असेल तर पुणे येथील विद्यानगरीत जा. तेथे तुला मुबलक ज्ञान मिळेल."

त्या अनाम वाटसरूचा सल्ला प्रमाण मानून तो वयोवृद्ध गृहस्थ पुणे नगरीत पोहोचला. तेथेही तो रस्त्यात काहीतरी शोधू लागला. तेव्हा तेथील एका वाटसरूने त्याला विचारले. "अरे बाबा, तू काय शोधत आहेस?" त्यावर तो वयोवृद्ध सद्‌गृहस्थ म्हणाला, "पुण्यात मी ज्ञान मिळविण्यासाठी आलो होतो. ज्ञान मिळणे बाजूलाच राहिले. माझा कंदील हरवला आहे. तो हरवलेला कंदील मी शोधत आहे."

आज घराघरात कंदील हरवला गेला आहे. झगमग-झगमग, झिकझॅक-झिकझॅक विद्युत दिव्यांच्या रोषणाईत कंदिलाची नामोनिशाणी राहिली नाही. पन्नास-साठ वर्षांपूर्वी ना रस्ते, ना वीज, ना विजेचा खांब. ना प्रकाशाची उधळण करणारे झगमगते विद्युत दिवे. खेड्यापाड्यात घासलेटच्या दिव्यावर रात्र उजळली जायची. पणती, दिवा, चिमणी, कंदील ही सर्व प्रकाशाची भावंडे. आपापल्या परीने अंधाराला चिरत घरात उजेडाचा वसा जपत होती. तिमिराला दूर सारत होती. रात्रीचा अंधार नाहीसा करणे हे एकच व्रत. कंदील म्हणजे या सर्वांचे मोठे भावंड. रॉकेलच्या ऊर्जेवर कंदिलाची गुजराण व्हायची.

गावामधील नाक्यावरील दुकानातून काचेच्या बाटलीत रॉकेल आणले जायचे. ती काचेची बाटली हाताने पकडता यावी म्हणून तिच्या तोंडाजवळ काळपट, मळकट दोरी अडकवलेली असायची. संध्याकाळ होण्याअगोदर साग्रसंगीत कंदिलाची तयारी केली जायची. घरातील वयोवृद्ध 'वाडगो' कंदिलात तेलवात करत असत. रात्रभर जळत असल्यामुळे कंदिलाच्या वातीवर काजळी जमा व्हायची. रात्रभर धूर ओकल्यामुळे काच धूरकट, काळपट व्हायची. चुलीमधील राखाडीच्या साह्याने कंदिलाची काच घासून-पुसून चकचकीत पूर्ववत करायची. पुन्हा रात्रभर प्रकाश देण्यासाठी! त्या काळी प्रभाकरचा कंदील व ओगलेची काच हे एक समीकरण बनले होते.

दिवेलावणीच्या वेळी घराच्या आत दिवे उजळले जायचे. ओटीवर मात्र प्रकाश देण्याचे काम कंदिलाचे. वादळ-वाऱ्याच्या झंझावातात दिवे विझले जायचे. मात्र कंदील एकटा तग धरून असायचा. मुसळधार पाऊस असो, घोंघावणारा वारा असो. रातकिड्यांची किर्रकिर्र कानाला ऐकू यायची. ढगांचा गडगडाट व्हायचा. रात्रीच्या गुढतेत अधिक भर पडायची. मरतुकड्या कुत्र्याच्या भुंकण्याने चिमणा जीव भीतीने बेजार व्हायचा अशावेळी मिणमिणत्या कंदिलाची साथ हाच एक आधार वाटायचा. थंडीच्या दिवसात हुडहुडणाऱ्या थंडीत तापलेल्या काचेला स्पर्श करीत अंगाला थोडी उष्णतेची धग ऊबदारपणा निर्माण करायची. तर कधी परीक्षा जवळ आल्यावर घरातील बाळगोपाळ मधोमध कंदील ठेवून त्याच्या चारी बाजूला गोणपाट अंथरून त्यावर बसून कंदिलाच्या प्रकाशात अभ्यासाचा अध्याय गिरवत असत. अभ्यास करता करता झोप लागली तरीही कसली भीती नसायची. कारण जळणाऱ्या वातीभोवती कंदिलाच्या काचेची सुरक्षित अशी भिंत असायची.

जेवणखाण झाल्यावर रात्रीच्या वेळी गोठ्यातील गाई-गुरांना पाणी देण्यासाठी, गव्हाणीमधील वैरण, पेंढा बघण्यासाठी एका हातात काठी व दुसऱ्या हातात गंजलेला, काजळलेला, जळणारा कंदील घेऊन घरमालक आपल्या जनावराची ख्यालीखुशाली बघत कधी कधी अपुऱ्या घासलेट तेलामुळे तो कंदिल मधून-मधून भगभगत असे... आचके देत असे. त्यावेळी बॅटरीचा जमाना नव्हता. कंदील हीच बॅटरी व्हायची. कधीकधी हाच जळणारा कंदील ओली बाळंतीण व तिचे तान्हुलं, गोजिरवाणं बाळ यांची रात्रभर देवदूतासारखा राखण करायचा. तर कधी रात्रभर पाझळणारा कंदील म्हातारा-म्हातारीच्या

खोकल्याच्या उबळेला साथ द्यायचा. म्हातारा-म्हातारीची अवस्था पाहून कंदिलाची वात कंपायमान व्हायची. तर कधी घरातील आजारी व्यक्तीच्या सान्निध्यात रात्रभर डोळ्यांत तेल घालून जपायचा. कधीकधी एका गावातून दुसऱ्या गावात जाणाऱ्या पै-पाहुण्याचा वाटाड्या म्हणून भूमिका निभावायचा.

कंदील केवळ रात्रीच भेटतो असं नाही; तर दिवसाढवळ्या तोच कंदील आपल्याला तत्त्वज्ञानाने सत्य स्वरूप प्रकट करतो. जीवनाचे एक महान सत्य विशद करतो. मानवाच्या अंतर्मनाची ज्योत प्रज्वलित करतो. ग्रीक साधू डायेजिनिस एकदा दिवसाढवळ्या सूर्याच्या प्रकाशात हातात कंदील घेऊन फिरायला निघाले. एकाने उत्सुकतेपोटी त्याला विचारले, ''साधू महाराज, हे काय नवीनच खूळ काढलेय?'' साधू महाराज अत्यंत शांतपणे म्हणाले, ''मी सज्जनांच्या शोधात आहे. अथेन्सच्या लोकांना सूर्यप्रकाशात कुठेच सज्जन माणूस दिसत नाही. सगळे जण एकमेकांची निंदानालस्तीच करत आहेत. उणीदुणीच काढत आहेत. म्हणून मला वाटतं की या कंदिलाच्या उजेडात तरी सज्जन माणूस दिसतो का ते बघावे.''

कंदील केवळ स्वत:लाच मार्ग दाखवतो असे नाही तर दुसऱ्यांनाही वाट दाखवतो. डोळे असून दृष्टीने अधू असलेल्या व्यक्तींना अंतर्यामीचे चक्षू उघडण्यासाठी प्रेरणा देतो. असाच एक अंध मनुष्य आपल्या हातात कंदील घेऊन रस्त्याने जाऊ लागला. आंधळ्या माणसाला कंदिलाचा काय उपयोग? दिवस असो वा रात्र असो, त्याच्या जीवनात त्रिकालबाधित अंधकार आहे. त्यांनी कशाला आपल्याबरोबर कंदील घेऊन फिरायचे? या लोकांच्या प्रश्नाला तो अंध व्यक्ती उत्तर देतो, ''कंदील काही मी स्वत:साठी घेऊन फिरत नाही. लोकांनी अंधारात माझ्यावर येऊन आदळू नये यासाठी मी हातात कंदील घेऊन फिरतो आहे.''

प्रज्वलित कंदील माणसाच्या मनात चैतन्य निर्माण करू शकतो. नैराश्याला मूठमाती देऊन जगण्याची आशा पल्लवित करू शकतो. हे आपणास मदर तेरेसाच्या जीवनातील एका चालत्या-बोलत्या कृतिशील उदाहरणावरून दिसून येते. मदर तेरेसा यांना निरनिराळ्या घरी भेटी द्यायला विशेषत: गरिबांच्या घरी भेटी द्यायला मनस्वी आनंद व्हायचा. गरिबांच्या घरात जाऊन साफसफाई करून देण्यात त्या स्वत:ला धन्यता मानायच्या. अशाच एका गरिबाच्या घरात त्यांनी प्रवेश केला. काळोखी रात्र होती. मदरनी

त्या घरात कंदील पाहिला. मात्र कंदिलाला बरीच काजळी लागली होती. मागचापुढचा विचार न करता स्वत: मदरांनी तो कंदील साफ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी खाटेत बसलेला तो गरीब माणूस मदरांना म्हणाला, ''याची आवश्यकता नाही. कारण मी बऱ्याच काळापासून कंदिलाचा वापर बंद केला आहे. अंधारात माझ्याकडे कुणीही चिटपाखरूसुद्धा येत नाही. त्यामुळे प्रकाशाची मला गरज नाही.'' मात्र मदर तेरेसांनी आपल्या सेवाभावी वृत्तीने कंदील स्वच्छ करून प्रज्वलित केला.

यानंतर मदर न चुकता दररोज संध्याकाळी या गृहस्थाच्या घरी येऊ लागल्या. काही काळानंतर सिस्टरांचं जाणं बंद झालं. मात्र आता त्याला प्रकाशाची सवय जडली. तो दररोज स्वत: कंदील लावू लागला. त्यानंतर त्या सद्‌गृहस्थाने मदर तेरेसांना एक पत्र लिहिले व त्यात म्हटलं, ''मला प्रकाशाची सवय नव्हती. अंधाराला छेद देणारा प्रकाश माझ्या जीवनात आता आगळा आनंद घेऊन आला आहे.'' कंदिलाच्या प्रकाशाने त्या माणसाच्या जीवनातील नैराश्याचा काळोख सातासमुद्रापार नेला हेही नसे थोडके.

कंदिलाच्या प्रकाशात प्रज्ञावंतांची लेखणीही झरझर झरत गेली आहे. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे लेखक, साहित्य अकादमी पुरस्कार विजेते साहित्यिक रस्किन बॉन्ड ऐन उमेदीच्या काळात देहराडूनला कंदिलाच्या प्रकाशात आपले लेखन करीत असत. 'देहरा आय नो' या पुस्तकात रस्किन लिहितात, 'विजेचं बिल भरायला पैसेच नसण्याच्या त्या काळात कंदिलाच्या मिणमिणत्या प्रकाशात लिहिलेल्या माझ्या लिखाणाला उलट एक सॉफ्ट आणि रोमँटिक ग्लो आला.' अशी स्पष्ट, प्रांजळ कबुली दिली आहे.

कंदिलाचा प्रकाश हा मंद मंद प्रकाश... शांत शीतल प्रकाश... मिणमिणता प्रकाश... आता मात्र शोकेसपुरता अद्ययावत असे कंदील जागोजागी लटकवलेले दिसतात. अर्थात त्यामधील प्रकाश मात्र हरवलेला आहे. प्रदर्शनामधील कंदील केवळ दर्शनासाठी प्रकाशासाठी नव्हे!

❖❖❖

---

आयुष्य जगण्यासाठी असतं<br>
हे आपल्या गावी उतरलेलं नसतं<br>
म्हणून काळोखात अंधाराचा शोध<br>
घेण्याचं आपण थांबवलेलं नसतं

उच्च शिक्षणाने सुशिक्षित<br>
असणं मोजतात<br>
पण सुसंस्कृत असणं<br>
कसं बरं ठरवतात ?

# स. ना. सूर्यवंशी ख्रिस्ताप्रमाणे संघर्षवादी.

▪ - फा. मायकल जी, वसई

*आज देशात लोकशाही लयास जात असताना फादर स्टॅन स्वामीप्रमाणे न्यायासाठी, सत्यासाठी झगडण्याची वेळ आली आहे. अशा वेळेला सूर्यवंशी यांचा आदर्श आपल्या युवकांसमोर आवश्यक वाटतो.*

सूर्यवंशी हे भारतीय ख्रिस्ती समाजातील विशेषतः मराठी भाषिक साहित्यिकांमधील एक बडे प्रस्थ आहे. १९१६मध्ये अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात त्यांचा जन्म झाला. त्यांचे वडील अमेरिकन मराठी मिशनच्या शाळेत शिक्षक होते. त्यांचे कुटुंब महार जातीतले असल्यामुळे अत्यंत हीन अशी वागणूक त्यांना लहानपणापासून मिळाली. १९६२-६५च्या दरम्यान जेव्हा मी गोरेगाव सेमिनरीमध्ये धर्मगुरू गुरुदीक्षेचा अभ्यासक्रम करत होतो, तेव्हा मी सूर्यवंशीविषयी खूप ऐकून होतो. त्यावेळी ते "आपण" नावाचे एक साप्ताहिक संपादित करत होते. साप्ताहिकाचे वैशिष्ट्य असे होते की त्याला आर्थिक पाठबळ कॅथलिक समाजाचे होते; सूर्यवंशी स्वतः प्रोटेस्टंट पार्श्वभूमीचे होते; पण ते अस्सल साहित्यिक या नात्याने सर्वधर्मीय, मराठी सारस्वतामध्ये अत्यंत मोठे स्थान मिळवलेले होते. मुंबईला कामगार नाट्यभूमीमध्ये यांची नाटके गाजली होती! त्यामुळे म्हटले तर ते धार्मिक वृत्तीचे पण वास्तविक ते होते व्यापक वृत्तीचे.

अगदी ताज्यातवान्या घडामोडींवर आपले स्वतःचे मौलिक विचार लेखन व कीर्तन यांद्वारे समर्थपणे मांडणारे असे कलावंत सूर्यवंशी होते. म्हणूनच उत्सुकतेपोटी मी त्यांचे "अगा जे कल्पिले नाही" हे आत्मवृत्त अभ्यासण्यासाठी घेतले. ग्रंथराजाने मला वेड लावले आणि मी आत्मवृत्त वाचता वाचता त्यांच्या अंतरंगात शिरलो आणि मी बरेच काही स्वतःसाठी शिकलो.

स. ना. सूर्यवंशी यांचे जीवन हे अनेक पैलूंनी संपन्न असे आहे. मला ते जाणवले ते एक सुसंस्कृत व्यक्ती व संसारी माणूस. तसेच कलाकार या नात्याने एक लेखक, कीर्तनकार, पत्रकार व ‘आपण’ साप्ताहिकाचे यशस्वी संपादक म्हणून. अर्थात ते एक बहुआयामी व्यक्तिमत्व होते; म्हणजे अगदी समाजबहिष्कृती अनुभवलेले, कामगार रंगभूमीत रमलेले, आई-वडिलांच्या सगळ्या गरजा भागवणारे कुटुंबवत्सल, तुरुंगाची हवा खाल्लेले, नाशिकात कॅथलिक समाजाबरोबर एकरूप झालेले ecumenist, ज्योकिम बारांकोसारख्या तडफदार मिशनरीबरोबर टिकलेले! आत्मवृत्त वाचताना हजरजबाबी आचार्य अत्रे यांचे "असा मी झालो" या ग्रंथाची आठवण होते. म्हणून ख्रिस्ती समाजाने त्यांना 'आचार्य' ही उपाधी दिली हे रास्तच आहे. अशा बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा आदर्श आजच्या युवकांच्या समोर ठेवावा, अशा हेतूने मी हा लेख तयार केला आहे. तरी विशेषतः युवकांना आकर्षित करणारा त्यांचा प्रमुख गुण मला दिसला तो म्हणजे संघर्षवाद. आज देशात लोकशाही लयास जात असताना न्यायासाठी, सत्यासाठी झगडण्याची वेळ आली आहे. अशा वेळेला सूर्यवंशी यांचा आदर्श आपल्या युवकांसमोर आवश्यक वाटतो.

ख्रिस्ताच्या पावलावर पाऊल.

सुवार्ता घोषणेच्या मोहिमेवर निघालेल्या प्रेषितांना एकदा येशू ख्रिस्त म्हणाला, "जा, सोबत पैसे घेऊ नका. कसलीच चिंता करू नका. लोक जे देतील ते स्वीकारत, खात जा. तुम्हाला कसलीही कमतरता पडणार नाही. मी तुमच्यासोबत जगाच्या अंतापर्यंत असेन." (मतय १०.९) मनमाडच्या कॅथलिक मिशन भागातील गरीब वस्तीत मिशनरी म्हणून काम करत असताना सूर्यवंशी यांनी ख्रिस्ताचे हे साध्या राहणीचे शब्द तंतोतंत पाळले. त्यांनी कधी वेतनाची पर्वा केली नाही. मिशनच्या कंपाउंडमध्ये अनेक जीप्स उभ्या असूनसुद्धा त्यांनी बैलगाडीत प्रवास केला. खेडुतांना देवाचा शब्द देण्याची तगमग त्यांच्या हृदयात होती. खेड्यातल्या जेवणाचा त्यांना त्रास होई. तिखटाने तोंड अक्षरश: भाजून निघे. डोळ्यातून टपटपा पाणी गळे. नाकाला धार लागे. हुस् हुस् करत तो खळगूट ओरपावा लागत असे! सूर्यवंशी साक्ष देत म्हणतात, "पण मला जुलाब झाले नाहीत. पोटात मुरडा आला नाही. ताप आला नाही. अंग दुखले नाही. काही नाही !" ते प्रसंगी रात्री निवाऱ्यासाठी धुळीत पडावे लागे पण म्हणे, "कुठल्याही जंतूला माझ्याठायी कसलेच आकर्षण आढळले नाही ! देवाने त्या दिवसात विलक्षण शक्ति पुरवली."

ख्रिस्ताप्रमाणे संघर्षवादी.

सारेच ख्रिस्तभक्त असले तरी ख्रिस्ताला समजून घेण्याचे प्रकार मात्र अनेक झाले आहेत. कोणी त्याला मवाळ करतात तर कोणी जहाल. कॅथलिक पंथामध्ये तर त्याला सौम्य

भक्तीचं दैवत, 'लीन आणि मिस्कीन' काळजाचा येशू बनवला आहे. त्यात चूक काही नाही परंतु येशूच्या तत्वनिष्ठ स्वभावाचा दुसरा पैलू मात्र पूर्णपणे विसरला जातो. वास्तविक ख्रिस्ताने त्याच्या वाडवडिलांचा ज्यू धर्म आमूलाग्र बदलण्यासाठी सतत संघर्ष केला. सगळ्यात महत्त्वाची शिकवण मोडून काढली ती म्हणजे 'शब्बाथ माणसासाठी आहे; माणूस शब्बाथासाठी नाही!' (मार्क ०२:२८). त्यामुळे शास्त्री, परुशी, याजक, महायाजक आणि इतर भक्तिमान लोक येशूच्या विरोधात गेले. येशूची धर्मसुधारणेची दृष्टी समोर ठेवून आजदेखील अनेक धर्मसुधारणा करण्यासारख्या आहेत. पण कल्पना करा, जर आज कोणी धर्मसेवक श्रद्धाचरणामध्ये ‘शुद्धीकरण’ सुचवू लागला तर लोक म्हणतील, 'हा धर्मद्रोही आहे, ख्रिस्ताचा अनुयायी नाही!' वास्तविक धर्मसुधारणा ही प्रत्येक काळाची गरज आहे. सूर्यवंशी हे ख्रिस्ताप्रमाणे सुधारणावादी व संघर्षवादी होते. ते केवळ ख्रिस्तभक्तीत बुडून गेले नाहीत किंवा एका विशिष्ट पंथाशी जखडून राहिले नाहीत. त्यांना जे चुकीचं वाटलं ते त्यांनी व्यक्त केलं आणि जे पटलं नाही, त्यावर ते तुटून पडले!

अगदी लहानपणी शाळेत असताना शिक्षकांबरोबर त्यांना पहिला धार्मिक संघर्ष करावा लागला. नाटकात काम करण्याची आयती आलेली संधी घेऊन सूर्यवंशीनी शाळेत लुगडी नेसून नाटकात स्त्रीपात्र करण्याची तयारी दाखवली. नुसती बातमी ऐकून रणनवरे मास्तरचे पित्त खवळले! त्यांनी सत्यवानला ऑफिसात बोलावून घेतले व दम दिला, "काय रे कार्ट्या! तू ख्रिस्ती ना? तुझा बाप ख्रिस्ती, तुझी आई ख्रिस्ती! आणि तू लुगडं नेसून नाटकात काम करणार? खबरदार! त्यांच्या तोंडाला काळोखी फासू नकोस! समजलं?" मास्तरांनी त्यांचा जोरात कान पिरगळला, पण परिणाम झाला नाही. ख्रिस्ती समाजाचा त्या काळी असा नाटकसिनेमावर राग का होता, ते बाळ सत्यवानाला समजलेच नाही. अर्थात तो समाजाने घेतलेला धर्माचा संकुचित अर्थबोध होता. स्त्रीपात्र केल्याने स्त्रियांचा अपमान होणार नव्हता की स्वतः सूर्यवंशींवर काही मानसिक परिणाम होणार नव्हता.

कीर्तनकार या नात्यानेदेखील त्यांना ख्रिस्ती समाजाशी संघर्ष करावा लागला. सूर्यवंशींना ख्रिस्ती जीवन, ख्रिस्ती शिकवण आणि तत्कालीन सामाजिक पद्धती ह्यात खूप विसंवाद आढळले. तेव्हा मित्रांचेही शत्रुत्व पत्करून आपल्या सद्सद्विवेकबुद्धीशी इमान राखून ते लिहीत व बोलत राहिले. विशेषतः ते म्हणतात, "आत्म्याशी इमान राखून मी माझ्या कीर्तनात बोलत राहिलो." विरोधकांशी दोन हात करताना ख्रिस्तदेखील म्हणाला, "मला जे पिता सांगतो तेच मी बोलतो" (योहान ०८:२८) सूर्यवंशींचे हितचिंतक, मित्र खुद्द मिस् मोर्लंडसुद्धा त्यांना ह्या सत्यवचनीपणापासून आवरायचा आटोकाट प्रयत्न करीत होते. मिस् मोर्लंड तर त्यांच्या घरी येऊन ढसढसा रडून प्रार्थना करीत; पण "लोकांना न आवडणारे पण

मला खरे म्हणून पटलेले मी निडरपणे बोलत आणि लिहीतही राहिलो," असा त्यांचा खाक्या होता. त्यांच्या टीकेला त्या काळी विलक्षण धार येत असे. एका बाजूला सूर्यवंशी बोलत ते चूक आहे, असे सिद्ध करता येत नव्हते तर दुसऱ्या बाजूला अशाने लोक दुरावत होते, ते दृश्य त्यांना पाहवत नव्हते आणि म्हणूनच त्यांची मित्रमंडळी विव्हळ बनून जात असे. विरोधकांवर वाकप्रहार करताना ते निर्दयी बनत होते का? नाही! ते म्हणतात, "मी क्रूर बनलो नाही! मी द्वेषापोटी लिहितो, कुणाला माणसातून उठवावे असे झाले नाही." ख्रिस्तानेदेखील त्याच्या काळातील विरोधकांना 'ढोंगी' म्हटले, 'कुजलेली प्रेते सांभाळणाऱ्या कबरां' ची उपमाही दिली; परंतु त्यात द्वेष नव्हता. त्यांनी आपली सुधारणा करावी, एवढीच प्रभू ख्रिस्ताची इच्छा होती.

सनांचा ख्रिस्तसदृश करारी स्वभाव केडगावमध्ये प्रकर्षाने दिसून आला. गांधीहत्येनंतर निराश न होता केडगावच्या मुक्ती मिशनच्या विरोधात निघालेल्या ब्राह्मणी मोर्चाला ते सामोरे गेले. मुक्ती मिशनच्या पंडिता रमाबाई यांच्या विरोधात पुणेरी ब्राह्मण प्रशांत उभा होता. त्यावेळी निघालेल्या भव्य मोर्चात केडगावकरांना त्यांनी खुले आव्हान केले, "केडगावकरांनो... आजवर पंडिता रमाबाईंच्या या संस्थेने तुमचे काय नुकसान केले? ही संस्था अराष्ट्रीय आहे, असे ही बामणं म्हणतात! मात्र यांच्या विधवा आया, बहिणी... मुली वाममार्गाला लागून पंढरपूरच्या चंद्रभागेत आपल्या पापाचे गोळे टाकून देतात! त्या अनाथ बाळांचे रक्षण आजवर 'मुक्ती'ने केले आणि त्यांना माणूस बनून जगू दिले, हे अराष्ट्रीय आहे काय ? सांगा, तुम्हांला तुमच्या देवाची, धर्माची, देशाची शपथ आहे. ज्या गांधीजींना ह्या... ह्या बामणांच्याच अवलादीनं गोळी घालून ठार केलं, त्या पूज्य गांधीजींची शपथ आहे! अराष्ट्रीय कोण? ख्रिश्चन की ब्राह्मण?' त्यासमयी सूर्यवंशी यांनी एक अलौकिक असे मनाचे सामर्थ्य दाखविले!

सूर्यवंशींबरोबर अनेक मतभेद होऊन ख्रिस्ती समाज त्यांच्यावर रुसला, तरी ते मात्र समाजावर रुसले नाहीत. कारण त्यांची धारणा होती, त्यांना समाजाची गरज होती, जशी समाजाला त्यांची गरज होती. सारा संघर्ष त्यांनी सद्सद्विवेकबुद्धीला अनुसरून व आत्मीयतेने केला होता. म्हणूनच त्याचा ताप सहन करण्यासाठी सनांना आंतरिक ऊर्जा मिळत होती. तो त्यांच्या आध्यात्मिक जीवनाचा आविष्कार होता. एके समयी ते म्हणतात, "मला कोणी कुत्रेही ख्रिस्ती समाजात हुंगायला तयार नव्हते. वर्षांमागून वर्षे जात होती. ख्रिस्ती समाजास मी विसरू शकत नव्हतो, पण ख्रिस्ती समाज मला जणू संपूर्ण विसरून गेला होता!" येशू गेथसेमनी बागेत जेव्हा बापाला प्रार्थना करताना हताश होतो, या प्रसंगाची मला इथे आठवण होते.

साहजिकच आहे की जेव्हा एखादी व्यक्ती समाजाशी दोन हात करून उभी राहते, तेव्हा समाज तिच्या कुटुंबाला सुखासुखी सोडत नाही! विशेषतः अशा पुरुषाची पत्नी हतबल होऊन जाते. एकदा सूर्यवंशी यांचा मीराबरोबर झालेला संवाद हृदयस्पर्शी आहे: 'मीरा, तुला समजत कसं नाही ? मी सरळच लेख लिहितो. जे लिहायला हवं तेच लिहितो. पण या लोकांना जरा त्यात टीका आली तर भीती वाटते ! ते मनं जपताहेत! पण त्यासाठी सत्य दडपलं गेलं तरी चालेल!’

‘तुम्हीच सत्य सांगितलं पाहिजे?’

‘मग कोण सांगणार? मी लेखक कशाला झालो?’

‘लोकांची मनं दुखवायला का? मिस् मोर्लंड कितीदा येऊन माझ्याजवळ रडून म्हणतात, तू तरी सूर्यवंशीला आवर ! तो या टीका करून स्वत:च्या पायावर धोंडा पाडून घेत आहे ! तुम्हाला हिताचं काही सांगायची तरी सोय आहे का? तुम्ही काय साऱ्यांचं वैर ओढवून घ्यायला निघाला आहात?’

‘मी ?’

‘आपण मोठे तालेवार लागून गेलो नाही, सूर्यवंशी! दुनियेशी वैर करून आपलं कसं चालेल? आपल्याला जगायचं आहे!’

‘मीरा, देव आपल्याला जगवील!’

‘देवच माणसाला जगवतो. पण माणसानेही जगलं पाहिजे. खड्ड्यांत उडी घेऊन माणूस पडू लागला तर देव नेहमीच त्याला झेलून धरू शकत नाही!’

अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याच्या स्वभावानुसार त्यांनी मुंबईत चाळीत राहत असताना गोरगरिबांना दारू पुरवणारे दारूचे अड्डे चालविणाऱ्या माफियांशीसुद्धा सामना केला. बिचाऱ्या दारुबाजांच्या पत्नींची तशी मागणी होती. पण अपेक्षेप्रमाणे एके दिवशी गुंडांनी सनांवर हल्ला केला! आणि काय आश्चर्य! चाळीतील सर्वधर्मी महिलांनी एकत्र जमून त्यांचा जीव वाचविला! सूर्यवंशी यांनी मात्र न भिता पुढच्या ‘धनुर्धारी’ अंकात दोन पाने त्या प्रसंगाची सविस्तर हकीगत प्रसिद्ध केली! पोलीस कमिशनर कानेटकरांनी सारी केस नीट ऐकून घेतल्यावर ते थक्क झाले व म्हणाले, ‘साऱ्या मुंबईत इतके धैर्य करणारा माणूस आज मी प्रथमच पाहात आहे! शाबास! शाबास पठ्ठे ! मी तुझ्या केसालाही धक्का लागू देणार नाही!" सनांना मिळालेला तो मर्दुमकीचा पुरस्कारच होता!

त्यांच्या एका कवितेत ते म्हणतात, ''ख्रिस्ताचे सरदार आम्ही तर येशूचे सरदार/ मरणाच्या दाढेतही आम्ही अजिंक्य वावरणार// त्या वीरसाप्रमाणे त्यांचे हे वर्तन झाले आहे. आज फादर, पास्टर, सिस्टर, सामाजिक कार्यकर्ता भ्रष्टाचाराच्याविरुद्ध आपल्या समाजाचे नेतृत्व करू शकतील का? फादर स्टॅन् स्वामी आज त्यांच्या ८३व्या वर्षात तलोजाच्या तुरुंगात पडले आहेत! पार्किन्सन रोगामुळे त्यांचे हात थरथरतात. पाण्याचा ग्लास नीट धरता येत नाही; म्हणून त्यांनी तुरुंग अधिकाऱ्यांकडे एका ट्रक क्स्ट्राची मागणी केली. त्यावर त्यांना उत्तर मिळाले, परवानगी मिळण्यासाठी वीस दिवस लागतील; कारण खुद्द न्यायालयामधून तसे आदेश आणावे लागतील! वारे आपले तर्कशास्त्र! वारे न्यायव्यवस्था!! वारे माणुसकी!!!

नाशिकच्या शरणपूरात राहत असतानाही त्यांना गुंडांशी मुकाबला करावा लागला होता. मात्र इथे गुंडांना साथ देणारी व हल्ल्याची सूत्रधार एक बाईच होती. पण सूर्यवंशींच्या आध्यात्मिक शक्तीपुढे त्यांचे काही चालले नाही. अखेर ही बाई सूर्यवंशींना शरण आली. एके दिवशी भल्या पहाटे ते बिछान्यात असता ती बाई आली आणि त्यांचे पाय घट्ट धरून म्हणाली, ‘दादा! मला क्षमा करा! मला देवानं तुमची ‘क्षमा माग’, म्हणून स्वप्नात सुचवलं आहे ! क्षमा केल्याखेरीज मी तुमचे पाय सोडणार नाही !’

तेव्हा तिला सूर्यवंशी एखाद्या साधुसंताप्रमाणे म्हणाले, “बाई ! तू आजपासून माझी धर्माची बहीण!” लगेच उठून त्यांनी तिच्याबरोबर एका ताटात जेवण केले!

ख्रिस्ताशी एकरूप

अगदी ख्रिस्ताप्रमाणेच ते Man for all seasons होते. पंथभेदाच्या व जातीयतेच्या भिंती ओलांडून ते एके दिवशी म्हणतात, "आज माझ्यापुरता मी प्रॉटेस्टटांना प्रॉटेस्टंट आहे, कॅथलिकांना कॅथलिक!" त्यांच्या लिखाणातून ख्रिश्चनांचीच नव्हे तर, दुबळे, दलित, कंगाल, वंचित, फजित समाजांचीदेखील त्यांनी वकिली केली आहे."

सूर्यवंशी यांचे जीवन केवळ ख्रिस्ताचे अनुकरण नव्हते. ते ख्रिस्ताशी एकरूप झाल्याचा तो अविष्कार होता. ते म्हणतात, "केवळ ख्रिस्ताठायी पूर्णत्व आहे हे मला पटले आहे. पण ख्रिस्त सद्धर्माच्या संकेतात फरक करीत नाही. तो कुठलाही सद्धर्म नष्ट करण्यास आला नाही, तर पूर्ण करण्यासच आला आहे !" ते ख्रिस्ताच्या समन्वय वृत्तीचे होते म्हणूनच त्यांना कॅथलिक-प्रोटेस्टंट ऐक्य व्हावे असे वाटू लागले. "जे माझ्याविरुद्ध नाहीत ते माझ्या बाजूचे आहेत.’’ अशीच येशूची सर्वसमावेशक भूमिका होती.

श्रद्धा की सत्कृत्ये महत्वाची ह्या मुद्द्यावरून प्रोटेस्टंट-कॅथलिक यांच्यामध्ये मतभेद झाले आहेत. दोहोंच्या भूमिकेत काय त्रुटी आहेत, ते सूर्यवंशी यांनी अभ्यासून घेतले. प्रॉटेस्टंट श्रद्धेवर आणि देवाच्या कृपेवर जोर देतात; तर कॅथलिक ते सर्व स्वीकारून त्या कृपेची फळे कृतीमध्ये अपेक्षीतात. कॅथलिक पंथ केवळ शाब्दिक श्रद्धाच नव्हे तर सत्कर्मानाही महत्व देतो. प्रॉटेस्टंट पवित्र आत्म्याच्या दानाविषयी बोलताना कुठे तरी स्वप्नाळू, काव्यमय धुंदीत बोलल्यासारखे करतो; पण कॅथलिकबंधू ते पवित्र आत्म्याचे दान घेऊन व्यवहारात उतरतो” आणि हा संसार सुखी करण्यास त्याचा कसकसा उपयोग करता येईल, त्याचा विचार करतो. ‘आपले धन स्वर्गात साठवा, वर पाहा...वर, वर, वर’ असे प्रॉटेस्टंट म्हणतात; तर कॅथलिक आध्यात्मिक आणि दैहिक या दोहोंचा समन्वय शोधतात. कारण माणूस केवळ आत्माच नाही तर आत्मा आणि शरीरही आहे. ख्रिस्ती शरीर ख्रिस्ताइतके महत्वाचे आहे’’... जाता जाता सूर्यवंशी दोहोंची समजूत कशी अपूर्ण आहे, ते एखाद्या इशज्ञानीप्रमाणे दाखवून देण्याचा प्रयत्न करतात.

सूर्यवंशी यांचे 'अगा जे कल्पिले नाही' हे आत्मचरित्र वाचताना मला त्यांच्या सखोल आध्यात्मिक जीवनाचा जागोजाग अनुभव येतो. ते ख्रिस्ताशी एकचित्त झाले होते. ख्रिस्त म्हणाला आहे, "मी वेल आहे, तुम्ही माझ्या फांद्या आहात. तुम्ही माझ्याशी एकरूप झाल्याशिवाय कोणतेच फळ देऊ शकणार नाहीत." (पहा: योहान १५.५) सूर्यवंशी यांनी ख्रिस्ताच्या आंतरिक प्रेरणेनेच सर्व जीवनकार्य केलेले वाटते.

त्यांच्या संघर्षी स्वभावाचा मुद्दा संपवताना माझं मन मात्र कुठेतरी म्हणतं, सूर्यवंशी ख्रिस्तानुकरणात कमी पडले! आजच्या युवा पिढीसमोर हा मुद्दा मला आग्रहाने मांडावासा वाटतो. मुंबईच्या ब्रिटिश इंडिया प्रेसमध्ये असताना सूर्यवंशींचा बॉंबे लेबर युनियनशी कार्यकर्ता म्हणून संबंध आला. श्री. जॉर्ज फर्नांडीस, मधु लिमये, श्रीमती मृणाल गोरे यांच्या त्यांच्याशी ओळखी झाल्या. त्यांच्याबरोबर त्यांनी युनियनचे कार्यदेखील केले. अवघ्या सहा महिन्यात ते बॉंबे लेबर युनियनचे उपाध्यक्ष झाले! त्यावेळी त्यांनी ब्रिटिश इंडिया प्रेसची नोकरी सोडून युनियनचे फुल टाईम काम करावे व पार्टीच्या राजकारणात भाग घ्यावा, असे खुद्द श्री. जॉर्ज फर्नांडीस यांना मनापासून वाटत होते.

मला वाटते, त्यावेळी सूर्यवंशी यांनी स्वतःला राजकारणात झोकून द्यायला हवे होते. तिथे ते कचरले. ते म्हणतात, "एक तर मला सोश्यालिस्ट व्हायचे नव्हते आणि माझी लेखणी सोडून मी पक्षीय राजकारणात पडावे, असे मला वाटत नव्हते." ह्या भावना मी समजू शकतो, परंतु ते पुढे जाऊन म्हणतात, "आणि दुसरे म्हणजे या मंडळीत मी समरसून गेलो तर माझा देवाधर्मावरचा विश्वास डळमळीत होईल." मी विचार करतो, देवावरचा खरा

विश्वास म्हणजे तरी काय? जो देवाधर्माची भक्ती करील तोच विश्वासू सेवक काय? आणि प्रत्यक्ष समाजात अन्यायाविरुद्ध झगडून कामगारांना न्याय मिळवून देणारे कामगारनेते, राजकीय नेते हे देवाचे विश्वासू सेवक नाहीत काय? येशू म्हणाला आहे, "जे ‘प्रभू प्रभू’ म्हणतात, त्या सर्वांचा देवराज्यात प्रवेश होईलच असे नाही; तर जे देवाच्या इच्छेप्रमाणे वागतात त्यांचा होईल." हे समजून घेण्यात सूर्यवंशी कमी पडले.

ते पुढे कबुली देतातच, "श्री. जॉर्ज फर्नांडीस व त्यांचे साथी माझ्यापेक्षा सज्जन होते, माझ्यापेक्षा मोठे आणि चांगले काम करीत होते, मानवतेची सेवा करणारे मिशनगरीच ते नि:संशय होते." मग माघार का घेतली? माझ्या मते ते खरोखर एका मोठ्या आव्हानापासून पळून गेले. एका भक्ती पंथीप्रमाणे ते म्हणतात, "मी माझी श्रद्धा जपावी व मुद्दाम तिच्यावर विपरीत आघात घडतील अशा परिस्थितीत शिरू नये असे मला वाटले." ही भीती खऱ्या ख्रिस्तशिष्याला शोभत नाही. सत्याने केलेले समाजकारण आणि खुद्द राजकारणदेखील ख्रिस्ती श्रद्धावंताला ख्रिस्ताच्या प्रेमापासून निराळे करू शकत नाही. काय वाटतंय युवकांनो?

यंदाची ख्रिस्तजयंती विचारपरिवर्तनाची होवो!

===============

*लेखातील सर्व अवतरणे: अगा जे कल्पिले नाही! स. ना. सूर्यवंशी यांच्या आत्मवृत्ताची संपादित आवृत्ती.

प्रकाशक: कुणाल मदन हजेरी, चेतक बुक्स फ्लॅट नं. १, १२८०,

ए विंग, हरिनारायण स्मृति सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.,

सदाशिव पेठ, पुणे ४११०३०.

फोन : ०२० २४४५०४२४

chetakbooksbusiness@gmail.com

---

ओंजळ भरली की त्यात
आणखी काही मावत नाही
भरल्या पोटाला काही केल्या
आणखी काही ‘भावत’ नाही

गरजेवेळी उघड्या अंगाला
थंडी बोचत नाही
आणि हावऱ्या मनाला
‘स्वेटर’ही पुरत नाही

# वेशसंकल्पन (कॉश्च्युम डिझाइनिंग) शिकवताना....

-- नीरजा पटवर्धन

९ ते ११ फेब्रुवारी २०१२ या दरम्यान फ्लेम, पुणे येथील कॅम्पसमधे आंतरराष्ट्रीय थिएटर कॉन्फरन्स झाली. 'नाट्यप्रशिक्षणाचे शास्त्रः भारतीय व आंतरराष्ट्रीय दृष्टीकोन (थिएटर पेडगॉजी: इंडियन अ‍ॅण्ड इंटरनॅशनल परस्पेक्टीव्ह)' असा या कॉन्फरन्सचा विषय होता.

मी २००१ पासून ललित कला केंद्र - पुणे विद्यापीठ, अ‍ॅकेडमी ऑफ थिएटर आर्टस - मुंबई विद्यापीठ, फ्लेम - पुणे, नाट्यदिशा - नेहरू सेन्टर, नॉर्थ लखिमपूर-आसाम येथील राष्ट्रीय नाट्य विद्यालयाचे एक्स्टेन्शन वर्कशॉप अश्या विविध नाट्यप्रशिक्षण केंद्रांमधे वेशसंकल्पन शिकवत आहे/शिकवले आहे. तसेच वेशसंकल्पन या विषयातच माझे पदव्युत्तर शिक्षण (एमएफए - थिएटर मेजर, कॉश्च्युम डिझाइन फोकस) झालेले आहे.

या माझ्या अनुभवावर आधारीत वेशसंकल्पनेच्या शिक्षणासंदर्भात एक पेपर सादर केला होता. माझ्या पेपरचे शीर्षक होते 'टिचिंग कॉश्च्युम डिझाइन' कॉन्फरन्समधला पेपर असला तरी हा विषय म्हणजे रॉकेट सायन्स नाही आणि पेपरमधले मुद्दे सर्वांसमोर आलेच तर कदाचित हे क्षेत्र समजून घ्यायला मदत होईल या हेतूने खालील लेख लिहित आहे.

प्रस्तुत लेख माझ्या पेपरमधील काही भागाचा अनुवाद आहे. काही गोष्टींना मराठी प्रतिशब्द वापरता आले नाहीयेत तर काही ठिकाणी ते तसे वापरणे हे अतिक्लीष्ट तसेच मुद्दा चुकीच्या दिशेला नेत असल्याने वापरले नाहीयेत.

**वेशसंकल्पन (कॉश्च्युम डिझाइनिंग) शिकवताना....**

रंगभूमी हे दृकश्राव्य माध्यम आहे जिथे संवाद व संगीत ऐकून तर नटांच्या हालचाली व रंगमंचाची मांडणी बघून प्रेक्षक नाटकाचा आस्वाद घेत असतो. हा जो बघण्याचा किंवा दृश्य भाग आहे तो अतिशय महत्वाचा आहे. कुठल्याही नाटकाचा दृश्य भाग किंवा संरचना कथा व व्यक्तिरेखांना खरेपणा देतो, आधार देतो.

या दृश्य भागाचे एक महत्वाचे अंग म्हणजे वेशसंकल्पन. नाटकाचे मुख्य कार्य जे कथा सांगणे त्यामधे वेशभूषेचा मोठा वाटा आहे. वय, व्यवसाय अश्या ढोबळ गोष्टींपासून स्वभावातल्या बारीक सारीक कंगोऱ्यांपर्यंत व्यक्तीरेखेच्या अनेक संदर्भांची ओळख प्रेक्षकांना वेशभूषेमुळे होते. प्राचीन काळी म्हणजे जेव्हा नाटक लिहिलेही जात नव्हते तेव्हापासून नटाचे/ नर्तकाचे भूमिकेत जादूई रूपांतर करण्यासाठी वेशभूषेचा उपयोग असेच. नटाचे भूमिकेत रूपांतर करण्यासाठी आजही या कलेची जरूर आहे. हे सर्व असले तरीही रंगभूमीच्या सर्व कलांमधे वेशसंकल्पना ह्या कलेबद्दल अजूनही प्रचंड गैरसमज आहेत आणि अजूनही या कलेला योग्य स्थान दिले जात नाही .

बहुतांशी वेशसंकल्पनेला फॅशन डिझायनिंगचा एक प्रकार मानले जाते. व्यक्तीरेखा व कथेप्रमाणे कपडे, दागिने, इतर ॲक्सेसरीज, डिझाइन करून वेशसंकल्पक एक पूर्ण चित्र निर्माण करतो. एक व्यक्तिरेखा डिझाइन करण्यासाठी व्यक्तिरेखेच्या सखोल अभ्यासाबरोबरच संहितेची शैली, दिग्दर्शकाची ट्रीटमेंट, सादरीकरणाची पद्धत, अभिनयाची पद्धत या सर्व गोष्टींचा अभ्यास वेशसंकल्पकाला करावा लागतो. यासाठी वेशसंकल्पकाला वेगळे शिक्षण घ्यावे लागते जे फॅशनच्या अभ्यासापेक्षा नाट्यशिक्षणाशी जास्त नाते सांगते.

**वेशसंकल्पनाचे शिक्षण: पाश्चात्य विचार**

पाश्चात्य जगात वेशसंकल्पनाचे शिक्षण हे स्पेशलायझेशन किंवा संपूर्ण नाट्य प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून असे दोन्ही प्रकारे घेता येते. जवळजवळ सर्वच विद्यापीठांच्यात जिथे नाट्य शिक्षण आहे तिथे पदव्युत्तर (ग्रॅड स्कूल/ मास्टर्स - एम एफ ए) स्पेशलायझेशन करता येते. तसेच काही ठिकाणी पदवीही (बॅचलर्स - बी एफ ए) करता येते. या सर्व अभ्यासक्रमांच्या मागे एक विशिष्ट मेथडॉलॉजी आहे.

वेशसंकल्पक बनण्यासाठी संपूर्ण नाट्यकलेचे ज्ञान असणे आवश्यक मानले आहे. यामुळे रंगभूमीचा इतिहास व संहिता विश्लेषण ह्या अतिशय महत्वाच्या विषयांचा अभ्यासक्रमात अंतर्भाव असतो. रंगभूमीच्या इतिहासाचा अभ्यास करताना जगभरातल्या रंगभूमीवर प्रचलित असलेल्या सादरीकरणाच्या पद्धती, त्यांची उत्पत्ती, वेळोवेळी केले गेलेले प्रयोग यांची ओळख होते तर संहिता विश्लेषण शिकताना विविध शैलींमधे लिहिलेली नाटके अभ्यासली जातात, अनेकविध दृष्टीकोनांच्यातून तपासली जातात. साहित्यिक प्रवाहांचाही अभ्यास यामधे केला जातो.

याबरोबरच वेशसंकल्पनेची सैद्धांतिक मूलतत्वे आणि प्रात्यक्षिक असे दोन्ही प्रकारचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांनी वर्गामधले छोटे प्रोजेक्टस तसेच पूर्ण नाटकाच्या प्रत्यक्ष

सादरीकरणासाठीही वेशसंकल्पन करणे आवश्यक असते. या प्रक्रियेच्या दरम्यान दिग्दर्शक व वेशसंकल्पक एकमेकांबरोबर काम कसे करतात याचे प्रत्यक्ष शिक्षण मिळते. सेमिनार क्लाससाठी विद्यार्थी महत्वाचे विविध वेशसंकल्पक आणि त्यांचे कलेसाठीचे योगदान याच्याबद्दल अभ्यास, संशोधन करून समजून घेतात. एखाद्या क्लास प्रोजेक्टसाठी किंवा प्रयोगासाठी वेशसंकल्पन करताना विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पना कागदावर दृश्यस्वरूपात आणणे अपेक्षित असते. यासाठी चित्रकलेच्या शिक्षणाचीही गरज असते. वेशसंकल्पनासाठी उपयोगी अश्या स्केचिंग, जलरंग, कोलाज अश्या विविध तंत्रांचे शिक्षणही दिले जाते. मोठ्या मोठ्या नाटक कंपन्यांची कॉश्च्युम शॉप्स अथवा ज्येष्ठ वेशसंकल्पकाच्या हाताखाली इंटर्नशिप करून व्यावसायिक जगातील कामाच्या पद्धतीचा अनुभव घेणे हे सुद्धा या शिक्षणात अनिवार्य असते.

यानंतरचा महत्वाचा भाग म्हणजे वेशभूषेचा इतिहास. यामधे कपड्याच्या इतिहासाबरोबरच कला, सजावट व वास्तुकलेचा इतिहासही अभ्यासला जातो. तसेच कला इतिहास आणि सामाजिक व राजकीय इतिहासाचा परस्परसंबंधाबद्दलही तपशीलात जाऊन विचार केला जातो. यामुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या संस्कृती आणि समाजाच्या जडणघडणीच्या संदर्भाने एक व्यापक दृष्टीकोन मिळतो जो एखादी व्यक्तिरेखा समजून घेण्यासाठी अत्यावश्यक असतो.

वेशसंकल्पन करताना इतर बाकीच्या संकल्पनाबद्दलही म्हणजे नेपथ्य व प्रकाशयोजना यांबद्दल विद्यार्थ्यांना ज्ञान असायला हवे कारण या दोन्ही विभागांच्याबरोबरच काम केले जाते. त्यामुळे नेपथ्य व प्रकाशयोजना या दोन्ही कलांबद्दल शिकणे अनिवार्य असते.वेशसंकल्पकाला कापड, कपडा बेतणे, शिवणे, आल्टरेशन्स या सर्व गोष्टी उत्तमपणे येणे अत्यंत जरूरीचे असते. त्यामुळे वेशभूषा तयार करण्याचे शास्त्र हा अभ्यासक्रमाचा अतिशय महत्वाचा भाग असतो.

उत्तर अमेरिकेतील बहुतेक सर्व विद्यापिठांच्या नाट्यविभागामधे वेशसंकल्पनामधे मास्टर्स करणाऱ्या विद्यार्थ्यांना 'शॉप असिस्टंटशिप' मिळते. ज्यायोगे शिक्षणाच्या आर्थिक बाजू सांभाळली जाण्याबरोबरच विद्यापिठाच्या कॉश्च्युम शॉपमधे काम करण्याचा अनुभवही मिळतो.

**वेशसंकल्पनाचे शिक्षण: भारतीय वस्तुस्थिती**

वेशसंकल्पनाच्या शिक्षणासंदर्भात भारतातील परिस्थिती अभ्यासल्यास काही ठळक महत्वाचे मुद्दे दिसून येतात. भारतात केवळ वेशसंकल्पनाचे शिक्षण देणारी एकही संस्था नाही. केवळ राष्ट्रीय नाट्य विद्यालय, दिल्ली येथील तीन वर्षांच्या पदव्युत्तर पदविके अंतर्गत 'नाट्य तंत्रज्ञान व संरचना' या विषयामधे दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात स्पेशलायझेशन करता येते. इथेही केवळ वेशसंकल्पन नाही.

बऱ्याचश्या नाटक शिकवणाऱ्या संस्थांमधे वा विद्यापिठातील विभागांमधे सेट शॉप, कॉश्च्युम शॉप तर दूरच स्वत:चे नाट्यगृह/ सादरीकरणाची जागाही असतेच असे नाही. काही फॅशन डिझायनिंग शिकवणाऱ्या संस्थांमधे वेशसंकल्पन हा विषय थोडक्यात शिकवला जातो. तिथल्या शिक्षणामधे तारेतारकांचे ग्लॅमरस स्टायलिंग जास्त करून शिकवले जाते. वेशभूषेचा इतिहास या विषयाचा अंतर्भाव फॅशन डिझायनिंगच्या शिक्षणात नक्कीच असतो पण नाट्यशिक्षण वा चित्रपटनिर्मिती यासंदर्भात अर्थातच काहीही शिकवले जात नाही.

इथले पदव्युत्तर नाट्यशिक्षण हे संपूर्ण नाट्यकलेविषयी(कॉम्प्रिहेन्सिव्ह) शिक्षण देणारे असते. असे असले तरीही अभ्यासक्रमात अभिनयशिक्षणावर सगळ्यात जास्त भर असतो. काही शिक्षणसंस्थांच्या मते वेशसंकल्पन वा इतर तंत्राधारीत गोष्टींना अभ्यासक्रमात तोंडओळखीच्या पलिकडे स्थान देण्याची गरज नाही कारण येणाऱ्या विद्यार्थ्यांचा ओढा अभिनय वा दिग्दर्शनाकडेच असतो. वेशसंकल्पनाची सैद्धांतिक बाजू शिकवण्यासाठी ठेवलेला वेळ जरूरीपेक्षा अतिशय कमी ठेवलेला असतो. या थोडक्या वेळात जे शिकवले जाईल त्याचे प्रात्यक्षिक करून बघण्याची संधी क्वचित उपलब्ध होते कारण मुळात नाट्यशिक्षणासाठी गरजेचे असलेले इन्फ्रास्ट्रक्चरच अस्तित्वात नसते. याच प्रकारे गुणांकन व्यवस्थेमधेही सैद्धांतिक व प्रात्यक्षिक विभागात वेशसंकल्पना या विषयाचा अंतर्भाव असतोच असे नाही.

मी जॉर्जिया विद्यापिठात शिकत असताना एक भारतीय म्हणून मला स्वत:ची एक महत्वाची कमतरता जाणवली, ती म्हणजे दृश्य संवेदना आणि दृश्यात्मक विचाराचा अभाव. हाच अभाव आज मला माझ्या बहुतांश विद्यार्थ्यांच्यातही दिसून येतो. दृश्यकलांचा अतिशय श्रीमंत वारसा लाभूनही भारतीय विद्यार्थ्यांच्या नाट्यकलेसाठी पोषक अश्या दृश्य जाणिवा पुरेश्या विकसित नसतात. आपल्या शालेय शिक्षणात दृश्यकलांचा अतिशय माफक वापर असतो. दृश्यात्मकता हे शिकण्या-शिकवण्याचे साधन म्हणून क्वचित वापरले जाते. समकालीन दृश्य कलांचे जग हे नेहमीच एक समांतर जग असते आणि माणूस म्हणून घडण्याच्या प्रक्रियेत त्याचा काहीच सहभाग नसतो. अर्थातच दृश्यकलांसंदर्भाने विचार व

जाणिवा अविकसितच रहातात. बहुतेक नाट्यप्रशिक्षणसंस्थांना दृश्यकलांचा प्रयोगकलांशी संबंध आहे आणि त्यांचा अंतर्भाव शिक्षणात केला पाहिजे असे वाटत नाही. हे सगळे मुद्दे या 'गोष्ट सांगण्याच्या कलेच्या' दृश्य भागाबद्दल शिकणे अवघड करून ठेवतात. यामुळेच बहुतेक रंगमंच संरचनेला नाट्यप्रशिक्षणामधे फारसे महत्व दिले जात नाही.

**भारतीय वस्तुस्थिती आणि प्रस्तावित शिक्षण पद्धती**

विविध नाट्यप्रशिक्षण संस्थांमधे जवळजवळ अठरा वर्षे मी वेशसंकल्पन शिकवत आहे. येथील वस्तुस्थिती लक्षात घेता पाश्चात्य जगात ज्या प्रकारे शिकवले जाते तो अभ्यासक्रम तसाच्या तसा इथे शिकवता येणे शक्य नाही हे उघड आहे. भारतीय प्रशिक्षण संस्थांमधे संपूर्ण नाट्यकलेचा अभ्यासक्रम शिकवला जातो हे लक्षात घेऊन मी वेशसंकल्पनेच्या अभ्यासक्रमात वेगवेगळ्या मॉड्युल्सचा प्रयोग करत आलेली आहे.

अ. वेशसंकल्पनेची प्राथमिक तत्वे - यामधे वेशसंकल्पनेचे प्रयोगातील स्थान व महत्व अधोरेखित होईल अशी काही मॉड्युल्स मी वापरते.

वेशभूषेचा मानसशास्त्रीय परिणाम - विद्यार्थी एका व्यक्तीचे कपडे, राहणी, ॲक्सेसरीज या सर्व गोष्टींचे निरीक्षण करतात व त्या व्यक्तीबद्दल आडाखे बांधण्याचा प्रयत्न करतात. रोजच्या आयुष्यातले कपडे, वस्तू व्यक्तीमत्वावर आणि व्यक्तिमत्व या वस्तूंवर कसा परिणाम करत असते यावर चर्चा होते. चपखल निरीक्षण आणि बारकावे/ तपशील यांना यामधे महत्व दिले जाते.

२. तुलनात्मक अभ्यास - यामचे फॅशन डिझायनिंग आणि कॉश्च्युम डिझायनिंग या दोन शास्त्रांची साम्यस्थळे व फरक याबद्दल चर्चा केली जाते. वेशसंकल्पन (कॉश्च्युम डिझायनिंग) हा फॅशन डिझायनिंगच्या कलेचा एक भाग नाही ह्याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली जाते. उत्तम प्रकारचे कापडचोपड, अत्युत्तम कारागिरी वापरून बनवलेले कुत्यूर/ कुटूर आणि इमिटेशन, उच्च दर्जा व किमतीचा भास निर्माण करणाऱ्या वस्तू वापरून बनवलेले कॉश्च्युम यातला फरक स्पष्ट केला जातो. उदाहरणार्थ एखाद्या कॉश्च्युममधे फेविकॉल आणि रंग यांच्या पेस्टने चित्र काढून उत्तम भरतकामाच्या नमुन्याचा आभास निर्माण करता येऊ शकतो.

३. वेशभूषेचे रसग्रहण - विद्यार्थी एखादे नाटक एकत्र बघून त्यातील वेशभूषेचे सखोल विश्लेषण करतात.

ब. वेशसंकल्पनाची प्रक्रिया - बहुतांश विद्यार्थी हे अभिनय वा दिग्दर्शनातच रस असलेले असतात. त्यामुळे संहिता ते प्रयोग या प्रवासातली वेशसंकल्पनेची प्रक्रिया

अभ्यासताना, अभिनेता किंवा दिग्दर्शकाच्या संदर्भाने ही प्रक्रिया समजावून सांगितली जाते. अभिनेत्याचे वा दिग्दर्शकाचे या प्रक्रियेतील योगदान आणि भूमिका तसेच अभिनेता व वेशसंकल्पक आणि दिग्दर्शक व वेशसंकल्पक या दोन्ही नात्यांबद्दल सविस्तर चर्चा केली जाते.

१. शब्दशः कोणतेही नाटक हे दिग्दर्शकाचे 'व्हिजन' असते असे म्हणता येईल. दृश्य भागासंदर्भाने, प्रेक्षकांना कश्या प्रकारचा अनुभव द्यायचा आहे याची स्पष्ट कल्पना दिग्दर्शकाच्या मनात असायला हवी आणि ती कल्पना तीनही डिझायनर्सना उत्तम प्रकारे समजावून देता यायला हवी.

२. अभिनेत्याने वेशभूषेची संकल्पना समजून घ्यायला हवी. वेशसंकल्पकाच्या अभ्यासाचा आदर करायला हवा. मला हे आवडत नाही ते आवडत नाही असता कामा नये. तसेच तालमींच्या वेळेस वेशभूषेचा सराव व्हावा म्हणून घालायचे कपडे, वेशभूषा व नटांच्या हालचाली या सर्व गोष्टींची चर्चा दोघांमधे व्हायला हवी.

क. दृश्य जाणिवा - हा अतिशय महत्वाचा मुद्दा आहे. तसेच आधी सांगितल्याप्रमाणे याबाबतीत काही प्रमाणात विशेष काम करण्याची गरजही आहे. विद्यार्थ्यांनी दृश्यात्मक विचार करावा, त्यांच्या डोळ्यांवर संस्कार व्हावेत यासाठी विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त चित्रांची/ शिल्पांची प्रदर्शने, वेगवेगळ्या पुस्तकांच्यातले चित्र वा शिल्पांचे फोटो, आंतरजालावर उपलब्ध असलेली चित्रे बघावीत हा माझा प्रयत्न असतो.

१. दृश्य संवाद - संरचनेचे घटक व मूलतत्वे, घटकांचे मानसशास्त्रीय परिणाम यांचा तपशिलात अभ्यास.

२. नाटकाच्या संहितेची शैली, सादरीकरणाची शैली आणि नाटकाचे दृश्य संकल्पन यांच्यातले नाते याचा मुळातून व सविस्तर विचार.

वरील दोन्ही गोष्टी समजायला मदत व्हावी म्हणून या चर्चेदरम्यान भरपूर वेगवेगळी दृश्ये, मोठ्या मोठ्या चित्रकारांची चित्रे, महत्वाच्या नाट्यप्रयोगांचे फोटोग्राफ्स असे बरेच काही दाखवून त्यावरही चर्चा केली जाते. अतिशय कमी तासिकांची उपलब्धता आणि प्रात्यक्षिकाचा अभाव यामुळे ही याही मॉड्यूल्स तशी मर्यादित स्वरूपातच यशस्वी होतात.

**भारतीय वस्तुस्थिती: आता यापुढे...**

भारतीय नाट्यप्रशिक्षण संस्था व विद्यापीठीय नाट्यविभागांमधे काही मूलभूत बदल होणे गरजेचे आहे. प्रत्येक महत्वाच्या प्रशिक्षण संस्थेकडे स्वतःचे नाट्यगृह आणि स्वतःची

कॉश्च्युम, सेट, प्रॉपर्टी, लाइट वर्कशॉप्स असणे गरजेचे आहे. यासाठी प्रचंड आर्थिक पाठबळाची गरज पडणार आहे. यासाठी विद्यापीठाच्या प्रशासनाने नाट्यविभागाचा भाषा किंवा अश्या विषयांपेक्षा वेगळ्या पद्धतीने विचार करणे अत्यंत जरूरीचे आहे. नाट्यविभागाच्या गरजा वेगळ्या आहेत हे समजून घेणे अनिवार्य आहे. योग्य प्रकारे पायाभूत सुविधा उभारल्या जाव्यात यासाठी नाट्यप्रशिक्षण संस्था वा नाट्यविभागांचा डिझायनिंग किंवा दृश्य संकल्पन या गोष्टींबद्दलचा दृष्टीकोन बदलणे नितांत गरजेचे आहे. कोरी पाटी घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्याला अभिनय वा दिग्दर्शन यातच रस असणे हे साहजिक आहे कारण आपल्याकडे नाटकाच्या तांत्रिक वा दृष्यसंकल्पनाच्या अंगांबद्दल सामान्य माणसांना फारसे माहित नसते, त्यासंदर्भाने तेवढी जागरूकता नसते. पण हे अज्ञान आहे हे कारण अभ्यासक्रम आखतानाचा पाया असता कामा नये. एकत्रित किंवा संपूर्ण नाट्याभ्यासक्रमात सर्व बाजूंना योग्य ते स्थान दिले गेले पाहिजे. दृश्य भाग हा पैशाअभावी काट मारण्याचा 'जास्तीचा' भाग नव्हे हे प्रशिक्षण संस्थांनी वा विद्यापिठांतील नाट्यविभागांनी लक्षात ठेवायला हवे. याचबरोबर दृश्यसंकल्पनाचे विषय शिकवण्यासाठी ठेवला जाणारा वेळ पण वाढवायला हवा जेणेकरून विद्यार्थ्यांना विषयाची किमान तोंडओळख तरी व्यवस्थित होऊ शकेल.

गुणांकन पद्धतीमधेही या अनुषंगाने बदल व्हायला हवेत. विद्यार्थ्यांना मूल्यमापनात शिकलेल्या विषयाचे प्रात्यक्षिक करून बघायची संधी मिळायला हवी. संपूर्ण नाट्यप्रशिक्षणाच्या काळात किमान एका तरी प्रॉडक्शनमधे विद्यार्थ्याने वेशभूषा विभागात काम करणे अनिवार्य ठेवायला हवे.

प्रशिक्षण संपल्यावर विद्यार्थी याच क्षेत्रात उतरणार असतात त्यामुळे प्रत्यक्ष क्षेत्रात काम कश्या प्रकारे चालते याचा अंदाज येण्यासाठी प्रशिक्षणाचा भाग म्हणून व्यावसायिक व्यक्तीच्या हाताखाली काम करणे अनिवार्य असायला हवे. जेणेकरून या क्षेत्राशी प्रत्यक्ष ओळख तर होतेच पण संपर्क वाढल्याने बाहेर पडल्यावर काम मिळण्याच्या दृष्टीनेही मदत होऊ शकते.

सर्वात शेवटी अतिशय महत्त्वाचा मुद्दा म्हणजे भारतीय पारंपरिक रंगभूमीची ओळख व नाळ जोडली जाणे. भारताची पारंपरिक रंगभूमी ही विधिनाट्य ते लोकधर्मी आणि नाट्यधर्मी अश्या सर्व प्रकारच्या अनेक शैलींचा समावेश असलेली श्रीमंत रंगभूमी आहे. प्रत्येक पारंपरिक रंगभूमी वैशिष्ठ्यपूर्ण दृश्य संकेतांचे पालन करते. भरतमुनींच्या नाट्यशास्त्रातही हे उल्लेख आहेत. अभिनय प्रकारापैकी 'आहार्य अभिनय' ह्या संकल्पनेत रंगमंच, नेपथ्य, वेशभूषा, रंगभूषा यांचा विस्तृत स्वरूपात विचार केलेला आहे. बहुतेक

नाट्यप्रशिक्षण अभ्यासक्रमात पारंपरिक रंगभूमीचा आढावा घेतला जातो. पण तो आढावा शारीरीक हालचालींची पद्धत, वारंवार दिसून येणारे विषय, संगीताचा प्रकार यासंदर्भात जास्त करून असतो. वेशभूषेचे वर्णन केलेले असते पण ते वस्तूंची यादी, त्या शरीरावर कुठे घातल्या जातात इतपतच असते. ठराविक वेशभूषा असण्याच्या मागचा संरचनात्मक विचार आणि त्याचा भारतीय दृश्य कलांशी घातलेला मेळ याबद्दल काहीच मिळत नाही. ह्या विषयाची किमान तोंडओळख होण्याइतपत तरी चर्चा केली जायला हवी. अर्थात या विषयामधे खूप मर्यादित स्वरूपात संशोधन उपलब्ध आहे. भारतीय रंगभूमीच्या इतिहासाच्या या पैलूबद्दल खोलात जाऊन केलेल्या संशोधनाची, संदर्भांची इथे नितांत आवश्यकता आहे.

**समारोप**

वेशसंकल्पन किंवा रंगभूमीच्या कुठल्याही पैलूचे व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या अभ्यासक्रमात त्या त्या विषयाचे संपूर्ण सैद्धांतिक तसेच प्रात्यक्षिक ज्ञान या दोन्हीचा समावेश असायला हवा. अश्या प्रकारच्या प्रशिक्षणातून तयार झालेला विद्यार्थी बाहेर पडल्यावर आपल्या क्षेत्रात अर्थातच उत्तम कामगिरी करेल. त्याच्यामुळे त्याच्यासारख्या इतर अनेकांकडूनही चांगल्या कामगिरीची अपेक्षा ठेवली जाईल. त्यामुळे अनेकांना व्यावसायिक अभ्यासक्रमाची निवड करण्याची प्रेरणा मिळेल. यामुळे प्रशिक्षण संस्थांकडे पायाभूत सुविधा उभारण्यासाठी निधी जमा होणे हे पण सोपे होईल.

सध्यातरी ऐकायला स्वप्नवत वाटतेय.. नाट्यप्रशिक्षण अभ्यासक्रमातील दृश्यसंकल्पन या विषयाची पुनर्बांधणी केल्यावरच हे सर्व स्वप्न की वास्तव हे खरोखर समजू शकेल.

संदर्भसूची

पुस्तके:
द मॅजिक गार्मेंट - रिबेका कनिंगहॅम
कॉश्च्युम डिझाइनः टेक्निक्स ऑफ मॉडर्न मास्टर्स - लिन पेक्टेल

संकेतस्थळे:
डिपार्टमेंट ऑफ थिएटर अॅण्ड फिल्म स्टडीज; युनिव्हर्सिटी ऑफ जॉर्जिया
स्कूल ऑफ थिएटर; कॅलिफोर्निया इंस्टीट्यूट ऑफ आर्टस, स्कूल ऑफ ड्रामा; कार्नेजी मेलन युनिव्हर्सिटी’ टिश स्कूल ऑफ आर्ट; न्यू यॉर्क युनिव्हर्सिटी, स्कूल ऑफ थिएटर, फिल्म अॅण्ड टेलिव्हिजन; यूसिएलए, रॉयल अॅकेडमी ऑफ ड्रॅमॅटिक आर्टस

# पावित्र्याचे आठ नमुने

फा. (डॉ.) रॉबर्ट बी. डिसोजा

पसायदान, नाळे, वसई

जंगलात लाकडे तोडण्यासाठी निघालेल्या लाकूडतोडयाला त्या जंगलाच्या प्रवेशाजवळ एक साधू बसलेला आढळला. त्याने मंत्र दिला. "खोलात जा." लाकूडतोडया निघाला. सुरूवातीला त्याला सुकी लाकडे असलेली खूप छान छान झाडे दिसली परंतु थोडेसे खोलात जावे म्हणून तो पुढे गेला. त्याला चंदनाची झाडे लागली. आता त्याला मोह आवरेना. त्याने त्या चंदनाच्या लाकडाची मोठी मोळी बांधली आणि तो आपल्या घरी आला. त्याला ब-यापैकी किंमत मिळाली. जवळचे पैसे संपले म्हणून तो पुन्हा जंगलाकडे जायला निघाला. पुन्हा तोच मंत्र. आता लाकूडतोड्याने जंगलात खोलवर जाण्याचा मनाचा पक्का निर्धार केला. सुरूवातीला त्याला खूप चांगली सुकी झाडे दिसली, त्यानंतर चंदनाची झाडे दिसली. तो आणखी पुढे गेला. त्याला चांदीच्या नाण्यांची रास दिसली. आता त्याची उत्सुकता शिगेला पोहोचली. शेवटी त्याला सोन्याची खाण दिसली. भावनेच्या भरात तो ते सोने गोळा करणार इतक्यात त्याला साधूची आठवण आली.

एवढ सगळं वैभव या जंगलात असताना हा साधू मात्र एखाद्या भणंग भिकाऱ्यासारखा जंगलाच्या तोंडाशी देव-देव करीत बसलाय, हे कसे ? त्याने तात्काळ साधूकडे जाऊन त्याविषयी विचारणा केली. ते साधुमहाराज शांतपणे मंद स्मित करत म्हणाले, "मी सुद्धा तुझ्यासारखाच एक लाकूडतोड्या होतो. परंतु एका पवित्र सत्पुरूषाने मला हा मंत्र दिला : खोलात जा. मी जेव्हा जंगलात गेलो तेव्हा मलाही सुकलेली झाडे, चंदनाची लाकडे, चांदीच्या राशी व सोण्याच्या खाणी सापडल्या. परंतु मी पुढे जात राहिलो, शेवटी मला साक्षात परमेश्वर भेटला. त्या भेटीमधील परमानंदापुढे लाकूड, चंदन, चांदी, सोने मला मातीसमान वाटू लागले. आज मी या क्षणी त्या स्वर्गीय आनंदाचा आस्वाद घेत आहे. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आपले लोक अजून ह्या चंदन, चांदी, सोन्याच्या विळख्यात अडकलेले आहेत. त्यांना त्या परमेश्वराच्या पावित्र्यात कधीच प्रवेश करता येणार नाही. एवढीच माझी खंत आहे म्हणून मी म्हणतो, "खोलात जा."

बोधकथा तशी थोडीशी प्रदीर्घ वाटली असेल परंतु तिच्यातील बोध मात्र नक्कीच मोलाचा आहे. माणूस या जगात सुखाच्या शोधात असतो. ज्या व्यक्ती किंवा वस्तू प्राप्त झाल्या की आपण सुखी होऊ त्या मिळाल्यानंतरही त्यांच्या भ्रमाचा भोपळा फुटुन जातो. शेवटी माणूस देव-धर्म करू लागतो. इथे त्याला एका वेगळ्या संघर्षाशी दोन हात करावे लागतात. परमेश्वराला भेटायचं म्हणजे आपण पवित्र असायला हवे. मग तो पावित्र्याचे विविध मार्ग अवलंबून पाहतो. त्यातही त्याच्या मनाचा गोंधळ उडतो कारण पावित्र्याचा कोणताही नमुना परिपूर्ण नसतो. असे आठ नमुने मी या लेखाद्वारे आपणापुढे मांडू इच्छितो.

**१) स्वर्ग आणि शिडी :**

उत्पत्ती २८:१२-१४ मध्ये याकोबाला बेथेल येथे स्वप्नात एक शिडी दिसली. तिचा शेंडा स्वर्गांपर्यंत टेकलेला होता आणि देवदूत तिच्यावरून खाली उतरत व वर चढत होते. पुढे येशू योहान १:५१ मध्ये नथनेलला सांगतो, “आकाश उघडलेले आणि देवदूतांना चढताना व मनुष्याचा पुत्रावर उतरताना तुम्ही पाहाल.” म्हणजेच याकोबाला दिसलेली शिडी दुसरा तिसरा कोणी नसून खुद्द प्रभू येशू ख्रिस्त आहे. मात्र अध्यात्मामध्ये ते परिपूर्णतेचे प्रतीक मानले गेलेले आहे. जसा एखादा माणूस शिडीवरील पायरी-पायरीने चढत वरवर जातो तसा माणसाने परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करावा असे हा नमुना सुचवितो. त्यासाठी मत्तय ५:४८ चा आधार घेतला जातो, “जसा तुमचा स्वर्गीय पिता परिपूर्ण आहे तसे तुम्हीही परिपूर्ण व्हा.” असे लोक परिपूर्णतेचा इतका ध्यास करतात की जीवनात कितीही कमावलं, कितीही काम केलं तरी त्यांचे समाधान होत नाही. इतकेच नव्हे तर ते इतरांकडून परिपूर्णतेची अपेक्षा करतात. त्यामुळे त्यांच्या जीवनात अकारण संघर्षाची परिस्थिती निर्माण होते.

असा परिपूर्णतेचा नमूना डोळ्यांसमोर ठेवून जीवनात जे उत्तम, उदात्त व उत्कृष्ट आहे, ते मिळविण्यात काहीच अडचण नाही. मात्र तसे करताना मनात इतरांविषयी तुच्छतेची व स्वत:विषयी श्रेष्ठत्वाची भावना बाळगली जाता कामा नये. म्हणून लूकच्या शुभवर्तमानात येशू म्हणतो, “जसा तुमचा स्वर्गीय पिता दयाळू आहे तसे तुम्हीही दयाळू व्हा.”(लूक ६:३६) स्वत: येशू करूणामूर्ती बनून जनमाणसांत वावरताना दिसतो. केवळ तांब्याची दोन नाणी भांडारात टाकणाऱ्या विधवेची तो स्तुती करतो. (लूक २१:१-४), स्वत:ला नीतिमान मानणाऱ्या परूश्यापेक्षा तो पापी जकातदाराला नीतिमान ठरवितो. (लूक ७:३६.५०).

थोडक्यात माणसाने परिपूर्ण होण्याचा प्रयत्न करताना त्याला करूणेची जोड दिली तर तो समाधानी जीवन जगू शकतो.

**२) दगड आणि शिल्पकार :**

आपल्या जीवनातील सत् आणि असत् यांच्यात एक आंतरिक संघर्ष सुरू असतो. माणसालाही या बऱ्या वाईटाची जाणीव असते. “वाईटाचा वीट माना व बऱ्याला चिकटून राहा.” (रोम १२:९) हा संत पौलचा सल्ला मानत काही जण दरवर्षी प्रायश्चित काळात एका तरी वाईट प्रवृत्तीवर विजय मिळविण्याचा व एका तरी चांगल्या गोष्टीचा अंगीकार करण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ते मत्तय ५:२९ चा आधार घेतात : “तुझ्या उजवा डोळा पापास प्रवृत्त करीत असेल तर तो उपटून फेकून दे.” किंवा संत योहान बाप्तिस्टाने केलेले भाकीत ते कृतीत उतरविण्याचा प्रयत्न करतात. : “चांगले फळ न देणारे प्रत्येक झाड तोडून अग्नीत टाकले जाईल.”(मत्तय ३:१०). शिवाय माणसाने “अंधाराची कर्मे टाकून प्रकाशाची शस्त्रसामग्री धारण करावी.” (रोम १३:१२) हा संत पौलचा सल्ला ते शिरोधार्थ मानतात.

या नमुन्यासाठी दगड व शिल्पकार हे प्रतिक वापरण्यात आलेले आहे. हा शिल्पकार जसा दगडातून मूर्ती तयार करताना नको तो भाग छिन्नी-हातोड्याने काढून टाकतो तसे माणसाने स्वत:चेच जीवन घडवायचे असते.

मात्र आता प्रश्न असा उत्पन्न होतो की बरे आणि वाईट या संकल्पना कायमच्या टिकणाऱ्या आहेत का ? उत्पत्ती १:२६ मध्ये, देवाने तर माणसाला स्वत:च्या प्रतिमेप्रमाणे व प्रतिरूपाप्रमाणे बनवलेले आहे. याचा अर्थ माणूस मूळात खूप चांगला आहे. मत्तय १३:२९-३० मध्ये म्हटल्याप्रमाणे परमेश्वराने माणसाच्या मनात गहू (चांगुलपणा) पेरलाय. परंतु कोणा वैऱ्याने (सैतानाने) त्यात निंदण पेरले. येशू सांगतो, “दोन्ही एकत्रितपणे वाढू द्या. किंवा रोम ५:८ मध्ये संत पौलाच्या मते, आपण पापी असताना देखील ख्रिस्त आपल्यासाठी मरण पावला.

याचाच अर्थ, मनुष्यामध्ये पाप व पुण्य, बरे आणि वाईट या दोन्ही गोष्टी एकत्र नांदत असतात. मात्र माणूस दिवसेंदिवस अधिक चांगला, पवित्र व शांतिप्रिय बनतो की तो आणखी वाईट, पापी व अशांत बनत जातो यांकडे त्याने जाणीवपूर्वक लक्ष देणे गरजेचे असते. शिवाय काळानुसार मूल्ये बदलत जातात. द्वितीय व्हॅटिकन विश्वपरिषदेपूर्वी शरीर हा आध्यात्मिक

जीवनातील मोठा अडथळा मानला जात होता, प्रापंचिकांना दुय्यम स्थान दिले जात होते, स्त्रियांना समाजात व उपासनेत फारसे महत्व दिले जात नव्हते, आज ही मूल्यव्यवस्था बदलत आहे. काळाची पावले ओळखून आपल्यात योग्य ती मूल्ये भिनविण्याची लवचिकता दाखविणे सुज्ञतेचे असते.

**3) माती आणि मूर्तिकार :**

शिल्पकार हातोडा व छिन्नी यांच्या साहाय्याने दगडातून शिल्प तयार करतो. मात्र मूर्तिकार एखाद्या साच्यामध्ये माती, चिकण माती, प्लास्टर ऑफ पॅरिस किंवा तत्सम साहित्य मिळवून त्यातून मूर्ती घडवित असतो. इथे आवश्यकतेनुसार साचा लहान किंवा मोठा घेतला जातो व हूबेहूब सारख्याच मूर्ती तयार केल्या जातात.

माणूस हा अनुकरण प्रिय प्राणी आहे. एखाद्या आदर्श डोळ्यांसमोर तंतोतंत त्याच्याप्रमाणे वागण्याचा तो काटेकोरपणे प्रयत्न करतो. त्यासाठी तो “आत्मत्याग करण्याची” येशूची आज्ञा (लूक ९:२३) पाळतो, व येशूला अनुसरत राहतो (मार्क ८:३४) जसे मी तुमचे पाय धुतले तसे तुम्हीही एकमेकांचे पाय धुतले पाहिजेत (योहान १३:१४-१५) हा येशूचा कित्ता गिरविण्याचा तो शब्दश: प्रयत्न करतो. “जसा मी ख्रिस्ताचे अनुकरण करणारा आहे तसे तुम्हीही माझे अनुकरण करणारे व्हा !” (१ करिंथ ११:१) असे संत पौल करिंथ येथील लोकांना सांगतो.

मात्र प्रत्येक व्यक्ती अद्वितीय व अप्रतिम आहे. प्रत्येकाचा स्वभाव वेगळा, आवडीनिवडी वेगळ्या, विचार व भावना वेगळ्या, जीवनशैली भिन्न, पार्श्वभूमी निराळी आणि ध्येय-उद्दिष्टे तसेच कार्यक्षमता व कार्यपद्धती अलग अलग असते. उदात्त व उत्कृष्ट व्यक्तिमत्वाकडून प्रेरणा घेऊन आपले अनोखे व्यक्तिमत्व घडविणे शहाणपणाचे असते. आंब्याच्या झाडाने आंबे द्यावेत, नारळाच्या झाडाने नारळ द्यावे, मुंगीने मुंगीचे व हत्तीने हत्तीचे काम करावे हे उचित आहे. त्यामुळे केवळ अंधानुकरण करण्यापेक्षा “जे काही सत्य, जे काही आदरणीय, जे काही श्रवणीय, जो काही सद्गुण, जी काही स्तुती त्यांचे मनन करून आपापल्या परीने समाजाचे कल्याण करणारे व्यक्तिमत्व घडवून योगदान करण्यात सर्वांचे हित दडलेले आहे.

**४) देवदूत आणि माणूस :**

माणसाठायी ईश्वरी अंश असला किंवा माणूस ही साक्षात ईश्वराची प्रतिमा व प्रतिरूप असले तरी तो एखाद्या देवदूतासमान जीवन जगू शकत नाही. त्याला शरीर आहे म्हणून शरीराच्या गरजा आहेत. नेमक्या याच गरजा अध्यात्मात अडथळारूप ठरू लागल्याने माणसाने शरीराला वेदना देऊन जे कह्यात ठेवण्याचे विविध मार्ग अवलंबायला सुरूवात केली. त्यात उपासनायास, व्रत-वैकल्ये, विरक्ती निवृत्ती, शरीराला त्रास होईल अशी जीवनशैली, शरीराला सुया टोचणे, चाबकाचे फटके मारणे, आत्मक्लेश सोसणे असे प्रकार समाविष्ट केले. कारण शरीर हे विकाराचे व विकृतीचे आगर अशी मानवाची भावना बनली. संत पौलसुद्धा आपले शरीर कह्यात ठेवण्यासाठी काय करतो ते १ करिंथ ९:२७ मध्ये सांगतो. शिवाय माणसाने देवराज्यासाठी नपुंसक व्हायला देखील तयार असले पाहिजे (मत्तय १८:१२) असेही येशू सूचित करतो.

प्रत्यक्षात मात्र येशू पाप सोडून सर्व बाबतीत आपल्यासारखा माणूस झाला. मानसी देह धारण करून त्याने मानवी शरीराची महती उंचावली, त्यालाही आपल्यासारखी भूक लागली. (मार्क ११:१२) तहान लागली (योहान ४:६), तो रागावला (योहान २:१३), रडला (योहान ११:१३-१५), खिन्न झाला (मत्तय २६:३८), झोपी गेला (मार्क ४:३८), त्याने लोकांना स्पर्श केला, बालकांना कवटाळले, त्याला लोकांनी खादाड, दारूबाज, जकातदारांचा व पाप्यांचा मित्र अशा शब्दात हिणवले. शेवटी आपल्या शरीराद्वारे त्याने अखिल जगाचे तारण केले.

मानवी शरीर हे कृपेचे वाहक व तारणाचे माध्यम असते. त्यामुळे एकीकडे त्याचे अकारण चोचले पुरविले जाऊ नयेत हे जितके खरे तितकेच शरीराचा विनाकारण हेळसांड होणार नाही, त्याच्याकडे दुर्लक्ष होणार नाही, त्याला पुरेसे अन्न, झोप न व्यायाम मिळत राहील यांकडे लक्ष देणे देखील महत्वाचे आहे.

**५) मठवासी आणि जग :**

या नमुन्यासाठी वापरण्यात आलेले प्रतीक म्हणजे जगाकडे पाठ फिरवून आपल्या मठामध्ये दिवसभर प्रार्थना करीत बसणारा मठवासी ! अशा लोकांना वाटते की हे जण खूप

वाईट आहे. ते मायावी किंवा फसवे आहे. त्यामुळे या जगात अडकून पडायचे नाही. 'ब्रम्ह सत्य जग मिथ्या' म्हणजे केवळ परमेश्वर तेवढाच काही एक सत्य आहे बाकी सारे झूठ आहे. त्यामुळे जगापासून जेवढया प्रमाणात विरक्ती वा संन्यास घेता येईल तेवढया लवकर आपल्याला परमेश्वराला प्राप्त करून घेता येईल असे या लोकांना वाटत असते.

त्यासाठी असे लोक बायबलमधील काही वचनेदेखील उद्धृत करतात, "व्यर्थ हो व्यर्थ ! सर्व काही व्यर्थ !! (उपदेशक १:२) "जगाबरोबर मैत्री हे परमेश्वराबरोबर वैर स्थापन करण्यासारखे आहे." (याकोब ४:४) खुद्द येशू जमावातून निघून डोंगरावर एकांती गेला (मत्तय १४:२३). तो आपल्या शिष्यांना प्रार्थनेविषयी शिकविताना त्यांनी आपल्या खोलीचे दार बंद करून प्रार्थना करावी. (मत्तय ६:६) असे सुचवितो. आपल्या शिष्यांनी जगात रहावे परंतु जगाचे बनू नये म्हणून येशू त्यांच्यासाठी प्रार्थना करतो. (योहान १७:१६). शिवाय तो आपल्या शिष्यांना सांगतो की, ज्या कोणी घरे, भाऊ, बहिणी, बाप, आई, मुले किंवा शेते माझ्या नावाकरिता सोडली आहेत त्यांना अनेकपटीने मिळून सार्वकालिक जीवन हे वतन मिळेल (मत्तय १९:२९) रूपांतराचे वैभव पाहून पेत्रालाही त्या पर्वतावर तंबू ठोकून राहण्याचा मोह झाला (मार्क ९:५).

परंतु जग खरोखरच वाईट आहे का ? उत्पत्ती १:२१ मध्ये म्हटलेले आहे की "परमेश्वराने निर्माण केलेले सर्व काही चांगले आहे." एलिया संदेष्टा जेव्हा ईजबेल राणीला घाबरून होरेब पर्वतावर जाऊन गुहेत लपून बसला तेव्हा खुद्द परमेश्वरानेच त्याला खडसावले. "एलिया, तू इथे कशासाठी आलाय?" आणि त्याला पुन्हा लोकांत पाठविण्यात आले (१ राजे १९). येशू तर दिवसभर लोकांच्या गरजा भागविण्यात, त्यांना शिक्षण देण्यात व त्यांचे आजार बरे करण्यात मग्न राही. (मत्तय ४:२३-२५). तो जसा लग्नाला हजर राहिला (योहान २) तसा मरणाला सामोरे जाणाऱ्यांच्या कुटुंबासमवेत राहिला. (योहान ११) "कैसराचे ते कैसराला द्या" (मार्क १२:१७) असे म्हणुन या जगात राहताना आपली नागरी कर्तव्ये आपण चुकवू नये असे त्याने शिकविले. शिवाय देवराज्याची शिकवण देताना त्याने दिवा, खमीर, नाणे, बी, मेंढरे, द्राक्षवेल, भाकर, मासे, जाळे अशी या जगातील प्रतिके वापरली.

या जगापासून पळ काढण्याचा मोह हा स्वार्थी प्रवृत्तीचे प्रतीक आहे. त्याने प्राप्त होणारी सुरक्षितता व सुखाची भावना फसवी असते. प्रसंगी एकांत, शांतता, प्रार्थना ही पळवाट होऊ शकते. मानवी जीवन जगण्यासाठी आपल्याला जगाची व जगाला आपली गरज आहे हे जाणून एकान्त व लोकान्त यांमध्ये समतोल साधणे योग्य ठरेल.

## 6) ऑनलाईन आणि ऑफलाईन :

या नमुन्यात वापरण्यात येणारे प्रतीक म्हणजे टेलिफोन किंवा मोबाईल फोन. मात्र इथे एका टोकाला माणूस तर दुसऱ्या टोकाला परमेश्वर असतो. जणू काही परमेश्वर सतत ऑनलाईन असल्याने माणूस त्याच्याशी थेट संपर्क साधून त्याची इच्छा जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. प्रार्थना आध्यात्मिक मार्गदर्शन व बायबलची वचने याद्वारे देवाची इच्छा जाणून घेण्याचा प्रयत्न केला जातो. कधी कधी त्यासाठी चुकीच्या पद्धती वापरल्या जातात. आता हेच उदाहरण पहा ना.

एका माणसाला दररोज सकाळी बायबल उघडुन देवाची इच्छा जाणून घेण्याची उत्सुकता असायची (हे राशीभविष्य पाहणाऱ्यासारखेच नाही का ?). एके दिवशी त्याने आपल्या बायबल उघडले तो त्याच्या नजरेस मत्तय २७:५ हे वचन पडले. त्यात लिहिले होते, “ज्युदासने जाऊन गळफास घेतला.” तो माणूस विचार करू लागला, हे असे कसे होऊ शकते ? आपण दुसरीकडे पाहू या. आता त्याच्या नजरेस लूक १०:३७ हे वचन पडले, “जा, तूही जाऊन तसेच कर,” हा माणूस बुचकळ्यात पडला. त्याने विचार केला की, ही देवाची इच्छा असूच शकत नाही परंतू शेवटी तो देवाचा शब्द होता म्हणून त्याने आणखी काही पाने फिरवून पाहिली, तो त्याच्या नजरेस योहान १३:२७ हे वचन पडले. ते वाचल्यावर तर तो पुरता थांबावून गेला,: “तुला जे करावयाचे आहे ते लवकर करून टाक.” शेवटी तो एका धर्मगुरूंकडे गेला. त्यांनी त्याला ही पद्धत चुकीची असल्याचे सांगून टाकले अन्यथा त्या दिवशी एका भोळ्या भाबड्या श्रद्धावंताचा जीव गेला असता.

पावित्र्याचा हा नमुना अंगिकारणारे लोक पुढील बायबलवचनांचा आधार घेतात. येशूने प्रार्थना शिकविताना म्हटले, “जसे स्वर्गात तसे पृथ्वीवरही तुझ्या इच्छेप्रमाणे होवो,” (मत्तय ६:१०) “माझ्या पित्याच्या इच्छेप्रमाणे जगणे हेच माझे अन्न होय.” (योहान ४:३४). “मला प्रभुजी, प्रभुजी असे म्हणणाऱ्यांचा देवाच्या राज्यात प्रवेश होणार नाही तर जे देवाच्या इच्छेप्रमाणे जगतात त्यांचा होईल” (मत्तय ७:२१).

मात्र परमेश्वराची इच्छा नक्की काय आहे हे कसे समजायचे ? तो म्हणतो, “माझ्या योजना ह्या तुमच्या योजना नव्हेत आणि माझ्या कल्पना या तुमच्या कल्पना नव्हेत,” किंवा “देवाचे मार्ग किती अगम्य आहेत.” (रोम ११:३३). त्यामुळे संत पौल थेस्सलनीका येथील लोकांना सावधगिरीचा इशारा देतो की, “सर्व गोष्टींची पारख करा,” (१ थेस्सलनीका ५:२१)

तर “प्रत्येक आत्म्याचा विश्वास धरू नका, तर ते आत्मे देवापासून आहेत की नाहीत याविषयी त्यांची परीक्षा करा.” असे संत योहान आपल्या पहिल्या पत्रात (४:१) मध्ये बजावून सांगतो.

सर्वात आश्चर्याची गोष्ट म्हणजे एखादी व्यक्ती एखादा विचार ही साक्षात देवाची इच्छा आहे अशा भावनेने तो इतरांवर लादण्याचा प्रयत्न करते. अशा वेळी इतरांचे मार्गदर्शन आपण जरूर घ्यावे परंतु आपला आतला आवाज ऐकायचा, त्यासाठी सदसदविवेक बुद्धीची जडणघडण करायची. कारण यिर्मया ३१:३१-३४ मध्ये म्हटल्याप्रमाणे “देवाचे नियमशास्त्र आपल्या हृदयपटलावर कोरण्यात आलेले आहे.”

**७) उपासना व जीवन :**

हा नमुना डोळ्यांसमोर ठेवून वागणारे लोक चिन्हानाच वस्तुस्थिती मानू लागतात. उदाहरणार्थ, रोझरी, पवित्र तेल, पवित्र पाणी, क्रूस, तीर्थक्षेत्र, इमाजी, नोव्हेनाचे पुस्तक इ. त्याद्वारे परमेश्वर जे शाश्वत वास्तव आहे, त्याच्यापर्यंत आपण पोहोचायला हवे. मात्र या नमुन्यात आपण किती वेळा रोझरीची प्रार्थना, नोव्हेनाची प्रार्थना म्हटली, किती वेळा उपवास केला, किती वेळा व कुठे कुठे रिट्रीटला गेलो, तीर्थयात्रेत सहभागी झालो, त्यावरून व्यक्ती स्वत:च्या पावित्र्याची पातळी ठरवित असते इतकेच नव्हे तर या काही गोष्टींमध्ये जादुई शक्ती आहे असे मानू लागते शिवाय तसे न करणाऱ्याला तुच्छ व पापी मानू लागते. लूक १८:९-१४ मध्ये परूशीदेखील जकातदाराला कमी लेखतो. लेवीयच्या पुस्तकात दिलेले उपासनेचे सर्व नियम काटेकोरपणे पाळणारे यहुदी येशूच्या काळात होते. शब्बाथवारी येशू चांगली का होईना, कामे करतो म्हणून ते त्याला पेचात पकडण्याचा प्रयत्न करीत होते.

उपासनेला उचित जीवनशैलीची जोड नसली की ते कर्मकांडे, ढोंगबाजी आणि दांभिकपणा बनू शकते म्हणून होशेय ६:६ चा आधार घेत मत्तय ९:१३ मध्ये येशू म्हणतो “मला यज्ञ नको, दया हवी.” किंवा अर्पणाला अंतर्यामीच्या शूद्धतेची गरज आहे असे सूचित करतो (मत्तय ५:२३) मंदिरात कर्मकांडाचा बाजार मांडला गेलेला पाहून तो हाती चाबूक घेतो (योहान २:१३-१६) शास्त्री परूश्यांचा निषेध करतो (मत्तय २३) आणि चांगल्या शोमरोन्याच्या दाखल्यात याजक व लेवी यांचे पितळ उघडे पाडतो. (लूक १०:२९-३७). थोडक्यात, आपल्या जीवनात उपासना व जीवन यात सूसंगती असायला हवी.

## ८) श्रद्धा आणि कृती :

परोपकार ज्यांच्या नसानसांत आणि रक्तात भिजलेला आहे, गोरगरिबांविषयी ज्यांच्या अंत:करणात ओतप्रोत करूणा भरून राहिलेली आहे आणि परदु:खाने ज्याच्या कंठापाशी दु:खाचे कढ येतात अशा व्यक्ती श्रद्धा, देवधर्म, प्रार्थना यांच्यापेक्षा प्रत्यक्ष कृतीवर भर देतात. अशा व्यक्ती २४ तास, सातही दिवस, बारा महिने लोकांच्या सेवेशी उपलब्ध असतात. विश्रांती, करमणूक, स्वत:चे आरोग्य, स्वत:चे कुटुंब इतकेच काय स्वत:चा रोजगार (कामधंदा, नोकरी-व्यवसाय) यांच्याकडे इतरांना मदत करण्यात ते खूप धन्यता मानतात. लोकांच्या अडीअडचणीत धावून जाणे हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असे त्यांना वाटते.

मात्र जोपर्यंत या गोष्टी नि:स्वार्थीपणे होतात तोपर्यंत ते ठीक असते. त्यातूनच मदर तेरेसा व बाबा आमटे यांच्यासारखी उतुंग व्यक्तिमत्वे उदयास येतात. परंतु अशी समाजसेवा करण्यामागे एखादा गुप्त / सुप्त हेतू दडलेला असेल तर तो लवकर किंवा उशिरा का होईना प्रकाशात आल्यावाचून राहात नाही. उदाहरणार्थ, कोणीतरी आपल्या कामाची दखल घ्यावी असे जर या व्यक्तींना वाटत असेल, इतरांच्या कामाची स्तुती केली जात असताना या व्यक्तींना अस्वस्थ वाटत असेल, इतरांपेक्षा अधिक सरस कामा करण्यासाठी चढाओढ, स्पर्धा, रस्सीखेच, राजकारण केले जात असेल अथवा प्रसिद्धी, पद, प्रतिष्ठा मिळविण्यासाठी समाजसेवेचा बुरखा पांघरला जात असेल तर अशी समाजसेवा ही स्वत:चीच सेवा असते.

दुसरीकडे काही लोकांमध्ये कमालीचा न्यूनगंड असतो. आपल्या गरजांपेक्षा इतरांच्या गरजा त्यांना अधिक महत्वाच्या वाटतात. प्रसंगी आपले कर्तव्य बाजूला सोडून ते परोपकार करू पाहतात अन्यथा त्यांना भयंकर अपराधी वाटत असते. त्यांना आत्मप्रतिष्ठा, आत्मप्रतिभा, स्वत:प्रती आदर इतकेच काय स्वत:चे मतही नसते, त्यामुळे कधी कधी एक ना धड भाराभर चिंद्या अशी त्यांच्या जीवनाची अवस्था झालेली असते.

बायबलमधील काही वचनांचा ते आधार घेतात : “करशील जे गरिबांसाठी होईल ते माझ्यासाठी !” किंवा “जनसेवा हीच ईश्वरसेवा” (मत्तय २५:३१-४६). “मी सेवा करून घेण्यासाठी नव्हे तर सेवा करण्यासाठी आलेलो आहे.” (मार्क १०:३४-३५) मात्र त्याचबरोबर गरीब नेहमीच तुमच्या जवळ आहेत| (मार्क १४:७) हे वचन त्यांना फारसे भावत नाही अथवा प्रभू येशूने मार्थाला तिच्या सत्कार्याबद्दल धारेवर धरले. (“मार्था, मार्था, तू पुष्कळ

गोष्टींविषयी दगदग करीत आहेस”) आणि मरियेची स्तुती केली. “(मरियेने चांगला वाटा निवडला आहे” लूक १०:३८-४४) हे वाचून ते कमालीचे अस्वस्थ होतात.

केवळ ‘देव,देव’ करणे हे कर्मकांड वा ढोंग असू शकते तसेच केवळ सेवा सेवा म्हणत झिजत राहणे हे असमतोल विचारसरणीचे फलित असू शकते. म्हणून सामर्थ्य आहे चळवळीचे ! जो जे करील तयांचे ! परंतु तेथे भगवंताचे ! अभिमान पाहिजे.” ही समर्थ रामदासांची उक्ती खूप काही सांगून जाते. “Mere Social workers do it for something but we do it for someone” हे मदर तेरेसांचे वाक्य त्यांच्या सेवाकार्याला अध्यात्माची कशी भक्कम बैठक होती त्याचेच द्योतक आहे. थोडक्यात, कृतीविना श्रद्धा ही जशी वांझ असते तसे श्रद्धेविना समाजकार्य हे ढोंग असू शकते, नाही का ?

**समारोप :**

आतापर्यंत आपण जे पावित्र्याचे आठ नमुने पाहिले आहेत त्यांच्यामध्ये जशी बलस्थाने आहेत तशीच दुर्बलस्थाने आहेत. प्रत्येक नमुन्यातील बलस्थाने घेऊन त्यांच्या दुर्बलस्थानांमध्ये सुधारणा केली आणि त्या सर्वांचा मिळून एक नवीन नमूना तयार करता आला तर ? तर मग एक अष्टपैलू पावित्र्याचा नमुना तयार होईल. त्यात

१) परिपूर्णतेची आस असेल परंतु तिला करूणेची जोड असेल.

२) सद्गुण व दुर्गुण हाताळण्याची परिपक्वता असेल.

३) इतरांचे अनुकरण करीत असता स्वत:ची अद्वितीय प्रतिमासुद्धा उजळून निघेल.

४) आपण स्वर्गातून उतरलेले देवदूत नसून हाडामांसाची माणसे आहोत याची जाणीव ठेवून स्वत:मधील ईश्वरी अंश फुलविता येईल व इतरांमधील मानवी मर्यादा समजून घेता येईल.

५) एकांत आणी लोकांत यामध्ये समतील साधता येईल.

६) परमेश्वराची इच्छा जाणून घेण्यासाठी बाह्य गोष्टींपासून प्रेरणा व आतला आवाज यांची सांगड घालता येईल.

७) उपासना व जीवन यांमध्ये सुसंगती असेल.

८) अध्यात्माच्या भक्कम पायांवर नि:स्वार्थी समाजसेवी इमारत उभी करता येईल आणि परमेश्वराची एक महान आज्ञा पाळता येईल. “मी, तुमचा देव परमेश्वर जसा पवित्र आहे तसे तुम्हीही पवित्र व्हा.” (लेवीय ११:४४-४५).

# आमच्या पोरांनी आम्हांला सातासमुद्रापलीकडे नेले

• सिडनी जस्टीन मोरायस. नायगाव, पाली, मो. – ९६०४३८५९८५

तिरेजबाय वय ७२ वर्षे. सर्वच प्रार्थनासभांत भाग घेणारी. चर्चमध्ये पहिल्या बाकावर बसणारी. काल रस्त्यात भेटली. “बाय, बरी आहेस ना?” मी. बाय आमची बोलघेवडी. तिने बोलायला सुरूवात केली. “आथं मी मेली तरी सालेल. स्वरग दावडीला माया पोरानं.” “म्हणजे ?” माझा प्रश्न. बायचा मुलगा शिपवर (क्रूझ) आहे हे माहित होतं. पुढची कथा बायने एका दमात वर्णन केली.

माझा राजू रजेवर आला होता. त्याने आमच्या दोघांचा पासपोर्ट काढला आणि दोघांना ‘मायकल ट्रॅव्हल’ सह जेरूसलेमला घेऊन गेला. तेथील ख्रिस्ताच्या जन्माची नि मृत्यूची क्रूस वाट पाहून आमची तिरेजबाय धन्य झाली होती. कारण तिच्या स्वप्नातील तो स्वर्गच होता. खूप काबाडकष्ट करून मुलाला १२वी पर्यंत शिकवलं. अंगावरचं सोनं गहाण ठेवून मुलाला हॉटेल मॅनेजमेंटचं प्रशिक्षण दिले. तेथूनच त्याला क्रूझवर जाण्याची संधी मिळाली. पहिल्या ट्रिपमध्ये त्याने कुटुंबाला कर्जमुक्त केले आणि आता दुसऱ्या ट्रिपच्या रजेमध्ये आईबाबाला तिर्थक्षेत्राचं दर्शन घडविले. दोघेही धन्य झाले. राजू आता नवीन घराचं स्वप्न पूर्ण करीत होता.

परदेशात गेल्याने मुलं आणि पालक यांच्यात दुरावा निर्माण होतो, अशी नेहमीच ओरड होते. पण ते कितपत खरे आहे ? काही मुलांना मोठ्या प्रमाणात हाती आलेला पैसा वापरता आला नसेलही, त्यामुळे ती चैनबाजी व मद्याकडे वळली असतीलही, ही जरी दुर्दैवाची बाब असली तरी सर्वच मुले तशी नसतात. ह्याच मुलांनी गरिबीत खितपत पडलेली कुटुंबे बाहेर काढली आहेत. आपल्या बहिणीची पैशाअभावी अडलेली लग्नकार्ये पार पाडली. टुमदार घरकुलं उभारली. आईवडिलांना सुखी ठेवलं. हे सर्व का शक्य झालं ? मातापित्यांनी आपल्या मुलाचा तर कुठे पत्नीने आपल्या पतीचा विरह सहन केल्यानेच ना ? काही अपवाद गृहित धरू.

माझा मुलगा कॉलेज शिक्षण पूर्ण होताच हॉटेल मॅनेजमेंटकडे वळला. त्याला ओबेरॉय शेरेटॉनमध्ये नोकरीही मिळाली. पाच अंकी पगार होता. अचानक एक दिवस माझ्यापुढे उभा राहून म्हणाला, 'बाबा, मी शीपवर जात आहे.' 'का रे ? एवढी चांगली नोकरी असताना? 'हे बघा, इथं राहून निवृत्त होईपर्यंत मी ५०,००० रू. पगारापर्यंतही पोहचणार नाही. खूप खस्ता खाऊन तुम्ही आम्हाला शिकवलं. बाबा, आपल्याला कायम या कौलारू जुन्या पद्धतीच्या घरात राहायचे नसेल ना तर मला ओबेरॉय सोडून सातासमुद्रापलीकडे गेलंच पाहिजे.'

अखेर प्रयत्न करून त्याने शीपवर नोकरी मिळवली. दरम्यान तीन वेळा घरी आला आणि आमच्या जुन्या घराचा संपूर्ण कायापालट केला. आज एका टुमदार बंगल्यात आम्ही राहतोय, जो बंगला उभ्या आयुष्यात नोकरी करून मी बांधू शकलो नसतो.

माझ्या गावचे उदाहरण देतो. दारूविक्री हा अनेक कुटुंबाचा व्यवसाय होता. अर्थात ते त्यांच्या उपजिविकेचं साधन होते. त्या मिळकतीवर त्यांनी मुलं साक्षर केली. निरनिराळ्या करीअरमध्ये तरबेज केली. ही मुलं पंख फुटताच 'परिवर्तना'च्या शोधात परदेशात उडाली. आपल्या आईवडिलांना मद्यविक्री व्यवसायातून मुक्त केलं. शेणाची, कारवीची, लाकडाची जुनी घरं अदृश्य झाली. तिथे टुमदार बंगले उभे राहिले. आताच्या नातवंडांना त्या जुन्या घराची कल्पना येण्यासाठी फोटोच दाखवावे लागतील. हा ८०च्या दशकानंतर झपाट्याने झालेला बदल मातापित्यापासून दूर नोकरीसाठी परदेशात गेलेल्या आपल्या मुलांनीच घडवून आणला ना ?

सांडोर चर्चलगतचं मारोडं नावाचं एक गाव. तिथे सर्वच घर कारवीची. टोपल्या विणणे हा त्यांचा व्यवसाय. गरिबीतून मुले शिकली सवरली. मुली शिक्षकी पेशाकडे वळल्या. प्रत्येक घरातून एक मुलगा मायभूमीपासून दूरदेशी नोकरीसाठी गेला. त्यांच्यामुळे गावात सुबत्ता, समृद्धी आली. कुडा-कारवीची घरे लयास गेली. सुबक बंगले उभे राहिले. गावकऱ्यांनी गावाचं नाव बदलून ते 'सतमे व्हिलेज' केलं.

चुळणा, गोखिवरे, आगाशी येथील धोबीतलाव, कुंभारवाडा आदी गावाचा इतिहास याहून वेगळा नाही. या गावातील मुलांनी देखील आपल्या मातापित्याचा, प्रिय पत्नीचा विरह सहन करूनच आपल्या कुटुंबाला झोपडीवजा घरातून बंगल्यात आणले. परदेशात नोकरी करणाऱ्या या मुलांच्या त्यागावरच आज ही टुमदार घरे दिसताहेत. नवीन पिढी स्वावलंबी होत आहे. विविध क्षेत्रात चमकत आहे. मी तर म्हणेन, वसई धर्मग्रामात आज जी सुबत्ता दिसत आहे, जागोजागी आकर्षक घरे, समाजाच्या गरजेनुसार शॉप, कित्येक लघुउद्योग,

विविध व्यवसाय सुरू करून त्याच्या पुढील पिढयांची सोय या नवीन पिढीने करून ठेवली आहे. आपल्या प्रगतीचे श्रेय परदेशातून अर्थार्जन करणाऱ्या मुलांना दिल्यास वावगं ठरणार नाही. NRE अर्थाजनातून कॅथलिक बँकदेखील तितकीच या मुलांनी प्रगतीशील बनवली.

आमचे 'इतोर' काका. वय ७५ वर्षे. काल मला भेटले. "पोरा, आजपरत इवान मी वरनंच जाताना बगीतलंत, पून पोरान न सुनेनं आमाना इवानात बवडीलं." इतोर उर्फ व्हिक्टर व त्याची पत्नी इस्पू उर्फ इस्प्रांस ऑस्ट्रेलियात मुलाकडे राहून आले नि धन्य झाले. विमानात बसण्याचे, नवीन जग पाहण्याचे भाग्य त्यांच्या नशिबी आले. तोच त्यांच्या जीवनातील आनंदाचा परमोच्च क्षण ! हे शक्य झाले, आपल्या प्रियजनांचा विरह सहन करून सातासमुद्रापलीकडे नोकरी करणाऱ्या मुलांमुळेच ना ? परदेशात नोकरी करणारी मुलं आईवडिलांना दुरावली म्हणण्यापेक्षा त्यांनी आपली कुटुंब समृद्ध केली, आईवडिलांचे पांग फेडले. आईचे हार-फुले विकण्याचे दिवस संपले.

जोस्पीनबाय स्मार्ट फोन घेऊन व्हाट्सॲपवर बसली होती. मी घरात प्रवेश करताच म्हणाली, "मुलगी सासरी गेली. दोन्ही मुलं परदेशात नोकरीसाठी. घरात आम्ही नराबायको दोघंच. मुलांनी व्हाटसॲपवर पाठविलेले फोटो पहात बसतो. मोठ्या मुलीनं अमेरिकेहून हा स्मार्ट फोन आणलाय. तो कसा हाताळायचा ते ती शिकवून गेली." जोस्पीन म्युनिसिपालटीच्या शाळेत शिक्षिका होती. तिलाही पेन्शन येते. पैशाची कमी नाही. माणसाच्या सहवासाची कमी जाणवायची, पण आता स्मार्ट फोनमुळे मुले, नातवंडे रोज आलटून पालटून IMO ॲपवर प्रत्यक्ष पाहून समाधान होते. रात्री चांगली झोप लागते. तिथं ती आनंदी आहेत हेच समाधान. आम्ही त्यांच्यासाठी प्रार्थना करीत असतो, जोस्पीनबायच्या बोलण्यात मुलांविषयीचं प्रेम आणि अभिमान ओसंडून वाहत होता.

फ्रान्सिसदादा नि फेलूबायला सूनबाई कारमधून चर्चला घेऊन आली. मी दोघांना हात जोडून सूनबाईचं अभिनंदन केलं. फ्रान्सिसदादा बोलला, "मुलगा सुनेला कार चालवण्यास शिकवून इंग्लंडला गेला. जाताना सांगून गेलाय, मम्मी-डॅडीना रिक्षाने कुठे पाठवायचे नाही. सूनबाईदेखील समंजस नि लाघवी आहे. चर्च, लग्न, नातेवाईक भेट, येतेरला, रक्तपासणी, डॉक्टरकडे, कुठल्याही प्रसंगी कुठेही कारशिवाय जाऊ देत नाही." दोघांनी मुलासाठी खूप खस्ता खाल्ल्या. फेलूबायने रस्त्यावर बसून भाजीपाला विकला त्याचे चीज झाल्याचा आनंद दोघांच्याही चेहऱ्यावर दिसत होता.

उत्तर वसईतील आमची फरशीदादी, वय ७२ वर्षे. मोठाली चॉकलेट घेऊन घरी परतली. वर्षभर मुलीच्या बाळंतपणासाठी दुबईला होती. अगदी लाल (कादोडी) लुगड्यातच गेलेली. चॉकलेट हातात कोंबत म्हणाली, “सिडनी, मी कते विमानात भयाशी.” जावई तिचा भला, त्याने संपूर्ण दुबई तिला दाखवली. दुबई पाहून फरशीदादीच्या डोळ्याचे पारणे फिटले. हे सर्व सांगताना तिच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळत होते.

माझा मित्र क्रिजोस. होंडा गाडी घेऊन दारात उभा. “अरे मित्रा, तू कधी सायकलही चालवली नाहीस आणि आज डायरेक्ट होंडा !” मी आश्चर्यचकित होत म्हणालो. “होय रे ! आयुष्यभर नोकरी केली पण सायकलही घेऊ शकलो नाही. मुलगा कर्ज काढून ऑस्ट्रेलियात MBAकरण्यास पाठविला. शिक्षण पूर्ण करून नोकरी करू लागला. आता घर सुसज्ज करून लग्न करण्यासाठी परतलाय. येताच मला होंडा गाडी घेऊन लग्नाच्या आमंत्रणासाठी पाठवलयं !” असे म्हणत क्रिजोस प्रथमच खळखळा हसला. आनंद त्याच्या चेहऱ्यावरून वाहत होता.

माझी पत्नी ओणव्याने दगडावर कपड्यांना साबण चोळत होती आणि हाय ! हूय ! करत होती. ‘देवा, कंबर दुखते रे ! कधी सुन येईल ? कधी हा वनवास संपेल ? परदेशातून आलेल्या मुलाने हे ऐकलं आणि सायंकाळी घरासमोर वॉशिंग मशीन घेऊन टेम्पो हजर झाला ! मुलाने कपडे धुवायचा दगड उलटा केला व आईला वॉशिंग मशीनमध्ये कपडे कसे धुवायचे ते शिकवलं. आईच्या दुखऱ्या कंबरेवर रामबाण इलाज देऊन परदेशात परतला.

विल्फ्रेड अंकलची मुलगी B.A. B. Ed. एक मुलगा ऑस्ट्रेलियाला तर दुसरा अमेरिकेत डॉक्टर. दोघांनी वडिलांसाठी कार घेऊन दिली. पती-पत्नी दोघंच बंगल्यात. मी कधी कधी त्यांच्याशी गप्पा मारायला जातो. “आयुष्य कसं ओकं ओकं वाटत असेल नाही ? मी. “तसं नाही रे, या मुलांनी जर ही गरूडझेप घेतली नसती तर आम्ही या जुन्या सामुदायिक घरात खितपत असतो. सतत वाद निर्माण झाले असते. ख्रिस्तजयंती निमित्त दोघेही सुट्टीवर येतात. आम्हाला भारतभर प्रेक्षणीय स्थळं दाखवायला नेतात. याच वर्षी आम्ही फ्रान्सला लुर्ड्स मावलीच्या दर्शनास जाऊन आलो. जपान, इंडोनेशिया, इस्त्रायल, जेरूसलेम दाखवले. नाहीतर आपले पाय त्या तीर्थक्षेत्रांना कधी लागणार होते ? सारं जग पाहिलं. आम्ही दोघेही सुखात आहोत. घरात स्वयंपाकाला बाई, साफसफाईला नोकर आहे. याहून आणखी काय हवं ?”

माझ्या सख्ख्या बहिणीच्या दोन मुली, मीना-वीना. त्यांच्या बालपणीच वडिलांच्या अकाली निधनाने पोरक्या झाल्या. ट्रीझाबायने कंबर कसली. फॅक्टरीत नोकरी पकडली. आम्हा दोन्ही भावाच्या व मावशीच्या आश्रयाखाली मुलींनी शिक्षण पूर्ण केले. त्यांच्यावर मोठ्या मावशीने (बहिणीने) चांगले संस्कार केले. सुशिक्षित, स्वावलंबी बनवले. त्यांना सुनील व सेल्वीनसारखे जीवनसाथी मिळाले. दोघेही व्यवसायात तरबेज असून दोघांनी सुसज्ज बंगले बांधले. त्यांना कारमधून फिरताना पाहून मामा म्हणून माझा ऊर भरून येतो. दोघींनी आपल्या ७० वर्षाच्या वृद्ध आईला इस्त्रायल-जेरूसलेमचे दर्शन घडविले. भारतातील विविध प्रेक्षणीय तिर्थक्षेत्रांना भेटी देण्यास पाठविले, हेही नसे थोडके.

विडया फुंकत ओटीवर बसणारा बस्त्यावकाका. त्याला गावात मुले बस्तूशेठ म्हणतात. पत्नीने डुकरं पाळण्याचा धंदा करून कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. एकच मुलगी तिला शिक्षिका बनवली. तिने प्रेमविवाह केला. दुबईस पतीसह राहते, तिथे शिक्षिकेची नोकरी करते. पत्नीच्या बाळंपणासाठी जावई दोघांना दुबईला घेऊन गेला. आईचा डुकराच्या घाणीतील वनवास संपला. बस्तूशेठ दुबई बघून धन्य झाला. देवधर्माला लागला. दुबईच्या कथा गावभर लोकांना सांगत सुटला. बिडीचे व्यसन सुटलेय.

“सिडनी, माझी मुलगी गुणवंत, नशिबवान निघाली रे !” मला कौतुकाने म्हणाला. “आता माझ्यावरही एक कथा लिही. खरं जग मी पाहिलं. आता यापुढे नवटाक बंद. तुझ्याबरोबर विन्सेंट डी पॉल संस्थेत सेवाकार्य करीन.”

जगायचं ते आता पूर्ण समाधानानं

मुलांना घडवलं स्वकष्टातून

त्यांचा आनंद हेच आमचं समाधान

सर्व मातापित्यांच्या सातासमुद्रापलीकडची ही सत्यकथा.

---

पुढ्यात असलेल्या ताटातील अन्न<br>
कष्टाचं असेल तर सात्विक असतं<br>
ओरबाडलेल्या पंचपक्वानाचं<br>
‘हजम’ होणं जरा कठीणच असतं

त्याच्या आनंदाचे ओझे<br>
मला का व्हायला हवे<br>
माझ्या दु:खाचेच मला<br>
अगोदर पेलायला हवे

# त्रिवेणीसंगमावर....

## *रेव्ह. ना. वा. टिळकांचे ख्रिस्तायन*

■ संकलन – फा. वेन्सी डिमेलो, नाशिक

गेल्या पन्नास-साठ वर्षातील महाराष्ट्रसारस्वतभक्ताला व निरनिराळ्या धर्मांचा तौलनिक अभ्यास करणाऱ्या जिज्ञासू भक्ताला टिळकांचे नाव अपरिचित नाही आणि विशेषत: 'वनवासी फूल, सुशीला, अभंगाजलि, उपासना संगीत, भजनसंग्रह' वगैरे काव्यांनी ज्यांनी आपल्या जीविताचे तत्वज्ञान सर्वांपुढे मांडले, ते तरी निदान हे नाव खचित विसरलेले नाहीत. आपल्या बालबोध लेखणीने महाराष्ट्रशारदेची आजन्म सेवा करून, शेवटी मनात घोळत असलेले 'ख्रिस्तायन' काव्य अपुरेच (अध्याय १ ते ११पर्यंत) लिहून हे फुलामुलांचे कवि ख्रिस्तवासी झाले, परंतु त्यांनी हाती घेतलेलं हे कार्य मात्र अपुरे राहिले नाही. त्यांच्या प्रेमळ व भाविक पत्नी 'लक्ष्मीबाई टिळक' यांनी ख्रिस्तचरित्राचा तो अपुरा सुटलेला धागा उचलला व आपल्या सुरस व जिव्हाळ्याच्या भाषेने त्याची गुंफण पुढे चालू केली. हे काम त्यांनी जवळजवळ तडीस नेले. 'जवळ जवळ' म्हणण्याचे कारण असे की, ख्रिस्तचरित्रातील अगदीं शेवटचा अध्याय लिहिण्यापूर्वीच श्रीमती लक्ष्मीबाई टिळक ख्रिस्तवासी झाल्या, पण त्यानंतरही हे कार्य अपुरे राहिले नाही. या पतिपत्नींचे सुविद्य चिरंजीव श्री. देवदत्त नारायण टिळक यांनी शेवटचा अध्याय पुरा केला व अशा रीतीने या ख्रिस्तायन महाकाव्याची पतिपत्नी व पुत्र यांच्या हातून पूर्ति झाली. संस्कृत वाङ्मयांत बाणभट्टाने आरंभिलेल्या 'कादंबरी' चा उर्वरित भाग त्याच्या मुलांने पुरा केल्याचे उदाहरण आहे. मंमटाचा 'काव्यप्रकाश' ही त्याच्या मुलाने पुरा केला आणि मराठी वाङ्मयांत कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचे 'रासेलस' शास्त्रीबोवांनी म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी पुरे केल्याची आख्यायिका आहे. याच उज्ज्वल परंपरेला अनुसरून टिळक घराण्यांतील या महनीय व्यक्तींनी एकनाथी ओवींत ख्रिस्तायनाचे हे काम पुरे केले आहे.

धर्मासंबंधी कितीही मंतातरे असोत किंवा कोणास कोणताही धर्म रूचो, कवितेच्या प्रांतांत जातिभेद किंवा धर्मभेद येऊ शकत नाही. घटकाभर नावे सोडली, तर सत्यधर्म जगात एकच आहे व त्याची मूलतत्वे कोणासही पटण्यासारखीच आहेत. टिळक हे धार्मिक जीवनाच्या बाबतीत तळमळीने विचार करणारे व त्यांचे जिव्हाळ्याने आचरण करणारे, असे

एक भक्तकवि होते. आपल्या धर्मांची थोर तत्वे आपल्या प्रेमळ पण निर्भीड वाणीने जगास सांगून जगाचे कल्याण करण्याकरिता देवपुत्र सद्गुरू येशु ख्रिस्त याने फार मोठा स्वार्थत्याग केला, हे तत्व मनावर पूर्ण बिंबविण्यासाठी टिळकांनी येशू ख्रिस्ताच्या जीवनाचा थोर विषय घेऊन तो मराठी ओवीच्या द्वारे रसिकांपुढे व उपासकांपुढे सगतवार रीतीने मांडण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु दुर्दैवाने अकराव्या अध्यायाच्या अर्ध्यातच त्यांची लेखणी विराम पावली.

अगदी विहंगम-दृष्टींने जरी या अध्यायांचे अवलोकन केले, तरी कोणालाही सहज दिसून येईल की, टिळकांच्या शारदेचा सुस्वर वीणा प्रथमपासून शेवटपर्यंत एकाच मंजुळ तालासुरांत वाजत असून, त्यात त्यांचा लय लागला आहे. या वीणेंतून निघणारा मंजुळ झंकार भक्तिरसाचा असून तो सर्व जगाला कवीच्या अंत:करणांतील ‘परमेश्वर म्हणजे प्रीति किंवा विश्वव्यापी प्रेम’ हे थोरतत्व आपल्या उपमादृष्टातांनी सांगत आहे व कवीही हेच पालुपद पुन:पुन्हा आळवून त्याचे स्वत:शी आलापांवर आलाप घेत आहे. त्याचप्रमाणे ख्रिस्तासारख्याचे अगाध प्रेम व त्याचा लोकोत्तर स्वार्थत्याग यांचे महत्वही कवि आपल्या गोड वाणीने लोकांच्या अंत:करणाला प्रतीत करीत आहे. ‘सेवा ही सर्व पूजनांहून अधिक मान्य व सर्वसाधनांहून अधिक श्रेष्ठ आहे’ असा कधीचा आत्मविश्वास आहे व तेच त्याची वाणी आपल्या काव्यातून बोलत आहे.

ख्रिस्तचरित्राचा हा भाग रेखाटताना इतर ठिकाणच्या ज्या ज्या गोष्टींचे श्रेष्ठत्व टिळकांना पटले, त्याची त्यांनी मुक्तकंठाने स्तुति केली आहे. नवव्या अध्यायांत गायत्रीमंत्राचा प्रभाव वर्णन करताना ते म्हणतात ----

‘शिरी ठेवोनिया हस्त | सांगे गायत्री मंत्राचा अर्थ |
म्हणे जा जा हाच जपित | मनी चिंतित प्रभुचरणा ||
सविता म्हणजे जगज्जनिता | नित्य तेजोमयी सत्ता |
अहा संतत जिला ध्यातां | परमसुखिता तीच खरी ||
वरेण्य म्हणजे परमसुंदर | केवळ श्रेष्ठत्वाचा पार |
वरेण्य म्हणजे कोटिभास्कर | क्षुद्र पामर जयापुढें ||
भर्ग म्हणजे तेज जाण | दिक्कालांही अनवच्छिन्न |
धीमहि म्हणजे याचे ध्यान | म्हणती हृषिजन आधारित ||
धीयो यो न: प्रचोदयाच्च | याचें ऐकून घेईं वाच्य |
प्रेरव आमुच्या बुद्धि उच्च | करो सदर्च सविता हा ||

गायत्रीमंत्राचा हा अर्थ उद्बोधक व प्रेरक नाही असे कोण म्हणेल ? त्याचप्रमाणे त्यांच्या काव्यांतील इतरत्र आलेल्या कल्पना त्यांनी याही काव्यांत उपयोगिल्या आहेत. ख्रिस्ते बोलेविलें बोला | नका बदलू कुणी ह्याला | त्याहून सुखे तीक्ष्ण भाला | उरी गेला साहीन || या ओवींतील कल्पना पहा उघडिलें हृदयाला | यांत सुखे घाला भाला या कवितेत दिसते व कवि आपल्या कवितेकडे किती हळूवारपणाने पाहात होता याची साक्ष पटते. ख्रिस्तप्रेम तरू फुलला | अश्रुसुमांचा सडा झाला ही कल्पना प्रेमतरू सारा फुलला | वेच अश्रुच्या सुमनाला या कवितेत पूर्वी येऊन गेलेली आहे. त्याचप्रमाणे सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी तसे पाहिले मी न कोठेतरी या कवितेतील कल्पना धन्य धन्य आर्यभूमि | अद्भुत शक्ति हिच्या नामी | तशी न कोठे देखिली मी | धन्य आम्ही पुत्र हिचे या ओवीत प्रतिबिंबित झाली आहे. पण ज्या कल्पना मूळच्याच गोड असतात, त्या पुनरूक्त झाल्या तरी त्यातील गोडी अवीटच राहते आणि हाच अनुभव आपणांस टिळकांच्या या विभागात येतो. टिळकांची या काव्यांतील भाषा संस्कृतशब्दप्रचुर व अलंकारिक असून थोडी अवघड पण सरळ, ओघवती व अर्थवती आहे. त्यांच्याच शब्दांत म्हणावयाचे झाल्यास कठिण आणि मृदु शब्दांही | भाषा झाली रमणीया ही असे म्हणता येईल. त्यांचे अध्ययन गाढे होते. जुन्या मराठी संतकवीच्या काव्यांचा त्यांनी कसोशीने अभ्यास केला होता. त्यामुळे प्रस्तुत काव्य वाचताना, एकनाथ मुक्तेश्वरादि जुन्या कवींच्या भाषाशैलीच्या छाया ठिकठिकाणी प्रत्ययास येतात व जुन्या कवींचे या काव्यात सुंदर संमेलनच झाले आहे की काय असे वाटते.

या महाकाव्याची घडण ‘शिवलीलामृत’ अगर ‘गुरूचरित्र’ यांच्या पद्धतीवर केलेली असून, त्यात पदोपदी ख्रिस्ताची थोरवी, त्याचे तत्वज्ञान व देवाचे श्रेष्ठत्व यांचे उल्लेख आलेले आहेत. या अकरा अध्यायांपैकी पाचवा ‘मार्या’, नववा ‘समीक्षक’ व अकरावा ‘वैधव्यविमोचन’ हे अध्याय रसाळ उतरले आहेत. आजपर्यंत ख्रिस्तचरित्रावर लहानमोठी अनेक पुस्तके झाली आहेत. परंतु त्यामध्ये नावाजण्यासारखी अशी फारच थोडी झाली. काव्यक्षेत्रात तर फादर स्टिफन्सचे ‘ख्रिस्तपुराण’ हे एकच उत्कृष्ट काव्य आहे. हे काव्य ज्ञानेश्वराच्या धर्तीवर लिहिले गेल्यामुळे त्याचा अभिजातपणा व कल्पनेचा ताजेपणा अजूनही कायम आहे असे वाटते. गद्यचरित्रांमध्ये ख्रिस्तवासी बाबा पद्मनजी यांचे ‘येशू ख्रिस्ताचे चरित्र’ व प्रो. श्री. म. माटे यांच्या ‘पाश्चात्य पुरूषश्रेष्ठ’ या पुस्तकातील ‘येशू ख्रिस्त’ ही चरित्रे विशेष उद्बोधक व स्फूर्तिप्रद आहेत. टिळकांनी आपल्या काव्याला ‘ख्रिस्तायन’ हे नाव देताना त्यांच्या डोळ्यांपुढे ‘रामायण’ हे नाव असावे अशी कल्पना आहे. महापुरूषाच्या किंवा श्रेष्ठ विभूतीच्या चरित्राला असे परंपरेने चालत आलेले नाव देण्यामध्ये लेखकाची अभिजातता, मार्मिकता व योजकता दिसून येते. ज्याने पराक्रम व पुरूषार्थ केला व प्रेम आणि स्वार्थत्याग यांच्या जोरावर ज्याने जगाचे कल्याण केले, अशा एका श्रेष्ठ प्रेषितांचे चरित्र रेखाटताना,

भावनेची उदात्तता कायम राहावी म्हणून, टिळकांनी नावांच्या बाबतीत योजलेली ही युक्ति विशेष काव्यमय ठरली असे वाटते. ख्रिस्ताचे चरित्र हा आपल्या महाकाव्याचा विषय करण्यामध्ये फादर स्टिफन्सची परंपरा राखल्याचेही श्रेय त्यांनी संपादिले आहे. अशा सर्व दृष्टींनी टिळकांनी केलेला ख्रिस्तचरित्राचा उपक्रम भाविकांना उपकारच वाटेल.

ख्रिस्तायनाचा यापुढील भाग श्रीमती लक्ष्मीबाईंनी लिहिला आहे. टिळकांनी अकराव्या अध्यायाच्या १०६ ओव्या लिहिल्या व तेथून पुढे श्रीमती लक्ष्मीबाईंनी लिहिण्यास सुरूवात केली. ही पतिपत्नी प्रतिभेची देवाणघेवाण करण्यासाठी नेमक्या अकराव्या अध्यायातच एकरूप झाली, हे अकरा (११) या आकड्यावरूनच किती तरी उत्तम सूचित होत आहे. हा योगायोग विलक्षण वाटला. टिळकांनी सोडलेला धागा उचलून त्याची गुंफण स्वयंस्फूर्तीने पुढे चालू करताना श्रीमती लक्ष्मीबाईंनी आपल्या अंत:करणातील प्रतिमेचा व प्रेरणेचा उपयोग केलाच आहे, परंतु ग्रंथाधार म्हणून त्यांनी बाबा पद्मनजींचे ‘येशु ख्रिस्ताचे चरित्र’ नजरेसमोर ठेविले आहे. बाबा पद्मनजी हे एक व्यासंगी गृहस्थ होऊन गेले व त्यामुळे त्यांच्या चरित्रात अनेक ख्रिस्तचरित्रांचे सार आले आहे. त्यांनी लिहिलेले चरित्र व्युत्पन्न असून त्याच्यामागे भावनेचा ओलावा आहे. या दोन्हीचा फायदा श्रीमती लक्ष्मीबाईंना मिळाल्यामुळे त्याचे अध्याय सरस वठले आहेत. त्यांनी स्वत: ख्रिस्तचरित्राचा व त्याच्या तत्वज्ञानाचा कसून अभ्यास केला होता. धर्मांतर करताना त्याच्या मनाची जी तळमळ झाली, ती त्या त्या क्षणाला त्यांनी नीट पारखून घेतली होती आणि त्यामुळे आपण ज्या ज्या गोष्टी करीत आहोत, त्या एका विशिष्ट ध्येयानुरूप करीत आहोत असा त्यांचा आत्मविश्वास होता. पटलेला जिव्हाळा व अनुभवाला आलेली तत्वे ही मुक्याला देखील वाचाळ करतात, मग श्रीमती लक्ष्मीबाई टिळक या तर काय हळुवार वृत्तीच्या जिज्ञासू व सहृदय धर्मसेविका होत्या. ख्रिस्ताचे तत्वज्ञान एकदा मनाला पटल्यावर, त्यांनी त्याचा प्रामाणिकपणाने ताबडतोब अंगीकार केला, इतकेच नव्हे तर ते त्यांनी पूरेपूर आचरणात आणले. असा वृत्तीच्या ‘आईच्या’ अंत:करणातून प्रेरणा उत्पन्न होऊन, त्यांच्या हातून हे चरित्र जवळ जवळ पुरे झाले असल्यास नवल नाही. अशा रीतीने स्वत:ची प्रतिभा, अंत:करणातून मिळणारी प्रेरणा व बाबा पद्मनजींच्या चरित्राचा संगतवार आधार या गोष्टी समोर असल्याने त्यांनी लिहिलेला भाग सरस व बालबोध वठत गेला. बाबा पद्मनजींच्या ज्या प्रतीवरून आईनी हे ख्रिस्तायन लिहिले, ती मूळ प्रतच आज माझ्यासमोर आहे. त्यात ठिकठिकाणी त्यांनी केलेल्या पेन्सिलीच्या अगर शाईच्या हातखुणा व कित्येक ठिकाणी पुस्तकाच्या समासातच लिहिलेल्या ओव्या पाहिल्या, म्हणजे त्यांनी या ग्रंथाचा अभ्यास किती सखोल केला होता व वाचता वाचताही त्यांना लिहिण्याची स्फूर्ति कशी होत होती. याची मला साक्ष पटते. यासाठीच ख्रिस्तायनाचा हा भाग वाचताना त्याबरोबर

बाबा पद्मनजीचे ‘ख्रिस्तचरित्र’ ही वाचकांनी नजरेआड होऊ देऊ नये, असे मी म्हणतो. तूलनात्मक अभ्यास करण्यातही एक प्रकारचा निराळाच आनंद प्रत्ययास येतो.

ख्रिस्तचरित्रासंबंधी निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या कल्पना केलेल्या आहेत. परंतु त्यांचा ऊहापोह करण्याचे हे स्थान नाही. ख्रिस्ताच्या पूर्व आयुष्यात त्याच्या वयाच्या तेराव्या वर्षांपर्यंतचा काल त्याने कोठे घालविला यासंबंधी फारसा उल्लेख सापडत नाही. परंतु ख्रिस्ताच्या चरित्रातील ही सतरा वर्षे कोठेतरी सखोल अध्ययन व चिंतन करण्यात गेली असली पाहिजेत हे खास, आणि हे जर खरे असेल तर ख्रिस्ताची तपश्चर्या फार मोठी व अलौकिक होती असे म्हणण्यास कोणताही प्रत्यवाय नाही.

ख्रिस्ताआधी जन्मास आलेल्या योहान्नाने सर्व जनतेची काळजी पाहून ‘लोक जर पश्चाताप पावतील व “क्षमस्व” म्हणून परमेश्वरास शरण जातील तर ते उद्धरून जातील’ या महामंत्राचा जयघोष केला योहान्नाच्या तत्वज्ञानांतील ‘प्रोक्षणविधि व शुद्धि’ या कल्पना ख्रिस्ताने उचलल्या व त्यांच्या जोडीला ‘प्रेमाची व स्वार्थत्यागाची’ घोषणा करून, त्याने आपले नवीन तत्वज्ञान बनविले. ख्रिस्त स्वत: ‘शांति, क्षमा, प्रेम व स्वार्थत्याग’ याचा साक्षात् पुतळा होता त्याच्या ठिकाणी ढोंग नव्हते, परोपकारासाठी आणि परमेश्वराच्या सामर्थ्याची प्रतीति आणून देण्यासाठी त्यांनी अनेक चमत्कार केले. या चमत्कारांत त्याचा कोणताही स्वार्थ नसल्यामुळे त्याच्यावर अनेकांचा विश्वास बसला व विशेषत: ‘मी देवाचा पुत्र आहे, मी देवाचा प्रेषित आहे, देवाचे सामर्थ्य अतिशय थोर आहे’ या तत्वज्ञानाची घोषणा केल्यावर त्याला अनुयायी मिळाले व त्याच्या कार्याचा प्रसार होत चालला, ज्यांना हे तत्वज्ञान पटले नाही किंवा समजले नाही, ते त्याचे शत्रू बनले व शेवटी त्यांनीच त्याचा नाश केला !

ख्रिस्ताने आपल्या प्रेषितांना प्रतिपादन केलेले तत्वज्ञान फार महत्त्वाचे आहे. ‘जे मनाने नम्र आहेत ते विश्वाचे राज्य करतील. जे मनाने खिन्न असतील त्यांनाच शांती प्राप्त होईल. जे स्वत: लोकांवर दया करतात ते स्वत: दयेस पात्र होतील. जे अंत:करणाने शुद्ध असतील त्यांनाच परमेश्वर भेटेल. तुम्ही आज माझ्यामागे फिरत आहात, पण तुम्ही त्या वेळी धन्य व्हाल किंवा ठराल कीं जेव्हा लोक तुमची निंदा करतील, तुमच्या पाठीस लागतील व माझ्यासाठी तुमच्या कपाळी सर्व तऱ्हेचे अपवाद येतील, शपथ वाहू नका, आकाशाची शपथ वाहू नका, कारण ते देवाचे आसन आहे. पृथ्वीची वाहू नका, कारण ती परमेश्वराची पायरी आहे. यरूशलेमाची वाहू नका, कारण ती त्याची राजधानी आहे. “होय” म्हणावयाचे असेल तर “होय” म्हणावे, “नाही” म्हणावयाचे असेल तर “नाही” म्हणावे. याहून जास्त जे बोलाल ती सैतानाची बरळ आहे. वाइटाचा प्रतिकार करू नका. तुम्ही शत्रुंवर सुद्धा प्रेमच करा. जे तुमच्यावर बोटे मोडतील त्याचे सुद्धा शुभ चिंतीत जा, जे तुमचा द्वेष करतात त्यांच्यावर

उपकार करा. जे कोणी तुम्हांस छळतात आणि दुष्टाव्याने राबवतात “त्यांना देव सुखी ठेवो” असे म्हणा. परमेश्वर जसा समदृष्टि आहे तसे तुम्ही असावे. मी असातसा कोणी नव्हे, मला प्रत्यक्ष परमेश्वराने घाडले आहे. जो कोणी मरण पत्करील तो अनंतकालपर्यंत जिवंत राहील.’

हे सर्व तत्वज्ञान उदात्त स्वरूपाचे असून ख्रिस्ताने ते पित्याच्या प्रेरणेने व स्वानुभवाने व्यवहाराच्या कक्षेत आणून ठेवल्यामुळे सर्व जनसमाजावर त्याचा चांगला परिणाम झाला व प्रसारही झाला. रसिकांनी थॉमस अ केंपिसचे ‘ख्रिस्तानुवर्तन’ (Imitation Of Christ) हे सुंदर पुस्तक वाचावे म्हणजे या संपूर्ण तत्वज्ञानाची महति कळेल.

ख्रिस्ताने अनेक चमत्कार केले व त्यांच्या द्वारे आपल्या तत्वांचा व परमेश्वरी सामर्थ्याचा लोकांना प्रत्यय आणून दिला. चमत्कार म्हटला की, त्याबद्दल साशंक होणारे काही लोक असतात परंतु त्यांनी तशी वृत्ति स्वीकारण्याचे कारण नाही. चमत्काराचे देखील थोडेफार समर्थन करता येते. जगातील सर्वश्रेष्ठ विभूतींच्या जीवनक्रमातील अगदी साध्यासुध्या गोष्टी आज लोकांच्या कुतहूलांचे विषय होऊन बसल्या आहेत. एका विशिष्ट मर्यादेच्या पलीकडील उच्च क्षेत्रात ज्या वेळी मनुष्यांचे मन पदार्पण करते, त्या वेळी त्याला काही सिद्धि प्राप्त होतात व नंतर तो आपल्या सामर्थ्याने काही अलौकिक गोष्टी करू शकतो. प्रश्न आहे तो या चमत्कारांचा नसून या सर्व चमत्कारांच्या पाठीमागे जो हेतू असतो त्याचा तुम्ही कोणत्या ध्येयासाठी हे चमत्कार केले अगर करता, हे जनता पाहात असते. आणि तसे पाहिले तर ख्रिस्ताने आपल्या शत्रुला नेमके ओळखले, त्याला शेवटपर्यंत क्षमा केली, आपण खांबालाही खिळून घेण्याचे पत्करले व ही सर्व दु:खे परमावधीच्या शांततेने सहन केली, हा एकच चमत्कार लहानसहान आहे का ? हा शेवटचा चमत्कार साक्षात् करून दाखविणाऱ्या देवपुत्राने आपल्या आयुष्यात आपल्या धर्मप्रचारासाठी व लोकांना सत्यज्ञान होण्यासाठी इतर काही व्यावहारिक चमत्कार करून दाखविले असल्यास त्यात काही नवल नाही. ख्रिस्ताचे पुनरूत्थान झाले व त्यांने लोकांना पुनदर्शने दिली या चमत्कारी समजूत घालताना, ज्ञानेश्वरांनी देखील समाधीनंतर पुनदर्शन दिले, हा दृष्टान्त दाखला म्हणून पुढे करता येईल. सारांश बुद्धिवाद्याची समजूत युक्तिवादाने होते व भाविकाची समजूत चमत्काराने होते, आणि म्हणूनच चमत्कार हे सर्व धर्मात सर्वकाळी यथावकाश हद्य व समर्थनीय ठरतात.

श्रीमती लक्ष्मीबाईंनी अथपासून इतिपर्यंत ख्रिस्ताच्या चरित्रातील अलौकिक गोष्टी घेऊन त्या आपल्या रसाळ वाणीने संगतवार रेखाटल्या आहेत. ख्रिस्ताचे चरित्र अतिशय अद्भुत व काव्यमय आहे आणि ते रेखाटण्याला श्रीमती लक्ष्मीबाईंसारखी प्रेमळ व सहृदय लेखिका मिळाली हा ‘समसमां संयोग’ झाला आहे. त्यांना करूण, वत्सल व भक्ति हे रस अतिशय चांगले साधतात. त्यांच्या लेखणीत कथनकला ओतप्रोत भरून राहिली आहे.

‘स्मृतिचित्रे’ रेखाटतांना एकदा तिने आपला प्रभाव सिद्ध केला आहे. ‘मी तुझी मावशी तुला न्यावया आले’ यासारख्या भावगीतांतून त्यांची सहृदयता व्यक्त झाली आहे. त्यांच्या ठिकाणी फार मोठी माणुसकी वास करीत होती. व्यक्तिमात्राविषयी त्यांना वाटणारे प्रेम हे जातिधर्मातीत होते. या सर्वांची प्रतिबंधे ख्रिस्तायनांतील निरनिराळ्या कथा रेखाटताना त्यात पडली आहेत, हे आपल्या अनुभवास येते, त्यांनी लिहिलेल्या अध्यायापैकी ‘हेरोद, शिष्य, योहान्न शिरच्छेद, शिष्यगर्वहरण, प्रयाण, लाजारस, प्रभुबोध, यहूदाविश्वासघात, येशूनिर्णय, पिलातन्यायसभा, येशूशासन, स्तम्भभार, प्राणोत्क्रमण व पुनरूत्थान’ हे अध्याय सरस वठले असून त्यात रामदासी भाषेचा प्रवाहीपणा असलेला आपल्या प्रत्ययास येतो. मधून मधून -

विश्वासाच्या मोतीयाला | आशा हाचि दोरा झाला |

श्रमसौंदर्य गुंफियेला | हार अर्पिला बालाकां ||

उषा बहुगुणी चित्रकार | मंडपा रंग दे मनोहर |

वायु झाडुन पर्णे दूर | सभोवार करी स्वच्छ ||

जमले सारे द्विजगणभाट | गाऊ लागले पंचमांत |

वृक्षी वायु वाजंत्री वाजवीत | ये धावत त्वरेने ||

तरूलता न राहती मागे | आरासा धावल्या वेगे |

पुष्पमाला त्या अनुराग | स्वअंगे उभारिती ||

मानवांच्या काळ्या कृती | नको बघण्या त्या पुढती |

ह्याकारणे सृष्टि सती | नेत्र मिटती जहाली ||

चोहीकडे अंध:कार दाटे | सूर्यास ग्रहण गिळी वाटे |

मेंढरे निघती गृहवाटे | पक्षी घरटे शोधिती ||

यांसारख्या धोसदार ओळी आपणांस ठिकठिकाणी आढळतात. ख्रिस्ताच्या मार्गात आलेल्या अडचणी, निरनिराळ्या शिष्यभक्तांनी दाखविलेला प्रेमळपणा, शत्रुंनी केलेला छळ यांचे उल्लेख रसभरित आहेत. त्याचप्रमाणे ‘ख्रिस्ताने पर्वतावरून केलेल्या’ उपदेशातील तत्वज्ञान ‘लाजरसाच्या’ कथेतील अद्भुतता, खिस्ताला पकडून देणाऱ्या यहूदाच्या मनोवृत्तीतील अधमपणा, न्याय देताना पिलाताच्या मनाची झालेली ओढाताण व शेवटी वधस्तंभावरही ख्रिस्ताच्या वृत्तीत आढळून येणारा अढळ असा धीरगंभीरपणा आपल्या

मनात त्या त्या भावना उत्पन्न केल्याखेरीज राहात नाही. हा सर्व प्रभाव श्रीमती लक्ष्मीबाईंच्या लेखणीचा आहे.

शेवटचा म्हणजे ७६ वा अध्याय श्री. देवदत्तांनी लिहुन मायपित्यांच्या कार्याला पूर्णत्व आणले आहे. श्री. देवदत्त स्वत:ला कवि म्हणवीत नाहीत, पण हे त्यांच्या विनयशीलतेचे द्योतक आहे, त्यांनी लिहिलेल्या अध्यांयातील कथनाचा ओघ, भाषासौष्टव, धार्मिक भावनेचा ओलावा अगर मायपित्यासंबधीच आदर पाहिल, हे देणे त्यांना परंपरेने आईबापांकडून मिळाले आहे याबद्दल खात्री होते. ते जेव्हा -

पुरी इमारत बांधुन अंती | मातापितरे दिधली हाती |

उगीच थोडी सोडुन देती | जाग रिती मजसाठी ||

वदती किंचित भिंत राही | इथे किंचित रंग देई |

बांधकाम हे अपुले, तूही |हात लावी पाहू ये ||

असे म्हणतात तेव्हा त्यांनी हे कार्य किती कळकळीने व निष्टेंने केले आहे हे दिसुन येते. या त्यांच्या लिहिण्यात काव्य नाही असे कोण म्हणेल ?

टिळक हे व्युत्पन्न कवि होते. श्रीमती लक्ष्मीबाई तशा नव्हत्या, इतकेच नव्हे तर, त्या अशिक्षित होत्या. याचा एक परिणाम आपणांस स्पष्ट दिसून येतो. टिळकांचे काव्य हे युक्तिवादांनी, संदर्भवाक्यांनी व उपमाअलंकारांनी भरलेले आहे, तसे श्रीमती लक्ष्मीबाईंचे नाही. पण श्रीमती लक्ष्मीबाईंच्या जिव्हाळ्याचा, प्रेरणेचा व अशिक्षितपणाचा त्यांना असा एक फायदा झाला आहे की, त्यांना जे सांगावयाचे होते. ते त्यांनी अगदी सरळ, सोप्या, साध्या व प्रवाही भाषेत सांगितले आहे.

त्यामुळे सर्व जनसमाजाला त्यांचे काव्य टिळकांच्या काव्यांपेक्षा समजण्यास अधिक सोपे जाईल. साधे शब्द, घरगुती भाषा व क्वचित मधून मधून येणारा एकादा दृष्टांत यांनी त्यांची भाषा अधिक जिव्हाळ्याची झाली आहे. एवढे मोठे काव्य अखंडितपणे लिहिणे ही काही सोपी गोष्ट नाही. श्रीमती लक्ष्मीबाई आपल्या जीवनात असा काही चमत्कार करतील असे कधीही कोणास वाटले नसेल, पण ‘स्मृतिचित्रे’ पाहिल्यानंतर त्यांच्या मनाचे अन्त:सामर्थ्य किती होते याची कल्पना येते व मग ‘ख्रिस्तायना’ सारखे महाकाव्य त्यांनी पुरे केले, या गोष्टीचे आश्चर्य वाटत नाही. टिळकत्रयोच्य रसवाहिनीच्या या ‘त्रिवेणीसंगमावर’ उभे राहून पाहिलेली शोभा अशी दिसते.

# खऱ्या सुखाचा मार्ग

▪ फा. (डॉ.) एलायस रॉड्रिग्ज, वसई.

**शब्दबीज**

प्रभू येशू ख्रिस्त सगळ्या जगाला, प्रत्येक माणसाला सुखाचा खरा मार्ग दाखवण्यासाठी आलेला आहे. मात्र येशूची सुखाची कल्पना आणि सर्वसामान्य माणसाची सुखाची कल्पना हयांच्यात खूप फरक असू शकतो. सर्वसामान्य माणसाला हया जगात खरे सुख आहे असे वाटते. परंतु हया जगातलं सुख बुडबुडयासारखे आहे. ते पटकन विरघळून जाते, टिकत नाही आणि पूर्ण समाधान करीत नाही. तृप्ती देत नाही. हया जगातल्या सुखामध्ये पुन्हा पुन्हा हाव निर्माण होते. अजून आपले वाढले पाहिजे, अजून आपल्याला जास्त काही मिळाले पाहिजे असे वाटत राहते आणि त्याच्यामुळे माणूस अतृप्त राहतो. हयाच्या उलट येशू म्हणतो की, तुम्ही देवाचे राज्य मिळवायचे ठरवले तर तुम्ही सुखी व्हाल आणि देवाचे राज्य कोणाकरिता आहे ? जे गरीब वृत्तीचे, जे लीन आहेत, जे आपल्या पापांबद्दल शोक करतात, पश्चात्ताप करतात, जे लोक देवाच्या कृपेने जीवन जगतात ते स्वर्गराज्य मिळवतात. संत पॉल म्हणतो एक जुना मनुष्य आहे आणि दुसरा नवीन झालेला मनुष्य आहे. जुना मनुष्य पापामध्ये राहतो. त्याला वाटते पाप केल्यामुळे मी सुखी होणार, पण बायबलमध्ये म्हटले आहे, जो पाप करून सुखी व्हायला बघतो तो वाऱ्याच्या मागे धावतो.

संत पॉल म्हणतो, तुम्ही प्रभू ख्रिस्ताचा स्वीकार केला आहे, त्याने तुम्हाला नवीन केलेले आहे. म्हणजेच कृपा दिली आहे, नवजीवन दिले आहे, तुम्ही खरोखर मनापासून, प्रामाणिकपणे प्रेमपूर्ण जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर तुम्ही सुखी होणार. येशू आपल्याला सांगतो, घेण्यापेक्षा देण्यामध्ये सुख आहे. आता हे सर्वसामान्य माणसाला स्वीकारायला जड वाटते. त्याला वाटते मला जास्त मिळाले तरच मी सुखी होणार. पण देवाच्या राज्याचा नियम वेगळा आहे. जे काही थोडेफार आपल्याकडे आहे त्याच्यातून आपण जे गरजवंत आहेत, अडचणीत आहेत त्यांना देऊ तितक्या प्रमाणात मी सुखी होणार. जे आपण देतो ते देवाच्या राज्यात आपल्याकरिता जणू काही जमा होते, राखले जाते.

आपल्याला त्याच्यामुळे विशेष कृपा मिळते. परंतु जो माणूस देवाचा शब्द ऐकतो त्या प्रमाणे वागत नाही, तो सुखी होणार नाही. तर जो ऐकतो आणि आज्ञापालन करतो तो सुखी होणार. जो माणूस ऐकतो परंतु त्याप्रमाणे काही बदल करायला तयार नाही तोसुद्धा वाऱ्याच्या मागे धावतो.

यशया संदेष्टा म्हणतो, जे कोणी परमेश्वराची वाट पाहतात, परमेश्वराची आशा बाळगत असतात, परमेश्वर मला सर्व काही पुरवणार आहे, असा भरवसा ठेवतात त्यांना परमेश्वर कधीच टाकत नाही. तो त्यांना त्याच्या उजव्या हाताने अनेक आशीर्वाद देतो. आपण हा जो शब्द वापरतो आशीर्वाद त्याचा अर्थ असा आहे: सुख देणारी, धन्यता देणारी परमेश्वराची कृपा. आपण जेव्हा आशीर्वाद मागतो तेव्हा काय मागतो ? तर खरे सुख मागतो. पण देवाच्या दृष्टीने जे सुख आहे त्यासाठी आपल्याला बदल करावा लागतो हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. हयाच्याकरिता येशूने क्रुस वाहिला तो येशूचा मार्ग आहे. तर आपले जुने विचार, आपले अर्धवट ज्ञान सोडून दिले पाहिजे आणि येशू म्हणतो त्या प्रमाणे आपण वागण्यासाठी येशूची कृपा मागितली पाहिजे. पविञ आत्म्याचे सामर्थ्य मागितले पाहिजे. आपल्याला जुन्या करारामध्ये आश्वासन देण्यात आले आहे, प्रभू परमेश्वर म्हणतो, तुमच्याकरिता माझी योजना आहे. म्हणून घाबरण्याची गरज नाही, काही चिंता करण्याची गरज नाही.

संत पिटर म्हणतो, तुमची चिंता प्रभूवर सोपवा. जो माणूस खरोखर परमेश्वराच्या कृपेत येशूच्या प्रकाशात जीवन जगू लागतो तो नुसती धास्ती करत बसत नाही. माझे ते झाले नाही, माझे हे व्हायला पाहिजे होते, नुसती चिंता करून काही होत नाही. प्रभूकडे क्षमा आहे, प्रभूकडे खरे जीवन आहे, प्रभू आपल्याला बोलावित आहे, प्रभू सर्व काही देणार आहे, त्याने माझ्याकरिता खूप मोठे वैभवाचे ताट वाढून ठेवले आहे. हा सगळा आशावादी विचार खऱ्या विश्वास ठेवणाऱ्या माणसाच्या जीवनात, परमेश्वराचे भय बाळगून नम्रपणे जीवन जगणाऱ्या माणसाच्या जीवनात, मिळत राहतो आणि त्यामुळे तो प्रत्येक क्षणाला खरे सुखी, धन्य, आशीर्वादित जीवन जगू शकतो.

**स्पंदन**

हे आमच्या प्रेमळ पित्या, ख–या सुखाचा मार्ग आम्हाला शोधता यावा म्हणूनच तू आम्हाला तुझा शब्द दिलेला आहे. बायबलमध्ये अनेक संदेष्टयांच्याद्वारे, अनेक मार्गदर्शकांद्वारे आणि विशेषकरून शुभवर्तमानामध्ये प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे तू आम्हाला तुझा

मार्ग दाखवला आहे. आम्ही तुझ्या शब्दामधून समजणारा मार्ग स्वीकारावा व खऱ्या अर्थाने धन्य, आशीर्वादित व्हावे अशी कृपादृष्टी आमच्यावर वळव.

हे प्रभो परमेश्वर पित्या, आमचे सुखाचे विचार जितक्या प्रमाणात चुकीचे आहे, येशूच्या आणि बायबलच्या शिकवणुकीच्याविरुद्ध आहेत, तितक्या प्रमाणात आम्हाला बदल करण्याची गरज आहे. येशूने दाखविलेला मार्ग कधी कधी आम्हाला अवघड वाटत असला तरीसुद्धा आम्ही क्रूस उचलून येशूचा संदेश स्वीकारावा व त्याप्रमाणे सुखी होण्यासाठी प्रयत्न करावेत म्हणून तू आम्हाला तुझे सामर्थ्य दे.

हे प्रभो येशू, तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांना तू नवीन करतोस. तू आम्हाला तुझ्या पवित्र आत्म्याठायी नवजीवन दिले आहे हया नवजीवनामध्ये तुझ्या प्रीतीची जाणीव, हया नवजीवनामध्ये स्वर्गीय शांती आणि पवित्र आत्म्याकडून मिळणारा आनंद हयांचा अनुभव आम्हाला येत राहावा व त्यामुळे आम्ही अधिकाधिक कृतज्ञ असावे, व खरे आभार मानण्याकरिता आम्ही अधिकाधिक दयावृत्तीने, चांगुलपणाने जीवन जगावे, असा आशीर्वाद आम्हाला दे.

---

दुसऱ्यांच्या सुख-दू:खात सामील होणं
माणुसकीचा अंश असल्याचं प्रतिक असतं
त्याच्या काळवंडलेल्या चेहऱ्याला
उजळविणारा गुणकारी लेप असतं

मी आहे म्हणून..., मी केले...
हे शाब्दिक बुडबुडे व्यर्थ आहेत
‘चमकत’ राहण्यासाठी केलेले
ते निरर्थक प्रयत्न आहेत.

जगात प्रत्येक गोष्टीचे मूल्य असते
घेताना किंमत त्याची द्यावी लागते
फुकट मिळणाऱ्या गोष्टींना कुठे
‘व्हॅल्यू’चे लेबल लावलेले असते.

चांगल्या-वाईट गोष्टी होत राहतात
तरीही संगत कुणाची हे ‘मॅटर’ करतं
सुरांबरोबर योग्य ताल तरच अवीट संगीत
अथवा भसाड्या गाण्याचं ‘बूमरॅंग’ असतं.

■ **सुनिल सोकाळकर**

# नजर न लग जाए

● सॅबी परेरा, नानभाट, वसई

साधारणतः वीसेक वर्षांपूर्वीची गोष्ट. नुकतंच कॉलेज संपवून मी अंधेरीला एका खाजगी कंपनीच्या ऑफिसात नोकरीला लागलो होतो. घरीदारी, शाळा-कॉलेजात, मित्रवर्गात, ऑफिसात सगळीकडेच एक गुणी, प्रामाणिक आणि वयाच्या विसाव्या वर्षीच गरीब कुटुंबाला चरितार्थासाठी हातभार लावू लागलेला मुलगा म्हणून माझ्याकडे पाहत होते. परस्त्रीकडे मान वर करून पाहणारही नाही असा सभ्य तरुण अशी त्या काळात माझी ओळख होती. (पुढे, खूप कष्टाने, मेहनतीने आणि महत्प्रयासाने मी ती ओळख पुसली. तर ते असो.)

ऑफिसमधे, आमचा बॉस जरी खडूस असला तरी बाकीचे सहकारी खूप चांगले होते. बॉस लोकांना खडूसपणे वागण्याचाच पगार मिळत असल्याने त्यांचाही नाईलाज असतो. त्यात भर म्हणजे आमचा हा बॉस कशाने तरी प्रचंड वैफल्यग्रस्त (म्हणजे आताच्या मराठी भाषेत फ्रस्ट्रेटेड) होता आणि त्याचं सारं फ्रस्ट्रेशन तो आमच्यावर काढायचा. कैलासवासी माणसांच्या नावासमोर जसे कै. लिहितात तसं कधीतरी गुपचूप जाऊन आपल्या वैफल्यग्रस्त बॉसच्या नेमप्लेट आधी वै. लिहावं असं मला खूपदा वाटायचं. पण माझ्या अशा मुक्त वाटण्याची आणि ते कृतीत आणण्याची सरासरी हजारास एक अशी असल्याने हे वाटणं कधी प्रत्यक्षात आलं नाही.

आमची कंपनी मल्टिनॅशनल असल्याने युरोपातील हेड ऑफिसशी पत्रव्यवहार, फोनाफोनी करावी लागायची. गम्मत म्हणजे, हेड ऑफिसमधील युरोपिअन सहकाऱ्यांना कळायला, बोलायला सोपे जावे म्हणून या माझ्या ऑफिसमधील मित्रांनी स्वतःहुनच आपली नावं सिद्धार्थचं सीड, पंढरीनाथचं पॅडी, नकुलचं निक आणि ज्ञानेश्वरचं थेट डॉमनिक करून टाकलं होतं.

मी ऑफिसात नव्यानेच रुजू झालेलो असलो तरी माझ्या बोलघेवड्या स्वभावामुळे थोड्याच दिवसात मित्रांचा गोतावळा माझ्या भोवती जमा झाला. आम्हा सहा-सात

सहकाऱ्यांचा सकाळ, दुपारचा चहा एकत्रच व्हायचा. बाकी सगळ्यांची टेबले फायली आणि कागदपत्रांनी भरलेली असताना माझं टेबल मात्र मोकळं आणि व्यवस्थित लावलेलं असायचं ह्याचं श्रेय माझ्या मित्रांच्या लेखी माझ्या नीटनेटकेपणाला जात असलं तरी प्रत्येक स्वच्छ टेबलामागे एक कोंबून भरलेला ड्रॉवर असतो हे सिक्रेट माझं मलाच ठाऊक होतं . तर सांगायची गोष्ट म्हणजे, लंच टाइमला देखील सर्वजण माझ्याच टेबलभोवती बसून हसत-खेळत, चेष्टा-मस्करी करीत, एकमेकांच्या डब्यातलं घेत-देत आम्ही जेवण करीत असू.

पॅडीला स्वतःचा टिफिन सोडून इतरांच्याच टिफिनमधे हात मारायची वाईट खोड होती ह्याचा मला सुरुवातीला राग यायचा. पण एक दोन वेळा त्याच्या टिफिनमधील पदार्थ चाखून पाहिल्यानंतर त्यात त्याची काही चूक नाही असे माझेही मत झाले. गमती गमतीत तो एकदा म्हणाला, लग्नाआधी मॅरेज ब्युरोवाल्यांनी मला माझ्या बायकोचा जो बायोडाटा दाखवला होता त्यात आवड या सदरामधे "स्वयंपाक करण्याची भयंकर आवड आहे" असं लिहिलं होतं. पण आता इतकी वर्षे तिच्या हातचं खाल्यानंतर मला कळून चुकलंय की तिला "भयंकर" स्वयंपाक करण्याची आवड आहे हे तिला प्रामाणिकपणे सांगायचं होतं पण तिचं मराठी व्याकरण तितकंसं चांगलं नसल्यानं अर्थाचा अनर्थ झाला असावा.

माझ्या आईच्या हातचं जेवण मात्र सर्वांनाच इतकं आवडायचं, की बऱ्याच वेळा मलाच माझ्या टिफिनमधील काही खायला मिळायचं नाही. सगळे म्हणायचे, तुझी आई सुगरण आहे. एकच पदार्थ चार वेळा केला तर चारही वेळा त्याची चव वेगवेगळी असते.

आमच्या घराच्या परसदारी पपईची झाडं होती. माझी आई त्या परसातल्या पपईचं, व्हिनेगर घालून आचार बनवायची. ते आचार तर सगळ्यांनाच खूप आवडायचं. त्या दिवशीही कुणीतरी आठवण काढली. म्हणाला,

- संजू, यार बऱ्याच दिवसात तू ते पपईचं आचार आणलेलं नाहीयेस.

- हो रे, मीच काल म्हटलं आईला की उद्या टिफिनमध्ये पपईचं आचार दे, मित्र खूप आठवण काढतात म्हणून.

- मग?

- अरे, आमची पपईची झाडं रस्त्याच्या कडेला आहेत ना. तिथून खूप लोकांचं येणंजाणं असतं. माझी आई आणि आजी दोघंही म्हणतात की लोकांची नजर लागून सगळ्या पपई खराब झाल्या.

- "अशा कशा नजर लागून पपई खराब होतात? मी तर असं कधी काही ऐकलं नाही." सीड बोलला.

- "मला तर हे नजरबिजर लागणे काही पटत नाही". डॉमनिकने त्याच्यात भर घातली.

मी म्हटलं, मलादेखील ही अंधश्रद्धा वाटते पण आमच्या गावातल्या लोकांचा असा समज आहे की लहान बाळाला ज्या प्रमाणे नजर लागते तशीच पपई सारख्या नाजूक फळझाडांना सुद्धा लागू शकते. ज्याप्रमाणे लहान बाळाला वाईट नजर लागू नये म्हणून आपण बाळाच्या गालाला किंवा कपाळाच्या बाजूला काजळ (तीट) लावतो तसंच पपईला नजर लागू नये म्हणून आमच्याकडे काय इलाज केले जातात ते थोडक्यात सांगून मी त्यांची कशीबशी समजूत काढली.

जेवण झाल्यावर सीडने ऑफिसमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा करण्याबाबत जे सर्क्युलर आलंय त्याचा विषय काढला. त्याने सांगितलं की पंधरा ऑगस्टला सार्वजनिक सुटी असल्याने दरवर्षी प्रमाणेच यंदाही स्वातंत्र्यदिनाच्या एक दिवस आधी म्हणजे चौदा ऑगस्टला ऑफिसमध्ये स्वातंत्र्यदिन साजरा केला जाणार असून त्या दिवशी सामूहिक खेळ आणि ऑफिसमधल्या मंडळींनीच सादर केलेल्या देशभक्तीपर गीतांचा आणि मनोरंजनाचा कार्यक्रम होणार असून ऑफिसतर्फे सर्वांना गोडधोडाचं जेवण दिलं जाणार आहे. ऑफिसमधील सर्व स्त्रियांसाठी साडी आणि पुरुष मंडळी साठी कुर्ता-पायजमा असा ट्रेडिशनल ड्रेस कोड असणार आहे.

दोन दिवसांवर असलेल्या ऑफिसमधील स्वातंत्र्यदिन सोहळ्याच्या बातमीने सगळ्यांचे चेहरे फुलले होते. आपल्या सात जणांच्या ग्रुपने एकाच रंगाचा कुर्ता पायजमा घालायचा की सात जणांनी सात वेगवेगळ्या रंगाचे ह्यावर मित्रांचा खल चालला होता, ऑफिसातली कोणती पोरगी साडीत फाकडू दिसेल आणि कोणती पोरगी / बाई कोणत्या रंगाची साडी नेसून येईल यावर पैजा लावल्या जात होत्या आणि मी मात्र विचारात गढलो होतो. ..

लहानपणी घरची आर्थिक परिस्थितीच अशी होती की आमच्या घरी मुलांची हौस आणि आग्रह म्हणून कुर्ता शिवला तर तो मुद्दामहून वाढत्या अंगाचा शिवला जायचा. एका वर्षी दिवाळीसाठी शिवलेला सफेद कुर्ता, पुढील तीनचार वर्षे तरी नीळ लावून इस्त्री करून नवा म्हणून आम्हाला दिला जायचा. वर्षभर कपाटात ठेवलेला कुर्ता कितीही इस्त्री केली तरी नवा काही वाटायचा नाही. आम्हीही, आम्हाला ही फसवणूक न कळल्याचं नाटक करायचो. मनात कुठेतरी आम्हाला पक्कं ठाऊक होतं की...कर्ता करविता आणि कुर्ता कुरविता तोच आहे. आपलेही दिवस येतील तेव्हा आपण दरवर्षी दिवाळीला नवा कुर्ता पायजमा घेऊ. हे कित्येक वर्षाचं स्वप्नं या वर्षी साकार होणार होतं. यावर्षी दिवाळीचा बोनस झाला की सर्वात प्रथम आपल्यासाठी एक आणि वडिलांसाठी एक असे दोन कुर्ते घ्यायचे मी ठरविलेच होते. किंबहुना ऑफिसला जाण्या-येण्याच्या रस्त्यावरील एका दुकानात हेरूनही ठेवले होते. पण, दिवाळीच्या दोन महिने आधीच, हातात दमडी नसताना कुर्त्यासाठी अर्धा पगार खर्ची घालावा लागेल असे वाटले नव्हते.

इतका अनाठायी खर्च करणे गरजेचे आहे का? असा एक क्षण डोक्यात विचार आला आणि मी मनातल्या मनात नटसम्राटासारखं स्वगत बोलू लागलो. ...

स्वतःला आणि घरच्यांना इतका त्रास देऊन या कार्यक्रमासाठी जावं का ऑफिसला? मुळात का जावं ऑफिसला? आपल्या आर्थिक परिस्थितीशी अनभिज्ञ सहकाऱ्यांच्या आग्रहाला बळी पडून, स्वतःच्या फाटक्या खिशाला कात्री लावून सामील व्हावं त्या जल्लोषात, बेशरम लाचार आनंदानं, कावळ्यासारख्या भिरभिरणाऱ्या नजरांनी टिपत राहावं ऑफिसातल्या महिलावर्गाचं सौंदर्य की फेकून द्यावं हे देहाचं लक्तर गप्प घरच्या बिछान्यावर? आणि काढावी दिवसभर झोप? आणि सांगावं सगळ्यांना की नाही येत मी ऑफिसला .. खड्ड्यात गेलं ते ऑफिस, उडत गेला तो फंक्शन आणि तेल लावत गेला तो ट्रेडिशनल ड्रेस कोड !

हा नटसम्राटाचा आव फार वेळ टिकला नाही. मुळात अशा छोट्यामोठ्या संकटांनी खचून जाणारा मी माणूस नाहीये. या बाबतीत मी आमच्या एसटी ड्रायव्हर असलेल्या मामावर गेलोय, तो म्हणतो "आपण एकदा पुढे जायचं ठरवलं की मग चष्मा आणि साइड मिरर काढूनच ठेवायचा, मागचं पुढचं बघायचं नाही, वरटेक करायचा म्हणजे करायचा!"

घरी आलो. आईवडिलांना परिस्थितीची कल्पना दिली. वडिलांनी आपल्याकडे जे काही होतं नव्हतं ते माझ्या हाती ठेवलं. आईने कपाटातले कोपरे-कापरे धुंडाळून, कपड्याच्या घड्या, डाळींचे डबे इत्यादीतून जे काही किडुकमिडूक तिने अडीअडचणीसाठी दडवून ठेवले होते ते माझ्या हाती सोपविले. मी माझ्याकडील शिल्लक त्यात जोडली आणि कुर्त्या-पायजम्याच्या एक जोडापुरते पैसे जमा झाले. असे म्हणतात, संकटे कधी एकटी येत नाहीत. एक समस्या सुटली इतक्यात दुसरी एक समस्या समोर आली. बाबा म्हणाले की, कुर्ता पायजमा घालायचा तर पायात चामड्याचा चपलांचा जोड (त्यांच्या शब्दात कोल्हापुरी पायतण) असायला हवा, नेहमीचे बूट बरे दिसणार नाहीत. माझ्याही आता लक्षात आले कि खरं म्हणजे अंगात कुर्ता पायजमा घालायचा तर पायात मोजडी असायला हवी पण ती नसेल तर निदान कोल्हापुरी चप्पला तरी असायलाच हव्यात, त्या आता कुठून पैदा करणार? विकत घेण्याचा प्रश्न तर सिलॅबसच्या बाहेरचाच होता.

तसाच मी झोपायला गेलो पण झोप काही केल्या येत नव्हती. विचार करता करता मला अचानक आठवलं. पंधरा ऑगस्टलाच आमच्या गावात स्वातंत्र्य दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आहे. माझा आमचा चुलत भाऊ; बबन एका राजकीय नेत्याची भूमिका करणार आहे. ऐनवेळी स्टेजवर धोतरात चप्पल अडकून फॅमिली ड्रामाची ब्लु-फिल्म व्हायला नको म्हणून तो हल्ली रोज धोतर नेसून, कोल्हापुरी चपला घालून चालण्याचा सराव करीत असताना मी त्याला पहिला होता. त्याचे पाय माझ्यापेक्षा थोडे मोठे असले, चप्पल एखाद नंबर मोठी असली तरी चालण्यासारखी होती.  त्याच्याकडून चप्पल उसनवार घेता येईल.

दुसऱ्या दिवशी ऑफिसहून येताना मी दुकानातून सफेद रंगाचा कुर्ता-पायजमा विकत आणला. घरी आल्यावर गावात नाटकाची तालीम चालायची तिथे गेलो. बबनला गाठले. बाबापुता करून एक दिवसापुरत्या त्याच्या नव्याकोऱ्या कोल्हापुरी चपला उसन्या देण्याची त्याला गळ घातली. पण तो काही रिस्क घ्यायला तयार नव्हता. शेवटी नाटकात त्याच्या सेक्रेटरीची भूमिका करणाऱ्या तरुणीला मध्यस्थी करायला भाग पाडले . बाईच्या मध्यस्थीपुढे साक्षात विश्वमित्र ऋषी देखील पाघळले होते तिथे आमच्या बबनची काय कथा! चौदा ऑगस्टला सकाळी सात वाजता त्याच्या घरून चपला घेऊन जायच्या आणि संध्याकाळी सात वाजायच्या आत जशा नेल्या तशा धुवून पुसून आणून द्यायच्या वायद्यावर चपलांची सोय झाली.

चौदा ऑगस्टचा दिवस उजाडला. कुर्ता-पायजमा घालून तयार व्हायला लागलो तेव्हा लक्षात आलं की, कुर्ता पांढराशुभ्र असल्यामुळे आतल्या बनियनला भोकं असून चालणार नाहीत. माझ्याकडे भोकं नसलेला बनियन सापडणे ही सनी लियोनीच्या घरी घागरा चोळी सापडण्यापेक्षा कठीण गोष्ट. त्यामुळे बनियनचा नाद सोडून मी तसाच कुर्ता अंगावर चढवला, पायजम्याची नाडी जेमतेम बांधली, बबनकडून आणलेले कोल्हापुरी चप्पल पायात चढवले आणि ऑफिसला जाण्यासाठी स्टेशनवर आलो.

ट्रेन यायला वेळ होता तोवर रेल्वे प्लॅटफॉर्मवरील पेपरस्टॉलजवळ उभा राहिलो. कॉलेजच्या दिवसांपासूनची ही आमची ठरलेली जागा. गरिबीमुळे वर्तमानपत्र विकत घेऊन वाचणे परवडायचं नाही म्हणून रेल्वे प्लॅटफॉर्मवरील त्या पेपरस्टॉल नजीक उभे राहून उभ्याउभ्या जमतील तितकी वर्तमानपत्रं, मासिकं फुकटात पाहून घ्यायचो. त्यावेळी तो हरामखोर पेपरवाला, हैदोस, जासूस करमचंद, प्लेबॉय, डेबोनेर सारखी मासिके धुळीने भरलेल्या काचेमागे अशी काही ठेवायचा की त्यातील विषयाचा आवाका लक्षात यायचा पण तपशीलात शिरता यायचे नाही आणि मिड-डे नावाच्या पेपरवर तर मधोमध एक बारका दगड अस्सा काही ठेवायचा की आम्हा दोघातिघां मित्रांनी एकत्र फुंकर मारली तरी तिसऱ्या पानावरील मिड-डे-मेट दिसूच नये! सांगायचा मुद्दा हा कि, या जालीम दुनियेने, आम्हा गरिबांसाठी ज्ञानाची कवाडे उघडली जाऊच नयेत म्हणून अडथळे आणण्यात कुठलीही कसर बाकी ठेवली नव्हती! प्लॅटफॉर्मवर उभ्या-उभ्या हे सर्व आठवत होतं आणि नव्या कोऱ्या कुर्त्या-पायजम्यामधे आणि करकरणाऱ्या कोल्हापुरी चपलांमध्ये मी सुखावत होतो.

इतक्यात प्लॅटफॉर्म वरील गर्दीत कुणाचा तरी धक्का बसला आणि कशी कुणास ठाऊक पण माझ्या पायजाम्याच्या नाडीची गाठ सुटली. नशीब बलवत्तर की आज हातात बॅग, टिफिन काही नव्हतं त्यामुळे भर प्लॅटफॉर्मवर होणारं वस्त्रहरण टळलं. एक डोळा गर्दीपैकी आपल्याकडे कुणी पाहतेय का यावर ठेऊन, कुणाच्या लक्षात येणार नाही अशा प्रकारे पायजाम्याच्या नाडीची गाठ बांधणे हे किती कठीण काम आहे हे ज्यांच्यावर असा बाका प्रसंग आला आहे त्याशिवाय कुणाला कळू शकणार नाही. कशीबशी गाठ बांधून झाल्यावर, आपण टायची गाठ मारून फाडफाड इंग्लिश बोलण्याइतके आंग्लाळलोही नाही आणि पायजाम्याच्या नाडीची व्यव्यस्थित गाठ मारता येण्याइतके देशीही राहिलो नाही ह्याची खंत वाटून गेली.

ट्रेन आली. मी कुर्त्या-पायजम्याला कुणाचा हात, कसला डाग लागणार नाही ह्याची शक्य तितकी काळजी घेत, पायाला जराशा सैलसर येत असलेल्या चपला सांभाळत कसाबसा ट्रेनमध्ये चढलो. गर्दीमध्ये मी जरा स्वतःला जास्तच जपत असल्याचे पाहून कुणीकुणी मुद्दामहून मला धक्के मारले. पण मी शक्यतो अशा गोष्टींवर दुर्लक्ष करतो. शब्दांची लढाई शब्दानेच लढायची हे माझं तत्व आहे. त्यामुळे समोरच्याने शिव्या दिल्या की मीही त्याला दुप्पट शिव्या देतो आणि प्रकरण हातघाईवर आलं की मी हात टेकतो.

अंधेरीला ट्रेनमधून उतरलो, बस पकडून ऑफिसला पोहोचलो. एक दिवस जरा नेहमीपेक्षा वेगळा ड्रेस घालून ऑफिसला सुखरूप पोहोचायचं म्हणजे किती दिव्य करावं लागतं? हेच दिव्य संध्याकाळी पुन्हा ऑफिसातून घरी जाताना करायचं आहे या कल्पनेनेच मला आलेल्या घामाचे ओघळ अंगावरून वाहू लागले. साला, ऑफिसमधून सुटल्यावर सूटबूट अशा पोषाखात डायरेक्ट बागेत जाऊन प्रेम करणाऱ्या जुन्या सिनेमातल्या हीरो लोकांची आठवण येऊन माझे मन त्यांच्याबद्दल अतीव आदराने भरून आले.

ऑफिसमधे आज फुल्टू फेस्टिव्हल माहौल होता. काम करायला आज कुणी सांगणार नव्हतं आणि सांगितलं तरी कुणी ऐकणार नव्हतं. सगळ्याचं इथून तिथे मिरवणे आणि मिरवणाऱ्यांवर नजर फिरवणे हेच सुरु होतं. सगळ्या नवतरुणी लेटेस्ट ट्रेण्डनुसार सजल्या होत्या. सगळ्याच खूप क्युट आणि एकसारख्या दिसत होत्या. चाळीशी ओलांडलेल्या चिरतरुण महिलांनी यथोचित आवरलेलं होतं, तरी अधूनमधून पर्समधला आरसा काढून किंवा मैत्रिणींना विचारून खातरजमा करणं सुरू होतं. कुणी कुणाला छान म्हटलं नाही तर रुसवे फुगवे होत होते. कुणी कॉम्प्लिमेंट दिली तरी तिच्याकडे संशयाने पाहिलं जात होतं. नेहमीच्या पोशाखात असलेली पुरुषमंडळी आपापल्या जागेवर बसून काम करण्याचा अभिनय करीत होती आणि माझ्यासारखी ट्रेडिशनल वेअर घालावी लागलेली मंडळी आपलं अवघडलेपण लपवत इथे तिथे फिरत होती. नेहमी बायकांच्या गराड्यात असणारे काही बिचारे पुरुष हातात डिजिटल कॅमेरा घेऊन आपल्या मैत्रिणींचे निरनिराळ्या पोझमधले फोटो काढण्याच्या ड्युटीवर तैनात होते. एकंदरीत सण समारंभाला किंवा लग्नाच्या रिसेप्शनला जो काही माहौल असतो तसा तो होता. देशभक्तीपर गाणी झाली, वंदे मातरमच्या घोषणा झाल्या, एचआर वाल्यांनी घेतलेले गेम्स झाले, गायनाच्या नावाखाली कुणी आपली रेकण्यांची हौस भागवून घेतली, एखाद-दुसरा रेकॉर्ड डान्स झाला, वात्रट जोक सांगून झाले, साग्रसंगीत जेवणं झाली आणि सगळे आपापल्या घराकडे निघालो.

अंधेरी स्टेशनवर तुम्ही कधीही जा, ते सदानकदा खचाखच भरलेलेच असते. कित्येक वेळा तर आपण प्लॅटफॉर्मवर उभे असताना पाठीमागून एखादी मुंगी येऊन आपल्याला 'एक्सक्युज मी' म्हणत पुढे जाण्यासाठी वाट मागत असल्याचा मला भास होतो. तर, मी हा असा ट्रेनची वाट पाहत उभा होतो. चर्चगेटहून एक तुडुंब भरलेली लोकल आली. नेहमी या अशाच ट्रेनमध्ये मी ढुशी मारून घुसतो पण आज नेहमीच्या सवयीचे कपडे नसल्याने आणि विशेषतः पायाला लूज येणारे कोल्हापुरी चप्पल असल्याने मी 'नंतरची ट्रेन पकडू या' असा विचार करत होतो. इतक्यात गर्दीच्या लोंढ्यासोबत मी ट्रेनमधे ढकलली गेलो. नेहमी मुंबईच्या गर्दीला शाप समजून कोसणाऱ्या आपल्याला गर्दीचा कधीकधी असा सुखद अनुभव येतो की गर्दी हेच वरदान वाटू लागते.

ट्रेनमधून उतरणाऱ्यांनी चढणाऱ्यांना आणि चढणाऱ्यांनी उतरणाऱ्यांना शिव्या द्यायची प्राथमिक औपचारिकता आटोपली, "अरे, अंदर जाव, पुरा खाली पडा है" ह्याचाही आलटून पालटून गजर झाला, गाडीने प्लॅटफॉर्म सोडला आणि नेमकं तेव्हाच मला जाणवलं की आपल्या डाव्या पायात चप्पल नाहीये. मी मागे-पुढे डोकावायचा प्रयत्न केला, खाली वाकायचा प्रयत्न करून पाहिलं, जोरात ओरडून गर्दीला विचारले पण व्यर्थ. पुढे भायंदरला गाडीतील गर्दी कमी झाल्यावर संपूर्ण डब्यात फिरून काना-कोपऱ्यात पहिले पण चप्पल काही दिसली नाही. उजव्या पायात चप्पल घालून, डोक्याला हात लावून मी दरवाज्यातच बसलो. बबनचा रागाने लालबुंद झालेला चेहरा माझ्या डोळ्यासमोर आला, मला कुठलीच वस्तू धड सांभाळता येत नाही याबद्दल आईवडिलांकडून जाहीरपणे काढले जाणारे वाभाडे मला दिसू लागले. उद्याच्या सकाळी बबनला नवीन चप्पल आणून देण्यासाठी पाच-सहाशे रुपये कुठून आणायचे या विचाराने माझे डोके गरगरू लागले. गाडी माझ्या स्टेशनला थांबली, मी उतरलो. विमनस्क अवस्थेत, एका पायात चप्पल आणि दुसरा पाय अनवाणी असाच घरी गेलो.

घडलेली गोष्ट ऐकून घेतल्यावर, मला केवळ एक मिनिटभराची सहानुभूती मिळाली आणि त्यानंतर माझ्या गलथानपणाचा शेजाऱ्यापाजाऱ्यांसमोर यथेच्छ उद्धार करण्यात आला. मला पैशाची कशी पर्वा नाही, इतरांच्या वस्तूंची कशी तमा नाही यावर प्रवचनं ऐकवण्यात आली. आपलं ठेवावं झाकून आणि इतरांचं पाहावं वाकून ही आपली संस्कृतीच असल्याने, माझी ही फजिती ऐकण्या-पाहण्यासाठी अर्धा गाव गोळा झाला होता. मी खालमानेनेच पाहिलं, त्या लोकांत बबन दिसत नव्हता.

मला जरा हायसं वाटलं. तो बहुधा उद्याच्या नाटकाची तालीम करायला गेला असावा. शेजाऱ्यांपैकी कुणीतरी 'एक चप्पल हरवल्यावर दुसरी चप्पल घरी कशासाठी घेऊन आलास?' असा वकिली पॉईंट काढला. त्यावर सगळे खो खो हसले तेव्हा माझा वेन्धळेपणा अटेस्टेड आणि नोटराईज्ड होऊन गेला. त्यातल्या त्यात एकच बरं वाटलं, सगळे मला हसत असतानाही माझी आजी मात्र आपल्या बसल्या जागेवरून माझ्याकडे आणि माझ्या उजव्या पायातील चपलेकडे शांतपणे पाहत होती. आजीसारखं कुणीतरी असं आपलं दुःख जाणणारं आहे ही भावनाच माणसाला दुःखात जगण्याचं बळ देते. दुःखात सुखाची बाब ती इतकीच!

मी झोपायला गेल्यावर माझ्या जवळ येऊन, माझ्या डोक्यावरून हात फिरवीत आजी बोलली, 'संजू बाळा, झालं गेलं विसरून जा, जे होतं ते चांगल्यासाठीच होतं'' मला माहीत आहे ती हे फक्त माझ्या मनाच्या समाधानासाठी बोलत होती. नको असणाऱ्या गोष्टी घडल्यानंतरसुद्धा जेव्हा हे असं काही म्हटलं जातं ना तेव्हा ते दुसरं तिसरं काही नसून फक्त एक 'अध्यात्मिक बर्नोल असतं हे मला ठाऊक होतं. पण त्याक्षणी मला तिच्या त्या बोलण्याचा, तिच्या त्या स्पर्शाचा खूप खूप आधार वाटला. रात्रभर झोप लागण्याचा प्रश्नच नव्हता. दुपारच्या आत बबनला त्याची हरवलेली चप्पल किंवा नवीन तसाच चपलेचा जोड कसा देता येईल हेच डोक्यात घोळत होतं.

दुसरा दिवस म्हणजे स्वातंत्र्यदिन. सार्वजनिक सुटीचा दिवस. तरीही, सकाळी लवकर उठून मी स्टेशनला गेलो, ट्रेन पकडून अंधेरीला पोहोचलो. आणि जिथून मी ट्रेनमधे चढलो तिथे प्लॅटफॉर्मवर, रेल्वे ट्रॅकमधे कुठे माझी चप्पल दिसते का शोधू लागलो. अंधेरीसारख्या वर्दळीच्या प्लॅटफॉर्म वर आदल्या दिवशी गहाळ झालेली चप्पल शोधणे म्हणजे विधानभवनात प्रामाणिक माणूस शोधण्या इतकी कठीण गोष्ट आहे. पण मी जिद्द सोडली नाही. संपूर्ण प्लॅटफॉर्म पालथा घातला. खाली उतरून ट्रॅक मधे पाहिलं. दोन ट्रॅकच्या मधे गटारात डोकावलो. तिथे मला माझ्या चपलेसारखी चप्पल दिसली. ती चिखलात पूर्णपणे माखलेली होती. दोन्ही प्लॅटफॉर्मवरून माझ्याकडे पाहणाऱ्या लोकांच्या देखत त्या चिखलात हात घालणे मला प्रशस्त वाटले नाही. मी प्लॅटफॉर्मवर बूटपॉलिश करणाऱ्या एका पोऱ्याला ती चप्पल काढून देण्याची विनवणी केली. वीस रुपयांच्या बोलीवर ती चप्पल काढून, धुवून द्यायला तो कबूल झाला. चिखलातून चप्पल काढली, धुतली आणि लक्षात आलं की, ही तर आपली चप्पल नाहीये. वीस रुपये अक्कलखाती जमा झाले.

तसाच चालत, चालत पुन्हा एकदा प्लॅटफॉर्मच्या टोकापर्यंत गेलो आणि आश्चर्य म्हणजे जिथे प्लॅटफॉर्म संपतो तिथून अवघ्या दहा-पंधरा मीटरवर माझी चप्पल पडलेली दिसली. मी जवळ जाऊन ती माझीच चप्पल असल्याची खात्री केली. चप्पल माझीच होती. पण त्यावर ट्रेनमधून जाणाऱ्या कुणीतरी उलटी केलेली होती. पुन्हा त्या बूटपॉलिशवाल्याला बोलावले, तीस रुपयांचा सौदा झाला. त्या पोराने ती चप्पल स्वच्छ धुवून प्लॅस्टिकच्या पिशवीत घालून दिली. मी चप्पल घेऊन ट्रेनने घरी निघालो.

प्रसंग कितीही गंभीर असला, कितीही ओरडा खाल्ला, कितीही बावचळलो तरीही शांत डोक्याने विचार करण्याची माझी वृत्ती आज कामी आली होती. ज्या चपलेच्या नवीन जोडासाठी पाच-सहाशे रुपये सहज गेले असते, ते केवळ पन्नास रुपयांवर निभावलं होतं. माझा मलाच अभिमान वाटला.

स्टेशनवर उतरलो. चालतच घरी जात होतो. गावात शिरताच, आपल्या घराच्या ओटीवर उभा असलेला बबन दिसला. "पाच मिनिटात तुझी चप्पल घेऊन येतो रे" असं लांबूनच ओरडून मी त्याला सांगितलं. घरी पोहोचलो. जिन्याखाली डोकावलो. उजव्या पायाची चप्पल तिथे दिसत नव्हती. कुणी उचलून ठेवली असेल म्हणून आईला विचारलं, बाबांना विचारलं. त्यांना कुणाला काहीच कल्पना नव्हती. आम्ही तिघेही घरभर फिरून उजव्या पायाची चप्पल शोधू लागलो. आजी परसदारच्या दरवाज्यातून घरात येताना दिसली, तिला विचारले 'माझी चप्पल कुठे पाहिलीस का?"

ती म्हणाली, अरे काल तू एकच चप्पल घेऊन आलास तेव्हा सगळे तुला हसले पण मी नाही हसले. कुठलीच वस्तू टाकाऊ नसते रे. मी मनात म्हटले माझ्या नातवाने इतक्या दुरून जपून आणलेली ही चप्पल मी अशीच वाया जाऊ देणार नाही. अरे, आपल्या परसातल्या पपईच्या रोपांना जाणाऱ्या-येणाऱ्यांची दृष्ट लागते, चांगलं फळ धरत नाही ना, म्हणून मी त्या चामड्याच्या चपलेचे विळीने मधोमध कापून दोन तुकडे केले आणि दोन्ही पपईच्या रोपांना बांधले. आता बघच पुढच्या हंगामात आपल्या पपईच्या रोपांना कसं फळ धरते ते!

(पूर्वप्रसिद्धी: आवाज दिवाळी अंक-२०२०)

# अपकार की उपकार

• संदीप राऊत, वसई (9158948200)

'भिकारचोर' या शब्दानेच मी लेखाची सुरूवात करणार आहे. हा शब्दप्रयोग मी भिकारचोर-चीन साठी वापरला आहे. येनकेन प्रकारेण हा चिनी ड्रॅगन आज कोण्याच्याही घरात शिरू लागला आहे. प्रश्न केवळ 'कोव्हिड-१९' आणि त्यातून उद्भवलेला करोना व्हायरसचा नाही. कारण या साऱ्या प्रकारातून होणारे साईड ईफेक्ट्स कित्येक पटीने धोक्याचे ठरणार आहेत. हे मी सांगत नाही, जगभरातील संशोधक आणि शास्त्रज्ञ या डेन्जरस् साईड इफेक्ट्स वर मात करण्याच्या कामाला लागले आहेत. आपण सारेच त्यांच्या यशासाठी प्रार्थना करूया. देवाचा शब्द घेऊनच माणूस रोजची मार्गक्रमणा करीत असतो म्हणून आशावाद शिल्लक आहे.

'करोनाने आम्हाला काय दिलं' असा निबंध कदाचित येणाऱ्या पिढीतील विद्यार्थ्यांना लिहायला सांगितला जाईल. म्हणूनच वरील शिर्षकाचा हा लेख सादर. मुळात कोणत्याही अनिष्ट गोष्टीचे स्वागत, आपण सैतानाचे स्वागत करतो तसेच करायला हवे. कारण उभ्याने येणारा सैतान आडवा होऊनच जातो असे प्राचिन ईतिहासाचे दाखले आहेत. करोनाच्या महामारीने जगभरात अनेक स्तरांवर मानवी जीवनात विपरीत स्थित्यंतरे घडवली आहेत. त्यातुन सावरण्याचा उपाय अजूनही कुणाला सुचत नाही. इंडस्ट्री जवळपास झोपली आहे. उद्योगावर अवलंबुन असलेली कर्मचारी कामगार मंडळी देशोधडीला लागली आहे. त्यामुळे केवळ कामगार मंडळीच नाही तर त्यामुळे अर्थव्यवस्थाही दुबळी झाली आहे. उदाहरणच द्यायचं तर महाराष्ट्र राज्याच्या विक्रिकर विभागात (म्हणजे सध्याच्या जी.एस.टी.) महसुलासाठी साधारणपणे एक हजार कोटीचे उदिष्ट होते ते चार-पाच महिन्यापुर्वी पाचशे कोटींवर आलं होतं. त्यातून निभावण्यासाठी शासनाला लोकांच्या घरात दारू ओतावी लागली, म्हणजेच दारूची दुकाने खुली करावी लागली कारण, लिकर, हॉटेल म्हणजेच शासनाला करमणूक करातून चाळीस टक्के महसुल मिळतो. तो तीन-चार महिने पूर्णपणे ठप्प झाला होता.

शासनाच्या या निर्णयावर अनेकांनी म्हणजेच जबाबदार (अपवादाने) प्रसिद्धीमाध्यमांपासून, फालतू समाजमाध्यमे आणि फेसबुक, व्हाट्सएपवेड्यांपर्यंत साऱ्यांनीच आपलं तत्वज्ञान प्रसवलं होतं. परंतु शासनाचे निर्णय हे लोकाभिमुख आणि लोकहितैशिच असतात. त्यामुळे अशा परिस्थितीत सर्वसामान्य माणसाने उगीच उत्साहीत न होता जबाबदारीने वागणे हेच श्रेयस्कर आहे.

जागतीक स्थरावर चीनच्या या अघोरीपणाचे दुष्परिणाम भविष्यात किती विदारक घेणार आहेत याचा विचार व्हाट्सएप, फेसबुक वाल्यांना करता येणार नाही, कारण चीन स्वत:ला बलाढ्य आणि जगाचा फौजदार होण्यासाठी हे सारं करित आहे हे या बावळटांना कळणार नाही. शतकातून दोन-तीनदा उद्भवणा-या अशा संकटे आणि महामारीतून प्रत्येकवेळी माणुस काही ना काही शिकत आला आहे. पहिल्या आणि दुस-या महायुद्धानंतर जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले. त्याला काही अशी यशही आले. परंतु काही अतिरेकी देशांना आणि ते चालवणा-या प्रमुखांना आपली अतिरेकी खुमखुमी अजून शाबुत ठेवायची आहे. पाकिस्तान, चीन, उत्तर कोरिया अशा काही देशांचा मेद अजुन वितळला नाही. मार्टिन लुथर किंग, जॉन केनेडी, नेल्सन मंडेला, महात्मा गांधी, दलाई लामा ईत्यादि धुरिणांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी आपले रक्त सांडले. त्या लोकांची अत्रास आज ठेवली जात नाही हे जगाचं सध्या मोठं दुख आहे. भारताबद्दल बोलायचं झालं तर असं म्हणता येईल की भारतातील प्रत्येक नागरीकांची आपली स्वतंत्र राज्यघटना असते (अपवाद सोडून) या साऱ्याच पार्श्वभूमीवर आता काही महत्वाच्या स्थित्यंतरांना आपल्याला स्विकारावं लागेल. एकूणच जिवनशैली बदलावी लागेल.

अनेक देशांनी आपल्या दुर्बल झालेल्या अर्थव्यवस्थेला सुधरविण्यासाठी काही सर्वांनाच काही कठोर निर्णय घेण्यास सुरूवात केली आहे. यंत्रणेचा हा निर्णय आता सर्वांनाच स्विकारावा लागेल कारण नामदेव ढसाळांनी आपल्या कवितेत म्हटल्याप्रमाणे सगळं भस्म होऊ दे, त्यानंतर येणारं आधी सुपीक जमीनीतून येईल. (आपण आपल्याकडे पावसाळयाच्या आधी शेतावर राब करतो म्हणजे जमीनीला शेताला भाजून काढतो. पूर्वी आपल्याकडे देवी, कॉलरा, मुलींच्या डोक्यात जास्त ऊवा, ढेणे झाल्यानंतर उद्भवणारा खर्जेचा त्रास, त्याचप्रमाणे गजकर्ण म्हणजे विशेषत: स्त्रि-पुरूषांच्या खाजगी भागात अस्वच्छतेमुळे, ओलसरपणामूळे खाज येऊन होणारा त्रास त्याला गजकरणं ग्रामिण भाषेत गसकरण का म्हणतात हे मला अजून कळलेलं नाही. हत्तीच्या कानाच्या या त्रासाशी काही

संबंध आहे का, असेल का त्याचा शोध माझा सध्या चालू आहे. त्यानंतर आणखी एका व्याधी त्रासाचा मला इथे उल्लेख करावा करावा लागेल. तो आता कायमचा विस्मृतीत गेलेल्या शारीरिक त्रासाचा तो टेपवर्म म्हणजे ‘नारू’ या त्रासाचा नारू हा जंतु माणसाच्या तळपायाच्या वर पाच-सहा इंचभरात शिरून वास्तव्य करतो. विहिरीत पोहतांना पूर्वी किंवा बायका तलावात कपडे धुवतांना हा जंतु पायामध्ये (भिजलेल्या) शिरकाव करतो. नारूला बाहेर काढण्यासाठी त्याला सुई सारख्या काडीने गुंडाळून-गुंडाळून बाहेर काढावे लागते. मी लहानपणी हे सारं अनुभवलं आहे. हत्तीरोग म्हणजे एलिकॅन्टाइटिस या व्याधीचेही निर्मुलन सध्या होण्याच्या मार्गावर आहे. असे अनेक रोग, व्याधी आपण म्हणजे संशोधकांनी पिटाळून लावले आहेत.

तर, आपण कोव्हीड-१९ म्हणजेच करोना विषाणुचा बाऊ किती करायचा ते आता ठरविले पाहिजे. कारण यंदा दिवाळीत आपण (म्हणजे आपण नव्हे, काही मुर्खांनी) इलेक्ट्रीक तोरणे लावलीच चीनची. अर्थात याला कारण सरकारचे धोरण. ते असं आहे की, “लाख मेले चालतील पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे. या वाक्याचा बदल मी असा करीन की, ‘पोशींदे अनेक येतील, त्याची काळजी करू नका, लाख जगले पाहिजेत”. वर मी काही रोगांचा उल्लेख सध्याच्या करोनाच्या संदर्भात वेगळया कारणासाठी केला आहे. कुठल्याही आपत्तीला घाबरून न जाता काळजी घेऊन सामोरे जायला हवे. मुंबईतील इतिहासात ‘काळया अक्षरात’ कोरल्या गेलेल्या गिरणी संपाबाबत असेच म्हणता येईल. या संपाने मुंबईतील मराठी संस्कृती लयाला जाण्याची सुरूवात करून दिली. मुंबईत त्याकाळी जेव्हा १९२५ साली कापडगिरण्या सुरू झाल्या तेव्हापासून कोकणातील मराठी माणसं मुंबईकडे येऊ लागली तेव्हापासुन त्यांच्यासाठी ‘चाकरमानी’ हा शब्द रूढ झाला. या चाकरमान्यांमध्ये केवळ कामगार, घरगडी, अशा निम्न स्थरातील लोक नव्हते. या चाकरमान्यामधूनच मुंबईत कामगार रंगभूमी जी गिरणीकामगरांनी उभी केली आणि त्यातून अनेक दर्जेदार रंगभूमी कलाकार तयार झाले, ती नष्ट झाली. कोकणातून मुंबईत स्थायिक झालेले अनेक कुटुंबांनी मुंबईत येऊन, गावस्कर, वेंगसरकर, तेंडुलकर, मांजरेकर, शिवलकर, सरदेसाई (हे गोव्यातले) असे अनेक रत्ने दिली. हे सारं विस्ताराने सांगण्याचं कारण असं की, सुरूवातीला म्हटल्याप्रमाणे काळाच्या ठरावीक टप्प्यानंतर सुदैवाने किंवा दुर्दैवाने काही स्थित्यांतर काळच घडवून आणतो.

इंग्लंडमधील उद्योगक्रांती, रशियन राज्यक्रांती, भारतातील हरितक्रांती, ऑपरेशन फ्लड म्हणजेच दुग्धक्रांती आणि अलिकडच्या काळातील राजीव गांधींनी जगासोबत चालून आपल्या द्रष्टेपणातून प्रसिद्ध तंत्रविशारद सॅम पित्रोदा यांना घेऊन १९९०-९१ साली केलेली 'दळण-वळण क्रांती'.

या साऱ्या संदर्भसुचीतून मला एक गोष्ट सांगायची आहे ती ही की, कोणत्याही आपत्तीला घाबरून न जाता त्या संकटाचे आपल्या दैनंदिन जीवनात आपण चांगल्या अर्थाने चांगले कसे करता येईल याचा सकारात्मक विचार केला पाहिजे. जसं महात्मा गांधीजींनी म्हटले आहे की, "we must find our Peace among this turmoil" त्याप्रमाणे सकारात्मक होऊनच आपण याही पॅनडेमिककडे पाहिले पाहिजे. नुकत्याच आलेल्या बातमीनुसार आता कोरोनावर लस उपलब्ध होणार आहे. ही आशादायक गोष्ट आहे. त्यामुळे हा लेख पुर्ण करतानाच मी असं म्हणेन की आलेली संकटे आपल्यासोबत त्याकडे उपायही घेऊन येतात. शास्त्रज्ञ संशोधकांना त्यांच्या बुद्धीकौशल्याच्या प्रतिमेचे घुमारे फुटतात.

"यदा यदा हि धर्मस्थ ग्लानिर्भवति भारत |

अभ्युत्थानमधर्मस्थ तदात्मानं सृजाम्यहम् ||

परित्राणाय साधुनां विनाशाय च दृष्कृताम् |

धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे ||"

या वैश्विक सत्य आणि उक्तीनुसार अधर्मकारण्याचा नि:पात करण्यासाठी कृष्ण जन्म घेतो. तद्वत अविचारी लोकांना सुधरविण्यासाठी आणि उपदेश करण्यासाठी येशु ख्रिस्त जन्म घेतो, प्रेम, शांतीचा संदेश घेऊन तो जगाचा वाटाड्या बनतो. गौतम बुद्ध शांतीचा प्रसार करतात, प्रेषित मोहम्मद पैगंबर देखील भाईचाराचा संदेश देवात, वर्धमान महावीर, गुरू नानक हे सारेच संत-सज्जन मानवधर्माला प्रेमाने आणि शांततेने जगण्याचा मुलमंत्र देतात. म्हणुनच कालातीत मानवजमात या विभुतींची आठवण आपल्या हृदयात आणि सणासुदीच्या निमित्ताने नेहमीच ठेवत असतात. यंदाच्या नाताळातही ख्रिस्तजन्माची सुवार्ता आपल्याला मिळाली आहे. मग य:कश्चित विषाणूला घाबरायचे कशासाठी ? ख्रिस्त आपल्या सोबत आहे. सर्वांनाच नाताळच्या व नववर्षाच्या मनापासून शुभेच्छा. इति...

# आनंदी राहण्याचे व शांती, समाधान अनुभवण्याचे एकमेव सुत्र – स्वत:च्या विवेकाने जगणे.

■ अतुल आल्मेडा – ९६७३८८१९८२

शीर्षक सोपं आहे तेवढं जगणं नक्कीच सोपं नाही, पण प्रयत्न करायला काहीच हरकत नसावी. त्यामुळे तोटा नक्कीच नाही. मात्र मनावर घेतलं तर फायदा जरुर आहे. प्रश्न आहे तो मनावर घेण्याचे, मनावर घेण्यासाठी मनाला पटायला हवं, भिडायला हवं, त्यासाठी वाचून झाल्यावर चितंनाची गरज आहे. कारण गरज ही शोधाची जननी आहे. "Need is mother of invention."

मी मनुष्य आहे म्हणजे कोण आहे? या निसर्गात विविध प्राणी होते. आजही आहेत. तसाच एक प्राणी आहे पण मी विचार करणारा प्राणी आहे. एवढेच नव्हे, तर मी विचारावर विचार करणारा प्राणी आहे. निसर्गात मनुष्य इतर प्राण्याप्रमाणे स्वतंत्र आहे. इथे सर्वांना आपल्या इच्छेप्रमाणे, मुक्तपणे आनंदाने जगण्याचे स्वातंत्र्य आहे. पण मानवाने आपल्याभोवती नियमाचं, सामाजिक बंधनाचं **आणि** धर्माचं बंधन घालून जखडून ठेवलं आहे. बंधन श्रेष्ठ? की स्वातंत्र्य ? विचार करुया.

मनुष्य सुधारलेला (Civilized) प्राणी आहे. मी मुळात एक स्वतंत्र्य मनुष्य आहे. मग मला आस्तिक, नास्तिक, अज्ञेयवादी हे लेबल येते कोठून? मी हिंदू, मी ख्रिस्ती, मी मुस्लीम, मी बौध्द हे ठरविले कुणी? हे ठरविताना माझ्या स्वतंत्र मनाचा विचार कूणी केला का? मला चिकटविलेले हे लेबल बरोबर की चूक? या बाबतीत मी स्वतंत्रपणे निपक्षपातीपणे चिंतन करणार नाही का? मी स्वतंत्र म्हणजे माझ्यावर माझे राज्य हवे. मी स्वराज्यवादी आहे म्हणजे रुल ऑफ द सेल्फ हे आपण सर्वच जाणतो. आपल्या सर्वांची आवडती हीच व्याख्या आहे. आपलं राज्य सर्वांनाच आवडणारं, इथे दुमत नसणारं, परंतू महात्मा गांधी सांगतात "Swarajya is not rule of self but rule on self." मला स्वत:वर, स्वत:च्या मनावर, वासनावर, वर्तनावर नियंत्रण ठेवता आले पाहिजे.

हे माझं स्वराज्य, मला हवे की नको? मी खिस्ती का? तर माझा जन्म खिस्ती कुटुंबात झाला आहे. पण मी जन्माने खिस्ती नव्हतो. मला स्नानसंस्कार देऊन खिस्ती करण्यात आले. मला खिस्ताची काही शिकवणूक, तत्व पटले म्हणून मी खिस्ती नाही, तर मला न विचारता माझ्या नकळत मला खिस्ती केले गेलं, आज मी खिस्तसभेच्या किंवा खिस्ती धर्माच्या कुठल्याही परंपरा पाळत नाही. कर्मकांड करत नाही. तरी मी मनापासून आणि वर्तणूकीने खिस्ती होण्याचा प्रयत्न करत आहे. कारण खिस्ताचे तत्वज्ञान किंवा महान आज्ञा "स्वतःवर प्रेम करतो तसे शेजा-यावर प्रेम करा" ही मला भावते. विनोबा सांगतात, हिंदू हा संस्कृतमधला मूळ शब्द नाही. अरब भारतात आले, तेव्हा त्यांनी सिंध नदीच्या काठावर राहणा-या समाजाला हिंदू म्हटलं. भौगोलिकदृष्टया सिंध नदीच्या परिसरात राहणारे ते हिंदू. या अर्थाने मी हिंदू आहे. शिवाय विनोबाचे पुढे असे सांगणे आहे की 'हिंसया दुयते चिंतम', हिंसेने ज्याच्या ऋदयाला चित्ताला दुःख होते, तो हिंदू. या विवेचनानूसार मी हिंदू आहे. कारण हिंसेने मला दुःख होते. जरी मी हिंदू असलो, खिस्ती असलो तरी मी देव मानत नाही. देव नाकारणारा बुध्द माझा मार्गदर्शक आहे. म्हणून मी बुध्दही आहे. इस्लाम (मुस्लीम) धर्माची शिकवणूक समतेची आहे. तशीच त्या धर्माची एक आज्ञा अशी आहे की, "तुझ्या गावात कुणी उपाशी नाही, याची खात्री करुन घेऊन मगच तू जेव" ही आज्ञा पाळणे मला मोलाचे वाटते. त्यामुळे मी मुस्लीमही आहे. इतरही जागतिक धर्माच्या आज्ञा मनुष्य हा केंद्र समजून सांगितलेल्या आहेत. एका वाक्यात, मनुष्य धर्मासाठी नाही, धर्म मनुष्यासाठी आहे हे सर्व धर्म सांगतात. सर्व धर्माची निर्मीती मनुष्याला माणूस बनविण्यासाठी आहे. नैतिकता पाळण्यासाठी झाली आहे. पण कवयीत्री बहिणाबाई खेद व्यक्त करुन म्हणतात "माणसा कधी होशील रे तू माणूस ."

मनुष्य जन्माला येतो तो स्वातंत्र्य असतो. त्याची वाढ निसर्गातल्या उत्पतीत असलेल्या घटकाच्या वातावरणात होते. ज्या श्वासावर तो जगतो त्या श्वासासाठी लागणारी हवा निधर्मी आहे. त्याच्या संवर्धनासाठी लागणारा सुर्यप्रकाश निधर्मी आहे. त्याच्या वाढीसाठी लागणारे आवश्यक असलेल पाणी निधर्मी आहे. ज्या खांदयावर त्यांचे पालनपोषण होते, ते सर्व धान्य निधर्मी आहे. एवढेच नव्हे तर मनुष्याच्या सर्व भावना उदा. तहान, भूक, गरजा, निधर्मी आहेत. सर्वात म्हणजे सर्व मनुष्याचे रक्त एका लाल रंगाचे आहे. जात, धर्म, राष्ट्र, सीमा ओलांडून हे उपयोगी येते. त्या धर्मावर अवलंबून नाहीत. म्हणूनच मनुष्याला माणुस होणारी बंधन घालणा-या घटकांचा व बाबीचा विचार होणे

आवश्यक आहे. “Man is born free yet everywhere he is in chin”- Jean J. Rousseau.

**महत्वाचं बंधन धर्माचं** : देव धर्माच्या बाबतीत महात्मे काय म्हणतात ते वाचा –

१) ज्या गाईच्या नावाने आपल्या देशात राजकीय स्वार्थासाठी दुही माजवली जात आहे, त्या गायीविषयी स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात ‘गाय ही माता असलीच तर बैलाची, माणसासाठी तो एक उपयुक्त असा पशू आहे. उपयोगी घोडा व इमानी कुत्रा या रागेंतच गाईला बसवावे लागेल.’

२) ख्रिस्त सांगतो, स्वर्गाचे राज्य तुमच्या अंतरंगात आहे (वेगळं स्वर्गीय राज्य नाही)

३) सॉक्रेटीस सांगतो ‘Know thy self’ तूम्ही स्वतःला ओळखा हाच तुमचा धर्म.

४) धर्म याचा अर्थ जगातील वास्तव स्वरुपाचा अंत:प्रेरणेने घेतलेला वेध, त्याला दर्शन किंवा अनुभूती असं म्हणतात. थोर तत्वज्ञ डॉ. राधाकृष्णान सर्वपल्ली.

५) खलिल जिब्रान म्हणतात- ‘अध्यात्म ईश्वराची उपासना फक्त मंदिरातच करायची असं नव्हे ती दैनंदिन जीवनातील सर्व व्यवहारामध्ये व्यक्त होणं आवश्यक ठरतं.’ दुस-या एका प्रसंगी खलिल जिब्रान सांगतात ‘तुमच्या अंतकरणात तुम्ही ईश्वर म्हणजे विवेकबुध्दी हे शब्द कोरुन ठेवा.’

६) गुरुदेव रविंद्रनाथ टागोर म्हणतात ‘या चराचर सृष्टीमध्ये ईश्वर भरुन राहिला आहे. म्हणून तू त्यागी वृत्तीनं जगून जीवनाचा आनंद घे. लोकांच्या धनसंपत्तीबद्दल तू आसक्तीची भावना ठेवू नको. आपण स्वतःला ओळखलं पाहिजे त्याचप्रमाणे दुस-यांना आपली खरी ओळख पटली पाहिजे.’

७) ईश्वर भक्ताला उद्देशून म्हणतात, ‘अरे तू मला कुठे शोधतोस? मी मंदिरात नाही, मशीदीमध्येही नाही, मी कैलास पर्वतावर नाही, मी कोणत्याही धार्मिक उत्सावात सहभागी नाही अरे तू मला एका क्षणात पाहू शकशील. कबीर म्हणतात सांधूनो, ‘सर्व श्वासातील श्वास ईश्वर.’

८) त्याला धरुन कवयीत्री बहिणाबाई म्हणते ‘जीवन मरण एका श्वासाचं अंतर, श्वास संपला की जीवन सपलं.’

९) स्वामी विवेकानंद सांगतातः देव नावाची कोणतीही गोष्ट नाही अगदी नास्तिक झालात तरी चालेल परंतू अंधश्रध्दा ठेवणारे मूर्ख होऊ नका. पुरोहितांनी दिलेल्या पूजेच्या पध्दती म्हणजे लोकांवर वर्चस्व गाजविण्याचे त्यांचे एक साधन असते.

१०) जॉन व्हीलर, या शास्त्रज्ञाच्या मते 'माणसाची जागृत विवेक बुध्दी म्हणजेच परमेश्वर.'

११) लॅसिक शस्त्रक्रियेचा शोध लावणारे आधुनिक भारतीय शास्त्रज्ञ मनी भौमिक म्हणतातः 'परमेश्वर म्हणजेच सर्वव्यापी असलेल वैश्वीक मन.'

१२) समोरचा माूस माझ्या सारखाच वैश्विक माणूस आहे म्हणजे तो माझा भाऊ, विश्वची माझे घर, ही भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. जगाला ती मार्गदर्शक आहे.

"Knowing others is intelligence, knowing yourself is true wisdom" : Laozi

ईषा, लालासा, लोभ ,द्वेष ,सत्ता आणि संपत्ती या खोटया आमिषाला बळी पडून मनुष्य आज धर्माच्या राष्ट्राच्या जातीच्या संस्कृतीच्या खोटया अस्मितेसाठी, मनुष्याचे खून पाडत आहे. कत्तल करीत आहे. ही सुधारलेल्या (Civilized man) मनुष्याच्या जीवनाची शोकांतिका आहे. जेव्हा एक माणूस दुस-याला मारतो, तेव्हा तो खूनी ठरतो. न्यायाधिश खुनीला फाशीची शिक्षा देतो त्या खुन्याचा जीवन घेतो, तो न्यायधीश ठरतो. निर्मीतीत परमेश्वर एक असेल तर त्याच्या लेकरात भेद का ?

सत्य हे आहे की सुखाने, आनंदाने जगण्यासाठी व शांतीने मृत्यूला सामोरे जाण्यासाठी प्रेम या एकाच गोष्टीची आवश्यकता आहे. **'दि क्लॅश ऑफ सिवीलायाझेशन्स'** हे पुस्तक १९९६ मध्ये हावर्ड विद्यापीठातला प्रोफेसर सॅम्यूअल हंटिग्टन यांने लिहिले आहे. त्यांनी इतिहास तपासून असा निष्कर्ष काढला आहे की, यापुढे जगातले संघर्ष हे सांस्कृतिक मुददयावर होतील. यांत, भाषा, धर्म, वंश, राष्ट्रीयत्वाच्या अस्मिता यामुळे होतील. हे संघर्ष देशामध्ये नाही, तर वेगवेगळया संस्कृतीमध्ये होतील.' मी माझ्या जीवनात कुठली अस्मिता घेऊन पुढे जाणार हा चिंतनाचा प्रश्न आहे. जर मी शांतीचा उपासक असेल, तर माझी अस्मिता फक्त मानवतावादी असेल, तिथे धर्माला संस्कृतीला, राष्ट्राला स्थान नसेल. जय महाराष्ट्र, जय हिंद नव्हे तर जय जगत ही घोषणा हवी.

स्वतंत्र या शब्दाचा अर्थच मूळी (स्वःतंत्राने) वागणे बोलणे, विचार करणे कृती करणे आणि हे स्वतंत्र्य मला आहे तसेच समोरच्या माणसाला आहे. हे मनोमन कबूल करणे. या स्वतंत्राला बंधन फक्त विवेकचं.

# ...१२ सेकंदाचा कॉल

• सुहास बिऱ्हाडे

(गुन्हा करताना गुन्हेगार खूप सावधगिरी बाळगतात. एकही पुरावा मागे सोडत नाही. पण तरीही पोलीस तर्क, अनुभव आणि तांत्रिक उपकरणाच्या सहाय्याने कठिणात कठीण गुन्ह्याची उकल करत असतात. वसईत कुरियर कंपनीचे कर्मचारी बनून आलेल्या टोळीने एका घरात ४० लाखांचा दरोडा घातला होता. आरोपींनी कसलाच माग मागे ठेवला नव्हता. पण पोलिसांनी कचऱ्यात सापडलेला एक बॉक्स आणि १२ सेकंदाचा कॉल यावरून या क्लिष्ट अवघ्या दहा दिवसात गुन्ह्याची उकल केली....)

वसई पुर्वेच्या एव्हरशाईन सिटी मधील स्काय हाईट या इमारतीत कमल अरोरा (७२) यांचा आलिशान फ्लॅट होता. अरोरा हे शेअर बाजाराच्या व्यवसायात होते. त्यामुळे आर्थिक परिस्थिती उत्तम होती. घरात काम करण्यासाठी त्यांनी डॉली नावाची मोलकरणी ठेवली होती. २२ ऑगस्ट २०१७. इमारतीच्या परिसरात दुपारच्या वेळी तुरळक गर्दी होती. अरोरा आणि त्यांच्या पत्नी कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यांच्या घरात त्यांची जुनी मोलकरणी डॉली चंद्रबन्सी (३५) ही घरात दोघे होते.

दुपारी सव्वाचारच्या सुमारास दाराची बेल वाजली. डॉलीने की होल मधून पाहिले. एक टोपी घातलेला तरूण हातात एक बॉक्स घेऊन उभा होता. कुरियर वाला असावा असं तिला वाटलं आणि तिने दार उघडलं. परंतु तिने दाराची सेफ्टी चेन लावली होती. दारात उभा असलेला तरुण म्हणाला,

'मॅडम, कुरियर कंपनीसे आया हू. अरोरा साहब का पार्सल है'

डॉलीने पार्सल घेण्यासाठी दाराची सेफ्टी चेन काढली..

ती बॉक्स घेऊन आत वळणार तेवढ्यात तो तरुण म्हणाला, "मॅडम एक ग्लास पानी मिलेगा"

"जी जरूर"

डॉली आत वळताच... दाराच्या मागे लपून बसलेले तिघे जण आले आणि त्यांनी डॉलीला ढकलत आत प्रवेश केला. चौघा अनोळखी लोकांना अशापध्दतीने घरात शिरलेलं पाहून डॉली घाबरली. एकाचा हातात तळपता सुरा होता. तिच्या तोंडून शब्दच फुटेना. पुढे काय वाढून ठेवलं आहे, याची तिला कल्पना आहे.

त्या चौघाजणांनी डॉलीला खुर्चीत बसवून तिला बांधले. तिला गप्प राहण्याशिवाय पर्याय नव्हता. त्या चौघाजणांनी कपाटातील १३ लाख रुपयांची रोकड २० तोळे सोने असा सुमारे ४० लाख रुपयांचा ऐवज लुटून पळ काढला.

घरात अन्य ठिकाणी त्यांनी शोधाशोध केली नाही. ज्या सहजनेने ते घरात शिरले होते तेवढ्या सहजतेने ते घरातून निघून गेले. संध्याकाळी अरोरा दांपत्य घरात आले तेव्हा डॉलीची सुटका झाली. दिवसाढवळ्या झालेल्या या चोरीने खळबळ उडाली होती. नालासोपारा पुर्वेच्या तुळीज पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.

आरोपींनी चोरी करण्यासाठी व्यवस्थित प्लॅन आखला होता. कारण या इमारतीमध्ये असलेल्या सीसीटीव्हीची जोडणी आधीच कापली होती.. अरोरा दांपत्याकडे विचारपूस केली पण काहीच सुगावा मिळत नव्हता. अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या अभिलेखावरील सराईत गुन्हेगारही तपासून पाहिले. पण काही निष्पन्न होत नव्हतं. अतिरिक्त पोलीस अधीक्षक रोशन राजतिलक, उपअधीक्षक दत्ता तोटेवाड यांनी तुळींज पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राकेश साखरकर यांच्याकडे या आव्हानात्मक दरोड्याचा तपास सोपवला. कसलाच दुवा नसताना गुन्ह्याची उकल करण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले होते.

पोलिसांनी सर्व शक्यता तपासायला सुरवात केली. डॉलीने तर हा बनाव रचला नसेल ना या दृष्टीने देखील तपास केला. मात्र डॉलीच्या चौकशीतून काही निष्पन्न झाले नाही. ती खरं बोलत असल्याची पोलिसांची खात्री पटली. शिवाय ती जुनी आणि विश्वासातील असल्याचे अरोरा यांनी पोलिसांना सांगितले होते.

साखरकर यांनी गुन्ह्याचा पंचनामा करताना गोळा केलेल्या वस्तू पुन्हा तपासल्या. आरोपींनी कुरियर कंपनीचे कर्मचारी असल्याचा बहाणा केला होता आणि गिफ्ट पार्सल देण्याच्या निमित्ताने घरात शिरले होते.

पोलिसांनी ते पार्सल तपासले. त्या पार्सल मध्ये कचरा होता. त्यात प्लॅस्टीकचे धागे, वर्तमानपत्रांचे कागदाचे बोळे होते. त्या कचऱ्यात पोलिसांना लॉरियल पॅरीस या सौंदर्यप्रसाधन कंपनीचा छोटा खोका सापडला. हा खोका गुन्हेगारांपर्यंत पोहोचवू शकेल असा विश्वास पोलिसाना वाटू लागला. पण हे काम देखील काही सोप्पं नव्हतं.

पोलिसांनी लॉरियल पॅरिस कंपनीला गाठून काही सुगावा मिळतो का त्याचा प्रयत्न करायचं ठरवलं. पोलिसांनी कंपनीचं लोअर परेल येथील मुख्यालय गाठलं. तो बॉक्स कंपनीचाच होता. कंपनीतून पोलिसांना एक धागा मिळाला. त्या बॉक्सवर एक बारकोड होता. कंपनीतून तयार होणारा माल विविध वितरकांकडे जातो. तेथून तो शहराच्या विविध भागातील किरकोळ विक्रेत्यांना वितरीत केला जातो.

बारकोड तपासून कंपनीने पोलिसांना मुख्य वितरकचा पत्ता दिला. पोलिसांचा तपास योग्य दिशेने सुरू होता. मुख्य वितरकाने पुन्हा बारकोड तपासून हा खोका असलेल्या मालाची डिलिव्हरी वसईच्या बॉम्बे कलेक्शन या दुकानात दिल्याचे सांगितले. पोलीस गुन्हा उकलण्याच्या जवळ येत होते. पण खरे आव्हान पुढे होते.

वसई पुर्वेच्या ब्रॉडवे सिनेमागृहाजवळील बॉम्बे कलेक्शन या दुकानात पोलीस पोहोचले. याच परिसरात फिर्यादी कमल अरोरा रहात होते. दुकानातील कर्मचाऱ्यांना पोलिसांनी बॉक्स दाखवून कोण हा बॉक्स घ्यायला आले होते ते विचारले. पण दुकानातील कर्मचा-यांना काही आठवेना.

मग पोलिसांनी २२ ऑगस्टच्या दिवसाचे सीसीटीव्ही तपासले. दोन तरूण त्या दिवशी दुकानात आले होते. त्यापैकी एकाने रिकामा बॉक्स मागितला होता. मित्राचं लग्न आहे आणि त्याची मस्करी करण्यासाठी रिकामा बॉक्स गिफ्ट पॅक करून द्या असे त्यांनी सांगितल होते.. नुकताच दुकानात माल आला होता.

त्यात प्लॅस्टीकच्या पिशव्या, थर्माकोल असा कचरा होता. याच कचऱ्यात हा सौंदर्यप्रसाधनाचा रिकामा खोका होता. तो देखील कर्मचाऱ्यांनी मोठ्या खोक्यात भरला आणि पन्नास रुपयात बॉक्स गिफ्ट पॅक दिला. सीसीटीव्हीत हे दोन तरूण दिसत होते पण हे ते कोण आहेत नवा प्रश्न पोलिसांपुढे उभा राहिला.

पोलीस त्यांची ओळख पटविण्यासाठी बारकाईने सीसीटीव्ही तपासत होते. ज्यावेळी हे तरुण दुकानातून रिकामा बॉक्स पॅक करून घेत होते त्यावेळी एका तरूणाला फोन आल्याचे सीसीटीव्हीत दिसले. तो फक्त १२ सेकंद फोनवर बोलत होता. पोलिसांनी मग हा १२ सेंकदाचा फोनच गुन्हेगारांपर्यंत नेणार असल्याचा विश्वास वाटला.

पोलिसांनी लगेच त्या भागातील 'डम्प डाटा' काढला. डम्प डाटा म्हणजे परिसरातील मोबाईल टॉवरवरून किती फोन केले गेले त्याचा तपशील. त्यावेळी शेकडो कॉल्स झाले होते. मग त्यातून १२ सेकंदाचे कॉल्स कुणी कुणी केले ते तपासले. ते देखील ४ जणांनी केले होते. मग पोलिसांनी खुबीने प्रत्येक कॉलच्या व्यक्तीकडे चौकशी केली. कारण जराही संशय आला असता तर गुन्हेगार सावध झाला असता. तो १२ सेकंदाचा कॉल योगेश शेंडगे या व्यक्तीला आला होता. पोलिसांनी त्याला डोंबिवलीहून ताब्यात घेतले आणि बोलते केले. मग एकामागून एक गुन्ह्याची साखळी उलगडू लागली.

विजय अदमाने (३२) हा मुंबईतील विकासक या गुन्ह्याचा मास्टर माईंड होता. तो कमल अरोरा यांचा परिचित होता. अरोरा यांच्याकडे शेअर बाजारातून मोठी रक्कम आल्याचे त्याला समजले होते. त्यामुळे अरोरा यांच्या घरात दरोडा घालण्याची त्याने योजना बनवली. त्याने सागर सांडवे (२६) या आपल्या मित्राला ही योजना सांगितली. सागरने योगेश शेंडगे, अरूण सुगावे, पुलकित ठाकूर आणि देवंद्र सांडवे या चार बेरोजगार तरुणांना तयार केले. चौघांना प्रत्येकी २ लाख रुपये देण्याचे कबुल केले.

घटनेच्या काही दिवस आधी जाऊन सीसीटीव्हीच्या वायरीच्या जोडणी गुपचूप कापून टाकल्या होत्या. आरोपींनी योजना नियोजनबध्दरित्या बनवली होती. पण घटनेच्या दिवशी पार्सल देण्यासाठी दुकानात गेले पार्सल घेण्यासाठी गेलेल्या योगेशला विजय अदमाने याने फोन केला आणि नेमका तो सीसीटीव्हीत कैद झाला. याच १२ सेकंदाच्या कॉलने आणि कचऱ्यातील सौंदर्यप्रसाधनाच्या रिकाम्या खोक्याने सहा आरोपींना तुरुंगात पोहोचवले.

---

आपण घास असेल तेवढाच
तोंडाचा जबडा आ वासतो
पेनाने नव्हे पेन्सिलीने लिहीलेल्या
लेखनावर आपण खोडरबर घासतो

आपण आपलं चांगलं काम
चालू ठेवायचं असतं
स्वमनाला होणाऱ्या आनंदात
स्वत:च सामील व्हायचं असतं

# कोविड काळात उद्योजकीय करीअरविषयी बोलू काही...

- प्रकाश आल्मेडा

कोविडने सगळं जिवन कसं अस्ताव्यस्त केलं, आपण लहान थोर सगळेच कसे भेलकांडलो याविषयी नव्याने लिहायची गरज नाही. जगभर करोना विषाणूशी शांती प्रस्थापित करून त्यासह काही वर्षे तरी जगावे लागेल हा “न्यू नॉर्मल” आहे अशी जगभर हाकाटी सूरू आहे. या लेखात आपण “न्यू नॉर्मल” कडून “न्यू पॉसिबल” कडे जाण्याचा विचार करणार आहोत. शेवटी “लाइफ मस्ट गो ऑन”.

मात्र या डोळयांना जराही न् दिसणाऱ्या सुक्ष्म विषाणूने आपल्या अतिविशाल, प्रगत जगाच्या पाकळया आणि आधुनिक प्रगतीचे पोपडे खरवडून आपले खरे स्वरूप दर्शविले. आपण नक्की कसे आहोत त्याविषयीचा वास्तवाचा आरसा या विषाणूने आपणासमोर धरून जणू काही सगळयांना स्वतःचे नग्न स्वरूप दाखवून दिले. आपली समृद्धी, आपले सगळे सामर्थ्य, आपले ऐश्वर्य, माजमिजास यांतील फोलपणा दाखवून दिला. गरीब देशांची होरपळ पहिली तशीच महासत्तांची दुर्दशाही सचित्र पाहिली. “लाइफ इज व्हॉट हॅपन्स टू अस व्हेन वुई आर बिझी प्लानिंग फॉर सो मेनी थिंग्जस्” याचा जळजळीत प्रत्यय आला. आयुष्यात इतर कशाविषयीही “निगेटिव्ह व्हा” पण “कोविड पॉझिटिव्ह” होऊ नका असे विनोदविषादाने म्हटले गेले.

सर्वत्र गोंधळाचे वातावरण असल्याने नक्की काय करायचे याविषयी संभ्रम आहे. हा लेख लिहीत असताना अमेरिकेत एकाच दिवशी तीन हजारांहून अधिक लोकांचा करोनाने बळी घेतल्याची बातमी आहे आणि भरीला मायक्रोसॉफ्टचे बिल गेटस् जे करोनावरील लशीसाठी भरघोस मदत करीत आहेत ते बजावून सांगत आहेत की येणाऱ्या काही महिन्यात करोनाचा मोठा उद्रेक होणार आहे. लस जानेवारीपासून उपलब्ध होईल असे आशादायक वातावरण आहे. मात्र करोनाने या मानवी अरिष्टाला सामोरे जाण्यासाठी देश, धर्म जातपात, वर्ग, रंगवंश सगळे विसरून एकत्र येऊन झगडणे हाच मार्ग असल्याचे दाखवून दिले आहे. हवामान बदलासारख्या जागतिक समस्यांना सामोरे जाण्यासाठी आपण सगळे एकमानवजात म्हणूनच एकत्र यायला हवे. “मानवजात हेच आपले खरे राष्ट्रियत्त्व” या गांधीजींच्या वाक्याचा प्रत्यय आला आहे.

कोविडला एक व्यक्ती,एक कुटुंब, एक समाज, एक देश... अशा विविध स्तरांवर प्रतिसाद द्यावा लागणार आहे; नेहमीची प्रतिक्रीया नव्हे. कारण लहानापासून वृद्धांपर्यंत प्रत्येकावर विविध आघाती परिणाम झाले आहेत.

कोविडला प्रतिसाद देण्यासाठी तज्ज्ञांनी तीन धोरणे सूचविली आहेत. प्रत्येकाने (लहानांपासून मोठयांपर्यंत, लहान उद्योगापासून बहुराष्ट्रिय कंमन्यांपर्यंत, चिमुकल्या देशांपासून ते महासत्तांपर्यत) या धोरणांचा अवलंब करता येईल. या तीन खांबी धोरणानुसार प्रत्येकाने ठरवायला हवे की काय थांबवायचे (व्हॉट टू स्टॉप), काय नवे सुरू करायचे (व्हॉट टू स्टार्ट) आणि काय वाढवायचे (व्हॉट टू ॲक्सलरेट)". प्रत्येक बाबतीत काय करायचे याची विचारपूर्वक यादी तयार करता येईल आणि त्याच्या मदतीने या अरिष्टातून "न्यू पॉसिबल"च्या दिशेने जाण्यासाठी योग्य प्रतिसादाचा मार्ग शोधता येईल. योगायोगाने गेल्या ऑक्टोबरपासून मी व्हीजन इंडिया फाउन्डेशनचा "पब्लीकपॉलिसी स्टडीज आणि रिसर्च"चा कोर्स करीत असल्याने देशातील विविध उच्चस्तरीय मान्यवर तज्ज्ञांशी प्रत्यक्ष चर्चा करण्याची, त्यांच्यासह काही प्रकल्पावर काम करण्याची संधी मिळाली आणि तेवढयात करोनाचा फेरा सूरू झाला. सगळे ऑनलाइन सुरू झाले पण एखाद्या राष्ट्रिय अरिष्टाला तोंड देण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना कशी केली जाते ते जवळून पहायला, अनुभवायला मिळाले. यातूनच वर सांगितलेली त्रिसुत्री दिली आहे.

प्रत्येकाला वैयक्तिक तसेच संघटीत स्तरावर बदल करावे लागणार आहेत. या "पॅरडाइम शिफ्ट" मध्ये मुलभूत "कॉग्निटीव्ह शिफ्ट" असल्याने हे बदल तसे अवघडच असले तरिही क्रमप्राप्तच आहेत. शेवटी करोना हा एक बदल आहे आणि त्यानुसार बदलण्यातच शहाणपण आहे. आता "सर्व्हाव्हल ऑफ द फिटेस्ट नसून सर्व्हायव्हल ऑफ दोज हू व्हील चेंज ॲण्ड अडॉप्ट" असे सुत्र असणार आहे. सेनादलाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने बोलताना एका वाक्यात स्पष्ट केले "इट इझ डेंजरस टू फिल टू सेफ !" क्षणभर मनात विचार आला "माथेफिरू, कडव्या दहशतवाद्यांच्या हाती करोनासारखा विषाणू लागला तर..." यापूर्वी आलेल्या महामारीचा आपण इतिहासात एक उल्लेख म्हणून वाचत होतो; प्रत्यक्ष अनुभव असा नव्हताच. करोनाने आपल्या पिढीला कोणत्याही पूर्वानुभव वा पूर्वतयारीशिवाय दणकून अनुभव दिला आणि आपले जगणे कित्ती असुरक्षित, अनिश्चित आहे हे दाखविले. मात्र मानवजातीने अशी अनेक अरिष्टे सोसून टिकून राहण्यात यश मिळविले आहे त्यामुळे आपण नष्ट होणार नाहीत हा इतिहासाचा दिलासा आहे. मात्र यापुढे खूप काही बदलावे लागणार आहे.

या कोविड काळाच्या पार्श्वभूमीवर या लेखात आपण विचार करणार आहोत तो करीअरचा. करोनाने शिक्षण क्षेत्रावर आघाती परिणाम केले आणि सगळी घडीच विस्कटून टाकली. यात बाल

विद्यार्थी ते उच्च शिक्षण घेणारे या सर्वांवर फार मोठे परिणाम झाले. यांपैकी अनेकांवर फारसे लक्ष गेले नाही. उदा. ज्या मुलांना अध्ययन अक्षमता आहेत, वर्तणूकीच्या समस्या आहेत वा विशेष गरजा आहेत अशा विद्यार्थ्यांकडे दुर्लक्ष झाले. विद्यार्थ्यांवर मानसीक आघात झाले. त्यांना वाटणाऱ्या भीतीकडे, स्वतःच्या आर्थिक स्थितीची जाण झाल्यामुळे अनिश्चिततेतून येणाऱ्या भविष्याविषयीच्या सैरभैरतेकडे फारसे लक्ष गेले नाही. घरी असलेल्या पालकांसह मुले सुरक्षित असल्याचे समजले गेले. ताणतणाव फक्त मोठयांनाच नव्हते तर अगदी चिमुरडयांना सुद्धा होते. "आपण सगळे मरणार आहोत का ?" हे या चिमुरडयांचे भाबडे प्रश्न फारसे विचारात घेतले गेलेले नाहीत. मुंले जेव्हा शाळेत परत येतील तेव्हा ते केवळ पूर्वीचे विद्यार्थी नसतील तर वेगळेच भान असलेले, विविध समस्यांनी ग्रस्त असलेले व्यक्ती असतील. केवळ पाच टक्के शाळांमध्ये प्रशिक्षीत समुदेशक आहेत हे विचारात घेता शिक्षकांना समुपदेशकाच्या भूमिकेत शिरावे लागेल. सगळेच शिक्षकांकडे आशेने पाहात असतील, पालकांना कामकाजासाठी घराबाहेर पडावे लागल्याने हातात मोबाइल असलेली मुले घरात एक्टी असण्यातून अनेक समस्या निर्माण होत आहेत. ऑनलाइन शिक्षणाचे ताण तणाव जसे विद्यार्थ्यांना आहेत तसेच मुलांनाही आहेत. त्यांच्याशी सवंदेनशील संवाद साधला तर त्यांच्यातील तांणतणाव, बेफिकीरी, बिनधास्तपणा तसेच भीती यांचे चिंताजनकस्फोटक मिश्रंण अनुभवायला मिळते. ज्यांच्या हाती मोबाइल जाऊ नये म्हणून आजवर तडफड केली त्यांच्याच हाती मोबाइल सोपविण्याची नौबत आली. मुलांना परत शिकण्याच्या मूळ प्रवाहात आणावे लागेल. अनेक विद्यार्थ्यामध्ये हताशपणा आल्याने ते पहिल्यासारखे महत्त्वाकांक्षी राहिलेले नाहीत. त्यांची "ॲस्पिरेशन लेव्हल" खूप घसरली आहे, एक प्रकारचा दैववाद त्यांच्यात आला आहे. मुलांच्या मनोवृत्तीतला हा बदल फार चिंताजनक आहे.

करीअरविषयी बोलताना मुलांच्या आकांक्षेचा व प्रयत्नांचा स्तर घसरू नये म्हणून त्यांना सतत प्रेरीत करावे लागेल. अनेकांच्या अभ्यासाचं, परीक्षांचं वेळापत्रकविस्कटल्याने त्यांच्यात पूर्वी सारखे स्वारस्य राहिलेले नाही. अनेकांचे विदेशी शिकण्याचे स्वप्न खोळंबले आहे आणि सगळेच अचानक अनिश्चित झाले आहे. ज्या देशात जाऊन उज्ज्वल करीअर करायचे स्वप्न होते त्या देशांच्या अर्थव्यवस्था मोडकळीला आल्या आहेत. करीअरचे, नोकरी रोजगाराचे प्रश्न केवळ विद्यार्थ्यांचेच नसून चांगले, सुस्थितीत करीअर केलेल्यांचेही आहेत. वसईतील कितीतरी उच्चशिक्षीतांच्या नोकऱ्या गेल्या आहेत. अनेकजण "वर्क फ्रॉम होम"ने बऱ्यापैकी पिचून गेले आहेत. आता तर वर्क फ्रॉम होम न्यू नॉर्मल ठरणार आहे असे स्पष्ट झाले आहे. झालेले बदल एवढया झपाटयाने झाले की कसलीच तयारी, कसलाच पूर्वानुभव नसल्याने जुळवून घेणे खचीतच अवघड

झाले आहे. अनेकांच्या आरोग्याच्या समस्या उभ्या राहिल्या आहेत. अशावेळी “करीअर” या संकल्पनेकडेच वेगळया परिप्रेक्षातून पाहायला हवे.

साधारणपणे करीअर म्हटले म्हणजे आपल्या अंगीभूत क्षमतांचा व एकूण व्यक्तिमत्त्वाचा शोध घेऊन या क्षमतांचा अधिकत्तम व सर्वोत्तम उपयोग करता येईल असे आवडीच्या आनंददायक कामाचे क्षेत्र निवडणे असा अर्थ होतो. येथे सजगपणे स्वतःची वास्तविकता स्विकारून स्वतःला स्विकारून डोळस निवड करणे आले. सचिन तेंडुलकरला चार्टड अकाऊंटट करणे वा लता मंगेशकरांना अर्थशास्त्रात प्राध्यापक करणे खचीतच चुकीचे ठरेल. व्यक्ती आणि करीअर यांच्यात फिटमेंट हवी. गोल भोकात चौकोनी खुंटी मारण्याचे प्रयत्न निष्फळ आणि मारक ठरतील. खेदाची बाब म्हणजे एवढा आटापिटा करून नव्वदीपार वैगरे टक्के काढून परिक्षार्थी झालेल्या असंख्य विद्यार्थ्यांना या सगळयामागचा “व्हाय” सापडलेला नसतो. ते “हाऊ” चा विचार करू शकतील असे अभावानेच दिसते. एवढे सगळे कष्ट करायचे ते कशासाठी, शेवटी मिळवायचे काय आहे याविषयी अभावानेच सुस्पष्टता आढळते. मुंबईतील एका सर्वेक्षणात आढळले की तब्बल सेहेचाळीस टक्के कॉर्पोरेट प्रोफेशनल्सना या ना त्या डिप्रेशनचा त्रास आहे आणि पालक सगळे मुलांना त्यांच्याच वाटेने न्यायला झगडत आहेत! विद्यार्थ्यांमधले डिप्रेशन अत्यंत भयावह स्वरूपाचे झाले आहे.

“आनंदासाठी करीअर” हा विचार हवा आहे. सकाळी उठून कामकाजासाठी जावेसे वाटत नसेल तर सगळेच व्यर्थ! साधारणपणे करीअरचा विचार करता आपण चार बाबी विचारात घेऊ शकतो. त्या म्हणजे “स्थिरता (स्टॅबिलीटी, सोप्या भाषेत कायम स्वरूपी नोकरी म्हणून बॅकेत प्यूनच्या पदासाठी एमबीए व इंजिनिअरही हजारोंच्या संख्येने अर्ज करतात; सरकारी नोकरीचे आकर्षण असते), दुसरी बाब म्हणजे “आर्थिक सुरक्षितता”, तिसरी बाब म्हणजे “ग्रोथ” आणि चौथी बाब म्हणजे “कामाचे समाधान.” पहिल्या तीन बाबी नसतील तर चौथ्या बाबीविषयी फारसे बोलणे नको. हा झाला करीअरविषयीचा निव्वळ व बऱ्यापैकी व्यावहारिक दृष्टिकोन. साधारणपणे जगण्याचा संघर्ष, जिवघेणी स्पर्धा यांचा प्रत्ययही दाहक अनुभव घेणारा पालकवर्ग या चार बाबींची अपेक्षा ठेवतो व ते रास्तही आहे.

या चार अपेक्षांचा चिकित्सकविचार केला तर काय आढळते? या बाबी अर्थातच एकमेकांवर अवलंबून आहेत. आपण पहिल्या एकाच बाबीचा म्हणजे “स्थिरता (स्टॅबिलीटी)”चा विचार करू या. आज सुरक्षित नोकरी असा प्रकार खरच आहे का? थोडी आकडेवारी पाहू या म्हणजे होत असलेल्या व होऊ घातलेल्या बदलांचा अंदाज येईल.

देशातील तब्बल ८५ टक्के इंजिनीअर्स व चारपैकी तीन एमबीए रोजगारक्षमतेच्या अभावाने नोकरीसाठी अक्षम आहेत. आठ दहा टक्के पदवीधर रोजगारक्षम आहेत. त्यात ऑटोमेशनमुळे ६० टक्के नोकऱ्या जाण्याची भीती आहे. तंत्रज्ञानातील उलथापालथ करणाऱ्या बदलांमुळे "जॉबलेस ग्रोथ" हा प्रकार नित्याचा आहे. व्यावसायिकांनाही रोजगारक्षम राहाण्यासाठी सातत्याने नवनवी कौशल्ये शिकत राहावी लागणार आहेत (रिस्कील ऑर पेरीश). वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या अहवालानुसार अमेरिकेत तब्बल ६५ टक्के मनुष्यबळाला येत्या पंधरा वर्षात नव्याने प्रशिक्षीत करावे लागणार आहे. तंत्रज्ञानामुळे अनेक प्रकारचे काम कालबाह्य ठरून कायमचे बंद होणार आहे त्याचवेळी नव्या प्रकारचे नवे रोजगार निर्माण होणार आहेत. उदाहरणार्थ, हवामान बदलाचा धोका पाहता येत्या दोन अडीच दशकात आपल्याला जिवाश्म इंधनांकडून शाश्वत, पुर्ननुतनीकरण करता येईल अशा ऊर्जास्त्रोतांकडे जावे लागेल. अशावेळी औष्णिक ऊर्जा प्रकल्प बंद करावे लागतील. त्यांतील मनुष्यबळ निरूपयोगी ठरेल.

भारतात जनभौगोलिक लाभांशाबाबत खूप बोलले जाते. भारत म्हणजे "यंगिस्तान" वगैरे असल्याने करोडोंच्या सख्येने तरूणवर्ग असल्याने देश वेगाने विकास करील अशी धोशा लावला जात असल तरीही दारूण वास्तव हेच आहे की करोडोंच्या संख्येने लोकग्रामीण भागांतून शहरी भागांकडे स्थलांतर करीत असून भारत हा जणू स्थलांतरितांचा देश होत आहे. दरवर्षी आपल्याला काही कोटी लोकांच्या हातांना काम द्यायचे आहे मात्र प्रत्यक्ष रोजगार निर्मिती लाखांमध्येही होत नाही. त्यात कोविडने लोचा केला आहे. कोटयवधी तरूण पण बेरोजगार हे वास्तव अत्यंत भिषण ठरण्याची भीती आहे. भारताचा "डिमोग्रॅफिक डिव्हीडंड हा डिमोग्रॅफिक डिझास्टर" ठरण्याची भीती आहे. समृद्ध भारत फाऊन्डेशनच्या अभ्यासात स्पष्ट झाले आहे की २०४० नंतर भारत म्हाताऱ्याचा देश होऊ लागेल आणि यातून अनेक समस्या निर्माण होतील. आपल्याकडे जेमतेम दिड दशकांचा कालावधी उरला आहे. जपान व इतर अनेक पाश्चात्य देश म्हातारे होत असले तरीही ते केवळ सधनच नाहीत तर त्यांनी आधीच (म्हाताऱ्यांची संख्या वाढण्याआधीच) सामाजिक सुरक्षिततेची किमान तरतूद केली आहे. आपल्याकडे अशा सुरक्षिततेविनाच म्हाताऱ्यांची संख्या वाढली तर अडचणी निर्माण होतीलच. एवढया प्रचड तरूण वर्गाच्या पोन्टेशीअलचे परफॉमन्समध्ये परिवर्तन करण्याची ठाम योजना धडपणे दिसून येत नाही. शिक्षणाचा सुमार दर्जा, कोसळती ग्रामीण अर्थव्यवस्था, पर्यावरणाच्या समस्या... एक ना अनेक समस्यांचा विळखा आधीपासून आहे. शिक्षणातून अपेक्षित परतावा मिळेलच याची शाश्वती नाही. आज कोर्टातल्या चपराशाच्या पदासाठी बीटेक, एमबीए वगैरे हजारोंच्या संख्येने अर्ज करताना पाहून शिक्षणाच्या प्रयोजनाविषयीच प्रश्न निर्माण होतात. केवळ प्रशिक्षीत मनुष्यबळ असणे पुरेसे नसून आर्थीक वृद्धीसाठी आवश्यक ती गुंतवणूक असायला हवी.

आज ज्यांची मुले दहावीला आहेत त्या पालकांनी अर्थव्यवस्थेतील असे बदल वेळीच समजून घ्यायला हवेत. मुंबईचेच उदाहरण घेता येईल. आज दहावी बारावीला असलेली मुले जॉब मार्केटमध्ये यायला किमान सात ते पाच वर्षाचा कालावधी आहे. तोवर होणारे बदल समजून घेतले पाहिजेत. अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्र जे उच्च ज्ञान व कौशल्याधिष्ठित आहे (व म्हणूनच सर्वांना संधी नसणारे आहे) त्याचे प्राबल्य वाढत आहे. पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेसाठी उत्पादनक्षेत्र प्रचंड वाढायला हवे ज्यात मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होऊ शकेल; पण त्यात फारशी प्रगती दिसून येत नाही. मुंबईतून उत्पादनक्षेत्र जवळपास बाहेर गेले आहे, जात आहे; आणि मुंबई सेवाक्षेत्र होऊ लागली आहे. मुंबई आपण शाळेत असताना भूगोलाच्या पुस्तकात वाचायचो तशी "कारखान्यांची महानगरी" उरलेली नाही. या अशा मुंबईत येत्या पाच आठ वर्षात नोकऱ्यांचे चित्र काय असेल, कोठे व कोणत्या नोकऱ्या असतील, त्यांचे स्वरूप काय असेल याचा विचार पालकांनी आजच करायला हवा. केमिकल इंजिनिअर्सना मुंबईत केमिकल उद्योगच राहिला नाही, दुसरीकडे गेला तर मुंबईत नव्हे तर तो उद्योग जाईल तेथे रोजगारासाठी जावे लागेल. शिक्षणाचे खाजगीकरण... अशा एक ना अनेक बदलांचा वेध घेऊनच करीअरची दिशा ठरवावी लागेल. सुरक्षित नोकरी असा प्रकार फारसा राहाणार नाही. सातत्याने शिकणाराच टिकेल.

आपण पेंट उद्योगाचे एक वानगीदाखल उदाहरण घेऊ या. एशियन पेंट या रंगनिर्मिती कंपनीचे स्वरूप आता डेकोरेशनविषयकसेवासल्ला देणाऱ्या सेवा कंपनीसारखे झाले आहे. पेंटची निर्मिती करणे गौण झाले आहे. रंग कंपनी आवश्यक दर्जासह कोठूनही बनवून घेईल. त्यामुळे रंगउत्पादनातील रोजगाराचे स्वरूप बदलेल, अनेक नोकऱ्या जातील वा कायमस्वरूपाच्या राहाणार नाहीत. मोठमोठया कंपन्यांनाही सातत्याने नवनवे उत्पादन सादर केले नाही तर मरणपंथाला लागण्याची भीती आहे. एकूण कायमस्वरूपी रोजगार नसल्याने सुरक्षित नोकरी हा प्रकार फार काळ टिकणारा नसेल.

मुंबई व इतरत्र (विशेषतः आपल्या वसईत) केवळ श्रमशक्ती विकून समृद्ध झालेल्या वसईकरांना कोविडने या समृद्धीची लंगडी बाजू प्रकर्षाने दाखवून दिली आहे. अनेक जणांनी कल्पकरित्या कोविडकाळात विविध उद्योगधंदे सुरू करण्याची कास धरली आहे, अगदी स्त्रीयांनीही लहानमोठे व्यवसाय सुरू केले आहेत हे एक प्रागतिक सुचिन्ह आहे. दिवसागणिक रोजगार कमी होणार आहेत, स्थलांतरित होणार आहेत, परप्रांतियांमुळे स्थानिक जनभौगोलिकबदल घडून येणार आहेत व पर्यायाने विविध बदल त्या अनुषंगाने घडणार आहेत. याचा वेळीच वेध घेऊन नव्या उमेदीने उद्योजकतेची कास धरावी लागेल. सर्व शक्यता एकत्रितरित्या आजमाव्या

लागतील, एकीचे बळ कळीचे ठरेल. या कोविडकाळात म्हणूनच उद्योकजतेतून करीअर याविषयी बोलावेसे वाटते.

कोणत्याही देशाचे, समाजाचे, गटाचे खरे सामर्थ्य हे त्यांच्यातील संस्था वा उच्चपदावर पोहोचलेल्या व्यक्ती हेच असते. एखादा समाज लोकसंख्येच्या दृष्टीने अल्पसंख्यांक( मायनॉरिटी) असला तरीही त्याचे देशाच्या विकासातील योगदान जर मोठे असेल तर तो समाज अल्पसंख्यांक असूनही सामर्थ्यशाली ठरतो. आज 'द मोस्ट इम्पॉटंट कम्युनिटी इज बिझनेस कम्युनिटी' असे जगभर लक्षात घेतले जात आहे. कारण शेवटी संपत्तीची निर्मिती उद्योजकच तर करतात. देशाकडे, समाजाकडे कितीही नैसर्गिक साधन संपदा असू दे, मनुष्यबळ असू दे; जर उद्योगाची जोखिम घेऊन त्यांची गुंतवणूक करणारा उद्योजकच जर नसेल तर ना रोजगार तयार होत ना संपत्ती. 'जिसकी लाठी उसकी भैस' हा नियम आर्थिकक्षेत्रातही असल्याने जे उद्योगव्यापारात आघाडीवर असतात त्यांचीच खरी सत्ता असते. ज्याच्या हातात अर्थव्यवस्थेच्या, भांडवलाच्या दोऱ्या असतात त्यांचेच समाजकारण व राजकारण यांवर वर्चस्व असते जे अमान्य करता येत नाही. अशाच सधन वर्गाच्या संस्कृतीचेही वर्चस्व राहाते. शेवटी पैशाचे सोंग देशाला, समाजाला, सरकारला कोणालाच आणता येत नाही. समाजाने उभ्या केलेल्या वित्तिय संस्था (बॅंका, पतपेढया. इत्यादी) असतील, शिक्षण संस्था असतील, आरोग्यसेवा संस्था असतील वा इतर सांस्कृतिक संस्था असतील तर समाज सामर्थ्यशाली व मजबूत असतोच. समाजाची ताकद त्यांतूनच येते. भारतात ख्रिस्ती समाज जेमतेम २.३ टक्के आहे मात्र शिक्षण व आरोग्यक्षेत्रातील वाटा इतर कोणत्याही समाजापेक्षा मोठा असल्याने एकप्रकारची स्वायत्तता व सामर्थ्य आहे. आपण किमान शिक्षण व आरोग्यसेवांसाठी शक्यतो इतरांवर अवलंबून नाही. अर्थात याचे श्रेय शिक्षण व आरोग्यसेवा देण्यासाठी सर्वस्व वेचणाऱ्या चर्चचे आहे.

आज वसईतील समृद्धी खचितच चर्चच्या शैक्षणिक व इतर संस्थांमुळे आहे. वसईतील ख्रिस्तीजनांना आर्थिक स्वातंत्र व स्वावलंबित्त्व लाभावे यासाठी १०० वर्षांपूर्वी (देशाच्या स्वातंत्र्याच्याही तब्बल २९ वर्षे आधी) रेव्ह. पी. मोनिस यांनी बॅसीन कॅथोलिक बॅंकेची पायाभरणी केली तेव्हाचा आर्थिक स्वातंत्रलढा बॅंकेच्या माध्यमातून आजही सुरू आहे. मुंबईनंतरचा सर्वात मोठा ख्रिस्ती समाज असणारा वसईतील ख्रिस्ती समाज आज एका महत्त्वाच्या वळणावर उभा आहे. काळाच्या ओघात वसईतील ख्रिस्ती समाज बदलला आहे, बदलत आहे. नव्या पिढयांच्या गरजा व आकांक्षा बदलत आहेत. विशेषतः १९९१ पासून आर्थिक सुधारणा (इकनॉमिक लिबरेलायझेशन) नंतर जे बदल झाले त्यांचा मोठाच प्रभाव वसईतील ख्रिस्ती समाजावर झाला आहे. युवा पिढयांनी आयटी व इतर अत्याधुनिक शिक्षणाद्वारे जगाला गवसणी घातली आहे.

आज गावागावातले ‘न्यू मिलेनियल्स’ तरूण अमेरिका, युरोप असो, आशियाई देश असो सर्वत्र नोकरी व शिक्षणासाठी मोठया प्रमाणात जाऊन स्थिरावले आहेत. त्यातून वसईत एक जनभौगोलिक (डिमोग्रॅफिक) बदलही झाला आहे; तरूणांची संख्या कमी होत आहे. वसईतील खिस्ती समाज शिक्षणामध्ये अग्रेसर राहिल्यामुळे व मुंबईजवळ असल्यामुळे सगळा भर हा नोकरीवर (मुलीसाठी टिचींग करीअर) राहिला. “उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ नोकरी’ असाही प्रकार अधूनमधून होता. वसईतील ज्या भागात शेती उत्तम होती तेथिल मंडळी बागायती शेती व दुधदुभत्याच्या व्यवसायात राहिली मात्र काळाची पाऊले ओळखून उच्चशिक्षणाची कास धरून नोकरीच्या सुरक्षित वाटेने गेली. मात्र शेतीला उद्योजकीय स्वरूप देता आले नाही. भाजीपाला, फुले व दुध असा बव्हंशी कच्चा मालच पुरवित राहिला. वसईत सर्वत्र चाललेल्या शहरीकरणातून निर्माण झालेल्या उद्योजकिय संधींची चाहूल फार थोडया लोकांना लागली व त्यांचा लाभही फार कमी लोकांनी घेतला. शिक्षणामुळे सहजगत्या मिळणाऱ्या नोकऱ्या व त्यातून येणारी सुरक्षितता यामुळे उद्योजकतेकडे फारच थोडी मंडळी वळाली. वसईची अर्थव्यवस्था बाहेरून आलेल्या उद्योजकांच्या हाती गेली; अगदी आपला कष्टाचा पैसाही आपले उद्योजक अभावानेच असल्याने आपल्या समाजात न् राहाता दुसऱ्याकडे जात राहिला. आपल्याकडे सुशेगात जिवनामुळे व उद्योजकतेची संस्कृती अशी मुळात फारशी नव्हती.

आज चित्र झपाटयाने बदलू लागले आहे. आज मोठया प्रमाणात बदल होत आहे. मोठया प्रमाणात खिस्ती तरूण वर्ग उद्योगाकडे वळत आहे. उच्चशिक्षण घेऊनही अनेक कारणांमुळे पूर्वी सारखे समाधानकारककरीअर मिळत नाही, तंत्रज्ञानातील बदलांमुळे मोठया प्रमाणात नोकऱ्या जाणार आहेत (उदा. एआय, मशिन लर्नींग, रोबोटीक्स, आयओटी सारख्या तंत्रज्ञानामुळे येत्या पाच वर्षात सहा लाख आयटी नोकऱ्या जाणार आहेत, सतत शिक्त राहावे लागणार आहे, चार पैकी तीन एमबीए बेराजगार आहेत, पंधरा टक्केही इंजिनिअर्सना नोकऱ्या नाहीत, तसेच नोकरी करताना होणारी होरपळ याची होत चाललेली जाणिव, नोकरीतील सुरक्षितता व प्रतिष्ठा यांविषयीच्या संकल्पनेत आता होत असलेला बदल, स्थानिक अर्थव्यवस्थेत महत्त्वाकांक्षी व मेहनती नवउद्योजकांसाठी उपलब्ध झालेल्या संधी व त्यांविषयीची जाणिव, ‘दुसऱ्याला श्रिमंत करण्यासाठी आपले आयुष्य खर्ची का घालावे, आपणच श्रिमंत, समृध्द का होऊ नये?’ अशी प्रेरणा, भोवतालचे कमी का होईना पण मोठे यश मिळविणारे नवउद्योजक, समाजाने उभारलेल्या वित्तीय संस्था विशेषतः प्रगतशील बसीन कॅथोलिक बॅकेकडून मिळणारे सर्व प्रकारचे पाठबळ अशा अनेक बाबीमुळे तरूण वर्गाच्या आकांक्षा बदलत असून मोठया प्रमाणावर उद्योजकतेकडे कल दिसून येत आहे. सुवार्तेचा कोणंताही अंक पाहिला तर त्यात ट्रॅव्हल टुरिझम, गुंतवणूक सेवा, केटरींग सेवा, बांधकाम सेवा, शिक्षण व रोजगारसेवा अशा व इतर नाविन्यपुर्ण उद्योग क्षेत्रांच्या जाहिराती मोठया प्रमाणात लक्ष वेधून घेतात आणि यात तरूणवर्गाचा वाढता वाटा लक्षणिय आहे. वसईतील

धाडसी ख्रिस्ती तरूण मळलेल्या वाटेवरून जाण्याऐवजी आता 'नोकऱ्या मागणाराच' नव्हे तर 'नोकऱ्या देणारा'ही होऊ लागला आहे व स्वयंरोजगारात व उद्योजकतेत करीअर करू पाहातो आहे. हे खरेतर देशभरात घडू लागले आहे. आयआयटी व आयआयएम्समध्ये 'प्लेसमेंटस' पेक्षा नवउद्योजक 'स्टार्टअप्स' वर भर आहे.

अर्थात उद्योजक होणे हे सोपे करीअर खचीतच नाही. समाजाच्या जडणघडणीचा एक ऐतिहासिक दस्तावेज व आरसा असलेल्या सुवार्तेचे काही दशकांचे जुने अंक चाळले तर वसई तील ख्रिस्ती समाजात उद्योजकता अभावानेच असल्याचे लक्षात येते. मोठया प्रमाणात शिक्षक देणाऱ्या ख्रिस्ती समाजाने 'शिक्षण एक ज्ञानउद्योग' म्हणून नागरीकरणाचा लाभ घेत स्वतःच्या शाळा उभारल्या असत्या तर त्याचे लाभ मोठे असते. अशा संधींविषयी वेळीच संस्थात्मक मार्ग दर्शन मिळाले नाही. चर्चचेही येथे दुर्लक्ष झाले. नोकऱ्यांसाठी शिक्षण देताना उद्योजकतेकडे वळविले असते तर आज मोठेच दूरोगामी परिणाम झालेले असते. उद्योजकिय करीअरसाठी एक आव्हानात्मक धाडसी मानसीकता लागते, स्वतःविषयी एक ठाम आत्मजाण व आत्मविश्वास असावा लागतो, धेय्यनिष्ठा लागते, अपार चिकाटी व प्रयत्नांतील सातत्य लागतं, बदलत्या परिस्थितीचा वेध घेऊन येणाऱ्या आव्हानांमधून नवनव्या संधी शोधण्याचा व वेळीच त्यांचा लाभ घेण्याचा सावधपणा असावा लागतो, भांडवलाचे पाठबळ असावे लागते आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आप्तस्वकियांचा अपयशात आधार असावा लागतो. यशाचे श्रेय घेणारे, बाप म्हणून मिरविणारे खूप असतात मात्र अपयश अनाथ असते याचा अनुभव उद्योजकाएवढा कोणालाच नसतो. उद्योजक होण्यासाठी एक जडणघडण लागते. अनेकदा 'एकला चलो रे' अशीच स्थिती असते. अजूनही स्वतःचा उद्योग व्यवसाय करणाऱ्याला (व व्यवसायासाठी कर्ज घेणाऱ्याला) मुलगी द्यायला आईवडील सहसा तयार होत नाही. मात्र यशस्वी होताच समाज उद्योजकाचे यश पाहातो कष्ट पाहात नाही आणिं उदोउदो करतो. स्वतःच्या कल्पनेतून, कष्टातून उभारलेल्या लहानमोठया उद्योगात काही लोकांना काम देऊन त्यांचे संसार चालविणे हे खचीतच गौरवास्पद व मोठे आंतरिकसमाधान देणारे आहे. मात्र ही वाट ख्रिस्त सांगतो तशी 'अरूंद वाट' आहे.

आपल्या शिक्षणात उद्योजकता विकासाची कास धरण्यासाठी काही बदल केले पाहिजेत. संघर्षातून यशवी झालेल्या उद्योजकांना विद्यार्थ्यांसमोर आणून उद्योजकिय करीअरचा विचार रूजवावा लागेल. समाजाला ताकद उद्योजक देतात हे नीट लक्षात घेतले पाहिजे. दोन वर्षांपूर्वी वसईतील ख्रिस्ती उद्योजकांनी नेटवर्कींगसाठी व इतर सहाय्य देण्यासाठी काही व्हिजनरी तरूण उद्योजकांनी एक उद्योजकिय इकोसिस्टम निर्माण केली आहे. 'बॅसीन कॅथोलिक बिझनेस असोसिएशन (बिसीबिए)'चे उदाहरण देता येईल. त्याचा समाजाला मोठा लाभ होत आहे. " नेटवर्कम्हणजे नेटवर्थ" हे लक्षात येऊ लागले आहे. वसईतील ख्रिस्ती समाजात नेटाने विविध

उपक्रमांद्वारे उद्योजता वाढवायला हवी. वसईकरांचा एक मोठा शक्तीस्त्रात असलेल्या आपल्या बसीन कॅथोलिक बॅकेने व यशस्वी उद्याोजकांनी नवउद्योजकांसाठी “उद्योगपिता (मॅन्टॉर)” व्हावे. स्त्रियांना उद्यअेजकिय संधीसाठी तयार करावे.  उद्योजकता विकासाचे विविध अभ्यासक्रम व उपक्रम हाती घ्यावेत. उद्योजक होऊ इच्छिणाऱ्या पदवीधरांना (विशेषतः एमबीए व इंजिनिअर्स) वेळीच हेरून त्यांची जडणघडण करावी. आपल्या बॅकेने ‘स्टार्टअप्स’साठी नव्या उद्योजकिय कल्पनांना व्यासपिठ द्यावे. एक विशेष ‘व्हेन्चर फंड’ सुरू करावा. विविध ख्रिस्ती संस्थाशी नेटवर्क करून नेटवर्थ वाढवावी. ख्रिस्ती समाजाची म्हणून एक मोठी बाजारपेठ आहे; आपला पैसा आपल्याकडेच राहायला हवा. इकॉमर्स सारख्या तत्रज्ञानचा वापर कल्पकरित्या व्यापारासाठी व्हायला हवा. वसईतील पारंपारिकसंसाधनांचा, संस्कृतीचा नव्याने उद्योगकिय वेध घेतला जावा. स्वकष्टाने, स्वतःच्या बुद्धीचार्तुयाने सनदशीर मार्गाने उद्योजक होऊन समृद्ध होता येते असा आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा. सगळयांनाच सुरक्षित रोजगार मिळायचे दिवस आता संपलेत हे लक्षात घेऊन वसईतील ख्रिस्ती समाजासाठी एक उद्योजकिय ‘व्हिजन व मिशन स्टेटमेंट’ तयार करावे.  युवक संघटनांनी याबाबतीत सक्रियरित्या उद्योजकतेचे भान निर्माण करू शकतील. उद्योजकांचा आदर सन्मान व्हावा. शेवटी ‘ज्याच्या हाती अर्थव्यवस्थेची नाडी, तोच जगाची हाकतो गाडी’ हे सत्य आहे. वसईतील ख्रिस्ती उद्योजक हे समाजाचे सौख्य, सामर्थ्य, व अभ्युदयाचे आधार आहेत. म्हणूनच वसई व्हावी उद्योजकांची नगरी.

या करोना काळाला प्रतिसाद देताना काय सूरू करावे तर उद्योजकिय मानस घडवावे. काय थांबवावे तर केवळ यापुढे सुरक्षित नसणारी नोकरी एके नोकरी करणे थांबवून साहसी व्हावे, मोठी स्वप्ने पाहावी आणि स्वप्ने पाहिल्यापासून त्यांची जबाबदारी घेऊन झपाटून कामाला लागावे. नव्वदीपार गुण मिळविणारे “पुढे काय करणार?” याचे उत्तर “उद्योजक होणार” असे देऊ लागतील तो सुदीन ठरावा. काय वाढवावे तर नवनवी कौशल्ये आत्मसात करावी, ग्रोथ माइंडसेट निर्माण करून उद्योजकतेची कास धरावी, नवनव्या संधीचा वेध घेत, स्वतःसाठी व इतरांसाठी नवनव्या संधी निर्माण करीत यशस्वी व्हावे. “शोधा म्हणजे सापडेल, ठोठवा म्हणजे उघडेल आणि मागा म्हणजे मिळेल” असे जे ख्रिस्ताने म्हटले आहे त्याचा उद्योजकिय शोध घेऊ या. शोधल्या तर संधी सर्वत्र सापडतात. कोविडने संघर्षातून संधीच्या वाटा सापडतात हे दाखविले आहेच.

कोविडकाळाकडे “अरिष्टातून संधी” शोधण्याची संधी देणारे वळंण म्हणून पाहू या. इटस् इंडीड ए टेरीबल आयडीया टू वेस्ट ए क्रायसिस!

**लेखकहे अनुभवी करीअर समुपदेशकआहेत. मो, ८६००१७८८२५**

# "खोटी धार्मिकता हा खरा स्वतः चा घात."

**-आशिष जयराज शिंदे , संस्थापक अध्यक्ष, अल्फा ओमेगा ख्रिश्चन महासंघ**

नाताळ आला की आपण आनंदी असतो. आपण देवाच्या समिप जाण्याचा अधिक प्रयत्न करतो. घरातील जळमटे काढतो, घर सजवतो परंतु शरीर रूपी मंदिराचे काय? त्यामध्ये साठलेल्या वाईट विचारांच काय? स्वार्थीवृत्तीचे काय? चला यावेळी ही ही जळमटे काढून टाकू व कोरोनाने जीवनात मिळालेल्या धड्यांचा विचार करू व एकमेकांची काळजी घेवू म्हणजे देव आपली काळजी घेईल.

आज आपण जरा गहन विषयावर चर्चा करू व निर्णय घेऊ. कामधंदा नाही म्हणून समाजासाठी काम करण्यापेक्षा समाजातील तरुणांसाठी कामधंदा कसा निर्माण होईल हे महत्वाचे आहे. वेळ ही अशी बाब आहे जी कोणाकडेच नसते ती काढावी लागते. अल्फा ओमेगा ख्रिश्चन तर सर्वच जन कामधंदा करणारी आहेत. तरी आम्हाला वेळ मिळतो.

आपण जेव्हा कोणतेही काम करतो तेव्हा अनेकांच्या नजरा, अपेक्षा आपल्याकडे लागलेल्या असतात काम जरी आपण करित असलो तरी आपण समाजाच देणं लागतो. कोणी काही समाजासाठी करायला की नकळत आपण म्हणतो कोणी उगाच, करत नाही ओ ? खर सांगायचे म्हणजे समाजासाठी काहीतरी करणे हे अतिशय कठिण काम आहे. येथे आपल्या मनासारखं काहीच होत नसतं परंतु ज्यांना काही समजत नाही. तोही फुकटचे सल्ले देऊन जातो. परंतु हेही सहन करावे लागते. कारण समाजाला पूढे घेऊन जायचे असते.

मी असेही म्हणत नाही की सर्वानीच प्रत्यक्ष सेवा करावी. परंतू ज्यांना media जमते तेथे त्यांनी support करावा. FB., WhatsApp व ईतर साधनाव्दारे समाज जागृत करावा, आपले लिखाण, भाषण, आर्थिक साह्य याव्दारेही समाजजागृतीस मदत होते. सर्वच जन पूढे येऊन काम करत नसतात परंतु प्रत्येकाने लहानसा वाटा जरी उचलला तरी खूप मोठा बदल होवू शकतो. प्रत्येकाने यात सहभागी होणे मात्र आवश्यक आहे. समाजात रोजगार

कसा निर्माण करता येईल. व्यवसाय व नोकरी मार्गदर्शन असो की शिक्षण कसे व कोठे घ्यावे याचे मार्गदर्शन.

बाहेर देशात लहानपणीच शास्त्रज्ञांची चरित्र, वैज्ञानिक गोष्टी किवा मूलांच्या नवनिर्मितीला चालना देणारी पूस्तके त्यांना दिली जातात आणि आपण..? म्हणून सर्व शोध इतर ठिकाणी आपण मात्र केवळ बघे. लहानपणीच हे रुजवावं लागेल तरच येणारी पिढी सक्षम बनेल. ज्या समाजात मी जन्माला आलो, त्या समाजामूळे नाव, पैसा, नोकरी, पत्नी, कुटूंब हे सर्वकाही मिळालं पण मी माझ्या समाजाला काय दिले ? कारण जेव्हा घेतो तेव्हा वापस द्यावंही लागत तरच समाज ऊभा राहत असतो.

देव एकाच घरात सगळं काही देत नसतो, नाहीतर कोणी कोणाला विचारलच नसत. त्यामूळे कितीही प्रयत्न करा सर्वकाही एकालाच मिळणार नाही त्याला हे जग चालवायचय.. त्यामूळे एवढेही सैरावैरा धावू नका की, मी जीवनात काय केले हे पाहण्यासाठी आपणच जीवंत राहणार नाही.

अतिशय गांभिर्याने विचार करू मला नेमके जीवनात करायच काय आहे ? समाज केवळ फूशारकी मारायचीय की काम करुन ईतराच्या जीवनात प्रकाश आणायचाय ? खूपदा आपण फूशारकी मारतो. माझं घर खूप मोठं आहे पण त्याला घरपण आहे का ? माझी मंडळी सर्वात पण तिथे ऐक्य, शांती आहे का ? आम्ही खूप धनवान आहोत, पण उत्तम आरोग्य आहे का ? मी खूप हूशार आहे, पण समाजाला आपला उपयोग आहे का ? हे खूप जे असते ना ते देवाने यासाठी आपल्याला दिले असते की, ते आपण आपल्या समाजाला व दुबळ्याना द्यावे. ते तुम्ही स्वतःपुरतेच वापरुन पहा ते तूम्हाला सूखानी जगू देणार नाही. त्यातला काही भाग समाजासाठी वापरा म्हणजे तूम्ही सुखी व्हाल.

कूठेही देवाला मध्ये आणुन आपली जबाबदारी झटकू नका. आजकाल पूळका धार्मिकांचे प्रमाण जास्तच वाढत चालले आहे. काही सांगा विनाकारण देवाला मध्ये आणायचे आणि मी किती धार्मिक आहे हे दाखवायचे हाच तर खरा खोटेपणा आहे. अल्फा ओमेगा हाच विचार महाराष्ट्रात रूजवत आहे की धार्मिकता ही वागण्यातून व कृतीतून दिसावी. आजच पक्का संकल्प करा माझ्या जवळ जे काही आहे त्यातला काही भाग मी समाजासाठी नक्कीच देईल.

# ख्रिसमस- प्रेमाचा व सेवेचा उत्सव!

• फा. आसिस रॉड्रिग्ज, एस. जे., नाशिक

ख्रिसमस काळ! ख्रिस्त जन्माचा काळ! आनंदाचा व उत्साहाचा काळ! चैतन्याचा काळ! त्याहि पुढे जाऊन हा प्रेमाचा, सेवेचा व आभाराचा काळ !

जगासमोर नम्रतेचे सर्वोत्तम उदाहरण घेऊन जन्माला आलेला परमेश्वर! लिनत्वाचे मुर्तीमंत स्वरूप आहे. सा-या विश्वाचा राजा पण, दरिद्री होऊन गाईच्या गोठ्यात अवतरला. परमेश्वराचे मानवावरील अमर्याद प्रेम ह्या महान तारणाच्या योजनेतून प्रकट होते. देवाकडून आपणाला मिळालेल्या ह्या प्रेमाच्या देणगीद्वारे आपण आपल्या जीवनात प्रेमाने वागूण देवाच्या प्रेमाचे साक्षीदार होऊ या. हेलन केलर म्हणतात, “ख्रिसमसच्या वेळी खरा अंध व्यक्ती तो आहे ज्याच्या मनात व ह्रदयात ख्रिसमस नाही.” देवाने आपल्याला अनेक देणग्या व कलागुण दिले आहेत. त्याहून ही सुंदर जीवनाची देणगी दिली आहे. मग ह्या सर्व गोष्टीतून इतरांना आनंद, शांती व सेवा देण्याचा प्रयत्न करू या. जेव्हा आपण प्रेमाने इतरांपर्यंत पोहोचतो तेव्हा आपण बहुतेक देवासारखे बनत असतो. इतरांप्रती दाखवलेले प्रेम आणि त्यांची सेवा करण्याची इच्छा हि सुद्धा परमेश्वराचीच देणगी आहे. परमेश्वराची प्रार्थना आम्हाला आमच्यातील कलागुणांना ओळखण्यास व ते इतरांच्या कल्याणासाठी वापरण्यास प्रेरणा व सामर्थ्य देते.

ह्या महामारीच्या काळात अनेक नवीन गरजा व अनेक नवीन गरजवंत लोक निर्माण झाले आहेत. कदाचित आपण त्यापैकी नसू अशावेळी आपल्या उत्सवापेक्षा इतरांच्या गरजा मोठ्या तर नाहीत ना हे जाणून घेऊन, अशा गरजवंताला आपण केलेली छोटीशी मदत किंवा दिलेला थोडासा वेळदेखिल त्यांच्यासाठी ह्या ख्रिसमसची सर्वांत मोठी ख्रिसमस भेट ठरू शकते. देवाचे प्रेम आपल्यामध्ये सतत असते. ख्रिसमसच्या रात्री ते आपल्या अंतकरणात पुर्नजन्म घेते. संत सिरील ख्रिस्त जन्माविषयी म्हणतात, “स्वर्गातील भाकरी भुकेल्यांना खायला अन्न होण्यासाठी खाली आली.” स्वतः भाकर झालेल्या ह्या प्रेमाच्या जन्माने इतरांना ख्रिसमस भेट म्हणून आपले प्रेम व आपली सेवा देण्यास आपणास प्रेरणा मिळावी, आपल्या उत्सवात भुकेल्याच्या ही मुखात प्रेमाचा घास आपल्याला भरवता यावा. ह्याच नाताळच्या शुभेच्छा!

# जगतो जीवन नव्हे मी माझे

• सचिन मेंडिस, बोळींज, वसई.

काही फुलं फुलतात, काही फुलण्याअगोदर अवेळी कोमेजून जातात. आपल्या पदरी आलेल्या कळीचं कधीचं फुलं होणार नाही, हे सत्य ठाऊक असूनही माळी त्या फुलासाठी अविरत कष्ट घेण्याचं थांबत नाही. तो रक्त आटवतो, डोळ्यातील अश्रूंनी कळीला पाणी देतो. जगण्याचा संघर्ष करीत असताना त्याचं शरीर जणू माती बनलेलं असतं. तीच माती तो रोपट्याच्या पायाशी बांधून कळीचा श्वास लांबवत राहतो. बागेत आजूबाजूला फुललेली फुले पाहत असताना तो अस्वस्थ होत असावा का? अस्वस्थतता नसेलही परंतु प्रश्न नक्कीच असतील. नव्हे प्रश्नांची रांग. वारूळातून निघणाऱ्या मुंग्यांसारखी लांब. न थांबणारी. अन थांबली तरी पुन्हा ओथंबून वाहणारी. आपली दैवी जबाबदारी पार पडत असताना इतर फुलांसाठी तो भरभरून मागत असावा. नक्कीचं तो मागत असावा. जगवण्याचा व स्व:त जगण्याचा संघर्ष करीत असताना येणारी निराशा कितीही प्रचंड असली तरी त्यात द्वेषाचा व तक्रारीचा लवलेशही नसावा, हे मात्र नक्की.

ह्या माळ्यांचं जगणंही किती वेगळं. खरंतर ते स्व:तासाठी तसे जगतच नसतात. कळीचं जगणं हेचं त्यांचं आयुष्य बनलेलं असतं. "जगतो जीवन नव्हे मी माझे" ह्या गाण्यातील ओळ्यांचे वास्तव दाखवणारे त्यांचे जीवन. अन असं जगतं असताना जेव्हा कळीचं आयुष्य जेव्हा अचानक थांबत तेव्हा काय वाटत असावं त्या माळ्यांना? जो कधी स्व:तासाठी जगला नाही, कधी हक्काचा श्वास त्याने घेतला नाही अन आपलं दु:ख ज्याने कायमचं हास्यामागे लपवलं त्याला तो क्षण कसा वाटत असावा? विचार करता येईल? शब्दात मांडता येईल? त्या वेदनेची कविता बनेल? त्या आसवांचा आवाज येईल? त्या रिकाम्या झालेल्या मिठीला पुन्हा कळीची उब गवसेल? आपल्या ओंजळीत कळ्यांना घेऊन गोंजारणारे असे आदर्श माळी गावोगावी दिसतील. त्यांच्या कहाण्या वेगळ्या असतील परंतु त्यातील वेदना सारखीच असेल. आपल्या वर्तुळात जगात असताना आपल्यासारख्या अनेकांना त्यांच्या वेदनेच्या वर्तुळाचा स्पर्श होणारही नाही. अन झालाच तर त्या वेदनेच्या वर्तुळाची त्रिज्या कमी करण्यासाठी लागणार सामर्थ्य आपल्याकडे असण्याची शक्यताही कमी. कारण वेदनेच्या वर्तुळाच्या काठावर राहणारे आपण अनेक जण. खरंतर अशी माणसे वेदनेला कवेत घेऊन परिघावरील आपल्या सारख्या अनेकांना जगण्याचं बळ देतात. अशा लोकांना वंदन करतानाच त्यांना व त्यांच्या निरागस कळ्यांना आपल्या प्रार्थनेत ठेवण्याचं काम आपल्या हातून घडावं हीच अपेक्षा.

# कमला हॅरीस यांचे भाषण

• अनुवाद- मॅक्सवेल लोपीस

शुभ संध्याकाळ. तर, काँग्रेसचे जॉन लुईस यांनी म्हटलेलं आहे; "लोकशाही ही एक अवस्था नसून ती एक कृती आहे". त्यांच्या या मतानुसार अमेरिकेतील लोकशाही ही अस्थिर आहे. जितके आपण त्या लोकशाहीच्या संरक्षणासाठी सज्ज राहू आणि तिचा सन्मान करू तितकी ती बळकट होत जाईल. आणि आपल्या लोकशाहीच्या बचावासाठी आपल्याला संघर्ष करावाच लागेल. त्यासाठी त्याग करावा लागेल. परंतु या कार्यात एक मानसिक समाधान आणि प्रगती आहे. कारण आपल्या लोकांत उज्ज्वल भविष्य घडवण्याचे सामर्थ्य आहे.

ज्यावेळी पूर्ण जगाच्या साक्षीने प्रत्येक जबाबदार अमेरिकन आत्म्याचा हुंकार एका बॅलट कागदावर आपली लोकशाही ठरवत होता, त्यावेळीच एका नव्या दिवसात आपण स्थानापन्न झालो होतो. ज्यांनी ज्यांनी लोकशाहीच्या या प्रक्रियेत लोकांचा अभूतपूर्व सहभाग घडवून आणला व हा विजय मिळवून दिला, त्या या मोहिमेत सहभागी झालेल्या सर्व कर्मचारी, स्वयंसेवक वर्गाला धन्यवाद.

प्रत्येक मताचे मोल ठेवण्यासाठी अविश्रांतपणे काम करणारे देशातील सर्व मतमोजणी कर्मचारी व निवडणूक अधिकारी- आपला देश तुमच्या ऋणात बद्ध आहे. तुम्ही लोकशाहीचे अखंडत्व राखले आहे. आणि या देशाला सर्वांग सुंदर बनवणारी अमेरिकन जनता - आपल्या विचारांना वाचा फोडण्यासाठी आपण जो हा विक्रम घडवून आणला त्याबद्दल आपले आभार.

मी जाणून आहे ही वेळ.... विशेषतः दुःख, पीडा, वेदना, चिंता आणि संघर्ष घेऊन आलेले मागील काही महिने हे आव्हानात्मक आहेत. परंतु त्याच वेळेस आम्ही आपल्या धैर्यशील, परिवर्तनशील आणि उदारशील वृत्तीचे साक्षीदार राहिलेले आहोत. कारण गेली चार वर्षे या देशात आणि अखंड जगात समता आणि न्याय स्थापित करण्यासाठी आपण एकत्रितपणे संघर्ष केलेला आहे. आणि तद्पश्चात तुम्ही मतदान करून एक संदेश जगाला दिलेला आहे. तुम्ही आशा, ऐक्य, सभ्यता, विज्ञान, आणि हो सत्य; अशा मुल्यांना प्राधान्य दिलेले आहे. तुम्ही ज्यो बायडन यांना संयुक्त राष्ट्रांच्या अध्यक्षस्थानी निवडून दिलेले आहे. (इथे टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला)

आणि ज्यो हे एक किमयागार आहेत. ते आहेत ऐक्य निर्माण करणारे, अनेक कसोटींतून बाहेर आलेले एक आत्मसंयमी पुरूष! एक असा माणूस ज्याने गमावण्याचा अनुभव घेतलेला आहे. ज्यामधून त्यांच्यात विकसित झालेला उद्दिष्टपूर्तीचा भाव आपल्याला देखील एक राष्ट्र म्हणून त्या मुल्याच्या विकासात सहाय्यक ठरेल आणि त्याच वेळी त्यांचे हृदय असीम करूणेने भरलेले आहे. आणि हेच त्यांचे प्रेम फर्स्ट लेडी झील, हन्टर, ॲस्ली आणि त्यांची नातवंडं आणि पूर्ण बायडन कुटुंबासाठी देखील समतुल्य आहे. ज्यावेळी ज्यो हे ऊपाध्यक्ष असताना त्यांच्याशी माझा परिचय झाला; त्यावेळीच माझा प्रिय मित्र असलेल्या बाऊचे ते वडील असल्याचे मला कळले होते. बाऊचे आज आम्ही खास स्मरण करतो.( बायडन यांच्या मुलाचे २०१५ मधे वयाच्या ४६ व्या वर्षी कॅन्सरने निधन झाले होते.)

माझे पती डग, मुलं कोल आणि इला, माझी बहिण माया आणि माझे सर्व परिवार सदस्य- शब्दांत व्यक्त करता येणार नाही इतके माझे तुम्हा सर्वांवर प्रेम आहे. या रोमांचक प्रवासात ज्यो आणि झील यांनी आपल्या परिवारात आम्हाला सामावून घेतल्याबद्दल मी त्यांची सहर्ष ऋणी आहे. आणि जिच्यामुळे मी या जगात येऊ शकले ती स्त्री- माझी आई शामला गोपालन हॅरीस; तिचे स्थान आमच्या हृदयात आहे.

वयाच्या १९व्या वर्षी ज्यावेळी ती भारतातून येथे आली, त्यावेळी तिने आजच्या दिवसाची कल्पनाही केली नसेल. परंतु अमेरिकेत अशा घटना घडू शकतात यावर मात्र तिचा गाढ विश्वास होता. त्यामुळे मी आज तिचा आणि या पूर्ण राष्ट्राच्या इतिहासातील कृष्ण-धवल वर्णीय स्त्रिया, आशियाई स्त्रिया, लॅटिन आणि मूळ अमेरिकन स्त्रिया ज्यांनी आजच्या या घटिकेची मुहूर्तमेढ खूप आधीच रोवली होती; अशा स्त्रीयांच्या सर्वच पिढ्यांचा विचार करत आहे. या स्त्रियांनी समता, स्वातंत्र्य, आणि न्यायासाठी संघर्ष केला. यात कृष्णवर्णिय स्त्रिया देखील आल्या ज्यांना कायम दुर्लक्षिले गेले आणि त्यांनीही वारंवार दाखवून दिले की त्या या लोकशाहीच्या कणा आहेत.

आणि मी स्मरण करते त्या सर्वच स्त्रियांचे ज्यांनी मतदानाचा हक्क राखण्यासाठी गेल्या शतकापासून प्रयत्न केले: मग ती १०० वर्षांपूर्वीची १९ वी घटना दुरूस्ती असो, ५५ वर्षांपूर्वीचा मतदान हक्क कायदा असो किंवा आताचे २०२० चे मतदान, ज्यात नवीन पिढीच्या स्त्रियांनी बॅलटवर मत नोंदवून मूलभूत अधिकारांसाठीचा आपला लढा कायम ठेवला. उद्दिष्टांसाठी असलेल्या त्याच लढ्याचे, त्याच चिकाटीचे आणि त्याच शक्तीचे मी आजच्या रात्री एक प्रतिबिंब म्हणून त्यांच्याच खांद्यावर उभे आहे... मी विचाराधीन आहे की त्यांचे कोणते जू मी हलके करू शकते व त्यासाठी मला काय करता येईल?

आणि किती अद्भूत हा करार की ज्यो सारख्या चारित्र्यवान नेत्याने मोठ्या धैर्याने सर्व साखळ्या तोडत एका स्त्रीला उपाध्यक्ष म्हणून उभे करावे!

परंतु जरी मी या पदावर नियुक्त झालेली पहिली स्त्री असले; तरीही खचितच मी या पदावरील शेवटची स्त्री नाही. But while I may be the first woman in this office, I won’t be the last. (टाळ्यांचा पुन्हा एकदा या ऐतिहासिक वाक्यासाठी कडकडाट) कारण प्रत्येक बालिका जी हा प्रसंग पाहत आहे ती निश्चितच हे देखील पाहत असणार की हे राष्ट्र सर्वसंभाव्य गोष्टींचे आहे आणि देशातील प्रत्येक मुलामुलींना आज एक संदेश मिळालेला आहे: 'महत्वाकांक्षा धरून स्वप्न पाहा, श्रध्देने नेतृत्व करा, आणि अशा एका मार्गावर वाटचाल करा जिथे इतरांना सहज जाता येणार नाही; कारण त्यांनी तो मार्ग पूर्वी कधी पाहिलाच नाही. आणि त्या मार्गावर आम्ही तुमचा पदोपदी गौरव करू'.

आणि सर्व अमेरिकन नागरिकांना मला सांगायला आवडेल की तुम्ही कोणाला मत दिलं हे आता महत्त्वाचं नाही; मी ओबामांच्या काळातील उपाध्यक्ष ज्यो बायडन प्रमाणेच तुमची उपाध्यक्ष म्हणून माझी भूमिका निभावेन - इमानी, प्रामाणिक, कार्यतत्पर राहून तुमच्या व तुमच्या परिवाराचा विचार करतच माझ्या दिवसाची सुरूवात करेन. कारण खऱ्या कामाला सुरूवात आताच झालेली आहे- कठीण काम, विधायक काम, सुंदर काम! सर्वांच्या आयुष्याचे रक्षण करत या महामारीला संपवण्याचे काम. कामगार वर्गासाठी काम करणाऱ्या अर्थव्यवस्थेची पूर्नबांधणी करण्याचे काम. आपल्या न्यायरचनेत आणि सामाजिक जीवनात शिरकाव करू लागलेल्या वंशवादाचे निर्मूलन करण्याचे काम. पर्यावरण समस्यांचे निराकरण, देशाचे ऐक्य व देशाच्या आत्म्याला नवसंजीवन देण्याचे काम! आणि ही वाट सरळ नक्कीच नाही. परंतु त्यासाठी अमेरिका तत्पर आहे आणि त्यामुळेच तत्पर आहोत मी आणि ज्यो. आपण अशा एका अध्यक्षाची निवड केलेली आहे जो आपल्यातील आदर्शाचे प्रतिनिधित्व करेल. असा नेता ज्याचा सन्मान पूर्ण जग करेल आणि बालके ज्याच्यावर आदराने पाहतील. असा लष्कर प्रमुख जो सैन्यांचा सन्मान करेल व राष्ट्र सुरक्षेसाठी सदैव कटीबद्ध असेल. आणि अमेरिकेचा जो अध्यक्ष असेल. (यानंतर भाषण संपवताना दिले जाणारे निरोपाचे औपचारिक अभिवादन न करता कमला यांनी पुढील भाषण करण्यासाठी राष्ट्राध्यक्ष बायडन यांना पाचारण केले.)

( लेखक नरसी मोनजी महाविद्यालयात वाणिज्य अध्यापक असून भारतीय संगीत आणि गांधी विचारांचे अभ्यासक आहेत.)

# त्याचं देऊळ, त्याचा देव....

• आलेक्स मच्याडो, नंदाखाल, वसई

राजू घाईघाईतच घराकडे निघाला होता. संध्याकाळचे साडेपाच वाजून गेले होते. त्याने चालता चालता खांद्याला हलकासा झटका देत पाठीवरचं दप्तर नीट केलं. त्याच्या अनवाणी पायांना आता रस्त्यावरील दगड टोचत होते, पण त्याला ह्या सगळ्या गोष्टींची सवय झाली होती. छोटी  कधीच पोहोचली असेल घरी. आपली वाट पाहात असतील सगळे. पप्पा घरी पोहोचायच्या आत आटपायला हवं सगळं. त्याच्या मनात विचार येता बरोबर त्याची पावलं झपझप पडू लागली.

त्याचा अंदाज खरा ठरला. त्याची धाकटी बहीण त्याची वाट पाहात दारातच ऊभी होती. त्याला पाहताच तीने " मम्मी, दादा आला गं." म्हणत मम्मीला आवाज दिला आणि धावतच आत पळाली. राजू पटकन घरात शिरला. पाठीवरचं दप्तर काढून कोपऱ्यात ठेवलं. तेवढ्यात मम्मीदेखिल आली, सोबत दोन लहान मुली होत्या, छोटीच्याच वयाच्या, छोटीच्या खास मैत्रिणी होत्या त्या. तीने आज मुद्दामहून घरी बोलावलं होतं त्यांना.

"राजू घाई कर. हे यायच्या अगोदर आटपायला हवं." हे बोलताना मम्मीची नजर एकसारखी दाराबाहेर जात होती. राजूला मम्मीची खूप दया आली. किती दबावाखाली असते नेहमी, सतत एका अनामिक भितीच्या छायेत. स्वत:विषयीच्या न्युनगंडामध्ये जणू आकसून गेलं होतं तिचं सारं शरीर.

राजूने झटकन कोपऱ्यातलं जुनं लाकडी स्टूल ओढून घेतलं. मम्मी पटकन आत गेली आणि एका हातात स्टीलच्या प्लेटमध्ये ठेवलेला छोटासा केक घेऊन आली. सकाळीच तिने तो शेजारच्या बेकरीतून आणून ठेवला होता. मम्मीने केक स्टूलवर ठेवला. छोटी आणि तिच्या दोन्ही मैत्रिणी स्टूलजवळ आल्या. छोटीच्या चेहऱ्यावर छान हसू फुललं होतं. स्वारी खुष दिसत होती. साहजिकच होतं. आज तिचा सातवा वाढदिवस होता आणि आज पहिल्यांदाच तिच्या वाढदिवसाला केक कापला जात होता. तिने तिच्या मैत्रिणींकडे पाहीलं, हसत हसत, अभिमानाने. मम्मीने आपल्या हातातील सुरी छोटीच्या हातात दिली.

"मम्मी एक मिनीट." राजूला अचानक काहीतरी आठवलं. तो धावतच आत गेला आणि हातात एक मेणबत्ती आणि काडेपेटी घेऊन बाहेर आला. गेल्या आठवड्यात त्याच्या एका मित्राच्या घरी त्याने बघितलं होतं, केकच्या बाजूला एक मेणबत्ती ऊभी केलेली होती.

"घाई कर राजू." मम्मीची नजर बाहेर रस्त्यावर लागलेली होती.

"हो मम्मी."

राजूने हातातल्या काडेपेटीने मेणबत्ती पेटवली आणि स्टूलवर केकच्या बाजूलाच ऊभी केली. छोटीने हातात सुरी धरली, तिच्या मैत्रिणी तिच्याकडे कौतुकाने बघत होत्या. सगळ्यांची नजर केकवर लागलेली होती, दोन्ही हात टाळी वाजवण्याच्या पवित्र्यामध्ये. छोटी थोडी खाली वाकली आणि ती आता केकवर सुरी ठेवणार...... ईतक्यात पाठीमागून आवाज आला..

"अऽऽऽर्रेर्रेरे व्वा....सेल्लेऽऽऽब्रऽऽर्रेऽऽऽऽशन....?"

दारात पप्पा ऊभे होते. सगळेच गांगरले. आज लवकर कसे आले हे? विस्कटलेले केस, तांबारलेले डोळे, दाढीची खुंटं वाढलेली, अंगात मळलेले कपडे. झोकांड्या देत ऊभे होते. दोन्ही हात दरवाजाच्या दोन बाजूवर धरून जेमतेम ऊभं राहण्याचा प्रयत्न चालला होता. मान डकाडका हलवत ते एकेकाकडे आळीपाळीने बघत होते.

मम्मी पाणावलेल्या डोळ्यांनी त्यांच्याकडे बघत होती. राजूला तर लाजेने मेल्याहून मेल्यसारखं झालं होतं. छोटीच्या हातातली सुरी तशीच होती. ती  मम्मीच्या पदराला धरून, पप्पांकडे भेदरलेल्या डोळ्यांनी पाहात होती. तिच्या मैत्रिणी गोंधळून गेल्या होत्या. पप्पा एक एक पाऊल ऊचलत, झोकांड्या खात त्यांच्या दिशेने येऊ लागले. मैत्रिणी घाबरून दोन पावलं मागे सरकल्या. तारवटलेल्या डोळ्यांनी त्यांनी एकदा केकवर बघीतलं.

" वाढदिऽऽऽवऽऽऽस....र्राजकुमार्रीऽऽऽचा.... मऽऽऽस्स्सत..."

आता ते मम्मीच्या पुढ्यात येऊन ऊभे राहिले, तोल सांभाळत. बोलताना त्यांची जीभ अडखळत होती. तोंडाला दारूचा ऊग्र वास येत होता.

"मला द्याऽऽयऽऽला पैशे नाहीत तुझ्याकडे आणि ऽऽऽऽ." त्यांची जीभ जड झाली होती. केककडे पाहात हाताने नुसतेच हातवारे करत राहीले ते.

"अहो..." मम्मीच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. तीने छ़ोटीच्या डोक्यावर हात ठेवत तिला पोटाशी घट्ट पकडून ठेवलं होतं.

"मला पैशे पायऽऽऽऽजेत.... आत्ताऽऽऽ...."

"अहो, नाहीयेत पैशे माझ्याकडे..." मम्मी काकुळतीला आली होती.

" चूऽऽऽऽप... खोटं बोल्लऽऽऽतेस तू...." केककडे पाहात हातवारे करत ते म्हणाले,

"ह्याच्यासाठी आहेत पैशे... पण माज्याकऽऽऽऱ्र्ररता नाहीत?"

"अहो...असं काय करता?आपल्या छोटीचा वाढदिवस. तिच्यासाठी......."

डुलत डुलत पप्पा आता स्टूलच्या बाजूला ऊभे होते.त्यांचे डोळे आता लाल झाले होते. त्यांनी एकदा रागाने छोटीकडे पाहीलं. ती थरथर कापत, मम्मीला घट्ट चिकटून ऊभी होती. वाढदिवस, केक सगळं सगळं ती विसरून गेली होती. पप्पा तसेच झुलत झुलत खाली वाकले. एक क्षण त्यांनी त्या केकवर बघितलं आणि दुसऱ्याच क्षणाला त्यांनी ती स्टीलची प्लेट हाताने जोरात ढकलून दिली स्टूलवरून, प्लेट खाली पडल्याचा आवाज झाला मोठा, प्लेट घरंगळत गेली एका कोपऱ्यात. केक सगळा जमिनीवर पसरला. छोटीच्या दोन्ही मैत्रिणी घाबरून घराबाहेर पळाल्या. छोटीच्या गळ्यातून अस्पश्ट असा हुंदका ऊमटला.

" हँ हँ हँ हँ....." पप्पा जोरजोरात हसत होते.

" हँप्पी बऱ्र्र्ररडे टू यू.....हँपी बर्र्र्ररडे टू यू..." भसाड्या आवाजात गाणं गात, झोकांड्या खात पप्पा बाहेर गेले, ओटीवर. बाकड्यावर झोपायला. राजू तसाच आतल्या खोलीत गेला. छोटीच्या मैत्रिणींच्या देखत झालेला प्रकार त्याच्या मनाला फार लागला होता. खूप अपमानीत झाल्यासारखं वाटत होतं त्याला. गादीमध्ये ऊताणा पडून त्याने ऊशीमध्ये तोंड खुपसले. त्याच्या डोळ्यासमोर मम्मीचा केविलवाणा चेहरा आणि छोटीचे भितीने भेदरलेले डोळे दिसू लागले.

का? का?? का??? हे सगळं आमच्याच नशिबी का?

बाहेर आता काळोख पडू लागला होता आणि राजूच्या कुटूंबातसुध्दा. त्याचं मन आतल्या आत आक्रंदत होतं. पप्पांचा खूप राग येत होता त्याला. तो हमसून हमसून रडू लागला, गालावरून अश्रुंच्या गरम धारा वाहू लागल्या........

किती छान दिवस होते ते?.....

सगळ्या आठवणी दाटू लागल्या राजूच्या मनात. पप्पांचे लाड आणि मम्मीचं प्रेम ह्यामध्ये जणू न्हाऊन निघत होतं राजूचं बालपण. त्याची सगळी हौस मौज पुरवली जात होती. पप्पांचा व्यवसाय छान चालला होता. आजुबाजूच्या परिसरात अतिशय आनंदी आणि आदर्श कुटूंब म्हणून त्यांचं कुटूंब ओळखलं जात होतं. मम्मी म्हणजे ऊत्साहाचा आणि आनंदाचा खळखळता झराच जणू. सगळं घर कसं अगदी प्रसन्न वाटायचं. राजू शाळेत जाऊ लागला त्याचवर्षी घरात छोटीचं आगमन झालं. मग काय? सगळं घर जणू बहरूनच गेलं.

पण.........

कोणाची तरी नजर लागली जणू ह्या सुखी कुटूंबाला. पप्पांच्या ओठाला कुठेतरी पहिला घोट लागला मद्याचा आणि मग अधूनमधून सुरू झालं त्यांचं. सुरूवातीला काही जाणवलं नाही. ऊलट पप्पांना त्याच्यामध्ये एक प्रकारचं थ्रिल वाटू लागलं. मम्मीच्या मनात सुरुवातीला भिती वाटली जराशी. तिने त्यांना सावध करण्याचा प्रयत्न देखिल केला. त्यांनी हसण्यावर नेलं. वेड्यातच काढलं तिला. मम्मीचा पण पप्पांवर भरवसा होता. ते हुशार आहेत, कुठे थांबायचं हे त्यांना नक्कीच कळतंय, अशी स्वतःचीच समजूत काढली तिने. पण.....

पप्पांचं पिणं वाढत गेलं. दोस्तांचा गोतावळा वाढत गेला. ऊशीरा पिऊन घरी येणं मग नित्याचंच झालं. घरामध्येच पार्ट्या झोडायला सुरूवात झाली. शेवटी व्हायचं तेच झालं. पप्पांच तब्येतिची वाट लागली. धंद्यावरचं लक्ष ऊडालं. जवळचं सगळं संपवून टाकलं. हळुहळू बाजारात पप्पांचं नाव खराब झालं. व्यवसाय बंद पडला. एकेकाळी खाण्यापिण्याची रेलचेल असलेल्या घरात दोन वेळच्या खाण्याचे हाल होऊ लागले. नेहमी ताठ मानेने चालणाऱ्या मम्मीची मान खाली गेली. कधीकाळी दागिन्यांची मनसोक्त हौस करणारी मम्मी पार लंकेची पार्वती बनून गेली. पप्पा जसजसे कंगाल होत गेले तसतसे एक एक करत त्यांचे दोस्त सुध्दा गळाले. शितं होती तोवर ही फुकटपिऊ भूतं होती बरोबर. शितं संपली, भुतं देखिल पळाली. मग सगळा राग घरामध्येच, कधी मम्मीवर कधी मुलांवर निघू लागला. घरात नेहमीच आरडाओरड. कुटूंबातील शांती संपली.

मम्मी काहीबाही कामं करून फाटक्या संसाराला ठिगळ लावत होती. राजूचं आणि छोटीचं बालपण खुरटत चाललं होतं. .......

ह्या आठवणी जाग्या करत त्यादिवशी राजू तसाच झोपी गेला, ऊपाशी पोटी.

त्यानंतर राजू जणू त्याच्या कोषातच राहू लागला. त्याला स्वतःबद्दल जणू एक प्रकारचा न्युनगंड वाटू लागला. रस्त्यातून चालताना त्याला वाटायचं, सगळी लोकं आपल्याकडे बोटं दाखवत फिदीफिदी हसताहेत. त्याची मान आपोआप खाली जाई. शाळेमध्ये खेळणं, हसणं सगळंच थांबलं त्याचं. अभ्यासात गाडून घेतलं त्याने स्वतःला. राजू तसा जात्याच हुशार आणि सालस, नम्र. चौधरी सरांचा खूप आवडता विद्यार्थी. राजूच्या वागण्यातला बदल त्यांना जाणवत होता. काहीतरी बिघडलंय हे त्यांना समजत होतं. त्यादिवशी शाळा सुटली आणि राजू नेहमीप्रमाणे सगळ्यात शेवटी वर्गाबाहेर पडला. मान खालीच होती त्याची.

"राजू."

हाक ऐकून राजूने समोर पाहिले. चौधरी सर होते समोर.

"गुड ईव्हनिंग सर." राजूचा नेहमीचाच नम्र स्वर. चौधरीसरांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला, प्रेमाने.

" आपण बोलू या पाच मिनीटं राजू?" राजूने नुसतीच मान हलवली. तो गोंधळला होता, थोडा घाबरला देखिल होता. काय चूक झाली असेल माझ्याकडून? कशाला थांबवलंय सरांनी मला?

तो थोडासा भित भितच चौधरीसरांमागोमाग वर्गात शिरला.

"बस राजू." एका बेंचवर बसत चौधरीसरांनी राजूला म्हटलं.

थोडा वेळ ते तसेच बसले राजूकडे पाहात, राजूची मान खालीच होती.

"काय झालंय राजू?" अचानक आलेल्या प्रश्नाने राजू गोंधळला.

"क क काही नाही सर.." जेमतेम शब्द फुटले त्याच्या तोंडातून.

"राजू, मी ईतक्या दिवसात बघतोय तुझ्या वागण्यातला फरक. घरी काही अडचण आहे का?" चौधरी सरांनी त्याच्या केसावरून मायेने हात फिरवला. राजूला रडू कोसळलं. चौधरी सरांनी त्याला थोपटल्यासारखं केलं थोडा वेळ.त्याला शांत होऊ दिलं.

"सांग बघू राजू आता."

आणि राजूने अर्धवट रडत रडतच बोलायला सुरूवात केली. पप्पांचं व्यसन, घरातील वातावरण, मम्मीचे कष्ट आणि  छोटीच्या वाढदिवसाच्या दिवशी घडलेला तो प्रसंग..

चौधरी सरांच्या सगळं लक्षात आलं. राजूविषयी खूप वाईट वाटत होतं त्यांना. काहीवेळ ते शांत राहिले आणि मग मनाशी काहीतरी ठरवून ते राजूला म्हणाले..

"राजू, ऊद्या संध्याकाळी सहा वाजता तू तयार राहा. मी येतो तुला घ्यायला. आपल्याला जायचंय एका ठिकाणी."

राजू विचार करतच घरी आला. घरी आल्यानंतर मम्मीला त्याने सगळं सांगितलं. तिला पण काही समजेना कुठे घेऊन जाणार आहेत चौधरी सर राजूला .

दुसर्या दिवशी संध्याकाळी बरोबर सहा वाजता बाहेर स्कुटरचा हॉर्न वाजला. राजू तयारच होता. तो लगेच बाहेर आला.

"गुड ईव्हनिंग सर."

" गुड ईव्हनिंग, बस राजू."

सरांची स्कुटर गावाबाहेरच्या देवळाच्या दिशेने निघाली. राजू विचार करत होता. सर देवळात कशाला घेऊन जाताहेत आपल्याला?  देऊळ आलं. सर थांबले नाहीत. सरांची स्कुटर देऊळ ओलांडून पुढे गेली. देवळाच्या पाठीमागे एक ईमारत होती, थोडी जुनीच. सरांनी स्कुटर त्या ईमारतीच्या आवारात आणून ऊभी केली. तेथे अगोदरच काही सायकली आणि स्कुटर्स ऊभ्या केलेल्या होत्या.

स्कुटरवरून ऊतरून सर चालू लागले, राजूला त्यांनी हातानेच बरोबर येण्याची खूण केली. तळमजल्यावरील एका खोलीचा दरवाजा ऊघडा होता. सरांच्या पाठोपाठ राजू त्या खोलीत शिरला. त्या खोलीत बरीच मंडळी बसली होती. समोर एका कोपर्यात दोन बायका आणि त्यांच्यासोबत दोन लहान मुलंही बसली होती. राजू सरांच्या बाजूलाच एका बाकावर बसला होता. तो थोडासा बावरून गेला होता. त्याने एकदा आजुबाजूला नजर टाकली. सगळ्या चेहर्यांमध्ये आणि डोळ्यांमध्ये त्याला काहीतरी ओळखीचं भासत होतं. ते सगळ्या

चेहर्यावरचे असहायतेचे  आणि एकटेपणाचे भाव,मध्येच शुन्यात हरवणारे, मध्येच काहीतरी शोधत असल्यासारखे डोळे. आणि अचानक त्याला जाणवलं, पप्पांचा पण चेहरा असाच दिसतो, जगापासून तुटल्यासारखा,नजर अशीच असते, काहीशी निर्जिव, शुन्यात लागलेली.

त्याची नजर समोर भिंतीवर टांगवलेल्या एका छोट्या बॅंनरवर गेली. त्या बॅंनरवर लिहीलं होतं...

"हे देवा, ज्या परिस्थितीला मी बदलू शकत नाही , ती स्विकारण्यास मनाची प्रसन्नता मला दे.

जी परिस्थिती मी बदलू शकतो, ती बदलण्याचे धैर्य मला लाभू दे.

आणि अशा परिस्थितीतला भेद जाणण्याचे ज्ञान मला दे."

राजू गोंधळला होता,काही समजत नव्हतं त्याला. ईतक्यात समोर खूर्चीत बसलेल्या व्यक्तीने चौधरी सरांचं नाव घेऊन त्यांना समोर येऊन शेअरींग करण्याची विनंती केली. चौधरी सरांनी राजूच्या मांडीवर थोपटल्यासारखं केलं आणि ते समोर जाऊन ऊभे राहीले. त्यांनी एकदा सगळ्यांवर नजर टाकली आणि आपला हात ऊंचावून म्हणाले,

" मित्रांनो, माझं नाव चौधरी आहे आणि मी एक बेवडा आहे."

राजूला काही समजायच्या आधीच समोरून तेवढाच ऊस्फूर्त प्रतिसाद ऊमटला...हात ऊंचावून...

" हाय चौधरी.."

त्या खोलीत एक चैतन्य पसरल्यासारखं वाटलं त्याला.

सरांनी पुढे बोलायला सुरूवात केली..

" परमेश्वराची क्रुपा, तुम्हां सगळ्यांची साथ आणि ए ए ची मिटींग ह्यामूळे आजचा दिवस मी ह्या दारूच्या घोटापासून दूर आहे..."

राजूचा आपल्या कानावर विश्वास बसत नव्हता. चौधरी सर आणि बेवडे? कसं शक्य आहे हे? खोटं बोलताहेत हे..

चौधरीसरांचं बोलणं चालूच होतं. राजूला त्यांच्या बोलण्यातला प्रामाणिकपणा जाणवत होता.सरांच्या तोंडातून एक एक वाक्य बाहेर पडत होतं. दारूच्या व्यसनापायी सरांच्या कुटूबाची झालेली वाताहात, दारूसाठी त्यांनी स्वतःच्या बायको मुलांना केलेली मारहाण, बायकोच्या गळ्यातून खेचून काढून विकलेलं मंगळसूत्र, शाळेतील मुलांच्या सहलीच्या पैशात केलेली अफरातफर आणि शेवटी हताश होऊन केलेला आत्महत्येचा प्रयत्न. हे सगळं ऐकताना राजूला धक्क्यामागून धक्के बसत होते.

सर बोलून झाल्यानंतर परत राजूच्या बाजूला येऊन बसले. राजूला सरांविषयी अचानक एक जवळीक जाणवू लागली होती. सरानंतर आणखी काही जण बोलले. ऐकताना राजूला वाटत होतं जणू ते सर्व आपल्या पप्पांचीच कहाणी सांगताहेत. किती साम्य होतं सगळ्यांच्या सांगण्यामध्ये आणि त्याच्या कुटूंबाच्या परिस्थितीमध्ये. प्रत्येक जण शेवटी एकच सांगत होता, मद्यपाश हा एक जिवघेणा आजार आहे आणि ए ए च्या मिटींग्ज हा त्याच्यावरील ऊपाय आहे. सरांच्या स्कुटरवरून घराकडे परतताना राजूच्या डोळ्यासमोर पप्पाच दिसत होते. पप्पा सरांसारखे बाहेर पडू शकतील का दारूच्या ह्या विळख्यातून? एकसारखा विचार येत होता राजूच्या मनात. सरांनी स्कुटर राजूच्या घराच्या जरा अलिकडेच थांबवली. राजू खाली ऊतरला. सरांचा निरोप घेऊन घराकडे वळला. अचानक तो परत फिरला.

" सर, एक विचारू?"

" बोल राजू.."

"सर , खरंच तुम्ही....."

"हो, राजू मी खरंच बेवडा आहे. एक एक दिवस करत मी आज कित्येक वर्षे ह्या दारूपासून दूर राहीलो आहे."

"सर, मग माझे पप्पा पण ...."

" राजू, मद्यपाश हा महाभयानक असा आजार आहे. तुझ्या पप्पांना पण हाच आजार जडला आहे. एक आजारी माणूस म्हणून तुम्ही त्यांच्याकडे पाहा. तुमच्या रागाची नव्हे तर प्रेमाची जास्त गरज आहे त्यांना."

थोडा वेळ थांबून ते राजूला धीर देत म्हणाले,

" आपण पप्पांना ह्या आजारातून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न करू या."

राजू घरी आला. घरात नेहमीप्रमाणे आरडाओरड सुरूच होती. पण आज राजूला पप्पांचा राग नाही आला. रात्री सगळं सामसूम झाल्यावर राजूने मम्मीला आज घडलेला सर्व प्रकार सांगितला. त्या माऊलीला आशेचा अंधूक किरण दिसू लागला.

" मम्मी, सर एक दिवस येतील पप्पांशी बोलायला."

आणि खरंच दुसऱ्याच दिवशी, अगदी सकाळीच सर राजूच्या घरी पोहोचले. पप्पा निघायच्या तयारीतच होते. सरांनी त्यांना थांबवलं. थोडंसं जुजबी बोलणं झाल्यानंतर त्यांनी मुद्द्याला हात घातला. मुलांचा अभ्यास, घरातलं वातावरण असं करत त्यांनी पप्पांना शनिवारी संध्याकाळी मिटींगला येण्याविषयी सांगितलं. एरव्ही पप्पांनी सरांचं ऐकलंच नसतं, ओरडले असते, रागावले असते, शिवीगाळही केली असती.

मला शिकवू नका, मी काय गटारात पडलोय का? असं म्हटलं असतं. पण सकाळची त्यांची परिस्थिती निराळी होती. पोटात इंधन गेलं नव्हत त्यामूळे मेंदूला झिंग चढली नव्हती. आणि खरं म्हणजे पप्पांना पण कळत होतं. त्यांना सुध्दा सुटका हवी होती ह्या सगळ्यातून पण मार्ग दिसत नव्हता. सरांनी जाता जाता पप्पांकडून शनिवारी मिटींगला येण्याचं वचन घेतलं आणि ते निघाले.

आदल्या दिवशी ठरविल्याप्रमाणे मम्मी शनिवारी घरीच थांबली. राजू सुध्दा शाळेत गेला नाही. पप्पांना कसंही करून आज मिटींगला पाठवायचंच असं त्यांनी ठरवलं होतं. पप्पा नुसते अस्वस्थ झाले होते. सारखं आत बाहेर चाललं होतं. ओरडत होते मध्येच मम्मीवर.पण मम्मीने आणि राजूने त्यांना घराबाहेर पडूच दिले नाही.

संध्याकाळी बरोब्बर सहा वाजता सरांची स्कुटर आली. पप्पांना घरी बघून त्यांना आनंद झाला. पप्पा जरासे नाराजीनेच सरांच्या स्कुटरवर बसले. रात्री सुमारे नऊ वाजता सरांनी पप्पांना घरी सोडलं. एरव्ही लडखडत आणि आरडाओरड करत येणारे पप्पा आज शांत होते. ते कोणाशीच जास्त बोलले नाहीत. मम्मीने त्यांच्याशी बोलायचा प्रयत्न केला पण त्यांनी प्रतिसाद दिला नाही. विचारात गढल्यासारखा चेहरा दिसत होता.

त्यांनी एकदा हळूच मुलांच्या खोलीत डोकावून पाहीले ,ती दोघं अभ्यास करत बसली होती ,पण मुलांशी बोलायचं धाडस नाही झालं त्यांना. कधी नव्हे ते आज कितीतरी दिवसांनी ते कुटूंब शांतपणे झोपी गेलं.

सर दोन तीन दिवसाआड सकाळीच येऊन पप्पांना भेटत होते. दुसर्या शनिवारी संध्याकाळी सर परत पप्पांना घेऊन गेले मिटींगसाठी. हळुहळू पप्पा मिटींगमध्ये रमू लागले. हल्ली ते स्वतःच जात असत मिटींगला. दोन महिने होऊन गेले. पप्पा दारूला शिवले नव्हते. राजूचं घर आता हळुहळू सावरू लागलं होतं. घरात शांतता होती. पप्पांनी हळुहळू परत कामाला सुरूवात केली होती. जुन्या ओळखी ऊपयोगी पडत होत्या.पप्पांना काम मिळत होतं. पुन्हा एकदा व्यवसायात जम बसत होता. मम्मीच्या चेहर्यावर अधुनमधून हसू ऊमटू लागलं होतं. राजू आणि छोटीला आता शाळा सुटल्यानंतर घराची ओढ लागू लागली होती. पप्पांची मेहनत वाढत चालली होती. ईतक्या वर्षात गमावलेलं सगळं कमावण्यासाठी जणू त्यांची धडपड चालली होती. मुलांना आणि पत्नीला दिलेल्या त्रासाची त्यांना भरपाई करायची होती. कुटूंब हळुहळू सावरत होतं, विस्कटलेली घडी परत बसू लागली होती. राजू आणि छोटी  शिक्षणाची एक एक पायरी चढत भविष्याकडे वाटचाल करत होते.

शनिवारची मिटींग मात्र पप्पा कधीच चुकवत नव्हते. अकरा वर्षे निघून गेली.

.............

" वेलकम टू एन् के एंटरप्रायझेस, मिस्टर राजेश." सरदेशमुखसाहेबांनी आपल्या खूर्चीतून ऊठून राजूचे हात हातात घेत त्याचं अभिनंदन केलं. " Heartiest congratulations young man for getting selected for this prestigious institution." एवढं बोलून त्यांनी आपल्या टेबलावरील लिफाफा ऊचलला आणि राजूच्या हातात दिला.

" हिअर ईज युवर अपाँईंटमेंट लेटर."

राजू काही क्षण एकटक हातातल्या लिफाफ्याकडे बघत राहिला. त्या तेवढ्या क्षणांमध्ये सारा ईतिहास त्याच्या डोळ्यापुढून तरळून गेला. मम्मी, पप्पा, छोटी, छोटीच्या वाढदिवसाचा तो प्रसंग.त्याचे डोळे पाणावले.

" घरी सांगायचीय ना गुड न्युज ,मिस्टर राजेश."

त्याची ती अवस्था बघून सरदेशमुखसाहेबांनी कौतुकानेच विचारलं.

" एस , एस सर. थँक्यु व्हेरी मच सर." कसंबसं बोलून राजू बाहेर पडला.

कधी एकदा घरी पोहोचतोय असं झालं होतं राजूला.

दारात येताच त्याने मम्मीला हाक मारली. एवढ्यात पप्पा देखिल खोलीतून बाहेर आले. ते कोठेतरी बाहेर जाण्याच्या तयारीतच दिसत होते.

" मम्मी, पप्पा आज माझ्या , नव्हे आपल्या आयुष्यातील अतिशय आनंदाचा दिवस. पप्पा, मम्मी हे माझं अपॉईंटमेंट लेटर."

एवढं बोलून त्याने लिफाफा पप्पांच्या हातात दिला. पप्पांच्या आणि मम्मीच्या डोळ्यांतून नकळत अश्रू ओघळले. एवढ्यात छोटी देखिल कॉलेजमधून आली.

मम्मीने तिला ही आनंदाची बातमी सांगताच तिने धावत जाऊन राजूला मिठीच मारली.

" कॉंग्रेच्युलेशन्स दादा. " आनंदाने किंचाळलीच ती.

" चला, आज आपण सगळे देवळात जाऊ या. देवाचे आभार मानू या. 'त्या"नेच हे सगळं घडवून आणलंय."

थोड्याच वेळाने चौघं जण देवळाच्या दिशेने निघाले. पप्पांच्या स्कुटरमागोमाग राजूची स्कुटर होती. देऊळ समोर दिसू लागलं. पण हे काय, पप्पा देऊळ ओलांडून पुढे निघाले. राजूने हॉर्न वाजवला, बहुदा हे भावनेच्या भरात पुढे गेले असावेत.

पप्पांची स्कुटर देवळाच्या मागच्या बाजूला असलेल्या जून्या ईमारतीच्या आवारात घुसली. पाठोपाठ राजू सुध्दा पोचला तेथे. आवारात आधीपासूनच काही स्कुटर्स आणि सायकली ऊभ्या होत्या. अचानक राजूच्या लक्षात आलं, अरे, आज तर शनिवार, पप्पांची मिटींग असते आज, आणि ते कधीही मिटींग चुकवत नाहीत. बहुतेक मिटींग आटपल्यानंतर देवळात जायचं असेल.

पप्पा आणि त्यांच्या मागोमाग मम्मीने तळमजल्यावरील त्या ऊघड्या खोलीत प्रवेश केला. राजू आणि छोटी सुध्दा आलेच मागोमाग.

मिटींग सुरू होती. चौधरी सर आज समोर बसले होते , खुर्चीत. कोणाचं तरी शेअरींग सुरू होतं. राजूने एकवेळ सभोवार नजर टाकली आणि तो ते शेअरींग ऐकू लागला.

तसा राजू यायचा अधुनमधून येथे, वेळ मिळाला की. येथे आल्यानंतर त्याच्या मनाला दोन गोष्टी सतत जाणवत राहायच्या. पहिली, एक मद्याचा घैट एखाद्या जीवनाची कशी वाताहत करू शकते आणि दूसरी , दुर्दम्य ईच्छाशक्ती असेल तर माणूस राखेच्या ढिगार्यातून फिनिक्स पक्षासारखी पुन्हा कशी भरारी घेऊ शकतो.

समोरच्याचं शेअरींग संपलं तसा पप्पांनी चौधरी सरांकडे पाहात हात जरासा ऊंचावला. चौधरीसरांनी पप्पांचं नाव घेऊन त्यांना शेअरींगसाठी पुढे बोलावलं. पप्पा थोडा वेळ तसेच ऊभे राहिले सर्वांकडे पाहात. मग मागे वळून त्यांनी एकदा भिंतीवर टांगलेल्या बँनरवर बघितले आणि आणि आपला हात ऊंचावला.

" मित्रांनो, माझं नाव अनील, मी एक बेवडा आहे."

"हाय अनील." समोरून तेवढाच ऊस्फूर्त प्रतिसाद.

"परमेश्वराची क्रुपा, तुम्हां सगळ्यांची साथ आणि ए ए.ची मिटींग ह्यामुळे मी आजचा दिवस दारूच्या ह्या विषारी घोटापासून दूर आहे."

राजूला अकरा वर्षापूर्वी तो चौधरी सरांबरोबर पहिल्यांदा ह्या मिटींगला आला होता तो प्रसंग आठवला.

पप्पा बोलू लागले..

" मित्रांनो, जवळ जवळ अकरा वर्षाअगोदर मी येथे , ह्या खोलीत पहिल्यांदा आलो. खरं म्हणजे तो मी नव्हतोच. एक मुडदा होता, चालता फिरता. त्याला ना वर्तमान होतं ना भविष्यकाळ. होता तो फक्त भूतकाळ, अतिशय लाजिरवाणा, काळाकुट्ट. त्याला कान होते पण ते बधीर झाले होते, डोळे होते पण दारूच्या नशेत चूर होऊन तो आंधळा झाला होता, त्याला जीभ होती पण ती जडावलेली होती, शब्द फुटत नव्हते."

पप्पा क्षणभर थांबले, ते भावूक झाले होते. "मित्रांनो, येथे आलो आणि तुमच्या सोबतीत त्या मुडद्यामध्ये जीव येऊ लागला. कानांना शब्द कळू लागले, डोळे स्वच्छ होऊन नवीन द्रुष्टी मिळाली. जीभेमधून शब्द ऊमटू लागले, मुडदा जीवंत झाला, त्याला वर्तमान कळू लागलं, भवितव्य दिसू लागलं."

मम्मीने डोळ्याला पदर लावला होता. छोटीला आपल्या भावना आवरणं कठिण जात होतं.

" मित्रांनो माझ्यासाठी आणि माझ्या कुटूंबासाठी हा एक चमत्कार आहे आणि असा चमत्कार फक्त देव करू शकतो, देवळातच होऊ शकतो. आज मी माझ्या कुटूंबाला म्हटलं, आपण देवळात जाऊ या, देवाचे आभार मानायचे आहेत."

पुन्हा एक क्षणभर ते थांबले, त्यांनी चौधरी सरांवर एक नजर टाकली.

" आणि मी त्यांना येथे, ह्या खोलीत घेऊन आलो.मित्रांनो, माझ्यासाठी ही खोली म्हणजेच देऊळ आणि तुम्ही सर्व माझ्यासाठी देवासारखे आहात."

त्यांचा कंठ दाटून आला होता. त्यांनी आपल्या हातातला लिफाफा चौधरी सरांसमोरील टेबलावर ठेवला. काही क्षण खोली एकदम स्तब्ध झाली. चौधरीसर ऊठले आणि त्यांनी पप्पांना मिठी मारली.दोघांच्या डोळ्यातून अश्रू वाहात होते. सगळी खोली ऊभी राहिली होती, टाळ्यांचा कडकडाट सुरू होता. राजू पाण्याने भरल्या डोळ्यांनी भिंतीवरील त्या बॅंनरवर पाहात होता.

"हे देवा, ज्या परिस्थितीला मी बदलू शकत नाही , ती स्विकारण्यास मनाची प्रसन्नता मला दे.

जी परिस्थिती मी बदलू शकतो, ती बदलण्याचे धैर्य मला लाभू दे.

आणि अशा परिस्थितीतला भेद जाणण्याचे ज्ञान मला दे."

आज ईतक्या वर्षानंतर राजूला त्या प्रार्थनेचा अर्थ समजला होता. पप्पांविषयीच्या अभिमानाने राजूचा ऊर भरून आला.

# स्त्री उद्धारक- येशू ख्रिस्त

© डॉ .नेन्सी विन्सेंट डिमेलो, गास, वसई

ती कबरेजवळ रडत उभी होती, तो तिला येशू उभा असलेला दिसला..... धन्य ती स्त्री मग्दालीया मरिया, जिला पुनरुथीत येशूने प्रथम दर्शन दिले...

जिथे जगातील सर्व धर्मसंस्थापकांनी स्त्रियांची ओझरती भेटही पुरुषाच्या मनात विषयभावना, लैंगिक आकर्षण निर्माण करून पूर्णत्वाकडे जाऊ इच्छिणाऱ्या संन्याशाला त्याच्या मार्गावरून मागे फिरवते असे ठामपणे मांडले आहे. तिथे स्त्रीच्या पोटी जन्म घेऊन, रक्तस्त्रावी, पापी, विधवा स्त्रियांत सतत संचार करून त्यांना मुक्तीचा मार्ग दाखवणारा येशू ख्रिस्त हा महान करुणामयी असा प्रथम स्त्री उद्धारक आहे.

अनेक धर्मांत मोक्षप्राप्ती ही फ़क्त पुरुषासाठी असून स्त्री ही मोक्षप्राप्तीचे साधन समजली जाते. स्त्री मोहाचे, पापाचे मूळ असल्यामुळे तिच्याबाबत कशी सावधगिरी बाळगावी हे विविध धर्मांच्या धर्मग्रंथात नमूद आहे. परंतु स्त्रीच्या हातून जे गुन्हे, ज्या चुका घडतायत त्या घडू नये म्हणून कोणती खबरदारी घ्यावी हे तिला येशूशिवाय कोणत्याही धर्मसंस्थापकांनी सांगितलेले नाही. अवतीभवती स्त्री असण्यानं आपला सर्वनाश होईल, तपोभंग होईल असा विचारही कधी येशूला शिवला नाही. त्यामुळे 'स्त्रीकडे पाहू नये, बोलु नये.. वगैरे उपदेश येशूने आपल्या शिष्यांना कधी केला नाही.

ख्रिस्ताच्या काळी यहुदी समाजात स्त्रीला मानाचे स्थान नव्हते.. एखादी स्त्री रस्त्यात परपुरुषाशी बोलली, स्वयंपाक करताना तिच्याकडून भाकरी करपली गेली तर तिला पोटगी न देता, घटस्फोट देता येत असे. पुरुषाने समाजात मिसळावे, परंतु स्त्रीने चार भिंतीच्या आतच राहावे असा नियम होता. अशा अतिशय कर्मठ समाजात ख्रिस्ताचा उदय झाला. ख्रिस्ती धर्म संस्थापक येशूची स्त्री विषयक भूमिका ही बायबलमधील जुना करार, मोशेच्या आज्ञा पेक्षा भिन्न आहे. मोझेसच्या जुन्या करारात व्यभिचारी स्त्रीला तसेच व्यभिचारी पुरुषालाही दगडांनी मारावे असे नमूद आहे. 'समान गुन्ह्याला समान शिक्षा' असा न्याय दाखवला असला तरी आपले कौमार्य सिद्ध करण्याची वेळ स्त्रीवरच येते, पुरुषाला कधी आपले पावित्र्य सिद्ध करावे लागत नसल्याचे या करारातील काही अटी वाचताना लक्षात येते.

येशू ख्रिस्ताच्या आयुष्यातला एक प्रसंग सर्वज्ञात आहे. एका स्त्रीला प्रत्यक्ष व्यभिचार करत असताना पकडण्यात आले. व्यभिचार करणाऱ्याला दगडांनी मारण्याची शिक्षा जुन्या करारात सांगितलेली असल्याने आज्ञेचे पालन करण्यासाठी म्हणजेच त्या व्यभिचारी स्त्रीला दगडमार करण्यासाठी लोक एकत्र जमले. हे सगळं प्रकरण येशूकडे नेण्यात आलं. लोक येशूला म्हणाले. “गुरुवर्य, या स्त्रीला व्यभिचार करताना पकडण्यात आले आहे. आपल्या धर्मशास्त्राप्रमाणे मोशेची आज्ञा आहे की अशा स्त्रियांना दगडमार करावा. पण तुमचे म्हणणे काय आहे ?" येशू म्हणाला, "तुम्हांमध्ये जो निष्पाप असेल त्याने प्रथम तिच्यावर दगड टाकावा. "हळूहळू एकेकाने काढता पाय घेतला. येशू एकटाच राहिला. समोर ती बाई तशीच उभी होती. येशूने आजूबाजूला नजर टाकली. तो तिला म्हणाला, "बाई, तुला दोष देणारे कोठे आहेत ? तुला कोणी दंड ठरविला नाही काय ?" “कुणी नाही.” ती म्हणाली. “मीही तुला दंड ठरवित नाही, जा, ह्यापुढे पाप करू नकोस." येशूने तिला सांगितलं. (योहान ८, १-११) ख्रिस्ताने त्या भगिनीला नवे जीवन जगण्याची उभारी दिली आणि तिला दोषी ठरवू इच्छिणाऱ्या लोकांना निरुत्तर केले. प्रत्येक पापी स्त्रीच्या मागे पुरुष असतो, व्यभिचारिणीच्या पापात त्याचाही वाटा असतो हे ख्रिस्ताने जमलेल्या लोकांना दाखवून दिले.

व्यभिचार वाईट आहेच, परंतु त्यापेक्षा स्त्री ही भोगदासी आहे ही पुरुषाच्या मनात रुजलेली समजूत ही खरी विषवल्ली आहे हे ओळखून ख्रिस्ताने स्पष्ट बजावले की कामेच्छेने स्त्रीकडे पहाणे हा देखील मानसिक व्यभिचार आहे. (मत्तय ५, २८) स्त्रीकडे पाहण्याच्या द्रुष्टीकोनात बदल होण्यासाठी पुरुषाच्या मानसिकतेवरच इलाज केला पाहिजे, असे खिस्ताने शिकविले. येशूच्या कथेतून स्त्रवणारी ही करुणा या कथेतील स्त्रीपुरती मर्यादित असली तरी प्रत्यक्षात ती प्रत्येक पीडितासाठी आहे, दुःखितासाठी आहे, अन्यायग्रस्ताला त्यात दिलासा आहे. अगदी क्षुल्लक कारणासाठी स्त्रीला घटस्फोट देण्याची सोय यहुदी समाजात होती. घटस्फोटाची एक केस यहुदी धर्मगुरूंनी येशूकडे आणली. 'सूटपत्र देऊन स्त्रीला टाकून दयावे' असा मोशेचा नियम त्यांनी संदर्भासाठी दिला तेव्हा ख्रिस्त त्यांना म्हणाला, "तुमची मने दगडासारखी आहेत म्हणून मोशेने ती सूट तुम्हाला दिली होती; परंतु देवाची योजना तशी नाही. ज्याना लग्नाचे दान मिळाले आहे ते हे वचन स्वीकारू शकतात." देवाच्या दृष्टिकोनातून दोघांना समान हक्क आणि प्रतिष्ठा आहे. येशू पूढे म्हणाला, "निर्माणकर्त्याने त्यांना प्रारंभापासूनच पुरुष आणि स्त्री असेच निर्माण केले. म्हणूनच मनुष्य आपल्या आईवडिलांना सोडून आपल्या पत्नीला धरून राहतो आणि ते दोघे एकत्र होतात. इत: पर ते

दोन नव्हेत. एक देह आहेत. तेव्हा ज्यांना देवाने जोडले त्यांना मानवाने तोडू नये" '(मत्तय १९,१-१२) पतीपत्नीच्या या अतूट आणि अपूर्व नातेसंबंधावर नव्या करारात ख्रिस्ताने शिक्कामोर्तब केला.

नवराबायकोचं परस्परांशी वर्तन सामंजस्याचं असावं यावर ख्रिश्चन धर्माचा सदैव भर राहिला आहे. "विवाहितांना माझी नव्हे तर प्रभूचीच अशी आज्ञा आहे की बायकोने नवऱ्याला सोडून जाऊ नये आणि जर ती गेलीच तर तिने दुसऱ्याशी विवाह करू नये, उलट तिने आपल्या नवऱ्याशी समेट करून घ्यावा. नवऱ्यानेही आपली बायको टाकू नये." नव्या करारात स्त्रीनं जरी पतीच्या आज्ञेत राहावे असे म्हटले असले तरी तिच्या संदर्भातील आपल्या जबाबदाऱ्यांचे भान पुरुषांनी ठेवावं, तिच्याशी सौजन्यानं वागावं कारण 'तिचाही तुमच्याप्रमाणेच जीव आहे' हे सांगितलेलं आहे. येशू मुळात करुणामूर्ती असल्यानं त्याचा भर 'न्याय' या मूल्यावर आहे व म्हणूनच त्याच्याकडे स्त्री-पुरुष विषमता नाही.

समानतेच्या भूमिकेतून ख्रिस्ताने नेहमी स्त्रीकडे पाहिले. 'गुरूने स्त्रीच्या सावलीला उभे राहू नये' अशी यहुदी धर्माची आज्ञा होती. ख्रिस्ताने ती झुगारून दिली. त्याने अनेक स्त्रियांना आधार दिला, भर दुपारी एकट्याने पाणी शेंदण्यासाठी आलेल्या संशयास्पद चालीच्या शोमरोनी स्त्रीबरोबर त्यांनी संभाषण केले. (योहान ४, २७) एका पश्चात्तापदग्ध पापी स्त्रीला आपल्या पायाचे मुके घेऊ दिले व तिला पापमुक्त केले. (लूक ७, ३६-५०) विधवेने जेव्हा एक दमडी दान केली तेव्हा तिने आपल्या कमाईतून आपले होते नव्हते म्हणजे आपली सर्व उपजीविका दान केले असे सांगून येशूने तिचे दान उंचावले. आपल्या एकुलत्या एक मुलाच्या प्रेतावर शोक करणाऱ्या विधवेचा येशूला कळवळा आला. तेव्हा तिच्या मुलाला मेलेल्यातून उठवून करुणामयी येशूने त्याला त्याच्या आईच्या हवाली केले. (लूक ७,११-१७)

यहुदी लोकांच्या नियमानुसार मासिक धर्माच्या सात दिवसांच्या काळात तसेच रक्तस्रावाच्या काळात स्त्रीला अशुद्ध समजले जाई व त्या काळात तिला स्पर्श करणे हे पाप ठरत असे. (बायबल, लेवीय १५, १९ ते ३०) या धर्माज्ञेची पर्वा न करता ख्रिस्ताने एका रक्तस्रावी स्त्रीला सर्वासमक्ष स्पर्श करून रोगमुक्त केले. प्रभू येशू ख्रिस्ताच्या या कृतीमुळे स्त्रिया आज हजारो वर्षापासून ख्रिस्तवेदी ते ख्रिस्ती स्मशानभूमीपर्यंत सर्वत्र सर्वकाळात कोणत्याही अटकावाशिवाय वावरत आहेत. ख्रिस्ताने मारियामातेप्रमाणे प्रत्येक स्त्रीला सम्मानात्मक दर्जा देऊन, स्वतःच्या वागणूकीने इतरांना आदर्श दिला. शब्बाथ दिवशी यहुदी लोक कडकडीत सोवळे पाळीत असत. कुठल्याही प्रकारचे काम करण्यास त्या दिवशी मनाई

असे. परंतु ख्रिस्ताने तो मनाई हुकूम मोडून एका कुबड्या बाईला मुद्दाम शब्बाथ दिवशी बरे केले व त्याबद्दल त्याला जाब विचारण्यात आला, तेव्हा त्याने सडेतोड उत्तर दिले. (लूक १३, १०-१७)

सेवाकार्यात पुरुषांप्रमाणे स्त्रियांनाही सहभाग देणारा येशू हा पहिलाच यहूदी गुरू. योहान्ना, सुसान्ना, मारिया, मग्दालिया आदी महिला त्यांच्या गोतावळ्यात होत्या. त्याबद्दल निश्चित त्याला लोकनिंदेला तोंड द्यावे लागले. समाजमताची पर्वा न करता, त्याने स्त्रियांना सामावून घेतले. यामुळे 'वेश्यांचा मित्र' अशा शब्दांत त्याची संभावना करण्यात आली. तरी स्वतःला प्रतिष्ठित समजणाऱ्या यहुदी धर्माचार्याना येशूने बजावले. 'कसबिणी तुमच्याआधी स्वर्गात जातील'  वेश्यांसाठीही स्वर्गाचे दार उघडणारा ख्रिस्त हा स्त्रीमुक्तीचा आद्य-प्रणेताच म्हणावा  लागेल. "प्रभू येशू ख्रिस्ताने आपल्या प्रत्यक्ष उदाहरणाने यहुदी आणि तत्कालीन यहुदीयेतर लोकांच्या दृष्टिकोनात स्त्रियांबाबत क्रांतिकारक बदल घडवून आणला.

देवपुत्र धरतीवर अवतरण्याचे अनेक पर्याय असताना ह्या कार्यासाठी एका स्त्रीची निवड होणे हाच समस्त स्त्री जातीचा उच्चकोटीचा बहुमान आहे. देवपुत्राच्या जन्मानंतर खरं तर मारियेचे कार्य पूर्ण झाले होते, तरी वेळोवेळी देवपुत्र येशूची मार्गदर्शक म्हणून तिला त्याच्या सानिध्यात ठेवण्यात आले. थोडक्यात मरियेचा फक्त साधन म्हणून देवकार्यात उपयोग करून घेऊन तिची भूमिका संपवण्यात आलेली नव्हती. तर तिचे शेवटपर्यंत आदर्शवत स्थान कायम होते. मरिया मातेच्या एका शब्दासाठी आपली प्रकट होण्याची वेळ आलेली नसताना ही येशूने कानागावी पाण्याचा द्राक्षरस केला. मरणाच्या प्रणांतिक वेदनेतही आपल्या आईप्रती कर्तव्य येशू विसरला नाही. मरिया मातेला त्यांनी शिष्याच्या स्वाधीन केले. तिची भूमिका येशूच्या पूर्णजीवनकाळात महत्वपूर्ण होतीच पण मृत्यूनंतर तिचे स्वर्गनयन हे स्त्रीत्वाचा परमोच्च बहुमान आहे.

जखमांनी रक्तबंबाळ लटपटणारे पाय, खांद्यावर भारी वजनाचा क्रूस, अंगावर चाबकाचे बळ, मस्तकावर आरपार रुतलेल्या काट्यांचा मुकुट आणि कपाळावर ओघळणारे रक्त अशा वेदनादायी अवस्थेत असतानाही रडणाऱ्या, शोक करणाऱ्या स्त्रीयांची दखल घेत सांत्वनपर येशू म्हणाला 'माझ्यासाठी रडू नका......'.

✦ ✦ ✦

# निर्मळ नाका आणि आमचा ग्रुप

● जेजू परेरा, विलेपार्ले, मुंबई.

आयुष्यातला काही घटनांना, काही अनुभवांना 'पण का? असं कसं? आणि खरंच का?' असे प्रश्न पडतात; तेव्हा त्याची कथा होते. यातले काही प्रसंग, काही घटना व काही भेटीगाठी वरवर दिसायला फारच छोट्या असल्या तरी त्या आयुष्यभर फार परिणाम करणारे ठरतात. अन् मनात कायमस्वरूपी घर करून राहतात. अश्याच काही घटनांची, काही प्रसंगाची तर काही भेटीगाठींची ही कथा आहे.

आमचा एक छान ग्रुप होता. माझे बालमित्र, वर्गमित्र आणि शालेय मित्र. काही जीवन विकास मंडळ आणि खेळामुळे जोडलेले. सर्व जण विशीच्या आसपास. आम्ही रोज भेटत असू. क्रिकेट, व्हॉलीबॉल, कबड्डी असे खेळ खेळत असू. तेव्हाचे शाळेचे प्रिंसिपल फा. फ्रान्सिस मस्करनीस हेही आमच्या सोबत व्हॉलीबॉल खेळत, अगदी रोज. अधूनमधून क्रिकेटही खेळत. खेळून झाले की चणेदाणे किंवा बटाटा वडे खाणे होई. फा. मस्करनीस यांना वडा खूप आवडे. खाणे झाल्यावर आम्ही सर्व मित्र, आमच्या प्रायमरी शाळेच्या पायरीवर बसून गप्पागोष्टी करीत असू. मगच घरी जात असू.

असेच दिवस सरत गेले. एकीकडे आमचे शिक्षण संपत आले व दुसरीकडे आमची नोकरी, कामधंदासाठी धडपड सुरू झाली. हळूहळू सगळ्यांना चांगल्या नोकऱ्या मिळत गेल्या. महाराष्ट्र शासन, रेल्वे, बीएमसी, बॉम्बे टेलीफोन, भारत पेट्रोलियम, आरसीएफ, महिंद्रा ऍंड महिंद्रा, एस. टी. तसेच आमची होली क्रॉस शाळा, इत्यादी चांगल्या ठिकाणी सगळे नोकरीला लागलो. एका मित्राची हॉटेल होती. एक कन्स्ट्रक्शनमध्ये तर एकाचा फेब्रिकेटरचा व्यवसाय. थोडक्यात सगळेच स्थिरावत गेले. पण रोजचा भेटीचा शिरस्ता काही थांबला नाही. तो कायम राहिला. प्रायमरी शाळेच्या त्याच पायरीवर सगळे भेटत असू. न चुकता. ऑफिस मधून आल्यावर तडक घरी न जाता प्रत्येक जण प्रथम या ठिकाणी भेट देत असे. मग दिवसभराच्या गंमती जमती गप्पागोष्टी यांची मैफिलच रंगे. मस्त माहोल तयार होई. खुप मजा येई. सगळा शिण निघून जाई. हे भेटणं आमची मानसिक आणि भावनिक गरज

बनली. ग्रुप मधला प्रत्येक जण या भेटीसाठी धडपडत असे. काही कारणास्तव एखाद दिवस भेटणं जमणार नसेल तर तसा निरोप दिला जाई. वाट पाहायला लागू नये याची काळजी.

आमची प्रायमरी शाळा निर्मळ नाक्यावर आणि मुख्य रस्त्यालगत जरा उंचीवर होती. पायऱ्या चढून शाळेत जावे लागे. या पायऱ्या आमची भेटण्याची जागा. या ठिकाणीहून तीन रस्ते जातात. वाहनांची येजा आणि रहदारीही खूप. यामुळे वर्दळीचा नाका. येणाऱ्या जाणाऱ्यांच्या नजरा आमच्यावर पडत. पण आम्ही आमच्या मस्तीत. आमच्या गप्पा, आमचं भेटणं हेच आमचे जग होते. तरीही नाक्यावर घडणाऱ्या प्रत्येक बारीकसारीक गोष्टींची खबरबात आम्हांस असे.

'निर्मळ' प्रसिद्ध ठिकाण. ऐतिहासिक व धार्मिक द्रुष्ट्या. पंचक्रोशीत अनेक जाती आणि जमातीचे लोक गुण्यागोविंदाने राहत. ख्रिश्चन, सामवेदी, कोळी पाचकळशी, भंडारी, गावड व अन्य समाजही. लोकांच्या उपजीविकेचे मुख्य साधन शेती व दुधदुभते. कोळी समाज मासेमारीही करत व भंडारी समाज ताडी व्यवसाय करत. त्याकाळी ताडी विक्रीवर सरकारचं नियंत्रण नसे. ज्यांच्या मालकीची झाडे ते ताडी विक्री करीत. ताडी बाराही महिने मिळे. त्यामुळे ताडी विक्रीतून येणारा पैसा बाराही महिने हाती खेळे. यातून थोडीशी सुबत्ता येत गेली. मग अहंपणा वाढला. मक्तेदारी आली व दादागिरी सुरू झाली. या दादागिरीचा त्रास सामान्य लोकांना होऊ लागला. याबाबत काही विचारणा झाल्यास मारहाण होऊ लागली. नाक्यावर भीतीचं वातावरण निर्माण होत गेले. या तथाकथित दादांची दहशत दिवसेन् दिवस वाढू लागली. लोक यांची कुठलीही आगळीक गुमान सहन करून लागले. गोष्टी हाताबाहेर जाऊ लागल्या.

ज्या दिवशी एखादी घटना घडत असे ती आमची कानी येत असे. यावर आमची चर्चा होई. संताप व्यक्त होई. पण निघायची वेळ झाली की विषय तेथेच संपे. घडून गेलेली घटना मात्र माझा पाठलाग करीत असे. मनाला एक प्रकारची बेचैनी लागून राही. रात्री बिछान्यावर आडवा झालो तरी डोक्यात या घटनेचे अनेक प्रश्न उठत. काहीतरी चुकीचे होत आहे असं वाटत राही. हे असं होता कामा नये. हे कीती दिवस व कितपर्यंत चालवून घ्यावं? असे अनेक प्रश्न घेऊनच झोपी जात असे.

सकाळी उजाडलं की रोजच्या आयुष्याला सुरूवात होई. कामावर जायची तयारी. बस व ट्रेन पकडणे. ऑफीसला वेळेवर पोहचणे. या धकाधकीत हे सगळे प्रश्न विरून जात.

कित्येकदा आपल्याला गोष्टी जाणवत असतात आणि आपण त्याकडे न पाहणं पसंत करतो. आपल्याला त्याच्याशी काय? ही मानसिकता. प्रत्येकाला स्वतःचं, केवळ स्वतःचं एक आयुष्य असतं. आपण त्याला सुखाचे आयुष्य म्हणतो. आपण त्यातच रमतो, जगतो. कारण आपण आखलेले रस्ते घेऊन जन्मला आलेले असतो. एक पांढरपेशी चौकट. पण कधीतरी या चौकटी बाहेर आपण ओढले जातो. अगदी नकळत. अशाच एके दिवशी आम्ही या सगळ्यात ओढले गेलो.

आमच्या भेटीच्या जागेच्या बरोबर समोर एक चणेदाण्याचे दुकान होते. रोज संध्याकाळी तेथे चणेदाणे भाजले जात. त्याचा एक खमंग वास नाकाभर पसरे. हा खमंग वास आला की आमच्यातला कोणीतरी जाऊन गरमागरम चणेदाणे घेऊन येई. हे चणेदाणे खात खात आमची भेटीची सांगता होई. एके दिवशी मी व माझा मित्र चणेदाणे आणण्यासाठी गेलो असताना एके ठिकाणी काही लोक जमलेले दिसले. तेथे सहज डोकावून पाहिले असता एक तरूण मुलगी रडत होती. खुप घाबरलेली होती. काही जण तिला समजावत होते, धीर देत होते. चौकशी केली असता त्या मुलीची एकाने छेड काढल्याचे समजले. छेड काढणारा कोण होता हेही कळले. तो तेथून पसार झाला होता. त्या मुलीच्या नको त्या जागी स्पर्श केला होता. तो प्रकार संतापजनक होता.

निर्मळ हे मुख्य बाजार पेठेचे ठिकाण. आसपासचे लोक आपला शेतीमाल, भाजीपाला विक्रीसाठी या ठिकाणी घेऊन येत. बाया मुली बाजारहाट, किराणा खरेदी, दळण वगैरे गोष्टीसाठी येत. बाजारपेठेला लागूनच भंडारी समाज वसलेला. तेव्हा तेथील काही मुलांकडून बायामुलीची छेडछाड व लोकांना मारहाण असे प्रकार आधीही घडले होते. त्यामुळे या मुलीवरील प्रसंगावर माझी तिखट प्रतिक्रिया आली. इतरही प्रतिक्रिया आल्या. थोड्या वेळाने आम्ही तेथून निघालो व चणेदाणे घेऊन आलो. माझी ती प्रतिक्रिया छेड काढणाऱ्यांना तितकीशी रुचली नाही हे पुढे दिसून आले.

त्याकाळी निर्मळला टुरिंग टॉकीज येत. रोज दोन खेळ व्हायचे. संध्याकाळी सहा व रात्री नऊ. दादा कोंडके यांचा "एकटा जीव सदाशिव" सिनेमा लागला होता. दुसऱ्या दिवशी रविवार होता. आम्ही काही मित्र नऊचा 'शो' पाहण्यास गेलो होतो. तेथे माझा एक वर्गमित्र भेटला. पहिल्या शोला आलेला. खूप दिवसांनी भेटल्यामुळे बोलत बोलत बसस्टॉपपर्यंत आलो. त्याला सोडून टॉकीजकडे येत असताना, वाटेत मुलीचे छेड काढणारे समोरून आले.

त्यांचा मोरक्या दिलीप याने मला मुद्दामहून धक्का दिला. कारण विचारले असता, माझ्या तिखट प्रतिक्रियेचा उल्लेख आला. यावरून सवाल जवाब झाले. बाचाबाची झाली. धक्काबुक्की  झाली. आमची पहिली चकमक.

इथून आमच्या चकमकीचा सिलसिला सुरू झाला आणि तो होतच राहिला. त्यांनी आगळीक केली की आम्ही त्यांना झोडपून काढायचे हे समीकरण झाले. यात कोण बरोबर आणि कोण चुक हे बघितले नाही. तर काय बरोबर हेच बघितले. त्यांची दादागिरी, त्यांची दहशत मोडून काढायची ऐवढेच मनात पक्के होते आणि आमच्या द्रुष्टीने तेच बरोबर होते. हाच आमचा फंडा  होता. ते वयच तसं होतं. सुरुवात तर झाली. तीही दणक्यात. जे जे स्वतःला दादा समजत होते. त्या सर्वांना चोप देऊन सळो की पळो करून सोडले. त्यातल्या अनेकांना अनेक ठिकाणी, अनेक वेळा चोप दिला.

हे त्यांना सगळे अनपेक्षित होते. ते सैरभैर झाले. आम्हांला दचकून राहू लागले. त्यामुळे आम्ही जास्त अग्रेसर होत गेलो. पण या लोकांच्या व्यतिरिक्त इतरांना अगदी त्यांच्या माणसांनाही त्रास होणार नाही याची काळजी घेतली. आमच्या या मारामारीचा या लोकांव्यतिरिक्त कोणालाच त्रास झाला नाही. यामुळे आमच्याबद्दल एक सॉफ्टकॉर्नर तयार होत गेला. त्यांच्या गुंडगिरीचा त्रास खुप लोकांना  झाला होता, होत होता. ते सर्व आम्हाला प्रत्यक्ष भेटून जात. आम्हांला सपोर्ट करू लागले. आम्हांला धीर देत. ज्या ज्या वेळी आमची या लोकांशी चकमक होई त्या वेळी शेकडो माणसं आम्हांला भेटण्यास, विचारपुस करण्यासाठी धावत येत.

यात अनेक शिक्षित, नोकरदार व वडीलधारी असत, हे विशेष. निर्मळ नाक्यावरील या लोकांची दादागिरी, त्यांचे प्रताप, फादर डॉमनिक आब्रियो यांच्या कानी जात असत. अनेकांना झालेली व होणारी मारहाण त्यांनी पाहिलीही होती आणि ऐकली होती. अनेक वेळा त्यांना समजावण्याचा, मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केलाही होता. पण त्याचा काही उपयोग होत नव्हता. त्यामुळे आमची भुमिका, आमचा फंडा एकवेळ चुकीचा असला तरी त्यांना आमच्याबद्दल सहानुभूती व काळजी असे. ते आमची आस्थेने विचारपूस करत. अनेक प्रतिष्ठीत व चांगल्या लोकांची सहानुभूती व आस्था याचे आमच्यावर एकप्रकारचे दडपण असे. घरच्यांचेही  दडपण असे. आपण जे करतो ते योग्य आहे का? चुकीचं तर नाही? हा विचार सतत मनात येत असे.

एक गोष्ट नक्की असे. आम्ही स्वतःहून त्यांची एकदाही कुरापत काढली नाही. त्यांच्या वाटेला गेलो नाही. पण त्यांची कुठलीही आगळीक खपवून घेतली नाही. लगेच उत्तर देत गेलो. तेही दणक्यात. आम्ही दादागिरी केली नाही. दादागिरी मोडून काढत होतो हे सत्य होते. तरीही मारामारी करणे, पोलीस स्टेशन, कोर्ट कचेरी हे भूषणावह व समर्थनीय नव्हते. तुमचा फंडा कितीही क्लिअर असला तरी काही लोकांच्या नजरेत ती गुंडगिरी होती. दादागिरी होती. अपकीर्ती होती. त्यामुळे आम्हांला नावे ठेवणारे ही होते. त्याचे वाईट वाटत असे. पण, तो सर्व या प्रक्रीयेचा भाग आहे. असं होणे आहे. याचे भान होते. आम्हीं सर्व जीवन विकास मंडळाशी संबंधित. साहजिकच संस्थेचे सक्रिय सभासद याचेही भान असे. त्यामुळे एका मर्यादेपलीकडे आम्ही जात नसू.

जीवन विकास मंडळाने क्रिकेटच्या स्पर्धा भरविल्या होत्या. आम्ही बहुतेक जण संस्थेच्या टीममधून खेळत असू. त्यामुळे आम्ही आमच्या शाळेच्या ग्राऊंड वर नेहमी सराव करीत असू. एकदा प्रॅक्टिस संपवून मित्राच्या हॉटेलमध्ये नास्ता करीत बसलो होतो. हॉटेल नित्यानंद. हा मित्रही ग्रुपमध्ये होता व तोही आमच्या टीमचा सदस्य असे. संध्याकाळची वेळ होती. विरारचा त्यावेळचा प्रसिद्ध दादा, नंदुदादा. याची काही माणसं कोर्टकचेरी करून येत असताना मित्राच्याच हॉटेलमध्ये नाश्त्यासाठी थांबली. जरासं पाणी सांडले या कारणास्तव वेटरला मारहाण केली. दादागिरी करू लागले. आम्ही हे सर्व पाहत होतो. मालक म्हणून मित्राने त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला. पण ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. शेवटी आम्हांला मध्ये पडावे लागले. यातून शाब्दिक चकमक घडली. आमचा आवाज चढलेला पाहून ते थोडेसे कचरले. काढता पाय घेतला. पण, जाताना इथेच थांबा! तुम्हांला पाहून घेतो, दाखवतोच आता, असे म्हणत ते तिरीमिरीत गेले.

ते परत येणार याची आम्हांस कल्पना होती. त्यामुळे आम्ही थांबून राहिलो. ते आलेसुध्दा. पण, यावेळी ते नंदूला सोबत घेऊन आले. आम्ही तिथेच होतो. आम्हांला पाहताच नंदू हसत पुढे आला व तुम्हीं आहात का? असे म्हणून सर्वांशी हस्तांदोलन केले. अरे, ही आपली माणसे आहेत अशी ओळख करून दिली. यांच्याशी असं परत होता कामा नये अशी समज दिली. आम्ही चार जण एकदा लॉकअपमध्ये होतो. त्याचवेळी तोही होता. तेव्हाची ओळख. निघताना विरारला येण्याचे आमंत्रण द्यायला विसरला नाही. पुढे या नंदूचा खुन झाला.

निर्मळची परीस्थिती आम्ही पूर्णतः नियंत्रणात आणली होती. त्यांना वठणीवर आणायला सुरूवात झाली होती. वातावरण बदलू लागलं होतं. हा बदल लोकांच्या नजरेत येत गेला. याचबरोबर, कळत नकळत आसपासच्या गावात, लोकांच्या मनात आमचा दबदबा निर्माण होत गेला. नकारात्मक गोष्टी लवकर पसरतात.

नंदाखाल येथेही एक दादा होता. त्याच्या कानी ही गोष्ट गेली. त्यांनी आमची एकदोनदा भेट घेतली. घरी बोलावून खुप चांगली उठबस केली. कुठलीही मदत करण्याची तयारी दर्शविली. दादा लोकांची एक सिस्टीम असते. त्यांना आसपासच्या भागात आपले सवतासुभा उभे करायचे असतात. यासाठी ते आपणहून मदत करण्यास पुढे येत असत. पण, आम्ही अशा कुठल्याच आमिषाला बळी पडलो नाही. सुरुवाती पासून आम्ही वेगळेपणा जपला होता. आम्ही सर्व नोकरदार. नोकऱ्याही खुप चांगल्या. ज्यांचे व्यवसाय होते तेही चांगला जम बसवून होते. लोकांशी आमचे सलोख्याचे, स्नेहाचे व आपुलकीचे नाते होते आणि विशेष म्हणजे आम्ही एका नामांकित संस्थेचे, जीवन विकास मंडळाचे कार्यकर्ते. ही इमेज आम्ही जपत होतो आणि जपत आलो. एका बाजूला ही मारामारी आणि दुसऱ्या बाजूला मंडळाचे कार्यकर्ते व त्याच्या कार्यात नेहमी पुढे यातून काहींनी गमतीने आमचे नामकरण केले. "शरीफ बदमाश". या नावाचीही एक कथा आहे.

माझा वर्गमित्रांचाही एक छान ग्रुप होता. सगळे बऱ्यापैकी अभ्यासात हुशार. अभ्यास खेळ, स्पर्धा, दंगामस्ती या सगळ्या बाबतीत नेहमी फ्रंटवर असायचो. शिक्षकांचे लाडकेही होतो. हिंदीचे शिक्षक, चौबेसर नेहमी कौतुकाने म्हणायचे "पढाईमे भी आगे और मस्तीमे भी". ते आम्हांला "शरीफ बदमाश" या नावाने हाक मारीत असत. हेच नाव पुढे ग्रुपला पडले.

आपल्याला शहाणं काय करतात? अनुभव! असे अनेक अनुभव आम्हांला शहाणे करून गेले. मनात नसताना आसपासचे लोक आम्हांला वचकून राहू लागले. एकदोन जण असेच भानगडीचे प्रकरण घेऊन आले. आम्हीं ते मिटवावे अशी अपेक्षा घेऊन. हे आम्हांला अपेक्षित नव्हते व तो आमचा प्रांत्त नव्हता. फेमस होणे हा आमचा उद्देश नव्हताच. जाणिवपूर्वक आम्हीं या सगळ्या पासून लांब राहिलो. आपण लहानसहान गोष्टी वाटेवर विसरून जातो. तेव्हा तो व्यवहारी शहाणपण असतं. कारण तोपर्यंत त्याहून महत्वाच्या गोष्टी लक्षात येतात. जसे जसे दिवस पुढे सरकू लागले, मोठे होत गेलो. तसे इतर

जबाबदाऱ्या वाढत गेल्या. कौटुंबिक जबाबदाऱ्या येत गेल्या. त्यांच्यात गुंतत गेलो. हळूहळू भानगडीपासून लांब होत गेलो. संपूर्ण वाईट असे या जगात काहीही नाही हेच खरं. एके दिवशी निर्मळ शांत झालं. नाका शांत झाला. पूर्वीचे स्वच्छ व साफ निर्मळ परत आले.

काहीतरी चांगलं करायचं म्हणजे लोकांना काही तरी द्यायचं. लोकांना देण्यासाठी, आपल्याला काही तरी मिळवावं लागतंच. पण, आम्ही काय मिळवलं. काय कमावलं आणि काय गमावलं हे शेवटपर्यंत कळलंच नाही. आमची ही टसल बरीच दिवस सुरू होती, टिकली. यात आमचे बरेच उमेदीचे, महत्वाचे दिवस मारामारी, पोलीस स्टेशन, कोर्टकचेरी यात गेले, हे मात्र खरं. वर मनस्ताप, ताणतणाव, पैसा हे वेगळंच. पण एक झालं. आम्ही खुप स्ट्राँग होत गेलो. पुढे आयुष्यात कुठल्याच प्रसंगाला घाबरलो नाही. सगळ्यांना सहज सामोरे जाण्यास शिकलो. सगळ्या बऱ्यावाईटांची जबाबदारी घेत गेलो. दुसऱ्यांना दोष देऊन काही साधत नाही, हे शिकलो.

आज जेव्हा मी मागे वळून पाहतो,

तेव्हा मारामारीचे ते प्रसंग त्यातले नाट्य, ताणतणाव, नंतरचे पोलीस स्टेशन आणि कोर्टकचेरी याची केलेली वारी. आमचा लढा, हो लढाच! आम्ही काही विशेष पराक्रम केला असं मी म्हणत नाही. पण त्यावेळच्या दादागिरीतून, दहशतीपासून निर्मळ मुक्त झाले. तद्नंतर निर्मळला एकही दादा निर्माण झाला नाही. याचे थोडेसे श्रेय आम्हाला आहे आणि तो आमचा लढाच होता.

या लढ्यातला अनेकांचा पाठिंबा, अनेकांनी केलेली मदत, हे सर्व आठवत राहतं. एका दिर्घ कादंबरीचा विषय होईल इतकं नाट्य या घटनेत, भेटीगाठीत आणि त्या आठवणीत भरलं आहे. या पर्वातून आम्ही सहजरीत्या बाहेर आलो हेच आमच्या द्रुष्टीने आज महत्वाचे आहे असं म्हणतात "अंत भला तो सब भला". सगळेच चांगल्या मार्गी लागले. आपापल्या संसारात रमले.

मी गेली ३५ वर्षे मुंबईत राहतो. घरी आल्यावर ज्या ज्या वेळी नाक्यावर येतो. या प्रत्येक वेळी माझी नजर शाळेच्या पायरीकडे जाते. त्यात मी माझ्या सह ग्रुपमधील सर्व मित्रांना शोधतो. नेहमी प्रमाणे आजही ते माझी वाट बघत आहेत असं वाटतं. ग्रुपमधील पाच

मित्र आज या जगात नाहीत. त्यांची आठवण होते. खुप वाईट वाटतं. आमची प्रायमरी शाळेची जुनी इमारत जाऊन त्या जागी आता नवीन इमारत झाली आहे. या बदलात आमच्या  पायऱ्या नाहीशा झाल्या. पण, पहीली एक पायरी अजून तिथे आहे.

आमची पायरी. आमच्या आनंदाचं ठिकाण. खऱ्या आनंदाचं  ठिकाण. मनाला ताजातवाना करणारी जागा. जिथे नुसतं डोकावले तरी मन एकदम रिलॅक्स होत असे. फ्रेश वाटे. आमची जी मोजकीच हक्काची ठिकाणं होती त्यातले एक ठिकाण. खूपसे मित्र या पायरीने दिले. या मित्रांच्या सहवासात मन हलकं हलकं होऊन जाई. अगदी निवांत होई. या पायरीवरील मित्रांची सोबत, त्यांच्यासोबतच्या गप्पा, गमतीजमती आजही एखाद्या सिनेमासारख्या डोळ्यापुढे तरळून जातात. या आठवणी माझा ठेवा आहे. या आठवणींनी आजही  नॉस्टाल्जिक होतो.

आमच्या प्रायमरी शाळेच्या पायरीने, "पायरीत" कसं राहायचे हेही शिकवले. त्यामुळे आयुष्यातील सगळी वाटचाल एक विशिष्ट पायरी सांभाळूनच केली. पायरी सोडून कधी वागण्याचा धीर झाला नाही. या पायरीवरील आठवणी कधीच विसरल्या जाणार नाहीत. विसरू शकत नाही. कायम स्मरणात असतील.

सुकलेल्या फुलांच्या पाकळ्या पुस्तकाच्या पानांत नाही का सापडत?

---

## फुल

किरण मोरे भ्रमणध्वनी... ९५९४००७२५०

चुरगळलेला पालापाचोळा फुलांचा मी झालो
उकिरड्यावरील कचऱ्याचा एक भाग मी झालो

पडलो गळ्यात जेव्हा पुष्पहार मी झालो
उतरला सुघंद जेव्हा कचऱ्याचा भाग झालो

उमललो प्रथम जेव्हा सुंदर कळी मी झालो
बहरून आलो जेव्हा सुघंदी फुल मी झालो

माळुन केसांत त्यांच्या सौंदर्य खुलून आलो
पडलो गळ्यात जेव्हा पुष्पहार मी झालो...

# फिल्म लाईन

• सेविन तुस्कानो, नंदाखाल, वसई.

तू फिल्म लाईन मध्ये नक्की काय करतोस, असे अनेकदा मला विचारले जाते खरोखर खूप लोकांना माहित नाही की फिल्म लाईन म्हणजे नक्की काय?

खरंतर मी ॲडव्हर्टायझिंग स्टुडंट आहे, टीव्हीवरच्या जाहिराती बनवणे हा माझा मूळ उद्योग आहे, परंतु २००३ मध्ये यशराज फिल्म या प्रोडक्शन कंपनीमध्ये त्यांच्या ॲडव्हर्टायझिंग डिपार्टमेंट मधे मी काम करत होतो, ते काम करताना मला धूम या पिक्चरच्या जाहिरातीसाठी एक म्युझिक व्हिडिओ बनवण्यासाठी सांगितला, त्यानंतर काही ॲड आम्ही या पिक्चरच्या प्रमोशनसाठी शूट केल्या, त्यानंतर बरेच जाहिराती मी यशराजसाठी बनवल्या व जेव्हा धूमच्या डिरेक्टर संजय गढवी याने, किडनॅप या चित्रपटाचे मला असोसिएट डिरेक्टर होण्यास सांगितले, तेव्हा मी पहिल्यांदा एका मेनस्ट्रीम सिनेमाचा भाग झालो त्याआधी १९९९ मध्ये मी डेंजर या सिनेमाचा थर्ड असिस्टंट डिरेक्टर व स्टोरीबोर्ड आर्टिस्ट होतो, "वन नाईट विथ द किंग" या इंग्रजी सिनेमाचा मी कॅमेरा असिस्टंट होतो. परंतु दोनशेहून अधिक जाहिरातींवर मी असोसिएट डिरेक्टरचा काम केल्यामुळे मला फिल्मचा बऱ्यापैकी अनुभव होता.

मी जाहिरातींच्या बॅकग्राऊंड मध्ये असल्यामुळे अगदी पद्धतशीर पेपर वर्क, भरपूर प्लॅनिंग करून सिनेमाच्या शूटिंगसाठी उतरलो, ॲक्टरच्या डेट्स मॅनेज करणे, सिनेमाचे शूटिंग शेड्युल बनवणे, ॲक्टर कडून स्क्रिप्ट रिहर्सल करून घेणे, त्यांच्यासाठी वर्कशॉप घेणे, संपूर्ण टेक्निकल टीमशी को-ऑर्डिनेशन, ते त्या फिल्मचे रिलीजपर्यंत हे सगळं माझं काम होतं.

या फिल्म लाइन मध्ये स्कोप आहे का? इथे पगार किती मिळतो? असे प्रश्न मला नेहमी विचारले जातात, एक सिनेमा बनवण्यासाठी, ज्या टीमची गरज असते, ती म्हणजे प्रोड्युसर, डायरेक्टर, ॲक्टर, राईटर, कॅमेरामॅन, आर्ट डिरेक्टर, एडिटर, कॉस्च्युम डिझायनर, ॲक्शन डिरेक्टर, म्युझिक डिरेक्टर, साऊंड डिझायनर, कोरिओग्राफर या सर्वांना लाखोमध्ये पगार असतो. परंतु या पोझिशनमध्ये पोहोचायला आधी त्याचे शिक्षण घ्यावे लागते, असिस्ट करावे लागते, बऱ्याच वर्षांचा अनुभव घ्यावा लागतो, आपल्याला फक्त ग्लॅमर, ॲक्टर,

डिरेक्टर, प्रोड्युसर ही टीम दिसते, परंतु अशा अनेक टेक्निकल टीम या एका सिनेमाच्या निर्मितीमध्ये भाग घेत असतात.

या लॉकडाउनच्या काळात आपल्याला खरोखर मनोरंजन किती महत्त्वाचं आहे ते कळले, बरेचसे वेबसीरिज सिनेमा व रियालिटी शोज आपण या काळात बघितले, या सर्वांना निर्माण करण्यासाठी यावरील टेक्निकल टीमची गरज असते.

आपल्या भागातील मुलांनी फक्त ॲक्टर डिरेक्टर न होता, त्या दुसऱ्या टेक्निकल फील्डमध्ये जरी भाग घेतला तरीसुद्धा ते सुंदर करियर करू शकतील असे मला वाटते, ॲक्टर डिरेक्टर व कोणत्याही क्षेत्राची निवड करण्यासाठी, त्याचे प्रशिक्षण घेतले पाहिजे. सेंट झेवियर्स इन्स्टिट्यूट ऑफ कम्युनिकेशन, फिल्म टेलिव्हिजन इन्स्टिट्यूट पुणे, व्हिसलिंग वूड्स इंटरनॅशनल मुंबई, व इतर बरेच प्रायव्हेट इन्स्टिट्यूट, फिल्म मेकिंगचे डिप्लोमा व डिग्री कॉलेजेस चालवत आहेत.

आपल्या येथील मुलांनी फिल्म मेकिंगमध्ये करियर करायला काही हरकत नाही, आज-काल सगळ्यांच्या हातात मोबाईल आहेत, सर्वजण शूट करत आहेत, व्हिडिओज, शॉर्ट फिल्म बनवत आहेत, परंतु त्याचा जर पूर्णपणे अभ्यास केला तर आपण नक्कीच एक चांगलं करिअर घडवू शकतो.

यु.पी., बिहार, दिल्ली, हरियाणा वरून मुले मुंबईत येऊन आपलं फिल्म लाईन मध्ये करिअर करत आहेत, परंतु आपल्याला हाकेच्या अंतरावर बॉलीवूड आहे, तरीसुद्धा आपल्या येथील हाताच्या बोटावर मोजण्याइतकेच मुलं या क्षेत्रात येत आहेत, त्याची कुठेतरी खंत मला वाटते.

या लेखाचे औचित्य साधून आपण लवकरच एक इंस्टाग्राम लाईव्ह सेशन ठेवूया, जेणेकरून मी मला असलेला जो काही अनुभव आहे, तो आपल्याबरोबर शेअर करेन, व तुम्हाला जे काही प्रश्न असतील ते तुम्ही मला मेसेज करून विचारू शकता.

You can Follow me on Instagram! Username: savin_tuscano

https://www.instagram.com/savin_tuscano?r=nametag

वरील लिंक वर क्लिक करा व आपण लवकर भेटून त्यावर चर्चा करू.

# धर्म, प्रेमाचा!

• बॅप्टिस्ट वाझ, दारसेंग.

आपण एकाच देवाची लेकरे आहोत हे मी आजपर्यंत मानत आलो आहे. त्या अनुषंगाने इतर धर्मीय हे माझे बांधव आहेत असेही मला सतत वाटत असते. परंतू काही लोक आपण इतरापेक्षा वेगळे आहोत ही भावना जोपासून इतर धर्मियांपासून ते ठराविक अंतर ठेऊन वागत असतात. त्यामुळे जीवनातल्या खऱ्या आनंदाला ते मुकतात. आपल्या जोडिदाराची निवड करतांना सुद्धा ते स्वजातीयांनाच प्राधान्य देतात. तेथे निवडीला वाव नसला तरीही काहीतरी ॲडजस्टमेंट करुन ते विजोड जीवनसाथी बरोबर आपले मौल्यवान आयुष्य व्यतीत करत असतात. याच्या अगदी विरोधी माझ्या मित्राच्या मुलाची कहानी आहे.

गेल्या वर्षी आम्ही उभयता कॅलीफॉर्नियातील फ्रीमॉन्ट सिटीत वास्तव्यास असलेल्या माझ्या मुलाकडे गेलो होतो. तो डिंसेबर महिना होता.थंडीचे दिवस होते. नातालचा सिजन असल्यामुळे जिकडे तिकडे उत्साहाचे वातावरण पसरले होते. एके दिवशी मुलाबरोबर गप्पा मारत असताना माझ्या मित्राचा फोन आला. तो सॅन होजेला आपल्या मुलाकडे आला होता. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर त्यांनी आम्हाला ख्रिसमस पार्टीसाठी घरी येण्याचे आमंत्रण दिले.मी सुद्धा ते आमंत्रण आनंदाने स्वीकारले व मुलाच्या कारने सॅन होजेला त्यांच्या घरी गेलो.

वास्तविक सॅन होजे हे फ्रिमोंट पासून १८ मैलावर आहे. तेथे कारने जायला २० ते २५ मिनिटे लागतात. डिसेंबर महिन्यात सन होजेचा दिवस, संध्याकाळी ५-३० वाजताच मावळतो. त्यामुळे मित्रानी पार्टीची वेळ संध्याकाळी ६-०० ची ठरवली होती. आम्ही तेथे वेळेवर पोहचलो. सर्व आमंत्रित वेळेवर आल्यामुळे पार्टी अगदी ठरलेल्या वेळी सुरू झाली. माझ्या मित्रांनी आमंत्रितांना आमची ओळख करून दिली. त्यानंतर शीतपेये व मद्याचे पेले भरले गेले. पेले उंचावून व एकमेकांना चिअर्स करत पार्टीला सुरवात झाली.

ड्रिक रिचवता रिचवता गप्पा गोष्टी सुरू झाल्या. मी माझ्या मित्रा समवेत प्रशस्त हा ॅल मधल्या एका सोफ्यावर बसलो होतो. गप्पा मध्ये जुन्या आठवणींना उजाळा देत आम्ही रमून गेलो होतो. इतक्यात बाजूला बसलेल्या माझ्या पत्नीने माझे लक्ष समोरच्या भिंतीकडे वेधले. तेथे एकाच कोनाड्यात येशू ख्रिस्ताचा स्टॅच्यू व गणपतीची सुबक मुर्ती विराजमान झालेल्या दिसल्या. मुख्य म्हणजे येशू ख्रिस्ताच्या इमाजा (मुर्ती) समोर मेणबत्ती व

गणपतीच्या मुर्ती समोर सुगंधी उदबत्ती तेवत होती. आश्चर्य म्हणजे दोन्ही मुर्ती ताज्या व टपोऱ्या गुलाबांच्या एकाच हाराने सजवल्या होत्या. ते पाहून मी चकीतच झालो. माझे मित्र चित्तपावन कायस्थ ब्राम्हण, म्हणजे हिंदू. मग गणपतीच्या बाजूला येशूचा स्टॅच्यू कसा? हे कोडे मला काही उमगले नाही.

मी समोर बसलेल्या माझ्या मित्रालाच त्याबाबत विचारले. त्यांनी सांगितलेली कथा ऐकून माझा मित्राबाबतचा आदर दुणावला. माझ्या मित्राचा मुलगा रोहन व त्याची सून म्हणजे रोहनची पत्नी स्विडल ही ख्रिश्चन! ती दोघं लहानपणा पासून एकाच शाळेत शिकत होती. इंजिनिअरचे उच्च शिक्षण सुद्धा त्यांनी एकाच का ॅलेजात घेतले. पुढे बाळपणाच्या मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. दोघांचे पालक सुशिक्षीत व समंजस असल्यामुळे त्यांनी त्यांचे लग्न थाटामाटात लावून दिले. पुढे एमएस करण्यासाठी ते दोघेही अमेरिकेत आले व मोठ्या कंपनीत नोकरी करत सॅन होजेला स्थायिक झाले. कालांतराने त्यांना पुत्रलाभही झाला.

माझ्या मित्राने त्याच्या सुनेच्या धर्माचा आदर राखून आपल्या मुलाचे लग्न व नातवाचं बारसं हे दोन्ही धर्मांच्या विधीव्रतानुसार केले. त्या घरात दोन्ही धर्म पाळले जातात. दोन्ही धर्मांचे सण- सोहळे आनंदाने साजरे केले जातात. सुनेबद्दल तो खूप आस्थेने बोलत होता. तिचे कौतूक करत होता. त्याच्या बोलण्यात मला सुनेच्या धर्माबद्दल खूप आदर दिसला. त्या घरात धर्मांच्या भिंती केव्हाच गळून पडल्या होत्या. तेथे प्रेमाचा नवीन धर्म उदयास आला होता. तरीही मित्राच्या नातूची आई ख्रिश्चन व वडील हिंदू असल्यामुळे गंभीर चेहरा करुन मी त्याला विचारले “तुमच्या नातूचा धर्म कोणता”? त्यावर ते हसत हसत उत्तरले “अरे, ते तो मोठा झाल्यावर ठरवेल”.

मी समोरच्या भिंतीकडे पाहिले. कोनाड्यातील मुर्ती सुद्धा माझ्या या अप्रस्तुत प्रश्नाबद्दल, माझ्याकडे बघून हसत असल्याचा मला भास झाला. जणू ते मला सांगत होते. “ आम्ही बघा एकाच कोनाड्यात गेली पाच वर्षे सुखेनैव राहत आहोत. आमच्यात कधी भांडणे होत नाहीत. आम्ही एकमेकांचा तिरस्कार करत नाही. आम्ही एकमेकांशी प्रेमाने वागतो.तोच वसा या कुटूंबातपण पाळला जातो. पण तुम्ही माणसे स्वत:च्या फायद्यासाठी धर्मा- धर्मात तेढ निर्माण करून दंगली घडवून आणता. धर्मांच्या नावाखाली अनेकांचा जीव घेता. आमची शिकवण फक्त प्रेमाची आहे. सहिष्णूतीची आहे. अहिंसाची आहे.धर्म कोणताही पाळा. कारण सर्व धर्म सारखेच आहेत. मनातला हा आतला आवाज ऐकून ‘ तुमच्या नातवाचा धर्म कोणता?’ हा पश्न मित्राला विचारल्यबद्दल माझीच मला लाज वाटू लागली.

# “सरीवर सरी.....”

• कल्पना रॉड्रिग्ज.

रविवारची सकाळ, पावसाच्या आवाजाने सरीताची सकाळची साखरझोप चाळवली. असा पाऊस कोसळायला लागला की तिला आपल्या आईची आणि राहुलची आठवण यायची. उठावे की पुन्हा लोळत पडावे ह्या संभ्रमात असतानाच तिच्या मनांत विचार आला की आजची पावसाळी सकाळ निसर्गाच्या सानिध्यात घालवायची. अंथरुणातुन ऊठुन तिने गच्चीचा दरवाजा उघडला आणि थंड वाऱ्याच्या झुळकेने पावसाच्या थेंबाबरोबर सलगी करुन तिचे कपाळचुंबन घेतले व तिला तजेलदार सकाळच्या शुभेच्छा दिल्या. तिनेसुध्दा हळुवारपणे पावसाचे काही थेंब हातावर झेलले आणि मोती वेचल्यासारखे समाधान तिच्या चेहऱ्यावर झळकले. पटकन तयार होऊन ती बैठकीच्या खोलीत आली, कोपऱ्यात ठेवलेल्या छत्रीकडे तिचे लक्ष गेले. पण आज छत्री किंवा रेनकोट न घालता बाहेर जायचे तिने ठरवले. तिने पायात बुट चढवले व तीचा हात टेबलावर ठेवलेल्या फोनकडे गेला. पण आज फोनचाही व्यत्यय नको असं ठरवून तिनं फोन बंद केला व ती घराबाहेर पडली.

सरीताच्या घराकडून रानगावच्या समुद्रावर जाणारा सरळ रस्ता तसा काही फार लांब नव्हता पण आज वाट वाकडी करुन शेताबांध्यावरच्या रस्त्याने सरीता चालु लागली. ते बांध आता पुर्वीसारखे राहीले नव्हते. पुर्वी ते मोठाल्ले असायचे आणि दोन्ही बाजुला शेतातील पिके डुलायची. तेव्हा पायात चप्पल नसायचे आणि पावसाळयात तो थंडगार, मऊशार चिख्खल सगळ्यांच्याच पायात मोफत बुट द्यायचा. पण आता ते सर्व लुप्त झाले होते. चिखलाची जागा कच्च्या रस्त्याने घेतली होती आणि पिकांच्या जागी आता गवत वाढले होते. सरीता आठवणींच्या हिंदोळ्यावर झोके घेत पुढे चालत होती. नागमोडी वळणाचा तो रस्ता आज तिला तीस वर्ष मागे घेऊन गेला...

सरीताच्या घरची परिस्थिती बेताचीच होती. वाट्याला आलेल्या दोन-तीन शेतात तिचे आई-बाबा शेती करायचे व आपल्या कुटुंबाचे संगोपन करायचे. सरीताला दोन बहीणी व एक भाऊ होता. सहा जणांच्या त्या कुटुंबात कधी कधी लेकरांच्या पोटात घास जावा म्हणून तिचे

आई-बाबा ऊपाशी सुध्दा रहायचे. सरीता सगळ्या भावंडात मोठी. तिच्या नजरेतून आईबाबांचे हे कष्ट आणि ऊपाशी राहणे कधी सुटत नसे. शाळेतून दुपारी घरी आल्यानंतर जेवणखाणं आटोपलं की सरीता आपल्या आईला घरच्या कामात मदत करायची. आई जेव्हा थोडावेळ विश्रांती घ्यायची तेव्हा ती आपला अभ्यास पुर्ण करायची. अशिक्षित असले तरीही तिच्या आई-वडिलांनी आपल्या मुलांना शिकवायचे ठरवले आणि योग्य वेळी त्यांना शाळेत घातले.

सरीता जशी अभ्यासात हुषार होती तशीच घरच्या कामातही तरबेज होती. आपल्या भावंडासाठी ती एक आदर्श बहीण होती. बघताबघता सरीता दहावीच्या वर्गात पोहचली. महत्वाचे वर्ष म्हणून घरातल्या सर्वच सदस्यांनी सरीताला फक्त अभ्यासावर लक्ष द्यायला सांगितलं आणि सगळ्यांनी सरीता करत असलेली बाकीची कामं वाटून घेतली. सरीताच्या शाळेतील शिक्षकांनी तिला अभ्यासात खुप मदत केली. तिनेही दिवसरात्र एक करुन खुप अभ्यास केला आणि ८५% गुण मिळवून ती आपल्या शाळेतून पहीली आली. तिच्या घरच्यांना आणि शाळेला तिचा खुप अभिमान वाटला. सरीताच्या मनात विचार आला की पुढे शिकायचं जरी असले तरी घरच्या परिस्थितीमुळे ते काही शक्य होणारं नाही, तेव्हा आता शेतीच्या कामात लक्ष घालून लहान भावंडांना शिकू द्यायचे. पण सरीताच्या वडिलांनी तिची समजुत काढली व तिला सांगितले की आपले दिवस पालटायचे असतील तर तुला शिकून मोठं व्हावे लागेल.

देव आपल्या लेकरांच्या मदतीला नेहमीच धावतो ह्यावर तिच्या वडीलांचा विश्वास होता. आणि झालेही तसेच, गावातील एक दानशूर व्यक्ती सरीताच्या मदतीस धावून आली. सरीताने कॅालेजला ॲडमीशन घेतले व मोठ्या उमेदीने तिच्या नवीन वाटचालीस सुरुवात झाली. घरकाम, शेती आणि कॅालेजचा अभ्यास ती कशातही कमी पडत नव्हती. तिच्या जोडीला तिची भावंडंही शिकत होती, तीही त्यांना अभ्यासात मदत करत होती.

सीनियर कॅालेजला असताना सरीता वेगवेगळ्या उपक्रमांत सहभागी होत होती आणि सगळीकडे आपली छाप पाडत होती. तिच्या प्रेमळ स्वभावामुळे ती सर्वांना आवडायची पण त्यातल्या त्यात राहुलला ती जरा जास्तच आवडायची. सरीताच्या नजरेतून हे काही सुटले नव्हते पण तिला आपल्या जबाबदारीची जाणीव होती आणि म्हणूनच मैत्रीपलीकडे ती राहुलजवळ कधी व्यक्त झाली नाही. तिचेही राहुलवर प्रेम होते पण सध्यातरी त्या सर्व

भावनांपासून अलिप्त राहणे योग्य आहे असे तिने ठरविले. छोट्या छोट्या गोष्टींतून राहुल आपले प्रेम व्यक्त करत राहीला पण सरीता जाणूनबुजून त्याच्याकडे दुर्लक्ष करत होती.

कॅालेजचं शेवटचं वर्ष होतं. सरीता जोमाने अभ्यास करत होती. तिच्या बाबांना तिचा खुप अभिमान वाटत होता. ते खुप खुश होते पण नियतीने त्या कुटुंबावर घाला घातला. दोन दिवसाच्या आजाराचे निमित्त झाले आणि तिचे बाबा मेंदूच्या रक्तस्रावाने मरण पावले. सरीताच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. आई सैरभैर झाली. साथीदाराशिवाय सगळ कसं निभावून न्यायचं ? प्रत्येक क्षणाला त्याच्या आठवणीत ती आसवं ढाळू लागली. सगळे कुटुंबच जसे उध्वस्त झाल्यासारखे वाटत होते.

पण सरीताला आपल्या बाबांचे बोलणे आठवले. ते नेहमी तिला बोलायचे “सरु, पोरी माझा तुझ्यावर खुप विश्वास आहे. मला कधी काही झाले तर तु नक्कीच आपल्या कुटुंबाचे तारु पैलतीरावर नेशील ह्याची खात्री आहे मला.” सरीता मग आपल्या बाबांवर रागवायची आणि असं अशुभ काही बोलू नका अशी विनवायची. आज सरीताला वाटले की तिच्या बाबांना मृत्यूची जशी काही चाहुल लागली होती. आपल्या बाबांचा विश्वास आता तिला खरा करायचा होता. ती खुप खंबीर बनली आणि आपल्या कुटुंबाची धुरा तिने आपल्या खांद्यावर घेतली. कॅालेज पुर्ण करण्यासाठी तिने आपला संपुर्ण दिनक्रम बदलला. अभ्यास, शेतीतील कामं, आणि मग फावल्या वेळात नविन काहीतरी शिकणे असे ती करु लागली.

आपल्या आईला तिला दुःखातून बाहेर काढायचे होते आणि त्यासाठी ती जीवाचा आटापीटा करत होती. राहुलला तिच्या परिस्थितीविषयी कळल्यानंतर त्याने तिला खुप भावनिक आधार दिला पण सरीताने आपल्या भावनांना लगाम घातला.

पदवीधर झाल्यानंतर सरीताला एका बॅंकेत नोकरी लागली. आता छोट्या भावंडांना शिकवण्यास तिला आपल्या पगाराची मदत होत होती. आई शेती सांभाळत होती, परिस्थितीत थोडाफार बदल झाला होता. सरीता आता राहुलशी मनमोकळेपणान बोलत होती. आठवड्याला एकदातरी न चुकता ते भेटत होते. रानगावच्या समुद्रावर बसुन निळयाशार पाण्यात डोकावत ते आपल्या भविष्याबद्दल बोलत राहायचे. सरीताने सुरुवातीलाच आपल्या कुटुंबाप्रती असलेल्या तिच्या जबाबदारीची राहुलला जाणीव करुन दिली होती. राहुलही तिला साथ द्यायला तयार होता. सरीताने राहुलविषयी आपल्या आईच्याही कानावर घातले होते.

राहुल एका फायनान्स कंपनीत चांगल्या पदावर नोकरीवर रुजु झाला होता. तो खुप महत्वाकांक्षी होता आणि नेहमीच नविन काहीतरी शिकत होता. सरीतालाही तो बॅकेच्या नवनविन परीक्षा द्यायला प्रोत्साहीत करत होता. सर्व काही कुशलमंगल चालले होते. पण परत एकदा नियतीने सरीताची परीक्षा घ्यायची ठरविले. सरीताच्या आईच्या पोटात तीव्र वेदना होऊ लागल्या, तिची झोप पळाली, अन्नावरची वासना गेली. सरीता आपल्या आईला उत्तम डॉक्टरांकडे घेवुन गेली. सविस्तर चौकशी करुन झाल्यावर त्यांनी काही चाचण्या करायला सांगितल्या. चार दिवसांनी रिपोर्ट घेऊन सरीता परत डॉक्टरांकडे गेली. ह्या चार दिवसात तिच्या आईची तब्येत जास्तच खालावली होती.

रिपोर्ट पाहून झाल्यावर डॉक्टरांनी तिला विचारले की तिच्या जोडीला घरातील कोणी वडिलधारं आलंय का? सरीताने आपले वडील हयात नसल्याचे सांगितले आणि जे काही असेल ते तिलाच सांगायची विनंती केली.

डॉक्टर आपल्या जागेवरून ऊठले व सरीताजवळ आले, तिच्या डोक्यावरुन मायेचा हात फिरवून ते बोलले, “पोरी धैर्याने घे, तुझ्या आईला आतड्यांचा कॅन्सर झाला आहे.” सरीताला पायाखालची जमीन सरकल्यासारखे झाले. तिच्या डोळ्यापुढे अंधार आला आणि तिला घेरी आली.

डॉक्टरांनी तिला प्यायला पाणी दिले. सरीताला समजत नव्हते की हे सर्व तिच्या बाबतीत का घडतेय. तिने आपल्या अश्रुंना वाट मोकळी करुन दिली. थोड्या वेळाने ती सावरली व बोलली, “डॉक्टर माझ्या आईला वाचवा.” त्यांनी तिला धीर दिला व बोलले, “आम्ही प्रयत्नांची पराकाष्ठा करु, बाकी सगळं देवाच्या हाती आहे.”

सरीता घरी आली. आईच्या नजरेला नजर देताना तीला भडभडून आलं पण तिने स्वत:ला सावरलं. खुप काम करत असल्यामुळे तु अशक्त झालीय आणि तुला भरपुर आरामाची गरज आहे असे सांगून तिने आईला खायला दिले व औषध देऊन झोपवले. सरीता घरात असलेल्या मरीयामातेच्या ईमाजीसमोर ऊभी राहीली व ओक्साबोक्शी रडू लागली. तिच्या भावंडांसाठी तिचे हे रुप नवीन होते. तिने त्या सर्वांना जवळ घेतले व आईच्या आजाराची कल्पना दिली. सगळेच भांबावून गेले आणि परत एकदा सरीताला आपल्या बाबांचे बोलणे आठवले. तिला आता हिम्मत हारुन चालणार नव्हते. तिने आपल्या भावंडांना समजावले व आईची जास्तीत जास्त देखभाल करण्याविषयी सुचना दिल्या.

दुसऱ्या दिवशी कामावर जाऊन तिने एक महीन्याची रजा टाकली. घरी परत येताना ती डॉक्टरांकडे गेली व आईच्या पुढील उपचारांविषयी चर्चा केली. केमोथेरपी, औषधे, घरखर्च , भावंडांचं शिक्षण सगळ्यांचा ताळमेळ घालणे खुप कठीण होते. सर्वप्रथम तिला आईला विश्वासात घेणे गरजेचे वाटले. आईजवळ जाऊन तिने आईचा हात आपल्या हातात घेतला. मायेने तिच्या कपाळाचे चुबंन घेतले व ती आईला बोलली, “आता उद्यापासून आपल्याला हॉस्पीटलच्या वाऱ्या करायच्या आहेत, कारण तुला असं जास्त दिवस अंथरुणात ठेवले तर तू आळशी बनशील.

आईच्या उदरात कालवाकालव झाली. तिच्यासमोर वाढून ठेवलेल्या ताटाची तिला जाणीव होती. पोरीवर किती भार आहे हे तिला माहीत होते. ती बोलली, “बाळा मला माहीत आहे, ह्या आजारातून माझी काही सुटका होणार नाही, तू उगाच जिवाचा आटापिटा करु नकोस.” पण सरीताने आईसाठी जे जे काही शक्य आहे ते सगळं काही करायचे ठरवले.

आपले एक शेत विकून त्यांनी पैशाची व्यवस्था केली व आईच्या उपचाराला सुरुवात झाली. कधी दोन दिवस बरे भरायचे तर कधी चार दिवस वाईट, आई कधी औषधांना प्रतिसाद द्यायची तर कधी ग्लानीत जायची. तिचे दु:खणे दिवसेंदिवस वाढत चालले होते. सरीतासमोर ती नेहमी हसायचा प्रयत्न करायची कारण तिला माहीत होते की तिच्या अश्या हसण्याने सरीताला ऊभारी मिळत असे.

सर्व परिस्थितीत सरीता अशी काही गुरफटली होती की तिला राहुलसाठीही वेळ मिळत नव्हता. पण ते फोनवर बोलायचे, राहुल तिला खुप धीर द्यायचा. आई ह्या आजारातून बरी होईल असे सरीताला वाटत होते.

एक दिवस संध्याकाळी राहुल तिला भेटावयास घरी आला. त्याने येताना तिच्यासाठी गुलाबांचा गुच्छ आणि आईसाठी फळे आणली होती. सरीताने सगळ्यांची ओळख करुन दिली आणि सर्वांनी त्या दोघांना बोलता यावं म्हणून एकांत दिला. राहुलने सरीताचा हात आपल्या हातात घेतला व तो बोलला, ‘मला तुला एक बातमी द्यायची आहे.’ त्याने आपल्या खिशातून एक पेपर काढुन सरीताच्या हातात दिला. राहुलची कंपनी कामानिमित्त एक वर्ष त्याला लंडनला पाठवत होती. खुप चांगली संधी होती त्याच्यासाठी.

राहुल आपल्यापासून दुर परदेशी जाणार म्हणुन मनातून सरीता खुप दुःखी झाली पण राहुल खुश आहे हे पाहुन ती बोलली , “राहुल मला तुझा खुप अभिमान आहे, यशस्वी हो.” पुढील पंधरा वीस दिवस व्हीजाचे काम, खरेदी ह्या सगळ्या गोष्टीत गेले आणि राहुल सरीताला जास्त वेळ नाही भेटु शकला पण तिने काहीच तक्रार नाही केली. राहुलचा परदेशी जाण्याचा दिवस उजाडला, सरीताने त्याच्या आवडीचे बेसन लाडु बनवले व डब्यात भरुन ती त्याला भेटायला गेली. दोघांनीही एकमेकांना घट्ट मिठी मारली व कायमचे संपर्कात राहण्याचे वचन देऊन त्यांनी निरोप घेतला.

आईच्या आजाराचे निदान होऊन जवळ जवळ सहा महीने झाले. ह्या सहा महिन्यात सरीताने जे जे काही शक्य होते ते सर्व केले. आईला कसलीच कमतरता जाणवू दिली नाही. पण आजार आईच्या शरीरभर पसरला होता. असंख्य सुया शरीरात खोलवर बोचल्यासारख्या वेदना तिला होत होत्या. ती खुपच हतबल झाली होती. तिच्याकडे आता फारसे दिवस उरले नव्हते. सरीताला राहुलची खुप आठवण येत होती. ह्या कठीण परिस्थितीत राहुल तिच्याजवळ असायला हवा होता असं तिला वाटत होतं पण तिने आपल्या मनाची समजूत काढली आणि त्याच्या विचारांतून ती बाहेर आली.

नोकरी, आईचं आजारपण आणि दैनंदिन कामे ह्या सर्व गोष्टींमुळे ती खुप थकली होती. आईकडे पाहिल्यावर सरीताला रडूच कोसळायचे, आई लवकर बरी व्हावी म्हणुन ती देवाकडे विनवणी करायची. एक दिवस राहुलबरोबर फोनवर बोलत असताना ती भावुक झाली व रडायलाच लागली. बहीण आपल्याकडे बघते हे समजले तेव्हा तिने आपले डोळे पुसले.

आता तर तिची आई काहीच खातपित नव्हती. तिला खुप त्रास होत होता. तिने सरीताला आपल्या बाजूला बसवले व तिचा हात आपल्या हातात घेऊन जी काही शक्ती आपल्या शरीरात होती त्या शक्तीनिशी ती सरीताबरोबर बोलू लागली. तिने आपले मन सरीताजवळ मोकळे केले. तिचे आभार मानले, बाबाच्या अकाली जाण्याने उध्वस्त झालेले घर तिने कसे सावरले होते ह्याची आठवण करुन दिली आणि शेवटी सर्व भावंडाची काळजी घेण्यास सांगितले. तुला काहीच होणार नाही, तू आराम कर असे सांगून सरीताने आपल्या आईला झोपवायचा प्रयत्न केला.

रात्री आईला ठसका लागल्यासारखे झाले. त्या आवाजाने सगळे जागे झाले आणि आईच्या बाजूला गोळा झाले. तिला थोडेसे पाणी दिले, तिने आपल्या सर्व लेकरांवरुन नजर फिरवली, सर्वांचे हात तिने सरीताच्या हातात देण्याचा प्रयत्न केला आणि आपले डोळे मिटले, पुन्हा कधीच न उघडण्यासाठी.

आई आपल्याला सोडून गेली ह्याची जाणीव होताच त्यांनी आक्रोश केला. सरीताने पुन्हा एकदा सर्वांना जवळ घेतले व आता आई आणि बाबा दोघांचीही माया आपल्यालाच आपल्या भावंडाना द्यावी लागणार हे तिने जाणले. निचेष्ट पडलेल्या आईकडे पाहत असताना तिला लहानपणी आई तिच्यासाठी पावसात बोलत असलेल्या ओळी आठवल्या.. “सरीवर सरी पावसाच्या सरी, सरीताच्या अंगणी बरसात करी” सरीताला आणि आईला पाऊस खुप आवडायचा, आज पावसाच्या नाही तर अश्रुंच्या सरींची बरसात सुरु होती पण ते पाहायला आई नव्हती.

सरीतालाच आता कुटुंबाची नौका पैलतीरावर न्यायची होती. तिने कंबर कसली. सगळे दुःख आपल्या काळजात ठेवून ती परत कामाला लागली. अधूनमधून तिचे आणि राहुलचे संभाषण व्हायचे , ती त्याच्या येण्याची वाट पाहत होती. भावंडाचे शिक्षण, तिची नोकरी, सर्व पुर्वपदावर येत होते. सरीताच्या कामाचा आवाका, तिची हुशारी आणि मेहनत ह्या सर्व गोष्टींमुळे तिला नोकरीत बढतीही मिळाली. एक वर्षासाठी गेलेला राहुल, दोन वर्ष होत आली तरी परत येण्याचे चिन्ह दिसत नव्हते. कामामुळे तो तिथेच अडकल्याचे त्याने सरीताला सांगितले. सरीतानेही त्याला समजून घेतले.

अडीच वर्षाने राहुल परत आला. परदेशी हवामान त्याला मानवले होते. त्याला पाहून सरीता खुप खुश झाली. येणाऱ्या रविवारची संध्याकाळ त्यांनी रानगावला समुद्राकाठी घालवायचे ठरवले.

रविवारची ती रम्य संध्याकाळ, एकमेकांच्या हातात हात गुरफटून ते समुद्रकिनारी चालत होते. एवढ्या दिवसाच्या साचलेल्या गप्पागोष्टी करत होते. दोघंही खुप खुश होते. बोलता बोलता राहुलने सरीताला सांगितले की आता त्याची कंपनी त्याला लंडनमध्येच कायमची नोकरी देत आहे आणि लवकरच त्याला तिथले नागरीकत्वही मिळेल. त्याने सरितासमोर लग्न आणि त्यानंतर लंडनला जाऊन स्थायिक व्हायचा प्रस्ताव मांडला. सरीता त्याच्याकडे बघतच राहीली, तो लंडन आणि तेथल्या राहणीमानाविषयी भरभरून बोलत

होता. जसं काही लंडन त्याच्या नसानसात भिनले होते. मध्येच त्याला अडवून तिने त्याला जाणिव करुन दिली की तिच्यावर तिच्या भावंडांची जबाबदारी आहे आणि ती झटकून ती त्याच्यासह लंडनला नाही जाऊ शकत. राहुलने तिला समजावण्याचा प्रयत्न केला की तेथून त्यांना भावंडासाठी पैसे पाठवता येतील पण सरीताला ते काही पटले नाही.

समुद्राच्या लाटांना उधाण आलं होतं, दुरवर एक छोटसं तारु गटांगळ्या खात होतं. सरीताला ह्या क्षणी आपले जीवन त्या तारुप्रमाणेच वाटले. राहुलच्या प्रेमात आणि भावंडाच्या मायेत गटांगळ्या खात असल्यासारखे. तिला आता निर्णय घेणे गरजेचे होते. राहुल परत जायच्या निर्णयावर ठाम होता. आपल्या काळजावर दगड ठेवून आणि अश्रुंना आवरुन सरीता बोलली, “राहुल माझे तुझ्यावर खुप प्रेम आहे, तुही माझ्यावर भरभरून प्रेम करतोस पण आपल्या दोघांच्याही वाटा वेगवेगळ्या आहेत. मला माफ कर पण मी माझी वाट सोडून तुझ्या वाटेवर नाही चालु शकत. आपण चांगले मैत्रीच नातं जोपासू, तेच आपल्या भल्याचं होईल.”

दोघेही सुन्न झाले. खुप वेळ शांत बसले, सरीताला खुप त्रास होत होता पण तिने स्वत:च्या भावनांना थोपवून धरले. आपल्याला निघावं लागेल आता, असं बोलुन ती चालु लागली तेव्हा तिचा हात धरुन राहुलने तिला तिचा निर्णय बदलण्याची विनंती केली पण सरीताला ते शक्य नाही झाले. काही गरज लागली तर मी आहेच असे बोलून राहुलने तिला एक आश्वासक मिठी मारली आणि दोघेही दोन भिन्न वाटांनी चालू लागले. बराच वेळ थोपवून धरलेल्या आसवांना तिने वाट मोकळी करुन दिली आणि सरीता परत एकदा खंबीर बनली जीवनाची वाट राहुलविना चालण्यास.

तिचे जीवन आता नोकरी, घरकाम, भावंडं ह्यांच्यात गुरफटून गेले, खुप वेळा भावंडांनी राहुलचा विषय काढायचा प्रयत्न केला पण तिने तो डावलला आणि त्यांना सांगितले की तो आता लंडनलाच स्थायिक झाला आहे. तिच्या त्यागाचा त्यांना मागमुसही लागु दिला नाही.

तिच्या लग्नाविषयी तिचे बहीण भाऊ चर्चा करायचे पण सरीताला लग्नच नव्हते करायचे. तिला येणाऱ्या लग्नाच्या मागणींस ती विनम्रपणे नकार देत होती. मध्यंतरी तिच्या कानावर बातमी आली की राहुलने लंडनमध्येच एका मुलीशी लग्न करुन संसार थाटला आहे. एकमेकांच्या संपर्कात राहायचे असे जरी ठरले होते तरीही सरीता आणि राहुल दोघानांही ते जमले नव्हते. पण सरीताला त्याची खंत नव्हती, ती राहुलसाठी खुश होती.

वर्षामागून वर्ष सरली, सरीताने आपल्या तिन्ही भावंडांना शिकवून स्वत:च्या पायांवर उभे केले. तिन्ही भावंडांची त्यांच्या मर्जीप्रमाणे लग्ने लावून दिली. सरीताने आपल्या आईबाबाना दिलेले वचन पुर्ण केले. आपल्या भावंडांचा संसार पाहुन सरीताला खुप समाधान होत होते. भावंडेही तिचा खुप आदर करत होती. ती आता बॅंकेची मॅनेजर झाली होती आणि फावला वेळ समाजकार्यात घालवत होती.

अधूनमधून तिला राहुलची आठवण यायची मग ती रानगावच्या समुद्राचा रस्ता धरायची आणि आठवणींच्या हिंदोळ्यावर झोके घेत सागराशी गप्पा मारत बसायची. आजच्या पावसाळी सकाळी शेता-बांध्यावरच्या रस्त्याने जात असताना तिचा जीवनपट तिच्यासमोर असा उलगडला होता.

पण सरीता आता खुश होती. ना कसली खंत, ना कसली आस, रिमझिम बरसणाऱ्या पावसाने तिला चिंब भिजवले होते... तिने वर आकाशाकडे पाहीले.. तिची आई ढगाचे रुप घेऊन जशी काही बोलत होती... “सरीवर सरी पावसाच्या सरी, सरीताच्या अंगणी बरसात करी”

सरीताच्या चेहऱ्यावर समाधानाचे स्मितहास्य झळकले आणि तेच हास्य लेवून तिने समुद्रावर जाण्यासाठी आपला वेग वाढवला..

---

आईचं प्रेम मोजण्याचं माप
कुठल्याही तराजूत नसतं
तिच्याशी फारकत घेणाऱ्याचं
तसं फारसं कर्तुत्वच नसतं

मन आणि बुद्धी
अंतकरणातील अदृश्य अवयव
बुद्धी अनूभवातून शिकते
मन हे अनुनभवीच राहते

प्रियकराच्या मिठीत शांत पहुडलेल्या
प्रेयसीस जगाचे भान नसते
जगानेही तिथे मग उगाच
डोकावण्याचे काय कारण असते

कळपात राहणाऱ्या जनावरांनाही
आपलं कोण ते कळतं
माझ्या ‘कम्युनिटी’त तो उपरा
मलाच कसं ते नडतं.

# संवाद

• फा. नोबेल मेन, वसई

काही दिवसापासून संवाद या विषयावर थोडसं चिंतन करत होतो. मानवाचा स्वत:शी असणारा संवाद, संवाद जो करायचा राहून गेलेला आहे, संवादाचा स्तर इत्यादी. संवाद या मराठी शब्दाला इंग्लीश शब्द आहे, 'Dialogue'. अगदी नवजात बालकसुद्धा जन्माला आल्यापासून संवादास सुरूवात करते किंबहुना आईच्या उदरात असल्यापासून आईशी व जगाशी त्याचा संवाद सुरू असतो. पक्षांचा किलबिलाट हासुद्धा एक संवाद आहे. डेव्हीड बोहम या एका अमेरीकी विचारवंताने म्हटले आहे की, 'संवाद हा एखाद्या 'गोंद' प्रमाणे आहे जो लोकांना व समाजाला धरून ठेवतो. माहिती तंत्रज्ञान, दळणवळण माध्यमं, संदेश या आधुनिक जगातील परवलीच्या शब्दांचा पाया हा संवाद आहे. आजकल बहुतेक संवाद हा कोड भाषेत केला जातो व साठवला जातो. जरी संवादाच्या कक्षा रूंदावत गेल्या, त्यात विविध साधनांची भर पडत गेली तरी दोन व्यक्तीमधील मुखावाटे होणारा संवाद हा सर्वश्रेष्ठ संवाद मानला जातो.

श्रीकृष्ण व अर्जुन या दोघांमध्ये कुरूक्षेत्र या ठिकाणी महायुद्धाअगोदर जो epic महान संवाद घडला तो अजरामर आहे. कृष्ण अर्जुनाला जीवनाचं सार किंवा मर्म सांगत असतो. अर्जुनासमोर असंख्य प्रश्न निर्माण होतात. कृष्ण त्याला सत्याकडे घेऊन जात असतो. अर्जुन गोंधळलेला असतो. तो विनवणी करतो. मनात संशयाचे ढग निर्माण होतात. काहूर माजलेलं असते. अर्जुनासाठी तो एक नविन व दिव्य संवाद असतो. आजपर्यंत कुणाशीही न साधलेला तो संवाद असतो. तो केवळ कृष्णाच्या मुखातील शब्दांवर लक्ष केंद्रीत करतो. परंतु शेवटी तो कृष्णाचे मन जाणू लागतो. त्यानंतर त्याला अंतिम सत्याचा उलगडा होतो. खऱ्या संवादाला सुरूवात झालेली असते. बायबलमध्ये दु:खसहनाच्या वेळी येशू, पेत्र, पिलात, रोमन सैनिक, धार्मिक नेते व चोर यामध्ये झालेला संवाद हा सत्याकडे नेणारा संवाद आहे. काही दिवसांअगोदर मी संवाद व दळणवळण या विषयांवरचे लेख वाचले. त्यात संवाद कसा असावा यावर भर दिलेला होता.

संवादामध्ये स्वाभाविकपणा, सरलता, प्रवाह व योग्यता असे विविध पैलू असले पाहीजेत व विशेष म्हणजे संवाद हा सत्याचा असावा त्यात बनावटपणा नसावा. कारण ‘सत्य’ हा संवादाचा मुळ ‘गाभा’ आहे. मागच्या काही वर्षात वर्तमानपत्रे, इंटरनेट व इतर समाजमाध्यमांवर एका नवीन संवादपर्वाची सुरूवात झालेली आहे. १९व्या शतकातील जर्मनीमधील जोसेफ गोबेल्स या व्यक्तीकडून आजच्या पिढीने प्रेरणा घेतली असावी. विशेषकरून आजच्या समाजमाध्यमांनी सत्याची सर्वत्र वानवा असते. सत्य जर सांगायचे व पटवून दयायचे असेल तर जे खोटे व बनावट आहे, त्यालाच जगासमोर सत्य म्हणून प्रकट करावे अशी जोसेफ गोबेल्सची नीती होती.

खोटारडेपणाचा रेटून पुरस्कार करायचा. एखाद खोटं दहा वेळा सांगायचं म्हणजे ऐकणाऱ्याला ते सत्य असल्याचा भास निर्माण होईल. गोबेल्सच्या या नितीला किंवा तंत्राला ‘Big Lie’ असे संबोधतात. हिटलरने या तंत्राचा पुरेपूर वापर करून घेतला व ज्यू धर्मियांची प्रतिमा बिघडवली व नंतर त्यांचे शिरकाण केले. दुसऱ्या महायुद्धाचा जनक हिटलर होता. हिटलरने महायुद्ध लादण्यासाठी गोबेल्सच्या खोट्या नितीचा वापर केला व लोकांशी, जगाशी खोटा संवाद साधला.

‘झुंडीचे मानसशास्त्र’ या पुस्तकात ‘झुंड crowd’ निर्माण करण्यासाठी त्यांना एकत्र ठेवण्यासाठी व त्यांच्यावर एखाद्या विचारसरणीचा अंमल ठेवण्यासाठी, त्यांना आपली धोरण पटवून देण्यासाठी, शत्रू आहे त्यापेक्षा मोठा करून दाखवावा लागतो असे नमूद केलेले आहे. आजची प्रसारमाध्यमं व राजकारणी नेमकं हेच करत आहेत. अनुयायांवर सतत शत्रू वाईट कसा आहे, त्याची व्याप्ती किती आहे, तो किती भयानक आहे, याचा सतत भडीमार केला जातो. विविध प्रतीक व रूपकांचा वापर करून शत्रूंची प्रतिमा मलीन केली जाते. उदा. शेतकरी वाईट आहे हे पटवून देण्यासाठी ते दहशतवादी आहेत, राष्ट्रविरोधी आहेत. खलीस्तानी आहेत असे सतत सांगीतले जाते. एकदा त्यांची प्रतिमा मलीन झाली की आपली प्रतिमा आपोआप स्वच्छ होते असा समज आहे.

संवाद किंवा चर्चा घडवून आणताना जात, भाषा, प्रांत, धर्म इ. अस्मितेचा डोस पाजला जातो. यात अलिकडच्या ५-६ वर्षात भारतीय न्यूज चॅनल्स अतिशय निपुण झालेल्या आहेत. संवाद, चर्चाविनियम, वादविवाद घडवून आणण्यात शिष्टाचाराचा अभाव दिसून येतो.

कोण किती बोलणार, काय बोलणार, केव्हा बोलणार, काय बोलू नये हे पुर्वनियोजीत (Orchestrated) असते. शाब्दिक चकमक घडवून आणल्या जातात. एखाद्याची खिल्ली उडवली जाते, एखाद्याला लक्ष्य केले जाते. पत्रकारीतेचा आत्मा व गाभा ज्याला ठावूक नाही अशी लोकं संवाद, परिसंवाद घडवून आणत आहेत. काही न्यूज चॅनेल्सवर अवमानकारक भाषा वापरल्याबद्दल मानहानीचे खटले दाखल झालेले आहेत.

भारतात नव्याने जन्म घेतलेल्या OTT Platforms म्हणजे मनोरंजनाच्या विविध चॅनेल्सवर अमर्यादीत सिनेमा व मालिका बघू शकतो. त्या चॅनेल्स सरकारच्या अखत्यारीत येणार आहेत, कारण आहे संवादाचा अतिशय घसरलेला स्तर. त्यात प्रामुख्याने नेटफ्लिक्स, ॲमेझॉन प्राइम याचा समावेश आहे.

हिंसात्मक व अनुचित भाषेचा वापर हा जास्त ग्राहकसंख्या मिळविण्यासाठी या चॅनेल्स करतात. कारण प्रेक्षकांना विशेषत: युवा वर्गाला या भाषा व संवाद पसंत पडतात. या संवादाचा वापर ते दैनंदीन वापरात करतात. नुकताच प्रसारीत झालेल्या ‘मिर्झापुर’ या वेब सिरीजमध्ये हिंसात्मक संवादाचा अतिरेक करण्यात आला. परंतु त्याला फारसा विरोध झाला नाही, उलटपक्षी ‘मिर्झापुर’ ही वेब सिरीज अशा संवादामुळे प्रसिद्ध झाली. इतर चॅनेल्स त्यापासून प्रेरणा घेत आहेत.

एकंदरीत नव्या व आधुनिक पिढीकडे काय वाहून ठेवले आहे याची कल्पना येते. कंगना रानावत या पद्मश्री पुरस्कारप्राप्त अभिनेत्रीचे ट्वीटर अकाऊंट सतत चर्चेत असते. रोज काहीतरी संवाद त्या ट्वीटरवरून ती करत असते. त्यात विक्षिप्तपणा, टीका, बालीशपणा यांचा भरणा आहे. तीचे कोट्यावधी चाहते आहेत.

इत्त्टरनेट व सोशल मीडीयावर जस्त वेळ खर्च करण्यामध्ये फिलिपाईन्स, ब्राझील, मलेशिया या देशांबरोबर भारताचासुद्धा समावेश होऊ लागला आहे. तथ्यहीन, बनावट, हिंसात्मक, पुर्वनियोजीत संवादाची मुळे जोर धरू पाहत आहेत. कुठे नेवुन ठेवलाय संवाद आपला असे म्हणायची वेळ आली आहे.

# बॉलिवूड अन काश्मीर

• सौ. वासंती प्रकाश घाडगे, सातारा - 9325491122

लडाख प्रांत आत्ताआत्ता लाईम लाईटमधे आला. पण संपूर्ण काश्मीर प्रांत पूर्वापार काळापासुन सगळ्यांचाच अत्यंत लाडका. सिनेअभिनेते शशि कपूर यांच्या निधनावेळी दूरदर्शनवर "जब जब फूल खिले" मधले सुमधुर संगीताने परिपूर्ण "एक था गुल और एक थी बुलबुल" गाणे व शिकाऱ्याच्या टेरेसवर म्हणजे वुलेगार्डवर, चित्रित झालेले 'ये समा समा है ये प्यारका' गाणे लागले अन मी मनोमन हिंदी सिनेसृष्टीचे आभार मानले. कारण काश्मीर खोऱ्याचे वादातीत सौंदर्य सर्वसामान्य माणसांना बघण्यास मिळाले व त्यांच्या मनात तिथे जाण्याची चेतना जागवली आणि काश्मीर पर्यटनाला चालना मिळाली.

मुंबईच्या राजाराणी ट्रॅव्हल्सने त्याकाळी अनेकांना काश्मीरचे अनन्यसाधारण दर्शन घडवले. राजासाब ही पदवी त्यांना काश्मीरच्या जनतेनेच ऊत्सफूर्तपणे बहाल केली होती म्हणे. आज अनेक ट्रॅव्हल कंपन्या तिथे नेतात. पण स्वतंत्रपणे काश्मीरला जाण्यात फार मजा येते. कारण बॉलिवूडमुळे हा प्रदेश सर्व परिचित झाला आहे. सिनेमांमुळे काश्मीरचा दहशतवाद, सर्वसामान्य जनजीवनाची आपल्याला माहिती झाली आहेच. उदा. सौंदर्य अर्थात काश्मीरचे अन तिथल्या स्त्री पुरूषांचे, कश्मीरकी कलीमधे ऊठून दिसले. रोझामधे आतंकी कारवायांचे चित्रण पाहून मन धास्तावते.

हैदर, मिशन कश्मीर, यहाॅ, लम्हा, दिलसे मधे दिसलेले रक्तरंजित काश्मीर अन त्यातला दहशतवाद मन विषण्ण करतो. अरेरे! काय हे गालबोट लागले असे वाटते."तहान"मध्ये तर लहान मुलगा अन त्याचे गाढव या दोघांमध्ये असलेले ईतके सुंदर भावपूर्ण नाते चित्रित अगदी मनाला भावते. प्रेम करण्याला मर्यादा नाही हेच खरे. फितूर, सिकंदर, आरजू, फना. मासूम, हायवे, सात खून माफ, ह्यात दिसलेले काश्मीर अजूनच वेगळे होते. तरुणाईचा लाडका सिनेमा "ये जवानी है दिवानी"तले मनाली' गुलमर्गचे जगप्रसिध्द बर्फाच्छादित स्पॉट म्हणजे काश्मीरी हिमाचली ऑल टाईम हिट ठिकाणे.

लक्ष्य, शौर्य, शालीमार गार्डन सिनेमांचे चित्रीकरण काश्मीरात झाले. पण थ्री ईडियट्सच्या शूटिंगमुळे लद्दाख एकदम लाईमलाईटमधे आले. गुलशनकुमारने वैष्णोदेवीची भजनं प्रसारित करून भक्तांमधे कमालीची वाढ झाली. ह्या भागात काश्मीरची बोली भाषा

कोशूर ऐकायला मिळते. दरवर्षी एक कोटी भक्त देवीदर्शनाला येतात. वीस जानेवारी १९९०ला सर्व कश्मीरी पंडित जरी काश्मीर सोडून गेले तरी भक्तांचा ओघ काही कमी झाला नाही. अन ह्या यात्रेकरुंच्यावरच ह्या भागातले पर्यटन अन रोजीरोटी अवलंबून आहे. "हेवन ऑन द अर्थ"ची पदवी सार्थ करणारे काश्मीर देवीदर्शनाने भाविकांना स्वर्गीय आनंद देते. तर सिनेप्रेमींना मूव्हीमधल्या स्पॉटसच्या पुनःदर्शनाचा आनंद देतात.

सिनेमात पाहिलेले दऱ्या, बर्फ, काश्मीरी युवति, शिकारा, फुलांचे ताटवे, सफरचंदाच्या बागा मनाला आनंदित करतात. कधीतरी अचानक दहशतवादाचा किंवा कर्फ्यूचा सामना करावा लागला तर भयभीत करतात. बॉलिवूडच नव्हे तर आता शॉर्टफिल्म वाल्यांची नजरपण काश्मीरकडे वळली आहे.

ईथल्या वुलरलेकचे सौंदर्य वादातीत, त्यात साठणारा कचरा गोळा करून उदरनिर्वाह करणाऱ्या चौदा वर्षाच्या बिलाल अहमद ह्या मुलावर डॉक्युमेंटरी बनवली गेली. त्यामुळे हा लेक वाचवण्यासाठी "वुलरलेक कॉंझर्वेशन" स्थापन झाले अन भविष्यात हा सुंदर लेक पूर्ववत निसर्गरम्य होईल अशी आशा निर्माण झाली. बॉलिवूड अन काश्मीरचे हे अतूट नाते म्हणजे हमखास हिट सिनेमाचा फॉर्म्युला होता. अनेक सत्य घटनांवरचे सिनेमा गाजलेत अन प्रेक्षकांच्या मनात घर करुन आहेत.

"ये समा समा है ये प्यारका" अश्या रोमॅंटिक भावनेचं कधी "रोझा जानेमन" सारख्या विफल करुण भावनेत परिवर्तन झालं कळलच नाही. हे सर्व भयावह मन खिन्न करणारे आहे. दहशतवादामुळे काश्मीरचे पर्यटन पार भुईसपाट झाले. "कश्मीरकी कली" कोमेजली. काहींचे तर निर्माल्य झाले. अनेक हैदर जन्माला आले. त्यात गरिब जनता निष्कारण होरपळून निघाली. केशराचा रंग ऊडाला. काहवा कडू झाला. गुलाबाचे काटे टोचू लागले. कांगडीने पेट घेतला. अवघे काश्मीर दहशतीने धगधगू लागले.

कमी झाले नाहित ते फक्त वैष्णोदेवीचे भक्त अन अमरनाथाचे यात्री. अनेक छुपे हल्ले, दरडी कोसल्या तरी भक्तीचा ओघ काही थांबला नाही. तर अशी हि बेधडक बेदरकार बिनधास्त काळजाचा ठाव घेणारी, थरारक, रोमांचक, ईतिहासाचा मागोवा घेणारी काश्मीर सहल आयुष्यात पुनःपुनः करायला हवी असे वाटते. तरच हे लोक मानाने जगतील अन त्यांचे भविष्य उज्वल होईल.

# 'रिस्क'

रॉबर्ट फर्नांडिस - ८००७२०५०१६

अचानक तीला जाग आली, आपण कुणाच्या कुशीत आहोत ? या संभ्रमात तिने डोळ्याच्या पापण्या फडफडवल्या. ती इकडेतिकडे पाहु लागली. आपल्या ओळखीचे कुणीच इथे दिसत नाही, या विचाराने ती कावरीबावरी झाली. माझ्याकडे रोखून पाहिल्यावर तीचा चेहरा खरकन ऊतरला. डोळ्यात अश्रुचा लोट अचानक जमा झाला आणि पाहता पाहता तिने भोकांड पसरलं. जितक्या मोठ्यानं रडता येईल तितक्याने ती रडू लागली. आम्ही ऊगी करण्याचा केवीलवाणा प्रयत्न करु लागलो पण छे, तीचं रडणं आमच्या आवाक्यात येतच नव्हतं. आजूबाजूचे अनोळखी चेहरे आमच्याकडे वळून पाहु लागले. त्यांच्या नजरेत संशय आम्हाला स्पष्ट दिसू लागला. तिला शांत करण्याचे आम्ही उभयतांनी खुप प्रयत्न केले पण तीच रडणं अनावर होतं. ह्या मधल्या काळात नाही ते विचार मनात थैमान घालू लागले. कारण हा प्रसंग चक्क विमानातला होता. ही बालीका माझी नसल्यामुळे एसी चालू असूनही विमानात मला चक्क घाम आला आणि हे जर विमान स्टाफला कळलं तर ? आपण सहकुटुंब सहपरिवार जेलमध्ये जाऊ. तसेच विमानही हुकण्याची शक्यता निर्माण झाली असती.

वेलंकनी मातेच्या नोव्हेनाचा पाचवा दिवस ऊरकुन मी माझ्या रूमवर परतत होतो. गर्दित वाट तुडवत असताना मागुन ओळखीची साद ऐकु आली, वळून पाहील्यावर तो माझा मित्रच होता. लागलीच त्याने आपली अडचण माझ्या कानावर घातली आणि होकारासाठी माझ्याकडे आशेने पाहु लागला. सवयीप्रमाणे मी मागचा पुढचा विचार न करता "होकार" दिला. त्याचं अस झालं होत की, माझ्या मित्राचं फ्लाईट माझ्या फ्लाईटपेक्षा तब्बल एक तास ऊशीराने होतं, आणि मुख्य अडचण अशी होती की मित्राच्या चिमुकलीच तिकीट मात्र आमच्या फ्लाईटचं होतं. तो आपल्या कन्येला मुंबई विमानतळापर्यंत सोबत नेण्याची विनंती करीत होता.

चेन्नई येथून पहाटे साडेपाचचं आमचं फ्लाईट होते. आम्ही मध्यरात्री दोन वाजताच चेन्नई विमानतळावर पोहचलो. सगळ्यांच्या डोळ्यात प्रचंड झोप होती. विमानतळावर पोहचल्यावर आमचं कुटुंब खुर्च्यात बसुन डुलक्या देऊ लागलं. माझी नजर मात्र माझ्या मित्राला शोधण्यास भिरभिरत होती, पण तो काही केल्या नजरेस येत नव्हता. खुप खटाटोप करून सुध्दा त्याच्याशी संपर्क होऊ शकत नव्हता. रात्र हळुहळु ऊडत चालली होती, पहाटेचं

झुंजुमुंजु होऊ लागलं होतं. आमच्या कुटुंबानी बोर्डींग पास काढले व इमिग्रेशनच्या तयारीला लागलो. वेटींग रूममध्ये आमचा संवाद सुरु होता. ते अजून का पोहचले नाहीत ? ट्रॅफीकमध्ये अडकले असतील का ? मोबाईलवर माझा संपर्क निष्फळ ठरत होता. आतातर विमानात जाण्यासाठी आम्ही रांगेत ऊभे राहीलो. माझा मोबाईल खणखणला, पण बँग खाली ठेऊन खिशातून फोन काढेपर्यन्त तो शांतही झाला. इतक्यात माझ्या मित्राची बायको आपल्या खांद्यावर एका छोट्या मुलीला घेऊन येताना माझ्या नजरेस पडली. जवळ येताच तीने मुलीला माझ्या हवाली केले. बोर्डींग पासही माझ्याकडे सोपविला. खरं पाहीलं तर मुलीला आमच्यासोबत पाठवताना तीला खुप यातना होत होत्या व त्या तिच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होत्या. मुलगी मात्र माझ्या खांद्यावर ढाराढुर झोपली होती. तीच्या तोडांतून पाझरणाऱ्या लाळेने माझा खांदा किंचीत ओलसर झाला होता. एकदाचे आम्ही विमानात पोहचलो.

आता खरी कसोटी तर विमानातील होती, विमानात स्पीकरवरून अनाऊसमेंट झाल्यामुळे ती लहान बालिका ताडकन जागी झाली होती, आणि मग हे वरील सारं नाट्य घडलं व हंगामा झाला होता. पण एक चांगलं काम केलं आहे आणि आपल्यामुळे त्या कुटुंबाना मदत झाली आहे त्यामुळे देव आम्हाला ह्या संकटातून जरूर वाचविल हा माझा विश्वास होता कारण "वेलंकनी माता" आमची आश्रयदाती होती व गरजूंना मदत करणे हे शिकविले होते..... जर का मी त्या बालिकेस नेण्यास नकार दिला असता तर त्या सर्व कुटुंबास आमच्या नंतर असलेलं लागलीच विमान सोडावे लागले असते व त्यात त्या कुटुंबियांचे फार नुकसान झाले असते, म्हणून मी ही "रिस्क" घेतली होती....

आता ही बालिका एकाऐकी रडण्याची गप्प कशी व का राहिली ? त्याचं रहस्य असं झालं की.......

बालिका रडण्याच्यावेळी आम्ही एकमेकाकडे घेत होतो पण ज्यावेळी ती माझ्या मुलाने हातात घेतली तेंव्हा त्याने एक शक्कल (आयडिया) लढविली. ती कोणत्या शाळेत शिकत आहे? हे विचारून, त्याच्या दोन्ही मामाच्या मुली तिच्या वर्गात आहेत व त्या हुशार आहेत हे सांगताना, त्यांची तिला नाव सांगून "तू" त्याच्याहीपेक्षा हुशार आहेस असे पटविले. मी त्यांना मामाकडे गेल्यावर प्रश्न विचारतो व त्यांनी उत्तर दिले की त्यांना चॉकलेट देतो, तर तू सुद्धा जर बरोबर उत्तर दिले तर प्रत्येक उत्तरासाठी १ चॉकलेट देईन. असे त्यांनी १० प्रश्न विचारून त्यातील तीने ७ प्रश्नांची अचूक उत्तर देऊन ७ चॉकलेट जिंकली होती. तिला ७ चॉकलेट बक्षीस मिळतील त्यामुळे ती खूश होती व रडणं बंद होऊन माझ्या मुलाबरोबर तिची त्यावेळी मैत्री झाली होती.

"इथे तर आमच्या कुटूंबियांनी सुटकेचा निश्वास सोडला."

# बदल...

• अशोक दिब्रिटो. नंदाखाल. वसई.

जग हे परमेश्वराची अदभूत किमया आहे आणि जगातील प्रत्येक गोष्टीवर त्याचं नियत्रंण आहे. प्रत्येक सजीव आणि निर्जिव गोष्टीला त्याने परस्पर पूरक बनविले असून जगातील प्रत्येक घटक हा एकमेकांवर अवलंबून आहे. जर एका घटकाने दुसऱ्या घटकावर अतिक्रमण केले तथा त्यांच्या कामात ढवळा ढवळ केली तर संपूर्ण विश्वाला त्याचा परिणाम भोगावा लागतो ह्याची प्रचिती अधूनमधून आपणास येत असतानाही आधुनिकीकरणाच्या नावाखाली आपण निर्सगरचनेला ओरखडा पाडून आपल्याच पायावर कुऱ्हाड चालवत नाही का?

काळानुसार बदल हा अपेक्षित आहे मात्र त्या बदलाला आत्मपरिक्षण तथा चिंतनाची झालरही असायला हवी. आपल्या बदललेल्या विचारशैलीतून आपण काय कमावलं आणि काय गमावलं ह्याचं मूल्यमापन जर करत नसू तर आपणास तात्पुरता आनंद देणारा हा बदल आपल्या विनाशास कारणीभूत ठरू शकतो. जगाच्या प्रारंभापासून सुर्यदेवता आपल्या किरणाव्दारे धरती प्रकाशमान करत असतो. ह्याच सुर्यप्रकाशाच्या किरणात असणारी अतिनील बी किरणे ही पृथ्वीवरील जीवसृष्टीसाठी अतिशय धोकादायक आहेत.

ही विनाशकारी किरणं आपल्यापर्यंत पोहचून आपला विनाश होवू नये म्हणून निर्सग निर्मित ओझेन वायूचा थर वातावरणात कार्य करत आहे. मात्र जगात घडलेल्या औद्यौगिक क्रांतीमूळे वातावरणात प्रदूषणाची पातळी प्रचंड प्रमाणात वाढून सजीवसृष्टीचे संरक्षण करणाऱ्या ओझेन वायूच्या थराला भगदाड पडल्याचे शास्त्रज्ञांच्या लक्षात आलेलं आहे. ग्लोबल वॉर्मींगच्या नावाने बरीच बोंबाबोंबही झाली मात्र प्रत्येक देश हा महासत्ता बनण्याच्या स्पर्धेत असल्यामूळे आपल्या विनाशाच्या दिशेने येणाऱ्या संकटावर दुर्लेक्ष होत आहे.

आजपर्यंत निर्सगाने आपणास शुध्द हवा, पाणी आणि अन्न पुरविले कारण निर्सगाला सशक्त ठेवणारी घनदाट जंगलं, पहाड डोंगर, नदी नाले आणि सागर सशक्त होते. आज मानवाने जंगलाचा कायापालट करून शहरं वसविली, पर्वत डोंगर भुईसपाट करून रस्ते बनविली, नदी नाले आणि अगदी सागराच्या पोटात क्रॉंक्रीट भरून पंचतारांकीत हॉटेल्स

आणि रिसॉर्ट उभारले आणि ह्या गोष्टीचा वातावरणांवर झालेला परिणाम आपण आत्ताच अनूभवत आहोत. आपण निर्सगरचनेत घडवत असलेले फेरबदल थांबवून आपल्या भावी पिढीसाठी प्राणवायू आणि पाणी शिल्लक ठेवणार आहोत का?

देव धर्माची व्याख्या काय आहे? प्रेम, क्षमा, शांती आणि अहिंसा आपणास प्रत्येक धर्म शिकवितो मात्र आज ही तत्व माणसाच्या आचारणात दिसतात का? संपूर्ण जग आज धर्मयुध्दाने पेटलेलं आहे. धर्मातील अहिसेंच्या तत्वाने हिंसेची जागा घेवून माणूस माणसाला संपवत आहे. अशा ह्या धर्मयुध्दाने आजपर्यंत कोणत्या धर्माची प्रगती झाली आहे तथा अखिल विश्वाचे कोणते हित साधले गेले आहे ह्या गोष्टीचं ह्या सुशिक्षीत युगात मूल्यमापण होवून धर्मयुध्दाची ही ठिणगी विझायला नको का?

जगभर बदलाचे वारे वाहात असताना आपण आणि आपली वसईही जगाबरोबर धावत आहे. ह्या सर्व धावपळीत थोडं मागे वळून पाहीलं तर आपण शैक्षणिक, सामाजीक आणि आर्थिक क्षेत्रात फार पुढे पोहचलो आहोत मात्र आपल्या पूर्वजांच्या आठवणी, त्यांचे संस्कार आणि त्यांनी आपणासाठी राखून ठेवलेला निर्सगाचा खजीना आपल्या हातातून निसटल्याचे तसेच काही नैतीक आणि सामाजीक मूल्य पायदळी तुडवत आपण धावत असल्याचे जाणवते.

आपण जर मागे वळून पाहीलं तर अगदी २० ते २५ वर्षापूर्वी आपली वसई गर्द हिरव्या शालूत सजली फुललेली असायची. आज तीच हरीत निर्सग संपदा आणि आपणास शुध्द हवा देणारी हिरवळ आपल्या प्रगतीच्या आणि प्रतिष्ठेच्या ओझ्याखाली गाडली जात आहे. शिक्षणाने, पदाने आणि पैशाने आपण फार मोठे होत असताना आपली कुटुंब छोटी होत आहेत. आपल्या कुटुंबाची व्याख्या बदलून भाऊ बहीणं, आजी आजोबा आणि वयस्क आई-वडील कुटूंबाच्या व्याख्येबाहेर जात आहेत.

सामाजीक प्रतिष्ठा आणि राहणीमान उंचावून झटपट श्रीमंत होण्याच्या स्पर्धेत आपण आपल्या जमिनी परप्रांतियांना विकल्या. आपली परिस्थिती बदलली परंतु त्याबरोबरचं परप्रांतियाच्या गर्दीत आपली संस्कृती बदलली. आपली प्रतिष्ठा वाढत असताना आपण संख्येने घटत चाललोय.

आधुनिक युगात निस्वार्थ गळून पडला व स्वार्थी भाव जागृत होवून गावातील आपल्या घरासमोरील रस्ता अरूंद झाला व शेतीवाडीतील रस्ता बंद होवू लागला. गावातील मोकळ्या जागेवर कुंपन आली व गावातील मुलांच्या खेळण्याच्या जागा बंदिस्त झाल्या. जी नैर्सगिक बावखालं आपल्या शेतीसाठी आणि पिण्यासाठी वर्षभर पाणी साठवत होते त्याच्या पोटात भराव टाकून संपविण्यात येत आहेत आणि आपणचं निर्सगाने मुक्त हाताने दिलेला पाण्याचा झरा बंद करण्याचं पाप करत सुटलो आहोत.

औद्योगिक क्रांतीने आजच्या आपल्या नविन पिढीला शेती आणि शेतीच्या कामापासून दुरावले आणि आपली गावातील खळी, भाताच्या राशी काळाच्या पडद्याआड गेल्या. ज्या शुध्द फळ भाज्या आपण आपल्या शेतात पिकवायचो त्या आपल्या शेतात आपण क्राँक्रीटचं बी पेरलं आणि आपण रासायनिक प्रदूषीत फळ भाज्या विकत घेवून आजाराच्या समीप जावू लागलो आहोत.

नविन तंत्रज्ञानाने आपलं राहणीमान बदललं, आपली घरं दारं बदलली, आपलं खाणं पिणं तथा आपले कपडे बदलले आणि त्याचबरोबर माणसाचं माणूसपणाही बदलला. आज माणसाला समाजासाठी, कुटुंबासाठी तथा स्वतासाठी वेळ मिळत नाही.

जागतीक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी माणूस दिवसरात्र कामाननिमित्त घराबाहेर राहून आपलं कौटोंबिक जीवन पैशाच्या ढीगाऱ्याखाली गाडत आहे. आजच्या ह्या नँनो कारच्या जमान्यात आपल्या कौटोंबिक गाडीत आपल्या आई वडीलांसाठी जागा मिळत नसल्याने आई वडीलांना अनाथाश्रमाचा आधार घ्यावा लागत आहे.

असा हा प्रगतीचा आलेख आपणास खऱ्या सुख शांतीच्या दिशेने नेत आहे का? जी प्रतिष्ठा आणि प्रगती ही माणसाला माणसापासून दूर नेत असेल, आपली रक्ताची नातेसबंध तोडणारी असेल आणि सर्व सुख दाराशी असताना ताणतणाव वाढविणारी असेल तर भविष्यात आपल्यातील हा बदल आपणास यशाकडे घेवून जाणारा आहे की विनाशाकडे हा चिंतनाचा विषय आहे.

# एक 'तारा'

• एमेल आल्मेडा, चौकाळा, वसई

आकाश वाट पाहत आहे त्या दिव्य ताऱ्याची. हो तोच पहाटेचा तारा जो पूर्ण नभोमंडळ व्यापून टाकणार आहे. त्याच्या दिव्यत्वापुढे ग्रह, गोल, तारे निष्प्रभ ठरणार आहेत. आम्हा पृथ्वी वासीयांना तो दिशादर्शक ठरणार आहे. आम्हाला मार्ग दाखवून तो आम्हाला पूर्णत्वाकडे घेऊन जाणार आहे.

ज्याचा माग काढत तीन ज्ञानी राजे त्याच्या दिशेने त्याला शोधत आले. ज्या ठिकाणी ते दिव्य बाळ होते त्या ठिकाणावर स्थिरावलेला तो तारा! त्या काळोख्या रात्री मेंढपाळांचे डोळे आपल्या लख्ख प्रकाशाने दिपवून टाकणारा तो तारा! मानव जातीचे भाग्य उजळणारा तो तारा!

तो उगवला आहे. अंधकारचे साम्राज्य नष्ट करण्यासाठी युगानयुगे तो तळपत आहे. जो आपल्या हृदयाचे दार उघडतो त्यांच्या अंत:करणात तो दिव्य प्रकाश पोहोचतो. ज्या दिवशी आपण मनाची कवाडे उघडतो तो दिवस आपल्या जीवनाचा नाताळ असतो.

तो अवतरला गायीच्या गोठ्यात. गव्हाणीत त्याचा जन्म झाला. का खरच जगाच्या निर्माणकर्त्याला पृथ्वीतलावर जन्म घेण्यास जागा नव्हती? त्याला जगात जागा नको होती. त्याला अंत:करणात जागा हवी होती. म्हणून तर तो गोठ्यात प्रकटला, गव्हाणीत जन्मला. आम्ही आमच्या मनाचे गोठेच तर केले आहेत. हृदयाची कोठारे केली आहेत.

जगातील सर्व चिंता, समस्या, स्वार्थ, मोह ह्याचे भांडार आहे आपले अंत:करण. आपले अंतरंग साफ केल्याशिवाय तो कसा येणार आपल्या जीवनात. आपले शरीर जिवंत देवाचे मंदिर बनवण्यासाठी आपल्या मनाचा बाजार उधळवून लावणे आवश्यक होते. त्याकरीताच तर त्याचे आगमन झाले होते.

जन्म घेण्यासाठी तो सगळीकडे हिंडला पण त्याकरीता त्याने गोठ्याला पसंती दिली. कारण त्याला गोठ्याचे रुपांतर राजमहालात करायचे होते. गुरांसारखे जीवन जगणाऱ्यांच्या जीवनात त्याला राजवैभव प्राप्त करुन द्यायचे होते. 'जे आत्म्याने लीन ते देवाला पाहतील' म्हणूनच तर तो वर्तनाने लीन आणि स्वभावाने दीन असलेल्या कपिलेच्या गोठ्यात अवतरला.

सारं जग झोपेत असताना तो गरीब मेंढपाळांच्या दृष्टीस पडला. कारण ते जागृत होते. डोळ्यात तेल घालून ते पहारा देत होते. मेंढरांची राखण करत होते. रात्र सरण्याची आतुरतेने वाट पाहत होते.

जो स्वभावाने गरीब असतो, परमेश्वराच्या लेकरांची काळजी घेतो. अन्याय अत्याचाराची रात्र सरण्याची वाट पाहतो त्यांना 'तो' दिसतोच.

जे त्याचा शोध घेत येतात व त्याला आपलं सर्वस्व अर्पण करतात ते खरे शहाणे लोक असतात. परमेश्वर त्यांना 'ज्ञानी' म्हणून संबोधतो. जगाच्या ज्ञानापेक्षा परमेश्वराचं ज्ञान मोठं आहे. जो परमेश्वराला ओळखतो देव त्याला राजा करतो. देवाच्या राज्याचा तो साक्षीदार आणि भागीदार होतो.

तो रोजच जन्मतो. क्षणाक्षणाला तो आपणास साद घालत असतो. कधी चमचमणाऱ्या ताऱ्यांतून, कधी मंद वाहणाऱ्या वाऱ्यातून, कधी अथांग सागरातून तर कधी विस्तीर्ण किनाऱ्यातून त्याचा आपल्याशी संवाद साधणं सुरूच असते. कधी फूल बनून तो आपल्याला बोलावतो तर कधी फुलपाखरू बनून आपल्याला खुणावतो.

पहा तो दरवाजा ठोठावत आहे. ये 'प्रभो' ये. आपल्या हृदयाची गव्हाण आपल्या निर्माणकर्त्यासाठी आज आपण मोकळी करु या एक नवीन नाताळ अनुभवण्यासाठी.

---

## जखमा

किरण मोरे भ्रमणध्वनी... ९५९४००७२५०

जखमा विरुन जातील जखमा भरुन जातील
मनाचे ते ओरखडे भुलता कसे मी भुलावे....

व्रन तो जखमांचा होता धुसर अस्पष्ट
व्रन तो मनाचा होईल अधिक गडद घट्ट

आता ना राही काही दिवस उलटून जाती
आभास हा जरासा आहे तरी उराशी...

जखमाच मिळणार होत्या तरी केली प्रिती तुझ्याशी
मनाच्याच अंगणात न्हाऊन ये जराशी

# भटकंती

• सुनिता बर्नड परेरा, गास

बहती हवासा था वो, उडती पतंग सा था वो, कहा गया उसे ढूंढो||

'थ्री इडियट' या सिनेमातील हे गाणे मनाली ते लेह लडाखपर्यंतचे मनमोहक दर्शन घडवते. ह्या सिनेमातील लडाखच्या विहंगम आणि सुंदर सौंदर्याने मनास भुरळ घातली व त्याक्षणी ठरवले की लडाखचे दर्शन घ्यायचेच ! घड्याळ्याच्या काट्यावर डोलणारी आणि यंत्रवत झालेली मानवी आयुष्ये पर्यटनामुळे फार सुखावतात. मानवी मनाच्या बिलोरी काचेचं हिऱ्यात रुपांतर करण्याचे महान कार्य भटकंती करत असते. म्हणूनच म्हणतात ना- 'केल्याने देशाटन, मनुजा.... चातुर्य येत असे'.

लडाख..... एक सुंदर, अद्भूत, आल्हाददायक अशी जादूमय नगरी! काश्मीर भारताचा स्वर्ग असेल तर लडाख त्या स्वर्गातील अप्सरेचा दरबार! अशी व्याख्या केली तरी वावगे ठरणार नाही. भारताच्या उत्तरेला चीनसारख्या महासत्ताक देशाला आणि पाकिस्तानसारख्या दहशतवादी राष्ट्राला आपल्या शेपटीत गुंडाळून लडाख अतिशय दिमाखदारपणे हिमालयाच्या कुशीत पहुडला आहे. सुमारे १ लाख ६६ हजार वर्ग किलोमीटर क्षेत्रफळ असलेला हा प्रदेश जगभरातील पर्यटकाला भुरळ घालतो. समुद्र सपाटीपासून ८३७० फूट उंच असलेला भारताचा हा केंद्रशासित प्रदेश आपल्या शीतल कवनाने सर्वांना आपलेसे करतो. लडाखची राजधानी 'लेह'! लडाखरुपी स्वर्गाला गाठण्याचे तीन मार्ग आहेत. थेट विमानाने लेह किंवा उरी ते लडाख हायवे, किंवा मनाली ते लेह हायवे!

आम्ही मुंबई ते लेह हा थेट विमानमार्ग घेतला होता. विमानतळ जसजसे जवळ येते तसतसे लडाखरुपी स्वर्गातील अप्सरेच्या नजाकतीचे दर्शन होते. गगनचुंबी पहाड, निळे स्वच्छ आकाश, पर्वतानी पांघरलेली श्वेत शाल, विशाल शुद्ध पाण्याच्या नद्या, मनमोहक नजारे मानवी मनास साद घालतात. लडाख- अवर्णनीय, अतुलनीय असे भारताचे शीतल,

थंड वाळवंट! समुद्र सपाटीपासून अतीउंचावर विराजमान झालेल्या या महारथीच्या प्रदेशात मात्र झाडांची खूप कमतरता, दीड लाख लोकसंख्या असलेला हा प्रदेश निसर्गाचे विविधांगी दर्शन घडवितो. मानवी हृदय ह्याची अनोखी अदा बघून हळूच गुणगुणू लागतो.... 'ये हसी वादिया, ये खुला आसमान, ये कहा आ गये'!

लडाखमधील ८५% लोकसंख्या आदिवासी असून त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आहे. अहिंसा, सत्य, शांत आणि संयमी विचारांचा पगडा त्या लोकांवर आहे, त्यामुळेच धर्म, तत्वज्ञान, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी जगभरात प्रसिद्धी मिळवली आहे. ऑक्टोबर ते मे या काळात येथे तुफान बर्फवृष्टी होते, म्हणून त्यांना जीवनावश्यक वस्तूंचा साठा करून ठेवावा लागतो. लेह लडाख मुलुखाचा थंड.... त्यात पठ्याकडे झाडांची कमी, त्यामुळे प्राणवायूचे प्रमाण कमी! म्हणून लेह मध्ये वावरताना कापूर आणि ऑक्सिजन कांड्या सोबत घ्याव्या लागतात.

लडाखने आपल्या अंगावर जणू सौंदर्याची चादर ओढली आहे. एक से बढकर एक प्रेक्षणीय स्थळं त्याच्या कवेत सामावली आहेत. नुब्रा व्हॅली म्हणजे चारही बाजूने डोंगराच्या कुशीत वसलेले शीत वाळवंट! येथील उंटसफारी फारच प्रसिद्ध! नुब्रा व्हॅली सोबत अवखळपणे वाहणारी नुब्रा नदी हळूच आपल्याला खुणावते. सिंधू आणि झंस्कार नदीचा संगम म्हणजे जणू अर्धोमिलीत नारीच्या मनावर उठणारे प्रणयाचे सुंदर चित्र! मिलनासाठी आसुसलेल्या प्रियकर प्रेयसीला गवसलेल्या सुखद क्षणाचे दर्शन या दोन नदीच्या मिलनातून घडते.

लडाखमधील मॅग्नेटिक हिल स्पर्शाची संवेदना जागृत करते, तर लेह पॅलेस, शॅ पॅलेस लडाखच्या वैभवाची साक्ष देतात. लेह लडाखमधील 'श्री पत्थर साहिब गुरुद्वारा' तर अवर्णनीय आहे. 'दान हे सुंदर हाताचे भूषण आहे.' या उक्तीचा तंतोतंत प्रत्यय येथे येतो. भुकेल्याना मोफत लंगर देऊन शीख बंधू अन्नदानाचे कार्य पार पाडतात. लडाखचा भूगोल सुंदर असला तरी इतिहास देखील महान आहे. १९९९ साली झालेल्या कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांच्या स्मृती प्रित्यर्थ येथे 'हॉल ऑफ फेम' नावाचे वस्तू संग्रहालय उभारले आहे. विविध तोफा, बंदुके, सैनिकाचे कपडे यांचे जतन करून ठेवले आहे. हे बघताना शहीद झालेल्या जवानांच्या चरणांशी मान झुकते आणि आपोआप भावना उमटतात... शुरा मी वंदिले.

लडाखचा मानबिंदू म्हणजे 'पॅंगोग लेक ! ही नदी जगातील सर्वात उंच असलेले खाऱ्या पाण्याचे सरोवर! या नदीचा एक भाग भारतात तर दोन भाग चीनमध्ये आहेत. माणसाने स्वार्थासाठी तिचे दोन भाग केले असले तरी ती मात्र निस्वार्थपणे अगदी खळाळून वाहत आहे. फिरोजी हिरवट खारे पाणी, निळसर आकाश, चहूबाजूंनी वेढलेले हिरवेगार डोंगर, गगनातून चोरटा कटाक्ष टाकणारा रविराज यांचा जणू लपंडाव चालला असल्याचा भास होतो. जवळच असलेले रेंचो स्कूल विद्यार्थांच्या कलागुणांची ओळख करून देते आणि आपल्या जीवघेण्या स्पर्धेत बळी पडलेल्या मुलांची जाणीव करून देते.

लडाखच्या शिरपेचात खोवलेला आणखी एक मानाचा तुरा म्हणजे येथील मॉनेस्ट्री, शांती स्तूप आणि बुध्दाच्या विचारांचा पगडा! लडाख जणू बुद्ध भूमी! सुविचारांची समृद्ध खाण! ह्या खाणीतून तळपते, लखलखणारे हिरे जन्मास येतात. श्रमण संस्कृतीचे लोक येथे वास्तव्य करतात. विनम्रता, प्रामाणिकपणा, सभ्यता, सदाचार त्यांच्या नसानसातून प्रवाहित होत असते. येथील लोक आपल्या संस्कृतीचे संवर्धन करतात. अनोखे दागिने, वस्त्र, परंपरा, नृत्य, भाषाशैली याचे ते जतन करतात. त्यांचा प्रामाणिकपणा आणि सचोटी वृत्तीमुळे मन अगदी भरून येते.

बाजारपेठा तर खरेदीचे स्वर्गीय सुख देतात. शाल, स्वेटर, दागिने, ड्रायफ्रूटस बघून डोळ्याचे पारणे फिटते! स्वच्छता त्यांच्या रक्तारक्तात भिनली आहेत. सर्व कसे सुंदर, नीटनेटके आणि टापटीप! जगातील सर्वात उंच ठिकाण असलेले 'खार्दुंगाला पास' म्हणजे जणू स्वर्गाचे दर्शन! समुद्र सपाटीपासून १८३०० फीट उंच असलेले हे ठिकाण मनभावन आहे. दोन्ही बाजूने श्वेत पहाड, मधूनच रविराजाचा बर्फाशी चाललेला लपंडाव, निमुळता रस्ता, डोंगरावरून दरीकडे आकर्षित झालेले धबधबे, किती किती वर्णन करू..... शब्द तोकडे होतात.... सिमेंट विटाच्या घराचा उबग आलेल्या मनाला गावातील शीतल तंबूचा सहवास हवाहवासा वाटतो. सहा दिवसांचा हा प्रवास कधीच संपू नये असे वाटते. फक्त एक खंत मनात राहते.... सियाचीनला भेट देण्याची. अतिसंवेदनशील प्रदेश जाहीर केल्यामुळे या भागात जाता येत नाही.. मात्र येथे कार्यरत असणाऱ्या जवानांना मात्र दुरूनच सलाम ! लडाखच्या शीत वाळवंटात घालवलेले सहा दिवस म्हणजे आयुष्यभरासाठी कमावलेली सुंदर, अद्भूत अशी गोड शिदोरी! हीच हृदयाच्या कप्प्यात साठवून ठेवत असताना एकच आग्रह करते..... आयुष्यात एकदा तरी लडाखच्या भूमीत जाऊन या.

# जोडूया नवीन नाती

■ ॲड. जॉन रॉड्रिग्ज, रांबाई

बंडोपंत गोखले हे मूळचे कोकणातले. पेशाने शाळा मास्तर. लहान भाऊ श्रीहरी व दोन बहिणी. श्रीहरी हे कोकणात गावीच आपली शेती व आंबा, फणस व काजू यांच्या बागा बघायचे. बंडोपंत मुंबईला म्युनिसिपालिटीच्या शाळेत शिकवत. गिरगावात एका चाळीत त्यांचे कुटुंब राहत होते. त्यांना तीन अपत्ये, मोठ्या दोन मुली व एक मुलगा. दोन्ही मुलींचे लग्न होऊन त्या आपल्या सासरी सुखाने संसार करत होत्या.

मुलगा अंकुश बी.कॉम.ची परीक्षा पास झाला त्यावेळची गोष्ट. गिरगावला बंडोपंत राहत होते त्याच चाळीत तळमजल्यावर कांतीलाल शाह म्हणून एक गुजराती व्यक्ती आपल्या कुटुंबासह राहत होते. बंडोपंत व कांतीलाल यांची खास दोस्ती होती. कांतीलालचा मुलगा, जिग्नेश व अंकुश हे दोघेही वर्गमित्र. बी.कॉम.ची परीक्षा पास झाल्यानंतर जिग्नेशने एमबीएला प्रवेश घेतला. कांतीलाल तेव्हा एका हिऱ्याच्या व्यापाऱ्याकडे हिरे पॉलिश करण्याचे काम करत होते. त्यांची इच्छा होती, मुलगा मोठा झाला की त्याला एखादा छोटा धंदा काढून द्यायचा. शेवटी गुजराती बच्चा, छोटा-मोठा का असेना, स्वतःचा एक धंदा करायचा हे या समाजाचे वैशिष्ट्य म्हणूनच त्याने जिग्नेशला एमबीएला घातलं होतं. बरेच वर्षे कांतीलाल हिरे व्यापाऱ्याकडे काम करत असल्यामुळे त्यांना त्या धंद्यातले खाचखळगे माहित होते आणि त्या धंद्यातल्या अनेक व्यक्तीशी संबंध आले होते. मुलाला याच धंद्यात टाकायचं ही त्यांची मनीषा होती.

एके दिवशी बंडोपंत व कांतीलाल हॉटेलमध्ये चहा पीत बसले होते. जिग्नेश व अंकुश दोघेही एकत्र बीकॉम पास झाले होते. कांतीलालने मुलाला एक छोटासा धंदा काढून द्यायची आपली मनोकामना बंडोपंतना सांगितली. चहा पिऊन झाल्यानंतर कांतीभाईने बंडोपंतना विचारले,

"बंडो, अंकुश आता काय करते ?"

"त्याला मी आता कम्प्युटर कोर्सला पाठवलं आहे. कोर्स पूर्ण झाला म्हणजे कुठेतरी नोकरी मिळेल" बंडोपंत आपल्या मराठमोळ्या भाषेत उद्गारले,

“तुझी हौस पुरली नाही का नोकरी करून ?” कांतीभाई हसत हसत बोलले.

“मग ?”  बंडोपंतनी प्रतिप्रश्न केला.

“बंडो ! आता तुम्ही मराठी माणूस नोकरदारी सोडून व्यापारात यायला पाहिजे.”

“मला नाही समजलं.”

अरे, मी जिग्नेशला एमबीएला घातलंय, तू पण अंकुशला पाठव. एमबीए झाल्यानंतर कायतरी छोटा-मोठा बिजनेस करता येईल.”

“बिझनेससाठी पैसा कुठून येणार ? आपली अर्धी भाकरी आहे ती बरी आहे. सध्या माझ्या पेन्शनमधून चांगलं चाललेय. पुढे अंकुशला नोकरी लागली की, लग्नाचा बार उडवून टाकू.” बंडोपंतनी एका दमात पुढील आखणीचा तक्ता सादर केला.

तेवढ्यात त्या हॉटेल समोरून एक भैया डोक्यावर आंब्याची पेटी घेऊन ‘देवगड हापूस लो’ अशी बोंब मारत गेला. कांतीभाईने काऊंटरवर पैसे देऊन ते दोघेही हॉटेल बाहेर पडले, बाहेर कांतीबाई एकदम थांबले त्याबरोबर बंडोपंतही थांबले.

“काय झालं कांतीभाय ?” बंडोपंतनी विचारले.

“तू मागे मला बोलला होते की तुझ्या भाऊ गावाला असतो आणि तो तुमची आंबा, फणसाची धंदा करते.”

“मग ?”

“तुमची आंब्याची किती झाडे आहेत ?”

“असतील साठ-सत्तर, का ?”

“माझ्या डोक्यात एक विचार येते की, तू आता रिटायर झालाय, गावाला कवाबी जाऊन येऊ शकते. मुलगाला तू एमबीएला पाठव. त्याला बिजनेस बाबतीत कळेल. नंतर तू तुझ्या मुलगाला आंब्याच्या व्यवसाय करायला सांग. आंब्याच्या सीजनला लय बिझनेस होतो. नाय बिजनेस झाला तर डिग्री हायेच. त्याला कुठेबी नोकरी मिळेल. बघ अंकुशला विचारून.”

“आयडीया तर चांगली आहे. घरी बोलतो बघून” असं बोलून बंडोपंत निघून गेले.

बंडोपंतनी हा विषय घरात काढला. कांतीभाईनी सुचविलेली आयडियाही अंकुशला पटली. त्याने एमबीएला ॲडमिशन घेण्याचे ठरविले. बंडोपंतांचे मोठे जावई, राहुल देशपांडेचा टुथब्रश मॅन्युफॅक्चरिंगचा व्यवसाय होता. बंडोपंतनी तिच्याकडे अंकुशबाबतीत विषय काढला, शिवाय कांतीभाईनी सुचवलेली आयडिया सांगितली. राहुलला ती कल्पना पसंत पडली. अंकुशने कॉलेजला ॲडमिशन घेतलं.

मधल्या काळात बंडोपंतनी आपल्या भावाशी चर्चा केली, त्यानेही याला सहमती दर्शविली. झाडं तर आपलीच आहेत. सीझनला आपल्याला चार पैसे जास्त मिळत असतील तर अगदी उत्तम.

दिवसांमागून दिवस जात होते. अंकुश आपल्या राहूल भाऊजीबरोबर पुढील वाटचालीची चर्चा करत होता. स्वतःचा व्यवसाय म्हटला की एक स्वतंत्र ऑफिसची जागा पाहिजे. बंडोपंतनी आपल्या रिटायरमेंटच्या आलेल्या पैशामधून विलेपार्लेला एक छोटीशी जागा घेतली. अंकुश शिक्षणाबरोबर कोकणात आपल्या काकाबरोबर संपर्कात होता, आंब्याच्या व्यापारासंबंधी काकांच्या सहकार्याने मोर्चेबांधणी करीत होता.

एकदा का माणसांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवला की सगळ्या गोष्टी जुळून येतात. एमबीएची परीक्षा अंकुश चांगल्या मार्कांनी पास झाला. आंब्याचा व्यवसाय सुरू करण्याअगोदर त्याचे आई-वडील, बहिणी व त्यांचे मिस्टर ह्यांनी एक मीटिंग घेतली. त्या मीटिंगमध्ये असे ठरले की प्रथम वर्षी आपल्या बागेतील आंब्याच्या झाडापासून येणाऱ्या फळांचाच व्यवसाय करायचा, नंतर मार्केटमध्ये आपली ओळख निर्माण करायची, मग पुढचे पुढे.

ठरल्याप्रमाणे गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर ऑफिसचं उद्घाटन विभागीय नगरसेवकाच्या हस्ते झालं. आपलाच मराठी माणूस नवीन धंद्यामध्ये पाऊल टाकतोय म्हणून नगरसेवक साहेबांनी संपूर्ण सहकार्य करण्याचे वचन दिलं. ‘गोखले मँगो मर्चंट’ या नावाने धंद्याची सुरुवात झाली. उद्घाटनाच्या वेळी कांतीबाई जातीने हजर होता. बंडोपंत सगळ्या पाहुणे मंडळींना ‘आम्हाला या माणसाने या धंद्यात आणलं’ असं म्हणून कांतीभाईची ओळख करून देत होते. कांतीभाई ‘बंडो आपला पुराना दोस्त हाय’ असं उत्तर देत नमस्कार करत होता.

सुदैवाने ज्यावर्षी धंद्याची सुरुवात केली, त्याच वर्षी गोखले कुटुंबाच्या बागेतील आंब्यांना लवकर मोहर आला होता. त्यामुळे त्यांचे आंबे एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच मार्केटमध्ये आले होते. सर्वसामान्य माणूस हा बाजारात जेव्हा भरपूर प्रमाणात आंबा येतो, तेव्हाच तो वाजवी भावात खरेदी करतो, परंतु गुजराती, बनिया व इतर श्रीमंत समाजातील मंडळी ही सुरुवातीलाच नमुनेदार आंब्याचा आस्वाद घेतात. त्यामुळे बंडोपंतना आपल्या कांतीभाई मित्राची मदत झाली. अंकुशने आपल्या बागेतील माल संपवला. मागणी वाढल्यामुळे काकांच्या मदतीने गावातील इतर बागायतदाराकडून माल मागवला. पहिल्याच फटक्यात आपला जम बसविला.

एकदा का धंद्यातील खाच-खळगे समजले आणि थोडी हुशारी दाखवली व नशिबाने साथ दिली की धंद्यात जम बसवायला वेळ लागत नाही. अंकुश हरहुन्नरी मुलगा होता व उच्चशिक्षितही होता. आंब्याचा सिझन संपल्यानंतर इतर वेळी काय करायचं या विचारात असताना त्याला एक कल्पना सुचली, कोकणातील इतर उत्पादनांची विक्री का करू नये ? त्याने त्याप्रमाणे पुढील हालचाली सुरू केल्या. व्यवसायाचं ठिकाण विलेपार्ले, राहायला गिरगाव. बंडोपंत अंकुशला त्याच्या व्यवसायात अधूनमधून मदत करीत होते. पार्टीबरोबरच्या मिटिंग्ज, मालाची ने-आण, दुसऱ्या दिवसाची आखणी वगैरे कामं सांभाळताना त्याला रात्री घरी पोहोचायला उशीर व्हायचा. त्यामुळे आई काळजी करायची.

वरील सर्व परिस्थितीचा आढावा घेतल्यावर व्यवसाय व राहण्याचे ठिकाण जवळ-जवळ असावे व यासाठी गिरगावची जागा विकायची आणि विलेपार्लेतच एखादा फ्लॅट घ्यायचा यावर सगळ्यांचे एकमत झाले. कांतीभाईने पंधरा दिवसात व्यवहार घडवून आणला, त्याने आपल्या एका मालदार नातेवाईकाला बंडोपंताची जागा विकली आणि आलेल्या पैशात थोडी पदरमोड करून स्टेशनपासून पंधरा मिनिटाच्या अंतरावर री-सेलचा फ्लॅट घेतला आणि गोखले कुटुंब विलेपार्लेला राहायला आले. एके दिवशी शुभांगी देशपांडे विलेपार्लेला आपल्या आईवडिलांना भेटायला आली. चहापाणी झाल्यानंतर तिने आई-बाबांकडे अंकुशच्या लग्नाचा विषय काढला. अंकुशने आपल्या व्यवसायात चांगला जम बसवला होता तसेच आईवडिलांची वार्धक्याकडे वाटचाल चालू झाली होती. आईलासुद्धा गुडघ्याचा त्रास होत होता. घरात सून आली म्हणजे कामाची विभागणी होऊन आईला मदत होईल. दुसरं कारण म्हणजे शुभांगीची ट्रेनमधली मैत्रीण होती, स्मिता कुलकर्णी. तशी ती आई-वडिलांची एकटी, ती लोकं बोरिवलीला राहत होते. जातीने ब्राह्मण. तसा जातीचा प्रश्न नव्हता, शिवाय दादर येथे ज्वेलर्स शॉपमध्ये सेल्सगर्ल होती. दिसायलाही छान होती. शुभांगीने आईकडे त्या मुलीसंबंधी विषय काढला.

अंकुशला विचारते असे आईने आपल्या लेकीला सांगितलं. अंकुश कामाच्या गडबडीत असल्यामुळे मिसेस गोखलेनी अंकुशकडे शुभांगीने आणलेल्या प्रपोजलविषयी विषय काढला नाही.

रक्षाबंधनाच्या दिवशी योग जुळून आला, त्या दिवशी शुभांगी व बंडोपंत यांची दुसरी मुलगी देवयानी सुद्धा आपल्या आई-वडिलांकडे आली होती. भाऊ-बहीण असा पवित्र नात्याचा दिवस असल्यामुळे अंकुशपण घरी होता.  शुभांगीने सगळे घरी असल्यामुळे लग्नाचा विषय काढला. सगळ्या गोष्टींचा सांगोपांग विचार झाल्यानंतर मुलगी बघायचं ठरलं. शुभांगी आणि स्मिता यांच्यात वरील विषयावर बोलणे झाले होते. स्मिताने सुद्धा त्याविषयी आपल्या पप्पा-मम्मीला कल्पना दिली होती. त्यांनाही गोखले कुटुंबाविषयी ऐकून बरे वाटले. सगळ्या गोष्टी ध्यानात घेता स्मितासाठी योग्य असे ठिकाण आहे अशी त्यांची खात्री झाली होती.

स्मिताचे वडील सुभाष कुलकर्णी हे बँकेमध्ये अकाउंटंट म्हणून कार्यरत होते. दोन ऑक्टोबर, गांधी जयंतीच्या दिवशी विलेपार्लेला दीनानाथ नाट्यगृहांमध्ये त्यांच्या स्टाफने एक नाटक आयोजित केलं होतं. वेळ संध्याकाळी सहाची होती.

त्यांचं असं ठरलं की स्मिता व तिच्या आई-वडिलांनी विलेपार्ले पूर्व स्टेशनच्या जवळ असलेल्या श्रीकृष्ण हॉटेलजवळ थांबायचं आणि तिथून शुभांगी त्यांना आपल्या आईच्या घरी घेऊन जाणार होती. गोखले कुटुंबीयांनी त्यांचं चांगलं आदरातिथ्य केलं. अंकुशने स्मिताला काही प्रश्न विचारले, तीने सुद्धा मनमोकळेपणाने उत्तरे दिली. थोड्यावेळाने शुभांगीने स्मिताला बाजूला घेऊन दोन-चार दिवसांनी तसं कळव असं सांगितलं आणि तिचे आई-वडील नाटकाला निघून गेले. अंकुशला मुलगी पसंत पडली होती. त्यानंतर स्मिता व शुभांगी ट्रेनमध्ये दोन-तीन वेळा भेटले परंतु शुभांगीने विषय काढला नाही. त्यात एके दिवशी स्मिताने शुभांगीला विचारले, “ताई, आईकडे कसे आहेत?” “मस्त” शुभांगीने हसत उत्तर दिले, “आत्तापासूनच आमच्या आई-वडिलांची काळजी वाटू लागली तर” शुभांगी मुद्दाम खोचकपणे म्हणाली. त्यावर दोघीही खळखळून हसल्या. दोन्हीकडून शुभांगी मध्यस्थ असल्यामुळे एंगेजमेंटची तारीख ठरली. सर्वांना दादर हे ठिकाण सोयीचे असल्यामुळे कितेभंडारी हॉलमध्ये अडीचशे नातेवाईकांच्या साक्षीने एंगेजमेंट सेरेमनी धुमधडाक्यात पार पडला. तिथेच पुढच्या वर्षीच्या ऑक्टोबर महिन्यात एखादा मुहूर्त बघून लग्नाचा बार उडवून द्यायचा असं ठरलं.

दिवसामागून दिवस जात होते, दोघा नातेवाइकाकडून एकमेकांच्या घरी ये-जा सुरू होती. अंकुश व स्मिता एकमेकांना भेटत होते, कधी कधी मोबाईलवरून संपर्क साधत होते.

तो एप्रिलचा महिना होता. अंकुश आपल्या ऑफिसमध्ये असिस्टंट बरोबर पुढच्या आठवड्यात येणाऱ्या नवीन आंब्याच्या फळाविषयी व कुठे कुठे माल कसा पोचवायचा याविषयी चर्चा करीत होता. अंकुशच्या गैरहजेरीत त्याचा असिस्टंट दिवाकर जोशी ऑफिसचे सगळे काम व इतर व्यवहार बघत होता. दुपारचे तीन वाजले होते, पुण्यावरून एका एजंटचा फोन आला, एक फॉरेनची पार्टी होती, त्यांना एक मोठं डील करायचं होतं. रात्री आठ वाजता एका हॉटेलमध्ये मीटिंग ठेवलेली होती. अंकुशला रात्री आठपर्यंत पुण्यात पोहोचायचं होतं. आंब्याचा सीझन होता, आलेली संधी सोडायची नव्हती. त्याने घरी फोन करून कल्पना दिली.

अंकुशने आपल्या ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली. त्यांना ट्रॅफिक लागले पण सात वाजेपर्यंत ते पिंपरी-चिंचवडपर्यंत पोहोचले. मधल्या वेळेत एजंट अंकुशच्या संपर्कात होता. शेवटी वेळेवर ते हॉटेल इंटरनॅशनलला पोहोचले. एजंट आणि त्याच्या मागोमाग अंकुश पहिल्या माळ्यावर पार्टी बसली होती तिथे पोहोचले. अंकुशने आपली ओळख देत त्याच्याबरोबर हस्तांदोलन केलं.

तेवढ्यात तिथे वेटर हजर झाला, अंकुशने एव्हरेस्ट साहेबांना त्यांच्या इच्छेप्रमाणे बियर व स्वत:साठी पायनापल ज्यूसची ऑर्डर दिली. एव्हरेस्ट व अंकुश यांच्यात आंब्याच्या देवाण-घेवाण बाबतीत बरीच चर्चा झाली. एव्हरेस्टला दोन लॉटमध्ये आंबे हवे होते. कींमतीच्या बाबतीत त्याची काहीही अडचण नव्हती परंतु आंब्याची प्रीमियम क्वालिटी हवी होती. दोघांमधलं डील उत्तम रीतीने पार पडलं, एवरेस्टने ॲडव्हान्स म्हणून चेक दिला, जेवण झालं आणि तिघेही हॉटेल बाहेर पडले. अंकुशने आपल्या ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली आणि मुंबईचा परतीचा प्रवास सुरु झाला. मधल्या वेळेत बंडोपंतनी अंकुशला फोन लावला आणि कुठपर्यंत आला आहात असे विचारले, आम्ही आता पनवेलपर्यंत आलो आहोत, तासाभरात येतोय असा अंकुशने रिप्लाय दिला.

अंकुशचा ड्रायव्हर कार एकदम व्यवस्थित चालवत होता. मेट्रोचे काम सुरू असल्यामुळे ब्रिजवरून वाहने हळूहळू जात होती, ओव्हरब्रीज खालून विरुद्ध दिशेने यूटर्न घेऊन वाहने मुंबईच्या दिशेने येत होती, यूटर्नचा सिग्नल पडला परंतु एका ट्रकच्या बेजबाबदार ड्रायव्हरने आपला ट्रक एकाएकी मध्येच घुसवला. अंकुशच्या ड्रायव्हरने सतर्कतेने ट्रकपासून वाचवण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, परंतु दुर्दैवाने ट्रकचा शेवटचा भाग

त्याच्या मागच्या उजवीकडे बसलेल्या खिडकीवर आदळला. अंकुशच्या उजव्या बाजूच्या डोक्याला व उजव्या हाताला जबरदस्त मार लागला. सिग्नलवर उभ्या असलेल्या पोलीस हवालदाराने ट्रकवाल्याला आपला ट्रक बाजूला घ्यायला सांगितले आणि हवालदार अंकुशच्या कारकडे आले. वरच्या बाजूने दरवाजा दबलेला होता. अंकुशच्या डोक्याला मार लागल्यामुळे तेथून रक्त येत होतं, तो बेशुद्ध अवस्थेत होता. हवालदाराने लगेच काही लोकांच्या मदतीने दुसऱ्या एका टॅक्सीमध्ये घालून दहा मिनिटाच्या अंतरावर असलेल्या सुरक्षा हॉस्पिटलमध्ये त्याला घेऊन गेले. हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर अंकुशला इमर्जन्सी वॉर्डमध्ये नेलं व उपचार सुरू झाले. मधल्या काळात ड्रायव्हरने अंकुशच्या घरी कळवलं.

बंडोपंतनी शुभांगीला फोन करून सांगितले, शुभांगीने सगळी घटना राहुलला सांगितली आणि लगेच निघायला हवं असं सांगितलं. राहुलने सासऱ्यांना म्हणजे बंडोपंतना तयार राहण्यास सांगितले आणि ते आपली कार घेऊन निघाले.

इथे बंडोपंत व मिसेस गोखले रडत होते पण वेळोवेळी आपल्या ड्रायव्हरच्या संपर्कात होते. अंकुशचे परंतु सकाळी ऑपरेशन करणं जरुरीचे होते. आपल्या सासऱ्याला कलेक्ट करून राहुल पनवेलच्या दिशेने निघाले. कारमध्ये शुभांगी, बंडोपंत व राहुल हे सगळे चिंताग्रस्त होते. अंकुशची काय स्थिती आहे हे त्याला प्रत्यक्ष बघितल्याशिवाय कळणार नव्हतं. परंतु 'वैरी न चिंती ते मन चिंती' अशी त्यांची परिस्थिती होती. सकाळच्या पाचपर्यंत ते हॉस्पिटलमध्ये पोचले. अंकुशचा ड्रायव्हर त्यांची वाट पाहत उभा होता, त्याने लगेच त्यांना पहिल्या माळ्यावर नेले. राहुल देशपांडे मुख्य डॉक्टरांना जाऊन भेटले व अंकुशची परिस्थिती विचारली. डॉक्टरांनी सांगितले की पेशंटची स्थिती स्टेबल आहे, डोक्याला मार लागल्यामुळे जखम किती मोठी आहे हे आता सांगता येणार नाही, सकाळी नऊ वाजता ऑपरेशन आहे, नंतरच आपल्याला अंदाज बांधता येईल. मिसेस गोखलेंनी स्मिताला फोन करून कळवलं होतं. स्मिता आणि तिच्या वडिलांनी हॉस्पिटलला जायचे ठरविले. स्मिता अगदी चिंतेत होती, अंकुशला कधी बघतो असं तिला झालं होतं.

नऊ वाजता अंकुशला ऑपरेशन थिएटरमध्ये नेलं. साडेनऊच्या दरम्यान स्मिता व तिचे पप्पा हॉस्पिटलला पोचले. अंकुशचे वडील व इतर नातेवाईक विजिटिंग रूममध्ये बसले होते. पण प्रत्येकाच्या चेहऱ्यावर चिंता दिसत होती. ऑपरेशन हा शब्दच मनात धडकी भरणारा असतो मग ते मायनर असो वा मेजर. मनात नाना प्रकारचे विचार येतातच, जास्त करून वाईट नकारात्मक विचारांची भाऊगर्दी ही होतच राहते. विजिटिंगरूमच्या तुमच्या समोरून जाणारे येणारे वॉर्डबॉइज किंवा नर्सेस जणूकाही आपल्यालाच बोलवण्यासाठी किंवा काही

बातमी घेऊनच येत आहेत असं वाटतं. मिनिटागणिक घड्याळाकडे लक्ष जातं. प्रत्येक क्षण युगायुगासारखा वाटतो. काय ही मानसिक स्थिती. या वास्तवाला अंकुशची मंडळी अपवाद नव्हती. तीन तास होऊन गेले होते. जसजशी वेळ जात होती तसतशी काळजी शिगेला पोहोचत होती.

एक वाजून वीस मिनिटांनी एक वॉर्डबॉय विजिटिंग रूममध्ये आला, सांगितले की ऑपरेशन झालेय आणि एका तासाने पेशंटला स्पेशल वॉर्डमध्ये आणतील. प्रत्येकाच्या जीवात जीव आला. नंतर देशपांडे डॉक्टरांना जाऊन भेटले, डॉक्टरांनी सांगितलं की ऑपरेशन गुंतागुंतीचे होते कारण मार डोक्याला लागला होता परंतु रिकव्हरीला वेळ जाईल. डोक्याचे ऑपरेशन असल्यामुळे शिवाय कोणत्याही प्रकारचे इन्फेक्शन होऊ नये म्हणून डॉक्टरांनी दोन-तीन दिवस आयसीयूमध्ये पेशंटला ठेवायचे ठरवले केवळ एका नातेवाईकला पेशंटकडे ठेवून सगळ्यांना घरी पाठवलं.

इथे मिसेस गोखले म्हणजे अंकुशची आई काळजीत होती परंतु शुभांगीने फोनवर ऑपरेशन यशस्वी झाल्याचे सांगितल्यामुळे त्यांना धीर आला होता. पहिल्या रात्री देशपांडे अंकुशकडे राहिले. अंकुशच्या उजव्या हाताला मार लागल्यामुळे हात प्लास्टरमध्ये घातला होता. एक महिना उलटून गेला परंतु अंकुशची परिस्थिती जैसे थे अशीच होती. सर्व नातेवाईक आळीपाळीने हॉस्पिटलमध्ये राहत होते. डॉक्टरसुद्धा त्यांना आशा दाखवत होते. मेंदूला मार लागल्यामुळे मेंदू कधी पूर्ववत होईल हे डॉक्टर नक्की सांगू शकत नव्हते. पेशंट कोमात होता, त्याचे इतर अवयव कार्यरत होते.

अशाच एके दिवशी अंकुशच्या नातेवाईकांची व हॉस्पिटलच्या डॉक्टरांची मिटींग झाली, त्या मीटिंगमध्ये डॉक्टरांनी असा सल्ला दिला की अंकुशला हॉस्पिटलमधून डिस्चार्ज द्यावयाचा व जवळच्या फॅमिली डॉक्टरकडून सुश्रुषा हॉस्पिटलच्या डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली औषधोपचार करावयाचा, फिजिओथेरपिस्टकडून मसाज करून घ्यायचा. मिटिंगमध्ये ठरल्याप्रमाणे हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाला आणि अंकुशला घरी आणण्यात आलं. पार्ल्यामध्ये डॉक्टर परूळेकर हे गोखले कुटुंबाचे फॅमिली डॉक्टर होते. डॉक्टरांनी संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिलं. देशपांडे व दुसरे जावई देशमुख व दोघांनी मिळून अंकुशची सर्व व्यवस्था केली. दररोज अंकुशची देखभाल करण्यासाठी एका माणसाची नेमणूकही केली.

या सगळ्या दुर्दैवी परिस्थितीत ऑफिस असिस्टंट जोशी प्रामाणिकपणे गोखले मॅंगो मर्चंटचे सगळे व्यवहार बघत होता. बंडोपंत जेव्हा वेळ मिळेल तेव्हा ऑफिसमध्ये जाऊन जोशी यांच्याशी संपर्क साधत होते. सर्व व्यवहार उत्तम रीतीने चालले होते. स्मिता व तिचे आई-वडील अधूनमधून येत जात होते व कुटुंबियांना धीर देत होते. दिवस जात होते परंतु काहीही सुधारणा होताना दिसत नव्हती. डॉक्टरच्या सल्ल्यानुसार नाकावरती लावलेल्या नळीद्वारे लिक्विड फूड दिले जात होते. अंकुशच्या देखभालीसाठी ठेवलेला माणूस अंकुशचे अंग पुसणे, औषध पाणी देणे वगैरे काम करत होता.

रविवारचा दिवस होता, सगळे घरी होते, स्मिताची मावशी आली होती. जेवण झाल्यानंतर हॉलमध्ये सगळे टीव्ही पहात बसले होते. मावशीने विषय काढला स्मिताला अंकुशच्या हालहवालीविषयी विचारले. आणि जास्त व्हीएल लागणार असेल तर तू असेच दिवस काढायचे का ? काहीतरी दुसरा विचार करायला हवा असा प्रश्न केला. पुढे काय करायचं ह्या सोयरिकी विषयी त्यावर स्मिताने तुम्ही जे काय सांगणार ते मला मान्य असे सांगितले, तिनेसुद्धा ह्या सगळ्या गोष्टीचा विचार केला होता. शेवटी तिला तिचे आयुष्य जगायचे होते. नंतर रात्री स्मिता व तिच्या पप्पा मम्मीची बरीच चर्चा झाली, नातं एकदम तोडायचं नाही परंतु परस्परांमधील संपर्क कमी करायचा मग गोखले कुटुंबाकडून विचारणा होईल नंतर काहीतरी कारण सांगून वेळ मारून न्यायची, काही दिवसांनी काय समजायचं ते समजतील. थोडक्यात सांगायचं म्हणजे झालेली इंगेजमेंट मोडायची.

अंकुशला जवळजवळ दोन महिन्यांनी हाताचे प्लास्टर सोडण्यासाठी आणि इतर चेकअपसाठी पनवेलला सुश्रुषा हॉस्पिटलला न्यायचं ठरवलं होतं. ॲम्बुलन्समधून देशपांडे देशमुख यांनी अंकुशला हॉस्पिटलमध्ये नेलं. डॉक्टरांनी प्लास्टर सोडून एक्सरे काढला जखम भरलेली होती. परंतु रक्तवाहिन्या व्यवस्थित चालावे म्हणून फिजिओथेरपीची मदत घेणे जरुरीचे होते. डॉक्टरांनी इतर चेकअप केलं. डोक्याचा सुद्धा एक्स-रे काढला. रिपोर्ट चांगला होता. अंकुशच्या सगळ्या टेस्टमधून त्याच्या तब्येतीत बरीच सुधारणा झालेली होती असे आढळून आले होते. अंकुशच्या नातेवाईकांना एकच काळजी होती की तो कधी शुद्धीत येईल याची हॉस्पिटलचे सगळे सोपस्कार झाल्यानंतर देशपांडेने डॉक्टरांशी चर्चा केली डॉक्टरांनी तो लवकरात लवकर शुद्धीत येईल असे आश्वासन दिले परंतु फिजिओथेरपिस्ट ट्रीटमेंट घेणे जरुरीचे आहे हे ही सांगितले.

अलीकडे एक नवीन डॉक्टर रंजना दोशीने फिजियोथेरपिस्ट म्हणून प्रॅक्टिस सुरू केली होती. तत्पूर्वी ती लीलावती हॉस्पिटलला होती. त्यामुळे चांगला अनुभव गाठीशी होता. शुभांगी व तिचे मिस्टर यांनी दोशी यांची अपॉइंटमेंट घेऊन त्यांच्याशी संपर्क साधला, त्यांना सगळ्या परिस्थितीची कल्पना दिली. रंजनाने आपल्या दवाखान्यात येण्याअगोदर त्यांच्या घरी सकाळी येण्याचे मान्य केले. अशा परिस्थितीत त्यांच्या मुलाची अशी दयनीय अवस्था व्हायला लागते हे ऐकून डॉ. रंजना दोशीना त्यांच्याविषयी सहानुभूती निर्माण झाली. लिलावती हॉस्पिटलमध्ये एक सिनियर न्यूरोलॉजिस्ट डॉ. पूनावाला होते. डॉ. रंजनाने अंकुशचे सगळे पेपर त्यांना दाखवले, त्यांनी ते पाहून औषधोपचारात थोडा बदल केला.

ठरल्याप्रमाणे डॉ. रंजना गोखलेंच्या घरी अंकुशला फिजिओथेरपी ट्रीटमेंट देण्यासाठी जायू लागल्या. डॉ. पूनावाला यांनी नवीन दिलेले औषधपण द्यायला सुरुवात केली. मालीश करतेवेळी मिसेस भोसलेपण डॉ. रंजनाला थोडीफार मदत करीत असत. एके दिवशी हात वर करताना अंकुशच्या तोंडातून हळू आवाजात ‘आई ग’ असे शब्द बाहेर पडले. ‘बाळा मी इथे आहे’ असे प्रतिक्षिप्त क्रियेप्रमाणे मिसेस गोखलेंच्या तोंडातून बाहेर पडले. डॉ. रंजना सुद्धा मिशन सक्सेसफुल म्हणाल्या. त्या अंकुशच्या आई-वडिलांना म्हणाल्या, “बाबा, आता काळजी करण्याचे कारण नाही, पेशंट हळूहळू होशमध्ये येईल.” मिसेस गोखलेंना वाटलं की इतके दिवस देवाकडे करत असलेली प्रार्थना ऐकली गेली. डॉ. रंजना नियमितपणे येत होत्या आणि त्यांच्या मालीशमुळे अंकुश हळूहळू हात हलवू लागला होता. परंतु त्याला पूर्ण शुद्धी आली नव्हती. एके दिवशी डॉ. रंजना हळुवारपणे मालिश करीत असता अंकुशला त्या स्पर्शाची जाणीव झाली. त्या स्पर्शात माया व करुणा होती. अंकुशने डोळे उघडण्याचे प्रयत्न केले परंतु तो उघडू शकला नाही. डॉक्टर गेल्यानंतरसुद्धा त्याच्या सबकॉन्शस माइंड मध्ये त्या स्पर्शाच्या लहरी जागा घेऊ इच्छित होत्या. तो स्पर्श त्याला तुटकपणे का असेना हवाहवासा वाटत होता. दुसऱ्या दिवशी जेव्हा डॉक्टर आल्या आणि मालिश करणं सुरू केलं तेव्हा अंकुशला तो स्पर्श ओळखीचा वाटला. त्याचा मेंदू त्याला प्रतिसाद देत होता. त्याने आपले डोळे उघडले. डॉक्टरांना आनंद झाला. अंकुशचे आईवडील तिथे हजर होते, त्यांना सुद्धा फार आनंद झाला. तो जरी पूर्ण शुद्धीत नव्हता तरीही एक स्त्री आपल्या शरीराला स्पर्श करीत आहे असे त्याला जाणवले.

दिवसागणिक अंकुशच्या तब्बेतीत प्रगती होत होती. डॉ. रंजना दोशी जणू काही या कुटुंबियाच्या मेंबर झाल्या होत्या. अंकुशला आपला व्यवसाय काय होता किंवा आपला अपघात कसा झाला वगैरे गोष्टी आठवत नव्हत्या. जणूकाही आपल्या जीवनाची आत्ताच सुरुवात झाली आहे असे वाटत होते. परंतु एक मात्र गोष्ट होती की डॉ. रंजनाचा स्पर्श व

संवाद हवाहवासा वाटायचा, त्यामुळे त्याचा चेहरा आनंदी दिसायचा. दुसरे एक कारण होतं डॉ. रंजना ह्या अंकुशच्या मनात सकारात्मक गोष्टी भरवायच्या. तुम्ही लवकरात लवकर बरे होणार, चालायला फिरायला लागणार हा आशावाद मनात एक नवी ऊर्जा निर्माण करत असे. मानवी शरीर म्हणजे जगातले सगळ्यात मोठे आश्चर्य. या आपल्या शरीराचे व त्यातील प्रत्येक अवयव व घटक त्याची सूत्रे मेंदूत असतात. थोर शास्त्रज्ञ थॉमस एडिसन म्हणतो, “The Chief purpose of the body is to carry the brain around” या मेंदूत अनेक प्रकारची रसायने स्रवत असतात आणि प्रत्येक स्रवणाऱ्या रसायनाचे काम सुद्धा निराळे असते. कारण मेंदू हे सर्व विचारांचं व भावभावनांचे भांडार आहे. महान मानसोपचार तज्ञ डॉ. नॉर्मन व्हिन्सेंट पील म्हणतात की माणूस जसा विचार करतो तसा तो बनतो. नकारात्मक विचाराने माणूस ऊदासिन बनतो तर सकारात्मक विचाराने माणूस उत्साही बनतो. प्रत्येक माणसात चेतन व अचेतन मने असतात. दोघांची कार्यप्रणाली वेगळी घेऊन आपण सकारात्मक विचार करतो तेव्हा माणसाच्या मेंदूत एक विशिष्ट प्रकारचे रसायन स्रवत असते त्यामुळे रक्तातील पेशी बदल होत असतो आणि त्या अनुषंगाने माणसाच्या शरीरात चांगले बदल घडून येतात ह्याच कारणांमुळे अंकुशची रिकवरी झपाट्याने होत होती.

मिस्टर गोखले जरी विलेपार्लेला राहायला आले होते परंतु त्यांचा जुना मित्र कांतीभाई यांच्याशी आपली मैत्री टिकून ठेवली होती. या अपघाताप्रसंगी सुद्धा कांतीभाईनी मिस्टर गोखलेंना भावनिक आधार दिला होता. डॉ. रंजना सकाळी येण्याअगोदर मिसेस भोसले सगळी तयारी करून ठेवत होत्या. आता अंकुश हळूहळू फिरू लागला होता. हातसुद्धा बऱ्याच अंशी रिकवर झाला होता. हलक्या हलक्या वस्तू उचलू शकत होता. त्याला हळूहळू मागचं आठवू लागलं होतं. त्याचे आई-वडील दिवसभरात इथल्या तिथल्या गोष्टी काढून त्याचे मन रिझवित होते. परंतु मनाने व शरीराने तो खंबीर झाला नव्हता. विशेष म्हणजे रंगाने गोरापान होता व घारे डोळे असल्यामुळे आणि त्यातल्या त्यात आजारात मिळत असलेल्या आहारामुळे तोंडावर एक निराळेच तेज दिसू येत होते. अधूनमधून आपला असिस्टंट दिवाकर जोशीला आपल्या घरी बोलावून विचारपूस करून योग्य त्या सूचना करीत होता. डॉक्टर रंजनाने बंडोपंत गोखले यांना सांगितलं की आता दररोज मालिश करण्याची गरज नाही एक दिवस सोडून मालिश केला तरी चालेल आणि त्याप्रमाणे त्या येत होत्या.

शुभांगी व तिचे मिस्टर यांच्यात चर्चा झाली की अंकुशला स्मिताबरोबरचे झालेलं एंगेजमेंट तुटलेलं आहे असं सांगावं नाहीतर आज ना उद्या त्याबाबतीत सांगणं भाग आहे. त्यानंतर शुभांगी फोनवर एकांतात आपल्या आईशी बोलली, आईने जरा भिती व्यक्त केली

की त्या गोष्टीचा अंकुश मनावर काही वाईट परिणाम होईल का कारण आताच तर तो आजारातून सावरतोय. परंतु शुभांगीने त्यावर असे सांगितले की उद्या त्यानेच विषय काढला आणि असं झालंय हे तुम्ही मला का नाही सांगितलं न पेक्षा त्याला सांगून टाकावे. त्याप्रमाणे शुभांगी आणि तिचे मिस्टर आईकडे आले, दुपारी गप्पा करत असताना शुभांगीने अंकुशला विचारले, तुला काय आठवतं का तुझं एंगेजमेंट झालं होतं. अंकुशने थोडा आठवण्याचा प्रयत्न केला, बऱ्याच वेळाने त्याला आठवलं, “हा, तिचं नाव स्मिता ना ! अरे मग काय झालं ?” अंकुशने प्रश्न केला. “हे बघ तुझा अपघात झाल्यानंतर त्या लोकांनी आपलं नातं तोडलं, असुदे आपण कुणाला भाव द्यायचा नाही, छान तू एकदा बरा झालास की सगळी काही ठीक होईल” शुभांगी अंकुशला म्हणाली. विषय बदलत शुभांगीने आईला विचारले, “आई, आता डॉक्टर एक दिवस आड अशा येतात ना” “होय बाळा,  किती छान मुलगी आहे हो आणि विशेष म्हणजे तिच्या हाताला काय गुण का कुणास ठाऊक” डॉक्टर रंजनाविषयी आईकडून होत असलेलं कौतुक ऐकून अंकुशला मनातल्या मनात आनंद होत होता. मालिश करतेवेळी डॉक्टरांच्या हाताचा स्पर्श हवाहवासा वाटायचा. त्या स्पर्शाचा एक जादुई परिणाम त्याच्या मनावर व शरीरावर होत होता.

काही दिवसांनी देशपांडे व गोखले कुटुंबियांनी न्यूरोसर्जन डॉ. पूनावाला यांची अपॉइंटमेंट घ्यायचे ठरवले. त्याप्रमाणे डॉ. रंजना दोशीनी त्यांची अपॉइंटमेंट घेतली. दिलेल्या वेळेला व दिवशी कारमध्ये ते लीलावती हॉस्पिटलमध्ये पोहोचले. डॉ. रंजनाचा वार असल्यामुळे त्या अगोदरच हॉस्पिटलमध्ये हजर होत्या. तपासणी करतेवेळी डॉ. पूनावाला यांनी अंकुशला चेक केले आणि इतर रिपोर्ट बघितले. डॉक्टरांनी बहुतेक औषध बंद केली आणि दोन औषधे दोन महिन्यापर्यंत घ्यायला सांगितले आणि एक महिन्यांनी हळूहळू हलकं हलकं काम करायला सांगितले, तोपर्यंत मालीश करायला सांगितले. मिस्टर देशपांडे आणि गोखले यांना फार बरं वाटलं. आपल्या डोक्यावरचं ओझं कमी झाल्यासारखं वाटलं. डॉक्टर रंजना केबिन मधून बाहेर पडल्या. बाहेर अंकुश, त्याचे वडील व देशपांडे त्यांची वाट पाहत उभे होते, त्यांनी डॉक्टरांचे आभार मानले.

डॉक्टर रंजना दोशी नियमितपणे येत होत्या. डॉक्टर व गोखलेंचं पेशंट आणि डॉक्टर असं नातं राहिलं नव्हतं, मैत्रीचं नातं निर्माण झालं होतं. डॉ. रंजनाची आई त्या लहान असताना कावळीने देवाघरी गेली होती. अंकुशच्या आईच्या रूपाने तिला आई मिळाली होती. मिसेस गोखलेसुद्धा डॉ. रंजनाला आपल्या मुलीप्रमाणे मानत होत्या. अंकुश हळूहळू सकाळी अर्धा तासभर बाहेर फिरायला जात होता, त्याला आता नवजीवन मिळालं होतं.

त्याचा धंदासुद्धा त्याचा असिस्टंट जोशी उत्तम तऱ्हेने चालवत होता. अधून-मधून अंकुश आपल्या ऑफिसमध्ये जात होता. अशाच एके दिवशी वेळ काढून कांतीभाई अंकुशला पाहण्यासाठी आले होते खबरबात होत असताना बंडोपंतांनी घरी मालीश करायला डॉ. रंजना दोशी येते आणि पार्ल्यात तिचा दवाखाना आहे असे सांगितले. ती नेमकी कांतीभाईच्या मेव्हणीची मुलगी निघाली. त्यानंतर त्यांनी सगळी हकीकत सांगितली.

का कुणास ठाऊक. डॉ. पूनावाला यांनी अंकुशविषयी दाखवलेली अनुकंपा आणि स्तुती, शिवाय एवढ्या दिवसाचा लाभलेला गोखले कुटुंबियांचा सहवास यामुळे डॉ. रंजना दोशींना अंकुशविषयी एक वेगळीच भावना निर्माण झाली. एक सुसंस्कृत कुटुंब, स्वतःचा असलेला बिझनेस शिवाय आपली जिथे प्रॅक्टिस चालते त्याच विलेपार्ले या ठिकाणी अंकुशचा फ्लॅट आणि महत्वाचं म्हणजे ह्या फिजिओथेरपिस्ट काळात गोखले कुटुंबातील माणसांचा कळलेला स्वभाव वगैरे गोष्टी लक्षात घेता आपल्या नवजीवनाची सुरवात अंकुशशी का होऊ नये असा विचार डॉ. रंजनाच्या मनात सतत यायचा आणि हो, आपल्या कांतीकाकाचे असलेले गोखले कुटुंबीयांशी जुने संबंध. प्रश्न एकच होता, दोघेही निराळ्या समाजाचे. डॉ. रंजना दोशी गुजराती समाजातल्या, अंकुश महाराष्ट्रीयन ब्राह्मण धर्म एक हिंदू परंतु भाषा रितीरिवाज संस्कृती भिन्न.

अंकुशची सुद्धा तीच परिस्थिती, डॉ. रंजना घेत असलेले त्याच्यासाठीचे प्रयत्न, तिच्या हाताला (स्पर्शाला) आलेले यश, तिच्या येण्याने त्याच्या मनात उठणारे तरंग आणि शरीरावर होणारे सकारात्मक परिणाम, हवाहवासा वाटणारा सहवास हे सगळे घटक त्याच्या हृदयात निराळे स्पंदने तयार करीत होते. तसं म्हटलं तर त्या दोघांमध्ये सहवास व संवाद होत होता तसाच थेरपीच्या स्पर्शपण होत होता. हे सगळे उपचार ह्या घटकात मोडते. परंतु ती जवळीक भावना या सदरात मोडत नव्हती. केवळ निरपेक्ष कर्तव्य, व्यवसाय जसे लोखंडाच्या कोणत्याही वस्तूला परिस स्पर्श होतो तेव्हा त्या लोखंडाच्या वस्तूचं सोन्यात रूपांतर होतं. डॉ. रंजना व पेशंट अंकुश यांच्यात आंतरिक प्रेमाचे रुपांतर वास्तवात व्हायचे होते.

डॉ. पूनावाला यांच्या सल्ल्यानुसार आणखी दहा ते पंधरा दिवस मालिश पुरेशी होती, डॉ. रंजना ठरलेल्या दिवशी येत होत्या, जसजसे दिवस जात होते तसतशी दोघांच्याही मनात कंठ दाटून येत होते. परंतु दोघांनीही आपल्या मनावर संयम पाळला होता. शेवटच्या दिवशी डॉ. रंजना मालिश करीत होत्या परंतु त्यांची मनस्थिती ठीक नव्हती. ही त्यांची शेवटची विजीट होती.

तीच अवस्था अंकुशची, त्यालाही नेहमी भेटणाऱ्या डॉ. रंजना केव्हातरी भेटणार होत्या. डॉक्टरांनी घड्याळाकडे बघितलं आणि निघायच्या तयारीत होत्या आणि मिसेस गोखलेकडे वळून म्हणाल्या, "आता अंकुशला मुलगी बघा आणि लग्न करून टाका."

"होय बरोबर आहे, पण तुझ्या सारखी मुलगी मिळायला पाहिजे ना"

"मी एवढी चांगली आहे, आई ?"

"मग ! एवढी शिकली सवरली आहेस, पण किती साधी वाटते"

त्यावेळेस डॉक्टर रंजनाचे डोळे पाणावले. तिने लगेच हात रुमालाने डोळे पुसले. तिला वाटलं आज माझी आई असती तर तिने सुद्धा माझे असेच कौतुक केले असते.

"का ग ? तुला कोणाची आठवण झाली" मिसेस गोखले यांनी विचारले.

"आईची, तुम्ही माझ्या आई प्रमाणे आहात"

गोखलेंनी तिला जवळ घेत म्हटलं, "हो.. ना..  येत जा तू, कधी वेळ मिळेल तेव्हा" मग डॉ. रंजना अंकुशकडे हात करत म्हणाल्या, "बाय, मि. गोखले" "बाय, थँक यु" अंकुशने स्माईल देत उत्तर दिलं. डॉक्टरांनी हात जोडून गोखले कुटुंबियांना बाय केलं व निघून गेल्या. अंकुशची तब्येत आता ठणठणीत झाली होती. दररोज योगा वगैरे करून ऑफिसला जायला सुरुवात केली होती. गाडी पूर्ण रुळावर आली होती. परंतु त्याच्या डोक्यातून त्या गोड आठवणी जात नव्हत्या. अंकुश व कांतीभाईचा मुलगा जिग्नेश, हे एकमेकांच्या संपर्कात नेहमी होते. त्यांचे एकमेकांचे मोबाईलवर नेहमी बोलणे व्हायचे. म्हणून अंकुशने डॉक्टर रंजना यांच्याविषयी लग्नाची इच्छा प्रकट केली. जिग्नेशला कल्पना फारच आवडली. प्रश्न होता इंटरकास्ट लग्नाचा.

अशाच एके दिवशी कांतीभाईच्या नात्यात मुलाच्या नामकरण समारंभात सगळे पाहुणे मंडळ एकत्र आली होती. डॉ. रंजना त्या कार्यक्रमात हजर होत्या. संधी साधून जिग्नेशने डॉ. रंजनाला अंकुशबद्दल सांगितलं. डॉ. रंजनाला अंत:करणातून आनंद झाला. तिने तिचा होकार कळवला परंतु मामाची व वडिलांचे मत जाणून घेऊन त्याप्रमाणे सांगते असे ती त्याला म्हणाली. तिला थोडा अवधी हवा होता कारण ती मुंबईला मामाकडे राहत होती, तिचे वडील गुजरातला राहत होते.  जिग्नेशने ही गोष्ट आपल्या वडिलांच्या कानावर घातली. कांतीभाईंनी आपल्या साडूला मुंबईला यायला सांगितले, रतनलाल गिरगावला त्यांच्या घरी उतरले. त्यांनी अंकुशकडून डॉ. रंजनाला आलेल्या प्रपोजलविषयी सांगितलं. रतनलाल सुरुवातीला जरा नाखूष होते, लोक काय म्हणतील याची त्यांना चिंता वाटत होती. सगळ्या गोष्टी एकत्र जोडून

आल्या होत्या आणि अशी इंटरकास्ट लग्ने मुंबईत नेहमी होत असतात याकडे त्यांनी लक्ष वेधले. शेवटी त्याला होकार द्यायचा असे ठरले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी अंकुशला ही आनंदाची बातमी कळवली व त्याचे अभिनंदन केले. दुपारच्या जेवणाच्या वेळी अंकुशने आपल्या आईकडे याविषयी विषय काढला. मिसेस गोखले यांना फार आनंद झाला. त्याने आईला या सोयरिकीविषयी तो नसताना बाबाच्या कानावर घालायला संगितले. त्या दोघांनाही कल्पना होती की बाबा हे जुन्या वळणाचे होते, त्यात उच्च जातीचे ब्राह्मण. आपण समाजात कितीही पुरोगामी आहोत अशी टिमकी मिरवत असलो तरीही जेव्हा स्वतःवर पाळी आली की अनेक बहाण्यांचा आधार घेत असतो. जात-पात, वर्णद्वेष ही सर्व जगाला लागलेली कीड आहे. मग ती युरोपियन देश असो, जिथे गोरा आणि कृष्णवर्णीय असो किंवा भारत देश असो जिथे ब्राह्मण व अनुसूचित जातीतील लोक असो.

एके दिवशी संध्याकाळची वेळ होती. बंडोपंत व मिसेस टीव्ही बघत बसले होते. मिसेस गोखले यांनी विषय काढला. त्यांना जरा नवलच वाटले. थोडा मनात राग पण आला. ते म्हणाले, “अगं आपण ब्राह्मण आणि मुलगी गुजराती, दोन भिन्न जाती, चालीरिती निराळ्या, कसं जमेल?” “न जमायला काय झालं, दोघेही उच्चशिक्षित आहेत, शिवाय दोघेही एकमेकास चांगले ओळखतात शिवाय एकमेकांच्या स्वभावाविषयी परिचित आहेत आणि हो आपण सुद्धा दोन-तीन महिने तिचे बोलणे चालणे आणि वर्तणूक सुद्धा बघितली आहे. आपल्या नजरेखालील मुलगी आहे” मिसेस गोखले जे सांगत होत्या त्यातली एकही गोष्ट चूक नव्हती. तरीही न राहून ते म्हणाले की ‘आपल्याही जातीत शिकलेल्या मुली आहेत, बघूया’ “तुमचं सध्या आपल्या जातीतल्या मुलीबद्दल समाधान झालं नाही का? स्मिताचं उदाहरण घ्या, जिथे वैवाहिक जीवनाला सुरुवात सुद्धा झाली नव्हती. अशा परिस्थितीत साथ देण्याऐवजी पळून गेली. तीपण आपल्याच जातीतली. काय फायदा ? परंतु रंजना, ना नात्यातली ना जातीतली, पण कठीण काळात अंकुशची सेवा केली की नाही. शिवाय आपल्या सर्वांची मने जिंकली. बघा तुम्हाला पटतंय की नाही.”

बंडोपंत काही क्षण स्तब्ध राहिले व मिसेस गोखलेकडे बघत विनोदाने म्हणाले, “मानलं तुला. बोलण्यात तुला कोणी कोणी हरवू शकणार नाही, म्हणजे माझी निवड योग्य होती तर.”

“म्हणजे काय?” मिसेस गोखले रागात परंतु लाडीक आवाजात म्हणाल्या आणि दोघेही खो-खो हसले. मिसेस गोखले रोड समोरील गॅलरीत अंकुशची वाट बघत येरझाऱ्या घालत होत्या. अंकुशला कधी गोड बातमी सांगते असे झाले होते तिला...

# माझे कुटूंब, माझी जबाबदारी

■सौ. राजेश्री कणीकर, माहीम, पालघर

करोना आज सर्वतोमुखी झाला आहे. जगावर आणि जगण्यावर आक्रमण करुन सर्वांना धडकी भरवणारा, करोना समतानिष्ठ आहे असे म्हटले तर वावगे होणार नाही. सर्वांना समभावाने कवेत घेणारा करोना खरेतर माणसांमधील भेदभावाच्या सर्व भिंती पाडून टाकत आहे. देश, धर्म, राज्य, जातपात, स्त्रिपुरुष, बालवृध्द असा कोणताच भेद करोनाला मंजुर नाही. आधुनिक होण्याचा म्हणजे निसर्गाकडून कृत्रिमतेकडे जाण्याचा आणि जिवनशैली उच्चभ्रु करण्याचा मार्ग आपण फार पूर्वीच पत्करला आहे. श्रीमंत होण्याचा आपला अट्टाहास, स्टेटस सिम्बॉल्स, प्रशस्त बंगला, चारचाकी वाहने, विदेशी दौरा, महागडा मोबाईल आणि स्टायलिश वागणे यामधे ही आजची दृश्ये आहेत. गेल्या एक दिडदशकापासून जगणे हे जगणे राहीलेच नव्हते. जगण्यामध्ये यांत्रिकता आली. खाणे-पिणे आणि मजा करणे हाच जगण्याचा फंडा झाला होता. यासोबत जगण्याला वागायला लागली होती एक दर्पणयुक्त झालर. स्वतःबद्दलचा गैरसमज असलेल्या गोष्टींच्या दुरभिमान नसलेल्या गोष्टींबाबत द्वेश, इतरांना हीन लेखण्याची वृत्ती समाजाच्या सर्व स्तरामध्ये डोके वर काढत होती.

करोनाचा प्रसार आणि प्रकोप याने थैमान घातलेल्या जगभरातील बातम्या धडकू लागल्यावर सर्वजण खाडकन जागे झाले. जैविक आपत्तीची टांगती तलवार आपले जगणे बदलवणार आहे. चीनमध्ये करोना तयार झाला आणि त्याने जगाला वेठीस धरले. अनेक अर्थव्यवस्था ढासळल्या. करोनामध्ये लॉकडाऊन झाले. त्यामुळे आपल्याला पाहिजे तसे जगण्याला पायबंद घातला गेला. करोनाने वेगवान जगण्याला करकरचून ब्रेक लावला. जगण्यातली मजा (मस्ती) क्षणार्धात थांबली. लॉकडाऊनने ज्याला त्याला आपल्या चार भिंतीत बंदिस्त केले. स्वतःचे जगणे स्वतःच क्लिष्ट करुन ठेवलेल्या माणसाला पंचतारांकित झूल उतरावयला जमले कां ? की लॉकडाऊन संपल्यावर पुःन्हा तो ही सर्व आवरणे स्वतःवर लादून घेईल. अहंकाराचे अवाजवी प्रदर्शन करायला घराबाहेर पडायची संधी लॉकडाऊनने हिरावून घेतली. आपआपल्या कोठडीत आणि कोषात ज्याला त्याला आवरण आता आवश्यक झाले.

करोना आपणाला आपली जगण्याची पध्दती सुधारण्याची संधी देत आहे म्हणून ''आपले कुटूंब आपली जबाबदारी समजून'' जे जसे नैसर्गिक आहे, ते स्वीकारा आणि सोपे जगा हा जगण्याचा मुलमंत्र ठरायलाच हवा ''जे साधे सरळ आहे, कोणताही मुलामा नसेल, तेच सत्य आहे. तेच खरे दर्शन आहे. सत्यदर्शन हे शिव आहे आणि तेच सुंदर आहे. सत्यम् शिवम् सुंदरम्" त्याला टाकून आणि झाकून पुढे जावे म्हणजेच, आपली प्रतारणा आहे. त्याच्या मुळाशी अंधकाराची जोपासना आहे.

करोना टाळायचा तर ''माझे कुटूंब माझी जबाबदारी'' हा मंत्र प्रत्येकाने ग्रहण केला पाहीजे (घर, कुटूंब, गाव व देशातील सर्वांनी) कारण हे सर्वजण माझ्या कुटूंबातच नाही का येत. ''घरी राहा सुरक्षित राहा'' हा नारा यानिमित्ताने दिला गेलेला आहे. म्हणून अहंकार नाहीसा झाला तर नैसर्गिक जगणे खुलून येईल. कृत्रिमतेची आवरण नष्ट होतील आणि आनंदप्राप्ती होईल. कुटूंबासोबत जगणे महत्वाचे. मरणाची भिती सर्वांनाच असते. पण आज करोना स्वत:कडून मिठी मारायला आला आहे. हेच सत्यकारण डोळयांसमोर ठेवून अहंकारी शरीराला चिकटलेली त्वचा काढून टाकायला पाहिजे. आपण आणि आपल्या कुटूंबाने जमिनीवरुन चालायला आणि जगायला, वावरायला शिकायला हवे. दुराव्याने माणूस एकटा पडतो, रुक्ष होतो. लॉकडाऊनच्या सर्व टप्प्यात माणुसकीचा, आपलेपणाचा जो गजर झाला आहे, तोच आता जागर म्हणून पुढे आणायला हवा.

स्मॉल ॲन्ड शॉर्ट इज ऑलवेज ब्युटीफुल हे आपण कायम लक्षात ठेवायल हवे. भौतीक सुखसोयींच्या मागे लागून, संपन्न परंतु विकृत आणि व्यसनी समाज निर्माण करण्यापेक्षा, सुखी, प्रामाणिक आणि चारित्र्यवान समाजाची निर्मिती करणे आवश्यक आहे. औद्योगिकीकरण करण्यापेक्षा शेतीचा विकास महत्वाचा आहे. कारण तिथे कणातून मणाची निर्मिती होते आणि रोजगाराच्या संधी उत्पन्न होतात. आपल्या देशातील तज्ञ आणि तंत्रज्ञान यामुळेच आपण करोनाच नव्हे तर मोठमोठया समस्यांवर मात करु शकतो. फक्त पर्यावरण स्नेही विकास हाच आमचा ध्यास असायला हवा.

''पाने कां सडली, घोडा कां अडला आणि भाकरी कां करपली'' या प्रश्नांचे उत्तर जसे न फिरल्याने हे एकच आहे तसेच प्रदुषण मग ते जमिनीतील, पाण्यातील किंवा हवेतील असो. अमेरिका, स्पेन, स्वीडन, इटली, चीन, इराण या देशात नायट्रोजन ऑक्साईड या घातक वायुचे हवेतील अत्युच्य पातळीवरील प्रदुषण, फाईव्ह-जी या विद्युतचुंबकीय उत्सर्जनामुळे झालेल्या उष्म्यामुळे मोठया प्रमाणावर आणि वेगाने करोनाविषणु संसर्ग झाले. स्वयंचलित वाहने आणि औद्योगिक कारखाने यातून होणारे प्रदुषण नायट्रोजन डॉयऑक्साईड आणि तत्सम प्राणघातक वायुची निर्मिती करते. हे वायु श्वासावाटे फुफ्फुसात

शिरुन त्याचा आतील स्तर सुजतो आणि फुफ्फुसाची कार्यक्षमता कमी करतो. रोगप्रतिकारक शक्ती कमी होते. करोना विषाणूची लागण त्वरीत होते. गार्डीयन या वृत्तपत्रात जेनी बेटस् या फ्रेडस् ऑफ अर्थ या मोहिमेचे जनक यांनी प्रकाशित केलेल्या संशोधनपर अहवालात हे सत्य उघडकिस आले आहे. या उलट प्रदुषणमुक्त भूतानमध्ये हा संसर्ग बोटावर मोजण्याइतका नगण्य होता. फक्त तीन करोनाबाधित तेही अमेरिकन प्रवासी. जमीन पाणी आणि हवेचे प्रदुषण रोखण्यात आम्ही दाखवलेली बेपवाई या करोनापर्वाचे उदयास कारणीभूत आहे. हेच यावरुन अधोरेखित होते. विकासाचे आम्ही स्वीकारलेले औद्योगिकरणाचे अमेरिकन मॉडल किती फोल आणि जिवावर बेतणारे आहे, हे यावरुन स्पष्ट होते. विकासाच्या खऱ्या वाटा दाखविणारे जागतिक पातळीवरील वावडे महात्मा गांधी, पं. दीनदयाळ उपाध्याय, झेल अंडरसन यांचा मार्ग आम्ही न स्वीकारल्याने ही भयावह आणि जीवघेणी परिस्थिती निर्माण झाली आहे. माझे कुटूंब माझी जबाबदारी समजून आपण ''वसुधवै कुटुम्बकम्'' समजून निसर्ग पाणी या सर्वांची योग्य निगा राखून सांभाळ केला पाहिजे. ग्रामीण भागाकडे दुर्लक्ष केल्याने तो भाग अविकसित राहून ग्रामस्थ रोजगारासाठी शहराकडे वळलेत आणि गावखेडी ओस पडू लागली. शहरांमधील वस्ती वाढली. तेथील सोयीसुविधांवर ताण वाढला. यामुळेच शहरी भागातील करोना विषाणू संसर्ग वेगाने मोठया प्रमाणात वाढला आणि नियंत्रणाबाहेर गेला.

लॉकडाऊन ठेवून करोनासंसर्ग रोखायचे कि लॉकडाऊन शिथील करुन रोजगाराच्या संधि देवून अर्थव्यवस्था सावरायची या कामीच प्रशासन आणि सरकार सापडले आहे. भौतिक सुखसोयींचा सतत पाठलाग करणे आणि त्याची वाढ करत राहणे हे संकट आहे. या गोष्टींसाठी आपण नैसर्गिक संसाधनांचा गरजेपेक्षा जास्त वापर करुन प्रदुषणच वाढवित आहोत. सध्या आपण करोनाप्रतिबंधीत लस, हॉस्पीटल्स्, मास्क, व्हेंटिलेटर, पीपींइ किट, या तात्पुरत्या उपायोजनांवरच लक्ष केंद्रित केले आहे. परंतु या गरजेच्या वस्तु समस्येच्या मुळाशी जाणाऱ्या नाहीत. दर शंभर वर्षांनी (प्रदुषणाची शंभरी भरण्यावर) अशी भयानक मनुष्यहानी होणारी महामारी येते असा इतिहास आहे.

या इतिहासातून आपण कांहीही न शिकता, आपण नैसर्गिक संसाधनांचा नाश करुन अव्याहतपणे प्रदूषण वाढवित आहोत. म्हणून तात्पुरत्या उपाययोजना न करता प्रश्नाच्या मुळाशी जावून कायम स्वरुपी उपाययोजना अमलात आणाव्या लागतील आणि सर्व करण्याकरीता ''माझे कुटूंब माझी जबाबदारी'' हे ब्रीदवाक्य खरे करुन दा खवायला हवे. माझे कुटूंब म्हणजे माझा देश, माझे राज्य, माझा गाव आणि शेवटी संसार (घर) हे जर प्रत्येकाने लक्षात घेतले तर आपणाला कशाचीही कमतरता पडणार नाही आणि आपण सुख शांतीने सर्व अडचणींवर मात करु शकू यात शंकाच नाही.

आपले जलस्त्रोत नद्या, नाले, तलाव, सांडपाणी, शेतजमिनी, रासायनिक खते आणि फवारणी याद्वारे आणि हवा औद्योगिकीकरणामुळे प्रदुषित झाले आहेत. या प्रदुषणातून मुक्त होण्यासाठी आपण उदासीन आहोत. नैसगिक संसाधनांची जपणुक आणि संवर्धनासाठी पर्यावरण तज्ञांनी वारवार सल्ले आणि इशारे देवूनहि सत्ताधारी राजकर्ते, उद्योजक, बिल्डर्स, विकासक आणि खाणमाफीया यांचे दडपणाला लालचे पोटी बळी पडून त्याकडे दुर्लक्ष करीत आहोत. कांहीतरी करा नाहीतर मरा अशी परिस्थिती ओढवली आहे. सारे जग आपल्याकडे समस्या सोडविणारे म्हणून आशेने पाहात आहेत. (सोल्युशन प्रोव्हायडर) पदश्री डॉ. पालेकर यांचे झीरो बजेट निसर्गशेतीचे, क्रांतीकारी तंत्रज्ञान आणि डॉ. भवाळकर यांचे जमीन, हवा आणि पाणी प्रदुषणातून समृध्द निर्मिणारे, जैविक शुध्दीकरण करणारे बायोकॅटलिस्ट इकोचिप तंत्रज्ञान या देशातील सर्व समस्यांवर मात करण्यासाठी आणि आत्मनिर्भर होण्यासाठी पुरे आहे. आपल्या देशातील तंत्र आणि तंत्रज्ञान यामुळेच आपण कोरोनाच नव्हे तर मोठया समस्यांवर मात करु शकतो. फक्त पर्यावरणस्नेही विकास हाच आमचा ध्यास असायला हवा.

कांही काळावधीनंतर जरी आम्ही कोरोना विषाणुवर मात केली तरी भविष्यात वाढत्या प्रदुषणामुळे मलेरिया, डेंग्यु, इबोला, सार्स आणि आता करोना या चढत्या अडचणीने अजुन भयानक विषाणु जन्माला येवू शकतात, असा अनुभव सांगतो. अमेरिका, ब्रिटन, फ्रान्सचे नव्हे तर भुतानचे पर्यावरणस्नेही मॉडेल स्विकारावे लागेल. जगातील ६० टक्के आजार प्राण्याद्वारे होतात. ७२ टक्के विविध प्रजातीचे भांडार असलेल्या जंगली प्राण्याद्वारे होतात. विषाणु त्यांचे सहअस्तित्व असले तरी मानवाला विषाणुंचा थेट लागण होत नाही. त्यासाठी एका वेगळया प्राण्याची माध्यम म्हणून गरज असते. यालाच संख्याधिका किंवा भरमसाठ वाढ म्हणतात. नवीन प्राण्यात प्रवेश केल्यावर विषाणुंचे उत्परिवर्तन होवून ते संसर्गजन्य होतात. ही एक टाळता न येणारी जनुकिम प्रक्रिया आहे. परंतु (परिसंस्था) इकोसिस्टिमचे संरक्षण करुन आणि वने अबाधित ठेवून विषाणूंची अबाधित वाढ रोकता येवू शकते.

सौ. राजेश्री कणीकर (९८६९० ८१५३९)
द्वारा दिपक रा. पाटील, ‘‘कमलकांता‘‘, गाडोडी,
पोस्ट :- माहीम, तालुका – पालघर,
जिल्हा – पालघर, पीन कोड : ४०१ ४०२.

# तू...

• संगीता वाझ, वसई

निसर्गतःच तुला सौंदर्याचं वरदान लाभलंय्. सृजनकर्त्याने आपली सारी सर्जनशीलता पणाला लावून तुला निर्माण केलंय्. या तुझ्या सौंदर्यापोटीच कधी रणसंग्राम लढले गेले तर कधी ताजमहाल बांधले गेले. पण म्हणून तू कायम सुंदर, सुबक दिसावं, सुडौल बाहुलीसारखं स्वत:ला maintain ठेवावंस असा अट्टाहास का? वयानुसार वाढणारं वजन, सैल पडत जाणारी त्वचा, करडे होणारे केस. हे सारे अपेक्षित बदल थोपविण्याचा इतका आटापिटा तू तरी का नि कशासाठी करावास?? तुझी सुंदरता नेमकी कशावरून ठरते? तुझ्या सौंदर्याची नेमकी व्याख्या काय?

खरं पाहता सौंदर्याला ठराविक अशा व्याख्येत नाहीच बसवता येणार. पण तरीही रंग-रूप-बांधा हे सौंदर्याचे काही निकष पूर्वापार चालत आले आहेत. गोऱ्या रंगाला तर आपल्या देशात अनन्यसाधारण महत्व दिलं गेलंय्. पण खरंच आपल्या मनाला मोहवून टाकणारं हे सौदर्य फक्त बाह्य रूपावरच अवलंबून असावं?? हे ट्रेडीशनल निकष का असावेत? कशासाठी पाळावेत नि तुझ्यासारख्या आजच्या सुजाण स्त्रीने तरी या निकषांवर का अडून राहावं? नोकरी व संसार ही तारेवरची कसरत करणारी तू...सध्या ट्रेंडमध्ये असलेल्या स्लिम, सेक्सी, झिरो फिगरच्या demanding culture मुळे स्वतःची स्ट्रेस लेवल मात्र वाढवत चालली आहेस.... नि ह्याचं मुख्य कारण समाजाचा तुझ्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन. पूर्वी पुरुषांच्या कर्तबगारीला, पराक्रमाला सौंदर्य मानलं जाई तर स्त्रीच्या सौंदर्यालाच पराक्रम मानला जाई. काळ बदलला...अनेक स्थित्यंतरे आली... पण तुझ्याबद्दलची विचार करण्याची मानसिकता एका विशिष्ट मर्यादेतच अडकून राहिली.

खरं तर ह्याला तुही तितकीच जबाबदार आहेस. आपण जर सुंदर दिसत असू तरच जणू आपल्या जगण्याला अर्थ असा विचार करणारी तू...ही पुरूषप्रधान संस्कृतीचा बळी नसून तो तुझ्या स्वतःचा वैचारिक पराभव आहे. मुळात तुझं 'स्त्रीत्व' हेच तुझं खरं सौंदर्य. निसर्गाकडून सृजनशीलतेचं बहुमोल वरदान लाभलेल्या तुझ्यात 'सहनशीलता' हा गुण ओतप्रोत भरलेला आहे. तुझ्यात असलेली ही खुबी हेच तुझं खरं सौंदर्य. तुझा स्वभाव, तुझा भित्रेपणा, तुझी grace (डौल), लज्जा, रूसवा, अबोला, बडबड, तुझी विनोदबुद्धी, जिज्ञासा, खोडकरपणा अगदी काहीही....जे तुझ्यात prominent आहे, तेच तुझं सौंदर्य !! कारण तेच खरं आहे, सच्चं आहे नि त्यामुळेच समोरच्याला ते appeal होतं...मग कधी ते साधं, सोज्वळ... मनाला मोहवून टाकणारं असतं तर कधी साजशृंगाराने सजलेलं. कधी संतापाने थरथरणारं तर कधी शांत, निरागस. आपण ज्याक्षणी जसं टिपू तसं ते भासतं. शेवटी सौंदर्य हे पाहणाऱ्याच्या नजरेत असतं म्हणतात.....!!!

"You have the power......To Create, To Nurture, To Transform."

# ख्रिस्तालय

• सुनील सायमन डिमेलो. गास वाडी. 9833929700.

ख्रिस्तालय ह्या टूमदार घरात लोपीस कुटुंबात सकाळी पुढील संवाद ऐकू येत होता, "जोशूवा, रिबेका चला उठा आज बुधवार 1 डिसेंबर मिस्साला जायचे ना." ऍनाने सकाळीच आपल्या नातवंडांना उठवले तब्बल आठ महिन्यानंतर कोरोना समूळ नष्ट होऊन मिस्सा सुरू झाल्या होत्या व आज पहिलाच दिवस असल्याने फादरांनी एकूण पाच मिस्सा ठेवल्या होत्या जेणेकरून संपूर्ण पॅरिशच्या लोकांना यात सहभाग घेता येईल आपले पती जोकींम यांनाही त्यांनी तयार राहायला सांगितले आपला मुलगा रॉबर्ट व सून सिमरन हे अगोदरच तयार असलेले पाहून मनाला खूप धन्य वाटले. मिस्सा आटोपून सर्व घरी आले एकत्र ब्रेकफास्ट केला

आता 2 डिसेंबर पासून सर्व सुरळीत सुरू होणार होते म्हणून रॉबर्ट उद्या ऑफिसच आणि सिमरन मुलांची व स्वत:च्या शाळेची तयारी करू लागली एना बाई नकळत भूतकाळात गेल्या..... रॉबर्ट लहानपानापासून संस्कारात वाढलेला पवित्र मिस्सा संडे स्कूल शाळा सर्व आटोपून आईला घरकामात हि तो मदत करीत असेल शेजारच्या सांतान बाई नेहमी म्हणत आणि अने तुझा रॉबर्ट त्याच्या बायकोला सुखात ठेवणार हो . " तें ऐकून एनाबाई स्मित करीत व मनोमन देवाचे आभार मानत असे. आपले पती जोकींम स्वतः व रॉबर्ट असे तिघेही रोज संध्याकाळी सात वाजता न चुकता रोझरी करीत असत. आजारी माणसांना भेट देणे गरिबांना मदत करणे ही सर्व ख्रिस्ती कर्तव्य तें नियमित पार पाडत असत.

रूथ व सॅबेस्टियन यांची मुलगी सिमरन व रॉबर्ट एका लग्नात भेटले त्यांची ओळख झाली. मैत्री झाली. मग हळूहळू मैत्रीचे रूपांतर प्रेमात झाले. रॉबर्टने मात्र एक दिवस जोकींम आणि एना यांना भेटून सिमरन विषय सांगितल संडे स्कूल बाल संघ व वेदि सेविका या अशा संस्कारात सिमरन वाढली होती.काळ पुढे सरकत होता दोन हृदय एकत्र आली दोन कुटुंब एकत्र झाली.लग्नाच्या दुसऱ्या दिवशी सोमवारी रूथ व सॅबेस्टियन आपल्या मुलीला भेटण्यास तिच्या सासरी आले जोकींम व एना यांना ते म्हणाले, "आमची मुलगी आता तुमची सून झाली तिला समजून घ्या.एखादी चूक जर तिने केली तर तिला प्रथम समजावून सांगा आणि नंतर आम्हाला सांगा." जॉकीम म्हणाले, "अहो आम्हाला मुलगी नाही. तुमची मुलगी

आता आमची मुलगी झाली. रॉबर्ट आमचा एकुलता एक मुलगा. सिमरनला  आम्ही मुली प्रमाणेच वागवू. अगदी रागवू देखील ह." असे म्हणताच  सर्वजण हसू लागले.जून महिन्यात रमेदी मातेचा वार सुरू झाला एव्हाना रॉबर्ट व सिमरनच्या संसारात नवीन पाहुण्याची चाहूल लागली होती डिसेंबरच्या 22 तारखेला जोशूवाच आगमन झालं आणि चार वर्षानंतर सप्टेंबरच्या आठ तारखेला रिबेका देखील या कुटुंबात सामील झाली.बघता-बघता बारा वर्षे निघून गेली.....

"मम्मी काय झालं तुम्ही विचारात बसलात बरे नाही का?" मुली पेक्षाही जास्त लळा लावलेली सून  सिमरन आपल्या सासूला म्हणाली. " अगं नाही गं सिमरन थोडी भूतकाळात जाऊन आली आणि गेले आठ महिने कोरोनाच्या संकटकाळात आपण सर्वजण कसे दिवस काढले ;ह्याचाही विचार करीत होती. " एना  म्हणाल्या.  तितक्यात रॉबर्टने बायबल मधील आश्वसक उदाहरणं दिली, "मम्मी पप्पा सर्व दिवस सारखे नसतात  नाही का! नोहा व त्याचे कुटुंब 40 पेक्षा जास्त दिवस बोटीत राहिले की नाही योनाही तीन दिवस माशाच्या पोटात होता ना काही नाही देवाने फक्त आपला प्लॅनेट रिफ्रेश केला अनिल  एवढच." पूर्ण लोपीस कुटुंबीयात अशी चर्चा सुरु असताना  जोशुवा व रिबेका या भावा-बहिणीच्या मनात मात्र काही वेगळाच बेत शिजत होता ख्रिस्त राजाचा सण  झाल्यापासून म्हणजेच 22 नोव्हेंबर पासून त्यांनी एका पिगी बँकेत आपले खाऊचे पैसे साठवावयास  सुरुवात केली होती.

20 डिसेंबर रविवार सगळीकडे ख्रिसमसची लगबग सुरू झाली होती रोशणाई ख्रिसमस   स्टार यांची धामधूम सुरू झाली एनाबाई म्हणाल्या, " जोकींम यावर्षी आपण ख्रिसमस  खूप जोरात साजरा करूया हो.गेले आठ महिने आपण खूपच त्याग केला आहे. "  रॉबर्ट म्हणाला, " हो मम्मी खरंच ”

सर्वांची अशी चर्चा सुरू असताना ही दोन्ही बालके मात्र एकमेकांकडे पाहून खाणाखुणा करीत होती त्यांना तसे पाहून सिमरन म्हणाली, "काय रे मुलांनो कसला प्लेन चाललाय? छोटी ख्रिसमस पार्टी की काय पण ताकास तूर लावून न देता मुले आपली पिगीबँक घेऊन तिथून पसार झाली जोखीम म्हणाले मला वाटतं मुलं खाऊचा पैसा त्यांच्या पिंगी  बँकेत जमा करीत आहेत आणि ख्रिसमसला तो फोडून त्या पैशात केक वगैरे आणायचा विचार दिसतो." रॉबर्ट म्हणाला, "पप्पा तसं असेल तर चांगल आहे या वयात मुलांना त्याग करून बचत करण्याची सवय छान आहे ना." आणि 22 डिसेंबर मंगळवार उगवला.जोशुवाचा  वाढदिवस होता सकाळपासून त्याची व रिबेकाची लगबग सुरू होती सर्व कुटुंब प्रथम 6:45 च्या मिस्साला जाऊन आले रॉबर्ट व सिमरन मुलाच्या अकराव्या वाढदिवसाची तयारी करीत होतें

ख्रिसमस डेकोरेशन त्यांनी रविवारी 20 डिसेंबरला उरकलं होतं म्हणून ती धावपळ नव्हती कारण गेली बारा वर्ष रॉबर्ट ख्रिसमसची तयारी एक आठवड्यात करीतसे. दुपारची जेवणं झाली आणि सर्व मोठी माणसं आपापल्या रूम मध्ये वाम कुशी घेण्यासाठी पहुडले.तिथे हॉलमध्ये या दोन्ही मुलांनी आपली पिगीबँक ब्रेक केली सर्व पैसे मोजले. " अरे फक्त दोनशे रुपये जमा झाले!" रिबेका म्हणाली. " एवढ्या पैशात तर फक्त स्टार येईल. " जोशूवा म्हणाला , "अरेच्चा मला वाटले कमीत कमी चारशे रुपये तरी जमतील." रिबेकाने निराशेचा सुर आळवला," दादा आता रे काय करायचं आपण कॅथरीन ऑंटी साठी स्टार लाइटिंग आणि क्रिसमस क्रिब आणणार होतो ना...? "

हॉल मधील कुजबुज ऐकून सिमरनने हळूच दरवाजा उघडून कानोसा घेतला या मुलांचा हा संवाद ऐकून सिमरनला गहिवरून आले तशीच रूम मध्ये जाऊन तिने रॉबर्ट ला आलिंगन देऊन म्हटले, " आपल्या पोटी देवदूत जन्माला आले आहेत रे " असं म्हणून ती रडू लागली रॉबर्ट मात्र काहीच न समजल्याने ब्लँक झाला होता नंतर सिमरनने सर्व वृत्तान्त रॉबर्टला कथन केला....

संध्याकाळी जोशुवाचा वाढदिवस साजरा करण्यासाठी रॉबर्ट व सिमरन दोघांनी केक सोबत अजून दोन बॉक्स व एक बॅग आणली. पप्पा मम्मी नि हे अजून काय आणलं असेल या विचारात मुले होती. संध्याकाळी केक कापायाच्या आधी रॉबर्ट ने एक घोषणा केली कीं आपण आत्ताच कॅथरीन आंटी च्या घरी सर्वजण जाणार आहोत.मुलांना आश्चर्याचा धक्का बसला जोकींम म्हणाले, "बाळांनो खूप चांगलं विचार तुम्ही केला आहे आम्हाला सर्व समजले आहे." पुढील एक तासात कॅथरीन ऑंटी च्या घरी ख्रिसमस स्टार,लाइटिंग आणि नाताळ गोठा तयार झाला. सोबत तिच्यासाठी एक छान साडीही दिली. कॅथरीन बाईचे डोळे पाणावले. एना बोलल्या, "ही सर्व कल्पना आमच्या ह्या छोट्या मुलांची हो."

.24 डिसेंबर ख्रिसमसची मध्यरात्र लोपीस कुटुंबीय पवित्र मिस्सा घेऊन घरी परतत होते. चर्चमध्ये स्वर सुरु होते..

बाळ जन्मला ख्रिस्त जन्मला

आनंदाने हर्ष गीत गाऊ चला

आज कॅथरीन बाईच्या घरी खरंच येशु बाळ जन्माला आला होता.आपल्या ख्रिस्तालय या घराच्या अंगणातून आकाशात पाहताना लोपीस कुटुंबियांना एक तेजस्वी तारा दिसत होता त्या ताऱ्याकडे पाहत सर्वजण वेगळ्याच खुशीत होते.

# मधु मालती

■ शुभांगी पासेबंद, ठाणे

तसं आमच्या घराण्यात वेड हे पूर्वापार काळापासूनच, थोड्याफार प्रमाणात दिसत असे. मी माझ्या नवऱ्याची लग्न केलं, तो माझा आत्येभाऊ होता. त्यांच्याही घरी थोडासा गतिमंदतेचा प्रकार होता. काळे कुटुंब सारे शेती करत. आजोबात मतिमंदता होती. माझी आई, तशी बुद्धीची बरी होती. त्यात आमचे चुलत आजोबा वगैरे पण कुपोषित होते. मी नॉर्मल जन्माला आले. गरोदरपणातील मातेची उपासमार, आबाळ त्यामुळे वाढ खुंटली होती. नजर वेडसर वाटत होती. लोक असं म्हणायचे की सारखं चुलीपाशी काम करून अग्नीशी संबंध येऊन काळे घराणे तसे झाले. भट्टी पेटवून द्यायची, ती राख माणसांच्या डोक्यात गेल्यामुळे ही माणसं रागीट झाली. ते म्हणण्यात काही तथ्य नाही पण एकूणच आमच्या घराण्यात वेड आहे, हे जातीत पसरविले गेलं होतं.

माझं लग्न झालं. माझा मुलगा राम सातवी इयत्ता शिकला. माझ्या मुलाला मी लग्नासाठी मागणी करायला जाई. कारण नवरा विचित्र वागे. मी बोलणी करी. मी बऱ्याच मुली बघितल्या, पण त्या पोरी किंवा घरचे लग्नाला कारण सांगत नाही म्हणत. नकारघंटा यायच्या. मग ही इंदू मिळाली. माहेर वडिल गरिब, सात मुलीतली एक होती. तिथे दिवस-रात्र काम करायची, इथे करते. कशालाही नाही म्हणायची नाही. उलटुन सुद्धा बोलायची नाही, बोलत नाही. लग्न झाल्यावर वर्षाच्या आत रामला मुलगी झाली. खूप आनंदाने मालती नाव ठेवलं. पण मला आता भिती वाटत होती की जे घराण्यातील वेड आहे ते त्या मुलीत पण येईल की काय? कारण त्या मुलीचे डोळे असे कधी तरळायचे. मालती दिसायला सुंदर होती. हे घराण्याला आलेले वेड सोडलं तर या घरी बाकी कशातच नाव ठेवायला जागा नव्हती. या दरम्यान नवऱ्याचे वेड वाढले. तो घर सोडून गेला. वाट बघितली पण आला नाही.

मालती वेडसर होती. फिट येई. मालतीला सातवीपर्यंत पास झाली की गळ्यात काळी पोती बांधण्यापूरते तरी कुणाशी तरी लग्न लावायचं. जगली आणि नांदली नाही तर मुलीला /माझ्या नातीला, मालतीला आयुष्यभर सांभाळायचं असं मी ठरवलं होतं. गोरी पोरगी. दिसायला देखणी, आकार घेतलेली होती आणि व्यवहार ज्ञान सोडलं तर बाकी ती पूर्णपणे व्यवस्थित होती. परेलच्या या चाळीचे खोलीत आमच्या मालकाने (नवऱ्याने) घेतलेल्या खोलीत आम्ही राहत होतो. माझा मुलगा राम, सून इंदू, मी आणि ही जन्माला आलेली गोरी

बाहुलीसारखी देखणी, पण किंचित डोक्याने कमी असलेली मालती ! शाळेत इतर मुली वेडी चिडवतात म्हणून मग तिने शाळा सोडून दिली. मालतीशी थोडफार बोलले तर तिच वेड काही कळायचं नाही. चालताना, जेवण जेवताना बघितले कि पटकन लक्षात यायचं की बुद्धी कमी असेल. सुंदर पण व्यवहार तिला अजिबात कळत नसे. ती आमच्या चाळीच्या आसपासच वावरत असे. आजूबाजूच्या पुरुषांच्या नजरेपासून मी तिला नेहमी राखत असे. बहुधा ती गप्प बसे पण कधी आवरेना अशी फिट येई. मी, राम, इंदू कसून तसे तिच्या पाठी राहात असू. काही दिवस मतिमंदांच्या एका दुरवरच्या शाळेत पण घालून बघितलं. शाळा खूपच लांब होती. खूप लवकर निघावं लागायचं आणि घरी परत यायला उशीर होत असे. घरी आल्यावर मालती शांत असे. तुम्ही म्हणाल, शाळा चालू ठेवायला हवी होती. शाळेतून परत आल्यावर मुकाटपणे मालती चाळीच्या दारात वाळत असलेल्या कपड्यांच्या घड्या करायची आणि ते घरात घेऊन यायची. मालती मस्त पोळ्या लाटायची. जे देवू ते जेवायला खायला घेऊन ते खायची. थोडावेळ काहीतरी टीव्ही बघायची. रात्री गपगार निजायची.

मालतीला गतिमंद मुलांच्या शाळेत मी न्यायचे. दोघी लवकर निघायचो. मी तिला शाळेत, तिथे बसवायचे, मग त्या शाळेच्या बाहेर बसून कुचाळक्या करायचे. मिश्री लावायचे. शाळा सुटली कि परत मालतीला घेऊन परत यायचे. त्या शाळेतल्या एका शिपायाशी मी गप्पा मारत बसे आणि शिपाई काम सोडून माझ्याशी गप्पा मारत असे. माझा नवरा गायब होऊन बरीच वर्षे झाली होती, पण मी कधी इकडेतिकडे पाहिलं नव्हतं. मुलाच्या संसारात आणि नातीच्या प्रेमातच आनंद मानला होता. मात्र या शिपायाशी अशी माझी जवळीक होतेय हे उमगले. शिपायाची माया, सहानुभूती खोटी आहे असं माझ्या मनाला जाणवत होतं. मी हे नातं संपवलं. शिपायाला दूर लोटलं आणि मालतीला पण त्या शाळेत नेणं बंद केलं. मला आज वाटतं, मी चुकले. मालती एकदम देवभोळी होती.

असं म्हणतात की अतिहुशार आणि अतिबुद्धिमान लोक देवभोळे वेडे होतात कारण की अशा पौराणिक गोष्टीमधल्या चित्रविचित्र आणि गुंतागुंतीच्या घटनांनी ती आकर्षित होतात. हुषार देवावरती विश्वास ठेवतात. काय कारण असेल ते असो पण मालती खूप देवभोळी होती. रोज सकाळी उठून देवळात जायची. मात्र तिच्यावर नजर ठेवून सगळीकडे मी सोबत जाई किंवा माझ्या लेकाला पाठवी. कारण देवळांमध्ये सुद्धा पुजारी भक्त यातील कुणी तिचा गैरफायदा घेतील मला भीती वाटत असे. चाळीच्या बाजूला एक किराणा मालाचे दुकान होतं. मालती तिथे थोडावेळ दूरवर बघत स्टुलवर जाऊन बसे. म्हातारा वाणी तिला गोळी खायला देई. तिथून थोडे पुढे चालत जाऊन एका राजकीय पक्षाच्या ऑफिसपर्यंत ती जात असे. त्या ऑफिसच्या दारात पारशी म्हातारा आणि तिला गोळी/पाव खायला देई.

त्या ऑफिसमध्ये काही ना काही किरकोळ कार्यक्रम बारा महिने चालु असत. तिथे तिच्या हातावर जो ठेवला जाईल, तो खाऊ खाऊन मालती परत येई. मालती वयात आली. परेलला वस्ती वाढली. मालती उफाड्याच्या अंगाची, तरुणी झाल्यामुळे २४ तास त्या सुंदर मुलीच्या मागोमाग मला फिरावं लागायचं. तिला खाऊ देणारा वाणी म्हातारा होता तरी मला त्याची भीती वाटायची. त्याच्यापासून दूर राहत जा असे मी मालतीला सांगे. “भय इथले संपत नाही” अशीच परिस्थिती होती/आजही आहे. त्या पक्षाच्या ऑफिसमध्ये मधू नावाचा मुलगा होता, जो वारंवार मालतीच्या पाठोपाठ घरी येई. तो खरं तर लग्न करू शकत होता का? पण टपोरी गड्याला मुलगी दिली तर, असं आपल्याला कसं वाटेल? कि फिरुन घेत नंतर नाही म्हणेल अशी भीती मला आणि माझ्या मुलाला वाटली.

“मालतीची लग्न करतोस का?” लेकाने मधूला विचारले. “घरी विचारतो“ मधू

मग मधु एक दिवस त्या ऑफिसमध्ये, घरी येण्याचा बंद झाला. कुठेतरी गोव्याला जाऊन राहिला असे लोक म्हणतात. मुलगा आणि सून मालतीची राखणदार म्हणून फिरत असायचे. मालतीची पाळी सुरू झाली. मालती अतिशय सुंदर दिसायला लागली. तिचं गर्भाशय बाहेर काढायचं, ऑपरेशन करून आणावं असं वारंवार मुलाच्या मागे लागले. पण माझा मुलगा म्हणायचा “नाही काढायचे. तिचं लग्न होईल.” मात्र मला सतत काळजी वाटत राही. कारण हल्लीच्या काळात या मुलीशी भानगड करायला मुले तयार होतात पण लग्न करायला कोणी तयार नाही. मी मालतीचे केस बारिक कापून घेतले. पण तरी मालती सुंदर, तशीही विकेशा मग अतिशय सुंदर दिसू लागली.

रात्री सुद्धा मालतीला माझ्याजवळ निजे. मालतीला बगलेत घेऊन मी झोपत असे. मात्र एका रात्री मी झोपले तेव्हा माझ्या बाजूला मालती होती. पहाटे मी लघवीला जायला उठले तेव्हा सुध्दा उत्तम निजली होती. मात्र नंतर मी चहा प्यायला उठले तेव्हा मालती जागेवर नव्हती. रानोमाळ मालतीचा शोध घेतला. मालती गायब झाली होती. मालतीला कोणी पळवलं? मालती कुठे गेली? काहीच शोध लागला नाही.

पोलीस स्टेशनवर फोटो घेऊन तक्रार नोंदवली. सगळीकडे शोधलं पण मालती सापडलीच नाही. माझा नवरापण वीस वर्षांपूर्वी असाच एके दिवशी गायब झाला होता, तो परत कधी आलाच नव्हता. मालतीला हात झटकायची, तोंड वाकडं करायची सवय होती. मालती असा हात झटकून, तोंड वाकडं करून दुसऱ्याला तुच्छ लेखण्याचे सारखी ॲक्शन करी. त्या कृतीने मला अतिशय कपाळात राग जात असे. खूप राग येई. असे वाटते कि ती मला हाकलत होती.

मालतीकडे बघून मला वाटे की ही पण माझ्या नवऱ्यासारखीच किंचित वेडसर जन्माला आली. पुढे पूर्ण वेडसर होईल. गायब झाली. का अशी झाली असावी. माझ्या नवऱ्याला झाला होता तोच दुभंग आजार मालतीला पण झाला असावा. कधी खूप छान वागे. त्या आनंदातच हसत, नटे. कधी आवरेना होई, फिट येई. परेलच्या या चाळीतली गंगाबाई मुली विकण्यासाठी कुप्रसिध्द आहे. ती मला म्हणाली.

“तुझ्या मालतीला धंद्यात घाल” ती अशी बडबड करत असे. तिने मालतीला पळविले असेल का? कुठल्यातरी नटीला म्हणे बारा मदतनीस आहेत. मला धुणे भांडी घासायला मदत नाही. जग असं आहे. आम्हा गरिबांना कोण कुठली मदत करणार? भांडी घासायची कपडे धुवायचे चाळीत बाहेरच्या नळावरून पाणी भरायचे, त्यातही मतिमंद मुलगीला सांभाळायची ? कसा आपला देश कळत नाही. खातो तो तुपाशी नाहीतर उपाशी! मला हळूहळू मनात येत असे ,मालती जन्माला आली नसती तर बरं .असं माझ्या मनात येऊ लागलं होते.त्यात तरुण मुलं ,हौशे नवशे सुंदर दिसणाऱ्या मालती साठी आमच्या घराभोवती घिरट्या घालू लागले पण मालतिला त्यातलं काही कळत नव्हतं.  सरकारी दवाखान्यात गर्भाशय काढायचं ते ऑपरेशन मोफत पण होतं. मी मुलाच्या मागे लागले.सुनेला म्हटले.

“ सूनबाई याच्या मागे लाग, मालतीच गर्भाशय काढायचे ऑपरेशन करून घ्या. तिला पाळीच्या वेळी व्यवस्थित येत असेल पण मला पुढची भीती वाटते” पुढे मी ज्याला घाबरले ती घटना घडली होती. मी पण माझा नवरा घर सोडून निघून गेल्यावर बरे वाईट दिवस बघितले होते. अनेक लोक माझ्या मागे लागायचे. मला पण काही वेळा ते गोड वाटले, पण नंतर खूप भीती वाटत असे. एक बाप्या भेटला, ती व्यक्ती माझ्या बापासारखी होती पण ती देखील माझ्याशी शरीर संबंध करायला लागली, तेव्हा मला खूप भीती वाटली. देह आनंद मिळतो, पण त्याचे वाईट परिणाम फक्त बाईलाच भोगावे लागतात. गरोदर राहिले तर काय करायचं ? जोखीम म्हणून मी त्या माणसाशी पूर्ण संबंध तोडले. मी त्या प्रकरणातून सुटले. मालतीला कसं वाचवायचं काहीच कळत नव्हतं. अन आता मालती गायब झाली.

मी वासनांतून तशी सुटले. माझा नवरा वेडसर होता. वेड आनुवंशिकतेने आले आहे. मुलगा जरा बरा आहे, पण कधीतरी वेळ येते की जिथे रामात पण वेडसरपणाची झाक डोकावून जाते. राम सरकारी नोकरीत शिपाई म्हणून कामाला  लागला, पगार मिळतो आणि रविवारी सुट्टी असे. माझा नवरा गायब झाला. पण त्यासारखी, माझी नात मालती सुद्धा तशीच गायब का व्हावी. माझ्याकडे एकदम असा हात कोणी झटकून मला तुच्छतेने पाहिले की कपाळात जायचं. असं वाटायचं, ’कोयती काढून गळा कापावा’.

मालती ही सुंदर दिसायची. “लाडकी लाडके” म्हणून मी तिचे कौतुक करायचे. कधी खेकसायचे. पण कधी मला मालतीच्या बद्दल खूप राग येत असे. मालती घर सोडून गायब झाली, घर शांत झाले. लवकरच माझ्या मुलाने पुढची संधी घेतली आणि माझ्या मुलाला आणि सुनेला पुढचा मुलगा झाला. हा नॉर्मल असावा. मुलगा राजा पाच वर्षाचा झाला. मुलगा नॉर्मल झाला असे वाटत होते. मालती गायब झाली होती. कुठे आहे? मधु बरोबर ? कोठ्यावर ? एखादे हॉटेलात मजूर ? पाच वर्षात अध्येमध्ये आहे माझा लेक मालतीची लापताची, त्यावेळी नोंद केलेली तक्रार प्रत, तर त्या वेळेचा फोटो घेऊन पोलिस स्टेशनच्या खेटे घाली. पोलीस स्टेशनला पोलीस इन्स्पेक्टरला भेटे, वाणी दात काढून हसायचा. त्यानंतर मी गप्प बसले. मी त्या राजकीय पक्षाच्या ऑफिसमध्ये जाऊन देखील सांगायचा प्रयत्न केला. ते लोक म्हणत.

“अहो आता काय करणार. ही मुलगी होती. सुंदर होती कुणाबरोबर प्रेमप्रकरण झाल असेल. पळून गेली असेल” असे म्हणून माझ्याकडे दुर्लक्ष करायचे. पाच वर्षानंतर लेक निवृत्त झाला. साहेब वॉचमन म्हणून नोकरी देणार होते. बदलापूरला तिथेच खोली दिली. परेलची चाळ सोडून गेलो. पैसा मिळाला. नवी खोली घेतली. परेलला फारसे जाणे होत नाही. मात्र एक वर्षानंतर मैत्रिणींना भेटायला मी त्या जुन्या चाळीत परेलला गेले. त्या चाळीचे जागी टॉवर होणार आहे. चाळीतल्या लोकांना पर्याय म्हणून समोरच्याच एका चाळीत पाठवण्यात आलं होतं. मी तिथे गंगाबाईशी गप्पा मारत असताना गंगाबाई म्हणाली.

“त्या खोलीच्या खाली खणल्ल्यावर दोन मृतदेह सापडला. एक ३९ वर्षाच्या पुरुषाचा होता. पार माती झालेला होता आणि दुसरा १५ वर्षे वयाचे मुलीचा भेटला. मालतीचा असेल का?”. मी शिव्या द्यायला सुरुवात केली. मी त्या मैत्रिणीशी भांडण करायला सुरुवात केली.“ काही बोलते! माझी मालती जिवंत येईल परत. आता तर किती सुंदर दिसत असेल. वाटल्यास लगीन वगैरे केलं असेल, पण आहे कुठेतरी जिवंत आहे .” अशी बडबड करून घरी परत आले. माझी मालती कुठेतरी असेल जिवंत असेल असं मला वाटत होतं. कशीतरी पाय ओढत, मी घरी आले. घरी आल्यावर लेकाला सुनेला असं सांगितलं की

“गंगाबाई सांगत होती आपण राहतो त्या वेळी जमिनीत गाडलेली दोन प्रेत सापडली. माती झालेलं होतं. एक वीस वर्ष जुन असून, उकरून काढलेलं ते दुसरं प्रेत मातीत जे सापडलं तो सांगाडा मुलीचा आहे. तो पाच वर्ष जुना आहे. त्या गंगाबाई तो आपल्या मालतीचा असावं असं लोक म्हणतात, अस म्हणत होत्या.” मी माझ्या मुलाला सांगितलं. माझा मुलगा काही बोलला नाही.सुन म्हणाली “आई गोव्याला कुठे तरी आपल्या मालतीला कुणीतरी बघितलं म्हणून! मधुमालती नावाचा एक बंगला आहे आणि त्या बंगल्यात आपली

मालती एका तरुणाबरोबर लग्न करून राहते. मधु असावा असा अंदाज आहे. मला कालच पोलिसांकडून कळल. पाच वर्षापूर्वी पोलिसांनी तिला मुंबईला तेजस एक्सप्रेस ध्ये चढताना व्हिडिओमध्ये / सीसीटीव्ही फुटेजमध्ये पण पाहीले आणि ती गोव्याला राहते आहे. आपण उद्या गोव्याला जाऊन तिचा शोध घेऊ या.” मला नवल वाटलं पण मी गप्प बसले. दुसऱ्या दिवशी लेक म्हणाला “मी आणि माझी बायको जावून घेऊन येतो.” “ठीक” मी उत्तर दिलं. कारण मला फक्त माहिती आहे मालती कुठेच सापडणार नाही.

मालती देवळात तीळ तांदूळ घेऊन जायची. वेळी शंभर प्रकारचे उपास करायची. सोळा सोमवार साठी तलावात आंघोळ करून ओलेत्याने देवळात जायची. त्यावेळी तिचा कुणीतरी गैरफायदा घेतला. मालती गरोदर आहे हे मला बरोबर कळलं. मी पूर्वीच सांगत होते! मुलाला म्हणत होते कि तीचा गर्भाशय काढूया, मुलांनी ऐकलं नव्हतं. आता काय करावे मला कळेना. मी भांडण करणारी प्रसिद्ध होते. मला अधिक बदनाम होणे नको होतं. त्यामुळे पहाटे मी मालतीचा गळा दाबला. रात्रीच्या वेळी परेलला मोठ्या श्रीमंत आणि भारी लोकांच्या सोसायट्यांची काम त्या काळी चालू होती तिथे एक खड्डा उघडा पडलेला मी सकाळीच पाहीले होते. नातीला शाळेत घेऊन जाताना बघितला होता. मालतीला मी तिथे गाडायचे ठरवले. पण वॉचमन होते. मी चाळीत मालतीचे देहाला गाडले.

आता पाच वर्षे झाली. मुलगा आणि सून नातवाला फारच जपत असत आणि मला त्याला शाळेत जाऊन परत आणायला पण सांगत असत. आपल्यावर जळूनच कुणीतरी मालतीला गायब केलं असं त्यांना वाटतं होत. तर त्या गंगाबाई कडून परेलतून येताना तो खड्डा मी बघितला होता. मी रात्रीच्या अंधारात खून केला होता. मालतीला या खड्ड्यात पूरले. वरती माती टाकली आणि परत खाटेवर येऊन झोपले. घरच्या सगळ्यांबरोबर मालती हरवली म्हणून शोधायला गेले. पोलिसांकडे गेले. शोधायचा प्रयत्न केला. आता मुलगा आणि सून गोव्याला गेले असले, तरी जी मुलगी सापडली आहे ती मालती नाही.

मुलगा आणि सून गोव्याला जाऊन दे. मी मुलाचा मुलगा सांभाळत बसले. मुलगा सून गोव्याला जावून आली. दोघांनी जाऊन मधुमालती बंगल्यात शोध घेतला नि पोलिसांच्या मदतीने ही मालती सारखी दिसणारी कोण मुलगी आहे तिचा देखील शोध घेतला. मात्र ती मुलगी मालती नव्हती. नाराज होऊन मुलगा आणि सून तिथून परत मुंबईला आले. आमच्या जुन्या चाळीत सगळीकडे हे माहिती होते. मालती सापडली, मालती येणार म्हणून जुन्या चाळीतली लोकसुद्धा चौकशी करत होते. मुलगा आणि सून परतले. “मालती सापडली नाही काय करायचं जाऊ दे.” लेक. मी रडु लागले.मालती परत येणार नाही हे फक्त मलाच माहिती होतं.

# ऑनलाइन शिक्षण आणि खोळंबा

• पायस आलेक्स तुस्कानो, घोसाळी, वसई.

शाळकरी मुलांनी आपल्या २०१९- २०२० शैक्षणिक वर्षातील वार्षीक परीक्षा मार्च महिन्यात आटोपुन आपल्या हातातोंडाला लागलेल्या शाईचे पुसट डाग पुसत न पुसत आपल्या सवंगडी सोबतीला कसे मौजमजा करून कसे उन्हाळी सुट्टीचे दिवस घालवता येतील या विचाराधीन बहुतेक असावेत. पण त्यांच्या आनंदात विरजण पडले. ऑक्टोबरमध्ये चीनच्या दिशेने कोविड १९ उर्फ कोरोना नावाचे  संसर्गजन्य वादळ घोगावत पुढे सरकत होते व तशी कल्पना सर्व जगामध्येही लागली होती. कोविड १९ असा  संसर्गजन्य रोग देश विदेशात पसरत असताना त्याचे हळूहळू पडसाद भारत देशात दिसावयास जास्त वेळ लागला नाही.

मार्च महिन्यात मध्याला कोरोना रोगाचा प्रादुर्भाव पसरण्यास सुरवात झाली आणि सरकार दरबारी त्याची नोंद होऊन देशात लॉकडाउनची नियमावली तयार करीत त्याची अंमलबजावणी संपूर्ण देशात लागू केली जसे जसे महिने सरसावत होते तसे घराबाहेर न पडण्याचे नियमही अधिक अनिवार्य होत होते व कोरोनाचा महाराक्षरूपी अजगर आपल्या विळख्यातून या रोगाचा प्रादुर्भाव अधिकाधिक गिळंकृत करण्याचा त्याचा स्वार्थी प्रयत्न चालूच आहे. शाळेने ९वीपर्यंतच्या मुलांना पुढील शैक्षणिक वर्षांत प्रवेश तर दिला परंतु या रोगाचा प्रादुर्भाव वा प्रसार मोठ्या प्रमाणात असल्याने शाळा सुरु करण्यासाठी आशेची किरणे अस्पष्ट व धूसर होती. उन्हाळी सुट्टी बघता बघता चार भिंतीच्या आड कोठून संपली ती मुलांना व पालकांना उमजली नाही. मुलांची उन्हाळी सुट्टी म्हणजे आपल्या मूळ गावी व मामाच्या गावाला जाऊन धमाल मजामस्ती करण्याची उधळण असते परन्तु या चालू वर्ष्यात त्यांचा हक्क या चिनी रोगाने हिरावुन घेतला होता. दहावी-बारावीच्या  मुलांनी आपल्या परीक्षा आटोपून ती निकालाच्या प्रतीक्षेत होती, त्यांनाही पुढील भविष्यातील अभ्यासाची चिंता सतावत होती. परंतु सरकारी प्रयत्नाने कसे बसे निकाल जाहीर करून गुणपत्रिका मुलांच्या हाती सोपविण्यात यश आले पण पुढचा मार्ग अजूनही सुकर नाही.

नवीन शैक्षणिक वर्ग चालू होण्यासाठी जूनच्या मध्यापासून सुरूवात होत असते व त्या अगोदर शालेय व कॉलेज  विद्यार्थी आपली वह्यापुस्तके, बॅगा,युनिफॉर्म, व इतर काही आवश्यक गरजू वस्तुचे जमवाजमव करण्याची पुर्व तयारी करीत असत पण तो योग सुद्धा मिळाला नाही. या काळात प्राध्यापक, टीचर्स, पालक वर्ग, विद्यार्थी यांना येणारे शालेय वर्षे फुकट जाईल की काय अशी भीती प्रत्येकाला सतावत होती व या रोगाचा प्रादुर्भावाचा हंगाम काही कमी होण्यास धजत नाही व भावी चिंता अधिक त्रस्त करीत होत्या.

मुलांचे शैक्षणिक वर्षे वाया न जाता शिक्षण पुढे चालू ठेवता यावे म्हणून शिक्षण मंडळाच्या आदेशानुसार ऑनलाइन शिक्षणाचा मार्ग निवडण्यात आला व त्या अनुषंगाने तसा सरकारी अंमलबजावणी प्रत्येक शाळेत जारी करण्यात आली व तसे ऑनलाइन शिक्षणाचे बुस्टर मुलांना देऊन जुलै महिन्यात वर्ग चालू करण्यात आली. सुरवातीच्या महिन्यात ऑनलाइन शिक्षणाचा खोळंबा निर्माण झाल्याने पालक व विद्यार्थ्यांना सुरवातीला काही सुचेना काही रुचेना मनी खिन्न आम्ही झालो व या उदभवलेल्या प्रसंगी वेडे होऊनी राहिलो. पण हळूहळू ही परिस्थिती सावरण्यासाठी प्रयत्न करीत सर्वांनी स्वतःला सावरत शिकण्याची ही पध्दत अंगवळणी करण्यासाठी प्रयत्न करू लागली. फूल ना फुलाची पाकळी ही मनोधारणा बाळगून राहिली. ऑनलाइन शिक्षणप्रणाली पद्धतीत शिक्षकही अडचणीत आहेत त्यांना सुद्धा फार मेहनत करून आपले कौशल्य पणाला लावून मुलांना शिकवीत आहेत.

ऑनलाइन शिक्षण प्रणाली मध्ये जसे फायदे तसे तोटेही दिसून येताहेत. ते सुद्धा निर्दशनास दिसू लागले. मुलांना मोबाईल, टॅब्लेट, लॅपटॉप, संगणक, इंटरनेट सारख्या डिजिटल उपकरणे एकदम जवळून हाताळण्यास परवानगी मिळाली त्यामुळे गूगल प्ले, गूगल मीट सारख्या अँपची तोंडओळख झाली व तांत्रिक दृष्ट्या  अभ्यासात भर पडली व आपल्या शालेय शिक्षण पद्धतीत ज्या वयात हातात  पेनपेन्सिलची आवड निर्माण होणे आवश्यक असते त्यांची जागा या उपकरणांनी  घेतली आहे. मुलांची शाळेत पाठविण्यासाठी जी रोजची पालकांची दगदग कमी झाली. पालक घरीच असल्याकारणाने काही मुले व पालक ह्यांचमधे नाते घट्ट होऊ लागले व काही प्रमाणात खटकेही उडू लागले. पण तेवढीच खेदजनक बाबीही उजेडात आल्या. या लॉकडाउन परिस्थितीत अनेक कंपन्या व बिझनेस बंद झाल्याने अनेक पालकांचे रोजगार गमावले गेले. काही पालकांना शाळेची मुलांची फी भरणे शक्य नव्हते त्यामुळे मॅनेजमेंटला शिक्षकांच्या पगाराची तरतूद करणे अशक्यप्राय व अवघड होऊ लागले. काही मुले या ऑनलाईन शिक्षणाचा लाभ घेऊ शकली नाहीत त्याला कारणेही पुरक होती. गरीब विद्यार्थ्यांना डिजिटल उपकरणे आर्थिक परिस्थितीमुळे त्यांच्यापर्यंत पोहचले नाहीत, विजेचा खोळंबा, काही गावात वीज व इंटरनेटचा अभाव.

काही पालकांना गरीब परिस्थितीमध्ये मोबाइल खरेदी करणे अवघड वाटत होते व काही ठिकाणी इतर मुले शिकत आहेत व आम्हाला का शिक्षण मिळत नाही ही नैराश्यची तीव्र भावना निर्माण होऊन आत्महत्यासारखे प्रकारही घडू लागले. देशभरात अनेक विद्यापीठात ऑनलाईन परीक्षांचा फज्जा उडाला. त्यामुळे काहिठिकाणी प्रचंड प्रमाणात मनस्ताप सहन करावा लागला आहे. परन्तु या जागतिक महामारीच्या प्रसंगीं जागतिक स्तरावर मुले शाळेत न जाऊ शकल्याने ऑनलाईन शिक्षण हाच पर्याय उपलब्ध आहे व असे म्हणतात शिक्षण हे वाघिणीचे दुध आ हे व ते कसे पाषाण करावे हे प्रत्येकाने ठरवावे.

# एक होती मॉडर्न वसई

• फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे

खोलीतले मल्टी फंक्शनींग वॉच वाइब्रेट होताच ती झोपेतून जागी झाली. तिच्या डोळ्यात अजूनही झोप होती, म्हणून तिने अलार्म स्नूजवर टाकला आणि काही वेळ झोप घेतली. बराच वेळ असे घडले आणि अर्धा तास सरला, पण आता ह्या खेपेस तिला काहीही करून उठावे लागणार होते. तिने आळस झटकला, राऊटरचे स्विच चालू केले आणि इंटरनेट चालू आहे का तपासले, मग आपल्या हजबंडला उठवले, माऊथ फ्रेशनरने तोंड धुतले आणि तयार होण्यास सांगितले. हजबंड तयारीला लागला तोवर तिने त्याच्यासाठी ग्रीन टी बनवला आणि नाश्त्यासाठी भिजलेले मुग घेऊन आली. ती स्वत: डायटिंगवर असल्याने तिने फक्त कारल्याचा ज्यूस घेतला. 'भरपेट' नाश्ता केल्यानंतर तिच्या हजबंडने जॉगिंगचे कपडे घातले, कानात वायरलेस इयरफोन घातले, पायात बूटे घातले आणि तो जॉगिंगला निघाला. हजबंड बाहेर जाताच तिने हातातल्या रिमोटने घराचा मेन डोर बंद केला आणि अलेक्साला तिचे आवडते गाणे वाजवण्यास सांगितले. तिने इटालियन मार्बलवर चटई टाकून योगासने करण्यास सुरुवात केली. बराच वेळ जॉगिंग झाल्यावर तिचे हजबंड परत आले, तिने त्याला नारळाचे पाणी दिले आणि तो शावर घेण्यासाठी निघून गेला. तिने योगा क्लास संपवला आणि स्टीम बाथ घेतला.

दोघंही घराच्या हॉलमध्ये बसले होते. ती ऑनलाईन शॉपिंग करण्यात व्यस्त होती, तर तिचा पती व्हॉटसअपवर आणि त्यांचा एकुलता एक जर्मन शेफर्ड कुत्रा टीव्ही पाहत होती. बराच वेळ निघून गेला तरी तिला हव्या त्या गोष्टी ऑनलाईन काही मिळाल्या नाहीत; ती नाराज झाली आणि रागाच्या भरात तिने ऑनलाईन शॉपिंगॲप डिलिट केलं.

ती नाराज झाली होती म्हणून तिने स्वयंपाक न करण्याचे ठरवले आणि ऑनलाईन जेवण मागवण्याचे ठरवले. बराच वेळ शोध केल्यानंतर तिला हवे होते ते पदार्थ तिने ऑर्डर केले आणि फूड डिलिव्हर होण्याची वाट पाहू लागली. बराच वेळ गेला तरी फूड घरी आले नाही म्हणून तिने ऑनलाईन चेक केले, दुर्दैवाने डिलिव्हरी बॉय त्याचा मार्ग चुकला होता. तिने तात्काळ त्याला फोन केला, खडेबोल सुनावले आणि मग त्याने कोणत्या मार्गाने यावे हे समजावले. हा सर्व ड्रामा चालू असताना तिच्या हजबंडणे सर्वांवर दुर्लक्ष केले आणि स्कॉच काढून त्याचे दोन लिट्टील-लिट्टील पेग्ज मारले. काही वेळेत फूड डिलिव्हर झाले. तिने सर्व जेवण टेबलावर मांडले, त्याचा फोटो काढला आणि व्हॉटसअप, इंस्टॅग्रॅम स्टोरीमध्ये टाकला. हा सर्व प्रकार पाहण्यात जास्त वेळ न घालवता तिच्या हजबंडने जेवायला सुरुवात केली.

दुर्दैवाने तिने मागवलेले पदार्थ चवदार नव्हते म्हणून ती पुन्हा भडकली; पण भूक लागली होती म्हणून ती कशीबशी जेवली, हात धुतले. ऑर्डर केलेले फूड चवदार नव्हते म्हणून तत्काळ तिने वेबसाईटवर फीडबॅक लिहिली.

दुपार झाली होती म्हणून तिने थोडा वेळ झोपण्याचा निर्णय घेतला, पण लो व्होल्टेजमुळे घरातला एसी चालू होत नव्हता, तिने महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्याला फोन करून झापले आणि फोन ठेवला. मग तिने Netflix वर काही वेळ वेब सिरीजचे एपिसोड्स बघितले आणि सोशल मीडियावर त्याचा अभिप्राय पोस्ट केला. वेब सिरीज तिला बोरिंग वाटली म्हणून तिने स्वतःचा एक फोटो एडिट करून रुप बदलले आणि तो सोशल मीडियावर अपलोड केला. त्या फोटोवर तिला एका तासात २०० लाईक्स आणि "हॉट, स्वीट, ब्युटिफुल, सेक्सी" अशा २२ कॉमेंट्स आल्या होत्या. ती पूर्ण भारावून गेली होती, एका फोटो एडिटिंग ॲपच्या जोरावर आपण सर्वांना कसा चुना लावला ह्याचा तिला गर्व वाटू लागला. ती खरंच सुंदर आहे असा तिला आभास होऊ लागला. ती खूप खुश होती, संध्याकाळ होत आली होती, हर्षभरीत होऊन तिने हर्बल टी बनवली आणि दोघांनी त्याचा आस्वाद घेतला. मग त्यांनी घराच्या कुंपणाबाहेर अजून एक कुंपण घालून त्यात केलेल्या गार्डनला पाणी घातले.

मग घरातल्या कुत्र्याला घेऊन ते वॉकला गेले. वॉक करता-करता ते डिजिटल वॉचमध्ये त्यांच्या स्टेप्स काऊंट आणि किती कॅलरीज बर्न झाल्या हे वारंवार पाहत होते. एखाद तास वॉक झाल्यानंतर ते घरी परतले, आंघोळ केली आणि हॉलमध्ये बसून डाएट प्लॅनवर रिसर्च करू लागले. हेल्थ काँन्शीअस असल्याने ते संध्याकाळी जेवणात अगदी लाईट फूड खात, कधी फक्त फ्रूटसॅलड, तर कधी बॉईल्ड व्हेजिटेबल्स. आज तिने जेवणात बेबी कॉर्न सूप आणि लिफी व्हेजिटेबल सँडविच केले होते. त्यांचे रिसर्च संपले आणि मग त्यांनी 'स्वादिष्ट जेवणाचा' मनसोक्त आस्वाद घेतला. खाल्लेलं फूड चांगल्या प्रकारे डायजेस्ट व्हावं म्हणून त्यांनी थोडा वेळ व्यायाम केला आणि मग ते बेडरूममध्ये आले. एकमेकांना टाईट हग करून ते बेडवर पडले. दिवसभराच्या थकव्यामुळे ती झटक्यात झोपी गेली, तर तो डोळे उघडे ठेवून गडद काळोखात एसीच्या इंडोर युनिटवर दिसणारे डिजीट पाहू लागला.

# डोंबारी

**फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे**

संध्याकाळची वेळ, दिवस मावळतीला झुकला होता. हातात सायकली आणि त्यावर बरेच सामान घेऊन त्या तिघांचा मुख्य रस्त्यावर प्रवेश झाला. मळकटलेले कपडे, वाढलेले-

विस्कटलेले केस, नागड्या पायाने ते गावाच्या वेशीवर पोहचले. त्यांना तेथे पाहताच गावातील लोकांनी चोर म्हणून ओरडण्यास सुरुवात केली आणि त्यांना तेथून पळवू लागले. त्यांनी लोकांपुढे हात जोडले, त्यांचे पाय पकडले आणि तेथे काही दिवस राहण्याची भिक मागितली; पण उपकार तर सोडाच, त्यांच्यावर भ्याड हल्ला केला गेला. त्या तिघांच्या नाका-तोंडातून रक्तस्त्राव होईस्तोवर त्यांना मारहाण करण्यात आली. शेवटी गावातील पाटलांनी हस्तक्षेप करून त्यांना त्या संकटातून वाचवले. पाटलाने त्यांना आपल्या घराशेजारी तंबू ठोकण्यात परवानगी दिली आणि पिण्यासाठी पाणी दिले. बरीच पायपीट झाल्याने त्यांना फार तहान लागली असावी, त्यांनी गटा-गटा पाणी प्यायले आणि पाटलाचे आभार मानले. पाटलाने त्यांना आंघोळ करण्याची जागा दाखवली आणि आत गेले.

त्या सर्वांनी झटपट आंघोळी उरकून घेतल्या आणि डोंबाऱ्याची मुलगी पाटलाच्या घरी जाऊन जेवण घेऊन आली. त्यांनी जेवण उरकले आणि रिकामी भांडी परत देण्यासाठी डोंबाऱ्याच्या पत्नीने मुलीला पुन्हा पाटलाकडे जाण्यास सांगितले, पण मुलीने स्पष्ट नकार दिला. मग डोंबाऱ्याची पत्नी स्वतःच तेथे गेली.

बराच वेळ झाला तरी ती काही परत येत नव्हती म्हणून डोंबारी थोडा अस्वस्थ झाला. तो तंबूमधून बाहेर पडणार तोच त्याची पत्नी तेथे आली. डोंबाऱ्याने तिला बरेच प्रश्न विचारले, पण ती काहीच उत्तरली नाही आणि जाऊन आपल्या मुलीला कुशीत घेऊन झोपली. तिची मुलगी पाटलाकडे पुन्हा जाण्यास का तयार नव्हती ह्याचे कारण तिने अनुभवले. पाटलाने तिला आणि तिच्या मुलीला आंघोळ करताना पाहिले होते आणि त्याच्या डोळ्यावर चढलेली शरिरसुखाची नशा त्याला शांत राहून देत नव्हती. त्याने डोंबाऱ्याच्या मुलीशी गैरवर्तन केले होते म्हणून ती पुन्हा तेथे जाण्यास तयार नव्हती, पण त्याची पत्नी मात्र ह्यातून वाचू शकली नाही. पाटलाने गरजवंत एकट्या स्त्रीला आपली शिकार बनवले आणि तिच्या शरीराचे लचके तोडले. ती फार बिथरली होती, तिच्या तोंडातून शब्द बाहेर पडत नव्हता. सदर प्रसंग ती आपल्या पतीला सांगू इच्छित होती, पण तिला भीती होती की पाटील तिच्या कुटुंबाला नष्ट करेल, तिच्या मुलीशी काही चुकीचे करेल; म्हणून तिने कल्लोळ न करता शांत राहणे पसंत केले. तिचे डोळे जराही बंद होत नव्हते, तिचे मन अजूनही स्थिर नव्हते, पाटील पुन्हा येथे येईल आणि ह्यावेळी माझ्या मुलीला शिकार बनवेल ह्या भीतीने सबंध रात्र ती जागत होती.

सकाळ झाली, पण रात्री घडलेली घटना तिला बेचैन करत होती, तिच्या मनात धडकी भरली होती. तिने तात्काळ आपल्या पतीला येथून परत जाण्याचे विनवले, पण त्याने नकार दिला. पतीला सत्यता माहित नव्हती. राहण्यासाठी जागा आणि काल रात्री मोफत जेवण दिलेला पाटील चांगला माणूस आहे ह्या आभासी दुनियेत तो होता, पण ह्या उपकारांचा मोबदला त्याने कसा चुकता केला आहे ते त्याला माहीत नव्हते, पण त्याची पत्नी त्याचे काहीही ऐकणार नव्हती. शेवटी तिची मागणी म्हणून त्यांनी हे गाव सोडून जाण्याचा निर्णय

घेतला. आता अडचण अशी होती की त्यांच्या खिशात एक कवडीही नव्हती, त्यामुळे त्यांनी गावात एक प्रयोग करण्याचा निर्णय घेतला आणि जमलेल्या पैशांतून पुढे मार्गक्रमण करण्याचे पक्के केले. काही वेळेत ते गावच्या मध्यभागी जमले आणि खेळ चालू झाला. नेहमीप्रमाणे डोंबारी गाणे बोलत, ढोलकी वाजवत दोरीवरून चालणाऱ्या त्याच्या पत्नीला प्रोत्साहन देत होता, तर त्याची चिमुरडी हातात करवंटी घेऊन सर्वांकडून पैसे मागत होती. दोरीवरून चालताना तिची नजर तिच्या दिशेने येणाऱ्या गावातल्या पाटलावर पडली आणि मन विचलित होवून ती घाबरून खाली कोसळली. एका क्षणात सर्वत्र शांतता पसरली. डोंबाऱ्याने भीतीपोटी आरोळी ठोकली आणि तिच्या दिशेने धावला. पण ती निपचित पडली होती, तिच्या डोक्याच्या मागील भागातून अखंड रक्तस्त्राव होत होता. त्याने तात्काळ मदतीची मागणी केली, सर्वजण हा प्रकार पाहत होते, पण मदतीसाठी कोणीही पुढे सरसावले नाही. बराच वेळ त्याने पत्नीला वाचवण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! तिने ह्या जगाचा निरोप घेतला आणि त्या मातीत ती कधीही न उठण्यासाठी झोपली.

त्याने आजूबाजूला पाहिले, पण त्याची मुलगी त्याच्या नजरेस पडली नाही; तो जागेवर उभा राहिला आणि सर्वत्र तिला शोधू लागला, गावभर "लक्ष्मी-लक्ष्मी" ओरडत धावू लागला, पण त्याला कोठूनही तिचा प्रतिसाद आला नाही.

बेभान होवून तो गावालगत असलेल्या जंगलात धावू लागला आणि त्याचा वेग मंदावला; तो शांत झाला. त्याला त्याच्या मुलीचे कपडे इथस्त: पडलेले दिसले. तो अजून पुढे गेला आणि देवालाही गहिवरून येईल इतका त्याने आक्रोश केला. त्याची नुकताच वयात आलेली चिमुरडी, त्या नरकात निर्वस्त्र पडली होती, तिचे तोंड पूर्णपणे ओरबडले होते, शरीरावर जखमा होत्या आणि तिच्या गुप्तांगातून रक्ताची धार लागली होती. त्याने लगेच आपले कडपे काढले आणि तिला त्यात लपेटले. शरीरातील सर्व शक्ती एकवटून तो तिला घेऊन गावाच्या मध्यभागी आला. गावातील कोणी त्याला मदत तर केलीच नाही, पण कोणाला त्यांची दयाही आली नाही. त्या गरीब डोंबाऱ्याचा ज्या खेळावर उदरनिर्वाह चालला होता, ते सर्व साहित्य आणि त्यांच्या सायकली गावकऱ्यांनी पसार केल्या. त्याने मुलीच्या तोंडावर पाहिले, तिने डोळे अर्धे उघडले आणि एक दीर्घ श्वास घेऊन प्राण सोडला. कोवळ्या मुलीचा जीव स्वतःच्या हातात जाताना पाहून त्या बापाचे हृदय चिरफाटले, ते दुःख त्याला असह्य झाले, त्याने बाजूला पडलेले ब्लेड उचलले आणि हाताची नस कापून घेतली; क्षणात तो खाली कोसळला. त्याचा प्राण जात होता, त्याने मोठ्या कष्टाने डोळे उघडले, डोक्यावर उगवलेला सूर्य त्याने पाहिला आणि डोळे कायमसाठी मिटले.

सर्वांसाठी सूर्य नुकताच उगवला होता, पण त्या डोंबारी कुटुंबाचा सूर्य भर दिवसा मावळला होता, पुन्हा कधीही न उगवण्यासाठी.

# हवे नव्या जीवनशैलीचे नियोजन.

■ एडवीन डाबरे - भुईगाव
अध्यक्ष, अनुदानित खाजगी प्राथमिक शिक्षक संघ वसई.

गेली दहा महिने आपण करोना महामारीने त्रस्त आहोत. लॉकडाउनने आपल्याला खूप काही शिकविले. करोना विरुद्धच्या लढाईत दिल्लीच्या "एम्स" पासून गावातील "आशा" पर्यंत सर्वच शासकीय व्यवस्था काम करू लागली. करोना विषाणूच्या संसर्गापेक्षा भीतीचा संसर्ग जास्त झपाट्याने होत आहे. ह्यापुढच्या काळातले सर्वात मोठे आव्हान हे आपल्या आत सतत उद्भवणाऱ्या भीतीचं व चिंतेचं निराकरण करणे हे असणार आहे. करोना विषाणू आपल्या अवती भवती आहे याचं भान ठेवून त्यासाठी योग्य ती खबरदारीं घेऊन एका नव्या जीवनशैलीच नियोजन आपण करायला हवे.

१) कृतज्ञता सतत ठेवावी –: आनंदाचा मार्ग हा कृतज्ञतेतून जातो हे आता शास्त्राने सिद्ध केले आहे. ह्यापुढच्या आयुष्यात असणाऱ्या सर्वच गोष्टीबद्दल आपण कृतज्ञता अनुभवायला सुरुवात करायला हवी. सुखाबद्दल, कारण ती आपल्याला आनंद देतात. दु:खाबद्दल, कारण ती आपल्याला अंतर्मुख करायला लावतात व नवीन संधीची जाणीव करून देतात. ह्यापुढे आयुष्यातील कुठलीच गोष्ट गृहीत धरून चालणार नाही. कशाबद्दल सतत तक्रार करून चालणार नाही.

२) माझे धन, ज्ञान - समाजासाठी -: आयुष्याचे मोल साठवलेल्या संपत्तीपेक्षा जपलेली मूल्ये व घेतलेली भूमिका यावर मोजले जाते. कमी गरजा असणारी माणसे अधिक आनंदी असतात. आता खाण्यापिण्याच्या सवयी व सण, उत्सव साजरे करण्याच्या पद्धती बदलायला हव्यात. धनवान व्यक्तीने आपले धन चलनात, व्यवसायात व समाजोपयोगी कार्यात द्यावे. विद्वान व्यक्तीने आपला व्यासंग लेखणीतून, भाषणातून, संवादातून व्यक्त करायला हवा.

३) जोपासना संवेदनशिलतेची -: इंग्लंडमधील फ्लोरेन्स नाईटिंगेल ही परिचारिका युद्धकाळात रात्री सारे निद्रीस्त असताना हातात एक दिवा घेऊन वेदनेने विव्हळणाऱ्या प्रत्येक रुग्णापाशी जात असे आणि त्यांची सेवा करत असे. तिचे दिवा घेऊन जाणारे ते रूप इतके प्रसिद्ध झाले की तिला 'दे लेडी विथ अ लॅम्प ' असे टोपणनाव मिळाले. लॉकडाऊन काळात अनेक संस्था, व्यक्तीने स्थलांतरीत मजुरांना अन्नपाणी दिले, त्यांना दिलासा दिला. आपल्या परीने आपण असे दीप धरू तेव्हाच आपल्याभोवती संवेदनशीलतेची कोजागिरी निर्माण होईल.

४) ध्यानधारणा हेच खरं अध्यात्म -: उत्साहाने सकाळ सुरु होणे आणि आनंदाने अंथरुणात पहुडणे हीच जगण्याची खरी रीत आहे. मनाला वर्तमानात ठेवण्यासाठी ध्यानासारखं दुसरं काहीच नाही. ध्यानामुळे शारिरिक, मानसिक कार्य सक्षम होते. रोगप्रतिकार शक्ती सुधारते, विचारामध्ये लवचिकता येते. आपल्याला आतील बलस्थाने गवसतात. सर्जनशिलता वाढते. आपल्या रोजच्या जगण्यातले एखादे काम जर तन्मयतेने केले तर तेथे खरं अध्यात्म प्रकट होईल.

५) माझी अत्यावशक गरज -: करोना काळात अत्यावशक सेवा देणाऱ्यांनी (डॉक्टर, पोलीस, नर्सेस) आपल्या जीवाची बाजी लावली. अत्यावश्यक सेवा हा परवलीचा शब्द झाला. सध्या आपला महिन्याचा इंटरनेटचा खर्च ३००/- रु., टीव्ही-केबल ३००/-रु., हॉटेलचा कमीत कमी खर्च १०००/-रु., वर्षाचा पर्यटनाचा खर्च काही हजारात. पण चांगलेचुंगले वाचण्यासाठी आपण किती खर्च करतो ? आपल्या अत्यावश्यक गरजामध्ये वाचन आहे कि नाही?

६) 'मी' च्या पलीकडे जाणे -: माणसाला जन्माला घालण्यामागे परमेश्वराचे काहीतरी प्रयोजन असते. पण हे प्रयोजन काय आहे हे सगळ्यांनाच समजत नाही. ज्यांना हे समजते ते सर्वसामान्य माणसापेक्षा वेगळे असतात. स्वतःपलीकडे बघणारी, समाजातील वंचितांच्या समस्या जाणून, त्यांची गरज ओळखून काम करणारी अनेक माणसे आपल्या अवती भवती आहेत. त्यांचा कित्ता गिरवावा. आपल्या पलीकडे जग आहे ह्याची सतत जाणीव हवी.

७) काहीतरी कार्य करीत राहावे -: जो चालत राहतो त्याच्या जगण्याला गती प्राप्त होते. अब्दुल कलाम म्हणतात “मृत्यूनंतर जिवंत राहायचं असल्यास एक गोष्ट जरूर करावी,

वाचण्यासारखं काहीतरी लिहावं किंवा कोणीतरी आपल्याबद्दल लिहिल असे काहीतरी कार्य करावे”. सतत कार्यमग्न राहून स्वतःला चिंतेततून मुक्त करावे.

८) हवी संगत थोरांची -: असे म्हणतात 'पाव ज्ञान गुरुकडून, पाव स्वतःच्या बुद्धीने, पाव काळाच्या ओघात व पाव संगतीने मिळते म्हणून आपण कुणाच्या समवेत आहोत ह्याला खूप महत्व आहे. (A man is known by the company he keeps.) प्रसिद्ध अमेरिकन तत्वज्ञ हेनरी थोरो हा विचारवंत ईमरसन ह्यांच्या बंगल्याच्या बगीचामध्ये काम करीत होता. कारण त्याला माहित होते की थोरामोठयाचा सहवास ही खरी पाठशाळा असते. चांगल्या माणसाचा सहवास आपल्याला घडवतो. तुकाराम महाराज म्हणतात 'परिसासंगे सोने झाला विळा'.

९) तरुणांनी अग्रक्रम बदलावे -: आज समाजात सेवाकार्य करणाऱ्या माणसाचा ठसा पडत नाही. आज तरुणांचे शिक्षण, बुद्धिमत्ता ह्यांच्या वापरासंबंधीचे अग्रकम बदलून गेले आहेत. शिक्षण व बुद्धिमत्तेचा उपयोग पैसा (अधिक) मिळवण्यासाठी कल वाढत आहे. पैसा मिळवण्याच्या नादात सामाजिक भान हरपून गेले आहे. आनंद, मनोरंजनाच्या व्याख्या बदलल्या आहेत. वाचन, साहित्य ह्यापासून दुरावणे. राजकीय प्रक्रिया व त्यातील नवे संदर्भ ह्याबाबत अनभिज्ञ असणे, तर कधी आक्रमक असणे. ह्या साऱ्यातून समाजापासून तुटण्याची आणि स्वतःच्या कोशात जाऊन बसण्याची प्रक्रिया घडत आहे. समाजात चळवळी व प्रयोग हयांना ओहोटी लागली आहे.

१०) प्रत्येक क्षण आनंदाने जगणे -: आयुष्यात आपल्या वाट्याला आलेल्या प्रत्येक क्षणात रमता आले पाहिजे. मुळात जगात असुंदर असे काहीच नसते. आपले वर्तन जर नकारात्मक भावनामुळे झाकोळलेले असेल तर कोणतेही सौदर्य आपल्यापर्यंत पोहचत नाही. सुंदर क्षण गतिमान असतात.

आपल्या नव्या जीवनशैलीत ह्यापुढचे आयुष्य जास्त जागरूकतेने आणि जाणीवपूर्वक जगायला हवं. करोना संकटाचे संधीत रूपांतर करायला हवे. आपले लक्ष्य विचारातून कृतीत आणायला हवं. आपले मन जेव्हा सकारात्मक विधायक कृतीशी जोडलेले असते तेव्हा ते आपले मित्र असते. आपल्या मनाला वर्तमानाच्या संपर्कात आपण जेवढ ठेवू तेवढं आपण आनंदी व सुखी राहणार आहोत.

# खरी शिकवण

• रोहित परेरा, विलेपार्ले, मुंबई

प्रसिद्द अमेरिकन लेखक आणि विचारवंत मार्क ट्वेन ह्यांनी एकदा म्हटले होते, "शाळा या प्रणाली मागचा मूलभूत उद्देश हा शिकवणे नसून शिकणे हा आहे. शाळेमध्ये तुम्हाला कसे शिकायचे हे शिकवले पाहिजे." किती खोल आणि सुंदर अर्थ आहे त्यांच्या म्हणण्याचा. माझी शाळेबद्दलची आठवण हि ह्या एका वाक्यात संक्षिप्त होते. प्रत्येक संस्थेची स्वतःची अशी एक संस्कृती असते आणि आमच्या शाळेच्या संस्कृतीचे वैशिष्ठ म्हणजे विद्यार्थ्यांच्या पुस्तकी ज्ञानाबरोबरच त्यांचा आत्मविश्वास आणि शाश्वत विद्यार्थी राहण्याची क्षमता ह्यालापण तितकेच महत्त्व दिले जाई. प्राथमिक शाळेतील संस्कार शिबिरं असोत, कायकिणी (बऱ्याच जणांकरता वाघ बाई) बाईंबरोबर केलेल्या अस्मिता संस्थेला भेटी असोत, माध्यमिक शाळेतील शालेय किंवा आंतरशालेय स्पर्धा असोत किंवा इतर उपक्रम असोत, शाळेचा आम्हा विद्यार्थ्यांच्या सर्वांगिक विकासावर भर असे.

विचित्रपणे, माझी शाळेची सर्वात चिंतनशील आठवण हि शाळेतून उत्तीर्ण झाल्यानंतरची आहे. मी २००२ साली दहावी म्हणजेच S.S.C. उत्तीर्ण झालो. तशी माझी गणना शाळेतील हुशार विद्यार्थ्यांमध्ये व्हायची. हुशार पण अत्यंत मस्तीखोर. असो, मला दहावीला चांगले मार्क्स मिळाल्यामुळे, हव्या त्या कॉलेजमध्ये हव्या त्या शाखेत प्रवेश मिळणार हे निश्चित होते. सुदैवाने माझे ठरले होते कि मला पुढे इंजिनिअर व्हायचे आहे. त्यामुळे विज्ञान शाखेत प्रवेश घ्यायचा हे नक्की होते. पण कुठल्या कॉलेज मध्ये प्रवेश घ्यायचा हे काही ठरत नव्हते. कोणी म्हणत होते, रुपारेल कॉलेजला प्रवेश घे, तर कोणी म्हणाले, रुपारेल पेक्षा साठ्ये (पार्ला) कॉलेज बरे. बारावीकरता क्लासेस कॉलेज पासून जवळ आहेत आणि प्रवासही कमी. एक मतप्रवाह असाही होता कि साठ्ये कॉलेज पर्यंतचा तरी रोजचा प्रवास कशाला? सरळ शैलेंद्रच्याच कॉलेज मध्ये प्रवेश घे. प्रवासाचा वेळ अभ्यासाला देता येईल.

प्रवासाचा वेळ अभ्यासाला देणे वगरे माझा हेतू अजिबात नव्हता, तरी मला तिसरा पर्याय खूपच सोयीस्कर वाटत होता. शैलेंद्र शाळेमध्ये माझी एक ओळख होती. अगदी शाळेच्या वॉचमन पासून, सगळे शिपाई काका, सगळा ऑफिस स्टाफ, सगळे प्रार्थमिक आणि माध्यमिक शिक्षक आणि अगदी समोरच्या बिल्डिंग मध्ये राहणारे लोक सुद्धा मला ओळखायचे. ह्यात खरंच अतिशयोक्ती नाही. असे सगळे असताना कशाला अश्या ठिकाणी जा जिकडे तुम्हाला कोणी ओळखत नाही आणि तुम्ही कोणाला ओळखत नाही, असा विचार माझ्या मनामध्ये घर करत होता.

ह्याच दरम्यान एक दिवस मी शाळेमध्ये चांगले मार्क्स मिळाले म्हणून पेढे द्यायला गेलो. का कोणास ठाऊक पण मी पेढे द्यायची सुरुवात टीचर्स रूम पासून न करता तळ मजल्यावरील प्राचार्य फणसेकर सर ह्यांच्या केबिन पासून करायचे ठरवले. मी माझ्या शालेय जीवनाच्या १२ वर्षात अगणित वेळा फणसेकर सरांच्या केबिन मध्ये गेलो होतो. कधी शाबासकी घ्यायला तर कधी ओरडा खायला. कारण काहीही असो पण नेहेमी त्यांच्या केबिनमध्ये शिरताना एक आदरयुक्त भीती वाटायची. आणि त्यांच्या केबिन मधून बाहेर पडायची घाई असायची. फणसेकर सरांचा तसाच दरारा होता. मी हळूच त्यांच्या केबिनचा दरवाजा ठोठावला. त्यांनी आतून "या" असे म्हंटले. मला बघून सर म्हणाले, "परेरा, आज काय?" मी म्हटले "सर, पेढे द्यायला आलोय." त्यांनी हसून मला आत बोलावले आणि खुणेनेच त्यांच्या समोरच्या खुर्चीवर बसायला सांगितले.

मी जाऊन त्यांच्यासमोर बसलो. ते काहीतरी वाचत होते. आपल्या उजव्या हाताची दोन बोटे दाखवून त्यांनी मला दोन मिनिटे थांब असा इशारा केला. मी काहीच न बोलता गुपचूप बसून होतो. त्यांचे वाचून झाल्यावर त्यांनी हातातला कागद बाजूला ठेवला आणि मला म्हणाले, "अभिनंदन, पण मी तुझ्याकडून अजून चांगल्या मार्कांची अपेक्षा केली होती." मला काय बोलावे कळत नव्हते. मी अस्वस्थपणे हसलो आणि पेढ्यांचा डबा त्यांच्या समोर धरला. त्यांनी त्यातून एक पेढा घेतला. मी त्यांना वाकून नमस्कार केला आणि थेट वळून दरवाज्याकडे जाऊ लागलो. मला कधी एकदा फणसेकर सरांच्या केबिनमधून बाहेर पडतोय असे झाले होते. एवढ्यात त्यांनी मला विचारले, "मग आता कुठल्या कॉलेजला ऍडमिशन घेणार? आणि कुठल्या शाखेत?" मी म्हटले, "सर, विज्ञान शाखा नक्की आहे पण कॉलेज अजून नक्की होत नाहीये." ह्यावर सर म्हणाले "का? प्रवेश अर्ज कुठल्या कॉलेजेस मध्ये भरले आहेस?" मी म्हटले "रुपारेल, साठ्ये आणि शैलेंद्र." कदाचित त्या वेळेला फणसेकर

सरांना माझ्या मनातली गोष्ट कळली असावी. अचानक ते मला म्हणाले, "रुपारेल किंवा साठ्ये ह्या पैकी कोणतेही घे. शैलेंद्र मधला तुझा प्रवास संपला आहे. आमचं काम आम्ही पूर्ण केलंय. आता ह्या मोठ्या कॉलेजेस मध्ये जा." मी ठीक आहे असे म्हणून बाहेर पडलो. फणसेकर सरांनी सांगितलेली गोष्ट न ऐकण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे मी साठ्ये कॉलेजला प्रवेश घेतला.

आज १६ वर्षांनंतरही हि आठवण माझ्या मनात घर करून आहे. ह्याचे कारण म्हणजे फणसेकर सरांनी दिलेल्या सल्ल्याचे महत्व मला आत्ता जास्त चांगले कळते आहे. 'जर खरेच चांगले शिकायचे असेल तर स्वतःला कठीण, अज्ञात परिस्थिती मध्ये झोकून द्यायला हवे' हाच त्यांच्या सल्ल्यामागचा सार होता. त्यांना माहित होते कि शैलेंद्रच्या कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन मी पुन्हा तिकडचा एक महत्वाकांक्षी विद्यार्थी बनून राहिलो असतो.

पण साठ्ये कॉलेजमध्ये असे मुंबईमधल्या सगळ्या शाळांमधले हुशार विद्यार्थी होते. त्यांच्या मध्ये राहून वावरून मला कळले कि ह्यांच्याशी स्पर्धा करायची असेल तर कसे शिकले पाहिजे, काय केले पाहिजे. माझ्या महत्वाकांक्षा इतरांच्या तुलनेमध्ये किती मोठ्या किंवा थिट्या आहेत, आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करण्याकरता काय करायला लागेल. सगळ्यात महत्वाचे म्हणजे, हे सगळे कसे करायचे हे मला माझ्या शाळेने आधीच शिकवले होते. आमच्या नकळत, आणि आमच्यावर काहीही न लादता, शाळेने आम्हाला पुढच्या प्रवासाकरता पूर्णतः समर्थ केले होते.

फणसेकर सरांचा हाच सल्ला मी पुढेही आचरणात आणला. पुढे के जे सोमैया, आय आय एम बंगलोर अश्या मोठ्या संस्थांमधून शिकताना प्राध्यापकांसह सह-विद्यार्थ्यांकडून आणि नंतर गोदरेज अँड बॉयस, लार्सन अँड टुब्रो अश्या कंपन्यांतून काम करताना वरिष्ठांकडून, सहकाऱ्यांकडून मी खूप काही शिकलो, शिकतोय असे मला वाटते.

आज जर मला कोणीही विचारले कि शाळेने तुला काय दिले, तर माझे उत्तर फार सरळ असेल, "माझ्या शाळेने मला कसे शिकायचे हे शिकवले!"

# मी कोरोना बोलतोय

• दुर्गाप्रसाद खांडाळेकर. बोरिवली, मुंबई.

आमच्या शेजारी राहाणारे शिवामामा दोन दिवसांपासून खोकत होते. त्यांना थोडा तापही येत होता. त्यांचा मुलगा सुनील याने त्यांना डॉक्टरांकडे नेले. डॉक्टरांनी करण्यास सांगितलेल्या कोव्हीड १९ च्या तपासणीचा निकाल पॉझिटीव्ह आला. कोरोनाच्या भयानक बातम्यांमुळे सेंटरमध्ये एकट्यानेच राहावे लागणार म्हणून मामा खूप तणावाखाली होते व पुढे काय होणार या विचाराने मामी देखील खूप घाबरल्या होत्या.

या सर्व गोष्टींमुळे मला रात्री बराच वेळ झोप नव्हती. रात्री उशीरानेच झोप लागली तर पहाटे कोरोनाच स्वप्नात आला. त्याचे लालभडक रंगाचे काटेरी गोळ्यासारखे रूप पाहून क्षणभर भीतीच वाटली. पण त्याचा खरखरीत आवाज येऊ लागला. तो म्हणाला थांब घाबरू नकोस. मी तुला माझी आत्मकथा सांगतो.

‘माझा जन्म चीनमध्ये झाला. चीनच्या वुहांग या शहरात काही वैज्ञानिक डुक्कर, वटवाघळे यासारख्या प्राण्यांवर गुप्तपणे प्रयोग करताना मी जन्माला आलो. पण प्रयोग करणाऱ्यांच्या निष्काळजीपणा मुळे मी वातावरणात पसरलो गेलो.

तुम्ही मला दोष देता! पण यात खरी चूक कोणाची? असे प्रयोग करू देणार्या सरकारची व ते निष्काळजीपणे करणार्याची कोणतीच जबाबदारी नाही का? कहर म्हणजे ही गोष्ट त्या सरकारने काही दिवस जगापासून लपवून ठेवली त्यामुळे माझा प्रसार जगभर आणखी जोमाने वाढला. यापूर्वी प्लेग,स्पॅनिश फ्लू वगैरे माझे भाऊबंद पृथ्वीवर येऊन गेले पण ते तेवढे भयंकर नसल्याने काबूत आले.

पण माझी गोष्टच वेगळी आहे.माझा प्रसार फारच वेगाने होतो. माझे स्वरूप कसे आहे ते पृथ्वीवरील संशोधकांना अजून नीट समजलेलेच नाही. त्यांचे प्रयत्न कळकळीचे आहेत पण मूळ स्वरूप कसे आहे ते न समजल्याने त्यात नेमकेपणा नाही. हत्ती व सात आंधळे अशी त्यांची अवस्था आहे. कोण म्हणतो अलोपथीची औषधे उत्तम तर कोण होमिओपॅथी

चांगली, तर कोण आर्युवेदिक औषधांच्या बाजूने बोलतो. त्यामुळेच जगभर माझ्या प्रतिबंधासाठी प्रयोग होत असले तरी त्यात यश आलेले दिसत नाही.

मानवजात थोड्याफार केलेल्या प्रगतीने फारच फुशारून गेलेली दिसते. आम्ही काहीही करू शकतो असा वृथा अभिमान तुमच्यातील काही जणांमध्ये दिसतो. तुम्ही थोडी प्रगती केलीत तरी तुमचे शरीर पूर्वीचेच आहे. त्याला तुम्ही गृहीत धरू नका. तुम्ही तेच करत आहात त्यामुळे माझ्यासारख्या सूक्ष्म विषाणूने तुमच्या नाकी दम आणला आहे. अमेरिका तुमचा प्रगत देश पण तेथेही लाखो माणसे माझ्यामुळे मृत्युमुखी पडली.

लॉकडाऊन च्या सुरवातीला तुम्ही नियम चांगल्या प्रकारे पाळले तेव्हा माझा प्रभाव कमी झाला.त्या काळात पर्यावरण,नद्यांचे पाणी देखील सुधारले. हा मुद्दा तुम्ही लक्षात घ्या.

सकाळी  उठल्यावर मुखमार्जनादी करून स्वच्छ स्नान करणे, आरोग्यदायी पौष्टिक अन्न खाणे, बाहेरून आल्यावर स्वच्छ हातपाय धुणे इत्यादी खूप चांगल्या सवयी समाजात होत्या.त्यांचा तुम्हाला आता विसर पडलेला दिसतो.

प्रगतीच्या नावाखाली तुम्ही निसर्गाचा विध्वंस चालवला आहे. त्यामुळे तुम्हाला ताळ्यावर आणण्यासाठी मला निसर्गाने पाठविले आहे असे समजा. निसर्गाशी सहकार्य करून प्रगती करा.निर्सगाला जिंकण्याची स्वप्ने पाहू नका.

तुमच्या बेपर्वाईने अब्जावधी रूपयांचे नुकसान झाले, लाखो माणसे मेली, लाखोंचे नोकरीधंदे गेले. माझ्या या निमित्ताने निसर्गाचे नियम पाळा. आरोग्याची काळजी घ्या. मग मला येथे राहाण्याची जरूर उरणार नाही. पण मी दिलेला दणका विसरू नका मला परत यायला लावू नका.

नंतर मी जागा झालो व स्वप्नावर विचार करू लागलो.

# कविता /

# चारोळ्या /

# कलाकुसर

# निरुद्देशिका अपडेटेड

- इग्नेशियस डायस, भुईगाव, वसई

प्रिय प्रोफाइलधारकांनो,

वाचकांनो, न-वाचकांनो, वाचकासारखे दिसणाऱ्यांनो,
न-वाचकासारखे दिसणाऱ्यांनो, वाचनवेड्यांनो,
वाचून वाचल्यासारखे करणाऱ्यांनो, वाचून न
वाचल्यासारखे करणाऱ्यांनो, न वाचून न वाचल्यासारखे
करणाऱ्यांनो, न वाचून वाचल्यासारखे करणाऱ्यांनो,

वाचून लाईकणाऱ्यांनो, न वाचून
लाईकणाऱ्यांनो, वाचून न लाईकणाऱ्यांनो,
न वाचून न लाईकणाऱ्यांनो, वाचून कमेंटणाऱ्यांनो,
न वाचून कमेंटणाऱ्यांनो, वाचून न कमेंटणाऱ्यांनो,
न वाचून न कमेंटणाऱ्यांनो, शेयरणाऱ्यांनो, पोस्ट्णाऱ्यांनो,
रोज पोस्ट्णाऱ्यांनो, अधूनमधून पोस्ट्णाऱ्यांनो,
मनातल्या मनात पोस्ट्णाऱ्यांनो, न पोस्ट्णाऱ्यांनो,

अंगठा कापून देणाऱ्यांनो, अंगठ्याच्या बदल्यात
अंगठा देणाऱ्यांनो, अंगठा मिळेलच्या अपेक्षेने
अंगठा देणाऱ्यांनो, अंगुठाबाज भाटांनो, अंगुठाबाज
लाळघोटयांनो, अंगठा शाबूत ठेवलेल्यांनो,

सेल्फीबहाद्दरांनो, फोटोबहाद्दरांनो, पाउटबहाद्दरिंनो,
माहीतगार प्रोफाईलधारकांनो, भाष्यकार प्रोफाईलधारकांनो,
प्रतिक्रियाकार प्रोफाईलधारकांनो, विद्वान प्रोफाइलधारकांनो,
सर्वकाही माहीत असणाऱ्यांनो, सर्वकाही माहीत न असणाऱ्यांनो,

आपण जे नाहीहोत ते भासवणाऱ्यांनो, आपण जे आहोत ते
लपविणाऱ्यांनो, आपण जे आहोत ते असणाऱ्यांनो,

चोळया हातांनो, लाळ्या जिभांनो,
हॅशटॅगच्या वाहत्या प्रवाहात हात धुवून घेणाऱ्यांनो,

# हाक

- फेलिक्स डिसोजा, भुईगाव, वसई

१.
इथून पुढे कुठे जाणार आहेस
कि हाच तुझा मुक्काम
हाच तुझा जन्म
हाच मृत्यू
हीच सुरुवात
हाच शेवट
कि इथून पुढे कुठे जाणार आहेस

किती चाललास
कुठून आलास
वाटेत कोण कोण भेटले
कोणाकडे पसरवलेस हात
कोणाच्या पोह-यातला पाणी प्यायलास
ओंजळीने
चेहरा धुताना आठवला का एखादा चेहरा
तेजस्वी

कुठल्या देवाचा केलास धावा
कोणाकोणाला दिलास खांदा
कोणासाठी सजवलेस फुलांचे हार
कोणाला दिली मुठभर माती
कोणाच्या आठवणीने तडमडलास
भुकेने तडफडलास की जेवू घातले
रस्त्यावर ओळख पाळख नसलेल्या
कुणीतरी

काय कोरतोयस मातीत अंगठ्याने
कशाचे शोधतोयस अवशेष
ही भूमी तीच भूमी आहे
जिच्या शोधात वणवण भटकावे लागले
तुला
कि हयाही पायाखालच्या माते-यात
आग्रह नाही मुक्कामाचा

२.
कुठल्याही कथेत शोभून दिसणार नाहीस
असा ॲन्टीप्रवासी निघालास तु
जो खूप खूप वर्षांपूर्वी निघाला आहे
प्रवासाला
जो अनवाणी आहे आणि
ज्याच्या पाठीवर गोठोडे आहे पूर्वापार
पण तुला सापडला नाही कुठलाच
जादुचा दिवा,
जादुची अंगठी
जादुचे बुट.....
किंवा तुझ्या करंगळीतून उगवून आले नाही
कुठलेच त्रिदल
तुझा प्रवास सुकर करणारं
गाणारं झाड उगवून आलं नाही रस्त्यात

घोटभर साक्षात्कारी अध्यात्म
उतरले नाही तुझ्या अंतरंगात
तुला ऐकावी लागली
भुक,थकवा आणि मृत्यूची प्रवचने
तुझ्या तल्लीन नामस्मरणात
आड आला उच्चाराचा

जन्मजात दोष
म्हणून पोहचू शकली नाही
तुझी आर्त भैरवी
देवस्थानापर्यंत

३.
इथून पुढे कुठे जाणार आहेस
कि पुन्हा तिकडेच
जिथून  केली होती सुरवात.

४.
वडिलांनी त्याच्या आईचा चेहरा
 पाहिला नाही कधीच
ते जन्माला आले आणि आईला
मातीचं पांघरूण दिलं

वडिलांना मातीची खूप ओढ होती
ते जेव्हा आई हा शब्द उच्चारायचे
तेव्हा माती खोरायचे पायाच्या अंगठ्याने

वडिलांनी अंथरूण धरलं
आणि आई या शब्दाचा जप केला
मरेपर्यंत
मृत्यूच्या कळानी थकलेला चेहरा
एक दिवस शांत देवदुतासारखा उजळला
वाटलं बाबा आता बरे होतायत
पण त्याच्या चेहऱ्यावर सुंदर मृत्यूचं
हास्य विसावलं...
न् खिडकीकडे डोळे उघडे ठेवून
ते मरण पावले

मग आम्ही त्यांना मातीचं पांघरूण दिलं.

५.
मला दिसणारं
प्रत्येक दृश्य अनोळखी आहे
मला येणारे आवाज
म्हणजे माझ्या पाठीवर आदळणारे
दगड आहेत
मागून धावून येणा-या
जमावाने फेकलेले

मी इथे कसा आलो
किती वर्षे मी इथे राहिलो
कि कोणीच कसं परिचीत नाही

कोणीतरी उभा आहे
लांब काठी घेऊन
मला काठीने दूर दूर ढकलतोय

मला दूर दूर जायचेय
इतक्या दूर कि जवळ जवळ पोहोचायचंय
अगदी जवळ
इतक्या जवळ कि
मला ऐकू येतील हाका

जसा मी खेळत आहे अंगणात
आणि घरून कोणीतरी बोलवत आहे
फेलि.... फेलि....
घरी ये.

# तो ती नि मत

महेश लिलापंडित, मुंबई

आजोबांनी मत दिलं
आजीने शिरसावंद्य केलं
मत नसलेल्या प्राण्याप्रमाणे
आजीने मताला आज्ञा मानली
पप्पांनी मत दिलं
मम्मीने पण मत दिलं
पप्पांनी डोळे वटारले
मम्मीने एकट्यात कुरकुर केली
त्याने मत दिलं
मी पण मत दिलं
त्याने संतापावर हास्य चढ़वलं
यू आर सच अ फेमिनिस्ट बीच म्हणत
गेला निघून बियर प्यायला
दोघांना भिन्न वाटतंय
मला वाईट वाटतंय
त्याला वाटतंय
मी सॉरी म्हणत मत मागे घ्यावं
तोपर्यंत
मी
'सच अ फेमिनिस्ट बीच'

("माणूस म्हणे" २०१९)

# चाचपड

महेश लिलापंडित, मुंबई

ज्ञान आणि
ज्ञानाचा भ्रम
यातल्या भेगेला
राहिलो आंधळा
गाढवपण
पाच मिनीटांचे
नव्हतं मान्य करवत
बौद्धिक पहेलवानांच्या
मजली कटआऊट्ससमोर
हार घालण्या इतपत
बापडूशकलो नाही
की
ज्ञानू शकलो नाही
डोळे मिटतांना
कळले तर बरे

(अथेति २०१५)

# भिंती

-सबिना फोस (गास,वसई) - ९१५८२२३५५२

एकच वात मिणमिणती
कोपऱ्यातल्या कोनाड्यात
अन् घरभर अंधार
तरी प्रत्येक वस्तू
दृष्य स्पष्ट कारण,
घरात भिंती नाहीत.

एक मोठा विजदिवा
छतावर टांगलेला
खोलीभर लख्ख प्रकाश
पण भिंती पलिकडे
अंधार किट्ट
अगदी काळा-कुट्ट

# मान्य नाहीए....

रचना रॉड्रिग्ज, नंदाखाल, वसई

निबिड अंधाराच्या अगणित रात्रीनंतर
तुझं आज उजाडलं होतं
क्षणभर माझंही मन सैराट झालं होतं
आज तुझ्याकडून गुडमॉर्निंग आलं होतं,
खरंच आली सय माझी की
तुझ्या संयमाचं लॉकडाऊन संपलं होतं??

कसं विसरू मी ते सारं जेव्हा
तुझ्या गोडगुलाबी मिठीत
बंध सारे गळले होते
तुझ्या इंद्रधनुषी स्वप्नांत

रंग माझे मिसळले होते
रविकर प्रकटले, इंद्रधनुचे रंग फिकटले,
ओंजळीत माझ्या कृष्णविवर तेव्हढे उरले
होते

असेल तुझी ती मजबुरी पण
माझ्या हृदयाला मान्य नाहीए...
असेन मी भोळी भाबडी तरी
हृदय माझं सामान्य नाहीए...
हृदयात तुझ्याविषयी हुरहुर असेल, नसेल
पण तुझं गृहीत धरणं मला मान्य नाहीए...

# मिशनरींचे ख्रिस्तायन !!

**फा. वेन्सी डिमेलो एस.जे.**

स्वये ख्रिस्त प्रभू ऐकती
मिशनरी ख्रिस्तायन गाती !! धृ !!

घेऊन खांदी क्रूस सेवेचा
दरीडोंगरी सेवा करण्या
दुरितांचे तिमीर मिटण्या
मिशनरी ख्रिस्तायन गाती.

जो राबतो श्रमिकांमध्ये
घाम गाळतो शेतांमध्ये
होतात जे तेथे सांगाती
श्रमिक हे ख्रिस्तायन गाती.

शुश्रूषा प्रीत्यर्थ जो रमला
परार्था प्राणास जो मुकला
गरजवंता अंगणी धावला
सेवेकरी हे ख्रिस्तायन गाती

न्यायार्थ ज्ञानार्थ जो लढतो
समता बंधुत्वात जो रमतो
स्वातंत्र्य एकतेसाठी झटतो
संविधानी हे ख्रिस्तायन गाती.

देवाची लेकरे ही, पद दलित
अतिपतित ना तेथ भेदभाव
आर्त अति विकळ कण्हती
उठवोनी त्या ख्रिस्तायन गाती.

रंजले गांजल्यास साह्य करीती.
अनाथा अन् दीना घरी धावती
औदास्य नैराश्य दूर करीती
नवचैतन्य हे ख्रिस्तायन गाती.

भोळी भाबडी जनता राउळी
असा भक्ताचा मेळावा भरवी
अंधश्रद्धेत बुडवून मावा खाती
सत्यधर्मी तेथे ख्रिस्तायन गाती.

धर्मांध लुटती जे जनास भूवरी
अन् विज्ञानावर पाठ फिरविती
अशांना आव्हान ते ध्यावे.
आसूड ओढूनी....
मिशनरी हे ख्रिस्तायन गाती.

# महामानव

नंदन पाटील, विरार

हे महामानवा,
मुक्या जीवाला जिवदान देण्यासाठी
स्वत: बळी जाण्यास तयार असणाऱ्या बुद्धात
प्रथम मला तू दिसलास !
समाजाचा छळ सोसूनही
'जो जे वांछिल तो ते लाहो'
हे पसायदान मागणाऱ्या ज्ञानेश्वरात
मला तुझेच दर्शन घडले.
आणि 'हे राम ! त्यांना क्षमा कर',
असे मृत्यूपूर्व उद्गार काढणाऱ्या
क्षमाशील गांधीजीत मी तुलाच पाहिले !
गोठ्यात जन्मून
तू दीनदुबळ्यांचा कैवारी झालास,
कुष्ठरोग्यांची मातेच्या ममतेने
सेवा केलीस.
निराधार, नाडलेल्या दु:खितांनी
तुला 'आकाशीच्या पित्याचा' प्रेषित केले.
तुला हवी होती दया क्षमा शांति !
त्यास्तव चंदनासारखा झिजलास तू
परिणामी तुला धर्ममार्तंडांनी
जिवंतपणी क्रूसावर लटकावले,
तेव्हा तू म्हणाला होतास,
'प्रभू, त्यांना क्षमा कर !'
हे महामानवा,
'संभवामि युगे युगे' म्हणणाऱ्या
श्रीकृष्णासारखा
पुन्हा भूतलावर ये
आणि वर्तमान मानवसंहार थांबव.

## चारोळ्या - आयवन क्रास्टो, उमराळे, वसई.

माझे पायातले पायताण,
वरताण होऊन पुढे सरकले.
अनवाणी माझ्या पायाला,
अलबत ! धरित्रीनेच सांभाळले.

मला आठवतोय माझा ध्यास,
एकट्यानेच केलेला पल्ल्याचा प्रवास.
चुरशीच्या उस्कटल्या अंधारात,
जीव वाचला ! बाकी गेले हरण्यात.

मरणाचे एक बरे असते,
संपूर्ण काळोखासह स्मृतींना विराम.
नाहीतर ! आठवणींच्या गलबल्यात,
जिवंत असण्याचा उगाच भ्रम.

श्वास तुझा तू,
असाच जिवंत ठेवावा.
हुंकार नित प्रतीत व्हावा,
हृदयात माझ्या चिर झिरपावा.

नभांशी झुलतोय गर्द निळा,
पानांशी उमललाय ऋतू पांढरा.
श्वासांत गुंतती जीव भोळा,
धुंद उड माझ्या प्रीती पाखरा

तू तुझ्या श्वासांना,
स्वैर सोडू नकोस.
उनाड अधीर प्रणयाला,
नित झुलवू नकोस.

## आम्ही शेतकरी - मेल्सीना तुस्कानो परेरा

आम्ही राहिली शेतकरी माणसं
आमचं शेतांमधी जीवन गेलं
राब राब राबूनी धान्य पिकवलं
तेव्हा कुठं दोन पैका मिळालं

देऊनी मला ह्या विधवेचे रूप
धनी अकाली सोडुनी गेला
देवाने तर माझ्या घराचा
कर्ता-धर्ताच असा नेला

तीन लेकरांची आय मी
कमवायला कोणी नाय
पोरांना ठेवूनी अशी घरात
म्या तर शेतावर जाय

भिजूनी जाय काळी आय
माझ्या घामानं आन अश्रूनं
दमूनी पार गेली मी माझ्या
डोक्यावरच्या ह्या कर्जानं

रखरखत्या दुपारच्या उन्हात
पूर्ण शरीर होळपून जातं
काळ्या मातीचा ढेगळ तो
अनवाणी पायाला लागतं

भूमीतूनी जेव्हा अंकुरुनी येती
सुवर्ण बीज कष्टाच्या घामाचे
तेव्हा मन येई भरूनी अन
टिपूर आसवे गळे आनंदाचे

# नि:शब्द

ॲलेक्स मच्याडो, नंदाखाल, वसई

शब्द .....शब्द......आणि शब्दच...

शब्द ओझरणारे, शब्द पाझरणारे
शब्द पांघरणारे, शब्द गोंजारणारे

शब्द टोचणारे, शब्द बोचणारे
शब्द रूचणारे, शब्द पचणारे

शब्द झिडकारणारे, शब्द स्विकारणारे
शब्द अव्हेरणारे, शब्द कवटाळणारे

शब्द मन कोरणारे, शब्द कुणासाठी झुरणारे
शब्द काळींज चिरणारे, शब्द हृदय चोरणारे

शब्द हिरव्या रानातले, शब्द पिकल्या पानातले
शब्द माझ्या मनातले, शब्द तुझ्या कानातले

शब्द रहाटमाळेचे, शब्द गावच्या शाळेचे
शब्द आेघळत्या लाळेचे, शब्द मातीच्या नाळेचे

शब्द ......शब्द.....आणि शब्दच....

शब्दांची झुल, शब्दांची भूल
शब्दांची चूल, शब्दांचाच पूल

शब्दांचं संगीत, शब्दांचा नाच
शब्दांचं लिहीणं, शब्दांतच वाच

शब्दांचं लाजणं, शब्दांचं सजणं

शब्दांच्या चांदण्यात, शब्दांचंच भिजणं

शब्दांची शिवी, शब्दांचीआेवी
शब्दांचा रवी, शब्दांचाच कवी

शब्दांचं घड्याळ, शब्दांची वेळ
शब्दांची भेळ, शब्दांचे खेळ

शब्दांची बढाई, शब्दांची चढाई
शब्दांची व्यथा , शब्दांचीच लढाई

शब्दांची जादू, शब्दांची किमया
शब्दांच जग, शब्दांचीच दुनिया

शब्दांचा थाट, शब्दांचा साज
शब्दांचा ताट, शब्दांचाच घास

शब्दांचा धूर, शब्दांची आग
शब्दांचं झाड, शब्दांचीच बाग

शब्दांची हवा , शब्दांचा वारा
शब्दांचा पाऊस, शब्दांच्याच धारा

शब्दांची रेषा , शब्दांची भाषा
शब्दांच्या मैफीलीत शब्दांचीच नशा......

शब्द.....शब्द........आणि शब्दच...

कसं बोलावं, किती बोलावं
कि राहावं नुसतं स्तब्ध
करून पाहावं स्वत:ला कधी...
नि:शब्द.....नि:शब्द............नि:शब्द

# किनारा

फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे

निरभ्र आकाश
सोसाट्याचा वारा,
अंगावर झेलताना
निसर्ग बेभान होई सारा.

मृदु वाळू
उसळणाऱ्या लाटा,
चालताना त्यामधूनी
अंगावर येई काटा.

डोलणाऱ्या बोटी
उडणारे पक्षी,
निसर्गवैभवाला
आपण नयनसाक्षी.

रवी तेजस्वी
झुके सागरात,
प्रतिबिंब शोधत
निरखे दिमाखात.

तप्त सूर्य
पाण्यात विलीन झाला,
काळोख्या रात्री
चंद्रप्रकाश पृथ्वीवर आला.

# आठवण

फ्रँक डॉ. मिरांडा, उमराळे

प्रखर ऊन सदाभोवती
झाली अंगाची लाही-लाही,
क्षणात नभ दाटूनी आले
सूर्यराजेही घनात विलीन झाले.

तप्त दिवस शेवटाला आला
पावसाचा सुदैवी प्रारंभ झाला,
पावसाचे थेंब अंगावर झेलताना
आठवणींच्या शहराला पूर आला.

पावसाची सर आता
नुकतीच बरसली,
आठवणींची वाट
पुन्हा एकदा हिरवळली.

मन दाटूनी आले
लक्ष विचलित झाले,
डोळ्यांतील अश्रूही
पावसासोबत मिसळून गेले.

क्षणार्थात बदलली सृष्टीची आवर्तने
वृक्ष-वेली आनंदाने डोलू लागले,
सर्वांग पावसाने चिंब झाले
मनही आठवणींच्या हिंदोळ्यावर बेधुंद झाले.

# आठवण

प्रवीण पाटील, वसई

गावाचे शिलेदार आम्ही एकदा
कारागृह हो पाहिला
तो आठवणींचा संच आमुचा, पुस्तक कैद राहिला !

वैराग्य जणू जीवनाचे
क्रांतीसाठी जो जगला
धडपडला तो बोलला
सत्याग्रही असा मी ठोकळा
झुगारून आदेश गुलामीचे
घेण्या स्वातंत्र्य श्वास मोकळा
तो आठवणींचा संच आमुचा, पुस्तकी कैद राहिला !

नव्हते शिवबा, नव्हते बाळ, नव्हते महात्मा-बाबा
विचार तयांचे सोबतीला
संविधान मखमल परिधान असा
विवेकाचा मेरू मी जाणिला
स्पर्श क्रांतिकारी विचाराचा
चिमटीतुनि गजापल्हयाड मी वाहिला
तो आठवणींचा संच आमुचा, पुस्तकी कैद राहिला !

संवेदना पसरली आसमंती,
देखि क्रांतीचे क्षण
तटबंदीला बांध फुटला
गुन्हा नव्हे हा एल्गार !

अभिमानी सांगत सुटला
आता मागे नाही सरणे
मरण बांधले हो डोईला
तो आठवणींचा संच आमुचा, पुस्तकी कैद राहिला !

रस्ते सुष्क कधी तापले
धुमसणा-या चुलींनी संप घेतला
झेलत दंडूक-फुले हुकुमशाहीची
कचेरीच्या अंगणात, लाल सडा कुणी हा ओतला ?
इतिहास सागरी सेतूचा पुन्हा न घडले
अश्रू लपविणारा न्यायदेवताही मी पाहिला
तो आठवणींचा संच आमुचा, पुस्तकी कैद राहिला !

# कुणीच नसते

प्रवीण पाटील, वसई

कोमात गेल्यात सा-या आशा
जिद्द काय ती फक्त जिवंत
स्वत:शीच लढते आहे
अन् कूस बदलते आहे
मनातल्या मनात

शिरा-धमन्या गढुळ झाल्यात
टणक, फुगीर बनल्यात
सांधवल्यात काही ठिकाणी
चिवट चरबीच्या धाग्यांनी

खिळवून पडले अवयव निपचित
लवंडणारी मान,
गळालेले देहभान
थेंब-थेंब ठिबकणारा 'ग्लुकोज'
एक संजीवनी तितकीच !

व्हेंटिलेटरवरचा कृत्रिम श्वास
दरवळणारा 'ईथाइल अल्कोहोल' चा वास
सिझर्स, ब्लेड, डिसेक्शन बॉक्समधील
शस्त्रांचा खळखळ आवाज
मेंदूला बधिर अधिक बधिर करणारा

कुरतडलेला मज्जा-चेतारज्जू,
आतडयांची पोखरलेली बिळे
वेदनेने विव्हळताना
टाळ चिपळ्यांचा गजर,
घंट्याचा नाद घुमणारा
घुमटावरच्या भोंग्याचा कर्णकर्कश आवाज,
वेदनेची तीव्रता झाकणारा ?

कुणी नसते ?
लपलेले सारेच
मतलबी, सोंगाडे
उभे आपापल्या मालकीच्या 'व्हरांड्यात'
राम ख्रिस्त पैगंबर सारेच ??

# आजोळ

ब्रायन मेंडिस, बोळींज, वसई

अजुनही शहारतं माझं अंग
आणि हताश वाटतं खूप
जेव्हा आठवतो तो दिवस
ज्या दिवशी माझं आजोळ सुटलं.. . कायमचं
होरपळून गेलं माझं बालपण...
कडाडणाऱ्या विजेसारखा अंगावर कोसळतो तो दिवस
त्यादिवशी मी घरी आलो... पण..
केवळ शरीराने
मन मात्र यायला तयार नव्हतं
ते रेंगाळतच राहिलं आजोळी
अगदी आजपर्यंत...

वादळ वारा पाऊस सुरू झाला की
मन बेभान होऊन जातं
सुसाट धावत सुटतं आजोळच्या वाटेवरून
गळक्या छताखाली ठेवलेल्या बादल्या
त्यामध्ये टपाटपा पडणारे पाण्याचे ते थेंब
सारवलेली जमीन ओलावत
उडणारे पाण्याचे ते थंडगार तुषार
सगळं कसं लक्ख दिसु लागतं डोळ्यांसमोर...

अजून फुललेली असेल का खिडकीतील सदाफुली?
की कोमेजून गेली असेल ती ?
अजुनही असतील जिवंत ती केळीची झाडं?
मोरीतल्या पाण्यावर जगणारी
की त्यांनी पण टाकली असेल मान केव्हाचीच?
घोंगावत्या विचारांनी घायाळ होतं मन
घुसमटून गुदमरून जातो जीव...
मन धावत राहतं मग झोके घेण्यासाठी
छताला टांगलेल्या मामाकडच्या हिंदोळ्यावर

जाड भिंगाचा चष्मा आणि डोक्याला टक्कल
किती तरी दिसायचे असे मामा
पण हवीहवीशी वाटणारी प्रेमळ आजी. ..?
ती कधी दिसलीच नाही मला
आज मामाचं कुटूंब नव्हतं तेथे
आजोळ मात्र साद घालत होतं मला
कित्येक वर्षं,

ते कच्चे रस्ते, ते बदामाचं झाड,ती विहीर,
तो रातराणीचा दरवळ आणि ते गाईचं हंबरणं
सगळेच मला ओळखत होते
अगदी नावानिशी....

आयुष्याचा पूर्वार्ध संपून गेला होता
उत्तरार्ध सुरू झाला होता उतारवयाचा
काळयाचे पांढरे झाले होते केस

आणि माझ्या अंतर्मनातील ओढ निघाली होती मला घेऊन

पुन्हा एकदा माझ्या आजोळी

माझ्याकडे वाकून झुकून बघणारी
वेशिवरील ती नारळ सुपारींची झाडं, तो
चौथारा,
काळजात घुसत होतं सगळं
कंठ दाटून येत होता माझा..

मी मामाच्या घराजवळ पोहोचलो
आणि जणू आठवणींचा डोंगरच
कोसळला अंगावर
ओटीवरच्या त्या दगडी काळया चिऱ्या
अजूनही शाबूत होत्या
येथेच आम्ही भावंडं खेळायचो,
भांडायचो...

दाराला लावलेलं कुलूप
गंजून गेलं होतं
माझ्या मनासारखंच...
ते शरण आलं पटकन....
हॉल उदास वाटत होता...
सगळंच भकास झालं होतं
आपसूक माझी नजर वर गेली...
त्या रंगहीन छताकडे...
आजीची आठवण आली खूप
छतावरील भूतांची भीती घालत
झोपवायची ती आम्हाला.. येथेच..मायेने
वेंगेत घेऊन
आज पण दिसत होती भुतं त्या रंगहीन
छतावर
पण आज आजी नव्हती
आणि भीतीही नव्हती...

सगळंच संपलं होतं...

आजीची ती जुनी लाकडी पेटी
तशीच होती अजून ओसरीमध्ये
काही गोष्टी युगानुयुगे जिवंत राहतात.

पेटी उघडताना माझे हात थरथरत होते
तो परिचित शिळ्या खाऊचा वास नाकात
घुसला
ह्याच खाऊवर आजीने भूक भागवली
होती कधी आमची
आता खाऊ संपला होता
भूक पण मरून गेली होती...
आजीबरोबरच

जुना कालनिर्णय फडफडत होता
खिडकीमधून घुसणाऱ्या वाऱ्याबरोबर
खिडक्यांचा  आता नुसताच सांगाडा
राहिला होता
जुनाट लाकडी चौकटीचा
आजीचा पण शेवटी असाच राहिला होता
सांगाडा
जुनाट ठिसूळ झिजलेल्या हाडांचा...
जुने कालनिर्णय फडफड होते
कालनिर्णयची रोजनिशी करायचा मामा
आणि लिहीत राहायचा रोज
कामाचं बिनकामाचं काहीबाही....पण
कायम...

धडधडत्या मनानेच पाऊल ठेवलं
परसदारी..
केळीचं नामोनिशाण नव्हतं
सदाफुली रुसली होती ... कायमचीच
काहीच नव्हतं शिल्लक...
आपली माणसं तरी कुठे होती?.....
आता राहिल्या होत्या त्या फक्त
आठवणी....

# वारमोड

आयवन डिकुन्हा, नानभाट

भरले क्षितिज आटोक्या पलीकडे
विचाराची गाथा त्याहून पुढे
माझी काय औकात लढण्याची
मी तर एक छोटा जीव भीती मला मरणाची !

दवाखान्याच्या पायरीवर चढल्यावर
माझे शहाणपण कधीच गळून गेले
त्यांचं पण तेच म्हणणं आहे
तुमच्यासारखे किती आले आणि किती गेले !

कोर्ट कचेरी ची पायरी चढलो
मोठ्या रुबाबा ने आत शिरलो
एवढ्या फेऱ्या माझ्या आयुष्यात
येरझाऱ्या मारता माझं अस्तित्व हरलो !

मित्राबरोबर बसताना माझा रुबाब खूप
दिखाव्याच्या दिवाळीत हरपून गेलो
मीच मोठा आणि श्रेष्ठ म्हणत
मी कसा माझंच राहून गेलो !

उतरत्या वयात कुठचा आला जोर
कोण विचारतोय म्हाताऱ्याला आता
जे होतं नव्हतं त्याचा केला बाजार
सांभाळत नाही जिवाचा हा आजार !

जवानी कशी रात्री सारखी
जागरण केलं तर भरत नाही
उगाच झोपून काढली तर
आयुष्य अजून काही उरत नाही !

शर्टाचं बटन काढणारा, जग जिंकणारा
ह्या दोघांना मी बघितलं जवळून
राखेवर रडणारयांची राख झाली
ओहटी नंतर आता पुन्हा भरती आली !

क्षितिजा पुढे का मी जावे
आयुष्य माझे रंगीन मी जगावे
रंगरंगोटी जीवनाची आनंदाने भरावी
आयुष्याची वारमोड मी कशापायी करावी !

भरले क्षितिज आटोक्या पलीकडे
वारमोड माझी मीच थांबवावी
माझा मी पणा आता सोडून
भरती नंतरची ओहटी मी पहावी !

# फाशी हा उपाय नाही

स्वीनी डिमेलो, गास इयत्ता : ९वी

दुःख आणि अडचणी हे जीवनाचे भाग असतात ,
पण जीवाचं बरं वाईट करणे हे त्याचे सोपे उपाय नसतात.

दोरीचा गोफ बांधून लोक घेतात फाशी,
त्यांच्या दुःखापाशी राहतात त्यांचे आई - वडील उपाशी .

उत्तराचे सर्व दरवाजे बंद झाले कि मृत्यूचा दार खुलतो असे नाही,
आत्महत्या केली तर जीवनाला काही अर्थ राहत नाही.

दुःख सर्वांनांच असतात,
पण काही मूर्ख आपला आमोल जीव गमवून बसतात.

जीवनात मोठे पावले घ्यावे लागतात आवश्य,
पण इतके मोठे नाही कि नष्ट होईल आपले पुढचे भविष्य.

जीवनात मोठे प्रश्न सर्वांनांच असतात,
पण सर्वच प्रश्नाला लवकर सोपे उत्तर नसतात.

राग हा माणसाला नाही होत सहन,
मग नाहीस्तव ठेवावा लागतो आपला अमोल जीव गहन.

जीवनांत मोठे पावले घेताना द्यावे थोडे लक्ष्य,
नाहीतर होऊ शकतात आपण मृत्यूचे भक्ष्य.


# कलाकुसर :-

## पॉल डिमेलो:-





ऑस्टिन डाबरे :-






## ऑल्विन कोरिया :-








## रॉयल बॅप्तिस्ट रॉड्रिग्ज :-






## ऑल्विन परेरा :-







## जोएल फुट्यार्डो :-







ऋतुजा किरण मोरे (इ. ५वी) :-





## लिओनार्ड रिबेलो :-








रॉबर्ट परेरा :-

